
# 2

# जोडीदाराची निवड

•

# लैंगिक शिक्षण



**अनिल भागवत**

**वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशक**

**जीवनसाथ**

दुसरी आवृत्ती

जीवनसाथ - 12 पुस्तकांच्या संचापैकी

पुस्तक क्र. 2

# जोडीदाराची निवड
•
# लैंगिक शिक्षण

## जीवनसाथ

जीवनभर स्पष्ट विचारांची साथ म्हणजे जीवनसाथ

**अनिल भागवत**

वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशक

**प्रकाशक**
अनिल भागवत
ई 3/21 गिरिजा शंकर विहार
कर्वे नगर, पुणे 411052




प्रथम आवृत्ती : 27 डिसेंबर2015

मुखपृष्ठ : आभा भागवत

**टाइपसेटिंग**
स्मिता टाईपसेटर्स
1120, सदाशिव पेठ,
पुणे 411030

**मुद्रणस्थळ**
स्मिता प्रिंटर्स,
1019, सदाशिव पेठ,
पुणे 411030

**किंमत 350 रुपये**



# अनिल भागवत – ओळख

- बांधकाम व्यवस्थापनाचं अमेरिकेत शिक्षण आणि नोकरी
- अमेरिकन ग्रीन कार्ड होल्डर असूनही भारतात परत येण्याचा निर्णय
- 8 महिने 50,000 कि.मी. आणि 35 देशांचा स्वतः गाडी चालवत बायकोबरोबर प्रवास
- भारतात अतिजलद आणि दर्जेदार बांधकाम व्यवस्थापनाचा अनेक वर्षं व्यवसाय
- तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्र यांचा रोजच्या आयुष्यात उपयोग करण्याविषयी खास अभ्यास
- 'वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशन' या विषयात डॉक्टरेटचं काम पूर्ण
- इंग्लंड आणि अमेरिकेत पालक-शिक्षण आणि विवाह-शिक्षणाच्या कार्यशाळा
- विवाह-शिक्षणाचे 500 च्या वर कार्यक्रम (1997 ते 2015)
- पालक-शिक्षणाचे 300 च्या वर कार्यक्रम (1980 ते 2015)

सामाजिक कामं -

- जीवनसाथ अभ्यास मंडळ – प्रमुख सल्लागार
- जीवनसाथ समुपदेशन केंद्र – प्रमुख समुपदेशक
- पालक विद्यापीठ – सल्लागार
- इंग्लिश संभाषण वर्ग – प्रमुख शिक्षक
- रोजच्या आयुष्याचं व्यवस्थापन – डायरी प्रशिक्षण – प्रमुख प्रशिक्षक
- सुंदर हस्ताक्षर वर्ग – प्रशिक्षक

- लेखन – वर्तमानपत्रांतून, नियतकालिकांतून अनेक वर्षं लिखाण

## पुस्तकं -

1. घर पाहावं बांधून (5 वी आवृत्ती)
2. लग्न पाहावं करून (उपलब्ध नाही)
3. व्यवस्थापनशास्त्र तुमच्यासाठी (2 री आवृत्ती)

●



# शोभा भागवत – ओळख

- मराठी, संस्कृत, इंग्लिश भाषेत पदव्या
- अमेरिकन ग्रीन कार्ड होल्डर असूनही भारतात परत येण्याचा निर्णय
- 8 महिने 50,000 कि.मी. आणि 35 देशांचा स्वतः गाडी चालवत नवऱ्याबरोबर प्रवास
- 2 वर्षं युनिसेफसाठी शैक्षणिक सल्लागार
- गरवारे बालभवन, सारसबाग, पुणे. च्या संचालक (1985 ते 2015)
- भारत सरकारतर्फे शैक्षणिक कार्यक्रमासाठी ब्राझिलला भेट
- इंग्लंड आणि अमेरिकेत पालक-शिक्षण आणि विवाह शिक्षणाच्या कार्यशाळा
- विवाह-शिक्षणाचे 300 च्या वर कार्यक्रम (1997 ते 2015)
- पालक-शिक्षणाचे 1000 च्या वर कार्यक्रम (1980 ते 2015)

सामाजिक कामं -

- पालक विद्यापीठ – प्रमुख सल्लागार
- जीवनसाथ अभ्यास मंडळ – सल्लागार
- अक्षरनंदन शाळा – सल्लागार
- महाराष्ट्र पालक शिक्षक संघ – कार्याध्यक्ष
- डॉ. स्नेहल अशोक स्मृती न्यास – विश्वस्त
- हुजूरपागा नियामक मंडळ – सदस्य
- लेखन – वर्तमानपत्रांतून, नियतकालिकांतून सातत्यानी लेखन

## पुस्तकं

1. आपली मुलं (राज्य पुरस्कार प्राप्त)
2. गारांचा पाऊस (राज्य पुरस्कार प्राप्त)
3. मूल नावाचं सुंदर कोडं
4. दिवास्वप्न (अनुवाद)
5. दलित पुरुषांच्या आत्मचरित्रातील स्त्री प्रतिमा
6. बहुरूप गांधी (अनुवाद)
7. आनंदाच्या पाऊलवाटा
8. देणारं झाड (अनुवाद)
9. मांजरांची वरात (अनुवाद)
10. गंमत जत्रा
11. विश्व आपलं कुटुंब
12. स्त्रियांचे प्रश्न
13. खेळण्यांचा जादूगार - अरविंद गुप्ता
14. सिंह आणि चिंगुली लाल चिमणी (अनुवाद)
15. खट्याळ उंदीर (अनुवाद)
16. अमरपत्र (अनुवाद)
17. शहाणी मुलं छान मुलं (अनुवाद)
18. बियांचे प्राणी (अनुवाद)
19. अंगठ्याची चित्रं (अनुवाद)
20. बोलणारे दगड (अनुवाद)

## आगामी पुस्तकं

21. सारं काही मुलांसाठी
22. शिक्षण आणि शांती (अनुवाद)

**नाटक –** आम्ही घरचे राजे (थिएटर अकादमी)

अनेक लेख, कविता, आकाशवाणी आणि दूरदर्शनवर कार्यक्रमांचं लेखन आणि सादरीकरण

●

# प्रस्तावना – शोभा भागवत

आमचं 'जीवनसाथ विवाह अभ्यास मंडळ' 1997 मधे सुरू झालं. आमची दोन्ही मुलं तेव्हा लग्नाच्या वयाची होत होती. अनिलला तेव्हा असं सारखं वाटत होतं की, आपण दोघांशी लग्नाबद्दल सूत्रबद्ध बोलायला हवं, पण या वयातली मुलं कुठं आई-वडलांचं ऐकण्याच्या मनःस्थितीत असतात? त्यांच्या मित्र-मैत्रिणींचा गट जमवणं, त्यांच्या पालकांनाही बोलावणं आणि दर रविवारी 2-3 तास एकत्र चर्चा करणं ही कल्पना मात्र त्यांना आवडली, आणि आमच्या घरीच 'जीवनसाथ' सुरू झालं.

'जीवनसाथ' म्हणजे स्पष्ट विचारांची जीवनभराची साथ. खूप जणांना असं वाटतं की, अविवाहित मुला-मुलींसाठी हे गट चालवतात, म्हणजे हे वधूवरसूचक मंडळ आहे. पण असं लग्न जमवण्यासाठी मंडळ चालवण्यात आम्हा दोघांनाही रस नाही. अर्थात, मंडळाच्या निमित्तानी एवढ्या वर्षांत लग्नाचा अभ्यास करता करता परिचय होऊन बरीच लग्नं ठरली, झाली, टिकली आणि ती विचारपूर्वक झाली याचं आम्हाला समाधान वाटतं.

18 वर्षांच्या अनुभवानी आम्हाला असं वाटतं की, तरुण मुली लग्नाबद्दल खूप विचार करतात. कारण, त्यांना जाणीव असते की, लग्नानंतर पुरुषाचं आयुष्य फार बदलणार नाही, पण बाईचं सगळंच बदलून जातं. या उच्चशिक्षित मुली असं म्हणतात की, लग्न हे काही आयुष्यभराचं 'अल्टिमेटम' नाही हे आमच्या पिढीला कळलेलं आहे. आमचं स्वत्व आम्हाला जपायचं आहे. त्याचप्रमाणे, एका व्यक्तीशी आयुष्यभर आपण जोडले जाणार, तर ती कशीतरी उरकून टाकायची पण गोष्ट नाही. लग्नानंतर आपलं आयुष्य घडूही शकतं किंवा बिघडूही शकतं. त्यामुळं स्वतः विचार करून स्वतःच निर्णय घ्यायचा.

ठराविक 'कांदापोहे' कार्यक्रमाचं स्वरूप बदललं आहे. तरीही अजून परिचयात मोकळेपणा नसतो. शिक्षण, पगार, घरदार, दिसणं या व्यावहारिक गोष्टींकडेच झुकतं माप असतं. माणूस म्हणून एकमेकांची ओळख होत नाही. खरं अंतरंग कळत नाही.

एखाद्या जोडीत कुटुंबातल्या पार्श्वभूमीमुळे, वातावरणामुळे मनमोकळा संवाद असला, तरीही लग्नाच्या वेळी विचार नेमका कशाकशाचा करायचा याबाबतीत पालकांना काही कल्पना नसते. मुलांना वाटतं पालक काहीतरी सांगू शकतील. त्याचवेळी पालकांना वाटतं, आजकालच्या मुलांना सगळं माहिती असतं. शेवटी दोघांकडून मिळून आवश्यक असलेला स्पष्ट विचार कमी पडतो.

आज प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्याचा ध्यास आहे. अशा वेळी वरवर भेटून, बोलून आयुष्यभराचा निर्णय कसा घ्यायचा? लग्न म्हणजे काय एक दिवसाचा सोहळा आहे का? ती आयुष्यभराची दोघांनी केलेली 'कमिटमेंट' आहे.

लग्नाच्या वयात घरून प्रचंड मानसिक दबाव असतो, असंही मुली सांगतात. त्यात बहुतेकींनी घरात आई-वडलांचंच आयुष्य अत्यंत असमाधानी पाहिलेलं असलं, घरात आई-वडलांची एकमेकांना, मुलांना मारपीट पाहिलेली असली, तर लग्नाबद्दल प्रचंड साशंकता असते. अनेक कुटुंबांत दुर्दैवानी तरुण मुला-मुलींना मोकळेपणानी बोलता येत नाही. अनेकदा पालकांशी संवादच तुटलेला असतो.

याला उपाय म्हणून, आपल्या समाजात या मुला-मुलींसाठी काय सोयी उपलब्ध आहेत? वधू-वर सूचक मंडळं आहेत, ती पालकांना जेवढी आकर्षक वाटतात, तेवढी मुला-मुलींना वाटत नाहीत. मेळाव्याचा अनेकांनी धसका घेतलेला आहे. विवाहपूर्व समुपदेशन खऱ्या अर्थानी विकसित झालेलं नाही. इंटरनेटचा आधार अनेकजण घेत आहेत, पण त्याची विश्वासार्हता अजून सिद्ध व्हायची आहे. समोरची व्यक्ती खरं बोलतेय असा विश्वास वाटत नाही.

इंटरनेटवर विवाहाविषयी माहितीचा धबधबा असतो, पण त्यातली बरीचशी पाश्चात्त्य असते. स्वतःला उपयोगी असं फारच कमी सापडतं.

अशा वेळी परिचयोत्तर विवाह असा काही कुठे पर्याय आहे का? मैत्रीतून विवाह असा काही 'प्लॅटफॉर्म' आहे का? या शोधात तरुण आहेत. त्यामुळेच जिथे केवळ पैशांसाठी काम चालत नाही, पण जिथे समाजकार्य असाही आव नाही, जिथं कुणाचं दडपण विचारांवर नसेल आणि निर्णयासाठी दबाव नसेल,

जिथे तरुणांचा सन्मान जपला जाईल आणि मार्गदर्शन म्हणून उपदेशांचे डोस नसतील, अशा विवाह अभ्यास मंडळाच्या शोधात मुलं-मुली आहेत. ही गरज ओळखून 'जीवनसाथ'ची सुरुवात झाली.

'जीवनसाथ' सुरू केल्यापासून अनिलनी वैवाहिक जीवनात येणाऱ्या प्रश्नांची यादी करून अभ्यासाला सुरुवात केली. विवाहामधल्या प्रश्नांचा अभ्यासक्रम तयार केला. त्याचं 'मॅनेजमेंट' या विषयाचं शिक्षणही आहे आणि व्यवसायही आहे. त्यातली तत्त्वं वैवाहिक जीवनात उपयोगी आहेत. आपण कसे आहोत हे कळणं आणि दुसऱ्याला पारखता येणं, यासाठी त्यानी व्यक्तिमत्त्वाच्या प्रकारांचा अभ्यास केला आहे. विवाहासाठी काय प्रकारची प्रगल्भता हवी हे शोधण्याचं त्याचं काम चालू आहे. त्याचं मानसशास्त्राच्या अंगानी 'वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशन' या विषयातलं डॉक्टरेटचं काम पूर्ण आहे. पीएच.डी. हातात मिळणं बाकी आहे. क्रिटिकल ॲनॅलिसिस या पद्धतीनी तो तरुण मुला-मुलींना आपले प्रश्न सोडवण्याचा आत्मविश्वास देतो आहे. अतिशय सातत्यानं 'ग्रुप काउन्सेलिंग' आणि 'इंडिव्हिज्युअल काउन्सेलिंग' करतो आहे. त्याची अभ्यासू वृत्ती, शिस्त, चिकाटी, तरुणांशी संवाद साधण्याचं कौशल्य, हे काम करण्यासाठी 'ट्रेनर्स' तयार करणं, हे सगळं पाहणं, त्यात मदत करणं हा माझ्या आनंदाचा भाग आहे.

'जीवनसाथ'मधे अविवाहित तरुण-तरुणी तर येतातच, पण नवविवाहित, मध्यमवयीन विवाहित जोडपी, घटस्फोटित व्यक्ती, अविवाहित राहण्याचा निर्णय घेतलेली मंडळीही येतात. त्यांच्यामधल्या विचारांच्या देवाण-घेवाणीचा सर्वांनाच उपयोग होतो.

एक मध्यमवर्गीय घरातला खूप न शिकलेला मुलगा. तो सांगत होता –

''आमच्या घरात जे विषय उच्चारले सुद्धा जात नाहीत त्यावर इथे मोकळेपणानी बोलतात हे पाहून मी चक्रावूनच गेलो. मित्राच्या सांगण्यावरून मी इथे आलो आणि मला कळलं की, इथे केवळ लग्नाविषयी नाही, तर इतर खूप विषयांबद्दल चर्चा होते. आयुष्य स्वस्थ आणि समाधानी कसं होईल हे कळतं. 'ग्रुप डिस्कशन'मधे अनेक माणसांचे विचार कळतात. इतरांच्या प्रश्नांची कल्पना येते.''

एक अतिशय गंभीर मुलगी आहे. तिनं अतिशय विचारपूर्वक लग्न केलं आहे. ती एकदा चर्चेत सांगत होती–

''लग्न म्हणजे तडजोड आणि ती बाईलाच करावी लागते. पण 'जीवनसाथ'मधे

येऊन मुलांमधेही तडजोडीची जाणीव आणि इच्छा निर्माण होते. एकमेकांत खेळीमेळीचं वातावरण असण्यासाठी वैचारिक पातळी जुळणं आवश्यक आहे. विचार जुळले तर 'कम्फर्ट लेव्हल' वाढते. एकमेकांचे दोष स्वीकारणं सोपं जातं. प्रत्येक माणसात दोष असणारच, मतभेद असणारच, पण ते कमी कसे करायचे ते इथे आल्यावर उमगलं.''

''आम्ही दोघं लग्नापूर्वी एकमेकांशी करिअर, पैसे, मित्रमैत्रिणी, कुटुंब यांविषयी बोललो. आमचे बरेच विचार जुळत होते. यावेळी निर्णय घेताना आम्हाला अनिलदादांनी सांगितलेली 'क्रिटिकल ॲनॅलिसिस'ची पद्धत उपयोगी पडली. आता लग्न झाल्यावर हा विचार किती महत्त्वाचा होता, ते लक्षात येतं आहे.''

एक रोखठोक मुलगी सांगते, ''मी 'हेडस्ट्राँग' आहे. पटल्याशिवाय काही करणार नाही. मुलं बघताना मी खूप विचार करत होते. पण मुलगे 'टिपिकल माइंडेड' असतात. मग नकार सुरू झाले. बाबांना त्याचा त्रास होऊ लागला. अजूनही मला जे हवंय ते मला सापडत नाही. जीवनसाथमधे लग्न जमलं तर मला आवडेल, पण इथे स्वतःला समजून घेण्याचा आणि इतरांना समजून घेण्याचा एक दृष्टिकोन मिळाला. तो मला उपयोगी पडतो आहे. सर्वांना मतं असतात. ती एकमेकांवर लादू नयेत, हे मी इथं शिकले. आपल्या समाजात मुलग्यांची मतं खूप पारंपरिक आहेत. माझ्यासारख्या मुलींना फार निराशा येते. अशा वेळी जीवनसाथचा मला खूप आधार वाटतो.''

लग्नाच्या निमित्तानी एकूण मानवी सूक्ष्म, नाजूक, तरल नाती आणि भावभावना यांचा हळुवार गोफ गुंफला जात असतो. त्याचा नितांत सुंदर अभ्यास या मंडळात होतो. आजच्या नव्या विचारांनी कालचा मनस्ताप पुसता येतो, हे मला या अभ्यासाचं सामर्थ्य वाटतं.''

जीवनसाथमधे सातत्यानं गेली पाच वर्षं येणाऱ्या एक मध्यमवर्गीय पालक म्हणतात :

''लग्न ठरविताना पत्रिकेवर अनावश्यक भर असतो, पण मुलामुलींच्या गाठीभेटी, चर्चा जास्त आवश्यक असतात. दोन कुटुंबांच्या परिचयासाठी वेळ देणं आवश्यक असतं, ते होत नाही. जीवनसाथमधे येण्यापूर्वी माझी मतं पक्की नव्हती. 50-50 टक्के दोन्ही बाजू खऱ्या वाटायच्या. पण आता मी योग्य शब्दांत माझा मुद्दा पटवून देऊ शकते. पालकांनाही या अभ्यासाची गरज आहे.

लग्नात पालकांचा पुढाकार नसावा. मुला-मुलींनीच पुढं जबाबदारी पेलायची असते. त्यामुळे मुलांचा पुढाकार आणि पालक फक्त सल्लागार असं व्हायला हवं. पालकांनी योग्य गोष्टींना प्रोत्साहन द्यावं, अयोग्य गोष्टी स्पष्ट, योग्य शब्दांत त्यांच्यासमोर मांडाव्यात, निर्णय मात्र मुलांचाच असावा.

जीवनसाथमधे नकारात्मक गोष्टींचा विचारही करण्याचं तंत्र कळलं. म्हातारपण, आजारपण, मृत्यू यांबद्दलचे विचार पक्के झाले; अनेक विषयांमधल्या डोक्यात ठसलेल्या अंधश्रद्धा गेल्या, साधी राहणी उच्च विचारसरणी म्हणजे काय हे कळलं. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे इथं मुलांबरोबर पालकांनाही आपल्या वैवाहिक आयुष्यातल्या समस्या सोडवता येतात, याचा दिलासा वाटला. आमचंही आयुष्य 'जीवनसाथ'नी समृद्ध केलं.''

स्वतः अनेक प्रकारची प्रशिक्षणं देणारं आमचं एक अत्यंत उत्साही, कृतिशील सभासद जोडपं म्हणालं, ''वैचारिक देवाणघेवाण फार कमी ठिकाणी होते. इथलं पद्धतशीर विश्लेषण आम्हाला खूप गोष्टी शिकवतं. अनिलदादांचे खास खेळ गमतीबरोबर महत्त्वाचे संदेश सहज देतात. तुम्ही दोघं आधी भेटला असतात तर आम्हाला अधिक चांगले नवरा-बायको होता आलं असतं आणि अधिक चांगले पालकही.'' लग्न आणि मुलांना वाढवणं हे प्रत्येकाच्या जीवनातले महत्वाचे प्रकल्प; पण लोक त्यांच्याकडे पुरेशा गांभीर्यानं पाहात नाहीत. आज झट लग्न पट घटस्फोट ही पद्धत होऊ पाहते आहे. अशा वेळी अशी मंडळं समाजात काही नवं घडवत आहेत ही समाधानाची गोष्ट आहे.

तरुणपणी योग्य वयात जीवनसाथमधे नियमितपणी यायला सुरुवात केली तर फारच छान; पण समजा तसं नाही जमलं तर काय करायचं? ताण आधीच निर्माण झाले असले तर? मला वाटतं 'बेटर लेट दॅन नेव्हर.' मध्यमवयीन, वयस्कर असलं म्हणून काय झालं? दोघांची इच्छा असली तर ताण नक्की कमी करता येतील. घालवताही येतील कारण 'विवाहाचं बिघडलेलं यंत्र कुठच्याही अवस्थेत दुरुस्त करायचा प्रयत्न करता येतो.'

अनिल त्याच्या वैयक्तिक समुपदेशनाच्या कामातही खूप व्यस्त असतो. केवळ सायकॉलॉजिकल काउन्सेलिंग करणाऱ्यांच्यात तो जवळजवळ सर्वात बिझी काउन्सेलर आहे. त्याच्या ज्ञानाला आणि अनुभवाला मॅनेजमेंट सायन्सची जोड असल्याचा हा परिणाम असावा. लोकांना केवढ्या प्रकारचे किती प्रश्न आहेत हे त्यामुळे कळतं. जेवढे करावेत तेवढे प्रयत्न कमीच पडतील इतकी

आपल्या समाजाला समुपदेशनाची गरज आहे हे लक्षात येतं.

असं हे जीवनसाथचं काम, वातावरण आणि फलितं! यातली मेहनत, अभ्यास, पुढाकार अनिलचा. माझी इतर कामं सांभाळून मी साथीला असते एवढंच. लोक रविवारच्या या कृतिसत्रांची वाट पाहात असतात याचं फार समाधान वाटतं.

आमची मुलं लहान होती तेव्हा आम्ही दोघांनी पालक-शिक्षणाचा अभ्यास केला. बऱ्याच पालकांपर्यंत तो पोहोचवला. ती वाढत असताना मला बालभवनच्या निमित्तानं चांगलं काम करता आलं. ती लग्नाची झाल्यावर अनिलनं विवाह-अभ्यास पुढं नेला. आता आम्हाला तीन छोटी नातवंडं आहेत. लहान मुलांची काळजी घेण्याची अधिक चांगली सोय समाजात व्हावी यासाठी खूप काही करायचं आहे. त्या त्या वेळी आपल्या समाजातले जे प्रश्न जाणवतात त्यासाठी काम करणं, हे आम्हाला आमचं कर्तव्य वाटतं. इतरांच्या कामाशीही त्यामुळं भरपूर संपर्क असतो. त्या नेटवर्कचा खूप फायदा होतो.

आम्ही दोघं गेली अनेक वर्षं पुण्यातच राहतो. पुण्याचे गुण, दुर्गुण आम्हाला आपोआपच चिकटलेले असणार. पुणेकरांना नावं ठेवणारे आमच्याही ओळखीत खूप आहेत. अनिलचं सगळं काम जास्तीतजास्त पुण्यातलंच आहे. बरेच संदर्भ महाराष्ट्र, पुणं, कर्वेनगर या भोवतालचे आहेत हे खरं आहे. हे पुस्तक वाचताना तुम्ही जगाच्या कुठच्याही भागात असलात तरी त्यामुळे जागेचे संदर्भ बदलतील. अभ्यासाचे विषय मात्र तेच राहतील. अमेरिकेत वापरताना या ज्ञानाला अमेरिकनाइज करावं लागेल. इंग्लंडमधे वापर करताना आंग्लीकरण करावं लागेल. पण तिकडे स्थायिक झालेल्या मूळच्या भारतीय लोकांना त्याचा खूप उपयोग होईल.

**– शोभा भागवत**

# जीवनसाथमध्ये या विषयातलं नेमकं काय चालतं?

मी भाषणं करण्याच्या विरुद्ध आहे कारण त्याचा काही उपयोग होत नाही, अशी माझी खात्री झाली आहे. त्यामुळे मी फक्त कार्यशाळाच घेतो. आत्तापर्यंत 500च्या वर ज्या कार्यशाळा घेतल्या त्याविषयी हे लिखाण आहे. यातला प्रत्येक लेख किंवा लेखाचा भाग म्हणजे एक कार्यशाळा आहे असं समजूया. पण त्या विषयाच्या अनेक कार्यशाळांचा गोषवारा इथे आहे. प्रत्यक्षातल्या कार्यशाळा अनौपचारिक आणि प्रश्नोत्तरं, चर्चा पद्धतीच्याच असतात; पण तो मजकूर त्याप्रकारे नाटकातल्या संवादांसारखा लिहायचा म्हणजे तो खूप पानांचा होतो. म्हणून ते मुद्दे सलग पद्धतीनी मांडले आहेत.

कार्यशाळांचा मुख्य सूत्रधार बहुतेक वेळा मी असतो. सूत्रसंचालनासाठी आणखी काही लोक तयार करण्याचं काम चालू आहे. सूत्रधारांनी आधी त्या विषयाचा माझ्याबरोबर अभ्यास करून मुद्दे लिहून तयार ठेवलेले असतात. 60 विषयांच्या यादीपैकी विषय त्यांनी स्वतः निवडलेले असतात.

अगदी प्रथम माझी या सबंध कामामागची, कार्यशाळेमागची, पुस्तकसंचामागची भूमिका स्पष्ट करतो. ही एक अनेक विषयांची कार्यशाळांची मोठी मालिका चालू आहे अशी कल्पना करून मी हा पुस्तकसंच लिहिलंय. आपण सगळे एका खोलीत समोरासमोर बसलो आहोत आणि प्रत्येक विषयासंबंधी निरनिराळ्या लोकांची निरनिराळी मतं, शंका, गैरसमजुती आपण सगळे ऐकतो आहोत अशी कल्पना केली आहे. जीवनसाथमधला आत्तापर्यंतचा अभ्यास त्याबद्दल काय म्हणतो हे मी सांगतोय, अशी कल्पना मनात धरलीय.

मला कळायला लागल्यापासून गेली 55 वर्षं मी जे आसपासचं जग बघतोय, परदेशात, भारतभरात, महाराष्ट्रात जे अनुभवलंय ते मला आवडलेलं नाही. थोडक्यात, ज्या दिशेनी सबंध जगाचा, भारताचा प्रवास चाललाय ती दिशा मला योग्य वाटलेली नाही. कुठच्यातरी निराळ्या पद्धतीनी विचार केल्याशिवाय, मार्ग शोधल्याशिवाय मला धडगत दिसत नाही. ज्याला सध्याची परिस्थिती पसंत नसेल त्यानी ती परिस्थिती बदलण्यासाठी धडपड करावी, नाहीतर मुकाटपणी सहन करावं. मी मुकाटपणी सहन करणाऱ्यांपैकी नसल्यामुळे मी तशी धडपड आयुष्यभर केली. त्या सगळ्या प्रयत्नांचा सारांश म्हणजे 'जीवनसाथ'. या अभ्यासाची सुरुवात विवाहाच्या अभ्यासानीच झाली. पुढे मात्र ती सबंध आयुष्याच्या अभ्यासाची संस्था बनली.

मी माझ्या आसपास बघितलं तर मला संतुलित लोकं सहज दिसतच नाहीत. उन्मत्त तरी दिसतात किंवा उदास लोक दिसतात. वागणारे मग्रूर तरी असतात किंवा केविलवाणे असतात.

प्रत्येक पर्वातल्या प्रत्येक काळात समाजाला विचार आणि भावना यांच्या समतोलाचीच गरज असते हे सगळ्यांना मान्य असतं. पण पुढे माझ्यासारख्या कोणी म्हटलं की, सध्याचा समाज भावनेच्या बाजूला पार झुकलेला आहे, त्यामुळे या समाजाला विचाराच्या दिशेनी समतोलापर्यंत खेचूया तर ते मात्र मान्य होत नाही. समाज भावनेच्या बाजूला अतिरिक्त प्रमाणात कशामुळे झुकला हे बघायला गेलं तर दोन गोष्टी स्पष्ट दिसतात.

एक म्हणजे प्रत्येक माणूस स्वतःच्या भविष्याची चिंता या एका भावनेमुळे हवालदिल आहे. वरवर बघितलं तर तो गाताना, नाचताना, हसताना मजा करताना दिसेल. पण ते दृश्य फसवं आहे. माणूस आतून घोर काळजीत आहे. त्या चिंतेच्या भावनेच्या ओझ्यामुळे तो भावनेकडे झुकलेला आहे.

दुसरं म्हणजे प्रसारमाध्यमांनी सर्वसामान्य माणसाची बुद्धी किंवा विचार करण्याची क्षमता क्षीण केली आणि त्याच वेळेला अतिशयोक्त भावनांचं भडक चित्रण करून त्याला भावनेच्या बाजूला आणखी ढकललं. ही दोन्ही कारणं जरी समजली तरी सत्य ते सत्यच आहे. समतोलापर्यंत त्याला पोहोचवण्यासाठी स्पष्ट विचारांचं बळ त्याला द्यायला हवं आहे. माझी त्याबद्दल खात्री झाली आहे. मला जर वाटलं असतं की, माणूस फार विचारांच्या दिशेनी झुकला आहे तर मी

भावनांच्या दिशेनी त्याला खेचलं असतं कारण शेवटी समतोल हा उद्देश आहे.

या सगळ्या प्रयत्नात दोन मोठ्या अडचणी मात्र आहेत. विचाराच्या दिशेनी म्हणजेच विवेकनिष्ठ विचारसरणीकडे खेचणाऱ्याला फार कष्ट आहेत कारण कोट्यवधी लोकांना खेचण्याचा तो लढा आहे.

दुसरी अडचण म्हणजे विवेकनिष्ठ विचाराच्या पुरस्कर्त्याला लोक कोरडा किंवा भावनाहीन, असंवेदनशील समजतात. ते खरं नाही हे त्याला स्वतःला माहिती असतं. पण लोकांची तशी गैरसमजूत, उघड किंवा पाठीमागे टीका सहन करावी लागते. थोडक्यात, या कारणांमुळे हा मार्ग लोकप्रिय होऊ शकत नाही.

मी आता 72 वर्षांचा आहे. शोभा 69ची आहे. हे सगळं पुस्तकात उतरवणं शक्य आहे तोपर्यंत लिहिलेलं बरं असं वाटल्यामुळे मी इथे दोन गोष्टींवर भर देऊन लिहायचं ठरवलं.

1. समाजाचं वैवाहिक आयुष्य, त्याखेरीजचं आयुष्य, त्यातले समाजाचे प्रश्न आणि त्यावर विवेकनिष्ठ पद्धतीचे उपाय
2. शोभाच्या आणि माझ्या वैवाहिक सहजीवनाचं चरित्र. सहजीवनाचं चरित्र या शब्दाकडे मला लक्ष वेधायचं आहे कारण हे माझं किंवा शोभाचं व्यक्तिगत चरित्र नाही. आमच्या व्यक्तिगत चरित्रात कोणाला रसही नसेल.

या पुस्तकाबद्दलचा एक निर्णय पक्का केलाय तो असा. व्यवस्थापनशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान या माझ्या अभ्यासातल्या तीनही विषयांत मूळच्या अभ्यासातच असे अनेक शब्द आहेत की, त्यांचं ओढूनताणून मराठी भाषांतर करण्याच्या फंदात न पडणं चांगलं. काही भाषांतरित शब्द सोपे, काही आधीच प्रचलित असलेले आहेत ते वापरले. बाकीचे खुशाल देवनागरी लिपीत इंग्लिश शब्द वापरायचे असं ठरवलं, कारण हे पुस्तक लोकांनी वाचावं, त्यांना ते सोपं जावं, त्यातल्या गोष्टी त्यांनी अमलात आणाव्यात ही इच्छा आहे. मग समजायला कठीण करून कसं चालेल? याबद्दलचे सोपे-कठीण वगैरेचे निर्णय मीच वाचकांबद्दलच्या माझ्या अंदाजानी घेतले आहेत. त्या माझ्या अंदाजात काही चूक आढळली तर नंतर ती जरूर दुरुस्त करीन.

आणखी एक निर्णय घेतला. हे पुस्तक वाचणाऱ्यांपैकी कॉम्प्युटर वाचणाऱ्यांचं प्रमाण जास्त असेल असं मला वाटतंय. त्यामुळे जीवनसाथच्या वेबसाईटवरून हे सबंध पुस्तक बघता येईल, छापता येईल अशी व्यवस्था करणार आहे. ज्यांना

कागदावर छापलेली अक्षरंच सोयीची वाटतात त्यांच्यासाठी छापील पुस्तकाचीही सोय असणार आहे.

मी स्वतः व्यवस्थापनशास्त्र शिकलेलो असल्यामुळे आणि गेल्या अनेक वर्षांमधे तो विषय शिकवल्यामुळे विषयाचे भाग पाडण्याची मला सवय लागली आहे. वाचणाऱ्यांना ते सोयीचं जाईल याबद्दल माझी खात्री आहे.

एक प्रश्न सगळ्यांना पडेल त्याचं आधीच स्पष्टीकरण करतो. आपलं म्हणणं थोडक्यात मांडावं अशी शिफारस मी अनेक वेळा ठिकठिकाणी केली आहे, तर मग जीवनसाथ म्हणजेच जीवनभर स्पष्ट विचारांची साथ हा विषय समजावून सांगताना एवढी थोरली पानं आणि बारा पुस्तकं कशासाठी लिहिली? याचं उत्तर असं आहे. 18 वर्षं एवढ्या निरनिराळ्या लोकांशी बोलताना एक गोष्ट लक्षात आलेली आहे. कुठच्या शब्दांत कुठच्या पद्धतीनी कुठच्या वेळेला कोणाला मुद्दा समजेल याला कुठचाही नियम नाही. तो संवाद साधण्याची तीव्र इच्छा असल्यामुळे माहिती असलेले सगळे मार्ग वापरायचे, असं मी ठरवलं. त्यामुळे मजकूर वाढला.

ही कार्यशाळा घेताना, हा मजकूर लिहिताना मला अनेक भूमिकांच्यात शिरावं लागणार आहे. दोन मुख्य भूमिका म्हणजे समुपदेशक आणि ज्येष्ठ अभ्यासू मित्र. पुन्हा या दोन भूमिकांमधून बोललेल्या, लिहिलेल्या मजकुराची सरमिसळ होणार हेही निश्चित आहे. कधी मित्र म्हणून गमतीगमतीत एखादी गोष्ट सांगितलेली असेल, तर कधी माझा समुपदेशनातला गंभीर अभ्यास त्यात डोकावेल.

समुपदेशन या सबंध विषयाविषयी खूप गैरसमजुती आहेत. वेड लागलेल्या माणसाला वेड्यांच्या हॉस्पिटलमधे ठेवतात ही गोष्ट सगळ्या भारतीयांच्या मनावर थेट कोरलेली आहे. समुपदेशकाकडेदेखील वेड लागलेली माणसंच जातात असा त्यांचा विश्वास असतो. त्यामुळे समुपदेशकाकडे जायचा विषय निघाला की, 'वेड लागलंय का?' हा प्रश्न लोकांच्या मनात असतो. ज्याला समुपदेशन म्हणजे काय हे समजलं त्याचा बरोब्बर उलटा प्रश्न असतो, 'इतका त्रास होतोय तरी अजून तू समुपदेशकाकडे गेला नाहीस? असा वेडेपणा करू नकोस.'

समुपदेशन या विषयाच्या अंतरंगाच्या पसाऱ्याची लोकांना कल्पना नसते. जीवनसाथमधे 60 विषयांची यादी आम्ही वापरतो. दरवर्षी ती यादी थोडी बदलते. त्यांच्यापैकी विषय निवडण्याचं काम सभासदच करतात आणि दर

महिन्याच्या पहिल्या रविवारी एक एक विषय गटचर्चेसाठी ठेवतात. लोकांना पडलेला प्रश्न असा असतो की, आयुष्यात एवढ्या साठ विषयांचा संबंध खरोखर येतो का? माझ्या दृष्टीनी हो. माझ्या 72 वर्षांत माझा तर त्यातल्या प्रत्येक विषयाचा संबंध आला बाबा!

आणखी एक प्रश्न अनेकांच्या मनात असतो. प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव निराळा असतो. प्रत्येकाचा प्रश्न स्वतंत्र आणि खासच असतो. घडणाऱ्या घटनाही निराळ्याच आणि खास असतात. चांगल्या घटना आणि वाईट घटना दोन्ही त्या त्या व्यक्तीलाच फक्त तपशीलातल्या बारकाव्यासकट माहीत असू शकतात. मग निराळीच कुठचीतरी त्रयस्थ व्यक्ती तो प्रश्न कसा सोडवू शकेल? याचं खरं उत्तर असं आहे की, मानसशास्त्राच्या अभ्यासात लक्षात आलं की जगाची लोकसंख्या कितीही असली तरी व्यक्तिमत्त्वाचे प्रकार मोजकेच असतात. चांगल्या आणि वाईट घटनांचेही मोजकेच प्रकार असतात. समस्यांचंही तसंच असतं. व्यक्तिमत्त्वाचे, घटनांचे आणि समस्यांचे या तीन गोष्टींच्या प्रकारांची सांगड कशी घालायची हे समुपदेशकाला माहिती असतं. तेवढी दिशा त्यानी दाखवली की, प्रश्न सुटण्याच्या दिशेनी एक एक पाऊल पडायला लागतं. समुपदेशनार्थींनी अभ्यास मात्र मनापासून करावा लागतो. अगदी कॉलेजमधे असताना जसा विषय, त्यातले मुद्दे, त्यांचा क्रम, त्यांची प्रश्नोत्तरं, त्यांबद्दल चर्चा, पडताळणी, लिखाण असतं तसं सगळं करावं लागतं. ही गोष्ट पटण्याचीच मुख्य अडचण असते.

मी व्यवस्थापनशास्त्र अमेरिकेत शिकलो ते बांधकामापुरतं. त्या ज्ञानाचं भारतीयीकरण केल्याशिवाय त्याचा इथे उपयोग नाही, हे मला पदोपदी जाणवलं. तेवढं केल्यावर मात्र व्यवसायात त्याचा खूप फायदा झाला. माझ्या आणि शोभाच्या वैवाहिक आयुष्यासाठी, कुटुंबासाठी उपयोगी असं त्यात फारसं नव्हतं. ते कसं शोधायचं याबद्दल माझ्या सुप्त मनात सतत विचार चालू होता. मी त्या माझ्या प्रयत्नांना 'रिलेशन्स मॅनेजमेंट' असं म्हणायचो. या नावाची काही लोक टिंगल करायचे. ते म्हणायचे, 'जी रिलेशन्स मॅनेज करावी लागतात त्यांच्यात अर्थच काय?' खरं असंय, मला शोभाशी बोलताना देखील कुठच्या शब्दांत, केव्हा, कसं याचा विचार करावा लागतो. ती 'मॅनेजमेंट'च आहे आणि त्यात वाईट काहीच नाही.

पुढे अनेक वर्षांनी वैवाहिक समुपदेशन या विषयात पीएच.डी. करायची

ठरवून मी मानसशास्त्राच्या मार्गानी गेलो. मानसशास्त्रामधे समोर आलेली 'थिअरी' प्रचंड होती. काही गोष्टींचा खोलवर अभ्यास आणि बाकीच्यांचा तुलनेनी वरवर अभ्यास असं ठरवावंच लागलं. मी पूर्वी शिकलेल्या व्यवस्थापनशास्त्रातल्या अनेक मुद्द्यांचा निराळा अर्थ मला दिसायला लागला. त्यामुळे पीएच.डी. 'थीसिस' लिहिताना मानसशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्र या दोन्हींचा उपयोग विवाहानंतरच्या आयुष्याला कसा करता येईल याच्या मागे मी लागलो. त्यावेळेला सारखं मनात यायला लागलं की, सगळ्या शास्त्रांच्या, ज्ञानाच्या मुळाशी तत्त्वज्ञान आहे. त्यामुळे तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला पाहिजे. थीसिसमधे ते शक्य नव्हतं. कारण ठरलेल्या वेळेत आणि पृष्ठसंख्येत ते बसलं नसतं. त्या थीसिसमधे मी माझ्या स्वतःच्या काही कल्पना मांडल्या. गंमत म्हणजे थीसिसवर जो रिपोर्ट लिहून आला त्यात संशोधन करणाऱ्यानी मी स्वतःची कल्पना मांडली त्याबद्दल टीका केली होती. स्वतःचं डोकं चालवणं याला 'ॲकॅडमिशियन्स'च्या जगात वाईट समजतात हे मला त्यावेळी थप्पड खाल्ल्यासारखं कळलं. मी तर 'सेल्फ मेड' आणि 'अप्लाइड' प्रकारचा माणूस आहे. मी त्याला मान झुकवली नाही. माझ्या दृष्टिकोनातून आत्तापर्यंत थोर लेखकांनी, संशोधकांनी म्हटलं तेच मानत राहणं, बोलत, शिकवत राहणं, यापेक्षा स्वतःचा विचार मांडणं जास्त चांगलं आहे.

त्यामुळे मी साधारण सहा-सात वर्षांपूर्वी 'विवाहाचं तत्त्वज्ञान' या विषयाच्या मागे लागलो. मला हवं ते कुठे सापडेना. तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकांशी बोललो. वाचनालयं धुंडाळली. 'वैवाहिक आयुष्याचं तत्त्वज्ञान' असा स्वतंत्र अभ्यास झालेला नाही असं कळलं. मग मीच त्या गोष्टी वाचून, माझ्या पद्धतीनी मांडायच्या ठरवल्या. मी 'हार्डकोअर फिलॉसॉफी शिकवणारा ॲकॅडेमिशियन' नसल्यामुळे मी जे या पुस्तकात मांडलंय ते तत्त्वज्ञानातल्या विद्वान, अनुभवी लोकांच्या दृष्टिकोनातून अर्धवट आणि निराळंच किंवा विक्षिप्त असू शकेल; पण आता मी थांबायला तयार नाही. मी मांडतो ते उपयोगी आहे याबद्दल मला शंका नाही, कारण मी ते अनेक वेळा बोलून, मांडून बघितलंय. तरी मी यामधे कुठच्याही दुरुस्तीला तयार आहे ना! मी स्वतः कुठे कमी पडतो याचा माझा शोध अखंड चालूच आहे. तेव्हाच तर माझ्या वागणुकीत दुरुस्ती होईल. या पुस्तकात मी कसा कसा बदलत सुधारत गेलो त्याचीच कहाणी आहे म्हटलं तरी चालेल.

स्वतःला स्वतःबद्दल नीट कळणं ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. कारण

स्वतःच्या शोधाची प्रक्रिया समजली की, इतरांना समजणंही सोपं जातं. ते जमलं की बऱ्याच बाबतींतले छुपे/उघड संघर्ष संपतात, निदान कमी होतात आणि शेवटी माणूस मनःशांतीपर्यंत पोहोचण्याची शक्यता हळूहळू वाढत जाते.

प्रत्यक्ष अनुभवानंतर माझी खात्री झालीय की, लोकांना समजणं हाच काहीही समजावून सांगण्याचा मुख्य उद्देश आहे. तीच सांगणाऱ्याची खरी परीक्षादेखील आहे. त्या दोन्हींच्या वापराचं म्हणजे थिअरी आणि प्रॅक्टिसविषयी बोलण्याचं माझ्या दृष्टीनी प्रमाण थिअरी एक वाक्य, तर प्रॅक्टिसविषयी 100 वाक्यं असं आहे.

मला वाटणारी अगदी मुळातली गोष्ट प्रथम सांगतो. शब्दशः काहीही म्हणजे अगदी काहीही कोणीही करत असलं, तरी त्याचा हेतू दोन शब्दांत वर्णन करता येतो. 'समाधान मिळवण्यासाठी'. इतरांच्या दृष्टीनी ते कृत्य चांगलं, वाईट, 'ग्रेट' कसंही असो, तो माणूस ती गोष्ट स्वतः समाधान मिळवण्यासाठीच करत असतो. लहानपणीचा स्वतःचा खेळ, अभ्यास, धांगडधिंगाही स्वतःला आनंद मिळवण्यासाठीच असतो आणि तरुणांचे वात्रट चाळे, प्रेमप्रकरणं, चांगल्या शिक्षणासाठी केलेली धडपड, करिअरसाठी केलेले प्रयत्नही स्वतःला आनंद मिळवण्यासाठीच असतात. आई-वडलांवर असलेलं प्रेम, आदर, भांडणंही त्यासाठीच आणि अधिक पुढच्या वयातला लग्नाबद्दलचा निर्णयही स्वतःच्या समाधानासाठीच असतो. लग्न न करण्याचा निर्णय असो, अमुक एका व्यक्तीशी लग्न करण्याची कृती असो, शेवटी हेतू एकच. स्वतःच्या मनाविरुद्ध आईवडलांचं मन सांभाळण्याचा निर्णयही शेवटी आईवडलांचं मन सांभाळण्यामुळे स्वतःला मिळणाऱ्या समाधानासाठीच असतो. समाजासाठी निरपेक्षपणी काहीतरी करू हाही निर्णय स्वतःच्या समाधानासाठीच असतो. इतरांचा फायदा हे त्याचं 'बाय प्रॉडक्ट' असतं.

थोडक्यात, हा सगळा माझा प्रयत्न समाजाच्या जगण्याचा दर्जा सुधारण्यासाठी म्हणजेच 'क्वालिटी लाईफ'साठी आहे. जीवनसाथचं सगळं काम 'प्रिव्हेंटिव्ह' काउन्सेलिंगवर भर देणारं आहे. पण आपल्या समाजात 'क्युरेटिव्ह' कामच जास्त लोकप्रिय आहे आणि मानसिक अस्वास्थ्याच्या बाबतीत काहीच न करता नुसतं सोसणं त्याहून लोकप्रिय आहे. त्याच्याहीपेक्षा वरच्या नंबरवर लोकप्रियतेच्या शिखरावर जोडीदाराला, कामावरच्या हाताखालच्या लोकांना किंवा मुलांना

छळणं आहे. त्याबद्दलचं हे प्रबोधनाचं काम आहे.

लोकांचे अनेक प्रश्न असतात. त्या प्रश्नाचं मूळ शोधायला गेलं तर त्याची मुळं त्यांच्या लहानपणाच्या वाढीत सापडतात. लहानपणी त्यांची वाढ चुकीच्या पद्धतीनी झालेली असते. म्हणजेच पालकांची वागण्यात चूक झालेली असते. त्या पालकांच्या वागण्यातल्या चुकीची कारणं शोधली तर ती त्यांच्या सहजीवनात सापडतात.

माझा दृष्टिकोन कायम विवेकनिष्ठ बुद्धिवाद्याचा आहे. बुद्धी शब्दावरून आमच्याकडे नेहमी गंमत चालते. मी कुठलाच धर्म मानत नाही, हे सगळ्या जीवनसाथींना माहिती आहे. माझ्या विवेकवादाला ते 'बुद्धिझम' म्हणतात. तो गमतीचा भाग तात्पुरता सोडला तरी एक गोष्ट नक्की. विवेकनिष्ठ विचारांनी सहजीवनाकडे बघता आलं तरच उपाय सापडेल. म्हणून सहजीवनाबद्दल काहीतरी करता येतं का बघूया. तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्र या तीनही विषयांचं 'सोप्पीकरण' करायलाच हवं असं वाटलं. त्यासाठी या पुस्तकसंचाचा महाप्रपंच.

महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, माणसाला कुठचाही प्रश्न असो, त्यावरच्या उपायाला सुरुवात झाली किंवा केली तरी स्वस्थ वाटतं.

जोडीदाराच्या निवडीबदल तत्त्वज्ञानात आणि व्यवस्थापनशास्त्रात काही काम झालेलं नाही. मानसशास्त्रीय क्षेत्रात थोडे तरी प्रयत्न कोणी कोणी केलेले दिसतात, तरी मला आढळलं की 2000 साली मी 'लग्न पाहावं करून' लिहिलं ती या विषयातली ठळक घटना होती. परिचयोत्तर विवाह या विषयावर इतकं मूलगामी काम तोपर्यंत कोणी केल्याचं मला तरी माहीत नाही.

लैंगिक शिक्षणात वैद्यकीय शाखेतल्या लोकांची मक्तेदारी होती. मानसशास्त्र जाणणाऱ्यांचं त्या महत्त्वाच्या क्षेत्राकडे दुर्लक्ष झालं होतं. या पुस्तकातल्या सविस्तर लिखाणात मी नि शोभा तिथे कसे पोचलो ते सांगितलं आहे त्यामुळे इथे थोडक्यात उल्लेख करतो. आम्ही दोघं मिळून हे काम करतो. त्याशिवाय ते मानसिक आणि भावनिक अंगानी करतो. 'दोघं मिळून' हेही क्वचित आढळणारं आणि 'मानसिक-भावनिक' हे पण खूप महत्त्वाचं असल्यामुळे आम्ही त्यात समाधानकारक प्रगती करू शकलो.

●●●

# जोडीदाराची निवड

●

# लैंगिक शिक्षण

## जीवनसाथ

### जीवनभर स्पष्ट विचारांची साथ म्हणजेच जीवनसाथ

## अनुक्रम

**पुस्तक क्र. 2**

1) प्रथमदर्शनी प्रेम आणि प्रेमप्रकरणं ........................... 27 ते 45

1. नैसर्गिक स्त्रीपुरुष आकर्षण । 27
2. प्रथमदर्शनी प्रेम । 31
3. एकतर्फी प्रेम । 34
4. नॉर्मल - ॲबनॉर्मल तारुण्य । 36
5. दुतर्फी प्रेम प्रकरण । 37
6. लग्न ठरवणं – साखरपुडा वगैरे । 38
7. अविचाराची शक्यता । 40
8. लग्न मोडणं । प्रेमभंग । 41
9. विवाहबाह्य आकर्षण / प्रेमप्रकरण । 43
10. खरं प्रेम म्हणजे काय? । 45

2) विमुक्त जीवन................................................. 46 ते 50

3) अविवाहितांचं आयुष्य ......................................... 51 ते 64

1. अविवाहितांच्या आयुष्याचा अभ्यास । 51
2. विवाहाचा इतिहास । 54
3. काही अविवाहितांची उदाहरणं । 56

4. जीवनसाथमधे अविवाहितांच्या प्रश्नाबद्दल काय असतं? । 59
5. समतोलपणी वागणाऱ्या अविवाहितांची उदाहरणं । 61
6. लिव्ह-इन रिलेशनशिप (लग्नाविना एकत्र राहणं) । 63
7. लग्न करण्याविषयी माझं स्वतःचं मत । 64

4) अविवाहितांच्या मुलाखती ..................................... 65 ते 68

5) लग्न कशासाठी? ............................................... 69 ते 80

6) लग्नाचं योग्य वय ............................................. 81 ते 87

7) वधू-वर सूचक मंडळं आणि मेळावे...................... 88 ते 101

1. वधू-वर सूचक मंडळ । 88
2. मेळावे, खेळ, सहल आणि जीवनसाथचे प्रयत्न । 92

8) जोडीदाराची निवड......................................... 102 ते 184

1. दुनिया जिसे कहते है वो जादू का खिलौना है– सध्याचा प्रश्न । 102
2. स्वस्थ वैवाहिक आयुष्याचं ध्येय । 111
3. निवडीसाठी किती काळ योग्य? । 113
4. लेखी प्रश्नावलीच्या देवघेवीची कल्पना । 114
5. प्राथमिक प्रश्नावली । 122
6. सविस्तर प्रश्नावली– बाह्यरूप । 124
7. सविस्तर प्रश्नावली– पत्रिका । 128
8. सविस्तर प्रश्नावली– शिक्षण/व्यासंग । 129
9. सविस्तर प्रश्नावली– आरोग्य । 131
10. सविस्तर प्रश्नावली– स्वभाव । 134
11. सविस्तर प्रश्नावली– पैशांबद्दलची विचारसरणी । 135
12. सविस्तर प्रश्नावली– मासिक प्राप्ती । 137
13. सविस्तर प्रश्नावली– स्त्री-पुरुष समानता । 138
14. सविस्तर प्रश्नावली– स्त्री-पुरुष लैंगिक संबंध । 140
15. सविस्तर प्रश्नावली– कुटुंब । 142
16. सविस्तर प्रश्नावली– मुलं । 144

17. सविस्तर प्रश्नावली– लग्न समारंभ । 146
18. सविस्तर प्रश्नावली– वैवाहिक आयुष्याचं सार । 148
19. सविस्तर प्रश्नावली– महत्त्व कशाला? । 150
20. त्रोटक सविस्तर माहिती । 152
21. भावी जोडीदाराच्या प्रत्यक्ष भेटीपूर्वीचे पर्याय । 154
22. जोडीदाराबद्दल अंतिम निर्णयप्रक्रिया । 156
23. जीवनसाथची कार्यशाळा नेमकी कशी असते? । 157
24. निवडक गटाचं जोडीदाराच्या निवडीसाठी सहसमुपदेशन । 160
25. जोडीदार ठरल्यावर लग्नापूर्वीची बौद्धिक चाचणी (मॅरेज मॅच्युरिटी इंडिकेटर) । 170
26. अविचाराची शक्यता । 171
27. लग्न ठरल्यानंतरची कर्तव्यं । 173
28. जोडीदाराची निवड या कार्यशाळेत वापरायचे खेळ । 177

9) लैंगिक शिक्षणाची गरज .................................. 185 ते 213

1. या लेखाची पार्श्वभूमी । 185
2. भारतातलं पारंपरिक कामशास्त्र आणि जगातली परिस्थिती । 191
3. तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्राची लैंगिक संबंधाबद्दलची भूमिका । 193
4. सध्याच्या प्रश्नाचं स्वरूप । 197
5. लैंगिक शिक्षणाची कार्यशाळा । 204
6. लैंगिक संबंधातलं समुपदेशन । 207

10) लैंगिक शिक्षण– जन्मापासून 5 वर्षांपर्यंतच्या मुलामुलींबद्दल .............................................. 214 ते 217

11) लैंगिक शिक्षण– 5 ते 10 वर्षांपर्यंतच्या मुला-मुलींसाठी 218 ते 222

12) लैंगिक शिक्षण – 10 ते 16 वयापर्यंतच्या मुला-मुलींसाठी 223 ते 228

13) लैंगिक शिक्षण – तरुणांसाठी – लग्नापूर्वी........... 229 ते 253

1. सध्याची परिस्थिती । 229

2. लैंगिक भावनांचा गोंधळ । 231
3. मुलग्यांच्या विकृत गप्पा । 233
4. हस्तमैथुन । 236
5. वेश्येकडे जाण्याचा मोह । 238
6. मुलींच्या मनातल्या कल्पना । 239
7. मुलगे आणि मुली यांची चांगली मैत्री । 241
8. लैंगिक शिक्षणाची अविवाहितांसाठी कार्यशाळा । 243
9. चुकीच्या गोष्टींची शक्यता– रेव्ह पार्टी । 245
10. प्रेमभंग आणि लग्नापूर्वी लैंगिक संबंध । 247
11. लग्नापूर्वी लैंगिक संबंधाबद्दल वैयक्तिक समुपदेशन । 249
12. परदेशातली परिस्थिती । 250
13. लैंगिक संबंधामागची मानसशास्त्रीय बैठक । 253

14) लैंगिक शिक्षण– जोडीदाराच्या निवडीनंतर
पण लग्नाआधी ............................................ 254 ते 262

1. द्विधा मनस्थितीचे परिणाम । 254
2. वैद्यकीय तपासणी । 256

15) लैंगिक शिक्षण– लग्न झाल्यापासून
मूल होईपर्यंतचा काळ .................................... 262 ते 297

1. लग्नानंतरची पहिली रात्र । 262
2. लैंगिक संबंधांबद्दलचं अज्ञान । 267
3. स्त्रीची मासिक पाळी । 268
4. स्त्री-पुरुषांची मानसिक बैठक । 270
5. लैंगिक समस्यांबद्दलचं मिश्रगट समुपदेशन । 273
6. लैंगिक संबंधातल्या अडचणी आणि उपाय । 275
7. प्रणय म्हणजेच 'फोरप्ले'चं महत्त्व । 280
8. लैंगिक संबंधात स्त्रीचं समाधान । 286
9. समलिंगी, उभयलिंगी आकर्षण वाटणारे स्त्री-पुरुष । 289
10. अविश्वास– जोडीदारावर, समाजावर । 290
11. लैंगिक अतृप्तीचे परिणाम । 291

12. गर्भ राहणं । 293
13. आनंददायी लैंगिक संबंधांसाठी काही सूचना । 296

16) लैंगिक संबंध– मध्यमवयीन स्त्री-पुरुषांचा .............. 298 ते 308

1. स्त्री-पुरुषांची लैंगिक गरज । 298
2. लैंगिक संबंधातून निवृत्ती । 302
3. स्वप्नरंजन । 304
4. लैंगिक उपासमार । 306
5. नसबंदी । 307
6. पुढच्या पिढीचं भवितव्य । 308

17) लैंगिक संबंध– ज्येष्ठांचा आणि लैंगिक विकृती ...... 309 ते 315

1. ज्येष्ठांचा लैंगिक संबंध । 309
2. लैंगिक विकृती । 312

18) आभार ............................................................ 335

●●●

# 1

# प्रथमदर्शनी प्रेम आणि प्रेमप्रकरणं

## 1) नैसर्गिक स्त्री-पुरुष आकर्षण

जीवनसाथच्या विवाह अभ्यास मंडळाच्या कार्यशाळेला जमलेल्या गटाला चर्चेसाठी एक विषय दिला होता. असं समजा की, एका मुलामुलीचा 6 महिन्यांपूर्वी साखरपुडा झाला. 8 दिवसांवर लग्न आलं आणि मुलींनी सांगितलं की, मी या मुलाशी लग्न करणार नाही. शेवटी मुलीकडच्यांनी मुलाकडच्यांना सांगितलं की, लग्न मोडलं. मी सूत्रधार म्हणून आणखी काही सांगणार नाही. हे योग्य का अयोग्य, कारण काय असेल याविषयी गोलचर्चा पद्धतीनी सगळं तुम्ही सांगायचंय.

काहींचं म्हणणं पडलं हे अयोग्य आहे. कारण आयत्यावेळी काहीही सांगणं अयोग्य आहे. त्यावर दुसरा म्हणाला की, जे आधी माहिती नसेल ते आता एवढ्या उशिरा कळलं असेल. एक मुलगा म्हणाला, त्या मुलीकडच्यांनी कार्यालयाचा 'ॲडव्हान्स' भरला असेल तो वाया जाईल, पण ते तिचंच नुकसान आहे. त्यानंतर एक मुलगी म्हणाली, खरं म्हणजे कार्यालयाचा ॲडव्हान्स दोघांनी मिळून भरायला पाहिजे. तसं असलं तर दोन्हीकडचं नुकसान होईल. मग एक मुलगा म्हणाला, मुलीकडच्यांनी लग्न मोडणं हे जास्त वाईट आहे, त्यामुळे तिचं लग्न ठरायला तिला त्रास होईल. एक मुलगा म्हणाला, मुलाला पण मानसिक त्रास होईल. विधानं करताना कोणाच्या दृष्टीनी एवढ्या उशिरा सांगणं या मुद्द्याला महत्त्व होतं तर कोणाच्या नजरेत खर्च वाया जाणं, गैरसोय, अशा प्रकारचे मुद्दे होते. त्या मुलीनी असा निर्णय घेण्याचं मूळ कारण काहीतरी गंभीर, मोठं असलं

पाहिजे असं बोलणं निघालं नि कारण काय असेल याकडे म्हणजे खऱ्या मुख्य मुद्द्याकडे मंडळी वळली.

कोणी म्हणलं की, साखरपुडा झाला होता, याचा अर्थ गेले 6 महिने ते दोघं एकमेकांबरोबर फिरत असणार. त्या दोघांचं काहीतरी भांडण झालं असणार. कोणी म्हटलं की, मुलानी पगार, प्राप्ती याबद्दल आधी जी माहिती दिली होती त्याबद्दल तिला शंका आली असणार. काही म्हणाले की, मालमत्तेबद्दल काहीतरी घोटाळा, आर्थिक बोजा, कर्जासाठी तारण असं काहीतरी समजलं असणार. काहींचं मत पडलं की, घरच्या लोकांचे आणि मुलाचे संबंध विशेषतः भावी सासूबाईंशी फार जवळिकीचे वाटले असणार. तो मुलगा सारखा किंवा अधूनमधून 'आईला विचारून सांगतो' म्हणत असेल. त्यावरून तो 'मम्माज बॉय' असल्याची तिला खात्री झाली असणार. काही मुली म्हणत होत्या की, त्याला सारखे इतर मुलींचे फोन येत असणार. कोणीतरी मधे असंही वाक्य टाकलं की, लग्न झाल्यानंतर वाद होण्यापेक्षा मोडलेलं चांगलंच की! इतर मुलींचे फोन येत असणार याचा अर्थ 'लग्नापूर्वीची प्रकरणं' या विषयाला डोक्यात सुरुवात झाली. मग आम्ही सगळ्यांनी ठरवलं की, या विषयाच्या खोलात शिरण्याची वेळ झाली. पुढे तो विषय कुठे कसा वळला ते आता बघूया.

सर्व लोकांनी मुळात समजून घेतलं पाहिजे की, नर-मादी आकर्षण ही सर्व प्राण्यांमधे असलेली नैसर्गिक भावना आहे आणि जे जे नैसर्गिक आहे म्हणजेच निसर्ग-योजनेत आहे ते बदलण्याचा प्रयत्न केला तर काहीतरी घोटाळा होतोच. इतर अनेक नैसर्गिक गोष्टींमधे मानवानी हस्तक्षेप करून घोटाळे करून ठेवलेलेच आहेत. संपूर्ण पर्यावरणशास्त्र ह्या विषयाबद्दलच सविस्तर गुंफलेलं आहे. पण आत्ता इथे तो विषय नाही. आणि माझा स्वतःचा पर्यावरणाचा खोलवर अभ्यासही नाही. स्त्री-पुरुष नैसर्गिक आकर्षण हा मात्र माझा आणि आपला सगळ्यांचा अभ्यासाचा विषय नक्की आहे.

मानसशास्त्रावर गेल्या साठ-सत्तर वर्षांपासून जगभर जे काम चालू आहे त्यात काही मानसशास्त्रज्ञांचं असं म्हणणं आहे की, जन्मल्यापासून स्त्री-पुरुष आकर्षण हा विचार तान्ह्या बाळाच्याही डोक्यात असतो. मी याबद्दल वाचन केलेलं आहे. पण माझा स्वतःचा जास्त अभ्यास 'ॲडल्ट' किंवा 'सज्ञान' मुलामुलींच्या बाबतीत आहे. सगळी अभ्यासमंडळं सज्ञान लोकांसाठी आहेत. विवाह अभ्यास मंडळात लैंगिक शिक्षण हा विषय असतो आणि ह्या पुस्तकसंचात

त्याविषयी स्वतंत्र लेख पण आहेत. आज मात्र आपण लक्ष केंद्रित करणार आहोत ते लैंगिक संबंधापूर्वीचं आकर्षण ह्या एकाच गोष्टीवर.

लहानपणापासून आकर्षण असलं तरी सात-आठ वर्षांच्या मुलीला किंवा मुलाला आकर्षण व्यक्त करता यायला लागतं. मग बारा वर्षांच्या मुलाला किंवा मुलीला ते खूप तीव्रपणी जाणवायला लागतं.

मला स्वतःच्या लहानपणचं, 10 वर्षांच्या आसपासचं आठवतंय आणि थोडं मोठं झाल्यावरचंही आठवतंय. कुठच्यातरी मुलीला आपण आवडतोय असं तिच्या नजरेतून, वागणुकीतून वाटायचं. त्या नुसत्या कल्पनेनी गुदगुल्या व्हायच्या. ते काही प्रेम नसायचं, पण अशीच तर प्रेम वाटण्याची सुरुवात असते!

त्या त्या घराच्या पद्धतीप्रमाणे असं तीव्र आकर्षण व्यक्त करण्याच्या पद्धतीत मात्र खूप प्रकार असतात. आमच्या लहानपणी म्हणजे साधारणपणे पन्नास ते साठ वर्षांपूर्वी ह्या वयात असलेल्या मुला-मुलींशी या विषयावर आई-वडील काही म्हणजे काहीही बोलत नसत.

एवढ्या वर्षांनंतर लैंगिक शिक्षण ह्या विषयात पालक शिक्षणाचा जेव्हा विषय असतो किंवा पालक शिक्षणात लैंगिक शिक्षणाचा विषय असतो, त्या वेळेला कुठच्या वयाच्या मुलाला किंवा मुलीला किती सविस्तर, किती त्रोटक आणि कुठच्या शब्दांत ते सांगायचं, हे बारकाव्यांनी समजावून द्यावं लागतं. आता मूळ मुद्द्याकडे वळूया. शोभाचं आणि माझं आमचं दोघांचंही अगदी पक्कं मत आहे की, दहा ते बारा वयात मुलाला किंवा मुलीला अनेक प्रश्न पडलेले असतात.

त्या सगळ्यांचं सारांशात एकच उत्तर असतं. आईवडलांनी मुलाला किंवा मुलीला एवढंच सांगायचं असतं की, जेव्हा केव्हा ह्याविषयी प्रश्न विचारावासा वाटेल तेव्हा संकोच करू नको. आम्हाला तुझी जी असेल ती अडचण, प्रश्न, शंका काहीही असलं तरी खाजगीत पण मोकळेपणानी सांग. सर्वसाधारण मराठी भाषिक सुशिक्षित घरात मुलग्यांनी वडलांना आणि मुलींनी आईला असं विचारणं सोईचं असतं, हे आपल्याला माहिती आहे. पण व्यवसायातल्या, नोकरीतल्या किंवा कौटुंबिक संबंधातल्या अनेक अडचणींमुळे कधी कधी आई किंवा वडील परगावी, परदेशी किंवा कामातल्या अडचणीमुळे उपलब्ध नाहीत, असं होऊ शकतं. ह्या खेरीज आणखी एक गोष्ट आहे. ज्या सगळ्या वर सांगितलेल्या गोष्टी दहा ते बारा वयात चालू होतात असं मी म्हणालो, त्या नैसर्गिक वयात हळूहळू

बदल होतो आहे की काय, अशी बाल मानसशास्त्रज्ञांना किंवा लैंगिक रोगतज्ज्ञांना शंका आहे.

वय आठ असो किंवा दहा असो. मूळ मुद्दा स्त्री-पुरुष आकर्षण ही नैसर्गिक भावना व्यक्त करण्याचा आहे. दुसरी एक परिस्थिती आपल्याला लक्षात घेतलीच पाहिजे की, गेली अनेक वर्षं सुशिक्षित कुटुंबात लग्नाचं सरासरी वय हे वीसचं बावीस, बावीसचं पंचवीस, पंचवीसचं अठ्ठावीस असं होतं आहे. सरासरीचा अर्थ अगदी साधा आहे. पूर्वी बाविशीत मुलींची लग्नं सर्रास होत असत. आणि आता अठ्ठाविशीमधे लग्न होताना खूप मुली दिसतात. ह्याचा अर्थ, सरासरी वय पंचवीस झालं. भारतातल्या कायद्यामुळे आणि परंपरेमुळे ह्याच प्रकारे मुलाचं वय सव्वीस ते बत्तीस म्हणजेच सरासरी एकोणतीस असं झालेलं आहे. ज्या परंपरेचा मी उल्लेख करतो आहे ती परंपरा म्हणजे विवाहामधे पुरुष स्त्री पेक्षा मोठा असावा हा घट्ट संस्कार. आणि तरीही आत्ता चर्चेचा मुख्य मुद्दा तो नाहीय. मुख्य मुद्दा असा आहे की, आकर्षण व्यक्त होण्याचं सरासरी वय आणि प्रत्यक्ष लग्न होण्याचं सरासरी वय ह्यामधे पूर्वी दहा वर्षांचं अंतर होतं ते अंतर पंधरा वर्षांचं झालं आहे. या दहा-पंधरा वर्षांच्या काळात मुलामुलींची पंचाईत झाली नाही तरच नवल.

●

*सर्व लोकांनी मुळात समजून घेतलं पाहिजे की, नर-मादी आकर्षण ही सर्व प्राण्यांमधे असलेली नैसर्गिक भावना आहे आणि जे जे नैसर्गिक आहे म्हणजेच निसर्ग-योजनेत आहे ते बदलण्याचा प्रयत्न केला तर काहीतरी घोटाळा होतोच. इतर अनेक नैसर्गिक गोष्टींमधे मानवानी हस्तक्षेप करून घोटाळे करून ठेवलेलेच आहेत. संपूर्ण पर्यावरणशास्त्र ह्या विषयाबद्दलच सविस्तर गुंफलेलं आहे. स्त्री-पुरुष नैसर्गिक आकर्षण हा माझा आणि आपला सगळ्यांचा अभ्यासाचा विषय नक्की आहे.*

## 2) प्रथमदर्शनी प्रेम

मुळात नैसर्गिक भावना व्यक्त करण्याची पंचाईत, त्यामुळे निर्माण झालेला गंड आणि मधली वर्षं दहाच्या ऐवजी वाढून पंधरा झालेली ह्या अवस्थेत समाज सापडला. थोडक्यात, आपला जो मूळ विषय आहे म्हणजे प्रथमदर्शनी प्रेम, लग्नापूर्वीची आणि लग्नानंतरची प्रेमप्रकरणं हा प्रश्न जास्त गंभीर झाला. पूर्वी प्रेमप्रकरणांचं प्रमाण कमी होतं. सिनेमात, साहित्यात भरगच्च कथाविषय एवढंच त्याला महत्त्व होतं. पण आता प्रेमप्रकरणांचं प्रकरण प्रत्यक्ष आयुष्यात खूप मोठ्या प्रमाणात वाढलेलं आढळतं.

पूर्वी स्त्रियांचा संबंध पुरुषांशी यायचा तो एका मर्यादेपर्यंतच. लग्न झालं असलं तर नवरा, सासरे, दीर, मुलगे आणि माहेरपणी भाऊ, वडील, आजोबा वगैरे. पुरुष मित्र असण्याचा प्रश्नच नव्हता. बाकीचं स्त्रियांचं आयुष्य इतर स्त्रियांबरोबरच जायचं. मैत्रिणींचे घोळके, निरनिराळे गट, सगळं असायचं. साहजिकच पुरुषांना, मुलग्यांनाही मैत्रिणी नव्हत्या.

घराबाहेर स्त्री पडायला लागली तसा इतर पुरुषांशी संबंध यायला लागला. सामाजिक कामं, कचेरीतले पुरुष सहकारी, तेही वरिष्ठ, कनिष्ठ असे असायला लागले. राहण्याच्या जागेच्या आसपासचे मित्र व्हायला लागले. अशा मैत्रीमधूनच लग्नापूर्वीची प्रेमप्रकरणं आणि प्रथमदर्शनी आकर्षण याची वाट तयार झाली आणि ती विवाहबाह्य प्रेमप्रकरणांपर्यंत पोहोचली. घालमेल, वादविवाद घराघरांत सुरू झाले. परंपरेचा पगडा होता, अजूनही आहे त्यामुळे लग्न करण्याचा निर्णय झाला, स्थळं बघायला सुरुवात झाली की आकर्षणाला मनावरचा पहिला ब्रेक लागतो. एखाद्या विशिष्ट व्यक्तीशी लग्न ठरलं की जोरात ब्रेक लागतो.

कुठच्यातरी मुलावर, मुलीवर प्रेम बसण्याच्या अवस्थेत असलं तरी मनाला आवरावंच लागतं. साखरपुडा झाला की ब्रेक लागून जॅम होतो आणि लग्न झालं की लॉक होतो.

पुरुषाचा ब्रेक जरा सैल लागतो. हजारो वर्षांच्या पगड्यामुळे पुरुष मनानी बाहेरख्याली असतो. एकपत्नी राम वगैरे सगळं पुराणातलं पुराणात राहतं. त्या तुलनेत स्त्रियांच्या मनात एकपतित्व आणि पातिव्रत्य ठसलेलं असतं.

काही लोकांना अंधुक तर काहींना स्पष्ट पण लग्नातल्या अडचणी कळलेल्या असतात. लग्न करावं की न करावं, हा प्रश्न पडलेल्यांची संख्या वाढत जाते, वाढत चाललीय. विमुक्त समाजाचे प्रयोग जगात अनेक ठिकाणी प्रत्यक्षातच झालेले आहेत, चालू आहेत. याविषयी पुढच्या प्रकरणात आपण शिरणारच आहोत, त्यामुळे आत्ता काही आणखी सांगत नाही. छोटा गट किंवा एक मुलगा, एक मुलगी एकत्र राहतात त्याला 'लिव्ह-इन' असं म्हणतात. विमुक्त समाजाचा माझा काही प्रमाणात अभ्यास आहे, पण 'लिव्ह-इन' चा माझा पुरेसा अभ्यास नसल्यामुळे या पुस्तकसंचात त्याविषयी काही सापडणार नाही. असे प्रयोग अनेक वर्षं, अनेक ठिकाणी करून बघितल्याशिवाय काही निष्कर्ष निघत नाही. त्याशिवाय प्रयोगातून परत फिरून समाजाच्या मान्य चौकटीत म्हणजे विवाहसंस्थेच्या कायदेशीर बंधनात बसणं फार कठीण जातं.

ह्या विषयाच्या अधिक खोलात शिरण्यापूर्वी काही व्याख्या तपासूया. प्रथमदर्शन, द्वितीयदर्शन आणि तृतीयदर्शन याचा अर्थ नीट समजून घेऊया. प्रथमदर्शनी प्रेम असा शब्दप्रयोग आपण जेव्हा वापरतो तेव्हा प्रथमदर्शन याचा अर्थ बाह्यरूप असा असतो. द्वितीय दर्शन असा शब्दप्रयोग रूढ नाही, पण त्याचा अर्थ आपण स्पष्ट करूया. द्वितीय दर्शन म्हणजे दुसऱ्याविषयीची कदर व्यक्त करण्याची पद्धत, बोलण्याचालण्याची लकब, वक्तशीरपणा, शिस्त, आवाज वगैरे. आणि तृतीय दर्शन म्हणजे विचार आणि भावना यांच्यातला समतोल, पैशाची विचारसरणी, समानतेची समज वगैरे मनातल्या, स्वभावातल्या खोलवरच्या गोष्टी. त्याखेरीज विरोधी विचारांची हाताळणी करण्याची पद्धत.

साधारणपणी सगळी प्रेमप्रकरणं प्रथम दर्शनावर म्हणजे बाह्यरूपावर भाळल्यामुळे होतात. मुलग्यांचा दृष्टिकोन अगदी स्पष्ट असतो. आसपास आढळणाऱ्या उपलब्ध मुलींच्यापैकी त्यातल्या त्यात आकर्षक दिसणाऱ्या मुलीवर त्यांचं प्रेम ते व्यक्त करतात. आणि मुली त्यातल्या त्यात पैसेवाल्या आणि शक्यतर आकर्षक अशा मुलावर प्रेम करतात. तृतीय दर्शनापर्यंत कोणीही पोहोचत नाही.

लग्नाचं राहू दे. दोन माणसांची मैत्री किंवा नातं निर्माण होण्यासाठी हेच प्रथम, द्वितीय, तृतीय दर्शनाचे निकष लागू आहेत. लग्नासाठी मात्र मुलगा-मुलगी दोघंही प्रेम करण्याच्या मनःस्थितीत असावे लागतात. स्वतःला वाटलेलं आकर्षण व्यक्त करण्याची संधी आणि दोघांपैकी एकामधे तरी व्यक्त करण्याची धिटाई असावी लागते. त्यानंतर मात्र वयाचा अंदाज, जातीचा अंदाज, आर्थिक स्तराची

चाचपणी या द्वितीय दर्शनानंतर प्रेमप्रकरण चालू होतं. खरोखरच प्रथम दर्शनात प्रेम हे आकर्षणापलीकडे असू शकत नाही, असं माझं बनलेलं पक्कं मत आहे. 'लव्ह ॲट फर्स्ट साइट' हे सिनेमा-कादंबरीतच शक्य आहे.

आणखी दोन गोष्टी मुलामुलींच्या आड येतात. डोळसपणे प्रेम करावं या कल्पनेबद्दल वादच नाही. पण डोळसपणाचा अतिरेक झाला तर कधी निर्णयच होत नाही. आंधळ्या म्हणजे प्रथमदर्शनी प्रेमाची पण पंचाईतच होते. एक तर जी मुलगी, मुलगा बघितल्या बघितल्या आपल्याला आवडेल तिला किंवा त्याला आपण आवडलो पाहिजे ना? प्रथमदर्शनात दोन्ही बाजूंनी पेटलेली प्रेमप्रकरणं संख्येनी अगदी कमीच असतात. पैसे आणि आत्मसन्मानाची प्रखर जाणीव यामुळे बघितल्यासरशी 'थंडरबोल्ट' आणि लग्न यावर माझा विश्वासच नाही. प्रत्यक्षात बहुतेक वेळा या पद्धतीनी चुकीचा निर्णय होतो.

या सगळ्या मगापासून आपण ज्या परिस्थितीविषयी बोलतोय त्या परिस्थितीचा परिणाम म्हणजे जमलेली/फसलेली/स्वप्नातली प्रेमप्रकरणं.

●

## 3) एकतर्फी प्रेम

शाळेमधे असताना कुठच्या कुठच्या मुलांवर-मुलींवर आपलं एकतर्फी प्रेम होतं, कुठच्या मुलांशी-मुलींशी दोन्ही बाजूंनी आकर्षण होतं, काही प्रमाणात अर्धवट अर्धवट बोलणं झालं होतं, हे सगळं प्रत्येकानी आठवून पहावं. कधी रूपावर भाळून, कधी खेळातल्या कौशल्यावर, श्रीमंतीवर भाळून प्रेम बसलेलं असतं. काही शिक्षकांविषयी आदरयुक्त आकर्षणही वाटू शकतं. त्याचबरोबर कोणाविषयी कणव वाटली तरी त्याचं प्रेमात रूपांतर होऊ शकतं.

अशा एकतर्फी प्रेमामधे चुकीचं काही नाही. एकतर्फी प्रेमात काही काळ जाणं हे अगदी स्वाभाविक आहे. दुसऱ्या व्यक्तीच्या मनात तसंच एकतर्फी प्रेम आणि तेही आपल्याविषयी हा योगायोग जुळला तरच ते दुतर्फी प्रेम होतं. कधी वय, कधी आई-वडील, गाव, काम, कधी धर्म, जात, कधी नागरिकत्व असं काहीही त्याच्या आड येऊ शकतं. माझं स्वतःचं सांगतो. 'ही मुलगी माझ्या पिढीत जन्माला आली असती तर हिच्याशी लग्न करायला मला आवडलं असतं.' असं आत्तापर्यंत मला 25-30 मुलींच्याबद्दल तरी वाटलेलं आहे. पण नाइलाज होता. त्यामुळे गप्पच बसावं लागलं. थोडक्यात मुद्दा असा की, एकतर्फी प्रेम छान असतं. त्यात अपराधी वाटायचं काही कारण नाही. त्या अयशस्वी एकतर्फी प्रेमप्रकरणात फार मजा असते. तो एक महत्त्वाचा आनंदाचा अनुभव असतो.

या सगळ्यामधे एक गोष्ट मात्र अजिबात न समजण्याजोगी असते. काही लोकांचं कुठच्यातरी व्यक्तीवर खूप प्रेम असतं असं ते म्हणतात. ते एकतर्फी असतं आणि खूप तीव्र असतं. इथपर्यंत ठीक आहे. पण पुढे ते प्रेम सफल होत नाही असं कळल्यावर त्या व्यक्तीला इजा कशी करावीशी वाटते? विकृतीशिवाय ही गोष्ट अशक्य आहे. काही लोकं, इजाच काय, प्रेम असलेल्या व्यक्तीची हत्याही करतात. अशी विकृती स्त्रियांच्यात मला आढळलेली नाही. पुरुषांमधेच ही विकृती असणं याचा अर्थ स्पष्ट आहे की, पुरुष अधिकाराच्या खुर्चीवरचा या समाजातला अस्वस्थात्मा आहे. काही थोडे विकृत पुरुष स्त्रीची हत्या करून आत्महत्याही करतात. यात समानता आहे, पण तो त्या स्त्रीवरचा अन्यायच आहे.

त्या पुरुषानी आत्महत्या केली तरी स्त्री काही पुन्हा जिवंत होत नाही.

मुलामुलींच्या कॉलेजच्या वयापर्यंत शिंगं फुटलेली असतात. प्रेम बसण्याचं प्रमाण वाढतं, पण तरी एकतर्फी प्रेमाचंच प्रमाण जास्त असतं. कामाच्या ठिकाणी जवळजवळ परिस्थिती तीच. जीवनसाथच्या मिश्र-गट चर्चेच्यावेळी सुरुवातीला एवढी ओळख नसते तेव्हा हे सगळे असे वागतात की जणू काही लग्न, स्त्री-पुरुष संबंध या विषयांशी त्यांचा कधी संबंधच आलेला नाही.

अधिक ओळख झाल्यावर कळतं की, जवळजवळ सगळ्यांचंच कुणावर तरी आधी प्रेम होतं. वर्गातला मुलगा, गल्लीतली मुलगी असं कुणीतरी आवडलेलं होतं. असं एकतर्फी, थोडं दुतर्फी किंवा प्रेमप्रकरण म्हणण्याजोगं, असं काहीतरी प्रत्येकाच्या बाबतीत झालेलं असतंच.

●

## 4) नॉर्मल - ॲबनॉर्मल तारुण्य

कितीही चमत्कारिक वाटलं तरी ह्या सगळ्या अभ्यासाचा सारांश अगदी स्पष्ट आहे. त्याला प्रेमप्रकरण म्हणायचं का अर्धप्रेमप्रकरण म्हणायचं हे गौण आहे. पण 25-30 वर्षांचा मुलगा किंवा मुलगी ह्यांना कोणाविषयीही आकर्षण वाटलेलं नाही, त्या व्यक्तीबरोबरच्या सहजीवनातल्या स्वप्नरंजनात वेळ घालवलेला नाही असं असेल तर ते 'ॲबनॉर्मलच' समजायचं. एक अभ्यासक म्हणून मी म्हणतो आहे की, कुठची पुस्तकं आवडतात, कुठचे सिनेमे आवडतात, असं एकमेकांना मुलामुलींनी विचारणं ह्याची पुढची खरी आवश्यक पायरी म्हणजे तुला कुठच्या प्रकारची मुलं-मुली आवडतात हा प्रश्न. लग्नापूर्वी ज्या व्यक्तीसंबंधात स्वप्नरंजन केलेलं होतं त्या व्यक्तीचं वर्णन म्हणजे स्वतःच्या 'बायोडेटा'मधला महत्त्वाचा भाग आहे.

अशातऱ्हेनी मन कुणावरही बसलेलं नसेल, तर ती मुलगी किंवा मुलगा घुमा, लाजरा, न्यूनगंडपीडित, संकुचित, इतरांच्या दबावाखाली असाच असणार. अशा व्यक्तीला आपण ॲबनॉर्मलच म्हणणार. असा ॲबनॉर्मल मुलगा किंवा अशी ॲबनॉर्मल मुलगी असेल तर त्यांचं लग्न ते स्वतः ठरवणारच नाहीत. इतरांनी ठरवलं तरी वैवाहिक आयुष्यात खूप अनपेक्षित गोष्टींमुळे घोटाळा समोर येण्याचा धोका आहेच.

●

# 5) दुतर्फी प्रेम प्रकरण

मुलामुलींची किंचित मैत्री, मध्यम मैत्री अनेकांशी असू शकेल. त्यापुढे जाऊन दुतर्फी आकर्षण, दुतर्फी मैत्री, याचं प्रमाण मुळात कमीच असतं. अशी एक कल्पना करून बघा ना. सध्याच्या समाजाच्या स्वतःला समजलेल्या परिस्थितीत आपल्याला योग्य असा जोडीदार सापडणं आणि त्याच वेळेला त्या व्यक्तीलाही आपलं स्वतःचं स्थळ आवडणं याचं प्रमाण खरोखरच 10,000 मधे 1 एवढंच असतं.

एवढ्या सगळ्या गोष्टी जुळतायत असं वाटलं आणि तत्त्वतः होकार असं ठरलं की खऱ्या पुढच्या पायऱ्या काय पाहिजेत आणि प्रत्यक्षात काय घडतं, यात फारच तफावत असते. घरच्या ज्येष्ठांना मुहूर्त, दागिने, समारंभाच्या तयाऱ्या, निमंत्रणांच्या याद्या, एवढंच समजतं. एकमेकांचा स्वभाव कळण्यासाठी प्रयत्न कोणाच्याच यादीत नसतात. माझं याबाबतीतलं मत असं आहे, तत्त्वतः होकार ठरला असला आणि 'साखरपुडा' व्हायचा असला तरी लगेच जीवनसाथ सारख्या अभ्यासमंडळात जायला सुरुवात करावी. असं अभ्यास मंडळ नसलं तर स्वतः अभ्यास गट तयार करावा. निदान सगळ्या शक्यतांची मित्रमंडळींशी चर्चा करावी. खरोखर खात्री झाल्यावरच लग्न ठरल्याचं जाहीर करावं. मग साखरपुडा, 'एन्गेजमेंट सेरिमनी', 'मंगनी' का सरकारी निबंधकाकडे इराद्याची नोंदणी, ते ठरवावं.

●

# 6) लग्न ठरवणं – साखरपुडा वगैरे

या सगळ्या पायऱ्यांनंतर मुलगा-मुलगी यांचं लग्न ठरलं की पुढचा कहाणीचा भाग सुरू होतो. माझ्या मते, मुलगा-मुलगी यांनी लगेच वैद्यकीय तपासणी करून घ्यावी. त्याचं महत्त्व काय त्याविषयी स्वतंत्र प्रकरणात सगळं सापडेल.

वैद्यकीय तपासणीनंतर साखरपुडा, एन्गेजमेंट, रजिस्ट्रेशन यापैकी कुठच्याही पद्धतीनी निर्णयाचा करार करायचा असला तर त्यात काही गैर नाही. विवाह निबंधक म्हणजे रजिस्ट्रेशन ही एक चांगली सोय असते. लग्नाची नोटीस देणं हाही ट्रायपार्टी करारच; पण जास्त आधुनिक आणि सामाजिक परिस्थितीशी सुसंगत. पारंपरिक साखरपुडा, मंगनी, एन्गेजमेंट यांच्यात कुठल्या ना कुठल्या प्रकारचा समारंभ-खर्च, पार्टी गृहीत असते. प्रत्यक्षात अशा समारंभाची, उत्सवीपणाची, खर्चाची खऱ्या वास्तववादी आणि आधुनिक, समजदार, मॅच्युअर माणसाला गरज नसते. त्याला विवाह निबंधकाकडचा अर्ज अगदी पुरेसा असतो.

तरी त्यात एक अडचण येते. विवाहनोंदणी कायद्यानुसार अर्ज केल्यापासून कमीत कमी एक महिना विवाह नोंदवता येत नाही आणि अर्जाच्या तारखेपासून जास्तीत जास्त तीन महिन्यांत नोंदणी करता येते. परदेशातून छोट्या सुट्टीत भारतात येऊन लग्न करणाऱ्या लोकांना हा नियम सोयीचा नसतो. कायदा बदलणं आपल्या हातात नाही हे मान्य करून, अशांनी एका चकरेत लग्न ठरवावं नि 6 महिन्यांनी पुन्हा वेळ काढून यावं नि लग्न करावं. मधल्या काळात पत्रं, चर्चा चालू ठेवाव्यात; पण ठरल्यावर 'लगेच लग्न' कुठल्याही परिस्थितीत टाळावं.

ठरवल्यापासून फार उशिरा लग्न करण्यातही खूप अडचणी संभवतात. नोकरी-धंद्यातल्या, कुटुंबाच्या, स्वतःच्या, मानसिक अधीरतेच्या अडचणी असतात. एवढ्या काळात भावी नवऱ्याचं किंवा होणाऱ्या बायकोचं दुसऱ्या कोणाशी सूत जमेल याचीही मनात भीती असते. प्रत्यक्षात अशी शक्यता फार कमी असते. खरोखर एक माणूस लग्न करण्याजोगा मिळण्याची मारामार, तिथे आणखी कोणीतरी त्यापेक्षा सरस भेटेल ही कल्पना खरी नसते. शिवाय आपल्यासारख्या अभ्यासपूर्ण पद्धतीनी, प्रश्नावलीची चर्चा बारकाव्यानी एका व्यक्तीबरोबर करण्याचाही

मुलामुलींना कंटाळा येतो, मग दुसऱ्या कोणाबरोबर प्रश्नावली अभ्यासाची शक्यता किती कमी असेल!

पेशन्स हा चांगला गुण आहे. संयम या सद्‌गुणाबद्दल मला अतिशय आदर आहे; पण त्याचं टोक गाठून घोटाळ्याची शक्यता जास्त. लग्न ठरवून ठेवून 4-5 वर्षं थांबल्याची उदाहरणं दिसतात आणि ठरल्यापासून 3-4 दिवसांत लग्न झाल्याचीही उदाहरणं आहेत. ही दोन्ही अगदी चुकीची टोकं टाळावीत.

जोडीदाराच्या निवडीसाठी जी प्रश्नावली वापरायची तीच प्रश्नावली या लग्न ठरल्यानंतरच्या काळासाठी चालते. त्याच्या जास्त तपशिलात शिरावं म्हणजे खूप माहिती वाढते. हा मधला काळ फोनवर बोलण्याचा असो, प्रत्यक्ष भेटीचा असो नाहीतर टपाल-ईमेल पत्रभेटीचा असो, मुद्दे विसरू नयेत. या बाबतीतही जवळच्या व्यक्तीशी नियमित चर्चा करायला विसरू नये.

या मधल्या काळात पत्रव्यवहार किंवा प्रत्यक्ष भेटीत मतभेद निघाले तर ते टाळू नयेत. त्यामुळे ठरलेली लग्नं मोडत नाहीत. मतभेद लपवल्यानी झालेली लग्नं मोडतात, हे लक्षात ठेवावं. प्रत्यक्ष वैवाहिक आयुष्यात अशा मतभेदांची उकल संतुलितपणी करायचीय हे ध्यानात घेऊन त्याची आत्ताच रंगीत तालीम करावी.

●

*पेशन्स हा चांगला गुण आहे. संयम या सद्‌गुणाबद्दल मला अतिशय आदर आहे; पण त्याचं टोक गाठून घोटाळ्याची शक्यता जास्त. लग्न ठरवून ठेवून 4-5 वर्षं थांबल्याची उदाहरणं दिसतात आणि ठरल्यापासून 3-4 दिवसांत लग्न झाल्याचीही उदाहरणं आहेत. ही दोन्ही अगदी चुकीची टोकं टाळावीत.*

## 7) अविचाराची शक्यता

आणखी एक शक्यता असते. सर्वसाधारणपणी सारासार विचारांनी वागणाऱ्या मुलामुलींनाही आपल्या समाजात स्त्री-पुरुष निकट सहवासाचा अनुभव नसतो. याउलट पाश्चात्त्य समाजात लैंगिक संभोगाचा अनुभव फार लवकर सुरू झाल्यामुळे अनेक विकृती जन्मलेल्या आहेत, हेही खरं आहे.

आपल्याकडे स्त्री-पुरुष मैत्रीचाही अनुभव नसल्यामुळे जवळिकीतून विवेक आंधळा बनण्याची शक्यता असते. लग्न ठरल्यानंतर लग्न होण्याच्या मधल्या काळात मुलगा-मुलगी दोघंच बाहेर हिंडतात, खातात, एकाच दुचाकी वाहनावरून जातात, स्पर्श होतात, स्वभावातल्या ज्या गोष्टी तपासायच्या, विचारायच्या, बोलायच्या असतात त्या राहून जातात. आकर्षणामुळे त्यांचा उल्लेख सुद्धा राहून जातो. स्त्री-पुरुष ओढीमुळे खरा विचार करणारे बुद्धीचे पैलू तात्पुरते काम करीनासे होतात. यासाठी आणखी एक गोष्ट आवश्यक आहे. अशा बैठका घरीच घ्याव्यात. मुलगा/मुलगी यांना दोघांनाच बोलण्यासाठी घरात तेवढी जागा करून द्यावी. हे शक्य नसलंच तर रेस्टॉरंटमधे भेटावं. दोघांनी स्वतंत्रपणी ठरलेल्या ठिकाणी परस्पर जमावं किंवा दोघांनी कुठेतरी प्रवास करून दिवसभर हिंडून यावं. त्यासाठी पब्लिक ट्रान्सपोर्ट वापरावा. यानी दोन्ही गोष्टी साध्य होतात. अनावश्यक स्पर्शामुळे मानसिक सापळे तयार होत नाहीत, विचार बाजूला पडत नाही आणि एकमेकांबरोबर 'फिरल्याचा' समाजात बोलबालाही होत नाही. लग्न ठरण्यापूर्वी तर ही पथ्यं फार महत्त्वाची ठरतात. लग्न ठरल्यानंतरही या अविचाराची आईवडलांना काळजी असते याविषयी जाणीव ठेवावी.

आणखी एक निराळा प्रश्न असू शकतो. काही व्यक्ती 'पॅशनेट' असतात. त्यांच्या भावनांचा जोर, विवेकाच्या 'ब्रेक'पेक्षा जास्त असतो. अशांनी तर जास्त काळजी घ्यायला पाहिजे. प्रेमाच्या कल्पनेवरचं प्रेम फारचं टिकाऊ नसतं. 'पॅशनेट' माणसांचे निर्णय 'त्याक्षणी काय वाटतं' यावरच जास्त अवलंबून असतात. विवेक ही गोष्ट त्यांना नेहमी मागूनच सुचते. आपण कसे आहोत हे ठरवताना याचा विचार प्रत्येकानी जरूर करावा. स्वतःच्या हातून अविचाराचं कृत्य होऊ देऊ नये. त्यामुळे चुकीच्या जोडीदाराबरोबर नाइलाजानी लग्न करण्याची पाळी येऊ देऊ नये.

●

## 8) लग्न मोडणं/प्रेमभंग

लग्नापूर्वीची प्रेमप्रकरणं अशा 'किंचित-मैत्री' ग्रेडची असली तरी लग्नापूर्वी ती मोकळेपणानी सांगायला कोणी तयार नसतं. अधिक घनिष्ट प्रेम असलं तर ते सांगण्याची शक्यता आणखीन कमी आणि शारीरिक संबंधांपर्यंत मैत्री असली तर तो लपवण्याचा निर्णय झालेलाच असतो. चुकून त्या मुलाला किंवा मुलीला खरं सांगण्याची इच्छा असली तरी घरचे लोक खरं बोलू देत नाहीत. एखादं ठरलेलं लग्न मोडलं असलं तर घरचे खूपच काळजीपूर्वक पद्धतीनी घरात 'कॉन्फरन्स' घेऊन खोटं बोलण्याचा 'प्लॅन' करून त्या मुलीवर/मुलावर दबाव टाकतात.

जीवनसाथ विवाह अभ्यास मंडळात असा एक प्रश्न नेहमी चर्चेला असतो. तुमच्या होणाऱ्या नवऱ्याचं किंवा बायकोचं लग्नाआधी कुठच्यातरी ग्रेडचं प्रकरण होतं असं धरून चाला. ते तुम्हाला लग्नाआधी तपशिलात कळलेलं आवडेल का लग्नानंतर कळलेलं आवडेल, असा प्रश्न प्रत्येकाला केलेला असतो. 100 टक्के मुलामुलींचं उत्तर 'लग्नाआधी' असं असतं. क्वचित एखादा मुलगा (मुलगाच) म्हणतो की, तिचं काही प्रकरण नसलेलंच मला जास्त आवडेल, आधी का नंतर कळण्याचा प्रश्नच नाही. मग सूत्रधार म्हणून मी विचारतो, अशा वर्णनाची मुलगी असेल तर ती 'ॲबनॉर्मल' नाही का? मग तो बावचळतो आणि मग मूळ मुद्दा कबूल करतो किंवा गप्प बसतो.

ह्या सगळ्यामधली मुख्य प्रेरणा स्पष्ट करतो. आधीचं प्रेमप्रकरण आपल्या होणाऱ्या नवऱ्याला किंवा बायकोला सांगता आलं तर मनावरचं खूप मोठं ओझं कमी होतं आणि त्याचा अप्रत्यक्षपणे असा अर्थ होतो. 'पूर्वी मला माझं स्वतःचं मन समजत नव्हतं. आता मी मोठा झालो आहे. दुसऱ्याची पारख मला आता अधिक चांगली जमते आणि त्यामुळे आपल्या प्रत्यक्ष वैवाहिक आयुष्यात माझ्या हातून असा घोटाळा होणार नाही.'

जीवनसाथचा हा विषय ह्या स्वरूपात इतक्यात स्पष्टपणी ऐकणं, चर्चेत भाग घेणं, वाचणं, हे कोणी करायला हवंय? लग्नाचा मुलगा, मुलगी, त्यांचे भाऊ-बहीण, आई-वडील, आजी-आजोबा सगळ्यांनी. कारण हा वास्तववादी

आधुनिक दृष्टिकोन लक्षात येईपर्यंत ही सगळी मणामणाची ओझी तुम्ही वाहत राहणार; त्याला मात्र इलाज नाही.

मगाशी आपण म्हणालो त्याप्रमाणे बहुतेक प्रेमप्रकरणांत व्यक्तीवरच्या प्रेमापेक्षा प्रेमाच्या कल्पनेवरच प्रेम असतं. ते पुढे टिकून राहण्याचं प्रमाण बरंच आहे. दुसरं शारीरिक आसक्तीमुळे बसलेलं प्रेम. ते फार काळ टिकत नाही, असं निरीक्षण आहे. मैत्रीतून हळूहळू विकसित होत गेलेलं प्रेम हे सर्वांत टिकाऊ ठरतं. आणि दुसऱ्यावर उपकार म्हणून केलेलं प्रेम ह्याचाही जीव छोटा असतो. दुसऱ्याचा उद्धार आणि त्यासाठी प्रेम हे स्वार्थाचंच परार्थरूप आहे.

●

## 9) विवाहबाह्य आकर्षण/प्रेमप्रकरण

लग्नानंतरही आकर्षण आणि तेही जोडीदाराच्या मित्राबद्दल किंवा मैत्रिणीबद्दल वाटू शकतं. वरती सांगितलेले रूप, गुण, कणव हे सगळं लग्नानंतरच्या आकर्षणातही शक्य असतं. त्याखेरीज लपवून, चोरून प्रकरण करण्याची एक्साइटमेंट हाही घटक असतो. बहुतेक वेळा नवरा-बायकोचं भावनिक, शारीरिक, आर्थिक संबंधांबद्दल समाधान नसल्यामुळे त्याची सुरुवात होते. कधीकधी कपड्यांसकट शरीरस्पर्शापर्यंत मर्यादा सांभाळली जाते. क्वचित लैंगिक शारीरिक संभोगही घडतो. अशा संबंधाची गरज पैसे देवाण -घेवाणीशीही कधीकधी जोडलेली असते. भेटवस्तूंच्या स्वरूपात, दागिन्यांच्या, रोखीच्या स्वरूपात देखील.

अगदी खरं सांगायचं तर परस्त्री, परपुरुषाबद्दल कधी विचारही केला नाही असं कोणीच नसतं. हे वास्तव सध्याच्या पिढीनी मान्य करणं याला इलाज नाही. स्त्री-पुरुष आकर्षण या नैसर्गिक भावनेवर फार बंधनं न घालणं आणि एका बाजूनी लैंगिक शिक्षण त्या व्यक्तीला उपलब्ध करणं हे दोनच इलाज त्यावर आहेत.

लग्नानंतर एकमेकांच्या संमतीनी, खुशीनी विवाहबाह्य संबंध असले तर काहीच अडचण नाही, भांडणही होणार नाही आणि इतरांना ते कळणार सुद्धा नाही. प्रत्यक्षात तसं घडत नाही. जगभर परस्त्री-परपुरुष यावरून भांडणं, घटस्फोट हे चालू असतं. एकमेकांना जोडीदारानी परस्त्री,पुरुषाचा विचारही केलेला चालत नाही.

पुरुषाच्या आणि स्त्रीच्याही मनात योनिशुचितेचं अतिरिक्त महत्त्व असतं. अगदी खरं सांगतो, जोडीदार व्यभिचार करणारा निघाला तर त्याला रोखण्याचा खात्रीशीर मार्ग नसतोच. चोरून दुसऱ्याचे मोबाईल तपासणं, पहारा करणं, मागे मागे जाऊन 'जासुसी' करणं वगैरे गोष्टींनी प्रकरण जास्त बिघडत जातं. हाती काहीच लागत नाही.

कधीकधी ताटातूट म्हणजे परगावी, परदेशी जास्त प्रमाणात असणं, जाणं यानीही संबंध दुरावतात, व्यभिचार घडतो. बलात्कारही घडतात. या सगळ्या

प्रश्नांबद्दल एकमेकांशी केलेली मोकळी चर्चा हा एकच इलाज असतो. थोडक्यात लग्नापूर्वी, लग्नानंतर घेतलेलं लैंगिक शिक्षण याखेरीज आपण काहीच करू शकत नाही.

योग्य निर्णय घेण्याचा दावा करणारे परंपरेमधले प्रकार आपल्या माहितीचे आहेत. ज्योतिषशास्त्राचे प्रकार, मध्यस्थ व्यक्ती किंवा मध्यस्थ संस्था, म्हणजेच वधू-वर सूचक संस्था, यांचा दावा खरा नसतो. यासाठी तर प्रश्नावली — विवाह किंवा विवाह अभ्यास मंडळ हा मार्ग शोधलाय.

अभ्यास मंडळात काय करायचं ते स्वतः करायचं असतं, त्यामुळे तो मार्ग सोपा मात्र नसतो. तो स्वावलंबनाच्या अनेक तपशिलांपैकी एक भाग आहे.

●

*लग्नानंतर एकमेकांच्या संमतीनी, खुशीनी विवाहबाह्य संबंध असले तर काहीच अडचण नाही, भांडणही होणार नाही आणि इतरांना ते कळणार सुद्धा नाही. प्रत्यक्षात तसं घडत नाही. जगभर परस्त्री-परपुरुष यावरून भांडणं, घटस्फोट हे चालू असतं. एकमेकांना जोडीदारानी परस्त्री,पुरुषाचा विचारही केलेला चालत नाही.*

## 10) खरं प्रेम म्हणजे काय?

खरं प्रेम या कल्पनेबद्दल मुद्दामहून एक महत्त्वाची गोष्ट मला तुम्हाला सांगायची आहे. लग्नाआधी स्त्री-पुरुषांच्या मनातलं आकर्षण मला समजतं. पुढे केव्हातरी लग्न होतं. नवरा-बायकोच्यात लैंगिक संबंध असतात, मुलं होतात, मालमत्ता नावावर चढते, चरितार्थ चालू असतो. अडचणी येतात, प्रश्न सुटतात, सगळं होतं.

पण नवरा-बायकोच्यात खरं प्रेम निर्माण व्हायला खूप वेळ लागतो. काहींचं लवकर, काहींचं उशिरा, पण सरासरी 25 वर्षं लागतातच. हा सगळा विचार केला तर एक प्रसिद्ध, लोकप्रिय विधान खरं नाही असं मला वाटतं. ते विधान म्हणजे 'आयुष्यात खरं प्रेम एकदाच होतं.' असं वाक्य सिनेमा, साहित्य सगळीकडे सर्वमान्य कल्पनेसारखं वापरतात आणि लोकांचा त्याच्यावर खरोखर पूर्ण विश्वास बसतो. या कल्पनेतून सगळ्यांनी बाहेर पडायला हवंय.

लग्नाआधी एखाद्या व्यक्तीवर प्रेम असलं, त्या व्यक्तीशी लग्न करणं जमलं नाही, प्रेमभंग झालेला असला, तरीदेखील लग्नानंतर आयुष्य कसं जगायचं याचा नीट अभ्यास केला तर खरं प्रेम आपल्या जोडीदारावर करता येतं. त्यासाठी तर ही कार्यशाळा, हा पुस्तकसंच आहे.

●●●

*लग्नाआधी एखाद्या व्यक्तीवर प्रेम असलं, त्या व्यक्तीशी लग्न करणं जमलं नाही, प्रेमभंग झालेला असला, तरीदेखील लग्नानंतर आयुष्य कसं जगायचं याचा नीट अभ्यास केला तर खरं प्रेम आपल्या जोडीदारावर करता येतं. त्यासाठी तर ही कार्यशाळा, हा पुस्तकसंच आहे.*

# 2

# विमुक्त जीवन

आपला सगळा अभ्यास नॉर्मल लोकांचा आहे. मतिमंद, विकलांग, अपंग यांचा आपला अभ्यास नाही. नॉर्मल अविवाहितांचे एकूण 2 प्रकार आहेत. पहिला प्रकार असा की, ज्यांना लग्न करायचं होतं, प्रयत्न केला आणि बरीच वर्षं ते न जमल्यामुळे पुढे नाद सोडला. दुसरा प्रकार संख्येनी फार कमी, पण अस्तित्वात आहे. तो म्हणजे लग्न ही कल्पना पसंत नसल्यामुळे अविवाहित राहण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेणारे. असे लोक विचारांनी स्पष्ट असतात आणि ते जे काही जगतात, ते विमुक्त जीवन या कल्पनेच्या जवळपास जाणारं आयुष्य असतं. आज आपण विमुक्त जीवन ही काय संकल्पना आहे, हे बघूया.

अशी कल्पना करा की जिथे देश नाही, सरकार नाही, कायद्याचं बंधन नाही. सर्व प्रकारची यंत्रं वापरण्यासाठी सरकारी वीज नाही, पण पवनचक्की आहे. पायी चालण्यापुरते रस्ते आहेत, पण इकडे-तिकडे जायला फक्त सायकल आहे. स्कूटर्स, कार्सचा प्रश्नच नाही. ड्रेनेज लाईन नाही. कारण सेप्टिक टँक आहे. गुरं आहेत. दूध आहे, गोबर गॅस प्लँट आहे, शेतीची सगळी शारीरिक मेहेनतीनी वापरण्याची हत्यारं आहेत. शेतीची लोकांना व्यवस्थित माहिती आहे, कारण सगळे व्यवस्थित शिकलेले आणि सुसंस्कृत लोक मुद्दामून अशा ठिकाणी रहायला गेले आहेत. सगळे धडधाकट आहेत आणि स्त्री-पुरुषांचा तो मिश्र गट आहे. एवढं गृहीत धरून विमुक्त जीवनाची संकल्पना समजावून सांगतो.

एरवी दोन गोष्टींनी आपलं सबंध आयुष्य व्यापलेलं असतं. अत्यावश्यक गरजा पुऱ्या करण्यासाठी, पैसे मिळविण्यासाठी काहीतरी उद्योग आणि दुसरी गोष्ट म्हणजे नैसर्गिक स्त्री-पुरुष आकर्षणाची भावना. विमुक्त जीवन या कल्पनेत आपण असं गृहीत धरू की, आपल्याकडे भरपूर सुपीक जमीन, गोडं पाणी,

सूर्यप्रकाश, थोडक्यात वनस्पती उगवण्यासाठी उत्कृष्ट वातावरण आहे. जमिनीचा आकार तुम्ही कल्पना कराल तेवढा मोठा आहे. भोवताली उत्तम दर्जाचं कुंपण आहे. माणसं किंवा श्वापदं यापैकी तुमची इच्छा नसताना कोणीही आत येणार नाही अशी व्यवस्था आहे. खाण्यापिण्याच्या सर्व गरजा भागतील अशी सोय वनस्पतींमुळे नक्की होऊ शकते. तुम्ही कल्पना कराल एवढी माणसं सहज राहतील एवढं सुरक्षित घर तिथे असेल. या व्यवस्थेमुळे पैसे मिळवणं ह्या गरजेसाठी सबंध आयुष्यात कुंपणाबाहेर नाही पडलं तरी त्याची सोय असेल. ह्या अशा 'कॉलनी'मधे स्त्री-पुरुष नात्याबद्दल कसलंही सामाजिक बंधन नसेल. आता विमुक्त जीवनाविषयी आपल्या समाजात भेडसावणारे प्रश्न एक एक करून काढायचे आणि त्याला आपल्या ग्रुपमधूनच सुचतील ती उत्तरं द्यायची असं करून बघूया.

**प्रश्न :** हे लोक दिवसभर काय करतील?

**उत्तर :** कदाचित काहीही करणार नाहीत. वाचन करतील, खूप व्यायाम करतील, बैठे, मैदानी खेळ खेळतील. अनेक वेळा विभागून थोडं थोडं जेवतील, झोपतील, कदाचित कंटाळून कुंपणापलीकडे काय आहे, ते बघायला जातील. सारांशात, कायम मजेत असतील.

अशा कार्यक्रमात प्रश्न आणि ग्रुपमधून त्याची निघणारी उत्तरं ही सुरुवाती- सुरुवातीला कमी असतात. त्यानंतर लोकांना कल्पना सुचायला लागतात. मग त्याचे पर्याय खूप वाढत जातात. मतभेद वाढत जातात. चर्चा रंगत जाते.

**प्रश्न :** त्यांच्यात एका स्त्रीचा, एका पुरुषाचा विवाह ही कल्पना असेल का?

**उत्तर :** बहुतेक नसेल. कारण मुळात सरकार नसेल, कायदा नसेल. कायद्यानी दोन व्यक्तींना एकत्र आणणं आणि त्यांच्यावर वागणुकीची बंधनं टाकणं ही गोष्ट नसेल व त्यामुळे विवाहच नसेल. कुठल्याही स्त्री व पुरुषांचा लैंगिक शारीरिक संबंध असू शकेल. त्याला काळ-वेळाचं बंधन नसेल. दिवस-रात्रीचं बंधन नसेल. वयाचं बंधन नसेल.

**प्रश्न :** परस्त्री, परपुरुष, प्रेमप्रकरण, फसवणूक, प्रेमभंग, प्रतारणा असं काहीच नसल्यामुळे स्त्री-पुरुष संबंध या विषयावरचे ताण अजिबात नाहीत असं होईल का?

**उत्तर :** ताण अजिबात नसतील.

**प्रश्न :** मुलांचा जन्म झाला तर ती कोणाची असतील? आई माहिती असेल, पण वडील कदाचित माहितीच नसतील. मुलं कोणाचं नाव लावतील?

**उत्तर :** प्रत्येक मूल ही सगळ्यांची जबाबदारी असेल. बाळाला त्याची आई आणि इतरही बायका दूध पाजतील. प्रत्येकाला ओळखण्यासाठी नाव असेल, पण आडनाव नसेल.

**प्रश्न :** गर्भारपणात बाळाला जन्म देताना किंवा एरवीदेखील तब्येतीचे प्रश्न आले तर हे लोक काय करतील?

**उत्तर :** वनस्पतीपासूनच सगळी औषधं बनतात. एरवीसुद्धा. त्या औषधांची अशा गटाला चांगली माहिती असावीच लागेल. पण रुग्णालय वगैरे नसेल. मुलांच्या पालनपोषण, आरोग्य याची सगळे मिळून जबाबदारी घेतील. औषधांचं ज्ञान मुलांना नसल्यामुळे सगळे सज्ञान लोक ती जबाबदारी घेतील.

**प्रश्न :** एवढ्या सगळ्या लोकांच्या मधे एखादी स्त्री-एखादा पुरुष जास्त आकर्षक किंवा स्वभावानी चांगला असल्यामुळे, त्यांना मागणी जास्त असल्यामुळे वाद निर्माण होतील का? किंवा कमी आवडता पुरुष, कमी आवडती स्त्री यांचेही संबंध असतील आणि असे कसलेच प्रश्न येणार नाहीत?

**उत्तर :** असे प्रश्न असू शकतील. पण वातावरणाचा सामाजिक ताण नसल्यामुळे त्याची उत्तरं शोधणं सोपं असेल.

**प्रश्न :** अशा समाजात शाळा असतील का?

**उत्तर :** मुलांची संख्या कमी असेल. मुलं मुख्यतः जीवनशिक्षण घेतील. इतर मोठी माणसं त्यांना बोलायला, वाचायला, लिहायला शिकवतील. भरपूर पुस्तकं उपलब्ध असतील. त्यामुळे आपल्याला अभिप्रेत आहे तशी शाळा नसेलच, पण जास्त चांगल्या पद्धतीनी भरपूर शिक्षण होईल. मुख्य म्हणजे ते मजेत होईल.

**प्रश्न :** अशा समाजात आई आणि मुलगा यांचा शरीरसंबंध होणार नाही, पण बाप आणि मुलगी निश्चित माहिती नसल्यामुळे त्यांचा संबंध येऊ शकेल का?

**उत्तर :** जवळच्या नात्यातल्या स्त्री-पुरुषांचा शारीरिक संबंध आला तर जन्मणारं मूल 'ॲबनॉर्मल' होतं असं सगळे म्हणतात. पण या कल्पनेला विरोध

करणाऱ्यांनी जितके गंभीर परिणाम अभिप्रेत धरले आहेत तेवढे ते गंभीर नाहीत असं विज्ञान म्हणतं. असे संबंध म्हणजे 'इन्सेस्ट' अनेक पिढ्यांच्यात चालू राहिले तर दुष्परिणाम होतात अशी विज्ञानाला शंका आहे.

**प्रश्न :** या अशा प्रकारच्या खूप मोठ्या कुटुंबात किती लोक रहात असतील आणि याच्यात स्त्री-पुरुष प्रमाण किती असेल ?

**उत्तर :** कदाचित या कुटुंबात थोडीच माणसं असतील आणि त्यात जवळपास निम्मे निम्मे स्त्री-पुरुष असतील. कदाचित या कल्पनेच्या आकर्षणामुळे सुरुवातीला पुरुषांची खूप गर्दी होईल आणि स्त्रिया अगदी कमी असतील.

**प्रश्न :** अशा समाजात राजकारण असेल का? निवडणूक, पुढारी असं काही असेल का?

**उत्तर :** राजकारण या शब्दावरून आपल्याला जे प्रतीत होतं तसं राजकारण नसेल. निवडणुका नसतील, पण ज्या व्यक्तीला ज्या विषयाचं उपजत अंग, अभ्यास आणि ज्ञान असेल तो त्या विषयापुरता ज्ञानी म्हणून इतर लोक मानतील. रोजच्या व्यवस्थेच्या अधिकारासाठी पुढारी नसेल. संपूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य असेल.

**प्रश्न :** अशा गटाला 'कम्यून' म्हणायचं का? हा कम्युनिझमचाच प्रकार आहे का? अशा गटात कामाची विभागणी कशी असेल? कार्यक्षमता कमी होईल का?

**उत्तर :** राजकीय अर्थानी हा कम्युनिझमचा प्रकार नसेल, कारण राजकारण नसेल. याला विमुक्त गट असंच म्हणावं. सगळ्यांना जवळजवळ सगळी कामं येत असतील. त्यामुळे कामाच्या विभागणीचे प्रसंग क्वचित येतील. पण प्रत्येक सज्ञान व्यक्ती स्वावलंबी असल्यामुळे फार प्रश्न येणार नाहीत. अवजड वस्तू आणि वनस्पतीचे नैसर्गिक मोसम अशा प्रसंगी एकमेकांची मदत घेताना कामाची विभागणी करावी लागेल. आणि सगळ्यांची कार्यक्षमता निश्चित वाढलेली असेल. कारण ताण नसतील.

**प्रश्न :** असं धरून चालू की हवामानाचे प्रश्न या ठिकाणी नाहीत. या कुटुंबाच्या घरात बंद खोल्या असतील का? आडोसे असतील का?

**उत्तर :** कदाचित खोल्या आणि आडोसे नसतील. लज्जारक्षण नावाची कल्पना

नसल्यामुळे कपडेही नसतील. दुसरी शक्यता, कपडे असतील. आडोसेही असतील. कारण ती मानवाची नैसर्गिक भावना आहे. इतर प्राण्यांच्यात आणि मानवात जे मुख्य फरक आहेत त्यापैकी तो एक फरक आहे.

**प्रश्न :** स्वयंपाक कसा असेल? स्वयंपाकघर एक असेल का अनेक?

**उत्तर :** बहुधा अनेकांनी एका वेळेला काम करण्याजोगं मोठं स्वयंपाकघर असेल. स्वयंपाकाची घाई नसल्यामुळे खूप चवीनी उत्तम स्वयंपाक होईल. कदाचित नुसती फळं, कच्च्या भाज्या असं लोकांचं आरोग्यपूर्ण अन्न असेल.

**प्रश्न :** एखादी व्यक्ती या विमुक्त गटामधे तात्पुरती रहायला, निर्णय घेण्यासाठी राहून बघायला आली तर? किंवा एखादी गटातली व्यक्ती तात्पुरती बाहेर गेली तर?

**उत्तर :** काही बंधन नसेल. विमुक्त याचा अर्थच विशेष मुक्ती असा असल्यामुळे दुसऱ्याला त्रास होईल असं काही न करण्याचं फक्त बंधन असेल. तुमच्या माहितीसाठी सांगतो. आसपासचं जग आहे ते तसंच्या तसं ज्याला पसंत नाही त्याचं विचारचक्र अखंड चालू असणार. स्वतःला पटणारी गोष्ट तो माणूस सतत दुसऱ्याला सांगत राहणार. चालू विवाहपद्धत आहे तशी मान्य नसल्यामुळे विमुक्त समाजाचे अनेक प्रयोग जगभर लोकांनी केले. माझ्यासारख्यांनी त्याचा फक्त अभ्यास केला. विलायतेत या विषयाचा अभ्यास भारतातल्या पेक्षा अधिक लोकप्रिय आहे. आपला समाज मात्र या विषयीच्या चर्चेत हजर असलेलं आपल्याला कोणी बघेल या विचारानीही बावचळतो.

आसपास दिसणारी समाजयंत्रणा पसंत नसलेल्यांपैकी मी एक असल्यामुळे मी विमुक्त गट स्थापन करता येईल का, अशा विचारानी अनेकांशी बोललो. ही कल्पना आवडणारे खूप निघाले. प्रत्यक्षात मात्र मी पुढे त्याचं काही करू शकलो नाही हे उघडच आहे. भारतात याबाबतीतले काही अर्ध प्रयोग सध्याही चालू आहेत. भारत सरकारचा अंकुश नाही अशी जागा मात्र सापडवण्याची अडचण आहे.

●●●

# 3

# अविवाहितांचं आयुष्य

## 1) अविवाहितांच्या आयुष्याचा अभ्यास

एक मोठा प्रश्न आहे, तो अविवाहित राहणाऱ्यांचा. ठरवून, विचार करून अविवाहित राहणाऱ्यांची संख्या अगदी कणभर. बाकीचे अविवाहित राहतात ते कधी प्रचंड ध्येयवादामुळे, कधी प्रेमभंगामुळे, कौटुंबिक जबाबदारीमुळे, अवास्तव अहंगंडामुळे किंवा शारीरिक न्यूनामुळे लग्न जमत नाही म्हणून! याखेरीज मोठं कारण म्हणजे स्वतःच्या चुकीच्या अपेक्षांमुळे. खरं तर एखाद्या मुलीनी किंवा मुलानी अभ्यासपूर्ण पद्धतीनी अविवाहित राहण्याचा निर्णय घेतला असला, तर तुमची-आमची काहीच हरकत नाही. मग प्रश्न उरतो एकच, आवश्यक तो अभ्यास ते कुठे करू शकतात?

आमच्या विवाह अभ्यास मंडळात अविवाहितांना आम्ही वक्ते म्हणून मुद्दाम बोलावतो. त्यांचे अनुभव खूप काही सांगून जातात. अभ्यास मंडळात अशी मुलं-मुली बऱ्याच संख्येनी असतात, की ज्यांच्या डोक्यात हे सगळे प्रश्न रोज गोंधळ घालत असतात. त्यांचे विचार गटचर्चेमुळे स्पष्ट होतात.

विशीच्या आसपासची अनेक तरुण मुलं 'मी लग्न नाही करणार' असं म्हणतात. खरं म्हणजे लहानपणी प्रश्न न समजल्यामुळे चुकीचं उत्तर देण्यापेक्षा मुलं गप्प राहणं पसंत करतात. मोठेपणी लग्न करावं का नाही? स्वतः कसे आहोत? जोडीदार कसा पाहिजे? या प्रश्नाचं चुकीचं उत्तर देण्यापेक्षा मुलं गप्प राहतात आणि 'लग्न करायचं नाही' असं म्हणत बसतात. लग्न करावं याविषयी खात्री झाली तर सगळ्या प्रकारच्या परिस्थितीतल्या, सगळ्या प्रकारच्या मुलामुलींना

कुठच्याही वयात जोडीदार सापडतोच अशी मी खात्री देऊ शकतो. तो शोधायचा कसा, यासाठी मार्गदर्शन आम्ही विवाह अभ्यासमंडळात करतो. चित्रपटातल्यासारखं आपोआप काही होत नाही. तो किंवा ती आपोआप भेटत नाही. आपल्याला त्यासाठी काहीतरी करावं लागतं.

एक लक्षात ठेवण्याची नवी म्हण सांगतो. 'लग्न करून चांगला जोडीदार मिळाला तर समाधानी जीवन; चांगला जोडीदार नाही मिळाला तर सश्रम कारावास.' दुसरी एक गोष्ट. मी असं वाक्य अनेक वेळा ऐकलंय, 'मला काय विवाह अभ्यास-मंडळाची गरज? मी लग्नच करणार नाहीय.' खरी गोष्ट अशी आहे की तुम्ही कोणीही असा, समाजातल्या स्त्रियांशी किंवा पुरुषांशी तुम्हाला वागायचं आहेच ना? ते कसं वागायचं हाच तर अभ्यासाचा विषय आहे.

अविवाहितांच्या बद्दल हे वाचताना काहींना वाईट वाटेल. काहींना राग येईल. अशांची सपशेल माफी मागतो. समुपदेशनात, माझ्या कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंटच्या व्यवसायात, सामाजिक कामात, खाजगी ओळखीत, नात्यात, भारतात, परदेशात एवढ्या शेकडो माणसांच्यात अविवाहित आणि तरी स्वस्थ, शांत, समाधानी अशा व्यक्ती मी मोजल्या तर बेरीज 5 च्या आत आहे. सगळ्यांची आयुष्याची कथानकं आपल्याला कळण्याचा प्रसंग येत नाही. बहुतेक अविवाहितांना लग्न करण्याची इच्छा असते. पण करिअर, परदेश, आजारपण, प्रेमभंग, लग्नाचं बघायला कोणी नाही, वेळेवर तडजोडीचा निर्णय न घेता येणं, अशा अनेक कारणांमुळे शेवटी लग्न राहतं आणि पुढे लग्नाचं वय राहत नाही. एकटं राहण्याचीच सवय लागते. सुखात असलेला जीव दुःखात टाकायची तयारी नसते आणि मग ते राहतं ते राहतंच.

आता लग्नाची इच्छा असून लग्न न जमणाऱ्यांबद्दल लोकांचं निरीक्षण सांगतो. पुरुष असले तर ते 'वहिन्या' शोधत हिंडायला लागतात. आणखी वय वाढलं की बहीण, मुलगी मानणं असा प्रकार वाढतो. क्वचित काही लोक उघड मैत्रिणी (प्रत्यक्षात असतात त्यापेक्षा अतिशयोक्त बढाया मारून) मिरवतात. स्त्री किंवा पुरुष दोघंही अशा अवस्थेत फार फटकून किंवा फार मैत्रीनी इतरांशी वागताना दिसतात. स्त्रिया पुरुषांकडे जास्त संशयानी बघतात. खरोखर कोणाशी शरीरसंबंध असले तर ते लपवण्याचा आटापिटा करताना दिसतात किंवा 'मल्टिपल रिलेशनशिप' या गोष्टींचं उदात्तीकरण करायला लागतात. असे अनेक नमुने आसपास दिसतात.

आणखी एक गोष्ट आहे. हातून मोठं कार्य व्हावं म्हणून ब्रह्मचर्याचं पालन आणि जीवनव्रतासाठी आयुष्य वाहून घेतलं तरी ते कार्य फार कमी लोकांच्या हातून होतं. तेवढी प्रतिभा, संतुलन, बुद्धिमत्ता, चिकाटी, मेहनत अंगी असेल तर विवाह, संसार, मुलंबाळं यांच्याबरोबरच स्वस्थ आयुष्यामुळे तेवढंच ताकदीचं कार्य माणूस उभं करू शकतो. एवढ्या विवाहितांच्या समाजात आपण 'मायनॉरिटी' मधले अविवाहित असल्याच्या गंडामुळे 'नॉर्मल' दिसण्याच्या धडपडीत काही माणसं जास्त केविलवाणी दिसतात. पुरुषजातीचा तिटकारा किंवा स्त्री जातीचा संबंध नको म्हणून रागानी स्वीकारलेलं ब्रह्मचर्यव्रत रागाच्या आवेगानंतर टिकवणं फार कठीण जातं. या प्रकारचे ताण झेलताना खूप मित्रमैत्रिणी आसपास दिसतात.

●

## 2) विवाहाचा इतिहास

विवाहाचा इतिहास हा विषय मानववंशशास्त्रातला आहे. मी मानववंशशास्त्राचा खास अभ्यास केलेला नाही. पण इथे जेवढा भाग सांगणं आवश्यक आहे तेवढा निवडक विवाह या कल्पनेचा इतिहास सांगतो.

स्त्री-पुरुषांचे लैंगिक संबंध तर मानवाच्या उत्क्रांतीच्या सगळ्या टप्प्यात मानवाला माहीत होतेच. स्त्रीला मूल कसं होतं, याविषयी पुरुषाला फारच अचंबा वाटायचा. पुरुषाबरोबरच्या लैंगिक संबंधामुळेच मूल होऊ शकतं हा प्रकाश त्याच्या डोक्यात पडला तेव्हा पुरुष जमातीला फार आनंद झाला. पण अनेक स्त्रियांशी अनेक पुरुष संबंध ठेवत असल्यामुळे विशिष्ट स्त्रीचं विशिष्ट पुरुषापासून झालेलं विशिष्ट मूल ही कल्पनाच कोणाला सुचली नव्हती.

जेव्हा विशिष्ट मूल त्याच्या साधर्म्यामुळे एका विशिष्ट स्त्रीचं आणि विशिष्ट पुरुषाचं असलं पाहिजे ही खात्री झाली तेव्हा वंश या कल्पनेच्या जवळपास जाणारी अंधुक कल्पना प्रथम मानवाच्या डोक्यात आली. आणि तरी देखील स्त्रीलाच फक्त वंश सिद्ध करता यायचा. त्यामुळे मातृसत्ताक पद्धतच सर्वमान्य होती. मालमत्तादेखील स्त्रीचीच समजली जायची.

या सगळ्या परिस्थितीबद्दल पुरुषाच्या मनात विरोध निर्माण व्हायला लागला. शेकडो वर्षांच्यात टप्प्याटप्प्यानी वैचारिक उत्क्रांतीमधून प्रथम मिश्रसत्ता आणि मग शेवटी पुरुषसत्ताक समाज तयार झाला.

मालमत्ता आणि तिची मालकी या गरजेपोटी एक स्त्री आणि एक पुरुष यांचा विवाह या कल्पनेपर्यंत समाज पोहोचला. शारीरिक ताकदीमधल्या फरकामुळे लढाया हे पुरुषाचं क्षेत्र बनलं आणि शेती, मालमत्ता आणि मुलं यांच्या संरक्षणाची जबाबदारी स्त्रीच्या वाट्याला आली. लढायांमधे पुरुष मारले गेल्यामुळे स्त्रियांची संख्या जास्त आणि पुरुषांची संख्या कमी अशी अवस्था झाली. यावर उपाय म्हणून एका पुरुषानी अनेक बायका केल्या तरी चालतील अशी पद्धत रूढ झाली. स्त्रीवर मात्र एकच पती करण्याचं सामाजिक बंधन आलं.

विमुक्त समाज या लेखात आपण बोललो त्या प्रकारच्या बंधनमुक्त अवस्थेपासून समाज थेट विवाह नावाच्या कृत्रिम बंधनात पोहोचल्यामुळे अनेक

घोटाळे, अनाचार आणि अत्याचार व्हायला लागले. आजही विवाहसंस्थेच्या सध्याच्या स्वरूपाकडे बघितलं तर त्यातल्या अडचणींची व्यवस्थित कल्पना येते.

विवाहाच्या इतिहासाचा अभ्यास करताना काही गोष्टींचा उल्लेख स्पष्टपणी आढळतो. व्यक्तिमत्त्व विकासाचा विवाह हा प्रमुख मार्ग मानला गेलाय. स्वार्थ, आप्तांचं हित आणि परार्थ याचा सुवर्णमध्य शोधण्यात आयुष्याचा बराच काळ जातो. वेळ कसा घालवायचा, हा लाखोंचा प्रश्न असतो तो निराळा. मुलं हाही त्यातल्या सुख-दुःखांमुळे आयुष्याला अर्थ देण्याचा एक मार्ग आहे. या संसाररूपी मायाजालाकडे पाठ फिरवून मनुष्यवस्तीपासून दूर जाऊन केलेल्या तपश्चर्येपेक्षा विवाह, संसार, मुलंबाळं, नातेवाईक, चरितार्थाचा झगडा, समाजकंटक, निंदक यातून मार्ग काढत समाधानानी जगणं जास्त कठीण आणि श्रेष्ठ आहे.

●

*जेव्हा विशिष्ट मूल त्याच्या साधर्म्यामुळे एका विशिष्ट स्त्रीचं आणि विशिष्ट पुरुषाचं असलं पाहिजे ही खात्री झाली तेव्हा वंश या कल्पनेच्या जवळपास जाणारी अंधुक कल्पना प्रथम मानवाच्या डोक्यात आली. आणि तरी देखील स्त्रीलाच फक्त वंश सिद्ध करता यायचा. त्यामुळे मातृसत्ताक पद्धतच सर्वमान्य होती. मालमत्तादेखील स्त्रीचीच समजली जायची. या सगळ्या परिस्थितीबद्दल पुरुषाच्या मनात विरोध निर्माण व्हायला लागला. शेकडो वर्षांच्यात टप्प्याटप्प्यानी वैचारिक उत्क्रांतीमधून प्रथम मिश्रसत्ता आणि मग शेवटी पुरुषसत्ताक समाज तयार झाला.*

## 3) काही अविवाहितांची उदाहरणं

जे अविवाहित राहतात त्यांना एक मुख्य गोष्ट जाणवते ती म्हणजे लोक त्यांच्याकडे दुय्यम दर्जाची व्यक्ती म्हणून बघतात. आपल्या समाजातले पुरुष अविवाहित स्त्रियांकडे 'ॲव्हेलेबल' किंवा 'बिचारी' अशा दृष्टीनी बघतात. पुरुषांकडे स्त्रिया संशयानी बघतात आणि विवाहित पुरुष त्यांना स्वतःच्या बायको, मुलींपासून दूर ठेवतात.

अविवाहित अवस्थेमधले पुरुष आणि त्याच अवस्थेमधल्या स्त्रिया यांच्या वागणुकीत बऱ्यापैकी फरक असतो. अविवाहित मुलगे काहीतरी निमित्त काढून कुटुंबवत्सल लोकांकडे जात राहतात. वहिनी वहिनी म्हणत स्त्री सहवासाची संधी शोधतात. मुली असं वागणाऱ्या असतात, पण फार कमी.

'नॉर्मल' म्हणजे स्त्री-पुरुष आकर्षण या निसर्गधर्मावर सारासार विचारांच्या आधारानी ताबा ठेवणारी, चरितार्थाची नीट व्यवस्था करणारी, आत्मसन्मान सांभाळणारी, समतोल अविकृत व्यक्ती असा अर्थ केला तर नॉर्मल असलेले अविवाहित पुरुष किंवा स्त्रिया कमी आढळतात हे मान्य करावंच लागतं.

आमच्याकडे एक अविवाहित वयस्कर गृहस्थ मधून मधून येतात. अकस्मात न कळवता, न ठरवता येतात. मी आणि शोभा एक तर खूप कामात असतो. शिवाय दोघंच रहात असल्यामुळे घरात पोषाखाचा जामानिमा करून आम्ही वावरत नाही. मला इतर अनेकांच्या तुलनेत जास्त उकडतं. त्यामुळे मी तर पोहण्याच्या पोशाखात असतो. एकटा घरात असताना दाराशी कोणीतरी आलं की कोण आहे, विचारतो. त्यांना एक मिनिट थांबायला सांगतो आणि सभ्य पोषाख करून दार उघडतो.

या गृहस्थांना अनेक वेळा सुचवून बघितलं की, फोन करून आलं तर जास्त सोयीचं पडेल. ते म्हणायचे, फोन परवडत नाही. नंतर त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली. तरीही ते फोन वापरत नाहीत. याचा अर्थ, फोन वापरायचा नाही असं त्यांचं तत्त्वच असावं. न कळवता अकस्मात जाऊन दुसऱ्याची गैरसोय करण्यात त्यांना बहुधा मजा वाटत असावी.

काही अविवाहित पुरुष वागतात नीट, पण सारखे स्त्रियांची त्यांच्याशी

कशी जवळीक आहे असे विषय बोलताना काढणं ‘एन्जॉय’ करतात. आपण संभाषण दुसऱ्या विषयावर सुरू केलं तरी ते पुन्हा तिथेच येतात.

एका समुपदेशनाचा अनुभव सांगतो. एका प्रथितयश कंपनीत असिस्टंट मॅनेजर म्हणून काम करणारे एक उच्चशिक्षित गृहस्थ आहेत. अविवाहित आहेत. मध्यमवयीन आहेत. स्वतःच्या समस्येकडे येण्यापूर्वी त्यांनी स्वतःची ओळख सविस्तर करून दिली होती. त्यांच्या मते, ते अत्यंत हुशार, महत्त्वाकांक्षी, अतिशय सिन्सिअर आणि परफेक्शनिस्ट प्रकारचे आहेत. जीवनात खूप काही मिळविण्याची त्यांची उच्च ध्येयं, महत्त्वाकांक्षा आहे. स्वतःच्या या सर्व गोष्टींबाबत त्यांना खूप अभिमान आहे.

त्यांना सहकाऱ्यांचा किंवा हाताखालच्या लोकांचा गलथानपणा जराही खपत नाही. प्रत्येकानी आपल्याला नेमून दिलेलं काम अत्यंत अचूकपणी आणि वेळेतच केलं पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. सबबी सांगणाऱ्या किंवा कामाची टाळाटाळ करणाऱ्या लोकांना शिक्षा झालीच पाहिजे अशी त्यांची धारणा आहे. ते स्वतः कुणापुढे वाकत नाहीत, आणि कुणाला मानतही नाहीत. किंबहुना तशी कोणाचीही लायकी नाही अशी त्यांची खात्री आहे. साहजिकच ते सहकाऱ्यांशी तुटकपणी वागतात. त्यांना चांगले फैलावरही घेतात. स्वतःचं प्रत्येक काम बिनचूकच असतं असा त्यांचा पक्का समज आहे. त्यांची चूक दाखवण्याची कोणालाही हिंमतच होत नसणार.

सहकारी स्त्रियांबाबत त्यांची विशिष्ट आणि ठाम मतं आहेत. त्यांच्या मते, स्त्रिया त्यांच्याशी लगट करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या लगट करण्याला ते प्रतिसाद देत नाहीत. ते स्वतः अविवाहित असले तरी ब्रह्मचर्याबद्दलच्या अतिरेकी कल्पनांनी झपाटलेले आहेत. मग त्या स्त्रिया वरिष्ठ बॉसच्या मदतीनी त्यांच्या कामात चुका काढायचा प्रयत्न करतात आणि त्यांच्यावर कुरघोडी करतात असा त्यांचा पक्का समज आहे. अर्थातच, अशा वातावरणात काम करणं त्यांना दिवसेंदिवस अवघड होत चाललेलं आहे.

या माणसाचं समुपदेशन करताना दोन मुख्य गोष्टी त्याला समजावून सांगायला पाहिजे होत्या. 1) व्यवस्थापनशास्त्राच्या सगळ्या शिक्षणात दुसऱ्या माणसाशी खुबीनी वागणं आणि स्पष्ट पण सभ्य भाषेत काम कसं करवून घ्यायचं, हे शिकवलेलं असतं. ते त्याला कळण्यासाठी 2-4 वेळा तरी भेटावं लागणार होतं. 2) स्त्रियांचं मन कशाप्रकारे सांभाळायचं, शेकडा नव्याण्णव भारतीय स्त्रिया

अशा प्रकारे लगट करणं शक्य नाही, त्याची कारणं, हे समजावून सांगायला हवं होतं. त्यासाठी देखील त्यांना आणखी 2-4 वेळा यायला लागणार होतं.

प्रत्यक्षात त्यांना तर सगळं एका सेशनमधे करून हवं होतं. कारण त्यांना वेळच नव्हता. ते का शक्य नाही हे समजावून सांगण्यातच एक सेशनचा वेळ पुरला नाही. 'कळवतो' सांगून ते बरेच महिने गायब झाले.

5-6 महिन्यांनी परत आले. त्यांच्याबरोबर 10-12 सेशन्स झाली तेव्हा कुठे त्यांना जरा उपाय सापडल्यासारखं वाटलं. त्यानंतर ते अनियमितपणी मधूनमधून जीवनसाथच्या मिश्रगट चर्चांना यायला लागले.

●

## 4) जीवनसाथमधे अविवाहितांच्या प्रश्नाबद्दल काय असतं?

ही सध्याची समाजव्यवस्था आहे तशी पसंत असली तर ठीक. नाहीतर आपल्या परीनी ती बदलूया. निव्वळ बदलासाठी बदल योग्य नसल्यामुळे प्रथम त्याचा अभ्यास करूया. स्त्री-पुरुष आकर्षण नैसर्गिक आहे आणि त्यामुळे त्याची काहीतरी पद्धत आहे, हे प्रथम मान्य करूया. या अभ्यासाच्या प्रक्रियेमधे मोकळ्या मनानी ऐकायला हवं, मोकळ्या मनानी बोलायला हवं. थोडक्यात, सहभाग हवा.

सध्याच्या बऱ्याच मुला-मुलींच्या मनात आपल्याला पाहिजे तसा जोडीदार दुसऱ्यानी हुडकून द्यावा अशी कल्पना असते. मनातून ह्यातला फोलपणा माहीत असतो, पण स्वतः धडपड करायची तयारी नसते. ही कल्पना अभ्यास मंडळात स्पष्ट झाली की सोपं असतं. एखादा मुलगा किंवा मुलगी आवडली तर कसं विचारावं, काय करू नये, त्याच्या निर्णयाच्या पायऱ्या याविषयी पद्धतशीर मार्गदर्शन चालतं.

मगाशी सांगितलं त्या मुलीसारखे तुम्ही लग्न न करण्याच्या प्रकारचे असाल तर तुम्ही लग्न न करण्यातच फायदा आहे. पण लग्न करायचं तुमच्या मनात असेल तर तुम्हाला स्वतःच्या विचारांची परीक्षा करवून घेतली पाहिजे. कारण प्रत्येकाला लग्न करण्यायोग्य जोडीदार कुठे ना कुठे असतोच. तो शोधण्यासाठी प्रयत्न इतरांनी करावेत, हे मात्र डोक्यातून काढून टाका. आयुष्य स्वतःचं तर तो प्रश्नही स्वतःचा, उत्तरही स्वतःच शोधायला लागणार.

आपला समाज असा आहे की, तो छोट्या प्रश्नांची चिकित्सा करत बसेल, पण खूप मोठ्या प्रश्नाला हात घालणार नाही. देशापुढचा भ्रष्टाचार हा खूप गंभीर प्रश्न आहे, पण त्याबद्दल काही करण्याची कोणाची छाती होत नाही. तसंच सामाजिक प्रश्नांच्यामधे ताणलेले किंवा विकृत स्त्री-पुरुष नातेसंबंध हा भयानक प्रश्न आहे. पण त्याच्या अचाटपणामुळे त्याविषयी कोणी बोलायला तयार नसतं. अविवाहित रहायचा एखाद्या व्यक्तीनी निर्णय घेतला तर आपली काही हरकत नाही, पण भिन्नलिंगी व्यक्तीशी संबंधच न ठेवण्याचा निर्णय घेणं म्हणजे निम्म्या लोकसंख्येपासून दूर पळणं. ते कसं योग्य ठरेल?

केवळ भारतातच नाही तर किंचित फरकानी जगभर पुरुषप्रधान समाजच आहे. शिक्षण, पगार, वय, रूप, जात, धर्म, खानदान अशा अनेक कारणांमुळे खूप मुलींची आणि काही मुलांचीही अवस्था जोडीदार शोधण्याच्या दृष्टिकोनातून कठीण होते. अशा वेळी होकारात्मक आणि नकारात्मक विचारही मनात येणारच. एक महत्त्वाचा नकारार्थी विचार असा की, जोडीदार सापडणारच नाही. मुळात स्वतःचं व्यक्तिमत्त्व लग्न करण्याच्या प्रकारचं असलं तर माझा वैयक्तिक सल्ला असा की, उशीर झाला तरी डोक्यातून लग्नाचा विचार काढून टाकू नये. प्रयत्न चालू ठेवावेत.

या नाही त्या गावी, कुठेतरी आपल्याजोगा जोडीदार असतोच. त्याला किंवा तिलाही जोडीदार शोधण्याची तेवढीच गरज असते. प्रश्न फक्त गाठ पडण्याचा असतो. त्यासाठी वधू-वर सूचक मंडळं, अभ्यास मंडळं, ई-मेल क्लब्ज, परदेशी संपर्क, वर्तमानपत्रात योग्य मजकुराच्या जाहिराती, वधू-वर मेळावे, कार्यशाळा, काही म्हणजे काही प्रयत्न सोडू नयेत. हे प्रयत्न स्वतः करण्यात अजिबात संकोच वाटू देऊ नये. वेळ जास्त लागणार हे मान्य करावं.

आता मी सांगणार आहे ते चमत्कारिक वाटेल, हे मला माहीत आहे, पण सांगितलं नाही तर मला स्वस्थ वाटणार नाही म्हणून सांगतो. माझ्या ओळखीत असे अनेक लग्नाचे मुलगे आणि मुली आहेत की ज्यांनी विधवा, विधुर, घटस्फोटित अशा चांगल्या गुणी व्यक्तीशी लग्न केलं आणि सुखानी, समाधानानी संसार केला. मला यात काही चूकच दिसत नाही.

दुसऱ्या बाजूनी बघितलं तर नवरा, बायको, मुलं यांच्यामुळे, आयुष्यात, संसारामधे जाणारा वेळ वाचल्यामुळे अविवाहित लोकांच्या हातून प्रचंड मोठी कामं उभी रहायला पाहिजेत. पण तसं होत नाही. ग्रेट माणसांपैकी फारच कमी जण अविवाहित दिसतात.

●

## 5) समतोलपणी वागणाऱ्या अविवाहितांची उदाहरणं

आमच्या मंडळात जाणीवपूर्वक लग्न न केलेल्यांपैकी एका मुलीची मुलाखत होती. ती मुलगी उच्चशिक्षित आणि कर्तृत्ववान आहे. ती म्हणाली, तिनी आईवडलांचे जे संबंध बघितले त्यामुळे लग्न या कल्पनेविषयी तिला कधीच, काहीच आकर्षण वाटलं नाही. आहेत त्या नातेवाइकांच्या पैकी दोन-चारच नातेवाईक आवडण्याजोगे आहेत. नवरा ही नवीन व्यक्ती आणि त्यांचे भरमसाट नातेवाईक या कल्पनेची तिला भीती वाटायची. तिला मुलांची अजिबात आवड नाही. तिचं आपल्या कामावर खूप प्रेम आहे आणि त्यामधे ती नोकरीत खूप उच्च पदावर पण पोहोचली आहे. चांगले पैसे मिळवत असल्यामुळे तिनी प्रॉपर्टी घेऊन ठेवली आहे. आई-वडलांकडे, भावंडांकडे वर्षातून एकदा-दोनदा येते. त्यांना बोलावते. त्यांच्यावर प्रेमानी खर्च करते. आईवडील आणि भावंडं तिच्याकडे समतोल व्यक्ती आणि सल्लागार म्हणून बघतात.

सुरुवातीला नातेवाईक तिला लग्न केव्हा करणार, असं विचारायचे. पुढे पुढे ते विचारेनासे झाले. त्यानंतर नातेवाइकांचे प्रश्न 'एकटं वाटत नाही का?', 'फावल्या वेळात काय करतेस?' असे अनेक प्रकारचे असायचे. जो प्रश्न नातेवाईक आणि मित्र विचारत नाहीत पण त्यांच्या मनातला मुख्य प्रश्न असतो तो म्हणजे तू शरीरसंबंधांचं काय करतेस? आमच्या ग्रुपमधे मोकळेपणाच्या वातावरणामुळे हा प्रश्न तिला प्रत्यक्ष विचारला. त्याला तिनी स्पष्ट आणि खणखणीत उत्तर दिलं. याची व्यवस्था असते. पण आम्ही विवाहित माणसांच्या भानगडीत पडत नाही. विवाहित पुरुष अशा मुलींच्या मागे जरूर लागतात, पण त्या त्यांना दाद देत नाहीत. तब्येत बिघडल्यावर म्हातारपणात काय करणार? यावर ती म्हणाली, ''तेव्हा आम्ही मित्रमंडळी एकमेकांच्याकडे खुशाल रहायला जातो. जास्त म्हातारे होऊ त्या वेळेला मात्र एकत्र राहण्यात रस आहे, अशा 5-7 लोकांचा ग्रुप अगोदरपासून ठरला आहे.'

जी काही कमी माणसं (बेरीज 5 च्या आत) लग्न न करण्याबाबत सातत्यानी ठाम असतात आणि गंडविरहित रूपात मी बघितली आहेत त्यांच्या कल्पना, अनुभव आणि तयारी यांचं आता वर्णन सांगतो. त्यांनी बराच विचार केलेला असतो.

आपण तरुणपणी कसं वागणार, ह्याची त्यांना स्पष्ट कल्पना असते. लग्न जुळवण्याची कल्पना नसल्यामुळे ते ओळख काढून बोलायला जात नाहीत. जोडीदार शोधणाऱ्या व्यक्तीची नजर भिरभिरती असते, तशी यांची नसते. दुसऱ्याला आपण आवडलो की ते हुरळून जात नाहीत. लाजत नाहीत. मुख्य म्हणजे आईवडील, भावंडं यांच्यावर चरितार्थाचा भार टाकण्याचा त्यांचा अजिबात विचार नसतो. ते स्वतंत्र घर हमखास घेतात.

इतर स्त्रिया, पुरुष आपल्याकडे विचित्र नजरेनी बघणार, हे त्यांना ठाऊक असतं. या विकृत समाजातले पुरुष आपल्याला गृहीत धरणार, हे मुलींना माहिती असतं. अवेळी येणाऱ्या पुरुषांना कटवावं लागतं. रात्री घरी यायला उशीर झाला तरी शेजारीपाजारी कुजबुजतात. पार्ट्या, समारंभात, सहलींना कसं वागायचं, याची तंत्रं पक्की करावी लागतात.

इतर सगळ्यांप्रमाणे त्यांचाही पैशाचा झगडा असतो, आजारपणं असतात. पण आजारपण कसं निभवायचं, याचा त्यांनी विचार केलेला असतो. अशा लोकांचं कामावर-करिअरवर खरं प्रेम असतं. त्यातल्या प्रगतीसाठी लागणारी बुद्धिमत्ता, मेहनत, चिकाटी त्यांच्यापाशी असते. नि ते त्या कामापासून चांगले पैसेही मिळवतात.

अविवाहितांच्या लैंगिक आयुष्याचं काय असेल, याबद्दल लोकांना अति कुतुहल असतं. 'तुम्हाला काय करायच्यायत या चौकशा लेको' असा भाव या 'बॅचलर पार्टी'च्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसतो. खरं म्हणजे त्यांनी त्याचा विचार आणि व्यवस्था केलेली असणं हेच अपेक्षित आहे, पण ही गोष्ट स्पष्ट बोलता येईल अशा व्यक्ती फार कमी असतात. त्यांच्या दृष्टीनी नातेवाईक फार 'नाकखुपसे' असतात. लग्न कर म्हणून मागे लागतात. त्यातल्याही काहींना शारीरिक संबंधाचं काय, हेच काढून घेण्यात रस असतो. या लोकांना नातेवाईक, भावंडं यांच्यापेक्षा मित्र जास्त जवळचे असतात. मुलं नकोत हा निर्णय स्पष्ट असतो.

जागा, पैसे,मालमत्तेबद्दल पुढचे विचार स्पष्ट असतात. त्यात घोळ क्वचितच सापडतात. म्हातारपणची काठी म्हणजे मित्रमैत्रिणी हे आधारासाठी पक्के असतात. त्यांच्याशी सततचा संपर्क असतो. आरोग्याबद्दलही हे निवडक लोक जास्त जागरूक असतात. अनेक नकारार्थी विचार या छोट्या गटानी जास्त आधी आणि शिस्तशीर केलेले आढळतात.

●

## 6) लिव्ह-इन रिलेशनशिप (लग्नाविना एकत्र राहणं)

समतोल अविवाहित लोक ज्या पद्धतीचा जोडीनी संसार करतात तो 'लिव्ह-इन रिलेशन'चाच प्रकार असतो. कधीकधी काही मुलं आणि काही मुली एकत्र राहतात. ते एकत्र राहिल्यामुळे घरभाडं, खाण्यापिण्याचा खर्च, सगळं नेहमीच्या कुटुंबासारखं त्यांना सांभाळावं लागतं. त्यांच्यामधे आलटून पालटून लैंगिक संबंध देखील असतात. कधी कधी काही काळानी त्यातल्या जोड्या पक्क्या व्हायला लागतात. कधी काही लोक बाहेर पडतात, बदलतात. काही जोड्या लग्न करायचं ठरवतात. नव्याण्णव टक्के अशाप्रकारे राहणारी लोकं तरुण असतात. या 'विवाहाशिवाय सहजीवन' प्रकारात नव्याण्णव टक्के लोक मूल होऊ नये अशी खबरदारी घेतात.

आमचा मुलगा शोनील आणि सून ॲनॅस्तेसिया हे ऑक्सफर्डमधे गेली अनेक वर्षं राहतात. ते लग्नापूर्वी एक-दीड वर्ष दोघं स्वतंत्र जागा घेऊन लग्नाशिवाय सहजीवन जगत होते. मी आणि शोभा त्या काळात त्यांच्याकडे दोनदा थोडे थोडे दिवस पाहुणे म्हणून रहायला गेलो होतो.

माझा लग्नाविना सहजीवनाचा अगदी थोडा म्हणजे 3 आठवड्यांचा अनुभव आहे. शोभा माझ्याशी लग्न करण्यासाठी म्हणून फिलाडेल्फियाला आली आणि आम्ही लग्नाच्या नोंदणीची तारीख 'मॅजिस्ट्रेट' कडून मिळेपर्यंत अर्थातच एकत्र रहात होतो. लग्नाशिवाय सहजीवन तरुण मुलं-मुली जगतात ते आणि आम्ही घेतला तो अनुभव यात जमीन-अस्मानाचा फरक होता. कारण आम्ही एकमेकांशी लग्न करणार हा निर्णय झालेला होता. तरुण मुलं-मुली एकत्र रहातात तेव्हा लग्न करायचं का नाही, हा निर्णय व्हायचा असतो आणि केव्हा निर्णय होणार, हे पण ठरलेलं नसतं.

माझा लग्नाविना सहजीवन या विषयाचा स्वतंत्र अभ्यास नाही, पण तो करावा लागणार आहे याची मला कल्पना आहे. काही वर्षांनी अशा पद्धतीनी जगणाऱ्या तरुणांची संख्या वाढत जाईल. मी तेव्हा हयात नसीन, पण जीवनसाथचं स्वरूप पुढच्या पिढीतल्या लोकांना सहजीवन अभ्यास मंडळ असं करावं लागणार आहे, हे नक्की.

●

## 7) लग्न करण्याविषयी माझं स्वतःचं मत

माझ्या मते, प्रत्येक माणूस केव्हा ना केव्हा तरी लग्न न करण्याचा विचार करतो. त्यात गैर काही नाही. मीही असं म्हणत असे. एकतर मला काही वर्षं परदेशात काढायची होती आणि इतरांच्या दृष्टीनी मी आग्रही, निर्भीड (थोडक्यात विक्षिप्त) आहे आणि स्थळ म्हणून चांगला नाही हे मला माहिती होतं म्हणून. शिवाय माझे दोन-तीन वेळा प्रेमभंग झालेले होते, हेही कारण होतं. शोभाही काही काळ असं म्हणायची की, ती लग्न करणार नाही.

आपण तर बाबा या निर्णयात कोणालाच सल्ला देत नाही. मला स्वतःला लग्न न करण्यात भरपूर फायदे दिसतात. मग मी लग्न का केलं, हे तुम्ही विचारणारच. जेव्हा लग्न करण्यातले फायदेही बघितले आणि स्वतःबद्दल नीट विचार केला तेव्हा लग्न करण्याला 100 पैकी 50.01 मार्क पडले नि न करण्याला 49.99. मग घेतला निर्णय. विवाहित आणि अविवाहित दोन्ही रहाणं शक्य नव्हतं ना! निर्णय तर ज्या त्या माणसानीच घ्यायचा.

आता अगदी शेवटी एकच महत्त्वाची गोष्ट सांगतो. शांत, स्वस्थ, समाधानी आणि संतुलित जीवन हे आपल्या आयुष्याचं वर्णन व्हावं असं वाटत असलं तर, तरी तुम्ही अविवाहित राहणार? मांडा तराजू 50.1 कुठे नि 49.99 कुठे, ते ठरवा तुमचं तुम्ही.

विवाह समुपदेशक म्हणून मला एवढंच वाटतं की, स्वतः लग्न करण्याच्या प्रकारचे आहोत का लग्न न करण्याच्या प्रकारचे आहोत, यासाठी अभ्यास करावा लागतो. दोन्ही प्रकारच्या गुणांचं आपल्यात मिश्रण सापडल्यामुळे काय ते ठरवता येत नाही, म्हणून अभ्यास, विचार करून निर्णय घ्या म्हणजे झालं.

●●●

# 4

# अविवाहितांच्या मुलाखती

जीवनसाथमधे अविवाहितांच्या मुलाखती असा एक कार्यक्रम असतो. निरनिराळ्या वयाचे आणि तऱ्हतऱ्हेची कामं करणारे अविवाहित मोठ्या संख्येनी आपल्या ओळखीचे असतात. काहींची लग्न करण्याची इच्छा असून अनेक कारणांनी उशीर होत जातो नि मग ते लग्न न करण्याचा निर्णय घेतात तर काहींचा विवाहसंस्थेबद्दल तत्त्वतः आक्षेप असतो. काही लोक इतरांच्या अभ्यासासाठी मुलाखत द्यायला तयार होतात, काहीजण वेळ नाही असं खरं/खोटं सांगतात. क्वचित एखादा, एखादी म्हणतात, मैत्रीत, खाजगीमधे सगळं सांगीन. पण गटासमोर बोलायला माझा नकार आहे.

प्रत्यक्ष मुलाखतीत असे प्रश्न त्यांना जमलेले लोक विचारतात. ज्याला अभ्यास करायचाय त्यांनी ओळखीच्या अविवाहित माणसाची मुलाखत घेऊन बघावी. आता ते प्रश्न खाली देतो. जीवनसाथमधल्या निरनिराळ्या कार्यक्रमांत अनेक प्रकारची उत्तरं आली होती.

**प्रश्न 1** : चरितार्थासाठी नेमकं काय करता?

**उत्तर** : अविवाहितांमधे सामाजिक काम करणारे सर्वांत जास्त आढळले. डॉक्टर्स, सेल्समन, इस्टेट एजंट्स बरेच आढळले. शाळा शिक्षकही बऱ्यापैकी संख्येनी असतात. सरकारी नोकरी करणाऱ्यांचंही प्रमाण खूप असतं.

**प्रश्न 2** : अविवाहित असल्यामुळे करिअरकडे खूप लक्ष केंद्रित करता येतं का?

**उत्तर** : याचं सर्वसाधारण उत्तर नाही असं आहे. अगदी कमी लोक असे असतात की ज्यांनी करिअरमधे उत्तम काम केलं, प्रसिद्धी मिळवली किंवा समाजाला उपयोगी काम करून समाधान मिळवलं.

**प्रश्न 3** : त्यामुळे उच्च दर्जाचा व्यक्तिमत्त्व विकास, भरपूर मिळकत असं होतं का?

**उत्तर** : व्यक्तिमत्त्व विकासाच्या मूळ व्याख्येतच प्रश्न सोडवण्याची कुवत म्हणजे विकास असं आहे. अविवाहितांना एरवी सर्वसामान्यांना जे प्रश्न सोडवावे लागतात ते सोडवावेच लागत नाहीत. त्याखेरीज लग्न न करणाऱ्याकडे समाज चमत्कारिक नजरेनी बघतो, हे देखील खरं आहे. त्यामुळे व्यक्तिमत्त्व विकासामधे खूप अडचणीच अडचणी नेहमी जाणवतात. अगदी क्वचित अपवाद आढळतात.

भरपूर मिळकत आणि खर्च कमी असं खरं म्हणजे व्हायला हवं, पण तसंही होताना दिसत नाही. यालाही मी अगदी क्वचित अपवाद बघितलेत.

**प्रश्न 4** : स्वतःची मालमत्ता, वडिलोपार्जित मालमत्ता यांच्या वाटणीत काही अडचणी वाटल्या का?

**उत्तर** : या बाबतीत भारतीय समाजातल्या पुरुषप्रधानतेमुळे अविवाहित मुलाला आणि मुलीला मिळणारी वागणूकच निराळी असते. मधल्या काळात वडिलोपार्जित मालमत्तेच्या वाटणीत मुलींनाही हिस्सा मिळावा, अशी कायद्यात दुरुस्ती झाली, पण तशी वाटणी झाली नाही तर कोर्टात जाणाऱ्या मुली फार क्वचित दिसतात.

अविवाहित मुलाला मात्र बहुतेक वेळेला ही अडचण येत नाही.

**प्रश्न 5** : स्वतःची निराळी जागा, स्वतंत्र संसार असं करता की आईवडिलांचं ओझं बनता?

**उत्तर** : या बाबतीतही स्त्री-पुरुष भेद खूप प्रमाणात आढळतो. स्वतंत्रपणी स्वतःच्या घरात राहणाऱ्या मुली कमी आढळतात. मुलगे त्या मानानी बरेच दिसतात.

अविवाहित मुली आईवडलांचं तर ओझं बनतातच, पण भावांच्याही लग्नामधला अडसर बनतात, असं बरेच वेळा दिसतं.

**प्रश्न 6** : रिकाम्या वेळेत काय करता?

**उत्तर** : या बाबतीतही अविवाहित स्त्रिया आणि अविवाहित पुरुष यांच्यात खूप फरक आढळतो. स्त्रिया टी.व्ही., मैत्रिणी आणि वाचन अशा छंदांमधे रमताना दिसतात. पुरुष मात्र मित्रांचे कंपू, दारूचे अड्डे,

पत्त्यांचे अड्डे यात जास्त वेळ घालवताना दिसतात. ते स्त्री सहवासाची संधी शोधत असतात आणि जरा आपुलकी दाखवणारी विवाहित स्त्री ओळखीची असली, तर 'वहिनी वहिनी' करत कुटुंबाशी दोस्ती करतात.

**प्रश्न 7** : तात्पुरतं आजारपण, मोठं आजारपण याचा विचार केलाय?

**उत्तर** : खरं म्हणजे याचा पुरेसा नीट विचार केलेला नसतो, असं आढळतं. वय वाढल्यावर तब्येतीच्या तक्रारी चालू झाल्यावर आसपास राहणारं कोणीतरी मदत करतं. भावंडांना बहुतेक वेळा तेवढी पर्वा असते.

**प्रश्न 8** : म्हातारपणाचा, परावलंबित्वाचा, मृत्यूचा, मृत्युपत्राचा काय विचार केलाय?

**उत्तर** : मृत्यूचा स्पष्ट विचार भारतीयांनी पुरेसा केलेला नसतो. मृत्यूबद्दल स्पष्ट विचार केला तरच मृत्युपत्र, इच्छामरणपत्र या गोष्टी माणूस करतो. त्यामुळे त्याची व्यवस्था केलेली नसण्याचं प्रमाण खूप असतं. एखादा अविवाहित पण पैसेवाला माणूस असला तर मात्र मृत्यूपत्र करण्याचं प्रमाण बरंच आहे. लाडका पुतण्या, भाचा, भाची यांना बहुतेकजण आपले पैसे, मालमत्ता देतात.

**प्रश्न 9** : वृद्धाश्रमात जाण्याबद्दल काय विचार आहे?

**उत्तर** : खरं म्हणजे अविवाहितांनी वृद्धाश्रमात जास्त संख्येनी जायला हवं. पण तसं होत नाही. बहुधा केवळ वृद्ध लोकांच्या सहवासात राहण्यापेक्षा मिश्र समाजात राहणं त्यांना जास्त बरं वाटत असावं.

**प्रश्न 10** : लैंगिक संबंधांचं काय करता? हस्तमैथुन, वेश्या वगैरे?

**उत्तर** : या बाबतीतही स्त्रिया आणि पुरुष यांच्याबाबतीत फारच फरक असतो. भारतीय स्त्रियांना मुळातच स्वतःचं मन मारण्याचं शिक्षण लहानपणापासूनच मिळालेलं असतं. त्यामुळे बहुतेक अविवाहित स्त्रिया लैंगिक संबंधांच्या वाटेलाच जात नाहीत. अगदी अपवादानी स्त्रिया, पुरुष-वेश्या, मित्रांशी संबंध या वाटेनी जातात. पुरुष मात्र अविवाहित असले तरी वेश्यांशी किंवा मैत्रिणींशी संबंध ठेवून लैंगिक भूक भागवतात. पूर्वीच्या पिढीतला ब्रह्मचर्य पाळण्याचा निर्धार हल्ली फारच क्वचित आढळतो.

**प्रश्न 11** : लग्न न करता दत्तक मूल घ्यायची तयारी आहे? विचार केलाय?

**उत्तर** : या बाबतीत पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया बऱ्याच पुढे आहेत. शिवाय अविवाहित पुरुषांनी मूल दत्तक घेण्याच्या बाबतीत कायद्याचीही बंधनं आहेत.

**प्रश्न 12:** अध्यात्म, ईश्वरभक्ती या मार्गाबद्दलचं मत काय आहे?

**उत्तर** : वय झाल्यामुळे या वाटेनी जाणारी लोकं दिसतात, पण फार संख्येनी नाही. प्रत्यक्षात भारतीय जनतेची परिस्थिती बघितली तर अध्यात्म, ईश्वरभक्ती या मार्गांनी कुठच्याही पुरुषानी, स्त्रीनी गुरू, महाराज बनायचं ठरवलं तर त्या व्यवसायाला खूप वाव आहे. पण प्रत्यक्षात तसं होताना दिसत नाही.

**प्रश्न 13:** समाजकारण, राजकारण यात कितपत रस आहे?

**उत्तर** : याचं प्रमाण मात्र खूप आहे. समाजकारणात, राजकारणात अविवाहित स्त्री-पुरुष बरेच असतात.

**प्रश्न 14:** निसर्गात, प्राण्यांबरोबर रमता?

**उत्तर** : याचं उत्तर अनेकांकडून हो असं मिळतं. 'निसर्गाशीच लग्न' लागलेले लोक बऱ्यापैकी संख्येनी आढळतात.

**प्रश्न 15:** मित्र-मैत्रिणींचा नियमित भेटणाऱ्यांचा गट आहे?

**उत्तर** : असा गट मात्र सगळ्यांचा असतोच.

सगळ्या लोकांना एक विनंती करायचीय्. जीवनसाथ संस्थेचा, व्यक्तिशः माझा विवाह या विषयाचा अभ्यास चालूच राहणार आहे. या अभ्यासात अविवाहितांनी मांडलेले विचार आमच्या दृष्टीनी मोलाचेच असतात. त्यासाठी आम्हाला मुलाखत द्यायला तयार असलेल्या अविवाहितांची खूप मदत होईल. ज्यांना अशी मुलाखत देण्याची इच्छा असेल त्यांनी अवश्य कळवावं.

●●●

# 5

# लग्न कशासाठी?

विवाह अभ्यास मंडळामधे अनेक वेळेला घेतलेला हा एक छान विषय आहे. जमलेल्या ग्रुपला एक अगदी साधा प्रश्न विचारलेला असतो. लग्न कशासाठी? ग्रुपमधे साधारणपणे 20 ते 30 लोक एका वेळेला जमतात.

मी म्हणजे सूत्रधार सांगतो, 'लग्न म्हणजे त्रासही आहे आणि आनंदही आहे.' मग मला सांगा, 'लग्न कशासाठी?'

या प्रश्नाला इतक्या 'डायरेक्ट' पद्धतीनी तोंड देण्याचा प्रसंग न आल्यामुळे निम्मे अधिक लोक बोलत नाहीत. कोणीतरी उत्तर देतं आणि मग चर्चेला सुरुवात होते. नुकत्याच झालेल्या कार्यशाळेमधला संवाद सांगतो. मोजक्याच पात्रांच्या तोंडी ते संवाद घातले आहेत. प्रत्यक्षात सगळे बोलतात.

**अनिलदादा :** आता काय करूया, प्रत्येकानी आपापल्या मनातला लग्न करण्याचा हेतू थोडक्यात स्पष्ट सांगायचा. कल्पना स्पष्ट असली तर छानच, नसली तर स्पष्ट होईल. मतभेद असला तरी स्पष्ट सांगायचं. यामधे चूक किंवा बरोबर असं काही नाहीय. प्रत्येकाचा आपापला विचार तेवढाच महत्त्वाचा आहे. हं अवंती, करूया का सुरुवात? आणि हो. विवाहितांनी सुद्धा सांगायचं आहे. लग्न झालेलं असलं तरी ते कशासाठी, याचा विचार महत्त्वाचाच आहे.

**अवंती :** सुख-दुःखात जोडीदार पाहिजे असतो म्हणून लग्न हवं.

**केदार :** मी नंतर सांगतो. जरा वेळानी.

**अलकाताई :** सुख-दुःख वाटून घेण्यासाठी जोडीदार असावा.

**केदार :** हो, मलाही असंच वाटतं.

**अनिलदादा :** अवंती, स्पष्ट विचारतो, रागावू नको. सुख-दुःख वाटून घेण्यासाठी तुला वडील, भाऊ, मैत्रिणी एवढे लोक आहेत की! मैत्रिणीशी तू तासन्‌तास गप्पा मारताना नेहमी कोपऱ्यावर दिसतेस आणि अलकाताई, तुमच्या मुलीबरोबर तुमचे खूप मैत्रीचे संबंध आहेत असं तुम्ही नेहमी तर सांगत असता. मग सुख-दुःख वाटून घेण्यासाठी लग्न कशाला पाहिजे?

**अनघा :** आपलं मन कुणाशीतरी मोकळं करण्यासाठी कमीतकमी एकतरी अगदी जवळची व्यक्ती पाहिजे म्हणून लग्न. चार-पाच जवळच्या व्यक्ती असल्या तर फारच छान.

**विजय :** माझे तर अनेक जवळचे मित्र आहेत. मैत्रिणीपण आहेत. मला लोक जगन्मित्र म्हणतात.

**अनिलदादा :** मागे आपण म्हणालो तसं कुठच्या क्रियेनी कोणाच्या डोक्यात केव्हा प्रकाश पडेल याला काही नियम नाही. एक 'एक्सरसाईज' त्यासाठी उपयोगी आहे. कुठच्याही दोन माणसांचं, (पुरुष असो, स्त्री असो) नातं, अर्थात नुसती मैत्री आणि नवरा-बायकोचं नातं यातल्या फरकांचा तक्ता करायचा. एकेक करून त्यात तपशील भरायचे. तो तक्ता खाली दिलाय.

| दोन माणसांच्यातलं मैत्रीचं नातं | नवरा-बायको लग्नाचं नातं |
|---|---|
| 1) हे कमी काळाचं असतं बहुतेक वेळा. | 1) जास्त काळाचं बहुतेक वेळा असतं. |
| 2) कायद्याच्या चौकटीबाहेर असतं. | 2) कायद्याचं बंधन, नियंत्रण असतं. |
| 3) शारीरिक संभोग यात नसतो. | 3) शारीरिक संभोग असतो. |
| 4) दोघांना मूल होत नाही. | 4) मूल होऊ शकतं. टिकाऊ समाईक धागा निर्माण होतो. |
| 5) एकमेकांच्या नातेवाइकांशी संबंध ठेवण्याचं सामाजिक बंधन नसतं. | 5) नातेवाइकांशी सामाजिक संबंध येतोच. त्याचं जवळजवळ बंधन असतं. |
| 6) मालमत्तेचा संबंध असतो किंवा नसतो. | 6) मालमत्तेवर कायदेशीर हक्क पोहोचतो. |

**अनिलदादा :** या तक्त्यात तुम्ही सुचतील तशा आणखी गोष्टी भराव्यात अशी कल्पना आहे. बरं का विजय, माझ्या बोलण्याचा राग मानू नकोस. पण मैत्री, प्रेम अशा भावनांची उत्कटता प्रत्येकाकडे काही मर्यादेपर्यंत असते. सोपं करण्यासाठी आपण त्याला म्हणू की, ते एक किलो प्रेम किंवा एक किलो मैत्री आहे. जी तुमची प्रेमाची माणसं असतील त्यामधे एक किलोचंच वाटप करावं लागतं.

**साधना :** हे तुमचं म्हणणं अनिलदादा मला अजिबात पटत नाही. उलट प्रेम दिल्यानी प्रेम वाढतं. मी तर लहानपणापासून असं ऐकते आहे की सबंध जगावर प्रेम करावं.

**अनिलदादा :** ज्या 'ॲप्लाईड सायकॉलॉजी'चा आपण अभ्यास करतो, त्यामधे 'थिअरी' आणि 'प्रॅक्टिस' यामधे काही फरक नसतो. एखाद्या कल्पनेची अंमलबजावणी जमत नसेल असं आढळलं तर ती कल्पना बदलायला पाहिजे किंवा एखादी कल्पना विचार करून पटलेली असेल तर त्याची अंमलबजावणी त्याप्रमाणे व्हायला पाहिजे. ज्या सध्याच्या जगात आपण वावरतो त्यात सत्य परिस्थितीकडे काणाडोळा करून चालणार नाही. त्यामुळे सबंध जगावर प्रेम करावं हे तर अशक्यच आहे. मनातल्या संपूर्ण गोष्टी सांगता येतील अशी चार-पाच मित्रमंडळी असणं हे सुद्धा कठीण आहे. त्यामुळे 'जगावर प्रेम' ही कविकल्पनाच राहते.

**अनघा :** सध्याच्या आयुष्यातली 'कॉम्प्लिकेशन्स' इतकी आहेत की अशी एक व्यक्ती सापडते का नाही, याबद्दलही शंका आहे. मगाशी मी चार-पाच व्यक्तींचा उल्लेख केला त्यात तर काहीच अर्थ नाही, हे मला आता कळतंय.

**कौस्तुभ :** आणि त्या व्यक्तीला तू सापडशील का नाही, हा पण प्रश्न आहे.

**अनिलदादा :** हे अगदी बरोबर आहे. अशा दोन व्यक्ती एकमेकांना एकाच वेळेला आणि एकाच ठिकाणी भेटल्याशिवाय आणि आवडल्याशिवाय ते जमणार कसं?

आमच्या ओळखीत, नात्यात मी अनेक उदाहरणं अशी बघितलीयत की मुलीचं शिक्षण ग्रॅज्युएशनपर्यंत झालं. नोकरी मिळत नाही आणि एवढी पैशाची जरूर पण नाही. पुढे शिकून काही खास करायचंय अशी हुशारी नाही आणि ईर्ष्या नाही. घरातल्या कामांमधे सबंध दिवसाचा वेळ भरवता येत नाही. थोडक्यात, करायला पुरेसा उद्योग नाही. मग काय करायचं पुढे? तर लग्न

करून टाकूया झालं म्हणून लग्न करायचं ठरतं. जरा बाकीच्यांना काय वाटतं, ते बघूया. साधना, तुला काय वाटतं?

**साधना :** म्हातारपणी कोणाची तरी गरज असते म्हणून देखील लग्न आवश्यक आहे.

**केदार :** खरं म्हणजे आजपर्यंत अशा गोष्टींचा विचारच केला नव्हता. लग्न करायचं असतं एवढंच माहिती होतं.

**अनिलदादा :** बहुतेकांची परिस्थिती अशीच असते. लग्न करण्याची समाजरीत आहे. या पलीकडे काही विचार झालेलाच नसतो. आपण जरा पुन्हा अवंतीला विचारू. काय ग अवंती, तुझी प्रेमाची माणसं कोण?

**अवंती :** बाबा, भाऊ, मावशी आणि मैत्रीण अनुराधा. यांना मी सगळ्या गोष्टी सांगते.

**अनिलदादा :** हेच तर म्हणणं आहे! सुख-दुःख वाटून घेण्यासाठी एवढे लोक असताना लग्नाची तुला काय जरूर?

अवंती गप्प.

**अलकाताई :** जवळचे सगळेच आहेत. पण खरा जवळचा म्हणजे नवराच फक्त.

**शुभदा :** खरा जवळचा म्हणजे नवरा असेल का नाही, ते माहीत नाही.

**अनघा, अवंती, साधना :** मलाही माहीत नाही.

**कौस्तुभ :** मी सांगतो माझा हेतू. गेल्या दोन कार्यशाळांच्या नंतर मला स्पष्ट कळलंय. माझ्या दृष्टिकोनातून लग्नाचा प्रमुख हेतू शरीरसंबंधच आहे.

**अनिलदादा :** मंडळी, ह्या प्रश्नाचं उत्तर इतक्या स्पष्ट शब्दांत येण्याचीच मी वाट बघत होतो. उत्तर देण्याचा तुमचा संकोच समजू शकतो. पण त्याचं खरं उत्तर एवढंच आहे की, समाजमान्य पद्धतीनी शारीरिक संबंध ठेवण्याचा लग्न हा परवाना आहे.

कोणाशी लग्न करायचं हा निर्णय घेताना ज्या कल्पनेचा मंत्रासारखा उपयोग करायला हवा ती कल्पना अशी, 'माझ्या कुवतीप्रमाणे, उपलब्ध व्यक्तींपैकी, उपलब्ध वेळेत, त्यातल्या त्यात चांगल्या जोडीदाराची मी निवड केली आहे. सर्व ताकद वापरून मी हे लग्न टिकवण्याचा प्रयत्न करीन. काही ताण आले तर मार्ग काढण्याचा सगळा प्रयत्न करीन.' दुसऱ्या कोणीतरी मंत्र म्हणण्यापेक्षा यातला प्रत्येक शब्द नीट समजावून घेतला पाहिजे. हे ऐकल्यावर

अनेकजण म्हणतात, 'हे सोप्या भाषेत आहे, पण सोपं नाही. खरं प्रेम असलं तरच शक्य आहे, नाहीतर फार कठीण आहे.'

हा हेतू स्पष्टपणी कळलेला असला की खूप सोपं होतं. ज्या जोडीदाराशी भावनिक, वैचारिक जवळीक असेल त्याच व्यक्तीशी लग्न करायला पाहिजे, तरच समाजमान्य आणि तरीही मनपसंत पद्धतीनी शारीरिक संबंध शक्य आहेत. भावनिक, वैचारिक जवळिकीसाठी बराच वेळ लागतो. त्या काळात दोन-तीन जोडीदारांशी एकाच काळात चर्चा-भेटी चालू असल्या तरी काही बिघडत नाही, हे आता मला कळलंय. पण तरुणपणी माझ्यावर जेव्हा असा प्रसंग आला तेव्हा मी पार गडबडलो होतो. लग्नापूर्वी माझ्या एका अमेरिकन मैत्रिणीनी मला स्पष्ट सांगितलं की, पुढच्या वीकेंडला मला भेटणं तिला जमणार नाही. कारण ती तिच्या दुसऱ्या बॉयफ्रेंडबरोबर जाणार आहे. मला हे अजिबात झेपलं नाही आणि मी तिला भेटणं सोडून दिलं. भारतातही असं होणार हे मान्य करावं, पण तिनी ज्या पद्धतीनी सांगितलं तसं इथे न सांगणं चांगलं.

**अलकाताई :** होय. हे म्हणणं अगदी बरोबर आहे.

**अनिलदादा :** आणखी एक महत्त्वाची गोष्ट अशी. एक स्त्री आणि एक पुरुष लग्नाच्या करारावर सह्या करतात तेव्हा ते दोन न लिहिलेल्या अटींवर सह्या करत असतात. एक म्हणजे यापुढे त्यांची पैशाची भागीदारी गृहीत असते. संसार या 'बिझनेसचे ते पार्टनर' होतात. म्हणजेच फायदा किंवा तोटा ते विभागून घेतात आणि फक्त एकमेकांशीच शरीरसंबंध करण्याचं बंधन पाळण्याचा करार करतात.

वाईट गोष्ट अशी आहे की, अनेक पुरुषांच्या मनात अशी छुपी इच्छा असते की लग्न केलं की बायकोवर स्वामित्व गाजवता येईल. त्यांना हे समजत नाही की, कोणाचाही स्वामी बनून गळ्यात माळ घालून घेतली की त्या माळेत जबाबदारीचे मणी असतात. ऐकताना ही अतिशयोक्ती वाटेल, पण खरं असं आहे की, एखाद्या वस्तूची मालकी म्हणजेच स्वामित्व स्वीकारलं की जबाबदारी येते. ही माझ्या मालकीची गाडी म्हटल्यासरशी त्याची स्वच्छता, दुरुस्ती, इंधन, नोंदणी, चालवण्याचा परवाना अशा बऱ्याच गोष्टींची जबाबदारी ओघानी येतेच. कुत्रा, मांजर, गाय, शेळी असं कुठचंही जनावर पाळलं तरी तेच. बायको तर त्याहूनही जास्त मूल्यवान आणि जबाबदारीची गोष्ट आहे. आणि पुढे मुलं झाली तरी तेच की. त्याहून मोठी जबाबदारी. हे पुरुषाला कळणं फार महत्त्वाचं आहे.

आणखी एक गमतीची गोष्ट आहे. बदली होणार असली की जशी माणसं

काम टाळतात, तसं लग्न टिकणारं नसलं की, अल्पजीवी संबंध अशी कल्पना असली की कर्तव्यं टाळतात. ‘कमिटमेंट’ टाळतात.

**केदार :** बदली हा विषय निघाला आहे म्हणून सांगतो. कुठच्यातरी भलत्या गावी काही वर्षांसाठी बदली झाली की जेवणाचे हाल होतात म्हणून लग्न करणारे अनेकजण मला माहिती आहेत.

**अनिलदादा :** ज्या वेगानी समाजचित्र बदलतंय त्या वेगानी प्रत्येक व्यक्ती एका जाळ्यात अडकतीय. कासावीस होतीय. प्रत्येकाचा तोल जातोय. या अवस्थेत एकट्यानी जगणं कठीण आहे. जोडीदाराच्या आधारामुळे स्थिरतेची शक्यता वाटते. स्थिरता ही माणसाची गरज आहे. जेव्हा आपण दुसऱ्याच्या हो, नाही, हो, नाही ला वैतागतो तेव्हा म्हणतो, काय ते पक्कं सांगा बुवा! अनिश्चितता जीवघेणी असते. याचाच अर्थ, आपण स्थिरतेची मागणी करत असतो.

धंदा करताना दोन भागीदार एकमेकांना एकमेकांची गरज आहे म्हणून भागीदारी करतात. अगदी तसंच नवरा-बायकोचं. लग्न करणं ही माझी गरज होती, त्यामुळे मी या मुलीशी माझ्या आणि तिच्या सर्व मर्यादा समजून स्वतःच्या निर्णयानी लग्न करतो आहे, हे पक्कं कळलं असलं तर मैत्री, समाधान शक्य आहे. माझ्यासमोर उपलब्ध असलेल्या पर्यायांपैकी या मुलीशी लग्न करण्याचा निर्णय मी स्वेच्छेनी घेतला आहे, त्यामुळे एकमेकांना यापुढे शक्य तेवढं समजून घेणं ही गोष्ट माझ्या स्वतःच्या फायद्यासाठी मला मान्य आहे, असं विधान असलं तर वैवाहिक आयुष्यात समाधान मिळू शकेल.

धंद्यातल्या भागीदारीची कल्पना आपल्या ओळखीची आहे. त्यात फायद्याची आणि तोट्याचीही वाटणी असते. एकमेकांना मदत करणं असतं, समजून घेणं असतं. मैत्रीच्या कल्पनेत व्यवहार अपेक्षित नाही. निव्वळ आपुलकी, आदर अपेक्षित असतो. लग्नाच्या कल्पनेत स्त्री आणि पुरुष यांची भागीदारी, अधिक जवळची मैत्री आणि लैंगिक संबंध गृहीत धरलेले असतात. हे पुरुषाला किंवा स्त्रीला कळलं नसलं तर संघर्ष होऊ शकतात.

आमच्या ओळखीत एक तरुण जोडपं आहे. दोघं प्रेमात काही वर्षं होते. खूप छान वाटायचं. खरोखरच प्रेमात पडलेलं असण्याची मजा औरच असते. त्यापुढे प्रत्यक्षात लग्न करायचं म्हटलं की मात्र अनेक कसोट्या असतात. दोन कुटुंबं प्रेमात पडली का नाही, हा प्रश्न यायला लागतो. स्वतंत्र संसार केला तर पैसे मिळविण्याची कसोटी असते. त्यात पुढे मूल झालं की आणखी कठीण

परीक्षेला बसावं लागतं. या सगळ्याचे ताण येऊ शकतात. ताण आले की स्वतःतला, नवरा-बायकोमधला किंवा कुटुंबाबरोबरचा संघर्ष सुरू होऊ शकतो.

त्यांच्या कुटुंबाचं जेव्हा एकमेकांबरोबर जमेना तेव्हा ते सगळे प्रश्न आले. मूल झाल्यानंतर तर खूपच तीव्र संघर्ष झाले. नवरा-बायकोला, दोघांना 'मूल केव्हा हवं', 'किती मुलं हवीत' हे समजलंच पाहिजे. लैंगिक शिक्षणामधे गर्भनिरोधकांचा वापर, किती काळ, कुठच्या पद्धतीची गर्भनिरोधकं वापरायची, हेही त्यांनी लक्षपूर्वक समजून घेतलंच पाहिजे. ज्या जोडप्याचं या बाबतीत अज्ञान, दुर्लक्ष, बेपर्वाई असं काहीतरी असतं त्यांच्याकडून नको असताना गर्भ राहणं, गर्भ पाडणं किंवा नको असताना, तयारी नसताना मूल होणं असे उल्लेख ऐकायला येतात. खरं सांगायचं म्हणजे 'मॅच्युअर' जोडप्याला ह्या गोष्टी शोभत नाहीत. दोघं एकमेकांना दोष देत बसतात आणि संघर्ष होतोच.

या दोघांच्या बाबतीत अनेक प्रकारचे प्रश्न एकदम आल्यामुळे दोन्ही कुटुंबं खूप अस्वस्थ झाली. ते प्रश्न सोडवायला पुढची काही वर्षं गेली.

**अनघा :** मुलं हा सुद्धा लग्नाचा हेतू आहे की!

**अनिलदादा :** तोच तर नेमका 'पॉईंट' आहे. अविवाहित लोकांना मुलं झाली तर समाज काय म्हणतो ते आपल्या सर्वांना माहीत आहे. शारीरिक संबंधाशिवाय मूल होत नाही आणि ते समाजाला पटवण्यासाठी त्यांना विवाहच लागतो.

**अलकाताई :** मुलं वाढवण्याचा आनंद लग्नानंतरच मिळतो.

**अनिलदादा :** अविवाहित राहण्याचा कुणीही निर्णय घेतला तरी समाज नावं ठेवणार, हे मान्य करायला हवं. बरं का शुभदा, भारतीय समाजात अविवाहित राहण्यापेक्षा विवाहित राहण्याचे फायदे थोडेसे जास्त आहेत.

**शुभदा :** हं... पैशाची भागीदारी न्..... शरीरसंबंध .... शरीरसंबंधात .... आनंद असेलही कदाचित.... पण तो आयुष्यभर पुरेल, असं मला वाटत नाही.

**अनिलदादा :** आणखी एक गोष्ट ऐकली की मला फार वाईट वाटतं. बिघडलेला, मंदबुद्धी, नाकर्ता, व्यसनी असा मुलगा पदरी असलेले आईवडील चक्क असा विचार करतात की, याचं लग्न करून देऊ म्हणजे हा सुधारेल. लग्नामुळे असा मुलगा सुधारल्याची उदाहरणं अगदी क्वचित लाखात एक आढळतात. मुलींच्या आयुष्याची वाट लागते त्याचा विचार कोणीच करत नाही. काही ठिकाणी अशा मुलाच्या आईवडलांनी मुलीच्या आईवडलांना स्पष्ट परिस्थिती

सांगितलेली असते, पण मुलीला बिचारीला काही माहीत नसतं. आणि तरी अशा तऱ्हेनी झालेली अनेक लग्नं टिकतातही. कहाणीचा त्याच्या पुढचा भाग ऐकून तर माझा थरकाप होतो. लग्नामुळे मुलगा सुधारत नाही कळल्यावर पुढे सगळे मिळून ठरवतात की, मूल होऊ दे म्हणजे तो सुधारेल. बापरे! म्हणजे पुढे त्या मुलाचेही हालच हाल. त्या जन्मलेल्या मुलाच्या मनात वडलांविषयी काय भावना असतील, त्याची आपण सगळे कल्पना करू शकतो.

**केदार :** हे असं सगळं आपण बोलतो आहोत हे आमच्या आईवडलांना कळलं तर ते मला घराबाहेर काढतील.

**शुभदा :** जे खरं आहे ते आईवडलांना मान्यच करावं लागणार. सध्या मात्र पटवणं कठीण वाटतं, हे खरं आहे.

**अनिलदादा :** खरं आहे ते स्पष्ट शब्दांत बोलणं, हा आधुनिक विचार आहे आणि त्याबद्दल काही न बोलता गप्प बसणं, हा पारंपरिक विचार आहे. ज्यांना स्वतःला आपण आधुनिक आहोत असं वाटत असेल त्यांनी मात्र इतका स्पष्ट विचार करणं आवश्यक आहे आणि जवळच्या लोकांबरोबर बोलणंही आवश्यक आहे. प्रत्येक माणसाची प्रेम करणं ही गरज आहेच, पण त्याहीपेक्षा प्रेम करून घेणं ही जास्त गरज आहे.

तू मला आवडतेस किंवा आवडतोस असं मनापासून म्हणणाऱ्या व्यक्तीच्या शोधात माणूस असतो. ही मनापासून आवडण्याची भावना स्त्री-पुरुष दोघांचीही असणं आणि ती टिकून राहणं ही गोष्ट सोपी नाही. असं शब्दांत म्हणणारा पुरुष किंवा स्त्री ते कुठच्या विचारांनी, कशा पद्धतीनी व्यक्त करतो यालाही खूप महत्त्व असतं.

प्रेम व्यक्त करण्यासाठी शब्दांबरोबर स्पर्श हे एक सर्वांत महत्त्वाचं माध्यम आहे आणि स्पर्शाचं कसलंही बंधन नसलेलं नातं फक्त स्त्री-पुरुष लैंगिक संबंधांमधेच असू शकतं. बाकी सर्व प्रेमात स्पर्शाच्या खूप मर्यादा असतात. इतरांच्या प्रेमाचा अनादर करण्याचा हेतू नाही, पण नवरा-बायकोच्या प्रेमाव्यतिरिक्त इतर नात्यांच्या प्रेमामधे इतर छटा असतात. वात्सल्य असतं, आदर असतो, कृतज्ञता असते. सहकार्य असतं, पण लैंगिक शारीरिक आकर्षण नसतं.

**अलकाताई :** नवरा-बायकोचं प्रेम हेच संपूर्ण प्रेम असू शकतं.

**शुभदा, अनघा :** आणि तसं नसलं तर?

**अनिलदादा :** ह्या एका नात्यामधे आदर, कृतज्ञता, सहकार्य, वात्सल्य

आणि आकर्षण सगळ्या भावना एकत्रित झाल्या असल्या तरच वैवाहिक आयुष्य समृद्ध असतं. त्यासाठीची धडपड प्रत्येकजण करत असतो. अशी समृद्ध वैवाहिक जीवन जगणाऱ्यांची संख्या कमी असली तरी हेतू मात्र सगळ्यांचा तोच असतो.

सारांशात, 'लग्न कशासाठी' या चर्चेत अशा प्रकारचे मुद्दे येतात.

संसारातल्या जबाबदाऱ्यांसकट लग्न करावं लागतं. स्वयंपाक, स्वच्छता, व्यवस्था, खरेदी, पैशाचे व्यवहार, नातेवाईक, मित्र, मुलं, आदरातिथ्य, सगळ्यांचा सन्मान जपणं, हे सांभाळावं लागतं. कुटुंबातल्या सगळ्या सदस्यांची प्रगती झाली पाहिजे. त्यासाठी स्वास्थ्य, शांती टिकवणं, प्रश्न सोडवण्याची ताकद वाढवणं जरूर आहे. लग्न झालेल्या व्यक्तीला समाजात सन्मान पण असतो.

**शुभदा :** अनिलदादा, एका निराळ्या स्वरूपाचा प्रश्न विचारते. अशा प्रेमासाठी जीव द्यायची तयारी, असे उल्लेख कवितेत आणि सिनेमात आढळतात. त्याबद्दल तुम्हाला काय वाटतं?

**अनिलदादा :** मृत्यूनंतरच्या प्रेमावर आपला विश्वास तर नाही बाबा. वैवाहिक संबंधांत तर सर्व भावनांच्या बरोबर आकर्षण हे सर्वांत महत्त्वाचं आहे. यावरून मानसशास्त्रातली आणखी एक फार 'इंटरेस्टिंग' गोष्ट इथे तुमच्यासमोर मांडतो.

एखादा मुलगा मुलीला म्हणतोय, माझं तुझ्यावर खूप प्रेम आहे. प्रेम किती ते कसं मोजायचं? समजा, स्वतःला कळत नाहीय की आपलं या मुलावर जास्त प्रेम आहे की त्या दुसऱ्या मुलावर? कसं ठरवायचं? प्रेम मोजायची एक व्याख्या सांगतो म्हणजे हे समजेल. ज्या माणसाचा विचार आपण जास्त वेळा, जास्त काळ करतो त्या व्यक्तीवर आपलं प्रेम आहे, असं समजावं. तो विचार त्या माणसाच्या भल्यासाठी केलेला आणि आनंददायक हवा. (वैऱ्याच्या घातपाताचा, रागानी, तिरस्कारानी केलेला विचार दिवसभर मिनिटा मिनिटालाही होऊ शकतो.) तो दिवसातून, महिन्यातून किती वेळा होतो, त्यावर प्रेमाची तीव्रता ठरते.

लग्न कशासाठी याबद्दल काही मुलींना वाटतं, 'लग्न स्वसंरक्षणासाठी'. याबाबतीत आणखी एका गोष्टीवर मुलींनी स्पष्ट विचार करण्याची जरूर आहे. फार पूर्वी पुराणकाळात दोन सैन्यांच्यात युद्धं व्हायची. त्याला धर्मयुद्ध म्हणायचे. युद्ध ठराविक काळातच केली जायची, कारण युद्धातली देखील नीती होती आणि ती सर्वमान्य होती. दोन व्यक्तींच्यामधलं द्वंद्वयुद्ध असलं तरी त्याचीही नीती होती. अशा काळात स्त्रीचं रक्षण तिच्या पतीनी करावं अशी अपेक्षा होती. जेव्हा युद्धाची नीती बदलली तेव्हा त्या कल्पनाही बदलाव्या लागल्या. पूर्वीच्या नीतीप्रमाणे दोन

माणसांच्या युद्धात तिसरा पडत नसे. दोघांकडची शस्त्रंही सारखी असायची. ही नीती बदलून जेव्हा एका माणसावर अनेकजण हल्ला करायला लागली तेव्हा त्या युद्धाचा अर्थच बदलला. सध्याच्या अनीतीच्या काळात एखाद्या मुलीची अशी कल्पना असली की, नवरा आपलं दुर्जनांपासून संरक्षण करेल तर ती गैरसमजूत आहे. सध्याच्या भारतातल्या कुठच्याही राज्यात स्त्री-पुरुष कोणीही सुरक्षित नाही. बायकोचं रक्षणच काय, स्वतःचं रक्षण करण्याचीही खात्री देता येत नाही. अगदी अंगापिंडानी मजबूत असा भक्कम पुरुष असला तरी. खेड्यातही माणूस सुरक्षित नाही आणि शहरातही नाही. जेवढं शहर मोठं तेवढा जास्त असुरक्षितपणा आहे.

लग्न कशासाठी, याची समज येण्यासाठी आणि त्याचं अवलंबन करण्यासाठी 3 गोष्टींची आवश्यकता असते. विचार स्वातंत्र्य हवं आणि तरी विश्वास हवा. या दोन गोष्टींमधून प्रेम जन्म घेतं. संसारात अडचणी असणारच आणि त्याचे क्लेश होतात तेव्हा साथीदार लागतो. तसा साथीदार जोडीदाराच्या अडचणीच्या वेळी हजर असला तर लग्न कशासाठी ते नीट कळतं.

लग्नाचा एक महत्त्वाचा उद्देश क्रीडा असा असतो. क्रीडा म्हणजे फक्त शारीरिक संबंध नाही तर क्रीडा म्हणजे सहवासाचा आनंद. दोन इंग्लिश शब्द प्ले आणि गेम हे आहेत. त्याचा अर्थ खरा म्हणजे स्पष्ट आहे. प्ले म्हणजे क्रीडा आणि गेम म्हणजे नियमांच्या आधारानी केलेली स्पर्धा. त्यात हार-जीत असते. क्रीडेत हार-जीत नसते. फक्त आनंद असतो. ही गोष्ट नवरा-बायकोला समजणं फार जरुरीचं आहे.

लोक जेव्हा लग्न कशासाठी याबद्दल बोलतात तेव्हा काही लोक स्पष्ट सांगतात, 'कोणावर तरी सत्ता गाजवण्यासाठी'. इतर काही जण असाच विचार करत असतात, पण बोलत नाहीत. बहुतेकांच्या दृष्टीनी लग्न करायचं असतं म्हणून केलं. काहीजण म्हणतात सामाजिक व्यवस्थेची ही गरज असते म्हणून. काहींच्या दृष्टीनी लग्न नाही केलं तर दडपण येतं म्हणून ते केलं. ते दडपण बहुतेक वेळा कुटुंबाचंच असतं. काही म्हणतात, कोणीतरी आपल्यावर आणि आपण कोणावरतरी प्रेम करण्यासाठी. त्यातलं कोणीतरी आपल्यावर हे जास्त महत्त्वाचं असतं, पण त्यासाठी प्रेम द्यायला आधी स्वतः सुरुवात करावी लागते. काही स्पष्टपणी म्हणतात, आधारासाठी. काही म्हणतात, एकत्र जगण्याच्या आनंदासाठी. ही गोष्ट अगदी खरी आहे. कारण नवरा-बायको दोघांचं निराळं विश्व तयार होतं. त्याला साहचर्य किंवा 'कंपॅनियनशिप' म्हणतात. त्याविषयी

'कौटुंबिक विसंवाद' या लेखात सविस्तर माहिती आहे.

लग्न होईपर्यंत स्वतःची प्रतिमा आपण जपलेली असते. अगदी भावंडं, आईवडील यांना देखील आपण पूर्ण माहीत नसतो. शरीर आणि मन या दोन्हीची गुपितं लग्न होईपर्यंत आपण सांभाळलेली असतात. जोडीदारासमोर आपण एकदम विवस्त्र होतो. मनानी विवस्त्र हे सगळ्यात कठीण जातं. अर्धवट कल्पना फक्त नवरा-बायकोतच बोलता येतात.

लग्न कशासाठी, ह्याचं उत्तर देताना एकजण म्हणाला होता, 'लग्न म्हणजे थ्री इन वन आहे. सोय, शरीरसंबंध आणि आधार.' जणू काही 'सोफा कम बेड कम सेटी.' कितीही विनोदी वाटलं तरी हे खरं आहे. फक्त तो सोफा नीट वापरण्याची अक्कल हवी. त्याचा मेन्टेनस हवा.

लग्न करण्यातल्या सगळ्या अडचणी दिसत असून, लोक लग्न करतात याची अनेकांना गंमत वाटते. चुकून एकदा झालेलं लग्न फसलं तरी पुन्हा लग्न करतात.

पुरुषासाठी पूर्वीच्या काळची लग्नाची व्याख्या सोपी होती. स्त्रीलाही चूल-मूल अशी सोपी अपेक्षा होती. अपेक्षा स्पष्ट असल्यामुळे यश स्पष्ट दिसत होतं. साहचर्य ही नवीन अपेक्षा, नवी व्याख्या समोर आल्यामुळे स्त्री-पुरुष दोघंही गडबडले. यशाची खात्रीच न वाटल्यामुळे संभ्रम निर्माण झाला. कित्येकांना अपयशाची शक्यता जास्त दिसायला लागली. या कारणामुळे लग्न नको म्हणणारी बरीच मुलं मुली असतात.

एका अध्यात्माबद्दलच्या कार्यक्रमातल्या काही प्रश्नोत्तरांपैकी एक संभाषण मला आठवतंय. माझ्या आणि शोभाच्या विवाह अभ्यासात अध्यात्म या मार्गाच्या शक्यतेचाही विचार झाला होता.

**प्रश्न :** मुलांना लहानपणापासून अध्यात्माची शिकवण कशी द्यावी? ज्ञानेश्वर इ. भावंडांना ती आईवडलांकडून मिळाली असणार असं वाटतं का? म्हणूनच ती मुलं पुढे मोठं कार्य करू शकली का?

**उत्तर :** अध्यात्माची शिकवण लहानपणापासूनच दिली गेली तर वैवाहिक जीवन निरपेक्ष बनेल, ही कल्पना बरोबर. पण कदाचित लग्न करावंसंच वाटणार नाही.

म्हणजे समाजव्यवस्थेला शेवटी कमी लाकेसंख्येचा धोकाच निर्माण होईल.

जरा या सगळ्या चर्चेचं तात्पर्य काय त्याची उजळणी करूया.

1) अविवाहित राहण्यापेक्षा विवाह बरा.
2) विजोड जोडीदारापेक्षा थोडं तरी जुळणारा जोडीदार बरा.
3) एकमेकांना जोडीदारांनी छळण्यापेक्षा विवाह अभ्यास केलेला बरा.
4) मुलं नसण्यापेक्षा दत्तक मूल बरं.
5) मुलं बिघडण्यापेक्षा पालक शिक्षण घेतलेलं बरं.

त्यातल्या त्यात बरं काय तेच शेवटी करायचं.

●●●

# 6

# लग्नाचं योग्य वय

एक मुलगी मला अगदी झटपट उत्तराच्या अपेक्षेनी विचारत होती, 'लग्नाचं योग्य वय काय असावं, अनिलदादा?' याचं उत्तर लोकांनाच विचारून त्यांच्याकडून विचार योग्य टप्प्यावर पोहोचवणं, हाच माझा उद्देश असल्यामुळे असं सरळ आकड्यात मी उत्तर देणं शक्यच नव्हतं. काही मुद्दे जमलेल्यांच्यातून योग्य प्रकारे निघतात, काही नाही निघत. जे निघत नाहीत ते मी काढतो. या विषयावर झालेल्या सगळ्या गप्पांचा सारांश आता सांगतो.

हाच प्रश्न मी जमलेल्यांना विचारला. विलायतेतल्या कार्यशाळेमधे तर प्रतिप्रश्न आला, 'तुम्ही कायद्याचं लग्नबंधन म्हणताहात की, स्त्री-पुरुष लैंगिक शारीरिक संबंध म्हणताहात?' 'होमोसेक्शुअल्स आणि लेसबियन्स यांच्यासकट उत्तर हवं का?' खरंच ह्या गोष्टींचं प्रमाण भारतात इतकं कमी आहे की हा याचा अर्थ मला तेव्हा सुचलेलाही नव्हता.

विलायतेचं जाऊ द्या. भारतात तरी लग्न आणि पहिला स्त्री-पुरुष लैंगिक संबंध या एकच गोष्टी आहेत. या अर्थानीच या प्रश्नाकडे बघतात. लग्नापूर्वी स्त्री-पुरुष लैंगिक संबंध ह्यांचं प्रमाण गेल्या दशकात नक्कीच वाढलंय, पण त्याचीही संख्या कमीच आहे. त्यामुळे प्रश्नाची अनेक इतर अंगं कटाप करून लग्नाच्या कायदेशीर बंधनात अडकण्याचं योग्य वय यावर लक्ष केंद्रित करूया.

14-15 व्या वर्षी वैद्यकीयदृष्ट्या स्त्री आणि पुरुष दोघंही शारीरिक संबंधायोग्य झालेले असतात. त्यामुळे तेही उत्तर सोपं आहे. कायद्याचं उत्तर फार स्पष्ट आणि आकड्यामधे आहे. मुलीचं वय 18 पूर्ण आणि मुलाचं 21 पूर्ण. निसर्ग रचना, वैद्यकीय कल्पना आणि कायद्याची कल्पना यामधे इतका फरक असण्याचं मुख्य कारण वैचारिक, भावनिक परिपक्वता कायद्याला अभिप्रेत आहे.

आणि तिथेच खऱ्या प्रश्नाला सुरुवात होते. ‘परिपक्वता!’ किती मोघम, मोठी, पसरट कल्पना आहे!

परिपक्वता ही कल्पना त्या त्या विभागाप्रमाणे, काळाप्रमाणे आणि व्यक्तीप्रमाणे बदलणार की! पूर्वी लहानपणी लग्नं व्हायची. नंतरच्या एका काळात लहान बायको आणि बाप्या नवरा मान्य होता. आपण आपलं सध्याच्या काळात आपापल्या विभागात आपली स्वतःची कल्पना तपासूया.

एक उदाहरण घेऊया. 16 व्या वर्षी काही अटींवर आणि 18 व्या वर्षी विनाअट वाहन चालविण्याचा परवाना मिळू शकतो असा कायदा आहे. मला अशी अनेक मुलं-मुली माहिती आहेत की, जी 10 व्या नि 12 व्या वर्षापासून उत्तम वाहन चालवतात. पण त्यांना ‘लायसन्स’ मिळू शकत नाही. कारण पुन्हा तेच. परिपक्वता! सारासार विचार, विवेक, आवश्यक त्या सामान्य ज्ञानाचा अभाव! लग्नासाठी आवश्यक सामान्य ज्ञान बघितलं तर ते कशाचं? चरितार्थ चालवण्याचं ज्ञान हवं. शरीर संबंधांचं ज्ञान जरूर आहेच. (पाण्यात पडलं की पोहता येतं वगैरे विचार मला सांगू नका. नाकातोंडात पाणी जाऊन कासावीस झाल्याची शेकडो उदाहरणं आहेत). नवरा-बायकोनी एकमेकांची मनं सांभाळण्याचं कसब, नातेवाईक (सासर-माहेर सकट आणि नवरा-बायको दोघांची सासरं) सांभाळणं. शेजारी, मित्र यांच्याशी वागणं. पुढे स्वतःच्या मुलांशी वागण्याचं ज्ञान!

आमच्या ओळखीचं एक सुशिक्षित, सधन कुटुंबातलं जोडपं आहे. दोघं नात्यामधलेच होते. त्यामुळे दोन्ही कुटुंबांची खूप ओळख होती. खूप कमी वयात आईवडलांनी लग्न करून टाकलं. मुलगी 16 वर्षांची आणि मुलगा 19 वर्षांचा. लगेचच एक मूल झालं. संसाराला 10-12 वर्षं झाल्यावर त्यांना वाटायला लागलं की, आता सगळी मजा करून झाली, पण सगळ्याचा कंटाळा आला. काहीच प्रश्न नाहीत, पण स्वस्थता नाही. मग वयाच्या तिशीत ते अध्यात्माच्या मार्गाला लागले. तेही न जमल्यामुळे सगळे कायम अस्वस्थ. मला वाटतं, त्यांची मूळ अडचण लग्न म्हणजे काय हे न कळण्याची म्हणजे परिपक्वतेची होती. आमची कौटुंबिक ओळख खूप आहे, पण ते जीवनसाथमधे एकदाही आले नाहीत. कारण बहुतेक त्यांना तो कमीपणा वाटत होता.

प्रश्नाच्या उत्तराचा एव्हाना तुम्हाला अंदाज आला असेल. हे एवढं ज्ञान आणि परिपक्वता एखाद्याला असेल तर 18 व्या वर्षी, 21 व्या वर्षी लग्नात काही अडचण नाही. पण वयाच्या 30 पर्यंत वैवाहिक आयुष्याविषयी काही

विचार केला नसला तर 30 वर्षांचंही बालकच म्हणायचं. आपल्या समाजात याविषयी विचार न करण्यात पुरुष आघाडीवर असल्यामुळे अनेक संसारांत 40 नि 50 वर्षांची लहान मुलं नवरे आणि बाप म्हणून वावरतात की! तुम्ही कोणी हे स्वतःला लावून घेऊ नका, हे इतरांविषयी आहे.

लहान वयापासून म्हणजे 12 वी झाल्या झाल्या विवाह अभ्यास मंडळात जायला सुरुवात केली, कुटुंबाचीही साथ असली, तेवढी बुद्धी, सारासार विचार अंगी असला तर एखाद्या मुलाला किंवा मुलीला लवकर म्हणजे 18,21 या वयात लग्न करणं शक्य आहे, समाधानानी संसार करणंही शक्य आहे, लवकर मुलं झाल्यामुळे सगळ्यांना स्वस्थ, आरोग्यपूर्ण आयुष्य तत्त्वतः शक्य आहे.

मध्यमवर्गीय लोकांच्यात सध्याच्या परिस्थितीप्रमाणे मुलीचं योग्य वय 20 ते 25 (सव्विसावं लागलं की काळजी करायला, स्थळाच्या तडजोडींना सुरुवात) आणि मुलाचं 24 ते 29 मानतात. एखादी मुलगी मोठ्ठाड किंवा नाजूक असली, देखणा मुलगा असला, तर एखाद-दोन वर्षं इकडेतिकडे. हे सगळं चालू वर्णन पारंपरिक पुरुषप्रधान विचारसरणीतलं आहे. या पलीकडे जाऊन विचार करायची तयारी असली तर मात्र या प्रश्नाचा निराळा विचार व्हायला काही हरकत नाही.

निसर्गातल्या रचनेप्रमाणे पुरुषाचं शरीर लवकर थकतं. स्त्रिया जास्त चिवट आणि काटक असतात. खूप वय वाढलं तर आता लग्न नको, असा विचार स्त्रिया आधी करतात. पुरुष बराच काळ 'उभे' असतात. सहचर पाहिजे अशी एखादी जाहिरात पोक्त स्त्रीनी दिली तर तिला मिळणारा प्रतिसाद आणि पोक्त पुरुषानी सहचारिणी पाहिजे म्हटलं तर येणारा प्रतिसाद निराळा असतो. परिपक्वतेमधे स्त्रिया बहुतेकवेळा काही वर्षं आधी शहाण्या होतात.

सगळा उलटा सुलटा विचार करून माझं असं मत बनलंय की, पुरुष वयानी मोठा हा लग्नाचा निकष रद्द मानावा. 4-5 वर्षं लहान किंवा मोठं वय मान्य करून लग्नं ठरवावीत. त्यामुळे लग्न जुळण्यातला एक मोठा अडसर कमी होईल. हा विचार सबंध कुटुंबानी करणं मात्र जरुरीचं आहे.

काही प्रश्न लोकांच्या मनात असतात त्यांची उत्तरं शोधूया. मुलगा-मुलगी बरोबरीचे असले तर काय? मुलगा वयानी छोटा असला तर? नवरा-बायको दोघांना एकमेक मनापासून आवडायला हवेत. या प्रश्नाला प्राधान्य दिलं तर आणखी काही गोष्टींचा विचार समोर येतो. काही पुरुषांना खरोखरच आपल्यापेक्षा मोठ्या वयाच्या बायकांबरोबर स्वस्थ वाटतं. अशांनी त्यांच्याशी लग्न करायला

काय हरकत आहे? काही मुलींना वयानी मोठे पुरुष आवडतात. त्यांनी अशा मुलग्याशी लग्न का करू नये?

आणखी काही प्रश्न निघतात. 'लग्नाचं वय गेलं' असं का बरं म्हणतात? 40 वयाच्या मुलानी किंवा मुलीनी का लग्न करू नये? नवरा किंवा बायको 40-50 वयात वारली तर मुलांना विश्वासात घेऊन, नातेवाइकांशी चर्चा करून आणि मालमत्तेसंबंधी कायदेशीर कागदपत्रं करून दुसरं लग्न करायला काय हरकत आहे? अगदी 60-70 च्या आसपासच्या स्त्री-पुरुषांनीही सोबतीसाठी लग्न करण्यात काय चूक आहे? खरं म्हणजे घटस्फोटित, विधवा, विधूर यांच्याकडे लोकांनी चमत्कारिक, विकृत नजरेनी बघितलेलं सहन करण्यापेक्षा दुसरं लग्न बरं.

वय याविषयी तऱ्हेतऱ्हेच्या गप्पा-चर्चा करत असताना असेही गमतीशीर विचार समोर येतात. निसर्गानी लहान मुलं म्हाताऱ्यांच्या पोटी जन्मतील अशी सोय ठेवायला हवी होती. वेळ असतो, पैसे असतात, सारासार विचार असतो, माया असते. आणखी एका गोष्टीविषयी एक मुलगी म्हणत होती, ज्या वयात सुंदर दिसण्याची खूप इच्छा असते तेव्हाच नेमका चेहऱ्यावर मुरुमांचा त्रास का बरं निसर्गात ठेवलाय? एक ८० वर्षांचे गृहस्थ वृत्तीनी इतके उमदे नि तरुण होते की, आम्ही त्यांना 'एटी इअर्स ओल्ड' न म्हणता 'एटी इअर्स यंग' म्हणायचो. असं आपल्याविषयी ८० व्या वर्षी इतर लोक म्हणाले तर काय बहार होईल, नाही? या वर्णनाच्या स्त्री-पुरुषांनी लग्न करण्यात काहीच चूक मानू नये.

लग्नाच्या वयामधे आणखी एक अडचण असते, नि तो प्रश्न जगभर असतो. मोठ्या भावंडांचं लग्न झाल्याशिवाय धाकट्याचा विचार करायचा नाही अशी समजूत असते. मोठा भाऊ असला तर धाकट्या बहिणीचं लग्न ठरेपर्यंत तो थांबून राहतो. हळूहळू यात बदल होताना दिसतोय. पण फार सावकाश.

आता मूळ प्रश्नाचं उत्तर. लग्नाचं योग्य वय काय, या प्रश्नाचं उत्तर आकड्यात देणं योग्य नाही. खरं उत्तर असं आहे की, विचार परिपक्व असतील तर कायद्यानी परवानगी दिल्यापासून पुढे केव्हाही लग्न करावं.

स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळापासून टिळक – आगरकर वाद आपल्याला सगळ्यांना माहितीच आहे. आधी स्वातंत्र्य मिळवायचं का आधी स्वातंत्र्य मिळाल्यावर त्याचा वापर कसा करायचा ते शिकायचं, हा तो वाद होता. स्वातंत्र्याचा वापर समजण्यासाठी समाजप्रबोधन आधी करावं या विचारात अनेक

मुद्दे होते. त्यात एक मुद्दा होता बालविवाहाच्या प्रथेचा. अगदी लहान वयात मुलांची लग्न करून टाकायला त्यांचा विरोध होताच, पण त्यांनी पुढे असंही म्हटलं की, मुलाला आणि मुलीला स्वतः विचार करून स्वतः निर्णय घेण्याची क्षमता आल्याशिवाय लग्न करू नये. जरी मुला-मुलींचं वय वाढलं तरी जोपर्यंत पालक आपल्या मुला-मुलींच्या लग्नाचा निर्णय घेतायत तोपर्यंत त्याला बालविवाहच म्हटलं पाहिजे.

इतर कशाचीही 'प्रॅक्टिस' करायला लोक 5-10 वर्षं कॉलेजमधे जायला तयार असतात. डॉक्टर्स, वकील, इंजिनिअर्स अनेक वर्षं शिकतात आणि मग 'इन्टर्नशिप' करतात. 'संसार' या महत्त्वाच्या 'प्रॅक्टिस'साठी मात्र निर्णय घ्यायला आणि अंमलबजावणी करायला काही मिनिटं, काही तास, काही दिवस दिलेले असतात. त्या काही मिनिटांत, तासांत त्यांचं म्हणणं असतं की आम्हाला नुसता स्थळाचा पत्ता द्या. बाकी काही शिकवू नका. पुढे काय करायचं ते आम्हाला सगळं माहितीय. हा विश्वास किती खरा असतो, तो जरा तपासूया. एक एक मुद्दा घेऊया.

1) आईवडलांना स्थळाबद्दल वरवरच्या गोष्टी समजतील. पण गाभ्यात म्हणजे त्या मुलाच्या डोक्यात काय माल भरलाय, म्हणजेच अंतर्मन, हे आईवडील, घरातले अनुभवी, काका, आत्या, मावश्या, मामा, आजी-आजोबा सगळे लक्षात घेतले तरी समजू शकतील का? माझ्या मते, ते शक्य नाही. आधीच्या पिढ्यांचे लग्नाबद्दलचे विचार आता उपयोगी पडणार नाहीत.
2) मित्रमंडळी त्याच पिढीची असतात. त्यांना अंतर्मन समजेल का? याचंही खरं उत्तर नाही असंच द्यावं लागतं.
3) मुलगा किंवा मुलगी खूप बुद्धिमान असला तर कोणाच्याही मदतीशिवाय एकट्याला समोरच्या व्यक्तीचं अंतर्मन समजेल का? याचंही उत्तर नाही असंच मिळतं.

या सगळ्याबद्दल ॲप्लाईड 'सायकॉलॉजी', तत्त्वज्ञान आणि व्यवस्थापनशास्त्र यांनी काही उपाय सांगितले आहेत. ते शिकण्यावाचून पर्याय नाही.

एक महत्त्वाची गोष्ट अशी की, नॉर्मल मुलाला किंवा मुलीला साधारण 2 वर्षांत जोडीदार सापडत नसेल तर कुठेतरी काहीतरी चूक आहे. ती चूक शोधायला हवी.

मुलग्यांच्या मनात असंच असतं की मुलीचं वय लहान असण्यात फायदे आहेत. मुख्य म्हणजे ती मुलगी आपल्याला आणि आपल्या कुटुंबाला हव्या त्या साच्यात बसेल. मुलींचीही दुसऱ्या माणसाच्या साच्यात जाऊन बसण्याची तयारी असते. मला मात्र हा विचार पटत नाही.

अजूनही काही प्रश्न येतात. उशिरा लग्न झालं की स्त्रीला गर्भारपणात, बाळंतपणात शारीरिक त्रास होऊ शकतो, त्याचं काय? मुद्दा खरा आहे. पेच आहेच. पण एखादंच मूल हवं असेल तर काही अडचण साधारणपणी येत नाही. खूप शिक्षण, उशिरा लग्न आणि खूप मुलं एखाद्या जोडप्याला पाहिजेच असली तर घ्यावीत दत्तक! एकूण जगण्याची मर्यादा पण वाढलीय. त्यामुळे पूर्वी बेतलेली अनेक वयाची गणितं आता नवीन मांडायला हवीत.

कोणाला वाटेल, याचा अर्थ एकाधिकारी वैवाहिक आयुष्याचं आम्ही समर्थन करतोय की काय! अविवाहित रहावं असा सल्ला देतोय की काय? छे! छे! अविवाहित राहिलेले कितीतरी स्त्री-पुरुष आपण बघतोच की. अविवाहित स्त्रियांना पुरुषप्रधान समाजात पुरुषांच्या विकृतींना तोंड देतादेता पुरेवाट होते, तर अविवाहित पुरुषांची स्त्री सहवासाच्या अभावामुळे विकृती आणखीन बळावते.

'स्त्री-पुरुष संबंध' हा विषय तोंडानी न बोलण्याचा, पण डोक्यात सतत घोळणारा विषय बनतो. अगदी निवडक काही अविकृत स्त्री-पुरुष आम्ही बघितले आहेत, पण ते प्रमाण फार कमी आहे. अविवाहित राहण्यासाठी जास्त सामर्थ्य लागतं, का सध्याच्या परिस्थितीत रूढ असलेल्या वैवाहिक जीवनासाठी जास्त सामर्थ्य लागतं, हा खरोखरीच एक प्रश्न आहे. माझ्यापुरतं म्हणाल तर मला अविवाहित आयुष्याचा निर्णय योग्य वाटत नाही.

एखाद्याचं, एखादीचं लग्न वेळेवर झालं नाही तरी लग्न रद्द समजू नये. योग्य वयात, योग्य व्यक्तीशी लग्न हे सर्वोत्तम मानलं तर त्यानंतरचा पर्याय अयोग्य व्यक्तीशी घाईनी लग्न हा होऊ शकत नाही. योग्य व्यक्तीशी उशिरा लग्न (आणि अर्थात त्यामुळे काही तोटे मान्य) हा सरस मार्ग आहे. योग्य व्यक्ती शोधण्याची अडचण मात्र तशीच राहते.

मनातलं स्त्रियांविषयीचं आकर्षण तर असतंच. मागे म्हणाल्याप्रमाणे तरुण,

अविवाहित मुलगे विवाहित कुटुंबाकडे वहिनी वहिनी करत जातात त्याचं कारण आकर्षण हेच असतं. मुली हा प्रकार फार कमी प्रमाणात करतात. मी आणि शोभा फिलाडेल्फियात रहात असताना शोभाला भेटण्यासाठी असे काही मुलगे, एकटे पुरुष निमित्तं काढून काढून यायचे. मी असभ्यपणी, उग्रपणी कधी वागायचो नाही. पण माझ्या आकारामुळे बहुतेकजण मला मनातून घाबरायचे. त्यामुळे कोणी कधी चुकीचं वागलं नाही. आमच्या लग्नापूर्वी मीही असाच अविवाहित होतोच की. मीही असा वहिन्यांना भेटायला गेलो असतो, पण मला नोकरी आणि 'मॅनेजमेंटचा कोर्स' यामुळे वेळच नसायचा.

मुख्य प्रश्न स्वतः विचार करून स्वतःला योग्य वाटतील ते निर्णय योग्य वेळेला घेण्याचा आहे. योग्य वयात कोणाशीही लग्न की योग्य व्यक्ती सापडली की लग्न, हा तो निर्णय. आणि शेवटी हे सगळं कशावर जाऊन पोहोचतं तर योग्य वेळेला विवाह अभ्यास चालू झाला, तर योग्य वयात योग्य निर्णय घेणं शक्य आहे, नाहीतर बसा पेच सोडवत, नाहीतर व्हा लग्नाचा जुगार  खेळायला तयार!

●●●

*सगळा उलटा सुलटा विचार करून माझं असं मत बनलंय की, पुरुष वयानी मोठा हा लग्नाचा निकष रद्द मानावा. 4-5 वर्षं लहान किंवा मोठं वय मान्य करून लग्नं ठरवावीत. त्यामुळे लग्न जुळण्यातला एक मोठा अडसर कमी होईल. हा विचार सबंध कुटुंबानी करणं मात्र जरुरीचं आहे.*

# 7

# वधू-वर सूचक मंडळं आणि मेळावे

## 1) वधू-वर सूचक मंडळं

लोकांची लग्नं जुळावीत अशी मनोमन इच्छा असणारे मी खूप बघितलेयत. त्यांचा काही स्वार्थ नसतो, पण सारखं याला ही सुचव, हिला याचं स्थळ सुचव, चालू असतं. अशा वर्णनाच्या बायका पुरुषांपेक्षा खूप जास्त. आत्तापर्यंतच्या परंपरेमधे बायकांना ही 'जुळवाजुळवी' करायला सवड जास्त, हे एक कारण असेल, पण त्यांना खरोखरच या अशा परोपकाराची इच्छा जास्त असते, हेही कारण आहेच. दुसऱ्याला मार्ग दाखवल्याबद्दलचं श्रेय, मोठेपणा हवासा वाटतो. हे कारण काहींच्या बाबतीत असतं. काहींना काहीतरी उद्योग पाहिजे असतो. काहींना 'रोल' पाहिजे असतो. कारणं अनेक असतात, पण 'श्रेय' मिळतंच असं मात्र नाही.

साधारण निम्मं प्रमाण असं आहे की, जे हा सरळसरळ धंदा म्हणून करतात. जी वस्तू विकली जाते ती विकणं हा तर प्राथमिक व्यापारी दृष्टिकोन आहे. लोकांना ज्या वस्तूची कळकळीनी (मुलगी लग्नाची झाली की जी कळ येते त्यावरूनच हा शब्द आला असावा) गरज आहे, त्यासाठी लोक खुषीनी पैसे मोजतात हेही खरं आहे. त्याच्या पुढची पायरी मात्र कुठच्याही मुला-मुलीला, त्यांच्या पालकांना आवडत नाही. ती सांगतो.

एखाद्या शाळेतल्या बाईंनी हातात छडी घेऊन विद्यार्थ्यांना विषय शिकवावा आणि त्यातले महत्त्वाचे मजकूर मुला-मुलींनी आपापल्या वहीत उतरवून घ्यावेत अशाप्रकारे मुलांचे पत्ते, वर्णनं आईवडील उतरवून घेताना वधू-वर सूचक

मंडळात मी प्रथम बघितले, तेव्हा मला जबरदस्त कळ आली. माणूस एका बाजूला सतत ‘आपण काय करायचं नाही’ याची यादी पक्की करत असतो. त्यात ही गोष्ट जाऊन बसली. मला आणि शोभाला एक मुलगा आणि एक मुलगी आहे. हा प्रकार आमच्या मुलांची लग्नं ठरताना, होताना आमच्या वाट्याला आला नाही, ही भावना सुखावणारीच आहे.

कुठच्याही आधीच्या पिढीमधे आणि नंतरच्या पिढीमधे ‘जनरेशन गॅप’च्या प्रश्नांबरोबर काही आधुनिकतेचे प्रश्न गृहीत धरलेले असतात. पोषाखातली आधुनिकता मला इथे अभिप्रेत नाहीय. विचारस्वातंत्र्य, स्वावलंबन, स्वतःच्या आयुष्याबद्दलचे निर्णय स्वतः घेणं आणि परिणामांना स्वतः तोंड देणं याबद्दलच्या आधुनिकतेबद्दल मी म्हणतोय. यालाच ‘व्यक्तिवादी’, ‘कुटुंबवादी’ अशीही जड जड नावं वापरतात. कुटुंबाबद्दल बेपर्वाई न ठेवता, समाजाच्या सर्व अंगांचं भान ठेवून जपलेला ‘व्यक्तिवाद’ खरा आधुनिक असं मी मानतो.

आधुनिक विवाह जुळवण्यातलं, लग्न आणि संसार करण्यातलं स्वतःशी म्हटलेलं जाहीर विधान असं असणं अपेक्षित आहे. ‘मी माझ्या संबंधात आलेल्या व्यक्तींपैकी, लग्नासाठी उपलब्ध असलेल्यांपैकी, माझ्या निर्णयशक्तीप्रमाणे आणि कुवतीप्रमाणे त्यातल्या त्यात चांगली व्यक्ती स्वेच्छेनी निवडून, त्या व्यक्तीशी लग्न करण्याचा निर्णय घेतला आहे आणि ह्या निर्णयाची सर्व जबाबदारी मी घेतो.’

याउलट आधीच्या पिढीच्या म्हणजे आधुनिक नसलेल्या कुठच्याही वयाच्या व्यक्तीनी मनाशी केलेलं विधान असं असतं. ‘बरोब्बर मला पाहिजे तशी व्यक्ती लग्न करण्यासाठी दुसरं कोणीतरी शोधून देईल आणि मग त्यामुळे माझा संसार आपोआप सुखाऽऽऽचा होईल’.

माझ्यासारख्याचं म्हणणं अगदी साधं आहे, आख्ख्या आयुष्यात आपण स्वतः करू इतकं चांगलं काम आणि बरोब्बर आपल्याला पाहिजे त्या पद्धतीनी

दुसरं कोणी करू शकतं? एखाद्या कामाचा प्रकार आपल्याला माहितीच नसतो म्हणून आपण दुसऱ्याची नेमणूक अवश्य करू, पण आपल्याला ते काम येत असतं तर ते आपण त्यापेक्षा चांगलं करू शकलो असतो, हे अगदी नक्की. आपल्याबद्दल निर्णय घ्यायचा असला तर दुसरी कोणीही व्यक्ती 'सेकंड बेस्ट' होऊ शकते. पण सर्वोत्तम स्वतःच, हा तर मानसशास्त्रातला प्राथमिक धडा आहे. दुसरी कुठचीही व्यक्ती ही आपली सल्लागार होऊ शकते, पण आपली जागा घेऊ शकत नाही.

पालकांची मात्र प्रामाणिक समजूत असते की, आपल्या मुलांच्या जोडीदार निवडीचा निर्णय आपणच घ्यायचाय. काही मुलांनाही खरोखरच वाटतं की आपल्यापेक्षा आपले आईवडील आपल्याला जास्त चांगलं ओळखतात. प्रत्यक्षात हा फक्त आकर्षक विचार, चमकदार 'फिल्मी' वाक्य आहे. ते अजिबात खरं नाही. संपूर्ण वधू-वर सूचक मंडळ आणि विवाह अभ्यास मंडळ यामधे हा मुळातला फरक आहे. ज्या पालकांना वाटतं की, आपल्या मुला-मुलींच्या आयुष्याबद्दलचे निर्णय आपण घ्यायचे आहेत किंवा ज्या अविवाहित मुला-मुलींना वाटतं की, आपल्या आईवडलांनीच आपल्या आयुष्याबद्दल निर्णय घ्यायचे आहेत, त्यांना अजून सध्या तरी 'विवाह अभ्यास मंडळ' मनापासून पटणार नाही याची मला कल्पना आहे.

एकेकाळी मी म्हणत असे की, वधू-वर सूचक मंडळांची गरज मला वाटत नाही. पण आता अभ्यास करायला लागल्यावर मला वाटतं की या दोन्ही कल्पना निरनिराळ्या लोकांसाठी आवश्यक आहेत आणि समाजाला दोन्हीची गरज आहे.

दोन पिढ्यांच्या विचारांमधल्या फरकाबद्दल आपण बोलतो आहोत, त्यात मी आणि माझी मुंबईला राहणारी आईही आली. जीवनसाथच्या मुंबई शाखेची एरवीची जबाबदारी आईकडे होती. दर महिन्याच्या चौथ्या रविवारी मिश्रगट चर्चेला फक्त मी जायचो. एरवीची जबाबदारी याचा अर्थ आईचं वधू-वर सूचक मंडळाचं काम. फाइली, फोटो, माहितीचे फॉर्म, बरंच काय काय चालायचं. मुंबईच्या एक-दोघी मुली आईला मदत करायच्या. त्या काळात आईनी एक का दोन लग्नं जमवली आणि त्याचा तिला आयुष्यभर अभिमान वाटायचा, हे मला आठवतंय.

पुण्याला माझ्याकडे जनमानस, जीवनसाथचं काम करायला एक बाई महिना पगारावर यायच्या. त्यांनीही वधू-वर सूचक मंडळ चालवायचा प्रयत्न

केला. त्या माझ्यापेक्षा वयानी लहान होत्या, पण त्यांना अभ्यास मंडळापेक्षा त्यात जास्त रस होता. आधुनिकता आणि वय यांचा खरंच काही संबंध नसतो हे त्यावरून कळतं.

काही लोक पैसे कमावण्याचा धंदा म्हणून हे काम करतात. असे लोकही माझ्या ओळखीचे आहेत. अशा धंदा म्हणून वधू-वर सूचक मंडळं चालवणाऱ्यांचे अनुभव त्यांनी मला सांगितले. मुलीचं नाव नोंदवायला आई आणि मुलगी बहुतेकवेळा येते. वडील क्वचितच येतात. मुलाचं नाव नोंदवायला फक्त आई येते. मुलगा क्वचितच फिरकतो.

अशा संस्थांचे मेळावेही असतात मधूनमधून. त्यात मुली स्वतः येतात. मुलगे मात्र आईला पाठवतात. मेळाव्यात स्वतः येणारा मुलगा क्वचितच आढळतो. पुरुषप्रधान मानसिकतेचा हा परिणाम ही खूप मोठी अचडण असते.

●

## 2) मेळावे, खेळ, सहल आणि जीवनसाथचे प्रयत्न

मला वधू-वर सूचक मंडळ चालवण्यात कधी रस नव्हता, पण वधू-वर मेळावा आणि विवाह अभ्यास मेळावा अशी एकत्र कल्पना वापरून जीवनसाथनी म्हणजे मी काही वर्षं प्रयत्न केला. त्यामुळे स्थळं कळणं, स्वतःची ओळख, दुसऱ्याची पारख अशा पारंपरिक आणि आधुनिक दोन्ही गोष्टी घडतील अशी माझी कल्पना होती.

म्हणजे पारंपरिक पद्धतीनी 'मुलीचं रुप' बघणंही होतं, 'मुलाचे पैसे' बघणंही होतं आणि आधुनिक पद्धतीनी विचारांचीही कल्पना येते. आम्ही गमतीत त्याला 'स्कॅनिंग' म्हणतो. कारण डोक्याच्या आत काय आहे ते दिसण्याची त्यात सोय असते ना! अशा मेळाव्याचं संपूर्ण दिवसभराचं व्हीडिओ शूटिंग करायचं, ही पण कल्पना छान आहे. म्हणजे मेळाव्याला हजर नसलेल्या लोकांनाही रूप, पैसे, विचार अशा तीनही गोष्टी कळू शकतील. अशा व्हिडिओ कॅसेट्स अनेक लोकं विकत घेतील असा माझा अंदाज आहे. मागे मी म्हटलं तसं अमेरिकेत, इंग्लंडमधे मराठी लोकांची 'विवाह अभ्यास मंडळं' निघतायत. काही चालू झालीयत, काही चालू होण्याच्या अवस्थेत आहेत. तिथल्या मेळाव्यांचंही व्हिडिओ शूटिंग करून कॅसेट्स काढण्याची कल्पना आहे. सहलींचंही शूटिंग करता येतील.

व्हिडिओ शूटिंगच्या 'रिस्पॉन्स'बद्दल मला एवढा विश्वास वाटतोय, कारण मधला एक अनुभव. नाशिकच्या मुक्त विद्यापीठानी या विषयावर माझ्या पुढाकारानी 4 व्हिडिओ कॅसेट्स काढल्या होत्या. त्या 'फॅमिली एज्युकेशन' या विषयातल्या 'एज्युकेशनल कॅसेट्स' होत्या. एरवी 'अभ्यासाला' वेळ होत नाही म्हणणारी मंडळी या शूटिंगच्या कार्यक्रमात 'वेळात वेळ' काढून सहभागी झाली होती. स्वतः फिल्मवर दिसण्याचं इतकं आकर्षण मनात असतं बघा! याखेरीज ई-मेल, फोटो ॲटॅचमेंट्स याही 'कॉम्प्युटर बेस्ड' पद्धतीही आहेतच की!

मुख्य मुद्दा एकच. एकमेकांची माहिती देण्यात-घेण्यात, संकोच, अहंकार यामुळे जो खोटेपणाचा अंश येतो त्याला आधुनिकतेचा आक्षेप आहे. पारंपरिक स्थळ बघण्याच्या पद्धतीचं काही लोक असं वर्णन करताना मी बघितलंय, 'खोटं बोलून लग्न जुळवण्याची पद्धत'. बघा बुवा विचार करून! आणि मुख्य मुद्दा

हा आहेच. कोणाला तरी अमुक एकाशी, तमकीशी लग्न कर, असा आग्रह करणारे आपण कोण?

आईवडील, विशेषतः आया आपल्या मुलाशी असं बोलताना मी ऐकलंय, 'मुलींचं काय, तू मुलगा आहेस. रांग लागेल दारापुढे.' इतकी पुरुषप्रधानतेची रूढी समाजात अजून शिल्लक आहे. पाश्चात्त्य समाजात डेटिंग चालतं त्यात एक रूढी कडकपणी पाळतात. मुली 'आपण लग्न करायचं का?' असं सुद्धा विचारत नाहीत. मुलांनीच मुलीला 'प्रपोझ' करावं लागतं, मुलगी मुलाला आपणहून विचारत नाही, हा रिवाज पण कडक आणि 'तू माझ्याशी लग्न करशील का?' असंच मुलानी विचारावं लागतं.

पाश्चात्त्य जगात आणखी एक निराळाच प्रश्न आहे. स्वतःचं स्वतःलाच जमवावं लागतं. एखाद्याला ते नाही जमलं तर कुटुंब मदत करत नाही. डेटिंगची सोय आहे, पण 'सीरियस रिलेशनशिप' म्हणजे लग्नासाठी मदत करण्याची काहीच सुविधा नाही. त्यामुळे जेव्हा मी इंग्लंड, अमेरिकेतल्या मित्रांशी बोलतो तेव्हा वाटतं, हे 'कॉंबिनेशन' ऊर्फ विवाह अभ्यास मंडळ आणि वधू-वर सूचक संस्था हे आपल्याला भारतीयांना केवढं वरदान आहे!

पण कित्येक मुला-मुलींना असं वाटत नाही. मेळाव्यांचा अनेकांनी धसका घेतलेला आहे. विवाहपूर्व समुपदेशन केवळ लैंगिक प्रश्नांभोवतीच अर्धवट घोटाळत राहतं. इंटरनेटचा आधार अनेकजण घेत आहेत, पण त्याची विश्वासार्हता अजून सिद्ध व्हायची आहे. इंटरनेटवर फसवणुकीचं प्रमाण वाढलेलं आहे.

अशावेळी परिचयोत्तर विवाह असा काही कुठे पर्याय आहे का, मैत्रीतून विवाह असा काही 'प्लॅटफॉर्म' आहे का, या शोधात तरुण आहेत. त्यामुळेच जिथे केवळ पैशांसाठी काम चालत नाही, पण जिथे समाजकार्य असाही आव नाही, जिथे कुणाचं दडपण विचारांवर नसेल आणि निर्णयासाठी दबाव नसेल, जिथे तरुणांचा सन्मान जपला जाईल आणि मार्गदर्शन म्हणून उपदेशांचे डोस नसतील अशा विवाह अभ्यास मंडळाच्या शोधात मुलं-मुली आहेत.

काही काळानी मी आणि जीवनसाथनी मेळाव्याचं स्वरूप बदलून पाहिलं, ते जरा सांगतो. मेळावे, अभ्यास मंडळ याच्यापेक्षा एक प्रयोग असा करून बघितला की, त्याला सहलीचं स्वरूप द्यायचं. माझ्या आत्तापर्यंतच्या कामात मी वैवाहिक आयुष्य समजावून सांगण्यासाठी उपयोगी असे अनेक खेळ शोधून काढलेले होते. त्यातले खेळ निवडून ते सहलीत खेळायचे अशी सुरुवात केली.

खेळ खेळायचा आणि मग अगदी थोडक्यात त्याचा अर्थ काय, असं जमलेल्यांना विचारायचं. त्यात थोडा विवाह अभ्यास व्हायचा.

निरनिराळ्या बागेत, फार्म-हाऊसेसवर अशा अनेक सहली जीवनसाथनी आयोजित केल्या. त्या सहलीच्या ठिकाणी खूप जास्त प्रमाणात खेळ आणि अगदी थोड्या प्रमाणात अभ्यास ह्याचं गणित जमलं. माझी एक पंचाईत सांगतो. मी जेव्हा जेव्हा मेळावे घेतले तेव्हा माझ्या विचारांची गाडी विवाह अभ्यासाकडेच कायम वळायची. शेवटी सहल, त्यातच खेळ आणि त्यातच विवाह अभ्यास हा साचा पक्का झाला. हळूहळू सगळ्यांच्याच डोक्यातून मेळावा रद्द झाला आणि खेळातून विवाह अभ्यास रूढ झाला. या पुस्तकसंचात खेळ याविषयी एक स्वतंत्र लेखच आहे. त्यामुळे त्याविषयी इथे फार सांगणं योग्य ठरणार नाही.

त्याखेरीज 'विवाह अभ्यास मंडळ म्हणजे नेमकं काय' असाही सविस्तर लेख आहे. त्यामुळे त्याविषयीदेखील सविस्तरपणी इथे सांगणं योग्य नाही. काही त्रोटक उल्लेख करतो. या सगळ्या निरनिराळ्या विषयांच्या चर्चा खेळाच्या निमित्तानी सहजपणे चालू करता आल्या होत्या एवढं फक्त सांगतो.

कोण, केव्हा प्रामाणिक विचार करायला लागेल याला काही नियम नाही. पण प्रामाणिक, स्वच्छ, स्पष्ट विचार करायचा म्हटला की मात्र काही कडू, गोड, खारट, तुरट चव पचवावीच लागते. खरं तेच बोलायचं, ऐकायचं ठरवलं की, सगळं मनपसंत कसं आढळणार?

माझ्या आठवणीप्रमाणे गेली काही हजार वर्षं (मला अगदी स्पष्ट आठवतंय) 'सुंदर मुलगी नि पैसेवाला नवरा' या एकाच मुख्य इच्छेवर आधारलेले संसार आसपास दिसत आहेत. 'आपण त्यातले नाही' असं वाटून गेलं ना वाचताना? नीट तपासून बघा. खुद्द तुम्ही कदाचित अपवाद असालही; पण सरासरीचा अभ्यास केला तर बघावं तिथं हेच सूत्र दिसतं. एक गंमत सांगतो. मी पुनःपुन्हा अगदी स्पष्टपणी 'विवाह अभ्यास ('अभ्यास' शब्दाखाली रेषा मारून 'ठळक' अक्षरात लिहिलेला) मंडळ' म्हणतोय आणि ऐकणाऱ्याला ते वधू-वर सूचक मंडळ ऐकू येतंय, हे माझ्या अगदी सवयीचं आहे.

विवाह अभ्यास मंडळाच्या सहलीत गुप्त मतदान पद्धतीनी 'बॉय ऑफ द डे' आणि 'गर्ल ऑफ द डे' अशी मतमोजणी करून जास्तीत जास्त मतं मिळालेल्या मुलाचं आणि मुलीचं जाहीर कौतुक आणि त्यांना दोन मिनिटं आपले विचार मांडायला स्टेजवर (बहुतेक ठिकाणी स्टेज नसतंच. सपाट जागेवर गोलात

बसून जास्त चांगली खुली चर्चा होते.) किंवा सूत्रधाराशेजारच्या खास खुर्चीवर बसून बोलण्याचा कार्यक्रम असतो. गेल्या पाच वर्षांतल्या माझ्या या विषयावरच्या केलेल्या कामात 'विचारांना रूपाएवढंच महत्त्व' देण्यासाठी मुलांना प्रोत्साहन देत आलोय. जोडीदार निवडताना अंतर्गुणांसकट संपूर्ण व्यक्तिमत्त्वाला सारखं प्राधान्य द्या, अशी विनंती करतोय. पण मुला-मुलींच्या मनातल्या विचारांची खरी परीक्षा या मतदानात होते. जास्तीत जास्त मतांना क्र. 1 तसंच क्र. 2 आणि 3 सुद्धा जाहीर करायची पद्धत असते.

मुला-मुलींना यात नुसती गंमत वाटते. कधी कधी पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या क्रमांकांना आनंद वाटतो. अभिमानानी 'कॉलर ताठ' होते, हे सगळं चांगलंय, पण माझ्यातल्या अभ्यासकाची नजर त्या प्रमाणाकडे असते. पुणं, मुंबईखेरीज इतर गावांमधे हा खेळ घेतो तेव्हा 100 टक्के वेळा सुंदर मुलगी लोकप्रिय ठरते. ती संपूर्ण कार्यक्रमभर गप्प बसून राहिली असली तरी आणि तिच्या विचारांविषयी, अंतर्गुणांविषयी काहीही माहिती नसली तरी, तिचा चेहराच तिला मतं मिळवून देतो. एके ठिकाणच्या एका कार्यक्रमात एका हजर असलेल्या विवाहित, पण तरुण दिसणाऱ्या सुंदर बाईला मतं मिळाली. कारण ती बाई मंगळसूत्र घालत नव्हती. एकदा घटस्फोट होऊन काही वर्षांनंतर 'ग्रुप काऊन्सेलिंग' पद्धतींनी विचारांना 'पॉलिश' करण्यासाठी विवाह अभ्यास मंडळात आलेल्या एका मुलीला खूप मतं मिळाली. कुठेही जा, मुलांच्या या आकडेवारीत फार फरक नाही.

अशा खेळांमधून केलेल्या सहलीतल्या चर्चेतून एक गोष्ट नेहमी समोर यायची. जोडीदाराचा शोध घेतानाच्या अडचणींच्या यादीत एक मोठं पिशाच्च आपल्या समाजाच्या मानगुटीवर बसलेलं दिसतं. ते म्हणजे प्रथम वर, प्रथम वधू ही कल्पना. एखाद्या मुलाचा किंवा मुलीचा घटस्फोट झाला असला तर लोक विचार करतात की, त्या व्यक्तीमधे काहीतरी दोष असेल. या कल्पनेमुळे प्रथम वर किंवा प्रथम वधू त्या व्यक्तीचा विचारच करत नाहीत.

योनिशुचिता आणि शिश्नशुचिता या कल्पनेचा प्रचंड प्रभाव भारतीय समाजमनावर आहे. तेवढी एक गोष्ट सोडली तर एका फसलेल्या लग्नाच्या अनुभवामुळे माणूस जास्त शहाणा होतो असं मला वाटतं. एक प्रेमभंग आणि एक घटस्फोट यात योनिशुचितेचा अभाव एवढाच फरक असतो, पण तो चालत नाही. एकमेकांचे स्वभाव जुळत नाहीत यामुळे झालेल्या घटस्फोटांचं प्रमाण

सर्वांत अधिक आहे. एकेकाळच्या कायद्याप्रमाणे 'नॉनकॉंपॅटिबिलिटी' या कारणामुळे घटस्फोट मिळायचा नाही. गेल्या काही वर्षांत मिळायला लागलाय.

ज्या व्यक्तीचे अंतर्गुण दुसऱ्या भिन्नलिंगी व्यक्तीबरोबर जुळले नाहीत त्याचे आपल्याशी जुळणार नाहीत असं धरून चालणं चूक आहे. माझ्या प्रत्यक्ष ओळखीत अशी बरीच उदाहरणं आहेत की, दोन घटस्फोटितांनी एकमेकांशी लग्न केलं आणि ते सुखात संसार करतायत. एकजण प्रथमवर किंवा प्रथमवधू आणि दुसरा जोडीदार घटस्फोटित अशी उदाहरणं फार क्वचित दिसतात. सख्खा भाऊ वारल्यावर वहिनीशी लग्न करणारे काही ओळखीचे आहेत. तेही सुखात संसार करतात.

घटस्फोट घेणाऱ्यामधे काहीतरी अडचण असणार या गृहितामुळे लोकांना विधवा, विधूर चालतात. अगदी पोटातली भीती अशीही असते की, घटस्फोटिताचा जोडीदार जिवंत असतो, त्यामुळे पुन्हा भेटू शकतो. ती गुंतागुंत नको अशी इच्छा असते. ज्यांना आधीच्या लग्नातलं अपत्य आहे त्यांचे तर खूप प्रश्न असतात. या प्रकारची लग्नं जुळली तर टिकताना दिसतात. कारण दोघं समदुःखी, समान स्थितीमधले असतात. दोन जोडीदारांपैकी एकाला आधीचं मूल असलं आणि दुसऱ्याला नसलं तरी खूप प्रश्न येतात. मुलांना त्रास होऊ नये ही मुख्य गोष्ट बनते आणि ती बरोबर आहे. त्याचबरोबर अभ्यास हा त्यावरचा उपायही आहे.

केवळ माहिती म्हणून या बाबतीतली पाश्चात्त्य देशांमधली परिस्थिती सांगतो. योनिशुचिता आणि शिश्नशुचिता हा विचार तिथे अस्तित्वातच नाही. लग्न करताना आधी लैंगिक संबंधांचा अनुभव नसणं, हे चुकीचंच मानतात. तेवढी एक गोष्ट सोडून जोडीदाराच्या स्वभावावरच सगळं लक्ष ते केंद्रित करतात. मला ही गोष्ट महत्त्वाची वाटते. ती गोष्ट पाश्चात्त्यांकडून भारतीयांनी शिकण्याजोगी आहे असं मला वाटतं.

माझ्या ओळखीचे लग्नाचं खूप वय झालेले एक-दोन मुलगे आहेत. ते अजूनही 'उभे' आहेत. गेली 10-12 वर्षं लग्न जुळवण्याचे त्यांचे प्रयत्न अयशस्वी ठरलेले आहेत. हे मुलगे सज्जन आहेत, चांगले आहेत, पण चुकीच्या मुलीला विचारलं, ती नाही म्हटल्यामुळे निराश झाले. मग बराच काळ धडपड केली नाही. अशा कारणांमुळे त्यांचं लग्न ठरत नाही. माझ्या मते, त्यांनी वेळीच प्रथम वधू हा आग्रह सोडून देऊन घटस्फोटित किंवा विधवा मुलगी मान्य केली असती तर एव्हाना ते संसाराला लागले असते.

सर्वसाधारण भारतीय, महाराष्ट्रीय यांच्यात बाह्यरूपाचं महत्त्व बरंच आहे. त्यातही आधी म्हटल्याप्रमाणे 'मुलीचं रुप आणि मुलाचे पैसे' महत्त्वाचे, असंच चित्र दिसतं. साधारणपणी जोड्यांच्यात मुलगे मध्यम रूपाचे, मुली त्यांच्यापेक्षा रूपानी सरस असंच चित्र दिसतं. अगदी क्वचित 10,000 मधे 1 एवढ्या कमी प्रमाणात उलटं चित्र दिसतं. अशा प्रकारच्या काही जोड्या मला माहिती आहेत. सुरुवातीला अभ्यासाचा विषय म्हणून कुतूहलानी चौकशी केली. त्यानंतर जीवनसाथच्या गटामधे बोलताना त्यांनी उघडच सांगितलं की, त्या मुलीनी पुढाकार घेऊन मुलाला विचारलं होतं. शेजारी शेजारी दोघं बसलेले असल्यामुळे त्यापेक्षा जास्त त्यांना बोलता आलं नाही, पण नंतर केव्हातरी कळलं की, त्या मुली त्या मुलाच्या मागेच लागल्या होत्या. सरळसरळ जाळं टाकलं आणि मासा जाळ्यात अडकला.

मुलगी निवडताना चेहऱ्याच्या सौंदर्याचं महत्त्व मुलांच्या मनात कमी-जास्त असू शकतं. किती ते ज्यानी त्यानी ठरवावं आणि मुलगी निवडावी. पण प्रौढपणी मुलीची शरीरयष्टी कशी असेल, याचा तरुणपणी काहीच अंदाज येत नाही. त्यासाठी मुलीच्या आईवडलांची अंगकाठी बघून निर्णय घ्यावा. आनुवंशिकतेनी आईवडलांचे शरीरयष्टीचे गुण मुलीमधे येणार, ही गोष्ट बऱ्याच प्रमाणात धरून चालायला हरकत नाही. मुलाच्या शरीरयष्टीबद्दल याच पद्धतीनी मुलींनी अंदाज बांधायला हरकत नाही.

अशा सहलींना आलेल्या मुली कसा विचार करतात, हा मला पडलेला प्रश्न होता. छोट्या गावांमधे, पुणं-मुंबईखेरीज महाराष्ट्रभरातल्या मोठ्या शहरांत मुलींच्या विचारात बऱ्यापैकी फरक आढळतो. मुलाच्या श्रीमंतीविषयी तर्क चालू असतात. पोशाख, शिक्षण, वाहन, कामाचं ठिकाण, बरोबरीची मुलं याविषयी अंदाज बांधणं चालू असतं. वडील काय करतात, मालमत्ता किती, शेती किती, याची छोट्या गावांच्यात सबंध गावाला मुळात माहिती असतेच. शहरात सगळ्यांचाच पोशाख आधुनिक असतो. राहणीवरून काही पत्ता लागत नाही. त्यामुळे व्यवसाय, नोकरी याबद्दलची माहिती आवश्यक ठरते. वधू-वर सूचक मंडळांच्या जाहिराती बघितल्या की, 'क्रॉस सेक्शन'ची माहिती समजते. त्यात मुलांचा 'पगार' हाच महत्त्वाचा मुद्दा असतो.

अभ्यासमंडळात एका गोष्टीची नेहमी चर्चा चालते. लग्नाच्या वयात एखाद्या मुलाची श्रीमंती आवडली तर ती त्याची स्वतःची कमाई कशी असेल?

खरी परीक्षा त्या मुलाकडे श्रीमंत होण्यासाठी लागणारे गुण आहेत की नाहीत, ही नको का असायला? आईवडील काय शिकले, काय करतात, किती पैसे मिळवतात, यावरून आईवडिलांचा आर्थिक स्तर कळायला मदत होते खरी; पण लग्नाच्या मुलाची धमक कशी कळणार? 'मनी पर्सनॅलिटी' कशी कळणार? जिथं तो मुलगा काम करत असेल, तिथल्या त्याच्या सहकाऱ्यांशी बोलणं, हे मला खूप गरजेचं वाटतं. हे मी जवळजवळ प्रत्येक सहलीतल्या खेळांनंतरच्या चर्चेत सांगतो.

'जीवनसाथ अभ्यास मंडळ' आता गेली 18 वर्षं सातत्यानी काम करतंय. प्रत्येक महिन्यातल्या पहिल्या रविवारी माझ्याबरोबर एखाद्या विषयाबद्दल चर्चा, एखाद्या रविवारी फक्त मुलं-मुली भेटतात, एका रविवारी एखादं जोडपं बोलावून त्यांची मुलाखत असते. मधेच सहली, वर्कशॉप्स असतातच. इतर ठिकाणी अभ्यास मंडळं त्यामानानी छोटी आहेत. तिथे अजून एवढे कार्यक्रम नसतात, पण पुण्यातल्या या मंडळाबद्दल मात्र असं आपण खात्रीनी सांगू शकतो की, या मूळ रूढीमधे लक्षात येण्याजोगा बदल होतोय, ही फार चांगली गोष्ट आहे. सुंदरपणात जरा कमी असलेली, पण हुशार, गुणी, स्वतंत्र मुलगी इथे जास्त प्रमाणात आढळते आणि पसंतही केली जाते. आता श्रीमंत नसलेला, पण हुशार, कर्तबगार आणि सुस्वभावी नवरा पसंत करून लग्न करणाऱ्या मुलीही आढळतात.

जीवनसाथ विवाह अभ्यास मंडळामधे भेटलेला मुलगा आणि मुलगी किंवा दोघांपैकी कोणीतरी एकजण जीवनसाथ मंडळातला. अशा परिचयोत्तर विवाह या पद्धतीनी लग्न केलेली बरीच जोडपी आहेत. मूळ आक्षेप सौंदर्याला नाही किंवा पैसे मिळविण्याला नाही; विचारपद्धतीबद्दल आहे.

मंडळात अनेक प्रकारचे कार्यक्रम असतात. त्यात 'विधान चर्चा' असा एक प्रकार असतो. म्हणजे ज्या विधानामुळे विचार ढवळून काढणारी चर्चा होईल अशी विधानं सूत्रधारानी मुद्दाम समोर मांडायची. त्या विधानाच्या विरुद्ध किंवा बाजूनी बोललं तरी चालतं. कल्पना यावी म्हणून मुद्दामहून काही विधानं सांगतो. ऐकणारे/बोलणारे विवाहितसुद्धा असतात, अविवाहितही असतात. गप्प बसायला कोणालाही परवानगी नसते. ओळीनी बसायचं, ओळीनी बोलायचं आणि आपला स्वतःचा विचार मोकळेपणानी सांगायचा. नमुना म्हणून काही विधानं सांगतो.

1) एक माणूस दुसऱ्याला बदलू शकत नाही. स्वतःला पटेल तेव्हाच तो

स्वतःहून वागणुकीत बदल करतो. त्याचा वेगसुद्धा आपण नियंत्रित करू शकत नाही. (हे अविवाहितांना तसंच विवाहितांना उपयोगी पडण्यासाठी).

2) आपल्याला जे व्हावंसं वाटतं, त्यातलं खूप चांगलं किंवा खूप वाईट फार क्वचित घडतं. 'मध्यम'च आपल्या वाट्याला येतं (हे अविवाहितांसाठी – विशेषतः जोडीदार निवडण्याचा काळ.)

3) विवाहाचं बिघडलेलं यंत्र कुठल्याही अवस्थेत दुरुस्त करता येतं. दोघांनी मेहनत केली तर लवकर दुरुस्त होतं. एकट्याला फार वेळ लागतो. जेवढ्या लवकर दुरुस्तीला सुरुवात होईल तेवढं भलं! (हे खास विवाहितांसाठी).

'सुंदर मुलगी आणि पैसेवाला नवरा' हा विषय मुद्दाम इथं अर्धवट सोडला असं वाटावा, अशा पद्धतीनी सोडतोय. याबद्दल तुम्हा सगळ्यांच्या विचारांचं 'गिरमिट' तर चालू झालं! प्रश्न निर्माण करणं माझं काम; उत्तरं तुमची तुम्हीच शोधून काढाल! त्रिसूत्र तपासा म्हणजे सगळं कळेल.

पूर्वीचं त्रिसूत्र 'अन्न,वस्त्र,निवारा' होतं आणि त्या तीनही गोष्टी म्हणजे एकत्रितपणी चरितार्थाची सोय असं म्हणून आधुनिक त्रिसूत्री आपण कशाला म्हणतो आहोत ते स्पष्ट करूया. 'चरितार्थ, लैंगिक स्वास्थ्य आणि सन्मान' ही ती नवी त्रिसूत्री.

विवाह अभ्यास मंडळ चालू करण्यापूर्वीच्या काळातली एक गंमत सांगतो. लोक लग्नापूर्वी, लग्नानंतर काय काय बोलायचे. पण आम्ही त्या गोष्टींची नोंद तेव्हा ठेवली नव्हती. नंतर हा माझ्या अभ्यासाचा विषय बनल्यावर कोण काय म्हणालं होतं, हे आठवून बघितलं. 'किती छान जोडा दिसतोय' असं काही जोडप्यांबद्दल कोणीतरी बोलताना ऐकलंय. छान म्हणजे नवरा-बायको दोघंही देखणे, एवढ्याच अर्थानी लोक बोलायचे. बँकेत काम करणाऱ्या मुलीला बँकेतलाच मुलगा हवा असायचा. तेव्हा बँक-बँकच्या ऐवजी 'बँग-बँग' म्हणायचे. एखादा मुलगा मुलगी कशी पाहिजे, याला 'लांब केसांची' एवढंच उत्तर द्यायचा. एखाद्या मुलीला परदेशात, शक्यतोवर अमेरिकेत स्थायिक झालेला मुलगा याचं फार महत्त्व वाटायचं. कोणी मुलगा म्हणायचा, कॉम्प्युटर क्षेत्रातच काम करणारी मुलगी हवी. नवरा धिप्पाड हवा, असं म्हणणारी एक मुलगी होती.

एका मुलानी मुलीबद्दलची अपेक्षा सांगताना, 'तिला 100 रु.ची नोट

खर्चायला दिली, तर तिनी त्यातले पैसे परत नाही आणता कामा', असं 25 वर्षांपूर्वी उत्तर दिलं होतं. बहुधा त्या मुलाला म्हणायचं होतं की, गरीब घरची मुलगी नको. एक मुलगा म्हणाला, 'मुलीबद्दलची अपेक्षा सांगता येणार नाही, पण बघितल्याबरोबर ती मला आवडली पाहिजे.' काही मुली म्हणायच्या, चष्मेवाला नको. एकजण म्हणाला होता, 'मुलीला विनोदबुद्धी हवी. तिला छानपैकी हसता आलं पाहिजे.'

सहलीतल्या चर्चेत एकदा एक मुलगा म्हणाला होता, 'एखाद्या सुंदर, मादक मुलीशी लग्न आणि मग हनिमून इथपर्यंतचा मुलांचा प्लॅन रेडी असतो. पण पुढे सगळी गडबड गडबड असते. खरं म्हणजे लग्न ह्या विषयाच्या अभ्यासाची सुरुवात शाळेत आणि महाविद्यालयातच व्हायला हवी.'

हा एक प्रश्नच आहे. सुंदर मुली सामान्य रूपाचे नवरे मान्य करताना दिसतात. त्यातल्या काही प्रेमासाठी असं करतात. काही चक्क पैशासाठी आणि काही अविवेकामुळे. एका सुंदर मुलीनी ठरवलं होतं की, जो पहिला मुलगा तिला पसंत करेल त्याला हो म्हणायचं. तसं तिनी सामान्य मुलाशी लग्न केलं, आयुष्यभर भांडली आणि 'जिंदगीचा राडा' करून टाकला. असं काही न करता समाधानानी आयुष्य जगणाऱ्याही बायका असतात. उलट उदाहरणंही आढळतातच. सामान्य रूपाच्या मुलीशी देखणा मुलगा लग्न करतो. लोकं बघतात, बोलत राहतात. कारण लोकांना फक्त बाह्यरूपच कळतं.

अभ्यासाला लागल्यावर लक्षात आलं, ही सगळी मुलं-मुली बाह्यगुणाविषयी अपेक्षा व्यक्त करत होती. बाह्यगुण हे खोकं आहे, त्याच्या आता काय, यावरून वैवाहिक आयुष्य कसं जाणार, हे ठरतं नि इकडे बघावं तर अंतर्गुणाविषयी कोणीच काही विचार करायला तयार नव्हतं. ती मुलं बाह्यगुणांविषयी काय म्हणाली होती, त्याची यादी केली आणि त्या यादीबरोबर त्यांनी काय तपासायला पाहिजे होतं, याची यादी केली. ती अशी–

**बाह्यगुण :** रंग, उंची, शरीरयष्टी, केस, डोळे चष्मा, आवाज, पोषाख स्वभावाचं बाह्यरूप – बोलका/अबोल शाकाहारी/मांसाहारी शिक्षण/व्यवसाय/धंदा पगार/मालमत्ता धर्म/जात.

**अंतर्गुण :** हुशार, आस्तिक/नास्तिक, धर्माचं वेड, कर्मकांडांचा आग्रह, सण, व्रतवैकल्यं, पत्रिकेवर विश्वास, राजकारणात रस, लोकशाहीची समज, शुभ-अशुभ कल्पना, स्वयंपूर्णता, न्यायबुद्धी, समानता, आरोग्य, करमणुकीचं

महत्त्व, स्त्री-पुरुष मैत्रीबद्दल विचार, मुलांच्या वाढीबद्दलचे विचार (पालकत्व), निवृत्तीबद्दलच्या कल्पना, घरातल्या ज्येष्ठांशी, शेजाऱ्यांशी, कष्टकऱ्यांशी वागणूक

आमच्या विवाह अभ्यास मंडळातही मुली खूप गंभीरपणी या विषयांचा अभ्यास करताना, विचार मांडताना दिसायच्या. त्यांना चिंताही कळत होत्या. मुलग्यांना मात्र आपल्याला मनासारखी मुलगी मिळणारच, ही खात्री असल्यासारखं बोलणं असायचं. दोन-चार मुलं गंभीरपणी विचार करणारी होतीही, पण ते प्रमाण काळजी वाटण्याजोगं कमी होतं. अजूनही तसंच आहे.

जणू काही लग्नाची जरूरच नाही. 'आपण पुरुष' या कल्पनेनी ते वधूवर सूचक संस्थेत नोंदणी करत नाहीत, ही गंभीर सामाजिक विकृती आणि अडचण आम्हाला जाणवली.

सहली, अभ्यास मंडळं सगळं चालू ठेवून काय होतंय बघूया.

आणि वधू-वर सूचक मंडळ जीवनसाथमधे नसल्यामुळे अनेक मुला-मुलींचा गटचर्चेला येण्यातला रस संपतो, तेही मान्य करूया!

●●●

# 8

# जोडीदाराची निवड

## 1) दुनिया जिसे कहते है वो जादू का खिलौना है - सध्याचा प्रश्न.

जगजीत सिंग आणि चित्रा सिंग यांची ही गझल मला फार अर्थपूर्ण वाटते.

*दुनिया जिसे कहते है वो जादूका खिलौना है*
*मिल जाये तो मिट्टी है, खो जाए तो सोना है*

लग्न या प्रश्नाचं तसंच आहे. लग्न करावं तरी पंचाइत न करावं तरी अडचण.

''नवरा-बायकोला एकमेकांचे स्वभाव आधी कळले तर सगळा 'सरप्राइझ' निघूनच जातो की हो. मग काय गंमत!'' असा वाद ते गृहस्थ माझ्याशी घालत होते. मला वाटलं, ते चेष्टा करतायत. मी म्हणालो, ''मग आधी बघणं, पत्रिका, भेटणं हे तरी कशाला? लॉटरीसारखं फासे टाकून किंवा तिकिटं छापून त्यामधे सारखा नंबर आलेल्या स्त्री-पुरुषांनी लग्न करावं, म्हणजे सरप्राइझच सरप्राइझ! वाट्टेल ती जात, धर्म, वय, भाषा, संस्कार, स्वभाव असो, सरप्राइझ नक्की. कारण आपल्याशी बऱ्यापैकी जुळणारी व्यक्ती सापडली तरी खरा सरप्राइझच!'' नंतर मला कळलं, तो माणूस हे सगळं 'सीरियसली' म्हणत होता. आम्ही तर थेट 'मुलगा-मुलगी यांच्या डोक्यातले विचारसुद्धा आधी कळतील तेवढं बरं' याच्या मागे लागलो होतो. त्यामुळे मी फारच चरकलो.

मी मुळातला 'मॅनेजमेंट', 'लेबर सायकॉलॉजी', 'कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी' अशा विषयातला. प्लॅनिंगवर जबरदस्त विश्वास. प्लॅनिंगचा अर्थच 'जे जे घडू

शकेल त्याचा आधी विचार' असा आहे. तात्पुरतं तरी मी विवाह अभ्यास मंडळात सांगून टाकलं – 'विचार करण्याचा विचार' ज्यांना पटत नाही, त्यांच्यासाठी 'विवाह अभ्यास मंडळ' नाही.

'जोडीदाराची निवड' असाच एका बाहेरगावच्या कार्यशाळेचा विषय होता. गेल्यागेल्या कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच मी सांगितलं की, माझ्याकडे एका देखण्या, सुशिक्षित, श्रीमंत, एकुलत्या एका मुलाचं स्थळ आहे. मुलींच्या आणि मुलींच्या आईवडलांच्या डोळ्यांत मला चमक दिसली. पुढे मी म्हटलं. 'तो मुलगा आत्ता इथे नाहीय, पण त्यानी निर्णयाचे सगळे अधिकार माझ्यावर सोपवलेयत. मी मुलगी निवडून तसा करार करूनच इथून निघणार आहे. मी त्या करारासाठी 100 रु. चा स्टॅम्पपेपर सुद्धा आणलाय.' असं म्हणून मी खरोखर स्टॅम्पपेपर दाखवला. 'स्टॅम्पपेपरवर त्या मुलानी खाली सही देखील केली आहे. ज्या मुलीला या मुलाबरोबर लग्न करण्याची इच्छा असेल तिनी फक्त इथे खाली सही करायची. स्टॅम्पपेपरवरचा सगळा मजकूर मी नंतर भरून घेईन.' हे ऐकल्यावर एकदम स्तब्धता पसरली. थोड्या वेळानी मुली एकेक एकेक बोलायला लागल्या. स्वभाव कळल्याशिवाय कसं ठरवणार, वगैरे प्रश्नांना सुरुवात झाली. आणि अर्थात, त्यानंतरचा सगळा कार्यक्रम विवाह अभ्यास कशासाठी – योग्य जोडीदाराच्या निवडीसाठी, या विषयावर रंगला.

दुसरा एक किस्सा सांगतो. एका छोट्या शहरातली कार्यशाळा होती. तिथल्या मुली जे सांगत होत्या ती गोष्ट अगदी सुरुवातीला मला नीट कळत नव्हती. मी विवाह अभ्यासाविषयी बोलत होतो. मुली 'आमच्याकडे हे जमणार नाही' एवढंच पुनःपुन्हा निरनिराळ्या पद्धतीनी सांगत होत्या. काही प्रश्नोत्तरांनंतर कळलं ते असं की, मुलीला अमुक मुलाबद्दल काय वाटतंय, हे कोणी विचारतच नाही. तिनी मुलाला काही प्रश्नही विचारायचे नसतात. मुलांनी म्हणजे मुलाच्या घरच्यांनी मुलीला पसंत केलं की, मुलींना नकार देण्याची सोयच नसते. ते लग्न ठरतंच. तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण पुणं-मुंबई सोडलं की महाराष्ट्रातल्या इतर सगळ्या शहरांच्यातली परिस्थिती थेट अशीच आहे.

जोडीदार निवडीच्या काळात मुला-मुलींचं एकमेकांना नकार देणं, ही गोष्ट नेहमीच चालू असते. त्या मिळालेल्या नकाराबद्दलची निरीक्षणं असा निष्कर्ष सांगतात की, नकाराला मुलींपेक्षा मुलगे जास्त घाबरतात. पुरुषाच्या प्रतिमेचं सामाजिक चित्र असं चमत्कारिक आहे. मुलगा शरीरानी मुलीपेक्षा जास्त

ताकदवान, पण मनानी कमजोर असतो.

मला कोणालाही इथे दोष द्यायचा नाही. विवाह या गोष्टीबद्दल 'अभ्यास' म्हणण्याजोगा विचार करणं, हा विचार खरंच नवीन आहे. मी 'विवाह-अभ्यास' या कल्पनेचा जन्मदाता आहे. भारताची, महाराष्ट्राची लोकसंख्या प्रचंड आहे. लाखो मुलगे आणि लाखो मुली एकमेकांना शोधत हवालदिल होऊन दिवस काढतायत. जोडीदार शोधणं ही गोष्ट जास्त जास्त कठीण होतेय. मला वाटतं, 'लग्न करायचं' असा निर्णय घेण्यापूर्वी स्वतः स्वतःला कळण्याची जरूर आहे. त्यासाठी अभ्यासाची गरज आहे. ही गोष्ट प्रत्येक कुटुंबाला कळायला हवी आहे म्हणजेच सबंध समाजाला कळायला हवी आहे.

माझे एक जवळचे मित्र आहेत. अनेक वर्षांपासून त्यांना 'विवाह अभ्यास मंडळ म्हणजे वधू-वर सूचक संस्था नाही' हे मी स्वतः अनेकवेळा बोलताना सांगितलं आहे. हे गृहस्थ खूप बुद्धिमान, श्रीमंत आणि सुसंस्कृत कुटुंबातले आहेत. ते जेव्हा मधे भेटले तेव्हा त्यांच्या मुलासाठी स्थळ शोधा म्हणत होते. मला त्यांनी हे म्हणावं याचं आश्चर्य वाटलं. एक गोष्ट लक्षात आली. 'अभ्यास' हा शब्द विवाह या शब्दाशी लोक जोडायलाच तयार नाहीत. या गंभीर प्रश्नाचं मला काहीतरी उत्तर शोधावंच लागणार आहे.

लग्न म्हटलं की, बहुतेकांच्या मनात प्रथम विचार येतो तो लग्नसमारंभाचा. जेवणं, दागिने, खर्च, मानापमान, मधुचंद्र असे तऱ्हतऱ्हेचे गोड विचार पाठोपाठ होतात. पण खरा महत्त्वाचा विचार आहे संपूर्ण स्वस्थ वैवाहिक स्वास्थ्याचा. तो राहूनच जातो. मग पुढचे परिणाम आपण बघतोच.

''बाकी सगळं पाहून लग्न केलं, पण मुलाला सोळा लाखाचं कर्ज आहे, हे आम्हाला त्यांनी सांगितलंच नव्हतं.''

''सगळी माहिती काढली होती, पण मुलगा नोकरी करतच नाही, घरीच असतो, हे नव्हतं कळलं.''

''लग्नाआधी काही बोलली नाही, पण मुलीची एकत्र कुटुंबात रहायची अगदीच तयारी नाही.''

''मुलगा रागीट आहे असं ऐकलं होतं, पण बायकोला सरळ पायातला बूट काढून मारेल, ह्याची कल्पना नव्हती.''

“मुलीच्या पाठीवर पांढरे डाग आहेत, हे आधी कसं कळणार?”

“आमच्या सुनेला खोटं अजिबात चालत नाही, हे तिच्या आईनी सांगितलं होतं, पण त्यावरून ती घरातल्या सगळ्यांना फैलावर घेते, हे अजबच आहे.”

अशी अनेक विधानं आपण ऐकत असतो. लग्न जुळवताना नुसतं एकमेकांना पाहिलं, देणं-घेणं ठरवलं आणि झालं लग्न, असं होऊ नये अशी सगळ्या सुशिक्षित मुला-मुलींची कल्पना असते. ते एकमेकांशी काही काळ बोलतही असतात. पण ह्या परिचयाच्या काळात आपल्याला काय समजून घ्यायचं असतं, ते लक्षात येत नाही.

अगदी साधी शिक्षणाची गोष्ट घ्या. किती शिक्षण झालं आहे? असा प्रश्न विचारला आणि उत्तर म्हणून बी.ए. किंवा बी.ई. असं कळलं तरी त्यात अनेक तपशील विचारात घ्यायला लागतात. विषय कुठला, कुठल्या वर्षी पदवी मिळाली, कोणत्या विद्यापीठातून? प्रत्यक्ष वर्गात शिक्षण घेऊन की बाहेरून परीक्षा देऊन? ज्या विषयात पदवी घेतली त्याची विशेष आवड आहे का? अशा अनेक गोष्टी सहज बोलता बोलता समजून घेता येतात. त्यातून जसा शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन कळतो तसं व्यक्तिमत्त्वही कळतं. कुणाला पुढेही सतत शिकायची इच्छा असते. कुणी म्हणतं, ‘आता पुरे झालं शिक्षण!’ यावरूनही माणूस कळतं. कधी शिक्षणातला खंड महत्त्वाची माहिती देतो.

तसंच एकमेकांच्या कामाचं स्वरूप जरूर समजून घ्यावं. नोकरी की व्यवसाय की धंदा, हे विचारावं. नोकरीचं ठिकाण, मासिक प्राप्ती, हिंडण्याचं काम असतं का बैठं असतं, एकूण कामाकडे पाहण्याची दृष्टी काय, हेही समजून घ्यावं. ते काम ती व्यक्ती नुसतं पाट्या टाकल्यासारखं करते का मनापासून करते, नुसतं पैशासाठी करते का आवडीनी करते, तो टाइमपास आहे का, काम बोअर वाटतं का, त्या कामामागे काही ध्येय, प्रेरणा आहे का, अशा अनेक गोष्टी समजून घेणं महत्त्वाचं आहे. कारण त्यावर आपल्या भावी संसाराचा सांस्कृतिक दर्जा ठरणार असतो. संवाद-विसंवाद ठरणार असतो. केवळ पैशासाठी काम करणाऱ्या व्यक्तीला कामावर प्रेम करणारा जोडीदार समजून घेणं कठीण जातं.

एक निराळाच प्रश्न आजकाल वारंवार समोर यायला लागलाय. माणसा-माणसात कमी-जास्त, डावं-उजवं असतं एवढं आपल्याला समजतं, पण शरीर,

बुद्धीनी 'नॉर्मल' आणि धडधाकट असणाऱ्या प्रत्येक माणसाला स्वतःच्या जीवाची काळजी असतेच. स्वतःचा जीव जगवण्यासाठीच्या प्राथमिक गरजा – अन्न, वस्त्र, निवारा या आपल्याला स्वतःलाच भागवाव्या लागतील, ही समज असते. लग्न करून बायको, मुलं यांच्या पोषणाची जबाबदारी नको असं ठरवून अविवाहित राहणारे अनेक पुरुष आपल्या माहितीत असतात, पण ते स्वतःपुरते पैसे मिळवतात. लग्न करून बायकोच्या जिवावर जगायचं असे नाकर्ते पुरुष पूर्वी पूर्वी अगदी कमी दिसायचे. आता असे पुरुष संख्येनी बरेच दिसायला लागलेयत. तपशीलात फरक असतो, पण मुळातलं वर्णन तेच. नवरा काय करतो बघावं, तर काही नाही. बायको धडपड करून मुलं, स्वतः आणि नवरा यांचा चरितार्थ कसाबसा चालवते. अशा नवऱ्यांची संख्या फार झाली आहे.

याचाच अर्थ, जोडीदाराची निवड करताना जे घोटाळे होऊ नयेत म्हणून काळजी घ्यायची त्यात एका घोटाळ्याच्या शक्यतेची वाढ झाली. आईवडलांनी ठरवलेल्या लग्नात हा धोका जास्त संभवतो. स्वतःच्या नाकर्त्या मुलाचं 'काही करत नाही' असं खरं वर्णन मुलाचे आईवडील करणं शक्यच नाही. 'रिअल इस्टेट एजंट', 'शेअर ब्रोकर', 'जुन्या गाड्यांचा डीलर' अशा अनेक प्रकारच्या वर्णनांनी मुलाचे आईवडील मुलीच्या आईवडलांना, म्हणजेच शेवटी मुलीला फसवतात. मुलगा आणि मुलगी एकमेकांशी पैशाच्या विचारसरणीविषयी बोलले तर अशी फसगत शक्य नाही.

जीवनसाथमधे येणाऱ्या तीन तरुण अविवाहित मुलींची उदाहरणं सांगतो. एक मुलगी दिसायला चांगली, सुशिक्षित, चांगल्या घरची. थोडक्यात 'मुलीचं चांगलं स्थळ' या व्याख्येत बसणारी असून तिला अनेक मुलांकडून नकार आला होता. केवळ एका कारणामुळे हे होतंय असं तिला नि घरच्यांना कळत होतं. तिच्या काही वर्गमित्रांबरोबर तिनी एका धंद्यामधे भागीदारी केली होती आणि त्या पूर्ण वेळच्या धंद्यातल्या भागीदारीमधे ती एकच मुलगी होती. अर्थात, आठवड्यातले 6 दिवस पुरुषांच्या सहवासात असलेली एकटी मुलगी स्थळ म्हणून मुलांना पसंत पडत नसे.

दुसरी मुलगी स्वतःचा फ्री-लान्सर व्यवसाय अधिक अर्धवेळ नोकरी करणारी होती. बोलतानाच तिच्या स्वतंत्र, कर्तृत्ववान, मुक्त स्त्री स्वातंत्र्याच्या कल्पनांनाच मुलं घाबरायची. खरं म्हणजे ही मुलगी सुस्वरूप होती, दुसऱ्याची कदर करणारी, मनमिळाऊ, हसतमुख. थोडक्यात, 'चांगलं मुलीचं स्थळं' या

वर्णनातली होती. पण लग्न जुळण्यात ही मुख्य अडचण स्पष्ट कळत होती. पुन्हा सध्या तात्पुरते विचार लपवून नंतर फणा काढण्याची लबाडी तिला पटतही नव्हती आणि तिला ते जमलंही नसतं.

जीवनसाथमधल्या एका मुलीची निराळीच कहाणी होती. तिचं एका मुलाबरोबर लग्न ठरलेलं होतं ते मोडलं. ती स्वतःच्या स्थळातली ती मोठी उणीव मानायला लागली. त्यामुळे ती घटस्फोटित मुलांची स्थळं बघायला लागली होती.

जीवनसाथमधल्या दोन मुलांची उदाहरणं सांगतो. एका अगदी जेमतेम कर्तृत्वाच्या, जेमतेम पैसे मिळवणाऱ्या मुलानी जीवनसाथमधे येणाऱ्या अतिसुंदर, घटस्फोटित मुलीला एकदा गटचर्चेच्या वेळेला बघितलं. ती मुलगी खरोखरच सुंदर होती आणि तिची बाकीची पार्श्वभूमी मला माहिती होती. ती श्रीमंतीत वाढलेली होती आणि या मुलाला तिनी दोन मिनिटंही समोर उभं केलं नसतं. मी स्थळं जुळवण्याचं काम करत नाही, हे माहिती असल्यामुळे तो मला तसं स्पष्ट बोलत नव्हता. पण ती पुन्हा केव्हा येणार आहे ते मी त्याला सांगावं अशी त्याची इच्छा होती.

दुसऱ्या एका जेमतेम शिकलेल्या मुलाचं एका उच्चशिक्षित मुलीवर मन बसलं होतं. मी तिला पटवावं असं तो सुचवत होता. अर्थात, यातली कुठलीच गोष्ट मी करणं शक्य नव्हतं.

लग्न ठरताना सर्वांत महत्त्वाची गोष्ट पुढे येते लग्नातला खर्च! खर्च किती करणार, कोण करणार, कशावर करणार? दोघांनी समान खर्च करावा, ही खरं तर सभ्यता आहे, पण 'मुलीकडच्यांनी लग्न करून द्यायचं' ही रूढी दोघांच्या प्रतिष्ठेची अजून मानली जाते! आपण बदलल्याशिवाय या व्यवहारातली विरूपता नाहीशी होणार नाही आणि ते प्रत्यक्षात आणायला 'आपलं स्वतःचं लग्न' याहून दुसरी सुसंधी कशी मिळणार?

## लोकांना पडलेले काही प्रश्न असे.

● सर्वांत महत्त्वाचा प्रश्न –

जोडीदार कसा शोधायचा? बाहेरचं जग इतक्या झपाट्यानी बदललंय की, पालकांना हा निर्णय नीट घेता येईल याबद्दल खरा भरवसा वाटत नाही. मुख्य म्हणजे पालकांचं सामान्य ज्ञान कमी पडतं. हे बोललेलं त्यांना आवडत नाही.

स्वतःही जोडीदाराच्या निवडीबाबत निर्णय घेणं नको वाटतं नि पालकांवर निर्णय सोपवायचाही धीर होत नाही अशी परिस्थिती होते.

● दुसरा प्रश्न –

जवळजवळ सगळी अनुभवी विवाहित मंडळी समाधानी सहजीवनाला पैशापेक्षा जास्त महत्त्व देतात. तरुण मात्र पैसे जास्त महत्त्वाचे मानतात. प्रश्न असा की, आधीच्या पिढीला म्हणजे मुलाच्या किंवा मुलीच्या आईवडलांना स्वस्थ सहजीवनाचं एवढं महत्त्व कळलेलं आहे तर ते आपल्या स्वतःच्या मुला-मुलींना ही महत्त्वाची गोष्ट का सांगत नाहीत? त्यांना पैशाचा लोभ, खर्चिक लग्नसमारंभ, हुंडा, त्यासाठी डावपेच या वाटेनी का जाऊ देतात? कामाच्या समाधानासाठी, कामावरच्या प्रेमासाठी करिअर प्लॅनिंग करावं, मेहनत करावी. पैसे नक्की मिळतात. चरितार्थासाठी प्रत्येकानी पैसे मिळवायलाच पाहिजेत, पण ते दुसऱ्याला न फसवता, हे का सांगत नाहीत? जरुरीपेक्षा जास्त पैसे मनस्वास्थ्य घालवतात, हे का बिंबवत नाहीत?

● तिसरा महत्त्वाचा प्रश्न –

एकमेकांच्या स्वभावाची जुळवणी म्हणजे सहजीवन. येणारे प्रश्न दोघांनी सारखी जबाबदारी घेऊन सोडवणं हे सहजीवनाचं मुख्य मर्म आहे. एकानी कोणीतरी जबाबदारी टाळली तर दुसरा काहीतरी करून मार्ग काढतोच, पण मग त्यातली गंमत जाते. एकमेकांनी एकमेकांसाठी करण्याची गंमत आधीच्या पिढीला समजली आहे, तर ते नव्या पिढीला तसं का सांगत नाहीत?

● चौथा अतिमहत्त्वाचा प्रश्न –

सहजीवन या विषयाबरोबर कामजीवन हा विषय येतोच. उत्सुकता, संकोच, आकर्षण आणि भीती या सगळ्या नैसर्गिक भावना आहेत. पण लग्नाचं सरासरी वय वाढतयं आणि सिनेमे, टी.व्ही. या सगळ्या भावना अतिशयोक्त स्वरूपात विकृतपणी भडकवतायत. या अवस्थेत तरुण पिढीनी काय करायचं? या बाबतीत मात्र आधीच्या पिढीला काही विचारता येत नाही. कारण त्यांनाच स्वतःला लैंगिक शिक्षण हा विषय पटण्याचा प्रश्न आहे.

'लग्न ठरलं' असं जेव्हा मुलगी कोणाला तरी सांगते तेव्हा मुली तर हमखास लाजताना दिसतात. अनुभवी विवाहिताला नक्की माहिती असतं की, लग्न ठरलं याचे सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही अर्थ होतात. माहेरी

अडचणी असल्या, तर 'सुटका झाली' असा अर्थ असू शकतो. सासरच्या अडचणींची आधीच कल्पना असली तर 'वनवासाला सुरुवात' असा अर्थ असतो. मध्यमवर्गीय कुटुंबात यापैकी कसलीच अडचणीची परिस्थिती नसते तेव्हा त्याचा अर्थ 'लवकरच पहिला लैंगिक संबंध आणि त्यातलं स्वर्गसुख मिळणार' असा अर्थ असतो. अनुभवी माणसाला ते विंचवाच्या बिळात बोट आहे हे माहिती असूनही तो गप्प बसतो. लैंगिक संबंधांबद्दल अज्ञान, हा मला तरी समाजातला खूप गंभीर प्रश्न वाटतो. खरं उत्तर लग्नापूर्वी दोघांची वैद्यकीय तपासणी हे एकच आहे.

मी मधे काही वर्षं आखाती देशात काम करत होतो. तिथे विशिष्ट प्राप्ती असल्याशिवाय 'फॅमिली व्हिसा' मिळायचा नाही. मी बराच 'सीनिअर' होतो, पण मित्रमंडळी बऱ्यापैकी तरुण होती. त्यांना 'फॅमिली व्हिसा' नसायचा. शुक्रवारी सुटीची पद्धत असल्यामुळे दर गुरुवारी संध्याकाळपासून पत्ते, दारू, खाण्याचे खास पदार्थ याचे अड्डे जमायचे. साधारण 7-8 लोकांच्यात दारू न पिणारा मी एकटाच असायचो. इतरांच्या अर्वाच्च गप्पांमधून एक गोष्ट दिसत होती की, बायको भारतात हीच मुख्य अडचण असायची. शोभा तिथे येऊन-जाऊन असायची, हे माहिती असल्यामुळे ते सुरुवातीला जरा बिचकायचे. पण नंतर कबूल करायचे की, त्यांची मनःस्थिती अशी असायची की कुठचीही बाई चालेल, पण बाई हवी. नेहमी भेटणाऱ्यांपैकी एखादा गुरुवारी रात्री हजर नसला की समजायचं की बाईकडे गेला.

हे एवढं स्पष्ट सांगण्यामागे माझा उद्देश एवढाच आहे की, आखाती देशात काम करणाऱ्या मुलाचं स्थळ आलं तर 'फॅमिली व्हिसा' असल्याची खात्री करून घेता यावी.

● पाचवा प्रश्न –

लग्नानंतर दोन कुटुंबांचाही संबंध येतो. आपलं ते बरोबर असं दोन्ही कुटुंबांना वाटत राहणं शक्य आहे. बायकोनी स्वत्व पूर्ण सोडून नवऱ्याच्या कुटुंबामधे सामावून जाणंही जमेल आणि दोघांनी स्वतःचं निराळं विश्व निर्माण करणंही शक्य आहे. यापैकी आपलं काय ह्याची उत्तरं केव्हा शोधायची? त्याच काळात लहान मुलं, सासर-माहेरचे ताण या सगळ्याचं व्यवस्थापन कसं करायचं? याचं उत्तर सोपं नाही.

● याखेरीज महत्त्वाचा सहावा प्रश्न म्हणजे – हे प्रश्न आहेत याचीच जाणीव

नसणं. लग्न ठरलं म्हणजे सगळे प्रश्न संपल्यासारखा आनंद एखाद्याच्या चेहऱ्यावर बघितला की वाटतं, पुढे काय, याची बिचाऱ्याला कल्पना नाही. आपल्याला तर पक्कं माहीत आहे की, लग्न म्हणजे सगळं छान छान असू शकत नाही. 'कभी खुशी कभी गम' हेच खरं. पण मग त्यातल्या 'गम'ची तयारी नको करायला? अडचणीखाली एखादी व्यक्ती चिरडली म्हणजे? थोडक्यात, अज्ञानात सुख मानणारे लोक आहेत, हाच खरा प्रश्न आहे.

●

## 2) स्वस्थ वैवाहिक आयुष्याचं ध्येय

स्वस्थ आयुष्यासाठी स्वस्थ वैवाहिक आयुष्याची गरज असते. शरीराला काही होत असलं तर जसं कशाकडेच लक्ष लागत नाही तसा विवाह 'दुखरा' असला तर पूर्ण आयुष्यच अस्वस्थ होतं. जोडीदाराची निवड नीट केलेली पाहिजे आणि लग्नानंतर कसं वागायला पाहिजे, ते शिकायला हवं. हे दोन्ही जमलं तरच लग्न म्हणजे सुख असतं, नाहीतर तो 'सश्रम कारावास' होतो. वैवाहिक आयुष्यात काही रस उरत नाही. अशा नीरस संसारांचं प्रमाण फार आहे. एखाद्याला लग्न करायचं नसलं तरी हरकत नाही. पण हा निर्णय अभ्यासपूर्वक घेतलेला पाहिजे. एक मुख्य गोष्ट माहिती पाहिजे की, फार थोडे अविवाहित लोक 'नॉर्मल' असतात. लग्न हा आत्म-विकासाचा सर्वांत लोकप्रिय आणि सोपा मार्ग आहे.

हजारो वर्षांच्या मानवाच्या इतिहासात 'विवाह' हा मानवानी लावलेला एक सामाजिक शोध आहे. स्त्री आणि पुरुष ही 2 लिंगं आहेत आणि नैसर्गिकपणी त्यांना एकमेकांविषयी आकर्षण वाटतं. मुलं जन्माला घालून वंश चालू ठेवणं, हाही आवश्यक निसर्गधर्म आहे. याशिवाय शेती, मालमत्ता, मुलांचं संगोपन अशातून स्त्री-पुरुष जोडीचं लग्नबंधन ही कल्पना जन्माला आली. या विचारप्रवासात इतरही बरेच प्रयोग झाले. पण त्यातल्या त्यात जे 'सामाजिक यंत्र' टिकलं ते म्हणजे विवाह.

प्रत्येक स्त्रीला पुरुषाच्या प्रेमाची इच्छा आणि गरज असते नि प्रत्येक पुरुषाला कुठच्यातरी स्त्रीच्या प्रेमात असण्याची इच्छा आणि गरज असते. खरं म्हणजे प्रेमात पडण्याचा आणि असण्याचा काळ प्रत्यक्ष लग्न झाल्यानंतरच्या काळापेक्षा जास्त आनंदाचा असतो. त्या व्यक्तीमधे बदल झाला तरी चालतो, पण प्रेमाची झिंग असण्यात खूप मजा असते. विवाह अभ्यासाच्या मदतीनी तीच मजा लग्नानंतरच्या संसारातही येऊ शकते असा जीवनसाथ संस्थेचा आणि माझा दावा आहे.

सहजीवन म्हणजे एकमेकांशी वागण्याची कला. स्वतःचं नि जोडीदाराचं निराळं व्यक्तिमत्त्व समजणं. 'परफेक्ट मॅच' नावाची गोष्टच नसते. आपण

स्वतःचा स्वभाव जर बदलू शकत नाही, तर आपल्याला दुसऱ्याचा स्वभाव कसा बदलता येईल? दोघांनी मिळून स्वभावाच्या पैलूंचा समन्वय साधल्याशिवाय सुखाचा संसार होऊच शकणार नाही. संसाराची गाडी दोघांनी मिळूनच चालवावी लागणार. नुसतं 'पॅसेंजर' म्हणून त्या गाडीत बसलं की एकावर फार भार पडणार. त्यासाठी दोघांनाही एकमेकांच्या सुख-दुःखाची मनापासून कदर पाहिजे आणि ती व्यक्त करण्याचं तंत्र आणि कसब आत्मसात करायला हवं.

खऱ्या निरपेक्ष प्रेमाची शक्यता आयुष्यात फार पुढच्या टप्प्यात निर्माण होते. बराच विचार, सारासार बुद्धी वापरून नवरा-बायकोनी एकमेकांसाठी केलेल्या अनेक गोष्टींनंतर काही वर्षांनी त्या प्रेमाची सुरुवात होते. ही विधानं ऐकून किती वाईट वाटलं तरी, हे कितीही नकारात्मक वाटलं तरी ते अंतिम सत्य आहे. फार कमी जोडप्यांच्या वाट्याला असं उच्च प्रतीचं प्रेम येतं, हेही जगन्मान्य सत्य आहे आणि आपण ते मान्य करूया. आपली पहिली पायरी तणावरहित वैवाहिक आयुष्य गाठण्याची आहे. ती ओलांडली तर समृध्द, समाधानी वैवाहिक आयुष्य पुढच्या टप्प्यात शक्य आहे. समृद्धीचा अर्थ पैशांची श्रीमंती असा इथे अजिबात नाही. चरितार्थाची काळजी नाही अशी अवस्था, नवरा-बायको आणि त्यांची सासरं-माहेरं, मुलं यांच्या आपुलकीची समृद्धी इथे अभिप्रेत आहे.

अशा समृद्धीची परीक्षा होण्यासाठी कुटुंबासमोर अनेक प्रश्न उभे राहावे लागतात. संकटं यावी लागतात. त्याला उत्तरं शोधताना माणसं कळत जातात. असे चांगले-वाईट प्रसंग पुरेशा प्रमाणात घडायला बरीच वर्षं जावी लागतात. या परीक्षेसाठी चांगल्यापेक्षा वाईट प्रसंग महत्त्वाचे ठरतात. अशा प्रसंगांच्यात व्यक्ती नापास झाली की दुरावा निर्माण होतो. पास झाली तर जवळीक वाढते. दुरावा आणि जवळीक याचा 'स्कोअर' सतत मनात मांडला जातो. अशा अनेक वर्षांनंतर त्या जोडप्याची एक स्वतंत्र संस्कृती बनते. नीतीची, कुटुंबकारणाची, अर्थकारणाची, समाजकारणाची एक बैठक बनते. अशा परिपक्व जोडप्यांच्यातलं एकमेकांच्यातलं नातं, समजूत, प्रेम, मतभेद हे सगळं कौतुकानी पहाण्याजोगं, शिकण्याजोगं असतं. हे फार कमी प्रमाणात आढळतं, ही मुख्य अडचण आहे.

●

## 3) निवडीसाठी किती काळ योग्य?

प्रश्नावली पद्धतीनी मुलाचं आणि मुलीचं संभाषण सुरू झालं, प्रत्यक्ष गाठ पडून आणखी बोलायचं ठरलं की त्यानंतर किती काळ या प्रश्नावली प्रक्रियेला लागतो, असा प्रश्न लोक हमखास विचारतात. मला वाटतं, यासाठी 6 महिने लागतात. एवढे 6 महिने का लागतात, हे मी पुढे सविस्तर सांगणारच आहे. एवढा काळ न लागल्याचीही उदाहरणं आहेत. नीट लक्षपूर्वक अभ्यासपूर्ण निवडप्रक्रिया नाही केली, तर 6 महिने अपुरेही वाटू शकतात.

जीवनसाथमधे नियमित येणाऱ्या एका मुला-मुलीनी एकमेकांशी लग्न करायचं ठरवलं. मला ते सांगण्याची त्यांची इच्छा होती, पण मी एकमेकांशी काय काय बोललात, किती काळ बोललात, याविषयी चौकशी करीन, हे त्यांना माहिती होतं. मला त्यांनी खोटं सांगायचं ठरवलं. गेले सहा महिने एकमेकांशी चर्चा झाल्या असं म्हणाले. प्रत्यक्षात मुलाचे वडील मला खाजगीत भेटले होते आणि त्यांनी मला सांगितलं होतं की, गेल्या पंधरा दिवसांतला हा निर्णय होता. मी काहीच बोललो नाही. त्यांचं लग्नानंतरचं आयुष्य समाधानानी जावं, याखेरीज मला काय हवं असणार? या प्रसंगाला काही वर्षं झाली. त्यांचं चांगलं चालू आहे.

●

## 4) लेखी प्रश्नावलीच्या देवघेवीची कल्पना

मी मागे सांगितलं की, वधू-वर सूचक मंडळ या कल्पनेतून बाहेर पडून मेळावे, मग सहल-मेळावे, त्यानंतर सहल-खेळ-अभ्यास असं करत जीवनसाथची गाडी 'विवाहाचा गंभीरपणी अभ्यास, इथे स्थिर झाली. 'विवाह अभ्यास' या कल्पनेचा जन्मदाता मीच असल्यामुळे त्यातून जन्मलेलं 'प्रश्नावली-विवाह' हे अपत्य देखील अर्थातच माझं होतं.

काही वर्षांपूर्वी दोन प्रश्नावल्या बनवल्या होत्या. एक प्राथमिक प्रश्नावली. त्यामधे एका ए-4 कागदावर अगदी ढोबळ माहिती द्यावी, अधिक फोटो अशी पद्धत चालू केली. अनेकजणांना (मुलांना आणि मुलींनाही) बघण्याचा किंवा दाखवून घेण्याचा अगदी वैताग येतो. नकार देण्याची सुरुवातीची झिंग ओसरली की 'नाही' म्हणण्याचा किंवा 'नाही' ऐकण्याचा मनःस्ताप वाढायला लागतो आणि मग एखाद्या तोल गेलेल्या क्षणी कोणालातरी होकार दिला जातो. प्राथमिक प्रश्नावली टपालानी पाठवावी अशी कल्पना आहे. त्याचा ताण येत नाही. त्याच्याखाली स्पष्ट सूचना असते. 'कारण कळवलं तर छान, पण कळवलंच पाहिजे असं नाही. होकार-नकार मात्र स्पष्ट कळवावा.' अक्षरशः हजारो मुलींनी आणि मुलांनी याबद्दल आम्हाला दुवा दिला. समोरचे लोक काहीच कळवत नाहीत याचा त्यांना फार त्रास होतो.

काही तथ्य वाटलं तर पुढे सविस्तर प्रश्नावली पाठवण्याची पद्धत पाडली. त्यात सुद्धा अशी सूचना आहे – विचार जुळतायत असं वाटलं तरी घाईनी प्रत्यक्ष भेटण्याचा उतावीळपणा करू नये. स्वतःबद्दल माहिती आणि दुसऱ्याची पारख हा छंद चालू झाला की, जरा वेळ द्यावा. सविस्तर प्रश्नावलीमधे असे विभाग असतात – स्वतःच्या बाह्य रूपाचं स्वतः केलेलं वर्णन असतं. शिक्षण आणि व्यासंग, छंद याचं स्वतःचं वर्णन नि जोडीदाराकडूनच्या अपेक्षा असतात. आपल्या आरोग्याविषयी, खेळ, आजार याविषयी माहिती असते. दुसऱ्याशी वागतानाचे आपल्या स्वभावातले मुख्य गुण दिलेले असतात. आपली पैशाबद्दलची विचारसरणी – थोडक्यात 'मनी पर्सनॅलिटी' असते. मासिक प्राप्ती, कामाचं स्वरूप याबद्दल माहिती असते. स्त्री-पुरुष संबंधांबद्दलचे विचार स्पष्ट केलेले

असतात. स्वतःच्या कुटुंबाबद्दल सविस्तर माहिती असते. मुलांबद्दलच्या कल्पना स्पष्ट केलेल्या असतात. लग्न-समारंभाबद्दलचे विचारही यात मांडायचे असतात. त्याचबरोबर देव, धर्म, जात, पत्रिका, रूढी, परंपरा, कर्मकांडं याबद्दलची मतंही मांडायची असतात.

ही प्रश्नावली आणि त्याबद्दलच्या सूचना, विचारांना चालना या विषयांवर मी लिहिलेलं 'लग्न पाहावं करून' नावाचं एक छोटं पुस्तक सध्या चौथ्या आवृत्तीत पोहोचलं आहे. त्याच्या आणखी आवृत्त्या मात्र निघणार नाहीत, कारण त्यासाठीच तर जीवनसाथचा हा 12 पुस्तकांचा संच काढला आहे. सुरुवातीला स्वतःबद्दल अशी इतकी सविस्तर माहिती द्यायला मुलगे तयार नसायचे. मुली जास्त 'सिन्सिअर' असल्यामुळे खरीखुरी उत्तरं लिहायच्या आणि मुलगे नाइलाजानी उत्तरं डफरवून द्यायचे. आता मात्र चित्र बदललंय. मुलगेही मनापासून फॉर्म भरतात आणि मासिक बैठकांना भरपूर संख्येनी हजरही राहतात.

हे मी म्हणतोय त्या प्रत्येक गोष्टीला अपवाद असणार, ह्याची आपल्याला कल्पना आहे. पण पूर्वीच्या संपूर्ण पुरुषप्रधान विचाराच्या तुलनेत संसार दोघं मिळून मैत्रीनी करण्याची इच्छा असणाऱ्या मुली जास्त आहेत. तेवढ्यात संख्येनी मुलगे असते तरी जमलं असतं. एकदा जर मान्य केलं की, मैत्रीपूर्ण विवाहाची इच्छा असणाऱ्यांना जोडीदार शोधण्यासाठी खटपट करावी लागणार आहे की अभ्यास मंडळाची कल्पना पुरुषांनाही स्पष्ट व्हायला लागते.

यापुढची पायरी म्हणजे एका ए-4 कागदावर स्वतःची त्रोटक/सविस्तर माहिती देता आली पाहिजे. खूप विचार केल्याशिवाय हे अशक्य आहे. 'लग्न पाहावं करून' या पुस्तकात आणि याही पुस्तकात एक नमुना 'त्रोटक/सविस्तर माहिती' दिलीय. तरीही प्रश्न असा शिल्लक राहतो की, जोडीदाराची निवड या पद्धतीनी केल्यावर मी किंवा 'विवाह अभ्यास मंडळ' यशस्वी संसाराची 'गॅरंटी' देतं का? तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण लोक असा प्रश्न खरोखरच विचारतात.

संसार करणारी ती दोघं, एकमेकांशी चांगलं किंवा वाईट वागणारी, भोगणारी ती दोघं आणि 'गॅरंटी' देणारा मी? मला 'हो' म्हणणं अगदी सोपं आहे आणि 'सब्जेक्ट टू कन्डिशन्स' असं म्हणून 'फाइन प्रिंट क्लॉजेस' सुद्धा लिहिणं शक्य आहे. पण मग माझ्या कायम खरं बोलण्याच्या धर्माचं काय? हाही वाद मी समजू शकतो की, 'प्रश्नावली विवाह' किंवा 'परिचयोत्तर विवाह' या औषधाचा शोध लागून अजून यश सिद्ध करण्याजोगे लग्न आणि संसार कुठे

झालेत? हेही मान्य करूया. पण माझ्यासारख्या अभ्यासकाला याहून जास्त चांगला मार्ग अजून सुचलेला नाही. तुम्हाला सुचला तर तुम्ही सांगा.

'बघितलं, ठरवलं नि तीन दिवसांत लग्न केलं', असं अभिमानानी सांगणारी जोडपी आहेत. आधी स्वभावाची तपासणी न करता आल्यामुळे बिनसलेल्या संसारांची उदाहरणं अगदी कमी – म्हणजे दहात एक एवढ्या प्रमाणात आहेत, असं आपण धरून चालूया. प्रश्न असा आहे की, ती दहातली एक व्यक्ती तुम्ही स्वतः असलात तर तुम्हाला चालेल का?

त्यामुळे मी पुन्हा म्हणतो – स्वतःच्या स्वभावाविषयी माहिती करून घ्यायला नकार, प्रश्नावलीच्या आधारानी किंवा आधार न घेता दुसऱ्याची पारख करण्याला नकार म्हणजे केवढा मोठा जुगार आहे! आयुष्य म्हणजे एक जुगार, वगैरेही खरंय. कारण 'नशीब' या गोष्टीला आपला इलाज नाही. पण त्यातला जुगाराचा अंश कमी करणं, अनिश्चितता कमी करणं, हा रास्त मार्ग नाही का? 'सरप्राईझ'ची मजा मात्र कमी होईल, याबद्दल माफी.

आमच्या ओळखीतल्या एका मुलीचं लग्न ठरत नव्हतं. ती परदेशात नोकरी करत होती आणि ती नोकरी तिला अजिबात सोडायची नव्हती. त्यामुळे परदेशातल्या त्याच गावी नोकरी करणारा नवरा ती शोधत होती. जोडीदार शोधायला साहजिकच खूप त्रास झाला आणि तडजोडीही कराव्या लागल्या.

जोडीदाराची निवड कशी करावी, हा प्रश्न जेव्हा जेव्हा निघाला तेव्हा काहीतरी नवा मार्ग शोधायला हवा असं वाटत राहिलं. लग्न जमवण्याच्या एकूण दोन पद्धती रूढ आहेत. एक म्हणजे स्थळ बघून. त्यातला दाखवण्याचा कार्यक्रम कोणालाच आवडत नाही, पण इलाज नसतो. दुसरी पद्धत म्हणजे प्रेमविवाह. त्यात काव्य आहे, शौर्य आहे, पण डोळस विचार नाही.

परिचयोत्तर विवाह हा तिसरा पर्याय आहे. परिचयासाठी सहवास हवा. त्याविषयी पालकांना चिंता वाटते म्हणून मार्गदर्शन हवं आणि चांगलं, सभ्य वातावरण हवं. चारचौघांत बोलबाला नको, यासाठी योग्य ठिकाण हवं. या सगळ्या गरजांसाठी सुरू झालं ते विवाह अभ्यास मंडळ. सुरुवातीला थोडी मुलं, मुली आणि काही पालक जमायचे. हळूहळू संख्या खूप वाढली. त्यामधे उच्चशिक्षित, कमी शिकलेले, शहरी, ग्रामीण पार्श्वभूमीचे, एन. आर. आय., जास्त वयाचे, घटस्फोटित असे अनेक नमुने जमले. सगळ्या अभ्यासातून जोडीदाराची निवड याबद्दल काही गोष्टी उलगडत गेल्या.

एवढं सगळं साधायचं तर जोडीदार निवडताना अभ्यास टाळताच येणार नाही. इतर सगळ्या विषयांचे अभ्यासक्रम फी भरून, कॉलेजमधे जाऊन, अनेक वर्षं घालवून करायचे; मग लग्नासारख्या महत्त्वाच्या विषयात झटपट निर्णय कसा योग्य ठरेल? मुला-मुलींना नेहमी प्रश्न पडतो की, प्रेमविवाह चांगला की 'बघून' लग्न चांगलं? माझ्या मते, अभ्यास मंडळात स्वतः ठरवलेला परिचय-विवाह सर्वांत चांगला. मुख्य म्हणजे या पद्धतीत निर्णय सावकाश घ्यायचा असतो. स्वतःविषयी खरं सांगायचं असतं. त्यामुळे खोटं पचवण्याचा ताण नसतो. यासाठी मुला-मुलींनी 'दुसरं कोणीतरी आपल्याला बरोब्बर पाहिजे तसा जोडीदार शोधून देईल', हे डोक्यातून काढलं पाहिजे. स्वतःच हा अभ्यास करायला हवा.

स्वतःची ओळख आणि दुसऱ्याची पारख करता यावी यासाठी आम्ही बऱ्याच गोष्टी चालू केल्या आहेत. पुण्यात दर महिन्याला कार्यशाळा असतात. त्यात जोडीदाराची निवड, करिअरचा विचार, सहजीवन आणि कामजीवन, कुटुंब आणि समाजाचे ताण अशा विषयांवर गटचर्चा, खेळ, मुलाखती, वादविवाद असे रंजक आणि उपयुक्त कार्यक्रम असतात. अशा कार्यशाळांची बाहेरगावीही बोलावणी असतात. मधे आम्ही इंग्लंडमधे आणि अमेरिकेतपण अशा कार्यशाळा घेतल्या. कार्यशाळांविषयी पुढे मी आणखी सविस्तर सांगणार आहे.

प्रश्नावलीबद्दल मगाशी आपण थोडक्यात बोललो. आता थोडं विस्तारानी बोलूया. प्रश्नावलीमधे बाह्यरूप, नोकरी, शिक्षण या नेहमी आढळणाऱ्या गोष्टी असतातच, पण त्याखेरीज स्वभाव-विचारांविषयी बरेच प्रश्न असतात. इथे ते थोडक्यात सांगतो. पुढे प्रत्यक्ष प्रश्नावली दिलेली आहे. तरीदेखील त्यामध्ये काय आहे हे आधी सांगण्याचा उद्देश एकच आहे. प्रश्नावली विवाह ही कल्पना टप्याटप्प्यानी पटवणं.

● स्वतःचं बाह्य व्यक्तिमत्त्व – उमदं, शांत, प्रभावी, भारदस्त, सामान्य, किरकोळ, भव्य, थोराड, आक्रमक, आकर्षक, नाजूक वगैरे.

● स्वतःचं शिक्षण, छंद, व्यासंग – शाळेतली बुद्धिमत्ता, नंतरची हुशारी, ॲप्टिट्यूड टेस्टिंग, आयक्यू टेस्टिंगची तयारी (यामुळे स्वभावातला आत्मविश्वास, सरळपणा कळतो). सामाजिक कामाची आवड, आवडते विषय, इंग्रजी बोलणं, वाचणं वगैरे.

● मोकळा वेळ घालवण्यासाठी काय – टी.व्ही., नाटकं, सिनेमे, पुस्तकं, गप्पा, वक्तृत्व, भाषणं, सभा वगैरे (यावरूनही बरंच कळतं).

● स्वतःची तब्येत – रक्तगट, व्यायामाचं प्रमाण, खेळाची आवड, पूर्वीच्या आजारांची माहिती, आहाराच्या सवयी, वैद्यकीय तपासणीची तयारी वगैरे.

● स्वतःची वागणूक – शांत, मनमिळाऊ, अलिप्त, संतापी, आत्मकेंद्री, अबोल, एकलकोंडा, मित्रप्रिय, बडबड्या, कामसू, आळशी, खटपट्या, कल्पक, प्रयोगशील, जिद्दी, संशयी.

● पैशाबद्दलची विचारसरणी – खर्चिक, काटकसरी, समतोल, सध्याची कर्ज फेडण्याची पद्धत, बचतीच्या सवयी, मित्रमंडळींशी पैशाचे व्यवहार, वडिलोपार्जित मालमत्ता, त्याचे हिस्सेदार, स्वकष्टाची मिळकत, बिनश्रमाच्या पैशाविषयी भूमिका, सध्याची राहणी, कपड्यांची संख्या, दागिन्यांची संख्या, हुंड्याबद्दलचे विचार.

● अनेक वेळा जोडीदार सापडला असं वाटतं, पण 'पत्रिका' हा विषय त्यात खो घालतो. त्याबद्दलचा रास्त आधुनिक विचार सबंध कुटुंबानी केला तरच प्रकरण मार्गी लागतं. त्यामुळे त्याचाही समावेश आहे.

प्रत्यक्षात कायद्यानी हुंड्याला बंदीच आहे. पण एक काळ असा होता की, मुलगा हुंडा नको म्हणत असेल तर त्या मुलाच्या स्थळात काहीतरी खोट असली पाहिजे, असा समज होता. माझ्या आणि शोभाच्या लग्नाच्या वेळी म्हणजे 45 वर्षांपूर्वी जवळजवळ अशीच परिस्थिती होती. मी हुंड्याला नकार दिल्यामुळे माझ्यात काहीतरी व्यंग असणार अशी अनेकांची खात्री होती.

● स्वतःच्या कामाचं स्वरूप – प्रकार, कामाचे वार, तास, हिंडण्याचं प्रमाण, त्या क्षेत्राचं भवितव्य, जोडीदाराकडून मदतीची अपेक्षा.

● स्त्री-पुरुष समानतेबद्दल कल्पना – चरितार्थासाठी दोघांनी किती जबाबदारी घ्यावी? घरकामात दोघांचा वाटा, मुलं वाढवण्यात दोघांचा सहभाग (याबद्दलचे विचार सहजीवनात खूप महत्त्वाचे ठरतात).

● एकत्र किंवा स्वतंत्र कुटुंबाबद्दलच्या कल्पना – घरात राहणाऱ्या कुटुंबीयांचं सविस्तर वर्णन. कुटुंबातल्या निर्णयाची पद्धत लोकशाहीची किंवा हुकूमशाहीची (यावर फार गोष्टी अवलंबून असतात).

● मुलांसंबंधी, संगोपनासंबंधी कल्पना.

● लग्नसमारंभाबद्दल, खर्चाबद्दल, विधींबद्दल, सण-समारंभांबद्दल, रूढींबद्दल, देव-धर्म-जात-कर्मकांड, पत्रिकेबद्दल विश्वास-अविश्वास, शुभ-अशुभ

याबद्दलच्या कल्पना.

सगळ्या पारंपरिक विचारांमधे पुरुषप्रधानता हाच मुख्य विचारस्रोत असतो. काही वेळा तर नुसतं लग्न ठरल्यावरच मुलगे आपले रंग दाखवतात. सावध होण्याची ती वेळ असते. त्याचबरोबर मुलींनी हेही लक्षात घ्यावं की, पिढ्या न् पिढ्यांचे हे पुरुषप्रधानतेचे संस्कार आहेत. त्यांच्याशी आपल्याला कधी प्रतिकारानी, तर कधी युक्तीनी लढावं लागतंच. समंजस माणसाला संसार करताना या गोष्टी पटत जातात, तो बदलत जातो. तो समंजसपणा, 'रिझनेबिलिटी' तपासण्यासाठी अशा प्रश्नावलीला पर्याय नाही.

प्रश्नावलीसंबंधीच्या इतक्या पार्श्वभूमीनंतरही एक प्रश्न जाणवतो. 'अभ्यास ना, करू की! एकदा लग्न होऊ दे, मग करू पाहिजे तेवढा अभ्यास', असं प्रत्यक्ष लोक म्हणताना मी ऐकलंय. इथे मी प्रश्नावलीविषयी सांगतोय. लगेच प्रतिक्रिया होऊ देऊ नका. प्रत्यक्ष प्रश्नावली आपण पुढे भरणारच आहोत. या मद्द्यांची ती पुनरावृत्ती वाटेल, पण ती मुद्दामहून केलेली आहे.

वैवाहिक आयुष्यामधला काही भाग पसंत पडतो; काही धक्के बसतात. त्यामधे कुटुंबाची संमती-साथ नसते. त्यामुळे आर्थिक-मानसिक ताण खूप निर्माण होतात. आयुष्याचा अभ्यास हा खरा कुठल्याही शिक्षणाचा प्राथमिक हेतू असतो. आयुष्यातल्या या मोठ्या आणि महत्त्वाच्या भागाचा अभ्यास राहून जातो. संपूर्ण वैवाहिक आयुष्य नीरस होण्याची शक्यता असते. 'ॲरेंज्ड' लग्नात त्यातल्या जुगारी पद्धतीमुळे निराशेची शक्यता असते, तशीच प्रेमविवाहातही असते. प्रत्येक व्यक्तीचं समाजाशी काही बाबतीत पटत नसतं. तोही संघर्ष चालू असतो; पण त्याचा अभ्यास फार उशिरा होतो. त्याचा परिणाम लग्न ठरण्यावर व्हायला लागतो.

यावर उपाय आहे हे निश्चित. तो म्हणजे डोळसपणे विवाह ठरवणं. त्याची काही पद्धत ठरवली तर ती सर्वमान्य होईल. ती पद्धत कशी असायला पाहिजे, असा विचार केला तर एवढ्या गोष्टी समोर येतात.

1) त्यामधे कुटुबीयांची संमती असेल.
2) त्यामुळे चोरून भेटण्याची जरूर नसेल.
3) चोरून भेटताना झालेल्या, केलेल्या स्पर्शांची शक्यताच कमी होईल.

4) मानसिक, शारीरिक, भावनिक सापळे कमी होतील.
5) बघण्याचा एकच पारंपरिक समारंभ नसेल. अनेक चर्चा असतील.
6) दोन्ही व्यक्तींच्या, दोन्ही कुटुंबीयांच्या चर्चा होतील.
7) स्त्री-पुरुष समानता पाळून या चर्चा करता येतील. मुलाकडचे किंवा मुलीकडचे यांचं अतिरिक्त बंधन नसेल. त्यामुळे उपचाराचं रूढीनियुक्त बंधन नसेल. होकार आणि नकार हा मानापमानाचा प्रश्न न करता ठरवता येईल.
8) या पद्धतीला 'आधुनिक विवाह संहिता' असं म्हणावं.
9) यामधे काही प्रश्नावल्या वापरायची जरूर आहे. त्याला इलाज नसेल.
10)या पद्धतीचा शक्य तेवढा अभ्यास हा या अभ्यासमंडळाचा हेतू आहे.

अशा निरनिराळ्या उद्देशांनी, पण शेवटी अभ्यास करायला पाहिजे असं कोणालाही वाटलं, तर त्यासाठी हे अभ्यासमंडळ आहे. एवढ्या सगळ्या गोष्टी साधण्यासाठी एवढ्या गोष्टी करण्याची जरूर असते –
1) प्रश्नावली देवाण-घेवाण.
2) जीवनसाथच्या प्रत्येक कार्यशाळेला नियमित हजेरी.
3) प्रश्नावलीतल्या प्रश्नांविषयी मित्रमंडळींशी चर्चा.
4) प्रश्नावलीमधल्या प्रश्नांविषयी कुटुंबीयांशी चर्चा.

मुलगा आणि मुलगी यांनी असं म्हणावं अशी आपली अपेक्षा असते, 'आमची दोघांची, दोन्ही कुटुंबांची चांगली ओळख आणि मैत्री झाली की आम्ही लग्न करू.' प्रत्यक्षात मात्र मुला-मुलींच्यात आधी आकर्षण आणि नंतर पैशांची सोय एवढंच कळतं. दोघांचं समाधान ही गोष्ट कळत नाही, त्यामुळे महत्त्वाची वाटत नाही. खरं म्हणजे आवश्यक त्या सगळ्या महत्त्वाच्या गोष्टी कळेपर्यंत नवरा-बायकोमधे खरं प्रेम निर्माण व्हायलाच खूप वेळ लागतो. अनेकांची 45-50 वयात प्रेमाची सुरुवात होते. आमच्या पिढीची सर्वसाधारण अवस्था अशीच होती. तुमची सुरुवात लवकर व्हावी अशी इच्छा आहे.

विवाहित पुरुष मंडळींचं आणखी एक चुकतं म्हणजे त्यांचं मन सतत परस्त्रीकडे धावत असतं. ही विकृती नसलेले पुरुष असतील, पण अपवाद म्हणून. 'घरकी मुर्गी दाल बराबर' या पद्धतीनी स्वतःच्या बायकोचा विचार केला, तर संसाराचा पायाच न गवसल्यानी त्यावर बेतलेलं समाधान पुरुषाला मिळत

नाही आणि विकृती वाढतात. आपली जशी लायकी असेल तशी बायको किंवा नवरा मिळेल, हाच खरा नियम प्रत्येकाला समजला पाहिजे.

शाळा-कॉलेजच्या परीक्षेत 10 निरनिराळ्या विषयांत कमी किंवा जास्त मार्कांच्या सरासरीवर शेवटी गुणवत्ता ठरते. विवाहेच्छू असताना, जोडीदार निवडताना, पैसे, धमक, शिक्षण, सौंदर्य, आरोग्य, सामाजिक समज, समानतेची समज, कलांविषयी समज, वाचन, वाक्‌चातुर्य, प्रामाणिकपणा वगैरे अशा अनेक 'पेपरांना' आपल्याला बसावं लागतं आणि 'गुणवत्तेप्रमाणे नवरा किंवा बायको मिळते तीच टिकते' असं मला खात्रीनी वाटतं. यालाही अपवाद असतात, पण ते शेवटी क्वचित घडणारेच फिल्मी किस्से आहेत. वास्तवातल्या 'रंगीला' मधे 'मुन्ना'ला 'मिली' भेटत नाही. आधीच्या पिढीत व्हायचं ते झालं. यापुढच्या तरुण मुलांना असा स्पष्ट अविकृत विचार केल्याशिवाय धडगत नाही.

मी जीवनसाथसाठी तयार केलेल्या प्रश्नावल्या आता एक एक करून बघूया. सगळं बोलून झालंय्, पण प्रश्नावली प्रत्यक्ष स्वतःच्या हातानी भरताना बराच विचार होतो त्याला काही तोड नाही. प्रश्नावली अभ्यास एका बाजूनी चालू ठेवायचा नि त्याखेरीज जीवनासाथच्या दर महिन्याच्या कार्यशाळेला मनापासून हजर राहायचं.

●

*जोडीदाराची निवड या पद्धतीनी केल्यावर मी किंवा 'विवाह अभ्यास मंडळ' यशस्वी संसाराची 'गॅरंटी' देतं का? तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण लोक असा प्रश्न खरोखरच विचारतात. संसार करणारी ती दोघं, एकमेकांशी चांगलं किंवा वाईट वागणारी, भोगणारी ती दोघं आणि 'गॅरंटी' देणारा मी? मला 'हो' म्हणणं अगदी सोपं आहे आणि 'सब्जेक्ट टू कन्डिशन्स' असं म्हणून 'फाइन प्रिंट क्लॉजेस' सुद्धा लिहिणं शक्य आहे.*

## 5) प्राथमिक प्रश्नावली

मध्यस्थातर्फे प्रथम या प्राथमिक प्रश्नावलीची मुलगा आणि मुलगी यांनी देवाण-घेवाण करावी. उत्तरं त्रोटकच असावीत. महत्त्वाच्या मुद्द्यांबाबत प्रश्नावलीतून एकमत जाणवलं, तरी प्रत्यक्ष भेटण्याचा आटापिटा करू नये. प्रत्यक्ष भेटीपूर्वी सविस्तर प्रश्नावलीची देवाण-घेवाण करावी. सविस्तर प्रश्नावलीही अनुकूल

<table>
<tr><td colspan="2">विवाह करण्याची इच्छा असणाऱ्यांनी भरण्याची प्राथमिक प्रश्नावली ● तारीख---------</td></tr>
<tr><td colspan="2">नाव – आई-वडलांचं नाव – आडनाव –</td></tr>
<tr><td>जन्मतारीख –</td><td rowspan="5">फोटो</td></tr>
<tr><td>रूप – रंग – उंची – वजन –</td></tr>
<tr><td>शिक्षण –</td></tr>
<tr><td>व्यवसाय –</td></tr>
<tr><td>स्वतःची मासिक प्राप्ती –</td></tr>
<tr><td colspan="2">कामाचं स्वरूप –</td></tr>
<tr><td colspan="2">कामाचा पत्ता/ठिकाण –</td></tr>
<tr><td colspan="2">सध्याची राहण्याची जागा –</td></tr>
<tr><td colspan="2">कायम वास्तव्याचा पत्ता/मालमत्ता –</td></tr>
<tr><td colspan="2">आई-वडलांचं क्षेत्र/वय/उद्योग –</td></tr>
<tr><td colspan="2">भावंडांची वयं - क्षेत्रं –</td></tr>
<tr><td colspan="2">जोडीदाराबद्दलच्या अपेक्षा –</td></tr>
<tr><td colspan="2">कुंडली/पत्रिका बघून निर्णय घेण्याबद्दल धोरण –</td></tr>
<tr><td colspan="2">लग्न समारंभाबद्दलच्या कल्पना –</td></tr>
<tr><td colspan="2">घरातल्या धार्मिक–सामाजिक परंपरांची माहिती –</td></tr>
<tr><td colspan="2">जात-देव-धर्म याबद्दलच्या कल्पना –</td></tr>
</table>

वाटली तर मध्यस्थामार्फत प्रत्यक्ष भेट ठरवावी.

इथे मध्यस्थ म्हणजे व्यक्ती असा अर्थ नाही. मध्यस्थ म्हणजे 'विवाह अभ्यास मंडळ', 'वधू-वर सूचक संस्था' किंवा 'पोस्ट ऑफिस'. पोस्ट ऑफिस किंवा 'कुरिअर' हा मध्यस्थ सर्वांत चांगला कारण त्यांना स्वतःचं मत नसतं.

आपला संपूर्ण विवाह अभ्यास मध्यमवर्गीयांविषयी आहे, हे मला माहिती आहे आणि तरी माहिती म्हणून तुम्हाला एक गोष्ट सांगतो. सुशिक्षित मराठी-भाषिक शहरी मध्यमवर्गीयांच्यात सगोत्र विवाहसुद्धा टाळतात आणि आपला ज्यांच्याशी रोज संबंध येतो त्या शहरी कष्टकरी वर्गात उलट नियम पाळतात. त्यांच्यात म्हणतात, जोडीदार ठरवताना 'पदर जुळला पाहिजे', म्हणजे नातं असलंच पाहिजे. मी या परस्परविरोधी कल्पनेविषयी थोडी माहिती काढू शकलो. 'सगोत्र' या कल्पनेचं खूप अवडंबर झालेलं आहे. अगदी सख्खं जवळचं बहीण-भावाचं नातं टाळावं, पण नातं असण्यात काही गैर नाही. अगदी थोड्या प्रमाणात आते-मामे भावंडांच्यात लग्न होतात आणि त्यात काही अडचण नसते. सुशिक्षितांच्या तुलनेत ग्रामीण रूढीतलं हे 'पदर जुळणं' प्रकरण जास्त तर्कशुद्ध आणि सोयीचं वाटतं. निदान दोन्ही कुटुंबांना, नवरा-नवरीला एकमेकांची नीट माहिती असते. विवाह अभ्यास नसल्यामुळे त्यांच्यात देखील विसंवाद होतात, पण खोटी माहिती सांगितल्यामुळे फसवणूक तर होत नाही!

जीवनसाथमधल्या एका मुलीनी परजातीतल्या मुलाशी लग्न ठरवलं होतं. तिच्या वडलांना ते अजिबात मान्य नव्हतं. त्यांच्या नजरेत ती नुसती परजात नव्हती, खालची जात होती. घरी रोज भांडणं व्हायला लागली. मुलगी तिच्या निर्णयावर ठाम होती. शेवटी त्यांनी तिला चक्क घराबाहेर काढलं. तिनी त्याच मुलाशी लग्न केलं. आई-वडील, भाऊ कायमचे तुटले. माझ्या मते वडलांनी स्वतःचं मत सांगणं यात काही चूक नव्हती, पण हा पुढचा प्रकार अनावश्यक आणि चुकीचाच होता. मुलगी असली तरी ती स्वतंत्र व्यक्ती आहे, हे लक्षात घेऊनच वडलांनी वागायला हवं होतं. या बाबतीत विचार स्पष्ट होण्यासाठी जीवनसाथमधे धर्म, जात, त्याची व्याख्या, अर्थ, इतिहास या सगळ्याचा शिस्तशीर अभ्यास चालतो.

या फेरीमधेच जी स्थळं बाद होतील, त्यांनी नकार स्पष्ट शब्दांत कळवावा अशीही अपेक्षा आहे. नकाराचं कारण कळवलं तर फार छान. पण कळवलंच पाहिजे असं नाही, कुठच्याही परिस्थितीत होकार, नकार स्पष्ट असावा. होकाराला तत्त्वतः होकार एवढंच महत्त्व द्यावं. 'ठरलं' म्हणून हुरळून जाऊ नये.

●

## 6) सविस्तर प्रश्नावली– बाह्यरूप

एक सूचना आहे. प्रश्नावली भरायला सुरुवात करण्यापूर्वी संपूर्ण वाचावी. त्यावर त्यातल्या प्रत्येक मुद्यावर आपल्या कुटुंबीयांशी चर्चा करावी. मग कमीत कमी 3 मित्र आणि मैत्रिणी यांच्याशी स्वतःची मतं ताडून पाहावीत. त्यानंतर प्रश्नावली भरावी आणि त्याची स्वतःकडे एक प्रत ठेवावी. प्रत्येक मुद्द्यावर विचार आणि चर्चा चालू ठेवावी. काही काळानी सुधारित प्रश्नावली भरून द्यावी. लग्न हा अखंड अभ्यासाचा विषय आहे, हेच या सगळ्याचं सार आहे. कारण हा माणसांच्या नात्यांचा अभ्यास आहे. यापेक्षाही जास्त सविस्तर लिहावंसं वाटलं तर ती चांगली गोष्ट आहे.

काही लोक म्हणतील की, आम्ही तोंडी प्रश्न विचारू, लेखी कशाला? खरं आहे. वारंवार प्रत्यक्ष भेटणं शक्य असलं, तर तोंडी प्रश्नोत्तरं करण्यामधे अडचण काहीच नाही. परगावी असताना मात्र लेखी हाच मार्ग सर्वांत चांगला. त्याशिवाय कुटुंबीयांशी, मित्र-मैत्रिणींशी चर्चा करण्यासाठी लेखी प्रश्नावली केव्हाही चांगली.

लेखी मजकुरात आणखी एक फायदा असतो. बोलताना आपण जेवढं अघळपघळ बोलतो, त्या तुलनेत लिहिताना जास्त विचार करून लिहितो. विचार व्हावा हाच तर उद्देश आहे. बाह्यरूपाचं वर्णन ही त्यामानानी सोपी गोष्ट आहे. नजरेसमोर दिसणारी सत्यं समोर मांडायची, एवढाच भाग यात आहे. आणि तरीही आपल्या पुरुषप्रधान समाजात ‘आधी मुलीचा फोटो आणि पत्रिका येऊ दे’ असा आग्रह धरणारे पुरुष यालाही नकार देण्याची शक्यता आहेच. आपल्या आधुनिक कल्पनेत मात्र दोघांनी एकमेकांना पारखायचं असल्यामुळे ते बसत नाही. प्रश्नावली पुढच्या पानावर आहे.

**स्वतःच्या बाह्यरूपाचं वर्णन**

उंची --------- वजन --------- रंग ------ (गोरा, सावळा, काळा)
केसाचं वर्णन : (लांब, आखूड, कमी, भुरे, काळे, कुरळे इ.)
आवाज : (गोड, घोगरा, बारीक, भरदार, भसाडा)
डोळे : घारे, काळे, तपकिरी, मोठे, बारीक
चष्मा : (नंबर, कॉन्टॅक्ट लेन्स इ.)

**व्यक्तिमत्त्वाचं थोडक्यात वर्णन**

उमदं, शांत, प्रभावी, भारदस्त, सामान्य, जेमतेम, किरकोळ, भव्य, थोराड, आक्रमक, आकर्षक इ.

लग्नाआधी कित्येक मुलगे, मुली अगदी बारीक अंगकाठीचे असतात. मी लठ्ठ असण्याची तरफदारी करत नाहीय, पण अगदी काडीपहिलवान माणसाला पुढे खूप अडचणी येऊ शकतात. मी येऊ शकतात म्हणतोय, कारण येतातच असं नाही. मी वैद्यकीय क्षेत्रातला नसल्यामुळे सामान्यज्ञानातून मला एवढं माहितीय की, बारीक अंगकाठीच्या मुलग्याला संसारासाठी लागणारी 'एनर्जी' कमी पडण्याची शक्यता असते. बारीक मुलीला गर्भधारणेत अडचण येण्याची शक्यता असते. मनातली याविषयीची शंका घालवण्यासाठी लग्नापूर्वी संपूर्ण वैद्यकीय तपासणी करावी असं मला नक्की वाटतं. त्याखेरीज आई-वडील, आजी-आजोबा यांच्याबद्दलही माहिती घ्यावी. बारीक अंगकाठी म्हणजे 'लग्नाला अपात्र' असं समजायची अजिबात गरज नाही. काळजीपूर्वक माहिती मात्र काढावी.

चेहऱ्यावरून स्वभाव सांगता येत नाही, हे सत्य मान्यच करावं लागतं. चांगल्या चेहऱ्याचं आकर्षण ही पूर्ण निराळी गोष्ट आहे, पण तेही सत्य मान्यच करावं लागतं. तुरुंगातले कैदी दुष्ट प्रवृत्तीचे, पण सोज्ज्वळ चेहऱ्याचे असू शकतात. सुंदर चेहऱ्याची मुलगी महाकजाग असू शकते.

माझ्या आणि शोभाच्या लग्नाबद्दल एक गोष्ट नीट सविस्तर सांगतो. सुंदर चेहऱ्याच्या मुलींविषयी आकर्षण मला वाटायचं, हे मला अनेक वर्षांच्या स्वनिरीक्षणामुळे माहिती होतं. त्याचबरोबर मी माझ्या मित्रमंडळींच्यात खूप सुंदर बायको आणि सामान्य रूपाचा नवरा यांच्या संसाराची परिस्थिती पण बघितली

होती. 'संशयकल्लोळ' नाटकाचा नियमित प्रयोग त्यांच्याकडे चालू होता. त्यावरून धुसफुस, काम करण्यावरची बंधनं, बाहेर जाण्यावरची बंधनं, लग्नाआधीच्या सगळ्या पुरुष मित्रांशी संबंध तोडणं, हे सगळं मला माहिती होतं. मी दिसायला मध्यम, सामान्य चेहऱ्याचा होतो, पण 'अमेरिकन ग्रीन कार्ड होल्डर' होतो. माझा लग्नाचं स्थळ म्हणून भाव भरपूर होता. मला अति सुंदर चेहऱ्याच्या मुलींनीही पसंत केलं असतं. पण मला तेवढी अक्कल असल्यामुळे मला 'सिनेमात काम न करणारी नटीसारखी सुंदर मुलगी' नको होती.

बऱ्याच मुलांना स्थळं बघताना 'सुंदर मुलगी' हवी असल्याची उदाहरणं मला माहिती आहेत. लग्नाच्या सुंदर मुलीही बऱ्यापैकी संख्येनी असतात, पण त्या मुलीलाही 'सुंदर मुलगा' पाहिजे असला, तर त्या व्याख्येत बसणारे मुलगे मात्र कमी आढळतात. मी सुंदर नवरा-बायकोचे समाधानकारक संसार कमी बघितलेयत. बिघडलेल्यांचं प्रमाण त्यामानानी फार आहे. त्याचबरोबर स्वतः रूपानी सामान्य असल्यामुळे सुंदर मुलगी नको असं म्हणणारे आणि समाधानानी संसार करणारे जास्त आहेत. मी ज्या बिघडलेल्या संसाराचा उल्लेख केला त्या बिघडण्यात संशय या मुख्य अडचणीचा हात होता, हे मला सांगायलाच हवं.

निराळ्या भाषेत एक मुद्दा मांडतो. दोन असामान्य नवरा-बायकोंच्या संसारापेक्षा दोन सामान्य नवरा-बायकोंचा संसार समाधानी असण्याची शक्यता खूप असते. त्यामुळे शोभाला पसंत करताना मी काळजी घेतली होती की, अंतर्गुण जुळणारे, विचारांच्यात साधारणपणी एकमत, पण बाह्यगुण म्हणजे चेहरा मला आवडणारा, तरी अति सुंदर नाही.

मी आणि शोभा यांच्या बाबतीतल्या एक-दोन गोष्टी इथे मुद्दामून समजावून सांगतो. मी आणि शोभाचा मोठा भाऊ सुरेश इंग्लंडमधे एकत्र रहात होतो, हे आपलं पूर्वी बोलणं झालंय. मला एकदा माझ्या बहिणीचं मुंबईहून पाठवलेलं पत्र आलं. तिचा आणि माझा पत्रव्यवहार सहा महिन्यांतून एखादं पत्र इतपतच होता. तिनी लिहिलं होतं की ती एका डॉक्टरच्या वेटिंगरूममधे नंबराची वाट पहात थांबली होती. थांबलोच आहोत, काही करायला नाही म्हणून तिनी समोरचा कसला तरी एक कागद ओढला आणि तिथेच ठेवलेलं पेन घेऊन घाईत मला पत्र खरडून ते पाठवून दिलं. त्यातला मजकूर मला आठवत नाही आणि त्याला काही महत्त्व देखील नाही.

मी सुरेशला म्हणत होतो, 'काय हे पत्र? हे असं पत्र पाठवण्यात काय

अर्थ आहे?' त्यावरून सुरेशनी माझ्याविषयी असं मत बनवलं की, मला दुसऱ्याच्या भावनांची किंमत नाही. मी प्रत्यक्षात निराळंच म्हणत होतो. माझ्या म्हणण्याचा अर्थ होता की, आपण जे काम करू ते नीटनेटकंच हवं. दुसऱ्याला दुय्यम दर्जाची वस्तू पाठवण्यात दुसऱ्याचाही अपमान होतो आणि स्वतःलाही कमीपणा येतो. आपली स्वतःची प्रत्येक गोष्ट नीटनेटकीच हवी असा आग्रह असायला पाहिजे.

माझ्याबद्दलच्या झालेल्या या गैरसमजामुळे शोभाच्या आणि माझ्या संसारात अनेक वर्षं याचा परिणाम टिकला. प्रत्यक्षात शोभाच्या म्हणजे कोडोलीकर कुटुंबाच्या आणि माझ्या भावना व्यक्त करण्याच्या पद्धतीत फरक आहे एवढंच. मी माझी पद्धत आधुनिक समजतो. अर्थातच, मला ती जास्त योग्य वाटते.

मला आठवतंय त्याप्रमाणे मी नववीच्या इयत्तेत म्हणजे 13 वर्षांचा असल्यापासून आसपासच्या सगळ्या सामाजिक यंत्रणांविषयी प्रश्न विचारायला लागलो. उत्तरं शोधायला लागलो. वाचन आणि मुख्य म्हणजे चिंतन करायला लागलो. माझे विचार स्पष्ट होत गेले. सामाजिक यंत्रणांमधे विवाहाविषयी विचार हा एक महत्त्वाचा भाग होताच. ते विचार मी मित्रमंडळींच्यात बोलून दाखवायचो. त्यांना ते पटत नव्हते. त्यांचे विरोधी विचार ऐकल्यामुळे माझे विचार जास्त जास्त पक्के होत गेले. मी शोभाशी लग्न केलं ते 25 व्या वर्षी. ही मधली 12 वर्षं त्यामुळे मला खूप महत्त्वाची वाटतात. मला 12 वर्षं मधे मिळाली, हा माझा फायदा झाला. सध्याच्या मला दिसणाऱ्या मुला-मुलींबद्दल मला वाटतं की, वयं 25 पेक्षा जास्त असतात, पण परिपक्वतेचा प्रवास 13 व्या वर्षी चालू होत नाही.

शोभा आणि मी लग्न पत्रमैत्रीतून ठरवलं. त्यामुळे आम्ही एकमेकांना लग्नाआधी भेटलोच नव्हतो. याला नेहमीच्या अर्थानी 'लव्ह मॅरेज' म्हणता येत नाही, 'अरेंज्ड मॅरेज'ही म्हणता येत नाही. त्याला 'सेल्फ अरेंज्ड' असंच नाव द्यावं लागेल. सध्या मी ज्या 'परिचयोत्तर विवाह' या कल्पनेची शिफारस करतो त्याचं मूळ आमच्या दोघांच्या लग्नपद्धतीत होतं.

●

## 7) सविस्तर प्रश्नावली– पत्रिका

सध्याच्या आपल्या एकूण परिस्थितीमधे सर्व अंगांनी सुधारणा करण्याचा मार्ग शोधण्याची सतत धडपड म्हणजेच आधुनिकता असा जीवनसाथचा विश्वास आहे. मानसशास्त्राचा विकास झालेला नव्हता त्या काळात दोन व्यक्तींनी लग्न करावं की न करावं, भविष्यात काय घडू शकेल, हे जाणण्यासाठी पत्रिका हा मार्ग होता. मानसशास्त्राच्या सध्याच्या प्रगत अवस्थेत पत्रिका हा मार्ग पूर्णपणे कालबाह्य झाला आहे असं जीवनसाथला वाटतं. पण समाजातून पत्रिका हा विषय गेलेला तर नाहीच; उलट समाज जास्त अस्वस्थ झाल्यामुळे पत्रिकेच्या जास्त मागे लागला आहे. थोडक्यात, पत्रिकेवर विश्वास असणारे आणि पत्रिकेवर विश्वास नसणारे असे दोन तटच पडले आहेत. त्याविषयी भूमिका स्पष्ट असावी म्हणून ही प्रश्नावली आहे.

| | |
|---|---|
| पत्रिका या कल्पनेवर विश्वास आहे? | ------------------------------ |
| विश्वास असला तर त्याचं कारण | ------------------------------ |
| विश्वास नसला तर त्याचं कारण | ------------------------------ |
| विश्वास असला तर पत्रिका कोणाला दाखवायची याबद्दल आग्रह? | ------------------------------ |
| आग्रह असला तर त्या व्यक्तीचं नाव | ------------------------------ |
| पत्रिका या विषयाबद्दल घरच्या ज्येष्ठ माणसांची भूमिका | ------------------------------ |

●

## ८) सविस्तर प्रश्नावली– शिक्षण / व्यासंग

अनुरूप जोडीदार अशा शब्दप्रयोगाऐवजी आम्ही 'अनुगुण' हा शब्दप्रयोग रूढ केला आहे. बाह्यगुण आणि अंतर्गुण हा नेहमीचाच अभ्यासाचा आणि वादग्रस्त मुद्दा ठरला आहे. रूप, शरीरयष्टी, आरोग्य, आर्थिक परिस्थिती, शिक्षण या गोष्टी तपासायला काही ना काही तरी आधार आहे, पण मनातल्या विचारांचा एक्स-रे कोण, कसा काढणार? खरे अंतर्गुण म्हणजे मूल्य, समजूतदारपणा, हिम्मत, न्यायबुद्धी, विवेक, स्त्री-पुरुष समानतेची समज आणि सांस्कृतिक दर्जा. लग्नं मोडतात, फसतात ती अंतर्गुणांमुळे. बाह्यगुणांमुळे नाही.

तो एक्स-रे काढण्याचं सोपं मशीन या प्रश्नावलीच्या रूपात सादर होतंय, असा अभ्यास-मंडळाचा विश्वास आहे. या प्रश्नावलीच्या उत्तरांवरून खरा सांस्कृतिक दर्जा कळतो.

शालेय शिक्षणात सक्तीचे विषय असतात. त्यात अभ्यासाची गोडी न लागलेलं एखादं मूल कॉलेजमधे योग्य विषयाच्या निवडीमुळे चमकूही शकतं.

वाचन, लेखन, मोकळा वेळ कसा घालवता, अशासारखे प्रश्न माणसाविषयी बरंच काही सांगून जातात.

ॲप्टिट्यूड, आय क्यू टेस्टिंगची 'तयारी असणं' याला खरं जास्त महत्त्व आहे. त्याच्या मर्यादा माहीत असल्यामुळे केवळ टेस्टला महत्त्व देणं चूक आहे; पण त्याचबरोबर कुशाग्र बुद्धीच्या व्यक्तीला अगदी मंदबुद्धी किंवा मध्यमबुद्धी जोडीदाराबरोबर संसार करणं कठीण आहे.

मी अशा अनेक जोड्या बघितल्या आहेत. रूप, स्वभाव, सगळं काही ठीक आहे, पण स्थळ बघताना, पसंत करताना बुद्धिमत्ता तपासण्याचं लक्षातच आलं नाही. कधी या वर्णनाचा नवरा असतो तर कधी बायको. आणि खरोखरीच रोज उठता-बसता जाणवतं की, जी गोष्ट जन्मजात असते किंवा नसते त्यावाचून म्हणजे बुद्धीवाचून सगळंच अडायला लागतं. मुलं कोणावर जातील, याची पण मनात काळजी वाटायला लागते. या प्रश्नावलीत शिक्षण म्हटलंय तिथे नुसतं बी.ए., एम.कॉम., बी.एस्सी. असं काहीतरी लिहिता आलं म्हणजे हुशार असं नाही सांगता येत, हीच तर अडचण आहे. त्यासाठी तर बाकीचे एवढे प्रश्न

आहेत. माणसांच्या मेंदूमधल्या चुण्या जेवढ्या जास्त तेवढी बुद्धी कुशाग्र असं म्हणतात. 'चुण्या कमी पडल्या' असं अनेकांच्याबद्दल वाटतं, पण लग्नानंतर त्याला फारसा उपाय नसतो.

**स्वतःचं शिक्षण/व्यासंग**

शालेय शिक्षणातली बुद्धिमत्ता : ----------------------------------
कॉलेज शिक्षणातली बुद्धिमत्ता : ----------------------------------
ॲप्टिट्यूड टेस्टिंगची तयारी : ------------------------------------
आय क्यू टेस्टिंगची तयारी : -------------------------------------
सामाजिक कामाची आवड किती : --------------------------------
अभ्यासात खास आवडते विषय : --------------------------------
पत्रलेखनाचं प्रमाण/आवड : --------------------------------------
छंद : -------------------------------------------------------
दैनंदिनी लिहिता? ----------------------------------------------
सध्या काय वाचन चाललंय? -------------------------------------
सध्या काय लेखन चाललंय? ------------------------------------
मोकळा वेळ कसा घालवता? ------------------------------------
चित्रपट/नाटक/टी.व्ही. बघण्याचं प्रमाण : (दर महिन्याला प्रमाण)

●

# 9) सविस्तर प्रश्नावली– आरोग्य

आहार, व्यायाम आणि मनःशांती यांनी आरोग्य टिकतं, हे सगळ्यांना माहिती आहे. 'तुम्ही प्रत्यक्ष काय करता, याला फार महत्त्व असतं, ते समजून घ्यावं. समजावून द्यावं. त्या निमित्तानी विचार करावा.

मी तर म्हणतो, व्यंग या प्रश्नाचाही योग्य अर्थ समजून घेतला पाहिजे. मला स्वतःला अनेक वर्षं अर्धशिशीचा त्रास होता, हाही विकार आहे. त्यावर मात करण्याचे प्रयत्न, हा खरा मनाचा एक्स-रे दाखवणारा मार्ग आहे. अर्धशिशी मी 'हँडल' कशी करतो, ही खरी परीक्षा आहे.

पूर्वीचे मोठे आजार यांचा प्रामाणिकपणी उल्लेख करणं, हे सरळ आणि मोठ्या मनाचं लक्षण आहे. लग्नानंतर ते कळणं, हे गृहकलहाचं कारण होऊ शकतं. डोळ्यांना चष्मा असणं, कानांनी किंचित कमी ऐकू येणं ह्या गोष्टी न सांगण्यापेक्षा सांगणं जास्त चांगलं, असं अभ्यास-मंडळात आम्ही सांगतो.

प्रत्यक्ष चर्चा, गप्पा, अभ्यास, प्रश्नोत्तरं अशा कार्यशाळेमधे मुलांना जेव्हा कळतं की, मुली कसा विचार करतात नि मुलींना जेव्हा कळतं की, मुलं कसा विचार करतात, तेव्हा बऱ्याच बाबतीत 'खरा विचार' करायला सुरुवात होते.

व्यायामाचं प्रमाण, खेळाचं प्रमाण याही गोष्टींवरून नवरा-बायकोच्यात वाद होतात. त्याबद्दलचे विचार स्पष्ट माहीत असलेले केव्हाही बरे. प्रश्नावली पुढच्या पानावर आहे.

**स्वतःची तब्येत**

रक्तगट : ------------- (माहीत नसला तर लगेच काढून घ्यावा.)
एकूण आरोग्य कसं आहे? उत्तम, मध्यम, जेमतेम वगैरे
व्यायामाचं प्रमाण : रोज, मधूनमधून, नाही.
खेळाचं प्रमाण : रोज, नियमित, मधूनमधून, नाही.
पूर्वी कुठचे खेळ खेळत होता? ----------------------------------
यापूर्वीचे मोठे आजार : ----------------------------------------
स्वतःच्या आजारात इतरांकडून सेवा करून घेता? ------------------
दुसऱ्याच्या आजारात दुसऱ्याची शुश्रूषा करता? ---------------------
कायमचा आजार : व्यंग (असलं तर) : --------------------------
त्यावर मात करण्याचे प्रयत्न : ----------------------------------
छोट्या आजारांचं प्रमाण : (उदा. सर्दी, खोकला, अंगदुखी, बारीक ताप)
ॲलर्जी/तीव्र आवड-नावड : ---------------------------------------
पाळीव प्राण्यांविषयी अडचण? : --------------------------------
आहाराच्या सवयी : शाकाहारी, मांसाहारी, मिताहारी, खादाड वगैरे वगैरे.
यापुढे नियमित व्यायाम करण्याची इच्छा आहे? --------------------

मी तयार केलेल्या या प्रश्नावलीत स्वतःच्या तब्येतीविषयी इतकी माहिती द्यायची, याचाच अर्थ हे सगळे प्रश्न दुसऱ्यालाही विचारायचे. हे सगळं मुला-मुलींना अवघड वाटतं. इतकं खरं सांगायची काय जरूर आहे? असा त्यांचा प्रश्न असतो. हा प्रश्न कशामुळे असतो ते जरा बारकाव्यानी बघूया.

माझं स्वतःचं मत पक्कं आहे की, जे आजार स्वतःला असतील, कुटुंबात कोणाला असतील, ते सांगायला पाहिजेतच. अशा खऱ्या माहितीमुळे कदाचित काही स्थळं नकार देतील अशी शक्यता आहे. माहिती लपवून समजा लग्न ठरलं आणि लग्न होऊन संसार चालू झाला तरी पुढे केव्हातरी खरी गोष्ट बाहेर येणारच. त्यानंतर त्या संसाराची काय अवस्था होईल?

खुद्द मला वयाच्या तेराव्या वर्षांपासून अर्धशिशीचा विकार आहे. शोभाशी पत्रव्यवहार करताना मी ते शोभाला सांगायला हवं होतं, पण सांगितलेलं नव्हतं. मला ते सुचलं नव्हतं. त्यातली चांगली गोष्ट अशी की, इतर अनेक अर्धशिशीच्या

रुग्णांच्या तुलनेत मला कमी त्रास होतो. तोही फक्त माझा मला होतो. इतरांना मी त्रास देत नाही. शोभाकडून कसलीही मागणी करत नाही.

माझ्या ओळखीत काही मुलं आणि मुली आहेत की, ज्यांना स्वतःला किंवा त्यांच्या पालकांना काही गंभीर आजार होता. त्यांनी मगाशी आपण म्हणालो तसं ते सांगायचं ठरवलं. काहींच्या लग्नात अडचणी आल्या नाहीत, काहींची लग्नं उशिरा झाली, तर काहींची लग्नं अडली. आमच्या मुलीनी श्रेयसशी लग्न करण्याचा निर्णय घेतला तेव्हा श्रेयसच्या आईला मूत्रपिंडाचा विकार झालेला होता, हे आभाला आणि आम्हा दोघांना माहिती होतं. काही आजार असे असतात की, दोन्ही कुटुंबांच्या आधीच्या पिढीत ते असले तर ते आजार पुढच्या पिढीत उतरण्याची शक्यता खूप असते. दोनपैकी एका कुटुंबात असले तर शक्यता कमी असते. या आणखी एका कारणामुळे लग्नापूर्वी वैद्यकीय तपासणी महत्त्वाची ठरते. या शक्यतांमुळे लग्न मोडावं असं मला म्हणायचं नाहीय. पण माहितीच नसण्यापेक्षा माहिती असण्याचे फायदे खूप आहेत.

माझ्या एका मित्राच्या आई-वडलांना दोघांनाही मधुमेह होता. त्यांनी वयाच्या चाळिशीपासूनच गोड सोडलं. बिनसारखेच्या चहाची सवय लावून घेतली. मी स्वतः तसं केलेलं नाही. पण असं म्हणतात की, साखर सोडण्याचा पहिले काही महिने त्रास वाटतो, पण त्यानंतर बिनसाखरेच्या पदार्थांची सवय होते. नंतर तर साखर नकोच वाटायला लागते.

एड्स हा एक आजार फार गंभीर आहे आणि एड्स झालेल्या माणसाचं लग्न होणं, ही क्वचित घडणारी गोष्ट आहे. केवळ माहिती म्हणून सांगतो, एड्सवरची सगळ्या प्रकारची औषधं ही जागतिक मालमत्ता म्हणून जाहीर झालेली आहेत. त्याच्यावरचे इलाज विनामोबदला होणार, असं ठरलेलं आहे.

●

## 10) सविस्तर प्रश्नावली– स्वभाव

स्वतःला ओळखण्याची अडचण हा तर नेहमीचा प्रश्न असतो. 'स्वभाव' हा फार मोठा व्यापक आणि प्रचंड अर्थपूर्ण, पण मोघम शब्द आहे. आणि तरीही स्वतःविषयी विचार करण्याची सुरुवात तरी व्हावी म्हणून हा प्रश्न ठेवलेला आहे.

आपले बरेचसे गुण-दुर्गुण आनुवंशिक असतात. आईसारखा अमुक किंवा वडलांसारखी तमुक असं तरी असतं किंवा आई-वडलांच्या कुठल्यातरी गुणाची 'रिॲक्शन' तरी आलेली असते. आत्तापर्यंत याविषयी – म्हणजे स्वतःच्या स्वभावाविषयी – विचार करण्याची किंवा दुसऱ्याला सांगण्याची वेळ आली नसली, तर ही आलेली संधी समजावी आणि स्वच्छ विचार करायला लागावं.

**स्वतःची स्वभाववैशिष्ट्यं**

संतापी, शांत, मनमिळाऊ, अलिप्त यापैकी कसे आहात?
आत्मकेंद्री, अबोल, बोलका, मित्रप्रिय, एकलकोंडा यापैकी कसे आहात?
कामसू, आळशी, कल्पक, प्रयोगशील, जिद्दी, खटपट्या यापैकी कसे आहात?
कशाचा राग येतो?
कशाचा आनंद वाटतो?
कशामुळे वाईट वाटतं?
मतभेदाच्या प्रसंगी दुसऱ्याशी शांतपणी बोलणं जमतं का?
मतभेद झालाच तर समुपदेशकाकडे जायची तयारी आहे का?
यापेक्षा स्वतःचं काही योग्य वर्णन सुचतं का?

स्वतःसारखाच जोडीदाराचा स्वभाव नसला तरी चालतो. जे आपल्यात नाही ते जोडीदारात असावं अशी लोकांची कल्पना असते. काळ्यांना गोरा जोडीदार मिळाला तर त्यासाठी ते अनेक तडजोडी करताना दिसतात. तसाच विचार स्वभावाबद्दल करायला हरकत नाही, पण स्पष्ट खरं सांगून. आळशी व्यक्तीला कामसू जोडीदार चालेल, पण त्या कामसू व्यक्तीला आळशी जोडीदार कसा चालेल? तरीही त्या अपेक्षा लिहून काढाव्यात.

●

## 11) सविस्तर प्रश्नावली - पैशांबद्दलची विचारसरणी

किती पैसे मिळवता, नोकरी, धंदा, कामाचं स्वरूप या गोष्टी मुळात पैशांबद्दलच्या विचारसरणीवर अवलंबून आहेत. गंमत म्हणजे ह्या प्रश्नांची उत्तरं देण्याइतका विचार केलेला नसतो. समजा, यापूर्वी केलेला नसला तर निदान यापुढे करावा यासाठी प्रश्नावलीचा उपयोग होतो.

सध्याच्या परिस्थितीत मला असं वाटतं की, मध्यमवर्गीय असणं सर्वांत चांगलं. मला स्वतःला मध्यमवर्गीय असल्याचा अभिमान आहे, पण कित्येकांना श्रीमंतीची स्वप्नं अस्वस्थ करत असतात. त्यांना श्रीमंतीतल्या अडचणींची कल्पना नसते, विवाह अभ्यास-मंडळात याची अगदी सविस्तर चर्चा चालते. गरिबी चांगली असं कोणीच म्हणत नाही.

इच्छा अशी की, समतोल वृत्ती नीट कळावी. पुढचा निर्णय ज्याचा-त्याचा. प्रश्नावली पुढच्या पानावर आहे.

*सध्याच्या परिस्थितीत मला असं वाटतं की, मध्यमवर्गीय असणं सर्वांत चांगलं. मला स्वतःला मध्यमवर्गीय असल्याचा अभिमान आहे, पण कित्येकांना श्रीमंतीची स्वप्नं अस्वस्थ करत असतात. त्यांना श्रीमंतीतल्या अडचणींची कल्पना नसते, विवाह अभ्यास-मंडळात याची अगदी सविस्तर चर्चा चालते. गरिबी चांगली असं कोणीच म्हणत नाही.*

## पैशाबद्दलची विचारसरणी

अति काटकसरी/खर्चिक : ---------------------------------------

आखून-बेतून खर्च करणार? ------------------------------------

सध्या कुठची कर्जं फेडताय? ----------------------------------

धंद्यात कर्जं आहेत? ------------------------------------------

बँक कुठली? ------------------------------------------------

मित्रमंडळींशी पैशाचे व्यवहार आहेत? ----------------------------

बायकोच्या माहेरी पैशाची मदत करण्याबद्दल विचार : -------------

पैशाच्या नियोजनात नवरा-बायको दोघांचा सहभाग हवा,

याबद्दल विचार : ---------------------------------------------

बचतीच्या सवयी कशा आहेत? ----------------------------------

वडिलोपार्जित मालमत्तेचं वर्णन : ---------------------------------

पैसे मिळविण्याचे बिनश्रमाचे मार्ग पसंत आहेत? उदा. हुंडा, लाच, लॉटरी, जुगार, घोड्यांच्या शर्यती : --------------------------------------

तुमची राहणी कशी आहे? -------------------------------------

सध्याच्या कपड्यांची संख्या किती? ------------------------------

पोशाखी, नटवी राहणी आणि विचारातला खोटेपणा यांचा संबंध पटतो का? ----------------------------------------------------

वाहन चालवताना सगळे नियम, संकेत पाळता का? --------------

व्यवस्थितपणा, शिस्त, नीटनेटकेपणा यांची आवड किती? ---------

शब्द पाळण्याचं महत्त्व किती? ---------------------------------

वेळ पाळण्याचं महत्त्व किती? ---------------------------------

याविषयी आणखी काही लिहिण्याजोगं? -------------------------

●

## 12) सविस्तर प्रश्नावली– मासिक प्राप्ती

स्वतःच्या प्राप्तीविषयी खरं सांगणारे मुलगे कमीच. मुलांचा कल प्रत्यक्षापेक्षा फुगवून जास्त प्राप्ती सांगण्याकडे असतो. तर 'मेल-इगो'ला त्रास होऊ नये म्हणून मुली स्वतःची प्राप्ती अंदाज घेऊन सांगतात आणि तरी मुलांना 'मिळवतीच बायको' पाहिजे असते. दिवसेंदिवस संसाराचा गाडा ओढणं जास्त कठीण व्हायला लागल्यामुळे हे साहजिक आहे; पण मुलग्यांनी ते मान्य करून खरं सांगायला काय हरकत आहे? पण पारंपरिक लग्नात खरं बोलण्याची पद्धत नसते, हीच खरी अडचण आहे.

व्यवसाय किंवा त्याचं स्वरूप याचं सविस्तर वर्णन करता आलं नाही, तर स्वतःच्या कामावर त्या व्यक्तीचं प्रेम नाही, हे उघड आहे. पण कामाचे तास खूप आढळले, तर 'टाईम मॅनेजमेंट स्किल' नाही अशी शक्यता आहे.

भरपूर काम, करमणूक, छंद, कौटुंबिक जबाबदाऱ्या, सामाजिक काम यांचा समतोल ज्याला साधला ती व्यक्ती – स्त्री किंवा पुरुष –पुरुषोत्तम किंवा 'स्त्रीउत्तम'च म्हटली पाहिजे. प्रत्यक्षात यातलं काहीतरी कमी-जास्त असतं आणि ते ओळखणं नि मोकळेपणानी लिहिणं, हे खरं मोठं महत्त्वाचं काम आहे.

विवाह अभ्यासमंडळात स्वतःच्या करिअरविषयी सविस्तर सांगण्याचा 'एक्सरसाइज' आम्ही घेतो. त्या व्यक्तीबद्दल कामावरच्या सहकाऱ्यांशी/वरिष्ठांशी तर अवश्य बोलावं. खूप 'खऱ्या' गोष्टी कळतात.

**स्वतःची मासिक प्राप्ती**

नोकरी : -------------------------------------------------------

धंदा : ---------------------------------------------------------

व्यवसाय : ----------------------------------------------------

भागीदारी/प्रा.लि. इ. : ------------------------------------------

धंदा/व्यवसाय–त्याचं स्वरूप : ----------------------------------

कामाचे तास/वार : --------------------------------------------

तुमच्या कामाच्या ठिकाणच्या सहकाऱ्यांशी बोललं तर काही हरकत?

----------------------------------------------------------------

भविष्यात परदेशात स्थायिक होण्याची इच्छा/शक्यता : -------------

●

## 13) सविस्तर प्रश्नावली– स्त्री-पुरुष समानता

स्त्री-पुरुष समानतेच्या अनेक पायऱ्या आहेत. फक्त स्वयंपाक आला किंवा केला म्हणजे समानता आली असं होत नाही.

या कार्यशाळेत स्त्री-पुरुष समानता या विषयाबद्दल आपल्याला बरंच सविस्तर बोलायचंच आहे, पण तरीही एक मुद्दा इथेच मांडतो. जोडीदार शोधतानाच्या वागणुकीतच मुलगा आणि मुलाच्या घरच्यांना स्त्री-पुरुष समानता हा विषय किती समजला आहे, ते कळतं. इतर व्यवहारांच्यातला संकेत असा असतो की, अधिकारानी कनिष्ठ व्यक्तींनी वरिष्ठाच्या घरी किंवा ऑफिसमधे वेळ ठरवून जायचं. उदाहरणार्थ, बिल्डरच्या ऑफिसमधे फ्लॅट पर्चेसर जातो; बिल्डर पर्चेसरच्या घरी जात नाही. मुलगी बघायला जाण्याचा संकेत असा आहे की, मुलीच्या घरी मुलानी जायचं. प्रत्यक्ष सामाजिक वागणुकीत सरळ सरळ पुरुषप्रधानता असताना असा संकेत कसा बनला असेल? याचं माझ्या मते एकच कारण आहे. मुलगा आणि मुलाकडचे लोक परीक्षकाच्या भूमिकेत असतात. मुलगी आणि तिचे कुटुंबीय परीक्षेला बसलेले असतात. त्यांनी परीक्षकांचं आदरातिथ्य, सरबराई स्वखर्चानी करणं आलंच. मला स्वतःला वाटतं की, अशी भेट सार्वजनिक ठिकाणी, आपापल्या खर्चानी खाद्य-पेयं मागवून योजावी किंवा मुलाच्या घरी ठरवावी. कारण नंतर मुलीला तिथे रहायचं असतं, पण या प्रसंगात मुलगी परीक्षक होईल आणि मुलाच्या कुटुंबाला ते कमीपणाचं वाटेल, हे कारण असावं.

समानता म्हणजे दोघांनीही जबाबदारीनी वागणं. एकमेकांना सन्मानानी वागवणं. स्त्री म्हणून किंवा पुरुष म्हणून कुठचेही खास फायदे न उकळणं. यामधे थोडेथोडे बदल होतायत, हेही खरं आहे; पण ते फार सावकाश होतायत. काही पुरुषांना स्त्री-पुरुष समानतेची कल्पना म्हणजे स्त्रीची स्वैराचाराची इच्छा, एवढंच समजतं. किंवा स्त्रिया पुरुषांसारखं वागणार असं वाटतं आणि हे 'वारं आपल्या घरात नको' असं ते म्हणत राहतात. घरकाम करणारे पुरुष कमी, पण आढळतात. लहानपणापासून मुलं सांभाळणारे पुरुष मात्र फार क्वचित. अजूनही हा विषय नीट समजला आहे का नाही, हे ओळखणं कठीणच जातं. तरीही किंचित अंदाज येण्यासाठी हे प्रश्न.

स्त्री-पुरुष मैत्रीचे एवढे प्रकार मानलेले आहेत –

आकर्षणयुक्त, वात्सल्ययुक्त, आदरयुक्त आणि भीतीयुक्त. लग्नाच्या वयाच्या तरुण मुला-मुलींच्या मैत्रीत ह्या सगळ्या शक्यता संभवतात.

स्त्री-पुरुष समानतेच्या पायऱ्या या विषयावर विवाह अभ्यासमंडळात अगदी सविस्तर चर्चा चालते. संपूर्ण समानता समजलेली असल्यानंतरची पायरी म्हणजे 10 वी मानून आणि बाकीच्या खालच्या पायऱ्यांची नीट वर्णनं समजावून सांगितली की, मुलगे स्वतःविषयी नीट विचार करायला लागतात.

सहजीवनातली स्त्री-पुरुष समानता नीट समजली नाही, तर समानता म्हणजे सगळं एकसारखं असा काहींना चुकीचा अर्थ वाटतो. नवरा-बायको दोघांना तोच नट, तीच नटी आवडली तर ठीक आहे, पण दोघांचं गणित कच्चं, दोघं लठ्ठ, दोघांनाही हिंडायची आवड असं नुसतं समान-समान शोधत गेलं तर नाही चालत. समान पेक्षा पूरक, ही गोष्ट जास्त महत्त्वाची आहे. एकाला स्वयंपाक करायला आवडतं, तर दुसऱ्याला मदत करण्याची आवड असणं हे पूरक आहे. एकाला लिखाणाची आवड असली आणि दुसऱ्याला वाचण्याची तर ते पूरक आहे. एकाला पैसे कमावण्याची, वाढवण्याची कला अवगत असली आणि दुसऱ्याला घराला लागणाऱ्या सगळ्या वस्तू चांगल्या दर्जाच्या शिवाय रास्त किमतीत खरेदी करण्याची कला अवगत असली तर ते पूरक आहे. आत्ता एवढंच सांगतो. कारण याविषयी आणखी सविस्तर आपण बोलणार आहोत.

**स्त्री-पुरुष समानता**

नवरा-बायको दोघांनीही कामं करणं जरूर, असं मानता का? --------
नवरा-बायको दोघांनीही पैसे मिळवले पाहिजेत, असं मानता का? ----
कुटुंबव्यवस्था दोघांनी बघायची आहे, असं मानता का? ------------
नवरा-बायको दोघांनीही घरातलं काम विभागून घ्यावं का? ----------
मुलं सांभाळण्यात, वाढवण्यात दोघांचा सहभाग पाहिजे, हे मानता?---
आपापल्या कामामधे समाधान ही गरज नवरा-बायको दोघांची आहे, असं मानता का? ------------------------------------------
संपूर्ण स्वावलंबनाचा अनुभव किती प्रमाणात आहे? ----------------
(आधीचा आणि सध्याचा अनुभव : -------------------------------
उदा. स्वतः स्वयंपाक, धुणी-भांडी, खरेदी, केरवारे करणं)
विवाहानंतरच्या स्वावलंबनाची कल्पना : --------------------------

●

## 14) सविस्तर प्रश्नावली– स्त्री-पुरुष लैंगिक संबंध

या विषयाबद्दल आई-वडील स्पष्ट बोलत नसल्यामुळे हा विषय मी अभ्यासमंडळामधे सविस्तर सांगतो. प्रश्नोत्तरं तर चालूच असतात. अनेक विवाहितांनासुद्धा याबद्दल अनेक प्रश्न असतात.

साधारणपणी मुलींशी शोभा बोलते आणि मुलांशी मी स्वतंत्रपणे बोलतो. आपल्याला आश्चर्यात टाकणारे अगदी प्राथमिक प्रश्नही मुलं-मुली विचारू शकतात. मुला-मुलींचा एकत्र कार्यक्रमही असू शकतो.

स्वतःच्या लहानपणापासून स्त्री-पुरुष आकर्षण हा विषय नैसर्गिक कुतूहलानी कसा विकसित होत जातो त्याचे तपशील आणि त्यातले विकृतींचे टप्पे – त्या विकृती कशा टाळता येतील, वैवाहिक आयुष्यातले गैरसमज, थेट वार्धक्यापर्यंतचे अनुभव अशा टप्प्याटप्प्यांनी गप्पांच्या स्वरूपात हा कार्यक्रम रंगतो. काहींचे प्रश्न परस्पर सुटतात. काहींना नवीन प्रश्न कळतात. पुरे पुरे म्हणेपर्यंत प्रश्न येत असतात. संकोच कमी करण्यासाठी असे कार्यक्रम कमी उजेडात–रात्री, मोकळ्या मैदानावर, गच्चीत आयोजित करावे लागले तरी हरकत नाही.

**स्त्री-पुरुष संबंधाबद्दलचे विचार**

प्रत्येक स्त्री-पुरुषाला मित्र-मैत्रिणी असाव्यात का? --------------------

जवळच्या मित्र-मैत्रिणींची नावं, स्वभाववर्णनं सांगा : ----------------

त्यांच्याशी किती घनिष्ठ मैत्री आहे, ते सांगा : ---------------------

लहानपणी कुठची भिन्नलिंगी व्यक्ती आवडायची? -----------------
(आई, बहीण, भाऊ, वडील अशी नाती सोडून)

कोणावर प्रेम होतं? ------------------------------------------

पुढे काय झालं? ---------------------------------------------

प्रेमभंग झाला असला तर कशामुळे? ----------------------------

विवाहबाह्य शारीरिक संबंधांबद्दलचं मत स्पष्ट करा (असावेत, नसावेत, त्याचं कारण असं अगदी स्पष्ट) : --------------------------------

इतर राज्यांतले, इतर धर्मांचे मित्र-मैत्रिणी आहेत? -----------------

त्यांच्या स्त्री-पुरुष संबंधाबद्दलच्या अनुभवांबद्दल सविस्तर बोलणं होतं? ---

महाराष्ट्रात, भारतात, जगात किती हिंडलायत? --------------------

स्त्री-पुरुष संबंधाविषयी जगात काय चालतं कल्पना आहे? -----------

केवळ माहिती असावी म्हणून सांगतो. पाश्चात्त्यांच्यात प्रत्येक मुलानी आणि मुलींनी लग्नापूर्वी लैंगिक संबंधाचा अनुभव घेतलेला असणं, हेच अपेक्षित असतं. त्यामुळे 'शरीरसंबंधासाठी लग्न' हा एक विषय डोक्यातून गेलेला असतो. मी त्या सामाजिक पद्धतीची शिफारस करत नाहीय, पण एका बाजूनी विचार केला तर त्यात तथ्य दिसतं. पाश्चात्यांच्यात लग्नापूर्वी लैंगिक संबंधच काय, कधीकधी मुलं देखील असतात. ते देखील समाजाला मान्य असल्यामुळे 'एकमेकांवर प्रेम', एवढाच लग्नबंधनाचा हेतू उरतो.

आधी लग्न झालेलं असो, नसो, मुलं असोत, नसोत, जोडीदार निवडायचं काम स्वतःलाच करावं लागतं. त्यासाठी 'डिस्कोथेक्स', 'बॉलडान्स', 'पार्ट्या' अशा गोष्टी सामाजिक उपचार म्हणूनच असतात. कुटुंबाचा 'चहा-पोहे' कार्यक्रम ऊर्फ 'अरेंज्ड मॅरेज' हा प्रकार अस्तित्वातच नसतो. भारतीयांपेक्षा एरवीही पाश्चात्त्य समाजात स्वावलंबन जास्त आहे. जोडीदाराची निवड याबाबतीतही पूर्ण स्वावलंबन, हेच तिकडचं तत्त्व आहे.

●

## 15) सविस्तर प्रश्नावली– कुटुंब

लग्न हा फक्त दोन व्यक्तींचा संबंध आहे, हा झाला टोकाचा पाश्चात्त्य विचार. आपल्या देशात आणि मध्यमवर्गीयांच्यात ते खरं नाही. स्वतंत्र कुटुंब असावं असं काहींना वाटतं, पण शक्य होत नाही. काहींना स्वतंत्र संसार मनापासून पसंत नसतो. हा त्या त्या माणसाचा प्रश्न आहे. पण एकमेकांच्या कुटुंबाचा जवळून किंवा दुरून संबंध येतोच. त्या कुटुंबाच्या वर्णनावरून आपल्या जोडीदाराविषयी आणखी माहिती मिळत जाते. व्यक्तीवरून कुटुंबाचा अभ्यास शक्य होतो आणि कुटुंबावरून व्यक्तीबद्दल माहिती वाढते. पाश्चात्त्य समाजात असं होत नाही. जोडीदाराच्या कुटुंबाशी फारच कमी संबंध येतो.

खुद्द माझं स्वतःचं मत 100% स्वतंत्र कुटुंबाच्या बाजूनी आहे. दुरून जे संबंध येतील ते रुचले तरच जवळीक निर्माण होते किंवा होत नाही; पण जवळीक गृहीत धरून, गळ्यात गळे घालून जे धक्के बसतात ते फार खोलवर जखमा करतात.

यातल्या शक्यता काय, याची माहिती होण्यासाठी, विचार करण्यासाठी जोडीदाराच्या कुटुंबाची माहिती मिळेल तेवढी चांगलीच. घरामधे विशेषतः एकत्र कुटुंबात शुश्रूषा करायला लागेल असे वृद्ध असले तर त्याबद्दल स्वतःचे नेमके विचार, प्रवृत्ती काय, आपली मानसिकता काय, याचा नीट विचार केलेला पाहिजे. उदा. मला वैयक्तिक पातळीवरची सेवा (नर्सिंग) कोणाचीही करायला जमत नाही, जमणार नाही आणि मीही करून घेत नाही, करून घेणार नाही. माझी स्वतःची अशी उदाहरणं मी केवळ मुद्दे स्पष्ट करण्यासाठी देतोय. स्वतःबद्दलचा विचार, निर्णय ज्यानी - त्यानी स्वतःच घ्यायचा, हे अगदी नक्की.

आमच्या ओळखीतल्या प्रथमवधू मुलीनी एका घटस्फोटिताशी लग्न केलं. तो मुलगा चांगला आहे. त्याचा आधीच्या बायकोशी कशामुळे घटस्फोट झाला, हे तिनी बघितलं. अनेक लोक 'प्रथमवर-प्रथमवधू' या रूढीत मनानी पक्के अडकलेले असतात; तशी ही मुलगी अडकलेली नाही, याचं मला कौतुक वाटलं. मुलीचे आईवडील विचारी आणि समजूतदार असल्यामुळे वादावादी न होता निर्णय झाले आणि अमलात आले.

## कुटुंबीय

स्वतःच्या सध्याच्या घरी राहणाऱ्या सख्ख्या नात्यातल्या कुटुंबीयांचं थोडक्यात वर्णन – त्यांची वयं, आनुवंशिक आजार वगैरेंबद्दल त्रोटक माहिती द्या.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| आई : | वय | काम | घरकाम | वैशिष्ट्य |
| वडील : | वय | काम | घरकाम | वैशिष्ट्य |
| भाऊ : | वय | काम | घरकाम | वैशिष्ट्य |
| बहीण : | वय | काम | घरकाम | वैशिष्ट्य |
| आजी : | वय | काम | घरकाम | वैशिष्ट्य |
| आजोबा : | वय | काम | घरकाम | वैशिष्ट्य |
| इतर व्यक्ती : | वय | काम | घरकाम | वैशिष्ट्य |

इतर आप्त, नातेवाईक यांच्याशी संबंध : --------------------------

कुटुंबात कोणी आजारी, मतिमंद, वेडं असलं तर त्याबद्दल माहिती :

-----------------------------------------------------------------

## एकत्र/स्वतंत्र कुटुंबाबद्दल कल्पना

एकत्र कुटुंब असावं का नसावं? --------------------------------

स्वतःच्या आत्मसन्मानासाठी राहण्याची स्वतंत्र जागा पाहिजे? --------

सध्याच्या कुटुंबात निर्णयपद्धत लोकशाही का हुकूमशाही? ----------

निर्णय कोण घेतं? ------------------------------------------

●

# 16) सविस्तर प्रश्नावली– मुलं

लग्नाच्या अनेक हेतूंपैकी मुलं होणं आणि मुलं वाढवण्याचा आनंद (आनंदाबरोबर त्रास आणि जबाबदारी) घेणं, हाही लग्नसंस्थेचा एक प्रमुख हेतू असतो.

त्यामधे सुद्धा 'मूल नको' पासून 'तीन मुलं असावीत', 'मुलगा पाहिजेच' याला अवास्तव महत्त्व असू शकतं. अशी अनेक मतं असू शकतात; त्यासाठी हे प्रश्न. दत्तक मुलांबद्दलही काही लोक विचार करतात.

काही नकारात्मक, अभद्र वाटणाऱ्या विचारांचीही चर्चा विवाह अभ्यासमंडळात चालते. मतिमंद मूल जन्माला आलं तर? त्याला जगवायचं का नाही, हा निर्णय ऑपरेशन थिएटरमधे त्या क्षणी घेणं जरूर असतं. त्यासाठी साहजिकच त्या आधी परिपक्व विचार केलेला असावा लागतो. गर्भारपणाच्या सोनोग्राफीमधे मूल नॉर्मल आहे का नाही कळतं, पण ते पूर्णपणी अचूक असू शकत नाही.

नकारात्मक विचार या शब्दाची ॲलर्जी असणारीही मुलं-मुली भेटतात; पण आयुष्य नकारात्मक, त्रासदायक आणि आनंददायक अशा घटनांनी भरलेलं असतं, हे सत्य मान्य करण्याशिवाय दुसरा काही इलाज आहे का?

नकारात्मक विचाराची ओळख, उदाहरणं मंडळात आम्ही देतो. अगदी आयुर्विमा, स्पेअर टायर, इलेक्ट्रिकल फ्यूज, बाहेर निघताना खिशात ठेवलेले पैसे ही सगळी नकारात्मक शक्यतांची उदाहरणं आहेत. अशा साक्षात्कारी चर्चा, गप्पा चालतात.

लग्नाआधी अपत्यजन्माविषयी बोलण्याचा कित्येक मुला-मुलींना संकोच असतो. तो संकोचही हळूहळू जातो. मुळात त्या विषयी बोलण्यात काहीच चूक नाही, हे कळायला लागतं. प्रश्नावली पुढच्या पानावर आहे.

### मुलांबद्दलच्या कल्पना

मुलं किती असावीत? -------------------------------------------
मुलांना वाढवण्यासंबंधीच्या कल्पना : -----------------------------
मुलं मोठेपणी कोण व्हावीत, असं वाटतं? ------------------------
मुलं होण्यात काही अडचणी आहेत का? -------------------------
यासाठी वैद्यकीय तपासणीची तयारी आहे ना? ---------------------
स्वतःच्या मुलाखेरीज/ऐवजी दत्तक घेण्याची तयारी? ----------------
मूल मतिमंद झालं तर काय कराल? -----------------------------

●

## 17) सविस्तर प्रश्नावली– लग्नसमारंभ

सगळं जुळलं, पण लग्नसमारंभाच्या चुकीच्या कल्पनांमुळे लग्नं मोडल्याचीही उदाहरणं तुम्हाला माहिती असतील. लग्न ठरल्यावर मुलाकडच्या मागण्या वाढत गेल्याचीही उदाहरणं खूप आहेत. त्या एका लग्नाच्या दिवशी घडलेल्या प्रसंगातल्या मानपानावरून आयुष्यभर वाद टिकल्याचीही उदाहरणं आहेत. म्हणून याविषयी स्पष्ट बोलणं झालेलंच पाहिजे.

छोटा समारंभ, मोठा समारंभ हे शब्दप्रयोग फार मोघमपणे वापरले जातात. अभ्यास मंडळात असे प्रांजळ प्रश्न निघतात आणि विचार स्पष्ट होतात. उदा.

- नेमका खर्च किती, ते आकड्यात सांगण्याची स्पष्टता पाहिजे.
- खर्च तुमचा किती – जोडीदाराचा किती, याचं प्रमाण सांगण्याची स्पष्टता पाहिजे.
- दुसऱ्याच्या पैशांनी स्वतः ऐट करायची, असा विचार योग्य आहे का?
- व्यक्तिगत प्राप्तीतून स्वतःला परवडेल तेवढाच खर्च योग्य?
- आई-वडलांना परवडेल तो खर्च योग्य? त्यांचे पैसे आपण का वापरायचे?
- मुळात लग्नसमारंभावरचा खर्च योग्य वाटतो का?
- एका दिवसासाठी प्रचंड खर्च म्हणजे कार्यालय चालवणाऱ्यांची, दुकानदारांची चांदी! याखेरीज काही साध्य होतं का?

बिनखर्चाच्या साध्या लग्नाची जोडीदाराची इच्छा असली आणि दोन्ही घरांचं एकच म्हणणं असलं तर, तुमचं-आमचं काहीच म्हणणं नसतं शेवटी. प्रश्नावली पुढच्या पानावर आहे.

**लग्नसमारंभाबद्दल कल्पना**

रजिस्टर्ड लग्नाचा आग्रह आहे? ----------------------------------

लग्नात होणाऱ्या खर्चाबद्दल मत काय? ----------------------------

प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हुंडा देणं/घेणं याबद्दलचं तुमचं मत -----------

जेवणावळी–धार्मिक सोहळे–दागदागिने–रिसेप्शनबद्दल मत -----------

लग्नासंबंधी रूढी मोडायची तयारी? -----------------------------

त्यानंतरचे दिवाळसण, मंगळागौरी याबद्दलचं मत -------------------

धार्मिक उपास करता का? --------------------------------------

देव–धर्म–जात–पत्रिका याबद्दलच्या कल्पना ------------------------

●

## 18) सविस्तर प्रश्नावली– वैवाहिक आयुष्याचं सार

स्वतःचं वैवाहिक आयुष्य कसं असावं, याचं चित्र रंगवणं हे खूप शिकवणारं असतं. मुलगे फारसा विचार करत नाहीत. कारण बायकोला आपल्या मनाप्रमाणे वळवून घेऊ, याबद्दल त्यांची खात्री असते. हे अगदी चूक आहे. संसार चांगला करण्याची गरज फक्त बायकोला कशी असेल?

आमच्या अभ्यासमंडळात 'वैवाहिक आयुष्यातले धोके' यावर चर्चा, गप्पा आणि प्रश्नोत्तरं असतात. तशी 'वैवाहिक आयुष्यातले आनंद' अशीही चर्चा असते. जोडीदार सापडणं, लग्न होणं, मूल होणं, मूल चांगलं निघणं, हे आनंदाचे मोठे टप्पे सगळ्यांनाच माहिती असतात; पण 'शरीराला काही न होणं', हा आनंद कळायला शरीराला काहीतरी व्हावं लागतं. तसंच रोजचा काही मनःस्ताप न होता एकमेकांच्या सहवासाचा, एकमेकांसाठी काहीतरी करण्याचा छोटा आनंद समजला, तर असे आनंदाचे प्रसंग रोज असतात. त्याचीही चर्चा असते. तो आनंद समजला मात्र पाहिजे.

**वैवाहिक जीवनाचे प्रकार – स्वतःची इच्छा**

यापैकी कुठल्या प्रकारचा तुमचा विवाह असावा, अशी तुमची इच्छा आहे?

1) पारंपरिक पुरुषप्रधान संसार -----------------------------------

2) नवरा-बायकोचा मैत्रीपूर्ण संसार -------------------------------

3) संघर्षपूर्ण टिकाऊ संसार -------------------------------------

4) नाइलाजानी टिकवलेला निर्जीव संसार -------------------------

एखादा विषय समजला की नाही, याची परीक्षा होण्यासाठी तो विषय सविस्तर सांगण्याचाही प्रयोग महत्त्वाचा. त्रोटक टिपणही महत्त्वाचं. विषय कळला आहे की नाही, ते इतरांना त्यावरून कळतं. अनेक चर्चा-गप्पा-अभ्यास झाल्यावर हा निबंध लिहायचा आहे. कितीही सविस्तर चालेल. मात्र कमीत कमी 200 शब्द.

निबंधाचा विषय : तुमच्या लग्नाचा हेतू ----------------------------
------------------------------------------------------------------

निर्जीव संसाराची इच्छा कोणाचीच नसते, पण यामुळे या शक्यतेचा विचार तरी होतो! अशा चारही प्रकारची वैवाहिक आयुष्यं असू शकतात, हा विचार अनेकांनी प्रथम ऐकलेला असतो. हे कळल्यावर जवळजवळ प्रत्येकाची इच्छा 'नवरा-बायकोच्या मैत्रीपूर्ण' संसाराची असते. त्यासाठी काय करायला हवं, हे मात्र त्यांना माहिती नसतं. त्रासदायक भाग असा की हे सबंध पुस्तक वाचलं की त्यानंतरच याचं खरं उत्तर मिळतं.

●

## 19) सविस्तर प्रश्नावली– महत्त्व कशाला?

आधीचे प्रेमभंग, मिळालेले किंवा दिलेले नकार हा वैवाहिक आयुष्याच्या अभ्यासातला महत्त्वाचा भाग आहे. छोट्या अपघातांनी माणूस जागेवर येतो. 'काय होऊ शकलं असतं', याची जाणीव होते. त्यामुळे सुधारणा होते. गाडीच्या 'ड्रायव्हिंगचं' असंच असतं. सुरुवातीला छोटे-छोटे, तऱ्हेतऱ्हेचे अपघात झाले की, माणूस जबाबदारी नीट शिकतो.

प्रेमभंग होणं, त्यापासून आपण काही शिकलो का, हे तपासणं फार आनंदाचंही होऊ शकतं; त्याच्याकडे बघण्याची वृत्ती नीट असली तर!

त्यापुढचा प्रश्न – आधीचा नकार, फसलेलं प्रेमप्रकरण, होणाऱ्या नवऱ्याला, बायकोला सांगायचं का नाही? माझं मत अगदी नक्की आहे की, ते सांगण्यानी फायदेच जास्त आहेत; पण लोकांना त्याची भीती का वाटते, ते मी समजू शकतो. समोरच्या माणसाची 'पचनक्रिया' (खरं पचतं का नाही) कळल्याशिवाय खरं कसं बोलणार?

तरीही ही एक संधी आहे – 'खरं बोलण्याची किंवा लिहिण्याची' – असं समजून हा मजकूर लिहावा.

**'या आधीच्या स्थळांबद्दल'**

या आधी तुम्ही मुलं-मुली बघितली असतील. ती का नाकारली, त्याची कारणं सविस्तर लिहावीत.

विवाह अभ्यास-मंडळात नकार देण्याची योग्य पद्धत याविषयी सविस्तर चर्चा होतात. त्यापासून फार फायदे होतात.

आता मुख्य मुद्दा लिहायला सुरुवात करावी. महत्त्व कशाला?

अनेक मुद्दे असतात; पण त्याची 'प्रायॉरिटी' किंवा प्राधान्य ठरवणं खूप विचार केल्याशिवाय कठीण असतं. विचार करायला भाग पाडावं या हेतूनीच महत्त्व कशाला हा प्रश्न ठेवलेला आहे आणि याचं उत्तर दिलंच पाहिजे असा

आग्रह आहे. तुमच्या निर्णयशक्तीची ही कसोटी आहे.

तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्र या तीनहीमधे असं सांगितलेलं आहे की, आपण अनेक गोष्टी शिकतो, पण आचरणात त्या आणताना आपल्याला सतत प्रत्येक क्षणी क्रम ठरवावा लागतो आणि तिथे माणूस चुकतो. त्यामुळे घोटाळे होतात. जोडीदाराची निवड या महत्त्वाच्या कामात क्रम लावण्याच्या कसबाची सारखी कसोटी असते. त्याची सवय झाली की पुढे संसारात देखील त्याचा रोज उपयोग होतो, म्हणजे करावाच लागतो.

**महत्त्व कशाला?**

याआधी दिलेल्या 1 ते 19 अभ्यासयोग्य विषयासंबंधी तुमच्या दृष्टीनी 'सर्वांत महत्त्वाचं'पासून 'सर्वांत कमी महत्त्वाचं'पर्यंत काही क्रम असेल. तो क्रम स्पष्टपणी अभ्यासक्रमाच्या संदर्भानी ठरवावा आणि लिहावा.

●

## 20) त्रोटक सविस्तर माहिती

एवढ्या अभ्यासानंतर जोडीदाराची परीक्षा कशी कराल? आपल्या संपूर्ण कुटुंबाचं चित्र एका कागदाच्या पानावर रंगवता येईल? प्रयत्न तर करा. माझ्या मुलाचं आणि माझ्या कुटुंबाचं शब्दचित्र खाली नमुन्यादाखल देतोय. प्रत्यक्षात तो विवाहित आहे. त्यानी एक मुलगा दत्तक देखील घेतलेला आहे. तो गेली अनेक वर्षं ब्रिटिश नागरिक आहे. पण पूर्वी 2000 साली त्यानी ही माहिती लिहिलेली आहे ती इथे देतोय्.

जोडीदारांच्या शोधासाठी मुलाची माहिती

मुलाविषयी : जन्म 1973, गोरा, देखणा, बांधेसूद, तब्येत उत्तम, उंची 180 सेंमी. आई-वडलांच्या मातृभाषेत शिक्षणाच्या आग्रहामुळे मराठी माध्यमातून शिक्षण, प्रत्यक्षात उत्तम इंग्रजी येतं. बुद्धिमान, प्रतिभावंत, मेहनती, जिद्दी, महत्त्वाकांक्षी.

शिक्षण : एम.एस्सी. (बॉटनी), पुणे युनिव्हर्सिटी (फॉरेस्ट्री), ऑक्सफर्ड, इंग्लंड इथे डॉक्टरेट.

राहणी : विचारपूर्वक साधी, परंतु सुबकपणा जपणारी राहणी, ऐषआरामाच्या राहणीची बिलकुल आवड नाही.

आर्थिक परिस्थिती : मध्यमवर्गीय.

स्थावर मालमत्ताः पुण्यात स्वतःचा फ्लॅट.

विचारसरणी : पुरोगामी, बुद्धिवादी, स्वावलंबी, आत्मसन्मानावर, प्रत्येक व्यक्तीच्या विकासावर, समानतेवर विश्वास.

पत्रिकेवर विश्वास नाही. निरर्थक कर्मकांडविरोधी. सुसंस्कृतपणाच्या कल्पनांमुळे लग्नात प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष हुंडा किंवा आर्थिक देवाण-घेवाण यांना सक्त विरोध. त्यामुळे नोंदणी विवाहाचा आग्रह.

कुटुंबाविषयी : आई-वडील उच्चशिक्षित. इंग्लंड, अमेरिका, आखाती देशांत काही वर्षं राहून, अनेक देशांचा प्रवास करून, आपल्या देशात वास्तव्याचा आग्रह असल्यानी परत आलेले आहेत. साध्या

राहणीचा, नीतिमूल्यांचा, सामाजिक कामांचा आग्रह. त्यामुळे मित्रमंडळी, नातेवाईक यांचं भावनांनी जोडलेलं समृद्ध कुटुंब.

वडील : बांधकाम व्यवस्थापनातले प्रसिद्ध सल्लागार, लेखक, जाहीर नास्तिक, कर्मकांड व समारंभविरोधी. विवाह अभ्यास मंडळ सल्लागार, वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशक.

आई : सामाजिक प्रतिष्ठेच्या हुद्द्यावर नोकरीत. प्रसिद्ध लेखिका. पालक-शिक्षणात स्वतंत्र काम.

बहीण : व्यावसायिक चित्रकार, नर्तिका, गायिका. मेहनती, बुद्धिमान, विवाहित असून कॉम्प्युटर इंजिनिअर पतीसह अमेरिकेत स्थायिक.

जोडीदार मुलीविषयी अपेक्षा : साध्या राहणीची, उच्चशिक्षित, उच्च समतोल विचारसरणीची, मध्यमवर्गीय कुटुंबातली, सुंदर, गोरी, सुदृढ, बुद्धिमान, सुस्वभावी. समारंभविरहित, नोंदणी पद्धतीनी लग्न करणारी, पत्रिकेवर विश्वास न ठेवणारी, स्वावलंबी, कर्तबगार, महत्त्वाकांक्षी, स्वतःच्या कामावर प्रेम असलेली, स्वतःचं स्वतंत्र करिअर असलेली, विविध देशांमधे वास्तव्य करून करिअर करण्याची तयारी असलेली, हिंडण्या-फिरण्याची आवड आणि त्यातल्या कष्टांची तयारी असलेली. विभक्त कुटुंबात राहण्याची इच्छा असणारी.

मुलीच्या कुटुंबाविषयी अपेक्षा : मुलीचं कुटुंब उच्चशिक्षित, सुसंस्कृत, साध्या राहणीचं, धार्मिक-पारंपरिक समारंभात न गुंतणारं असावं. चरितार्थ व्यवस्थित सांभाळून अर्थपूर्ण सामाजिक कामाचा समतोल राखणारी पार्श्वभूमी असावी. वैचारिक संकुचितपणा नको. साहित्य, संगीत आणि कलांची समज असावी.

●

## 21) भावी जोडीदाराच्या प्रत्यक्ष भेटीपूर्वीचे पर्याय

प्राथमिक प्रश्नावली, सविस्तर प्रश्नावली वगैरे खरोखर टपालानी पाठवली, माहिती एकमेकांना पसंत पडली तर प्रत्यक्षात लवकरात लवकर भेटावंसं वाटणार यात वादच नाही. जरूर भेटावं आणि प्रश्नावलीमधले प्रश्न, त्याची उत्तरं डोक्यात ठेवून प्रत्यक्ष बोलावं. त्याचा नीट अर्थ समजण्यासाठी चेहऱ्यावरचे हावभाव, बोलण्याची, वागण्याची ढब, हालचालींची पद्धत या प्रत्येक गोष्टीला महत्त्व असतंच. प्रत्यक्ष भेटीनंतर अभ्यास मंडळात जायचं ठरवावं किंवा अभ्यास मंडळाच्या कार्यशाळेमधेच भेटावं. प्रत्यक्ष भेटीपासून अंतिम निर्णयाच्या प्रक्रियेच्या मधे कार्यशाळेत मात्र जरूर जावं. विवाह अभ्यास मंडळाच्या मिश्रगट कार्यशाळेबद्दल पुढे मी सविस्तर सांगणार आहे. त्याचंच दुसरं नाव 'मिक्स्ड ग्रुप काउन्सेलिंग.'

टपालानी देव-घेव केलेली माहिती, फोटो वगैरे सगळं पसंत पडूनही भौगोलिक अंतरामुळे प्रत्यक्ष भेट शक्य नसली तर त्याला काही पर्याय आहेत.

इंटरनेट, ई-मेल, अमुक डॉट कॉम, तमुक डॉट कॉम सगळं आहेच. माझं त्याविषयीचं मत असं आहे. एरवी दोन व्यक्तींनी एकमेकांना एकमेकांची माहिती पाठवायची म्हटली, तर अंतराप्रमाणे खर्च कमी-जास्त, पण एकूण खूप येतो. माहिती पोहोचेपर्यंत मधे वेळही फार जातो. खर्च आणि वेळ या दोन्हीमुळे त्यावर फार मर्यादा येतात. त्या तुलनेत कॉम्प्युटरवरचं सगळंच प्रकरण स्वस्त आणि झटपट. जगाच्या कुठच्याही कोपऱ्यात कोणीही असो. काही फरकच पडत नाही. हा एक 'नेट-कनेक्शन'चा फायदा सोडला, तर बाकी मला सगळे तोटेच दिसतात. स्थळांची प्रचंड भलीमोठी यादी अगदी कमी पैशांत मिळाली तरी पुढे काय, हा मला प्रश्नच वाटतो.

पहिली गोष्ट म्हणजे मिळालेल्या माहितीच्या खरेपणाबद्दल खात्रीच बाळगता येत नाही. माहिती सोयीस्करपणी अर्धवट पाठवता येते. फोटोमधे प्रत्यक्ष रूपापेक्षा सुधारणा करूनही पाठवता येते. काहीही करता येतं.

गेल्या काही वर्षांत 'स्काइप' ही सोय झालीय ती निव्वळ इंटरनेट किंवा मॅरेज डॉट कॉम पेक्षा जास्त चांगली आहे. त्यात निदान संबंधित व्यक्ती दिसते नि तिच्याशी बोलता येतं. प्रत्यक्ष व्यक्ती समोर दिसते तेव्हा काय बोलायचं

याबद्दल माझं मत असं आहे की 1 ते 19 या प्रश्नावलीतला प्रत्येक मुद्दा घ्यायचा आणि त्याविषयी सविस्तर बोलायचं. त्यासाठी अनेक स्काइप मीटिंग्ज घ्याव्या लागतील. पण त्याला अडचण मानू नये.

आणखी एक चांगला पर्याय म्हणजे व्हिडिओ फिल्म. ज्यांना शक्य असेल त्यांनी स्वतःच्या राहत्या घरी संपूर्ण प्रश्नावलीविषयी (स्वतः, भाऊ-बहीण, आई-वडील चर्चा करतानाची) व्हिडिओ कॅसेट तयार करावी आणि कॉपीज करून ठेवाव्यात. व्हिडिओ कॅसेट, सीडी एकमेकांना पाठवून मगच प्रत्यक्ष भेटीची योजना आखावी. बघण्याच्या समारंभातलं बरंचसं 'नको' ते यामुळे टळेल.

●

## 22) जोडीदाराबद्दल अंतिम निर्णयप्रक्रिया

प्रश्नावलीच्या अगदी शेवटी महत्त्वाची गोष्ट सांगतो. आपण शाळेच्या वयापासून निरनिराळ्या परीक्षा देतो. सगळ्या परीक्षांच्यात, विषयांत आपण 35% म्हणजे पास नाहीतर नापास असं मानतो. त्या मार्कांच्या भाषेत या प्रश्नावली आणि उत्तरं याचं काय करायचं, हे समजावून सांगतो. ही एका व्यक्तीची परीक्षा नाही. दोन माणसांचं एकमेकांशी जुळेल का नाही, याची परीक्षा आहे. पण या परीक्षेत 50% ला पास समजावं.

थोडक्यात, कमीतकमी 50% गोष्टी जुळण्याजोग्या वाटत असल्या, तरी होकार द्यावा आणि उरलेल्या 50% वर लग्नाआधी काम करत रहायला हवं, हे एकमेकांशी बोलावं. त्यासाठी अभ्यास मंडळात जावं. मुख्य म्हणजे लग्न झालं की, अभ्यास संपला असं समजू नये. उरलेला अभ्यास चालू ठेवावा.

व्यवस्थापनातलं मानसशास्त्र असं सांगतं की निम्मं काम झालं की मानसिक उभारीला सुरुवात होते. झालेल्या भागापेक्षा राहिलेला भाग कमी आहे या कल्पनेनी छान वाटतं. प्रत्येक टप्प्यासरशी 'आता आणखी थोडं राहिलं' असं वाटण्याला फार महत्त्व आहे.

नवराबायकोच्या जुळण्याच्या परीक्षेत 50% नीच सुरुवात होत असल्यामुळे न जुळलेल्या प्रत्येक मुद्यावर त्यापुढे केलेलं काम म्हणजे ध्येयाच्या दिशेनी केलेली प्रगतीच असते.

●

## 23) जीवनसाथची कार्यशाळा नेमकी कशी असते?

प्रश्नावलीच्या बाबतीत लोकांना बरेच प्रश्न असतात. नेहमी असा प्रश्न निघतो की, कोणी या प्रश्नांना खोटी उत्तरं दिली तर? शंका बरोबर आहे. एका भेटीत दुसऱ्यावर इम्प्रेशन मारण्याचा मोह होऊ शकेल. पण अभ्यास मंडळाच्या कार्यशाळेत वारंवार भेटीत, खेळात, चर्चांमधे स्वतःविषयी सातत्यानी चुकीची समजूत करून देणं अशक्य आहे. या प्रश्नावलीमुळे आणखी एक फायदा होतो. बघण्याच्या कार्यक्रमात आईवडील 'तुम्ही बोला' म्हणतात तेव्हा कित्येकांना काय बोलायचं, हा प्रश्न असतो तो सुटतो. पुस्तक घरी ठेवून येऊन आठवेल तसं सहज बोलावं अशी कल्पना असल्यामुळे पुन्हा पुन्हा भेटावंच लागतं. सुरुवातीला पालक याला तयार होत नाहीत. पण विवाह मंडळाची जागा, अभ्यासाचं सभ्य वातावरण बघितलं की पालकही सहजपणी त्यात सामील होतात. मग सगळं 'टेन्शन' जातं. कारण सल्लागार म्हणून पालकही चर्चेत सामील होतात आणि तरी मुलगा-मुलगी यांना निर्णय स्वतः घेता येतो. स्वतः निर्णय घेण्याचा निराळाच आनंद असतो.

जोडीदाराची निवड तुम्ही विचारपूर्वक नीट करालच. आणि तरी एक महत्त्वाचं सांगतो. प्रश्न निर्माण झालेच नाहीत तर आयुष्यात काही गंमत नाही. इच्छा एवढीच की ते प्रश्न छोटे नि सोडवण्याजोगे असोत. विवाहाचं 'ड्रायव्हिंग' करताना छोटे अपघात होवोत. ते प्रश्न सोडवण्यात आनंदही मिळतो आणि आपली ताकद वाढते. त्यापुढचे सगळे प्रश्न मग नेहमी सोडवण्याजोगेच असतात. ते प्रश्न सोडवण्यातला अनुभव आणि मजा तुम्हाला मिळो, म्हणजे मोठी संकटं टळतील.

माणसाचा स्वभाव ही गोष्ट स्वतःची स्वतःला पण समजायला खूप वेळ लागतो, तर पंचविशीच्या आसपास तो नेमका कुणाला सांगता येईल? या वयातला दिसणारा स्वभाव हा कुटुंबाच्या वातावरणातून, शाळा-कॉलेजातल्या अनुभवांवरून, मित्र-मैत्रिणींवरून ठरलेला असतो. ह्या सगळ्याचे अनुभव सुखद असले तर स्वभावात एक स्थिरता असते, स्वस्थता असते. तसं नसलं तर माणसं गोंधळलेली असतात. इतरांशी जुळवून घेणं कठीण जाऊ शकतं. स्वतःच्या

स्वभावाबद्दल दोघांनीही कार्यशाळेच्या निमित्तानी मोकळेपणानी बोलावं.

आपले काही आग्रह असतील तर ते सांगावेत. कोणत्या प्रकारची माणसं आपल्याला आवडतात, कोणती आवडत नाहीत, ते बोलावं आणि हे बोलताना दुसऱ्या व्यक्तीचा अंदाज घेत रहावं. ती व्यक्ती इतरांशी कशी वागते, काय बोलते, तेही पहावं. इतरांविषयी असलेला सहज विश्वास, प्रेम, आदर, बोलण्या-वागण्यातली सहजता, गांभीर्य, कामाबद्दलचा उत्साह, साधेपणा या गोष्टी खूप काही सांगून जातात. माणूस वाढत जातो तसे थोडेफार स्वभावात बदल पण होतात, पण मूळ विश्वास फारसे बदलत नाहीत. मूल्यं बदलत नाहीत. नवरा-बायकोचे स्वभाव वेगळे असले, पण मूल्यं सारखी असली तर त्यांचं एकमेकांशी जुळायला अडचण येत नाही. अर्थात, जोडीदाराचा स्वभाव समजून घेणं ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे एवढंच म्हणता येईल की, त्या त्या वयात स्वतःला कळलेले स्वतःचे गुण, दुर्गुण, वागण्याच्या पद्धती, याविषयी मोकळेपणानी, खरं ते बोलावं.

स्वभावाचा किंवा व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक तपशील म्हणजे आपले छंद, व्यासंग, मोकळ्या वेळेत आपण काय करतो, याविषयी सांगणं. छंद म्हटलं की काही लोक लगेच वाचन असं सांगतात. कारण तो प्रतिष्ठेचा छंद वाटतो. पण काय वाचता, असं विचारलं तर उत्तर नीट येत नाही. बहुतेक माणसं आयुष्यभर वर्तमानपत्रापलीकडे फार काही वाचत नाहीत. तसा वेळही मिळत नाही त्यांना, पण ज्याला खरोखर वाचन आवडतं तो आवडती पुस्तकं सांगू शकतो, काय दिशेनी वाचन चालतं ते सांगू शकतो. एखादा विषय ठरवून, एखादा लेखक ठरवून त्याची सगळी पुस्तकं वाचणारे लोक असतात. वाचन हाच काही एकमेव छंद नाही. कुणाला संगीत आवडतं. कुणी वाद्यं वाजवतं. कुणाला खेळ आवडतो, तर कुणाला भटकंतीत मजा येते. व्यायामाची आवड असते. माणसाला एखाद्या छंदात असलेला रस त्याची जीवनाची खोली ठरवत असतो म्हणून छंद महत्त्वाचा असतो. कधीकधी छंद ही वरवरची आवड न राहता जीवन- कार्यही बनतो.

वैवाहिक जीवनात महत्त्वाचे असतात असे दोन विषय लग्नापूर्वी बोलले गेले पाहिजेत. ते म्हणजे पैशाविषयी विचारसरणी आणि स्त्री-पुरुष समानतेविषयी एकमेकांचे विचार, अपेक्षा. मगाशी याचा उल्लेख केला होता, पण आता जरा विस्तारानी बोलूया. मुख्य म्हणजे या दोन्ही गोष्टींवरूनही घराची 'संस्कृती' ठरत

असते. एकमेकांना पैसा ह्या विषयाचं महत्त्व किती, पैसा काहीही करून खूप मिळवावा असं वाटतं का, की ठराविक पातळीनंतर समाधान असेल? पैसा मिळवण्याचे गैरमार्ग (भ्रष्टाचार) मान्य आहेत का? राहणी साधी आहे की खर्चिक, दिखाऊ, चंगळवादी आहे? पैसे खर्च करण्यातला कंजूषपणा किंवा उधळेपणा दोन्हीमधून प्रश्न निर्माण होऊ शकतात. मूळ वृत्ती जर दोन टोकांच्या असल्या तर मग फार मतभेद होत राहतात. त्यात फार शक्ती वाया जाते. पैशांचा संतुलित विचार करणारीही माणसं असतात. बेहिशेबी असावं असं नाही, पण प्रत्येक गोष्टीत हिशेब पाहू नये. पैसा आपल्या सुखा-समाधानासाठी घरात यावा आणि खर्चावा. त्याच्या येण्या-जाण्यावरून अशांती निर्माण होऊ नये. देण्यासाठी हात पुढे असण्याची सवय असली की पैशाचं संतुलन कळत जातं.

समानतेबद्दल बरंच लिहिलं-बोललं जातं, पण घराघरांत ते आचरणात फारसं येत नाही. काही मुलगे तर उघडपणी सांगतात की, आम्ही स्वयंपाक करणार नाही. मुलं सांभाळणार नाही. घराकडे बघणार नाही. समानता म्हणजे नवऱ्यानी चूल-मूल करणं, एवढंच नाही. तो परिणाम असतो त्याच्या औदार्याचा, सज्जनपणाचा, स्वावलंबनाचा, सहजतेचाही. पत्नीबद्दलचा सन्मान पतीच्या मनात आहे का, ही खरं तर समजून घेण्याची गोष्ट! समानतेचे तपशील अनेक आहेत, पण मूळ पाया सन्मानाचा आहे, हे विसरू नये. आता शिकलेल्या, करिअरिस्ट मुलींची ही पहिली प्राधान्याची गोष्ट ठरू लागली आहे, हे तरुण मुलांनी विचारात घ्यायला हवं.

जीवनसाथमधे चालणाऱ्या अभ्यासाचा विवाहितांना तर उपयोग होतोच, पण अविवाहितांनादेखील खूप उपयोग असतो. पण त्यांना ते समजत नाही. त्यांच्या घरच्यांना अभ्यासाचं महत्त्व कळण्याचं प्रमाण तर फार कमी आहे.

विवाह अभ्यास मंडळामुळे जुगाराचा अंश खूप कमी होतो, एवढंच माझं म्हणणं आहे. प्रश्न येतील, पण ते सोडवण्याची कुवत वाढेल, एवढाच मुद्दा आहे. लग्न कोणाशी करायचं याचा निर्णय म्हणजे एकमेकांच्या अंतर्गुणाच्या ओळखीमुळे आपलं जुळण्याची शक्यता जास्त आहे आणि तो निर्णय अमलात आणणं म्हणजे प्रत्यक्ष लग्न आहे.

●

## 24) निवडक गटाचं जोडीदाराच्या निवडीसाठी सहसमुपदेशन

सहसमुपदेशन या शब्दासरशीच नेहमीच्या मिश्रगट आणि वैयक्तिक समुपदेशनापेक्षा हा काहीतरी निराळा प्रकार आहे हे लक्षात येतं. या प्रकारात मी मुख्य समुपदेशक असतो आणि गटात भाग घेणारे सगळे जण एकमेकांचे समुपदेशक असतात. त्या गटातल्या प्रत्येकाचा एकच प्रश्न असतो. तो सोडवण्यासाठी सगळे जमलेले असतात.

निवडक छोट्या गटाचं समुपदेशन याविषयी आणखी थोडं सांगतो. जास्तीतजास्त वेळांना 'जोडीदाराचा शोध' याविषयीच याची गरज वाटते. बिनसलेले कौटुंबिक संबंध, घटस्फोटितांचा पुनर्विवाह, हट्टी मुलांचं पालकत्व, लैंगिक संबंधात अपरिपक्वता अशा विषयांच्यावरही सहसमुपदेशन बैठका होतात. आत्ता मात्र आपण जोडीदाराच्या निवडीबद्दल सहसमुपदेशन कसं चालतं ते बघणार आहोत. अगदी सुरुवातीच्या बैठकीला जमलेल्या लोकांना या 'गेश्टाल्ट' पद्धतीच्या 'ग्रुप को-काउन्सेलर मीटिंगची' नियमावली समजावून सांगावी लागते. त्यातला सर्वांत महत्त्वाचा नियम म्हणजे त्याच विशिष्ट लोकांनी ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या वेळी नियमितपणे गृहपाठ करून हजर राहणं. हा नियम ऐकल्यावर काही लोक गळतात. त्यानंतरच्या बैठकांच्यात देखील एखादं-दुसरी जोडी किंवा सदस्य नियमाविरुद्ध जाऊन गळू शकतो.

उरलेल्या लोकांच्यात योग्य संख्येनी स्त्रिया आणि पुरुष असायलाच हवेत, कारण ते एकमेकांचे समुपदेशक होणार असतात. प्रत्येक प्रश्नाबद्दल स्त्रियांचा आणि पुरुषांचा दृष्टिकोन निराळा असू शकतो. हे सगळं सूत्रधाराच्या म्हणजे जीवनसाथमधे माझ्या मदतीनी होणार असतं. सगळ्यांना समुपदेशकाच्या भूमिकेविषयी समजावून सांगावं लागतं. समुपदेशक म्हणजे सल्लागार नाही, मध्यस्थ नाही, वकील नाही, न्यायाधीश नाही. जे सुप्त मनात आहे, ते व्यक्त करायला मदत करणारा म्हणजे समुपदेशक.

प्रथम प्रत्येकानी जीवनसाथ विवाह अभ्यासमंडळानी बनवलेला एक फॉर्म भरायचा. तो फॉर्म बाह्यगुणांबरोबर अंतर्गुणांबद्दल असल्यामुळे तो घाईघाईनी खरडून दिलेला चालत नाही आणि खरं म्हणजे तसं शक्यही नसतं. तो फॉर्म

या लेखात दिलेला आहे. वाचताना विवाहितांनी देखील तो फॉर्म भरून स्वतःच्या लग्नानंतरच्या आयुष्यात आपली परिस्थिती जाणून घेण्यासाठी तो भरावा. त्यानंतर मी सगळ्यांना एक गोष्ट समजावून सांगतो ती अशी.

सध्या खूप मुलं-मुली ओळखीची असली तरी जोडीदार शोधणं सोपं नाही. ही परिस्थिती खूप गुंतागुंतीची आहे म्हणून तर तुमची ही धडपड चालू आहे. थोडक्यात, ही परीक्षा कठीण आहे. एरवीच्या आयुष्यातला नियम या ठिकाणी लागू करायला लागणार. जेवढा कठीण पेपर, जेवढा महत्त्वाचा विषय, तेवढा जास्त आणि पद्धतशीरपणी अभ्यास करावा लागतो. या अभ्यासात सातत्य पाहिजे. आधी आळस आणि परीक्षा जवळ आली की रात्रभर अभ्यास, जागरण, त्यामुळे निर्माण झालेल्या तब्येतीच्या तक्रारी या पद्धतीनी अभ्यास चुकीचा आहे. सध्या जोडीदाराच्या निवडीच्या अभ्यासात सातत्य नाही. आईवडील या विषयावर वारंवार बोलायला लागले की, झटका आल्यासारख्या दोन-तीन मुली किंवा मुलं नाइलाजानी बघायची, त्या अनुभवानी निराशेचा झटका आला की स्थळं पहाण्याच्या पुढच्या झटक्यामधे ६-८ महिने काही हालचाल न करता गेलेले असतात. त्यामुळे या सगळ्या मोहिमेचा कार्यक्रम ठरवून त्याच्या कागदपत्रांची फाईल बनवून शिस्तशीर काम करायला हवं.

वधू-वर सूचक मंडळांकडे सकारात्मक दृष्टीनी बघून स्थळांच्या यादीची फाईल बनवून, एकेका स्थळाला पद्धतशीरपणी गाठून त्याच्या नोंदी करणं. इंटरनेटचा वापर करून त्यांना जीवनसाथ फॉर्म भरायला पाठवणं आणि या सगळ्यावरून आपलं लग्न न ठरण्याचं शब्दांत मांडण्याजोगं कारण स्पष्ट करणं. आणि अर्थात, सध्याच्या ग्रुपच्या साहाय्यानी उपाय शोधणं, एवढं आपल्याला करायचं आहे. प्रत्येकाचा एक एक दिवस, त्यापूर्वी पद्धत समजावून घेण्याचा एक दिवस आणि शेवटी प्रत्येकानी काय 'ॲक्शन प्लॅन' ठरवला ते सांगण्याचा एक दिवस एवढे दिवस या 'गेश्टाल्ट ग्रुप'ला वेळ काढावा लागतो.

आता जोडीदाराच्या निवडीच्या निवडक गटाच्या सहसमुपदेशनात काय विषय येतात, त्याचं उदाहरण देतो. पहिली गोष्ट सगळ्यांना सांगावी लागते की, दुसऱ्याला न दुखावता स्पष्ट मुद्दा मांडायला लागा. काही उदाहरणं घेऊन ते समजावून सांगावं लागतं. आपण परक्या, अनोळखी व्यक्तीशी वागताना जे 'मॅनर्स' वापरतो ते वापरायला लागा. अमुक एका गोष्टीबद्दल स्पष्ट बोललं तर 'तुम्हाला राग नाही ना येणार?' अशासारखी वाक्यं, 'माफ करा', 'धन्यवाद',

अशा शब्दांचा वापर करण्याचा सराव करा. अनोळखी माणसाशी योग्य संभाषणासाठी निदान सुरुवातीला त्याची जरूर असते. नंतर तुम्ही काय बोलायचं ते तुमच्या स्वतःच्या धोरणानुसार ठरवा.

पुढचा प्रश्न – जमलेल्या गटासमोर किती वर्षं जोडीदाराचा शोध चालू आहे ते स्पष्ट सांगा. किती लोकांनी नकार दिले, तुम्ही कितींना नकार दिले ते सांगा. किती प्रेमभंग झाले, त्याची कारणं, हे स्पष्टपणी सांगा. त्याचा अर्थ स्पष्ट आहे. विचारप्रक्रियेत काहीतरी चुकत असलंच पाहिजे. तुम्ही अविकृत (नॉर्मल) आहात, बुद्धिमान आहात, चांगलं जगण्याची तुमची इच्छा आहे. त्यामुळे वागणुकीतल्या चुका दुरुस्त करण्याचीच फक्त खोटी आहे.

एकाच वेळी 3-4 मुलांशी किंवा मुलींशी बोलणं चालू असलं तर त्यात काही गैर नाही. प्रवेशाची खात्री नसल्यामुळे जसे 3-4 कॉलेजेसमधे अर्ज करून ठेवतात, नोकरीसाठी एकाच वेळेला 3-4 अर्ज एकाच काळात पाठवलेले असतात, तसंच याला समजा. मुळात अमुक स्थळाशी जुळेल न जुळेल याची शक्यता 50-50% असते, हे लक्षात येत नाही. आपल्याला तो मुलगा किंवा मुलगी आवडली की 99% हो धरून चालून इतर स्थळांकडे दुर्लक्ष, असं होतं. ही चूक मी माझ्या स्वतःच्या आयुष्यात केली होती आणि नाही ठरलं त्याला मी प्रेमभंग समजलो. प्रत्यक्षात त्या मुलीचं माझ्यावर तेवढं प्रेम नव्हतंच.

पुढचा मुद्दा असा की, आकर्षण वाटत असलं तर पुढाकार कोणी घ्यायचा, याबाबतची भूमिका चुकीची असते. आपण जागच्या जागी थांबून रहायचं नि दुसऱ्यानी आपणहून आपल्याला विचारावं अशी अपेक्षा असते. दोघं आपापल्या जागी पुतळे म्हणून उभे राहिले तर काय होणार, हे मी सांगायला नको. याचं मुख्य कारण 'नकाराची भीती'. शाळेमधल्या वर्गातल्या शिक्षणापासून, घरातल्या संस्कारात दुसऱ्याकडून नकार कसा घ्यायचा, हे शिक्षण राहून गेलेलं असतं. नकार देण्याची पद्धत आणि नकार घेण्याची पद्धत याबद्दल जीवनसाथमधे सविस्तर चर्चा असतात. सारांशात, त्याबद्दलचा उल्लेख इथे पुरेसा आहे. नकार चांगल्या शब्दांत, माफी मागून, खऱ्या कारणासकट द्यायचा आणि नकार घेताना देखील कारण विचारण्याइतपत भावनेचा तोल सांभाळायचा. लगेच हिरमुसलं होऊन 'आता यापुढे मुलींच्या/मुलांच्या भानगडीतच पडणार नाही' असा निश्चय करायचा नाही.

जीवनसाथचा जोडीदार निवडण्यासाठीचा फॉर्म नीट भरायचा, याविषयी

आपण मगाशी बोललोच. त्यामधे दिलेला गुणतक्ता निवडक गटाच्या सल्लामसलतीनी भरायचा. समजा, त्या गुणांची बेरीज 100 पैकी 65 झाली, तर या सध्याच्या लग्नाच्या बाजारात आपल्याला 65 टक्क्यांच्या आसपासच्या गुणवत्तेची मुलगी किंवा मुलगा मिळणार, एवढं तर स्पष्ट झालं! डोक्यातल्या भलत्या कल्पना काढून टाकण्यासाठी याचा फार उपयोग होतो. मुलगे आणि मुली कशा पद्धतीनी विचार करतात हे कळतं, ते महत्त्वाचं. अनेक मुला-मुलींशी मैत्री असली, चहा-खाणं यासाठी अनेकवेळेला एकत्र भेटणं होत असलं, तरी जोडीदाराच्या निवडीबद्दल मुलगे काय विचार करतात, याची मुलींना माहिती नसते आणि मुली कसा विचार करतात, हे मुलग्यांना माहिती नसतं.

जोडीदार निवडीबद्दल जे लोक निर्णय घेऊ शकत नाहीत त्यांच्या मुख्य अडचणी काय असतात, ते बोलणं होतं. त्या सगळ्या अडचणी पुढच्या चर्चेत सुटतात. त्या अडचणी अशा–

1) कुठच्याही बाबतीत अडलं की इतर पर्याय शोधावे लागतात. ते पर्याय माहिती नसतात.
2) निर्णय कायम स्वतःलाच घ्यावा लागतो, हे मूलतत्त्व माहिती नसतं.
3) परिस्थिती, नियती, प्राक्तन वगैरे सोईस्कर शब्द वापरून ही माणसं निर्णय सतत पुढे ढकलतात.
4) दुसऱ्याच्या आयुष्याचे निर्णय स्वतः घेणारे काही लोक असतातच. ते यांना भेटतात. त्यामुळे यांचा निर्णय होतो.

असा आणखी एक निर्णय पक्का करावा लागतो, तो म्हणजे अंतिम निर्णय स्वतःच घ्यायचा. आईवडील, समुपदेशन गटातली मुलं-मुली, मी, ही सगळी फक्त निर्णयाला मदत करणारी माणसं आहेत. निर्णयप्रक्रिया, त्याचं मानसशास्त्र आणि अंतिम निर्णय कोणाचा, यावर जीवनसाथ विवाह अभ्यासमंडळामधे वारंवार चर्चा होते.

जोडीदार निवडीच्या बाबतीत काही चूक झाली तरी त्याची जबाबदारी आपल्यावर नको, या कल्पनेनी मुलं-मुली आईवडलांमागे लपताना दिसतात.

प्रत्यक्षात हा भ्याडपणा आहे नि ‘इमॅच्युरिटी’चं ते मुख्य लक्षण आहे. अगदी पोटातली भीती अशी असते की, नेमका दुर्गुणी जोडीदार आपल्या वाट्याला आला तर? म्हणजे नाकर्ता, व्यसनी, बाहेरख्याली, दुष्ट, खुनशी, टोकाचा आत्मकेंद्री, टोकाचा विरक्त किंवा अगदीच अपरिपक्व, आईवडलांचं अपरिपक्व पण मोठ्या वयाचं कुकुलं बाळ. या सगळ्या वर्णनाचे पुरुष संख्येनी बरेच दिसतात. स्त्रिया कमी. पण हा धोका टाळायचा विवाह अभ्यासमंडळ हा एकच मार्ग असू शकतो.

या संदेशासाठी एक खेळ जीवनासाथमधे काही वेळेला घेतलेला आहे. स्त्री-पुरुष जोड्या करायच्या. संख्येमधे कमी-जास्त झालं तर कार्यकर्त्यांनी भाग घ्यायचा. एकाच व्यक्तीनी दोघांशी/दोघींशी बोलायचं. साधारण 5-7 मिनिटं एकमेकांविषयी माहितीची देवाणघेवाण झाली की त्या व्यक्तीशी का लग्न करू शकत नाही, याची कारणं सांगायची. अगदी क्वचित असंही होतं की दोघं म्हणतात, ‘लग्न करू शकत नाही’ असं आम्हाला वाटत नाही. काही झालं तरी अभ्यास होतोच. डोक्यात प्रकाश पडतोच.

जोडीदाराची निवड या विषयावर मला काही मूलतत्त्वांविषयी सलग भाषणासारखं बोलावं लागतं. ते मुद्दे असे–

1) आपल्यापैकी प्रत्येकजण सर्व गोष्टी स्वतःच्या समाधानासाठी करतो. मी हे बायको-मुलांसाठी करतो वगैरे खोटं नाही, पण नीट चिंतनानंतर हे पटतं की, त्यांच्यासाठी काहीतरी करणं हे सुद्धा त्यामुळे स्वतःला बरं वाटावं म्हणूनच असतं.
2) निराळं म्हणजे वाईट नाही. जोडीदार दुसऱ्या कुटुंबातून आलेला असल्यामुळे तो स्वभावानी, सवयीनी निराळा असेलच. आपल्या दृष्टीनी जर तो निराळा म्हणून वाईट असला, तर त्याच्या दृष्टीनी स्वतः निराळा म्हणजे वाईट ठरणार.
3) स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रकार स्वतःला कळणं, ही निर्णयाची पहिली पायरी आहे. दुसऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रकार कळला की होकारार्थी किंवा नकारार्थी निर्णय होतो. अर्थात, त्यापूर्वी स्वतःच्या आणि दुसऱ्याच्या मर्यादा कळायला हव्यात.

4) एखादा माणूस प्रश्नाचं उत्तर न देता गप्प बसला तर त्याची एवढीच कारणं असू शकतात, अ) न्यूनगंड, ब) अहंगंड, क) विचारहीनता. याखेरीज ऐकू न येणं, लक्ष नसणं, हेही असू शकतं.
5) सारासार विचार हा माणसाचा सर्वोच्च गुण आहे. त्याची व्याख्या म्हणजे दुसऱ्याचं म्हणणं लक्षपूर्वक ऐकून, समजून घेऊन त्यावर विचार करण्याची तयारी.
6) दोन प्रकारची माणसं असतात. करणारी किंवा करवून घेणारी. दोन्हीचा योग्य मेळ घालू शकणारी माणसं समाधानी संसार करू शकतात. एकजण तसा असला तर मध्यम दर्जाचा संसार कसाबसा निभावता येतो. दोघंही करणारी असली तरी अडचण येत नाही, पण दोघंही करवून घेणारी असली तर अवस्था कठीण होते.
7) प्रश्न आपोआप सुटत नाहीत. प्रश्नांचं उत्तर शोधून त्याची व्यवस्था करण्याचं आपलं कौशल्य वाढवावं लागतं.

या विषयाबद्दलचा एक खेळ आत्तापर्यंत बरेच वेळेला घेतलेला आहे. जमलेल्यांपैकी अमुक माणसाशी चांगली मैत्री होऊ शकेल असं सांगून त्याची कारणं सांगायची. प्रत्यक्षात खेळताना आपल्याला स्वतःला काय आवडतं, कुठच्या प्रकारची व्यक्ती आवडते, हे ती व्यक्ती सांगत असते.

अंतर्गुणांच्या या तपासणीत नेमकं काय तपासायचं आहे आणि किती तपासणी करून केव्हा थांबायचं, याचं मार्गदर्शक तत्त्व मी सांगतो. ती तत्त्वं अशी–

1) लग्नापूर्वी वैद्यकीय तपासणी अत्यंत महत्त्वाची आहे.
2) मिळकत, बचतीच्या सवयी, कामाच्या जागेवर सहकाऱ्यांशी, वरिष्ठांशी, कनिष्ठांशी वागणूक कशी, याची माहिती काढण्यासाठी सहकाऱ्यांशी बोलणं आवश्यक आहे.
3) समानतेची समज किती, हे कळायलाच पाहिजे. त्यासाठी मित्रांशी, नातेवाइकांशी ओळख करून घेणं, वाढवणं, हेही आवश्यक आहे.
4) विवाह अभ्यास आवश्यक आहे, ही गरज पटणं, ही परीक्षाच आहे. त्यासाठी 'लग्न पहावं करून' हे पुस्तक वाचायला देणं, त्यात व्यक्त केलेल्या विचारांबद्दल चर्चा आणि त्यापुढे विवाह अभ्यासमंडळात नियमित येणं, ही परीक्षा आहे.

5) एवढ्या सगळ्या चाळण्यांतून सुटूनही तरी फसवणारा महापुरुष, महास्त्री कोणी भेटलीच तर आपलं नशीब समजायचं, पण एवढे प्रयत्न करायलाच पाहिजेत.

या सगळ्या जोडीदाराच्या शोधाच्या प्रवासात प्रेमभंग झाला तर ते खरं म्हणजे 'क्वालिफिकेशन' वाढणं आहे, हे समजून घ्यावं. दुसऱ्याला आपण का पसंत पडलो नाही, हे कळणं म्हणजे वैवाहिक जीवनातलं ज्ञान वाढणं असतं.

प्रत्येक विषयात खोलवर विचार केलेला असणं शक्य नाही. तसंच सगळे लोक सारखे आग्रही नसतात. खरं तर ज्यांचा कशाबद्दलच आग्रह नाही अशी दोन माणसं विवाहानी एकत्र आली तर काही अडचण होणार नाही. दोघांपैकी एकजण आग्रही आणि दुसरी व्यक्ती पाण्याच्या रंगाची असली तरी संसार धकेल. पण नवरा-बायको दोघंही आग्रही असले नि त्यांचे आग्रह परस्परविरोधी असले तर मात्र कठीण आहे.

जीवनसाथनी एक तक्ता बनवलाय. भावी जोडीदाराच्या नजरेतून आपल्या स्वतःबद्दल काय वाटतं, ते स्वतः लिहायचं. मगाशी याचा उल्लेख केला होता. तो तक्ता आता इथे देतो. इतरांच्या दृष्टिकोनातून स्वतःचं स्थळ कसं असेल, याचा विचार करून स्वतः स्वतःला दिलेले गुण.

| इतरांच्या दृष्टिकोनातून स्वतःचं वर्णन | 5 पैकी गुण | इतके गुण देण्याचे त्रोटक कारण |
|---|---|---|
| 1. स्वतःचं बाह्यरूप (चेहरा, शरीरयष्टी) | | |
| 2. स्वतःचं आरोग्य (असेल तर व्यंगासकट विचार करून) | | |
| 3. स्वतःचं शिक्षण (डिप्लोमा, डिग्री, विविधता इ.) | | |
| 4. पैसे मिळविण्याची क्षमता (सध्याची लाट लक्षात घेऊन) | | |
| 5. सध्याच्या कामाचं स्वरूप (वेळ, ठिकाण, प्रवास इ.) | | |

| इतरांच्या दृष्टिकोनातून स्वतःचं वर्णन | 5 पैकी गुण | इतके गुण देण्याचं त्रोटक कारण |
|---|---|---|
| 6. सध्याची दर महिन्याला सरासरी मिळकत | | |
| 7. वडिलोपार्जित मालमत्ता (घर + गुंतवणुकी) | | |
| 8. स्वतःचं वय | | |
| 9. कला,छंद यांची आवड, स्वतःची गुणवत्ता (सरासरी समाजाचा विचार करून) | | |
| 10. आधुनिक, पारंपरिक विचारसरणी, लग्नसमारंभ (सध्याच्या समाजाचा विचार करून) | | |
| 11. पत्रिकेबद्दलची भूमिका (पूर्ण विश्वास/अविश्वास/ अनिर्णित) ईश्वरभक्ती, धार्मिकता, जात याबद्दलचे आग्रह किंवा उदारता (सध्याच्या समाजाच्या दृष्टिकोनातून) | | |
| 12. आसपासच्या सर्व वर्गांतल्या समाजाविषयी आत्मीयता (स्वतः कल्पना करून) | | |
| 13. स्त्री-पुरुष समानता, लोकशाही प्रवृत्ती याची समज, हुंडा (स्त्री असो किंवा पुरुष) | | |
| 14. घरकाम, मुलांचा सांभाळ याची तयारी, आवड (स्त्री असो अथवा पुरुष) | | |
| 15. समजूतदार स्वभावाचे जवळचे नातेवाईक (आई-वडील, भावंडं इ.) | | |
| 16. स्वतःला असलेलं एखादं व्यसन (पान, सिगरेट, तंबाखू, दारू + इतर) | | |
| 17. जोडीदाराला समजून घेण्यासाठी लागणारा धीर, संयम, सारासार विचार (स्त्री किंवा पुरुष) | | |

| इतरांच्या दृष्टिकोनातून स्वतःचं वर्णन | 5 पैकी गुण | इतके गुण देण्याचं त्रोटक कारण |
|---|---|---|
| 18. दुसऱ्यावर विश्वास टाकण्याची तयारी (सुरुवातीच्या तपासणीनंतर) (स्त्री किंवा पुरुष) | | |
| 19. जोडीदारावर प्रेम करण्याची कुवत (स्त्री किंवा पुरुष) | | |
| 20. अडचणीच्या प्रसंगी मार्ग काढण्याची धमक (स्त्री किंवा पुरुष) | | |
| एकूण 100 पैकी गुण | | |

मागे मी म्हणालो त्याप्रमाणे जेव्हा जेव्हा प्रश्नावली भरण्याचा प्रश्न आला तेव्हा स्पष्टपणी समोर आलं की, मुली जास्त मनापासून उत्तरं लिहितात. मुलं उत्तरं डफरावून देतात. ह्याची कल्पना नव्हती असं नाही, पण तरी ते खूप खटकलंच. आपल्याला कसा नवरा मिळेल, आपल्या शिक्षणाचं काय होईल, अशा गोष्टींचा विचार मुली करायला तयार आहेत. पण मुलांना कुठचाही प्रश्न पडलेला नाही. याचं कारण उघड आहे. कशीही मुलगी असो, तिला आपण आपल्या पद्धतीनी वळवून घेऊ, अशी मुलांना खात्री वाटतेय आणि हे मान्य असलेल्याही मुली आहेतच की!

या प्रश्नावलीमधे शिक्षण, व्यासंग, आरोग्य, आजार, व्यायाम, आहाराच्या सवयी, स्वभाववैशिष्ट्यं, पैशाबद्दलची विचारसरणी, बचतीच्या सवयी, समानतेसंबंधीचे विचार, स्त्री-पुरुष समानतेची संसारातली जागा, कुटुंबाबद्दलचे प्रश्न, मुलांबद्दलच्या कल्पना, लग्नसमारंभाबद्दलच्या कल्पना, देवधर्म, जात, रूढी, कर्मकांड, पत्रिका याबद्दलच्या कल्पना, अशा अनेक गोष्टींचा समावेश आहे. हे प्रश्न विचारायला पाहिजेतच याबद्दल सगळ्यांचं एकमत झालं. पण या प्रश्नांची उत्तरं देण्याइतका विचार मात्र मुला-मुलींनी केलेला नाही असं लक्षात आलं.

अशा निरनिराळ्या विषयांना सुरुवात झाली की, आणखी प्रश्न निर्माण होतात. पण नवरा-बायको दोघांनी मिळून अभ्यासाच्या साहाय्यानी ते सोडवण्यात

जास्त आनंद आहे, हे कळायला लागतं. आपोआप सगळं 'शुभ-मंगल' होत नाही. त्यासाठी दोघांनी मेहनत घ्यायला हवी आहे, हे कळतं. अशा या अभ्यास-परिवर्तनाचा परीघ सध्या तरी छोटाच आहे. पुणं-मुंबई, महाराष्ट्रातली शहरं आणि त्यातले अस्सल विचाराच्या वाटेनी यायला तयार असलेले लोक, एवढाच.

जोडीदार शोधणाऱ्या प्रत्येकानी आणखी एक महत्त्वाचा विचार केला पाहिजे. जोडीदाराला आपण काय देऊ शकतो, हा तो विचार.

खरा प्रश्न आपण दुसऱ्याला आवडलो का नाही, हा आहे. दुसरा आपल्याला आवडतो का नाही, याला कमी महत्त्व आहे; असा एक हिंदी सिनेमातला 'डायलॉग' आपण या वेळेला ऐकला आहे, मला ते पटत नाही. दोघं एकमेकांना मनापासून आवडणं, हेच आवश्यक आहे.

मगाशी उल्लेख केल्याप्रमाणे आणखी एक गैरसमजूत अनेक मुला-मुलींच्यात आढळते. सगळं सारखंच सारखं यानी संसार सुखाचा होईल अशी त्यांची कल्पना असते. शारीरिक व्यंगाच्या बाबतीत हे खरं ठरू शकतं. एका पायानी थोडा अधू असणाऱ्या मुलानी ठरवून थोडं हातात व्यंग असलेल्या मुलीशी लग्न ठरवलं. समजण्याजोगं आहे. पण स्वभाव, सवयी याबाबतीत ते खरं नाही. जोडीदारामधे आपल्यात नाहीत ते पूरक, पण वरवर पाहता निराळे असे गुण असू शकतात आणि त्याचा समाधानी संसाराला उपयोगही होतो. 'विजोड जोडी विधाता' असं एक प्रसिद्ध वचनच आहे. पण त्याचा खरा अर्थ, कुठचीही दोन माणसं एकसारखी असूच शकत नाहीत असा आहे. सारखी दिसणारी जुळी भावंडंही स्वभावानी निराळी असतात. ते निराळेपण शोधणं आणि त्यासाठी उपाय करणं, हाच योग्य मार्ग आहे.

•

## 25) जोडीदार ठरल्यावर लग्नापूर्वीची बौद्धिक चाचणी (मॅरेज मॅच्युरिटी इंडिकेटर)

माझ्याकडे लग्नापूर्वी जोड्या येतात आणि सल्ला मागतात. एकमेकांशी लग्न करायचं अशी त्यांची इच्छा असते. खरं म्हणजे दोघांना एकमेक आवडले असले तर नाही म्हणणारा मी कोण? मी एकच काम करू शकतो.

मी तयार केलेली एम.एम.आय+आर.क्यू. टेस्ट त्यांना देतो. त्या जोडप्याला लग्नानंतरच्या आयुष्यात कुठच्या बाबतीत प्रश्न येणार नाहीत आणि कुठच्या बाबतीत प्रश्न येऊ शकतील, हे मी त्यावरून सांगतो. अशा निवडक विषयांचा जास्त अभ्यास करायला लागणार, एवढाच त्याचा अर्थ असतो. या पुस्तकसंचामधे 'व्यक्तिमत्त्वाचे 6 प्रकार' नावाचा लेख आहे. त्यामधे ही टेस्ट दिलेली आहे. ही टेस्ट माझ्या डॉक्टरेटच्या अभ्यासासाठी मीच बनवलेली आहे.

●

*मी तयार केलेली एम.एम.आय+आर.क्यू. टेस्ट त्यांना देतो. त्या जोडप्याला लग्नानंतरच्या आयुष्यात कुठच्या बाबतीत प्रश्न येणार नाहीत आणि कुठच्या बाबतीत प्रश्न येऊ शकतील, हे मी त्यावरून सांगतो. अशा निवडक विषयांचा जास्त अभ्यास करायला लागणार, एवढाच त्याचा अर्थ असतो. या पुस्तकसंचामधे 'व्यक्तिमत्त्वाचे 6 प्रकार' नावाचा लेख आहे. त्यामधे ही टेस्ट दिलेली आहे. ही टेस्ट माझ्या डॉक्टरेटच्या अभ्यासासाठी मीच बनवलेली आहे.*

# 26) अविचाराची शक्यता

आणखी एक शक्यता असते. सर्वसाधारणपणी सारासार विचारांनी वागणाऱ्या मुला-मुलींनाही आपल्या समाजात स्त्री-पुरुष निकट सहवासाचा अनुभव नसतो. पाश्चात्त्य समाजात लैंगिक संभोगाचा अनुभव फार लवकर सुरू झाल्यामुळे अनेक विकृती जन्मलेल्या आहेत हेही खरं आहे. प्रश्न समतोल साधण्याचा आहे.

याउलट आपल्याकडे स्त्री-पुरुष मैत्रीचाही अनुभव नसल्यामुळे जवळिकीतून विवेक आंधळा बनण्याची शक्यता असते. लग्न ठरल्यानंतर लग्न होण्याच्या मधल्या काळात मुलगा-मुलगी दोघंच बाहेर हिंडतात, खातात, एकाच दुचाकी वाहनावरून जातात. स्पर्श होतात.

काही मुली लग्न ठरवण्यासाठी उतावीळ असतात. अशा अधीर मुली विकृत मुलांना बरोबर कळतात. ते त्या मुलींचा गैरफायदा घेण्याच्या हेतूनी भलभलत्या असभ्य सूचना करतात. अटीही घालतात. अशा सूचना मान्य केल्यामुळे लग्न जमेल, हे खरं नाही. असं लग्न न ठरण्याची शक्यताच जास्त असते.

ज्या गोष्टी तपासायच्या, विचारायच्या, बोलायच्या असतात त्या निसटतात. आकर्षणामुळे त्यांचा उल्लेख राहून जातो. स्त्री-पुरुष ओढीमुळे खरा विचार करणारे बुद्धीचे पैलू तात्पुरते काम करीनासे होतात. यासाठी आणखी एक गोष्ट आवश्यक आहे. अशा बैठका घरीच घ्याव्यात. मुलगा-मुलगी यांना दोघांनाच बोलण्यासाठी घरात तेवढी जागा करून द्यावी. हे शक्य नसलंच तर रेस्टॉरंटमधे भेटावं. पण दोघांनी स्वतंत्रपणे ठरलेल्या ठिकाणी परस्पर जमावं किंवा दोघांनी कुठेतरी प्रवास करून दिवसभर हिंडून यावं. त्यासाठी पब्लिक ट्रान्सपोर्ट वापरावा.

मुंबई-पुणे हे अंतर 3 तासांच्या आसपासचं म्हणजे मध्यम अंतर आहे. कुठच्याही गावी तुम्ही असलात तरी असं अंतर निवडावं. रेल्वे जास्त बरी. कारण समोरासमोरच्या सीट्सचं रिझर्व्हेशन करता येतं. बसमधे शेजारीच बसावं लागतं. त्यामुळे खूप गैरसोय होते. मुंबई किंवा पुणे ही मोठी शहरं असल्यामुळे ओळखीचं कोणी भेटण्याची शक्यता कमी होते. एकमेकांशी प्रश्नावलीतले मुद्दे बोलण्यासाठी असं एकदाच काय, जास्त वेळाही जायला हरकत नाही.

यानी दोन्ही गोष्टी साध्य होतात. अनावश्यक स्पर्शामुळे मानसिक सापळे

तयार होत नाहीत, विचार बाजूला पडत नाही आणि एकमेकांबरोबर फिरल्याचा समाजात बोलबालाही होत नाही. लग्न ठरण्यापूर्वी तर ही पथ्यं फार महत्त्वाची ठरतात. लग्नाची तारीख ठरल्यानंतरही या अविचाराची आईवडलांना काळजी असते, याविषयी विचार करावा.

कुठच्याही परिस्थितीत, 'खरं म्हणजे ही व्यक्ती मनापासून पसंत पडलेली नसताना, मानसिक सापळ्यामुळे, स्पर्शांच्या बंधनांमुळे आता होकार देण्यावाचून इलाज नाही' अशी स्वतःची अवस्था होऊ देऊ नये.

एक स्वतंत्र गोष्ट मला माहीत नव्हती, पण कोणी कोणी सांगितली, ती मी तुम्हाला सांगतोय. हिंदू धर्मानी धर्मबांधव वाढवण्यासाठी आक्रमक धोरणं कधी आखली नाहीत, पण ख्रिश्चनांनी जसं अनेक हिंदूंना बाटवून ख्रिश्चन करून घेतलं तसं मुस्लिमांनीही निराळ्या पद्धतीनी धर्मप्रसार केला, त्याचं नाव 'लव्ह जिहाद'. प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे मुस्लिम तरुण हिंदू मुली, विवाहित स्त्रियांना योजनापूर्वक जाळ्यात ओढून मुस्लिम बनवून घेतात, त्याला असं नाव ठेवलेलं आहे. हे एवढ्यासाठी आपण बोलतोय की चुकून कोणी अशा धर्माच्या आक्रमणाला बळी पडू नये.

आणखी एक निराळा प्रश्न असू शकतो. काही व्यक्ती 'पॅशनेट' असतात. त्यांच्या भावनांचा जोर, आकर्षणाचा जोर विवेकाच्या ब्रेकपेक्षा जास्त असतो. अशा मंडळींनी तर जास्त काळजी घ्यायला पाहिजे. प्रेमाच्या कल्पनेवरचं प्रेम फारसं टिकाऊ नसतं. आणि नवरा-बायकोमधलं खरं निरपेक्ष प्रेम निर्माण व्हायला बराच काळ लागतो. खरं तर वैवाहिक जीवनाच्या सुरुवातीचं असतं ते प्रेम नसतंच. ते आकर्षण असतं.

उच्च दर्जाच्या प्रेमाच्या कल्पनेवर मुला-मुलींचं प्रेम असलं तर हरकत नाही, पण सुरुवातीला डोळस प्रेम करण्यासाठी भावनाप्रधान, 'पॅशनेट' व्यक्तींनी जास्त काळजी जरूर घ्यायला पाहिजे. अशा व्यक्तींनी शक्यतोवर आपल्या अगदी जवळच्या मित्र-मैत्रिणी, आई, वडील, भाऊ, बहीण यापैकी कोणाबरोबर तरी अशा काळात रोज चर्चा करावी आणि त्यांचा सल्ला घ्यावा. काही लोक मुळातच शांत, संयमी, विचारी आणि संतुलित असतात. त्यांच्या बाबतीत हा धोका संभवत नाही. त्यांना सल्ल्याची गरज कमी असते, पण अनुभवही कमी असतो. त्यामुळे त्यांनीही कोणाचातरी सल्ला जरूर घ्यावा.

●

# 27) लग्न ठरल्यावरची कर्तव्यं

मागे उल्लेख केलेला आणखी एक निराळाच मुद्दाही लक्षात घ्यायला हवा, तो म्हणजे लग्न या विषयाची 5 पर्वं असतात.

पहिलं पर्व – लग्नाचा विचार डोक्यात यायला लागतो, तो जरा उशिरा; पण स्त्री आणि पुरुष या दोन जातींमधे शारीरिक आकर्षण नावाची – इतर सर्व विचारांपलीकडची – गोष्ट असते. हे तर साधारण वयाच्या 10-12 व्या वर्षापासूनच कळायला लागतं. प्रत्यक्ष लग्न ठरेपर्यंत बाविशी-पंचविशी येते. त्यामुळे 'लग्न ठरण्यापूर्वीचा काळ' हे पहिलं पर्व 10-12 वर्षांचं असतं.

दुसरं पर्व – 'लग्न ठरल्यावर, पण लग्न होण्यापूर्वीचं'. लग्नबंधनात अडकण्याच्या आधीचं. हा काळ छोटा असतो. पण माझ्या मते, अधिक अभ्यासाचा (परीक्षा जवळ आल्यावर असतो तसा) असतो.

तिसरं पर्व – लग्नानंतरच्या एक-दोन वर्षांचं.

चौथं पर्व – मुलांच्या पालकत्वाचं.

पाचवं पर्व – 'मुलं लग्नाच्या वयाची होतील तेव्हाचं'

या पाचही पर्वांत अभ्यासाची, आत्मपरीक्षणाची, प्रश्नावलीची जरूर असते; पण लग्न ठरण्यापूर्वी लग्न ठरण्याच्या आशेनी मुलं-मुली, पालक अभ्यासाला जरा तरी तयार होतात. लग्न ठरलं की अभ्यास बंद होतो आणि लग्न झालं की अभ्यासाचं नावही कोणी काढत नाही. मग काही वेळा पुढचे संघर्षपूर्ण विवाह, घटस्फोट, 'काऊन्सेलिंग सेशन्स', मुलांचे हाल, हे सगळं आपण पाहतोच.

दुसऱ्या पर्वाबद्दल, जोडीदार निवडल्यावर, लग्न होईपर्यंतच्या काळाबद्दल सविस्तर सांगतो. कारण आत्ताचा तोच तर मुख्य विषय आहे. त्यामधे भावी वैवाहिक आयुष्यासंबंधीच्या सविस्तर प्रश्नावलीत उल्लेख केलेल्या प्रत्येक विषयाविषयी अधिक सविस्तर चर्चा, खरं तर प्रश्नावलीतल्या सर्व विभागांबद्दल दोघांची एकमेकांशी चर्चा, पुन्हा स्वतंत्रपणी कुटुंबाशी चर्चा, पुन्हा दोघांनी काढलेले निष्कर्ष, एवढं व्हायला पाहिजे. लग्न ठरलं की चर्चा बंद, असंच सगळ्यांना वाटतं, हे मला माहिती आहे. प्रत्यक्षात बरोबर उलट पाहिजे. लग्नानंतरचे वाद टाळण्यासाठी हा अभ्यास असतो, या माझ्या मतामुळे मला

चेष्टेत 'चर्चिल' म्हणतात.

माझ्या मते किमान 10 ते 15 वेळा कुटुंबचर्चांची जरूर असते. वाचणाऱ्यांपैकी बहुतेकांना हे टोकाचं विधान वाटेल हे मला पूर्ण माहिती आहे. असं विधान मुद्दाम केलेलं आहे. एका 'बघण्याच्या' समारंभात निर्णय घेऊन, एकदम 8-15 दिवसांत कार्यालय बुक करून, लग्न उरकून टाकणाऱ्या आपल्या समाजाला भावी जोडीदारांच्या 5-7 बैठका, चर्चा करता आल्या तरी मला समाधान वाटेल. प्रश्नावलीविषयी 2 कुटुंबचर्चा झाल्या तरी मला लढाई जिंकल्यासारखं वाटेल. खूप मुलं-मुली 'आत्ताच वादावादी होईल' याला घाबरून भावी नवऱ्याशी/बायकोशी/सासरशी चर्चा टाळतात. याचा अर्थ, नंतर जी वादावादी होईल त्याला त्यांची तयारी आहे.

लग्न ठरलेले एक मुलगा-मुलगी एकदा सल्ल्यासाठी आले होते. मी त्यांना विवाह अभ्यास ही कल्पना समजावून सांगत होतो. मी त्यांना विचारलं, 'तुम्हाला दोघांना प्रत्यक्ष लग्न होईपर्यंत एकमेकांशी जास्तीत जास्त ओळख करून घेता यावी यासाठी तुम्हाला अभ्यासमंडळ या माध्यमाचा उपयोग होईल. तुमच्या दृष्टीनी लग्नापूर्वी किती वेळ मधे ठेवणं योग्य ठरेल?' दोघांनीही सांगितलं, 'एक महिना खूप झाला.' प्रत्यक्षात सध्याच्या तरुण पिढीसमोर इतक्या गुंतागुंती आहेत की, त्यांना त्याची उकल करायला 6 महिने सुद्धा अपुरे पडतील. पण हे त्यांना पटण्याजोगं नव्हतं. असे बरेच 'कुमार अधीर आणि कुमारी अधिरा' समाजात आहेत.

खरं तर एखाद्या मुलाशी, मुलीशी, कुटुंबाशी आपलं जमणार नसलं तर ते संबंध आता लग्नापूर्वीच तुटणं, हे केव्हाही चांगलं आहे. साखरपुड्यानंतर लग्न मोडलं असं जेव्हा कळतं तेव्हा त्याचा अर्थ असा असतो की, साखरपुड्यापूर्वी एकमेकांविषयी नीट माहिती नव्हती आणि ती माहिती साखरपुड्यानंतर कळली. खूप ठिकाणी साखरपुड्यानंतर मुलगा अरेरावीनी वागू लागल्यामुळे, कुठे मुलीच्या स्त्री-पुरुष समानतेच्या कल्पनांमुळे, कधी सासरच्या इतर मंडळींच्या नवीन कळलेल्या पैलूंमुळे, कधी पैशाच्या समोर आलेल्या खऱ्या परिस्थितीमुळे, कधी आधी लपवलेलं शारीरिक व्यंग लक्षात आल्यामुळे, कधी मानसिक विकृती समजल्यामुळे, काही ठिकाणी लग्नसमारंभातल्या खर्चाच्या मानपानाच्या अपेक्षांमुळे लग्नं मोडतात.

अशा प्रसंगी माझी प्रतिक्रिया नेहमी अशी असते की, ह्या प्रश्नामुळे संपूर्ण वैवाहिक आयुष्य ताणलेलं जाण्यापेक्षा किंवा नीरस होण्यापेक्षा आत्ताच हे लग्न

मोडणं सगळ्यांच्या हिताचं आहे. अशा चर्चांमधे मुलगा आणि मुलगी यांनी आपापले, स्वतःला माहिती असलेले दुर्गुण एकमेकांना प्रश्नावलीत लिहून, सांगून टाकणं जास्त चांगलं. उदा. तापटपणा, आळशीपणा, अव्यवहारीपणा, उशिरा उठणं, आवरायला वेळ लावणं वगैरे वगैरे सुद्धा. या अवस्थेत 'पॉझिटिव्ह फ्रेम' मधे मुलगा-मुलगी असल्यामुळे हे दुर्गुण मान्य होतात. प्रश्नावलीमुळे नंतर लग्नानंतरच्या आयुष्यात 'हे मला माहिती असतं तर मी तुझ्याशी लग्नच केलं नसतं.' अशी विधानं करायला संधी रहात नाही. सारांश, दुसरं पर्व म्हणजे लग्न होईपर्यंतचं पर्व – 'अधिक खरं' बोलण्याचं पर्व आहे. माहिती असलं की निदान उपाय करण्याची गरज कळते.

वर सांगितलेल्या पाचही पर्वांमधे 'मॅरेज एज्युकेशन'ची 'वर्कशॉप्स' नियमित चालतात. अशा सगळ्या मुद्द्यांचा विचार वेळेमुळे शक्य नसला, तर त्यात 'प्रायॉरिटीज' ठरवून घेऊन मुद्दे बोलावेत म्हणजे काही गोष्टी चुकून राहिल्या तरी एवढं बिघडत नाही. या एवढ्या नंतर साखरपुडा, एन्गेजमेंट, रजिस्ट्रेशन यापैकी कुठच्याही पद्धतीनी निर्णयाचा करार करायचा असला तर त्यात गैर नाही. विवाह निबंधक म्हणजे रजिस्ट्रेशन ही एक सोय असते. लग्नाची नोटीस देणं, हाही 'ट्रायपार्टी' करारच. जास्त आधुनिक आणि सामाजिक परिस्थितीशी सुसंगत.

पारंपरिक साखरपुडा, मंगनी, एन्गेजमेंट यांच्यात कुठल्या ना कुठल्या प्रकारचा समारंभ, खर्च, पार्टी गृहीत असते. प्रत्यक्षात अशा समारंभाची, उत्सवीपणाची, खर्चाची खऱ्या वास्तववादी आणि आधुनिक समजदार 'मॅच्युअर' माणसाला गरज नसते. विवाह निबंधकाकडचा अर्ज अगदी पुरेसा असतो. तरी त्यात एक अडचण येते. विवाह नोंदणी कायद्यानुसार अर्ज केल्यापासून कमीत कमी एक महिना विवाह नोंदवता येत नाही आणि अर्जाच्या तारखेपासून जास्तीत जास्त तीन महिन्यांत विवाह नोंदवता येतो. परदेशातून छोट्या सुट्टीत भारतात येऊन लग्न करणाऱ्या लोकांना हा नियम सोयीचा नसतो.

कायदा बदलणं आपल्या हातात नाही, हे मान्य करून अशा लोकांनी भारताच्या एका चकरेत लग्न ठरवावं आणि ६-८ महिन्यांनी पुन्हा येऊन लग्न करावं. मधल्या काळात पत्र, ई-मेल चॅट, स्काइप, फोन चालू ठेवावेत. प्रश्नावली पूर्ण करावी. जोडीदाराच्या निवडीसरशी लगेच लग्न कुठल्याही परिस्थितीत टाळावं. लगेच लग्न कदाचित पैशानी स्वस्त पडेल, पण संसारभर महागात पडेल.

माझ्या मते आणखी एका गोष्टीमधे मुलं-मुली चूक करतात. एखाद्या मुलाला एखादी मुलगी आवडत असते किंवा एखाद्या मुलीला एखादा मुलगा आवडत असतो. त्या व्यक्तीकडून होकार मिळेल, या आशेवर ही मुलं-मुली थांबून राहतात. त्यामुळे दुसऱ्या कोणाचा विचार करत नाहीत. मला ही चूक वाटते. कोणासाठी किती थांबायचं, हे माणसाला ठरवता आलं पाहिजे. कॉलेजमधे जशी प्रवेशासाठीच्या अर्जाची अंतिम तारीख असते तशी कोणासाठी किती थांबायचं, याची अंतिम तारीख ठरवलेली पाहिजे. तेवढ्या काळात उलगडा नाही, याचा अर्थ नकार असाच असतो. फार तर अगदी शेवटचं एकदा विचारावं पण स्पष्ट उलगडा करून घ्यावा.

जोडीदाराच्या शोधासाठी अंतर्गुणांची तपासणी या विषयावर आपण बरंच बोललो. त्याच्यापुढे जाऊन मला असंही वाटतं की, प्रत्यक्ष लग्ननोंदणी करण्यापूर्वी नवरा-बायको आणि त्यांची जवळची कुटुंबं यांनी विवाहाचा लेखी कराराही करून त्यावर सह्या कराव्यात. पुढे आपण लग्नसमारंभ याविषयी बोलणार आहोत तेव्हा विवाहाचा लेखी करार याविषयी देखील तपशिलात जाऊन बोलू.

आमच्या नात्यातल्या एका आजारी माणसाची गोष्ट मला नेहमी आठवते. ताप बरेच दिवस हटेना. मोठ्या डॉक्टरांकडे जायला त्याची बायको घाबरत होती. मुख्य काळजी एकच. काही मोठा रोग निघाला तर? किती अपुरा विचार आहे हा! रोग असला तर लवकर कळू दे म्हणजे इलाज करता येईल. नसला तर आनंद मानता येईल. पण तपासणीला नकार मी समजू शकत नाही; जीवनसाथ विवाह अभ्यासमंडळही अभ्यासाला नकार समजू शकत नाही.

जोडीदाराच्या निवडीविषयी मला माहिती असलेल्या सगळ्या गोष्टी सांगून झाल्या. आता या विषयाच्या कार्यशाळेसाठी उपयोगी असे थोडे खेळ सांगतो.

त्याशिवाय खेळांचं स्वतंत्र मोठं प्रकरण पुढे आहेच.

●

## 28) जोडीदाराची निवड या कार्यशाळेत वापरायचे खेळ

जोडीदाराची निवड हा लेख संपवण्यापूर्वी ज्या खेळांची भट्टी व्यवस्थित जमली असे दोन खास खेळ इथे सांगतो.

**खेळ क्र. 1**

आत्तापर्यंत तीनदा-चारदा निरनिराळ्या सहलींमधे हा खेळ घेतला. त्याचं मी वर्णन करतो आहे. सहल म्हटली की, अगदी थोडे विवाहित, पण बरेचसे अविवाहित त्याच्यामधे येतात. सुरुवातीलाच मी जाहीर करून टाकलं होतं की, विवाहितांना कार्यकर्त्यांच्या भूमिकेत मदत करावी लागेल. हा खेळ फक्त अविवाहितांसाठी आहे. साधारण 40 च्या आसपास सगळे मिळून लोक होते. त्यातले 30-35 अविवाहित, कधी मुलगे जास्त तर कधी मुली जास्त असं होतं. हे सगळं मी 3-4 निरनिराळ्या सहलींचं एकत्रित वर्णन सांगतो आहे.

सगळ्या मुला-मुलींना मी विचारलं की, तुमच्या मते, सध्या ओळखीच्या मुला-मुलींमधे मुलं मुलींच्या मागे लागतात की, मुली-मुलांच्या मागे लागतात? मागे लागणं याचा अर्थ नीट समजून घ्या. पुढाकार घेऊन, धाडस करून मैत्री करशील का, असं विचारणं या अर्थानी आपण मागे लागणं हा शब्द वापरलाय. हा शब्द वापरण्याचा या खेळामधे विशिष्ट उद्देश आहे; तो तुम्हाला खेळ चालू केला की समजेलच. तीनही-चारही वेळेस फार झटपट एकमत झालं की, मुलगेच पुढाकार घेऊन मुलींना विचारतात. कोण कुणाच्या मागे लागतं, हा या पद्धतीनी निकाल लावल्यावर सगळ्यांना सांगितलं की आता हॉलमधे मुलींनी जायचं. सर्व मुलांनी बाहेर थांबायचं. मुलींनी आतमधे जाऊन एका रिंगणामधे गोल करून तोंड आत करून बसायचं. कोणी कुठे बसायचं यावर कसलंही बंधन नाही.

मागे तुम्हाला म्हटल्याप्रमाणे हॉलच्या जागेचा अंदाज, मुला-मुलींच्या संख्येचा अंदाज, कुठच्या ठिकाणी कुठचा खेळ घ्यायचा, हे सगळं मी सहलीच्या ठिकाणी गेल्यागेल्याच बघून ठरवलं होतं. मुलींना सांगितलं की, तुम्ही तशाच अवस्थेत फक्त 2-3 मिनिटं थांबा, एकमेकींशी बोलायला हरकत नाही, खरं म्हणजे तुमच्यावर कसलंही बंधन नाही आणि तुम्ही काहीही करायचं नाहीय.

मगाशी आपलं ठरल्याप्रमाणे मागे लागणारे मुलगे असल्यामुळे ते जे काही करतील त्याचा अर्थ तुम्ही फक्त समजून घ्यायचाय. त्याविषयी नंतर चर्चेला सहलीत तरी वेळ होणार नाही. नंतर जेव्हा आपण पहिल्या रविवारी भेटू तेव्हा मात्र तुम्ही याच्यावर सविस्तर बोललात आणि याचा अर्थ सांगितलात तर मला आवडेल.

मग बाहेर मुलांकडे आलो आणि मुलांना खेळ काय आहे, तो समजावून सांगितला. त्यांना मी असं सांगितलं की, मागे लागणं वगैरे सगळे शब्द विसरून जा. कुठच्याही असभ्य वागण्याला आपण कधीच पाठिंबा देणार नाही. त्यामुळे या खेळामधला मागे लागण्याचा अर्थ एवढाच आहे की, अमुक मुलीशी मैत्री करायला तुम्हाला आवडेल. समजा, तुम्हाला एक नाही पण दोन-तीन मुलींशी मैत्री करावीशी वाटत असेल तरीही माझी हरकत नाही. पण ज्या मुलीशी प्रथम मैत्री करावीशी वाटेल त्या मुलीच्या मागे जाऊन तिच्याकडे बघून तुम्ही नुसतं उभं राहायचंय.

दुसऱ्या किंवा तिसऱ्या मुलीच्या बाबतीत तुम्हाला असं वाटत असलं, तर तिच्यामागे तुम्ही उभं राहण्याऐवजी तुमच्याकडे असेल ती वस्तू नुसती ठेवू शकता. उदा. रुमाल वगैरे. गमतीत मी त्या मुलांना असं म्हटलं, तुम्ही दुसऱ्याकडून ती वस्तू घेतली तरी चालेल, आसपास दिसताहेत त्याच्यापैकी कुठचीही वस्तू चालेल आणि त्या वस्तूवर तुमचं नाव लिहिणं वगैरे प्रत्यक्षात शक्य नसल्यामुळे आणि ते योग्यही नसल्यामुळे आपले कार्यकर्ते याच्या नोंदी ठेवतील.

सगळ्यांना सगळा खेळ कळला का? काही शंका आहेत का? एकानी विचारलं की, एकाच मुलीच्या मागे दोघातिघांना उभं रहायचं असलं तर काय करायचं? असं झालं तर जो पहिल्यांदा जाईल त्यानी तिच्या मागे उभं राहायचं, दुसऱ्यांदा जाईल त्यानी त्याच्या मागे उभं राहायचं. या पद्धतीनी एका मुलीच्या मागे रांग लागली तरी खेळाच्या नियमात काही आडकाठी नाही. आणखीन काही शंका आहेत का? आणखीन काही शंका नसल्यामुळे आता खेळाला सुरुवात करू. हॉलमधे गेल्यानंतर काही शंका विचारायच्या नाहीयत. एकमेकांशी काहीही बोलायचं नाहीय. खरं म्हणजे कसलंही संभाषण या खेळात अपेक्षित नाही.

जे काय प्रत्यक्षात होईल त्याच्याविषयी बोलण्यासाठी आपण पुढच्या महिन्याच्या पहिल्या रविवारी भेटणार आहोत. माझी सूचना तुम्हा सगळ्यांना अशी आहे की, जे प्रश्न असतील ते, जी निरीक्षणं असतील ती तुम्ही लिहून दिलीत तर जास्त बरं होईल. हॉलमधे जाण्यापूर्वी एका मुलानी मात्र विचारलं की,

एखाद्या मुलीचं नाव माहिती नसलं तर? मी म्हटलं, त्याचं उत्तर असं की, कार्यकर्त्यांना सगळ्यांची नावं माहिती असतात. आत्ता तुम्ही खेळ खेळा. ठरल्याप्रमाणे काही न बोलता खेळा आणि खेळ संपल्यावर कार्यकर्त्यांना तुम्ही कुठच्याही मुलीचं नाव विचारू शकता. एका सहलीमधे कार्यकर्त्यांपैकी एकच विवाहित पुरुष माझ्याबरोबर होता. तुला काही शंका वाटताहेत का, असं त्याला विचारलं. तो म्हणाला, अनेक मुलींनाही मुलांची नावं माहीत नसतील.

मी म्हटलं, त्याचं उत्तरही असंच आहे. अमुकअमुक ताईंकडे म्हणजे एका स्त्री कार्यकर्तीकडे सहलीची फी भरलेल्यांची व्यवस्थित यादी होती. त्यांनी बसमधे चढताना अगदी एकेका मुला-मुलीचं नाव पुकारून लहान मुलांच्या शाळेच्या बसमधे एकेकाला चढवतात तसं चढवल्याचं मी बघितलं होतं. खरं म्हणजे मला स्वतःला अगदी सगळ्या मुला-मुलींची नावं माहिती नव्हती. याचं कारण मागे मी सांगितलं तसं विवाह अभ्यास मंडळात येणाऱ्यांची नियमितपणी उपस्थिती नसते. आणि काही काही नियमितपणी येणाऱ्यांची मित्रमंडळीही सहलीत सामील झाली होती.

त्यामुळे त्या माझ्या मित्राला मी म्हटलं की, मला जरी वर्णन करून सांगायचं झालं तरी ती पिवळा ड्रेसवाली, केस कापलेली असंच काहीतरी वर्णन सांगावं लागेल. पण यानी काही बिघडत नाही, याची तू खात्री बाळग. हॉलमधे जाण्यापूर्वी मी पुन्हा एकदा मुलांना सांगितलं, याचा चुकीचा अर्थ काढायचा नाही. यातल्या कुठच्याही मुलीच्या खरोखर मागे लागायचं नाही. हे सगळं खेळापुरतं आहे. आता जाऊया का आत?

मग आम्ही सगळेजण आत गेलो. आतमधल्या कार्यकर्त्यांना मुलींनी याच प्रकारचे प्रश्न विचारले होते आणि ही सगळी उत्तरंही मी त्यांना आधी सांगितली होती. हे सगळं सांगताना मला बराच वेळ लागला असला तरी प्रत्यक्ष खेळ मात्र 5-7 मिनिटांच्यावर चालत नाही. हॉलबाहेर उभं असलेल्यांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरं देण्यासाठी चांगली 15-20 मिनिटं लागतात. खरं म्हणजे संपूर्ण सहलीमधला हा एक महत्त्वाचा भाग सूत्रधारानी समजून घेतला पाहिजे. साधारणपणे एकेका खेळाला अर्धा-अर्धा तास लागतो. पण त्यातल्या पाच मिनिटांचा खेळ आणि आधीची प्रस्तावना 20-25 मिनिटं असं होऊ शकतं. काही खेळांचं दोन मिनिटांचा खेळ आणि बाकी सगळा वेळ अर्थ शोधून काढण्यात जातो असंही होऊ शकतं. पण सहलीसाठी निवडलेले खेळ छोटे, पण महत्त्वाचा अर्थ असलेले

आणि अर्ध्यातासात उरकणारे असे असले तर नेहमीच जास्त चांगलं असतं.

सबंध सहलीच्या कार्यक्रमात दोन-तीन बोलण्याचे खेळ, दोन-तीन शारीरिक हालचाली कराव्या लागणारे खेळ आणि एक-दोन साहित्य लागणारे खेळ असं मिश्रण सर्वांत चांगलं. त्याखेरीज सहल म्हटलं की, जेवण, चहापान या सगळ्यामधे भरपूर वेळ जातो, पण असे खेळांसकटचे कार्यक्रम असले की कार्यक्रम सोडून इतरच ठिकाणी भटकायला जाणारे असे मात्र जवळजवळ कोणीही नसतात. थोडक्यात, नेहमीचा मुद्दा पुन्हा मांडतो. शिक्षण रंजक केलं की 'ॲबसेंटिझम' शून्य.

आता पुन्हा खेळाकडे वळूया. हॉलमधे जे काय 5 मिनिटांमधे घडलं त्याचं थोडक्यात वर्णन करतो. खरोखरच काही मुलींच्या मागे मुलांची रांग उभी होती आणि हॉलचा आकार न पुरल्यामुळे रांग वळवून त्यांनी मार्ग काढला होता. काही मुलींच्या मागे दोघं-तिघं उभे होते, काही मुलींच्या मागे नुसते रुमाल होते आणि काहींच्या मागे कोणीही उभं नव्हतं आणि रुमालही नव्हते. नेहमीप्रमाणे एका दिसायला खूप चांगल्या असलेल्या मुलीच्या मागे मोठी रांग होती.

गंमत म्हणजे आम्हाला कार्यकर्त्यांना माहिती होतं की, ती मुलगी घटस्फोटित होती आणि पुनर्विवाहासाठी आलेली होती. हेही आम्हाला माहिती होतं की, तिनी जरी फॉर्ममधे ते भरलेलं असलं तरी बोलताना ती तो विषय टाळायची. खरं म्हणजे खाजगीमधे त्या मुलीला मी अनेकदा सांगितलं होतं की, वागताना खरं लपवण्याचा तू प्रयत्न करू नको, तू इतर मुलांचा वेळ वाया घालवशील आणि जास्तीत जास्त मनःस्ताप तुला स्वतःला होईल.

दुसऱ्या एका मुलीच्या मागे साधारण मध्यम लांबीची रांग उभी होती. ती मुलगी दिसायला मध्यम, पण वागायला-बोलायला अतिशय चांगली, हसतमुख आणि सगळ्यांच्यात मिसळणारी थोडक्यात, लोकप्रिय अशी होती. खेळाचं वर्णन तर संपलं.

त्याच्यापुढच्या महिन्याच्या पहिल्या रविवारी 2-4 मुला-मुलींनी खरोखर काही निरीक्षणं लिहून आणलेली होती. काहीजण आम्ही तोंडी सांगतो असं म्हणत होते. काही एकही शब्द न लिहिता-बोलता नुसते आले होते आणि काही गैरहजर होते. या पुस्तकसंचातल्या विवाह अभ्यास मंडळ म्हणजे काय, या लेखामधे मी एक गंभीर काळजी व्यक्त केली आहे त्याचं प्रत्यंतर असं वारंवार दिसतं. कुठचाही विषय गंभीरपणे, विचार करून त्याबद्दल कृती करण्याबाबत

मला जवळजवळ सगळा अंधार दिसतो.

काही लोकांनी निरीक्षण लिहून आणलं होतं आणि काही लोकं प्रत्यक्ष बोलले त्याविषयी सांगतो. मला सर्वांत जास्त काळजी होती ज्या मुलींच्या मागे कोणीही उभं नव्हतं आणि कुठचीही वस्तू ठेवलेली नव्हती अशा मुलींना काय वाटलं असेल याची. त्या मुलींना प्रथम विचारलं. सगळ्या हजर नव्हत्या, पण जेवढ्या हजर होत्या त्यांना विचारलं. त्या मुलींनी अगदी स्पष्ट शब्दांत सांगितलं की, आम्हाला कॉलेजच्या वयापासून, काहींना तर शाळेच्या वयापासून मित्रमंडळींच्यात आणि घरातसुद्धा अशी वागणूक मिळायची. या मुली त्यांच्या लहानपणाविषयी सांगत होत्या की, अगदी सख्खे नातेवाईक तोंडावर बोलून त्यांचं खच्चीकरण करायचे. कधीकधी वडलांना सांगायचे की, खूप हुंड्याची तयारी करायला लागा. कधी आईजवळ बोलायचे की, हिच्यासाठी चांगलं स्थळ आहे आणि 2-4 प्रसंगांनंतर मीच आपणहून विचारायची की चांगलं स्थळ आहे म्हणजे मुलगा लंगडा आहे की बहिरा आहे, तेवढं सांगा.

ज्या दुसऱ्या मुलीविषयी मी तुम्हाला सांगत होतो ती घटस्फोटित मुलगी त्यावेळच्या चर्चेला नव्हती. खरं म्हणजे मुलांना सगळं समजावून सांगितलं होतं हे मगाशी मी तुम्हाला सांगितलंच. आणि तरीही पहिल्या रविवारी भेटल्यावर त्या मुलीचं नाव काढून ती आली नाही का, वगैरे बऱ्याच चौकशा चालू होत्या. आता दुसऱ्या मुलीविषयी मला तुम्हाला मुद्दामहून सांगायचं आहे. ती मुलगी दिसायला मध्यम होती, पण तिच्यामधे खरोखरच गोडवा होता. वागण्यात, बोलण्यात, आवाजात गोडवा होता आणि तरी ती चालू नव्हती. ती मुलगी मुलांना योग्य अंतरावर ठेवायची आणि तरीही सगळ्यांशी चांगली वागायची. त्या मुलीमधे 4-5 मुलांनी का होईना, मैत्री करायला आवडेल असं म्हणण्यापुरता रस दाखवला होता, हा त्या खेळातला भाग मला खूप महत्त्वाचा वाटला.

खरं सांगायचं म्हणजे आपल्या शहरी, सुशिक्षित, मध्यमवर्गीय वातावरणात लग्नाच्या बाजाराबद्दल ही जी परिस्थिती समोर आली त्यामुळे अनेक मुला-मुलींचे डोळे उघडले असं त्यांनी स्पष्ट सांगितलं. मी सांगतोय त्या खेळाला खेळून 15 वर्षं झाल्यानंतर 8 वर्षांचा मुलगा असलेल्या एका मुलीनी तिच्या सासरच्या गावी शोभाला आणि मला अगदी नुकतंच कार्यशाळेसाठी बोलावलं होतं. हा खेळ हे 'व्हिज्युअल' असल्यामुळे तिच्या ते पक्कं डोक्यात शिरलं होतं आणि ती काही महिन्यांपूर्वी भेटली तेव्हा आम्हाला सांगत होती की, तिला स्वतःला निर्णय घेताना

त्याचा फार उपयोग झाला. ती भेटली तेव्हा आठवून आठवून इतरही काही खेळ सांगत होती. त्या खेळांच्या वेळेला भेटलेल्या मुला-मुलींची चौकशी करत होती.

त्याबद्दल मात्र परिस्थिती चांगली नाही. विवाह अभ्यास मंडळात काही वेळा येऊन गेलेल्यांची संख्या सहज दोन हजार असेल. ते प्रत्यक्ष कधी भेटले तर सांगतात की, सगळे खेळ, सगळ्या चर्चा आम्हाला अजून आठवतात, पण संपर्क ठेवण्याच्या बाबतीत मात्र हे लोक अगदी कमी पडतात. त्याच्या पुढचंही सांगतो. जीवनसाथ अभ्यास मंडळ 'अजूनही वन मॅन इन्स्टिट्यूशन' असल्यामुळे संपर्काच्या बाबतीत मी आणि शोभा त्यांच्याही पेक्षा कमी पडतो. 'डॉक्युमेंटेशन'च्या बाबतीत आम्हाला खरं म्हणजे अनेकांनी सांगितलं आहे की, प्रत्येक कार्यक्रम 'व्हिडिओ रेकॉर्ड' करा, निदान 'ऑडिओ' करा, त्याचा वृत्तांत छापून घ्या, पण आम्हाला अजून मी कार्यक्रमाच्या आधी काढलेल्या टिपणांच्या पलीकडे जाता आलेलं नाही. आमच्या पुढची पिढी या बाबतीत काहीतरी मार्ग काढेल नि करून दाखवेल, अशी आम्हाला आशा वाटते.

### खेळ क्र. 2

जोडीदाराची निवड या विषयात उपयोगी पडणारा आणखीन एक खेळ सांगतो. दोनदा-तीनदा हा खेळ खेळल्याचं मला आठवतंय. एकदा तो एका मोठ्या हॉलमधे होता आणि बाकी वेळेला झाडाच्या सावलीखाली उघड्यावर होता. जमलेल्या सर्व मुला-मुलींनी एका बाजूला उभं राहायचं. जेवढे कार्यकर्ते असतील तेवढ्यांनी काही नोंदी करायच्या. त्यासाठी कागद, पेन, पेन्सिल वगैरे अशा गोष्टी त्यांच्याकडे तयार पाहिजेत. समजा, चार कार्यकर्ते असतील तर एका वेळेला चार मुलं एका कार्यकर्त्यापाशी एक असे बोलू शकतात. मोकळ्या मैदानाच्या एका बाजूला घोळक्यानी उभी असलेली मुलं एकेक करून एकेका कार्यकर्त्यापाशी येतात आणि ज्याच्याशी किंवा जिच्याशी मैत्री करायला आवडेल त्याचं नाव कार्यकर्ता लिहून घेतो.

या खेळामधे एकाच व्यक्तीची निवड करायची आहे आणि विवाहाच्या दृष्टिकोनातून जोडीदाराची निवड हा विषय ठरवलेला असल्यामुळे भिन्नलिंगी व्यक्तीचीच निवड करायची आहे. दोन मुलांची मैत्री किंवा दोन मुलींची मैत्री एरवी कितीही घनिष्ठ असायला आपली काही हरकत नाही, पण आज या खेळामधे विवाहाचा अभ्यास हाच केंद्रबिंदू असल्यामुळे आवडलेली मुलगी किंवा

आवडलेला मुलगा ही विचारांवर मर्यादा घातलेली आहे. एक सांगायचं राहिलं. शक्यतोवर हा खेळ कार्यक्रमाचा पहिला भाग असावा. अर्थात, त्याचा विशिष्ट हेतू आहे. सगळ्या मुलांनी आपल्याला आवडलेल्या व्यक्तीचं नाव नोंदवून झालं की मग सगळ्यांनी पलीकडच्या भागात पुन्हा घोळका करून उभं राहायचं. सगळे कार्यकर्ते आपापल्या नोंदी तपासून सहलीला आलेले सगळे मुलगे आणि सगळ्या मुली यांची संख्या तपासून सर्व ठीक असं सांगितलं की मगच सूत्रधारानी जमलेल्या घोळक्याला खेळ समजावून सांगायचा.

खेळाचे नियम असे – घोळक्यामधे उभं असलं तरी कुठच्याही व्यक्तीला कुठच्याही व्यक्तीकडे चालत जवळ जायला परवानगी आहे. ज्या व्यक्तीचं नाव तुम्ही नोंदीमधे लिहिलं आहे त्यात बदल करायला परवानगी नाही, आणि हा खेळ सगळ्यांनी एकाच वेळेला खेळायचा आहे. त्याला एक-दोन मिनिटांपेक्षा जास्त वेळ लागणार नाही. खेळ अगदी साधा आहे. ज्या व्यक्तीचं नाव तुम्ही मगाशी नोंदवलं आहे त्या व्यक्तीच्या डोक्यावर हात ठेवायचा आहे. एवढाच खेळ.

मग त्याच अवस्थेत थांबून राहायचं आणि कार्यकर्ते, मुलं-मुली आणि सूत्रधार यांनी आपापली निरीक्षणं सगळ्यांना ऐकू जातील अशा पद्धतीनी, पण एका वेळेला एकानी अशी सांगायची. जी गमतीशीर आकृती बनलेली असते त्यामधे कुठच्यातरी एका व्यक्तीच्या डोक्यावर अनेकांनी हात ठेवलेले असतात, तर काही ठिकाणी दुसऱ्यानी कुणी आपल्या डोक्यावर हात ठेवलेला असला तर त्याच्याशी बोलून, त्याला सांगून त्याच्यासकट आपल्याला पाहिजे त्या व्यक्तीपर्यंत पोहोचावं लागतं. असंही होऊ शकतं की, या गुंतागुंतीच्या आकृतीमधे आपल्याला पाहिजे त्या व्यक्तीपर्यंत पोहोचताच येत नाही. हे सगळं चालू असताना आपापलं काय म्हणणं आहे ते मुलं बोलत असतात, पण त्यांना सांगितलेलं असतं की, याचा अर्थ आत्ता सांगू नका. आत्ता नेमकं काय घडलं आहे तेवढंच सांगा. माझ्या अनुभवाप्रमाणे कोणालाही याचा अर्थ सांगण्याची गरज पडत नाही.

हा सबंध दिवसातला पहिला खेळ का, याचं कारण आता सांगतो. त्यानंतर दिवसभरामधे निरनिराळ्या विषयांवरचे अनेक खेळ खेळले जातात. काही प्रमाणात का होईना, पण बाह्य रूपाबरोबर अंतर्गुण दिसायला लागलेले असतात. आणि बोलण्याच्या पद्धतीवरून, वागणुकीवरून, हालचालींवरून, जेवणाच्या वेळेला, चहाच्या वेळेला झालेल्या इतर गप्पांच्यावरून अंतर्गुणांची जास्त जास्त ओळख होत असते. मधले दिवसभरातले खेळ कुठचेही असले तरी काही

बिघडत नाही. पण कार्यक्रमाच्या शेवटी हाच खेळ पुन्हा घ्यायचा. त्यामधे डोक्यावर हात नाही ठेवला तरी चालेल, पण आवडलेल्या व्यक्तीची यादी अवश्य बनवायची. गंमत म्हणजे एका दिवसभराच्या निरीक्षणातून, खरं म्हणजे काही तासांच्या अंतरात निम्म्या लोकांची यादी तरी बदलते. काही न बोलता याचा अर्थ सगळ्यांना कळतो, असं आत्तापर्यंत जाणवलेलं आहे. कारण त्याच्या पुढच्या महिन्याच्या पहिल्या रविवारी याच्यावर तपशीलात जाऊन बोलणं होतंच.

पहिली गोष्ट मुला-मुलींना कळते की, विशिष्ट मुलगा किंवा विशिष्ट मुलगी थेट समोर बसलेली असतानाही मोकळेपणानी बोलण्याचं धाडस आपल्यात आलेलं आहे. सुरुवातीच्या आणि शेवटच्या यादीमधे बदल का केला, याचा काही मुलं-मुली संकोच करतात, पण त्यांना सांगावं लागतं की, या विषयात जोडीदार शोधताना संकोच सोडणं हा पहिला महत्त्वाचा पाठ आहे. सध्याची लग्नाच्या बाजारातली परिस्थिती अशी आहे की, बहुतेक मुलं-मुली दुसऱ्यांनी आपल्याला विचारावं यासाठी जागच्याजागी थांबून बसलेले आहेत.

प्रत्यक्षात असं फार क्वचित घडतं. एखाद्या मुलात किंवा मुलीमधे मैत्री करण्याइतकं स्वारस्य आहे असं वाटत असलं, तर महत्त्वाचा निर्णय म्हणजे आपणहून जाऊन सभ्य आणि योग्य शब्दांत विचारता आलं पाहिजे. ही पायरी तुम्ही ओलांडलीत की पुढच्या गोष्टी सोप्या आहेत, हे मी तुम्हाला खात्रीनी सांगतो. सारांशात, 'ती नाही म्हटली तर' किंवा 'तो नाही म्हटला तर' याला घाबरणं सोडून दिलं पाहिजे. अगदीच भलत्या मुलानी किंवा भलत्या मुलीनी विचारणा केली, तर नाही म्हणण्याची शक्यता अर्थातच आहे, पण व्यक्ती विचार करण्याजोगी आहे इतपत जरी असलं तरी ताबडतोब नकार येत नाही, हे मी तुम्हाला खात्रीनी पुन्हा सांगतो. आणि योग्य पद्धतीनी विचारण्याची युक्ती नीट जमली की, गालावर चप्पल उठणार नाही, याचीही मी खात्री देतो.

आपला समाज इतका किडका आहे की, अमुक मुलीनी मला विचारलं होतं किंवा अमुक मुलगा माझ्या मागे लागला होता असं नंतर आयुष्यभर बोलणारी आणि त्याला अतिशयोक्त स्वरूप देणारी लोकं आपल्याकडं आहेत. ते टाळायचं असेल आणि थोडक्यात 'स्मूथ ऑपरेटर' व्हायचं असेल, तर तू नाही म्हटल्याबद्दल मला राग आलेला नाही, हे स्पष्ट शब्दांत सांगितलं पाहिजे. काही कारणांनी पुन्हा भेट झालीच तर चेहरा लपवणं, न बघितल्यासारखं करणं, मुद्दामहून लांब कुठच्यातरी दिशेला जाणं यातलं काहीही करायचं नाही.

●●●

# 9

# लैंगिक शिक्षणाची गरज

## 1) या लेखाची पार्श्वभूमी

सर्वांत प्रथम उलगडा करतो, की मी आणि शोभा वैद्यकीय शाखेतले नाही. अनेक वर्षं लोक म्हणायचे आणि आम्हालाही वाटायचं की लैंगिक शिक्षण देण्याची आम्हाला परवानगी नाही. शिवाय मनातून वाटायचं की आमची योग्यताही नाही. मी आणि शोभा पालक शिक्षणाचे वर्ग घ्यायचो. तसे एकदा एके ठिकाणी गेलो होतो. आमच्या भाषणानंतर लैंगिक शिक्षणाचा कार्यक्रम होता. त्यात एक डॉक्टर बोलणार होते. आम्ही त्यासाठी थांबलो. मग जमलेल्यांनी काही प्रश्न विचारले. त्या डॉक्टर वक्त्यानी सांगितलं की, हा लैंगिकतेतला मानसशास्त्रीय प्रश्न आहे आणि तो तुम्ही मानसशास्त्राचा अभ्यास केलेल्याला विचारा. मुळात त्या गायनॅकॉलॉजिस्ट डॉक्टरांनी स्त्री शरीराची रचना, पुरुष शरीराची रचना, गर्भ कसा राहतो वगैरे गोष्टी सांगितल्या, मॉडेल्स दाखवली. त्यात जमलेल्यांना स्वारस्य नव्हतं असं दिसत होतंच. त्यात तज्ज्ञांकडून अशी उत्तरं मिळाली.

पुढे मला आणि शोभाला असं वाटायला लागलं की, लैंगिक प्रश्न हा क्वचितच वैद्यकीय क्षेत्रातला असतो. तो जास्त प्रमाणात सामाजिक प्रश्नच आहे. त्यामुळे त्याबद्दलचा आमचा दृष्टिकोन बदलत गेला. मानसशास्त्रीय भागाचा अभ्यास आम्ही शिकायचा ठरवला.

पुढे काही वर्षात आम्ही लैंगिक शिक्षणातला मानसशास्त्रीय भाग शिस्तशीर शिकून घेतला आणि पालक शिक्षणाबरोबर लैंगिक शिक्षण द्यायला लागलो.

आम्ही शरीररचनेविषयी काही न बोलता मानसशास्त्रीय भागावर अधिक बोलायचो. ते लोकांना आवडत गेलं आणि हळूहळू आमचाही अभ्यास वाढला, कार्यक्रम वाढले. अनेकांनी सांगितलं की, आम्ही डॉक्टर नसल्यामुळे आम्हाला सगळं समजतं, असा 'परफेक्ट'पणाचा आव आमच्या बोलण्यातून व्यक्त होत नाही, त्यामुळे ते जास्त उपयोगी ठरतं. जास्त उपयोगी का कमी उपयोगी हे ठरवण्याचा आमचा उद्देश नाही. लोक आम्हाला बोलवत गेले आणि आम्ही ती निमंत्रणं स्वीकारत गेलो.

आम्ही लैंगिक शिक्षण हा विषय शिकवण्यासाठी जायचो, तिथे बहुतेक वेळा लहान किंवा तरुण मुला-मुलींना हे शिक्षण मिळावं म्हणून कार्यशाळा योजलेली असायची. त्यांच्याबरोबर त्यांचे शिक्षक आणि शिक्षिकाही हजर असायचे. गंमत म्हणजे मुला-मुलींपेक्षा शिक्षकांनाच जास्त शंका असायच्या. त्यातले निम्म्याच्या वर शिक्षक विवाहित असायचे. ते एक-दोन मुलांचे पालकही बनलेले असायचे.

ते शिक्षक असण्या-नसण्याबद्दल मला काही म्हणायचं नाहीय. पण विवाहित तरुण, मध्यमवयीन लोकांना लैंगिक संबंधांबद्दल जास्त शंका असतात, कारण त्यांच्या प्रश्नांची यादी अनुभवांवर आधारलेली असते आणि त्यांना उत्तरं देणारं कोणी नसतं. नवराबायकोंच्या संभोगाच्या प्रमाणाविषयी त्यांना शंका असते. 'किती वेळ आणि किती वेळा' याबद्दल त्यांचे प्रश्न असतात.

कधी कधी याखेरीज निराळी गंमत व्हायची. शाळेत लैंगिक शिक्षण या विषयाचा तास असतो, असा मुलंमुली उल्लेख करायची. त्यात काय शिकवतात विचारल्यावर काही गोष्टी कळायच्या. बऱ्याच शाळांच्यात तो तास 'ऑफ पीरिअड' ठेवायचे. काही शाळांच्यात प्राणी एकमेकांबरोबर काय करतात ते सांगायचे, नर-मादी, प्रजनन, असे अर्धवट उल्लेख कलेले असायचे. कधी आकृत्या, मॉडेल्स यांचा वापर केलेला असायचा. शेवटी मुलं विचारायची, 'हे प्राण्याचं प्रजनन म्हणजे माणसाचं असतं तसंच ना? ते आम्हाला माहीत आहे.' प्रत्यक्षात खरं काही माहीत नसायचं.

त्यानंतर काही वर्षांनी मी 'मॅरेज अँड फॅमिली काऊन्सेलिंग' मधे डॉक्टरेटच्याच अभ्यासाला लागलो. त्या अभ्यासात 'सेक्श्युअल डिस्फंक्शन'चा पद्धतशीर अभ्यास करण्याचा खूप फायदा झाला. मला आणि शोभाला माहिती आहे, की पुण्यात डॉ. अनंत आणि डॉ. शांता साठे, डॉ. सामक, डॉ. मोहाडीकर,

डॉ. कोठारी, डॉ. पाटकर यांच्यासारखे दिग्गज लोक याच क्षेत्रात आहेत. एखाद्याला प्रश्न असा पडेल, की या सगळ्या मोठ्या लोकांनी एवढं काही सांगितलेलं, लिहिलेलं असताना आम्ही काय आणखी नवीन सांगणार? मुद्दा तर बरोबर आहे. आम्ही बोलतो आणि मग तुम्हीच ठरवा तुम्हाला काय वाटतं ते.

एक शक्यता आहे. आम्ही लैंगिक शिक्षण या विषयावर भाषण देत नाही. कार्यशाळा घेतो. साधारण अविवाहित-विवाहित मिळून 15 ते 20 लोक असतात. जास्तीत जास्त आकडा म्हणजे 30. साधारण 3ऱ्या वर्षापासून मूल ज्याचा अर्थ लैंगिक कुतूहल होईल असे प्रश्न विचारू शकतं. त्या अवस्थेपासून मुलांशी कसं बोलावं ह्याचा आमचा अभ्यास आहे. आम्ही शारीरिक तपासणी करण्याचा प्रश्नच येत नाही, पण त्याखेरीज वैयक्तिक, जोडप्यांचं लग्नाआधी, लग्नानंतर, निवडक गटाचं, मिश्रगटाचं समुपदेशन करतो. वैद्यकीय चाचण्यांसाठी ओळखीच्या डॉक्टरांकडे पाठवतो. लहान मुलांसंबंधीच्या लैंगिक प्रश्नांसंबंधीच फक्त अशा काही कार्यशाळा असतात. काही फक्त मुलींच्या, काही फक्त मुलांच्या, काही तरुणांच्या, काही फक्त विवाहितांच्या. पुणे आणि मुंबईमधे आम्ही दोघं मुला-मुलींशी एकत्र बोलू शकतो. महाराष्ट्रातल्या इतर छोट्या शहरात शोभाला मुलींबरोबर आणि मला मुलांबरोबर स्वतंत्र बसावं लागतं. कारण एकत्र बसलं, की सगळे गप्पच बसतात असा अनुभव होता.

आता हा विषय मांडताना विशिष्ट क्रमानी मला हा विषय का महत्त्वाचा वाटतो ते सांगतो. मी माझ्या लहानपणापासून ही म्हण ऐकलेली आहे, 'पाण्यात पडलं की पोहता येतं', शिकवावं लागत नाही. माझ्या मते हे पोहण्याच्या बाबतीत खरं नाही, आणि कुठच्याच बाबतीत खरं नाही. लैंगिक आकर्षण ही गोष्ट नैसर्गिक आहे, त्यामुळे ती आपोआप जाणवते एवढं खरं आहे. पण फक्त मानवाखेरीज इतर प्राण्यांच्या बाबतीतच त्याबाबतीत योग्य कृती होते. मानवानी प्रगतीच्या मागे लागताना काही बाबतीत अधोगती केली आणि ते मानवाच्या लक्षातच आलं नाही. 'संस्कार, चारित्र्य, पातिव्रत्य' असल्या कल्पनांनी सगळ्या नैसर्गिक प्रेरणा दाबल्या गेल्या. दाबून ठेवलेल्या भावनेला विकृत स्वरूप आलं. त्यामुळे सध्या जी परिस्थिती आहे त्यात पाण्यात पडलं की पोहता येत नाही, नाकातोंडात पाणी जातं, हेच खरं आहे. हे माझं मत अगदी पक्कं आहे. लैंगिक शिक्षणाला काही पर्याय नाही. मानव हा एकटाच प्राणी कपडे वापरतो. तसंच मानव हा एकटाच प्राणी लैंगिक संबंधाच्या वेळी एकांताचा हट्ट धरतो. या अटी

आल्या की, त्याचं शिक्षण ओघानीच येतं. योग्य वागण्यासाठी आणि अयोग्य ते टाळण्यासाठी.

काही निरीक्षणं सांगतो. पुरुष लग्न करतात ते मुख्यतः मनाजोग्या स्त्रीशी हक्कानी करता येणाऱ्या लैंगिक संबंधासाठी आणि वंशाच्या दिव्यासाठी वगैरे. स्त्री मात्र लग्न करते ती इतर अनेक कारणांसाठी. सुरक्षिततेसाठी, समाजमान्यतेसाठी, स्त्रीत्वाच्या सिद्धतेसाठी, मुलांसाठी आणि साथ देणाऱ्या साथीदारासाठी, आणि या सगळ्याबरोबर लैंगिक संबंधासाठी. यातला समाईक दुवा म्हणजे फक्त लैंगिक संबंध! या नाजूक विषयावर शिस्तशीर शिक्षण द्यावं का नाही, याबद्दल अनेक पिढ्या अनेक वर्षं वाद चालूच आहेत.

खरी गोष्ट अशी आहे की, संपूर्ण वैवाहिक आयुष्यातल्या वेळेचा हिशेब मांडला, तर बाकीच्या इतर गोष्टींतला वेळ आणि त्यातला लैंगिक संबंधात व्यतीत केलेला वेळ फारच क्षुल्लक असतो. आपल्या संबंध शरीराच्या आकारमानाचा विचार केला, तर या तुलनेत हृदयाचा आकार अगदीच छोटा असतो, पण एवढ्याशा त्या हृदयावर संपूर्ण शरीरच अवलंबून असतं. तसंच लैंगिक संबंधाचं असतं. लैंगिक समाधानावर सबंध आयुष्य अवलंबून असतं. खुद्द आमची आणि जीवनसाथ अभ्यास मंडळाची हे शिक्षण अत्यावश्यक आहे, याबद्दल खात्री झालेली आहे.

डॉ. अनंत साठे आणि शांता साठे नेहमी सांगतात, ''सेक्स इज बिटवीन टू ईअर्स.'' लैंगिकता लिंगात नसते, विचारात असते. ती दोन पायांमधे नसते तर दोन कानांच्यामधे असते. त्यामुळे आम्ही हा विषय शारीरिक, वैद्यकीय अंगानी न मांडता मानसिक, वैचारिक आणि सामाजिक अंगांनी सहज संवादातून मांडायचं ठरवलं. लहानपणापासून सुरुवात करून ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांपर्यंत ह्या विषयाचा विस्तार आम्ही मांडतो.

विशेषतः जेव्हा मुलं-मुली वयात येतात म्हणजे कुमार वयातून तारुण्याकडे जातात, तेव्हा खूप काळजीपूर्वक हा विषय समजावून देण्याची गरज असते. बहुतेक लोकांचा लैंगिक विकृतीचा प्रवास कुमार वयात सुरू होतो. लैंगिक संबंध करण्याची शरीराची आणि मनाची त्या वयात तयारी होत असते. आपल्या पुढच्या चर्चेत आपण या वयातल्या प्रश्नांविषयी अगदी सविस्तर बोलणार आहोत.

हा विषय मांडताना कुठल्या शब्दांत आणि किती स्पष्ट बोलायचं, हा निर्णय आम्हाला घ्यायचा होता. कुटुंबामधे या विषयावर शक्यतोवर बोलतच

नाहीत, बोललंच तर 'दोघं लग्नानंतर एकत्र आले', 'दोघं एक झाले' यापलीकडे नाही. तरुण माणसं त्या दोघांच्यात 'रिलेशनशिप' आहे. 'त्यांनी अगदी सगळं केलं' यापलीकडे बोलू शकत नाहीत. तत्त्वतः आमची याला काही हरकत नव्हती. बोलण्याचा संकोच ही गोष्ट समजण्याजोगीच आहे.

पण काही काही उदाहरणं ऐकली आणि आमचं मत बदललं. जोडप्याला लग्न होऊन दोन वर्षं होऊन गेली तरी मूल होईना म्हणून डॉक्टरकडे गेल्यावर लक्षात आलं, की त्यांना लैंगिक संबंधाबद्दल माहितीच नव्हती. काही मुलींना वाटत होतं की, एकमेकांच्या गळ्यात फुलांच्या माळा घातल्या की मूल होतं. अशी अनेक उदाहरणं ऐकून हळूहळू आमचा निर्णय पक्का होत गेला, की अगदी स्पष्ट शब्दांतच बोलायला लागणार.

याखेरीज आणखी एक कारण मला आणि शोभाला माहिती आहे. जगभरातली पुरुष जात स्त्रीशरीराविषयीच्या उत्सुकतेमुळे आणि आकर्षणामुळे स्त्रियांशी विशिष्ट पद्धतीनी वागते. आकर्षण वाटणं हे नैसर्गिक आहे, पण ते व्यक्त करण्याच्या पद्धतीत जगभरात अनेक प्रकार आढळतात.

भारतात त्यातला खूप निराळा प्रकार आढळतो. पारंपरिक संस्कारांत स्त्रियांविषयी आदर दिसत नाही. सगळ्या भावना दाबून ठेवण्याची शिफारस केलेली दिसते. सगळ्या बाजूंनी बंधनं घातली, की कुठल्यातरी पद्धतीनी त्याचा त्रास होणार हे नक्की असतं तसं भारतीय पुरुषांचं झालं. भारतीय पुरुष विकृतीच्या मार्गांनी गेले. बाकीच्या जगातले पुरुष विकृत नाहीत असं मला म्हणायचं नाही, पण भारतीय पुरुषांच्यात विकृती जास्त प्रमाणात आहे असं मला नक्की वाटतं. काही उदाहरणं सांगतो.

पुरुषांचा छोटा गट गप्पा मारायला बसला, की 10व्या मिनिटाला लोक स्त्री शरीरावर घसरलेले असतात. स्त्रीनी सर्वप्रसंगी आकर्षक दिसलंच पाहिजे, असं पुरुषांच्या मनात असतं कारण यामागचा मूळचा विचार स्त्री ही पुरुषाला नेत्रसुख, शरीरसुख देण्यासाठीच आहे असा असतो. मागे एका कार्यक्रमात, एका मध्यमवयीन नृत्यांगनेनी नृत्य केलं. तिला नृत्यकला चांगली अवगत होती, पण वयामुळे शरीर लठ्ठपणाकडे झुकलेलं होतं. त्याविषयी अनेक पुरुषांनी नाकं मुरडली. तिनी तिच्या तरुण शिष्येला पाठवलं असतं तर बरं झालं असतं असं म्हणायला सुरुवात केली. त्या अनेक पुरुषांच्यात मीही होतो. शोभाचा पुरुषांच्या आक्षेपाबद्दल आक्षेप होता. तिच्या मते ती खास भारतीय पुरुषांची विकृत नजर

बोलत होती. आणखी एक उदाहरण सगळ्यांनाच माहिती आहे. भारतीय सिनेमांच्यात लोकांना नायक 50 वर्षांचाही चालतो, पण नायिका मात्र एकदम तरुण सडसडीत लागते.

सांगायचा मुद्दा एवढाच, की या सगळ्या भारतीय पुरुषांच्या विकृतीच्या मुळाशी लैंगिक शिक्षणाचा अभाव आहे. लैंगिक शिक्षण देण्याच्या प्रक्रियेमधे एक गोष्ट व्हायला लागली. माझा स्वतःचा जास्त अभ्यास झाला. सगळ्या विकृत सर्वसाधारण भारतीय पुरुषांच्यात माझाही समावेश होताच की! टप्प्याटप्प्यांनी माझ्यातही सुधारणा झाली.

हे बोलताना, लिहिताना किती स्पष्ट आणि कुठच्या शब्दात बोलायचं हा निर्णय घेताना मला तीन गोष्टींचा विचार करावा लागला.

1) हे लिखाण या प्रकारे लिहून प्रकाशित करणं याबद्दल कायदा काय म्हणतो ते तपासणं. लोकांचं आयुष्य जास्त समाधानी व्हावं म्हणून प्रयत्न करताना अश्लील लिखाणाबद्दलचा कायदा माझ्या हातून मोडला जाऊ नये अशी माझी नक्कीच इच्छा आहे.

2) या लिखाणातला वैद्यकीय माहितीचा भाग मला इतर डॉक्टर मंडळींना विचारावा लागला. कारण काही चुकीची माहिती माझ्याकडून अनवधानानी दिली जाऊ नये.

3) मी आत्ताच उल्लेख केल्याप्रमाणे सरासरी भारतीय पुरुषांच्या विकृत मनाचा अभ्यास उघडपणी समोर मांडावा असा माझा उद्देश आहे. त्यामुळे ऐकणाऱ्या, वाचणाऱ्या पुरुषांच्यात सुधारणा व्हावी अशी माझी इच्छा आहे. मी त्या विकृतींचा बळी होतो हे मी प्रामाणिकपणी मांडल्यामुळे माझ्याविषयी वाईट मत होण्याची शक्यता आहे. पण पुढे मी स्वतः जीवनसाथच्या निमित्तानी माझ्या झालेल्या अभ्यासामुळे सुधारलो आहे हा महत्त्वाचा मुद्दा आहे.

●

## 2) भारतातलं पारंपरिक कामशास्त्र आणि जगातली परिस्थिती

फार पूर्वीच्या काळाबद्दल असे गमतीशीर उल्लेख सापडतात की, मूल नेमकं कशामुळे होतं हे माहीत नव्हतं. स्त्री-पुरुष लैंगिक संभोगामुळे मूल होतं हे अनेक पिढ्यांनंतर कळलं, पण कुठच्या पुरुषाचं हे मूल ठरवण्याचा मार्ग माहीत नव्हता. अशा सगळ्या कुतुहलाच्या, ज्ञानाच्या अवस्थांनंतर अनेक पिढ्यांनंतर विवाह ही कल्पना निघाली. विवाह या कल्पनेचा इतिहास वाचला की एक गोष्ट स्पष्ट कळते की, देवानी दोन माणसांची जोडी बनवली या कल्पनेत काहीच तथ्य नाही. सिनेमासाठी ते ठीक आहे, पण प्रत्यक्ष आयुष्यात पूर्णपणी निरुपयोगी आहे.

सर्वसाधारण भारतीय पुरुषाची मानसिकता अनेक वर्षांच्या संस्कारांमुळे कशी झालेली असते ते समजावून घेऊ. एकेकाळी फार पूर्वी लैंगिक संबंधांच्यामधे जी मोकळीक होती ती 'उत्सव' नावाच्या हिंदी सिनेमात वर्णन केली आहे. तो काळ काही हजार वर्षांपूर्वीचा होता. वात्स्यायन हे ऋषी समाजहितासाठी लैंगिक संबंध या विषयाचं संशोधन करत होते. वात्स्यायनाच्या कामसूत्रात स्त्री-पुरुषांच्या प्रणयकाळात नखं, दात यांचा वापरही सर्वमान्य होता. गुप्त अंगावरच्या अशा व्रणांमुळे प्रणय संपल्यावरदेखील एकटं असताना त्या आठवणींनी स्त्री-पुरुषांना आनंद मिळतो, अशी त्यामागची कल्पना होती.

भारतीय संस्कृतीनी स्त्री-पुरुषाच्या लैंगिक संबंधाविषयी आपल्याला पूर्वी काही चांगल्या गोष्टी दिल्या होत्या. पुरुषालाच जास्त महत्त्व दिलं गेलं ही एक उणीव त्यात होती, पण जे ज्ञान होतं ते चांगलं होतं. चतुर्विध पुरुषार्थाची कल्पना तेव्हा मांडलेली होती. धर्मे च, अर्थे च, कामे च नातिचरामि या वचनात ब्रह्मचर्याचं अवास्तव स्तोम नव्हतं, कामेच्छा ही तिरस्करणीय गोष्ट मानली नव्हती. ती विवाहांतर्गत जबाबदारी पुरुषाची मानली होती. नंतरच्या काळात या मूळ कल्पनांचा अपभ्रंश झाला, आणि कामेच्छा दडपून ठेवण्याची विकृत कल्पना जन्माला आली.

जेव्हा कामशास्त्र ही कल्पना सर्वमान्य झाली त्यापूर्वी वास्त्यायनानी त्यावर अनेक वर्षं काम करून या विषयाचं अध्ययन केलं होतं. मी स्वतः कामशास्त्र

आणि अनंगरंग ही पुस्तकं वाचली आहेत. त्यावरून तरी असं वाटतं की, वात्स्यायनानी स्त्री-पुरुषांच्या मानसिकतेचा पुरेसा अभ्यास केला नव्हता. बहुधा त्या काळात मानसशास्त्राचा एकूणच अभ्यास झालेला नव्हता. भारतातच काय सबंध जगात गेली शेकडो, हजारो वर्षं पुरुषांनीच जगातले सगळे निर्णय घेतले. सगळे निर्णय अर्थातच पुरुषधार्जिणे घेतले गेले. शब्दशः जगभर (त्यात भारत आलाच) असं मानलं गेलं की, स्त्रीचं कर्तव्य पुरुषाला लैंगिक उत्तेजना आणणं आणि मग त्याचं लैंगिक समाधान करणं हेच आहे.

संबंधित पण जरा वेगळा विषय मांडतो. एकेकाळी वेश्या व्यवसायाला पूर्ण परवानगी होती. समलिंगी संबंधांनाही समाजमान्यता होती. पण जसं पुरुषांचं चमत्कारिक, विकृत वागणं वाढायला लागलं तसं त्याबद्दल नियम करावे लागले. पूर्वी सार्वजनिक स्नानगृहांची पद्धत होती, पण त्यातल्या अडचणींमुळे, मुख्यतः विकृतीमुळे पुरुष आणि स्त्रिया ह्यांची स्नानगृहं कायद्यानी विभक्त करावी लागतात. पूर्वीही वेश्या असायच्या, पण त्यानंतर पुरुषांची विकृती वाढल्यामुळे स्त्रीवेश्यांचं प्रमाण वाढलं. त्याचाही पुढे कायदा करावा लागला. सध्या भारतात वेश्या व्यवसायाला अधिकृत परवानगी मिळू शकत नाही.

समलिंगी संबंधांना अधिकृत परवानगी सध्या नाहीय्, पण तो विचार करावाच लागेल. अमेरिकेतदेखील प्रत्येक राज्याचा कायदा निराळा असतो. तिथे आमच्या ओळखीत दोन मुलींनी कायदेशीर लग्नदेखील केलेलं आहे. भारतात देखील या विषयावर कायद्यातल्या सुधारणा करण्याचं काम चालू आहे. काही झालंय् काही व्हायचंय्.

●

## 3) तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्राची लैंगिक संबंधांबद्दलची भूमिका

तर्कबुद्धीनी विचार केला की मुळातच एक प्रश्न पडतो. समाजामधे मातृत्त्व पूज्य, विवाहाशिवाय मातृत्व समाजाला अमान्य असल्यामुळे विवाह पूज्य, पण मातृत्वासाठी जरूर असलेले शरीरसंबंध मात्र त्याज्य, अश्लील, गोपनीय हे कोणाच्या तर्कबुद्धीला पटेल?

मानसशास्त्राच्या अभ्यासामुळे मला यात आणखी एका गोष्टीचा संबंध दिसतो त्याविषयी सांगतो. जसं स्त्री-पुरुष लैंगिक आकर्षणाविषयी आहे. तसंच सिगरेट, दारू ह्या व्यसनांविषयी आहे. 'सिगरेटला हात लावलास तर खबरदार' असं म्हणणारी घरातली संस्कृती असेल, तर ते मूल घराबाहेर चोरून सिगरेट पिईल. आधुनिक विचार असं म्हणतो की, मूल मोठं होण्याच्या काळात पालकांनी मुलांना अगदी सहजपणी पण स्पष्ट सांगितलं की, तुला केव्हातरी सिगरेट ओढावीशी वाटेल. तसं वाटण्यात गैर काही नाही. सिगरेट चवीनी वाईट असते. तब्येतीला हानिकारक असते हे सगळं माहिती असूनदेखील सिगरेट ओढण्यात पौरुषत्व किंवा मर्दुमकी वाटते म्हणून अनेक लोकं त्याच्या आहारी जातात. पुढे असं म्हणावं की, हे सगळं मी तुला जरी सांगत असलो, तरी वाटत असलं तर आपल्या घरी सिगरेट ओढून बघण्यात काहीही अडचण नाही. आधुनिक विचार म्हणतो की, ह्या पद्धतीनी वागल्यामुळे नव्व्याणव टक्के मुलं सिगरेटच्या आहारी जाणार नाहीत. पण बंधनं घातल्यामुळे सिगरेटच्या आहारी जाण्याची शक्यता नव्व्याणव टक्के आहे. हीच सगळी गोष्ट अशीच्या अशी दारूला लागू आहे.

ह्या दोन विचार पद्धतींमधली आधुनिक वृत्ती कुठची आणि पारंपरिक वृत्ती कुठची ह्याबद्दल मात्र प्रचंड घोटाळा आहे. हीच गोष्ट ह्याच प्रकारे स्त्रीपुरुष आकर्षणाला लागू केली, तर आधुनिक विचार म्हणतो लैंगिक शिक्षण अत्यावश्यक आहे. योग्य पद्धतीनी योग्य त्या वयात, योग्य त्या गोष्टी सांगणं अतिशय उपयोगी आहे. परंपरेला चिकटलेलं तत्त्व असं सांगतं, 'की लग्न झालं की त्यांना सगळं आपोआप कळेल.''

केवळ माहिती म्हणून सांगतो. पाश्चात्त्य देशांत तुलनेनी योनिशुचिता याला

फार महत्त्व नाही. लग्नाच्या वेळेला एखादा मुलगा किंवा मुलगी 'व्हर्जिन' म्हणजे कोणाशीही लैंगिक संबंध न आलेली असली तरी त्यात कमीपणा मानतात. कारण 14-15 वयापासून शारीरिक संबंधांना सुरुवात झालेली असते. त्याला 'परमिसिव्ह सोसायटी' असंच म्हणतात. 'सेक्शुअली परमिसिव्ह' म्हणजेच लैंगिक मुक्तता असलेली. आज इंग्लंड अमेरिकेत जे डेंटिंग चालतं ती गोष्ट भारतीय संस्कृतीनी फार पूर्वी करून बघून सोडून दिलेली आहे. डेटिंग ही गोष्ट सोडून देण्याऐवजी त्यात सुधारणांचा प्रयत्न केला असता तर ते योग्य झालं असतं.

एक गमतीची गोष्ट सांगतो, पूर्वी आम्ही दोघांनी इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, युरोप यामधे म्हणजे पाश्चात्त्य देशांत स्वतः गाडी चालवत मोठा प्रवास केला होता. आम्ही हॉटेल्समधे न राहता कँपसाइटवर रात्री राहायचो. बहुतेक कँपसाइटवर अंघोळीची सोय भारतीयांच्या दृष्टिकोनातून फार गमतीशीर असायची. पुरुष-स्त्रिया असे भाग असायचे. पण दरवाजातून आत गेलं की एक मोठी खोली आणि त्यात छतावरून खाली येणारे थोड्याथोड्या अंतरावरचे शॉवर्स. मधे पार्टिशन नाहीच. थोडक्यात, एकाच वेळेला 15-20 नागडे पुरुष शॉवरखाली अंघोळी करत असायचे. शोभा सांगते की, बायकांच्या अंघोळीची सोयही अशीच होती. भारतात या गोष्टीची आपण कल्पनाच करू शकत नाही. मला माझ्या वाचनातल्या 'रोमन बाथ हाऊसेस'ची आठवण झाली. रोमन बाथ हाऊसेसमधे पाहिजे असेल तशी अंघोळीची सोय असायची. जोडप्यांसाठी, कुटुंबासाठीदेखील असायची. एकत्र अंघोळ शक्य असायची. सार्वजनिक कुंडंही असायची.

एका निराळ्याच गोष्टीचा इथे उल्लेख करतो. एखादी सामाजिक समस्या प्रत्यक्षात असते, पण आपलं विश्व स्वतः आणि स्वतःभोवतीची लोकं एवढंच असल्यामुळे आपल्याला त्या समस्येच्या प्रमाणाची कल्पना नसते. लैंगिक शिक्षणाच्या कार्यक्रमात कोणीतरी मधूनच हा प्रश्न विचारतं की हिजडे म्हणजे नेमकं काय असतं. हा माझा अभ्यासाचा विषय नाही. वाचनातून असं कळलं की ज्यांच्या लैंगिक क्रिया करण्याच्या अवयवात काही विकृती असते अशांची संख्या जगभरात बरीच आहे. नैसर्गिकरीत्या समलिंगी संभोगाचं आकर्षण वाटणाऱ्यांचीही संख्या खूप आहे. अशा लोकांबद्दल मी काही विचारच केलेला नव्हता. आणि तरी ती लोकं आपल्यासारखी माणसंच आहेत. त्यांच्याशी माणुसकीनी वागलं पाहिजे, त्यांची हेटाळणी करणं योग्य नाही. कित्येक लोकं आपल्या अवतीभवती वावरत असतात. व्यवस्थित चारचौघांसारखा कामधंदा करत असतात, पण

प्रत्यक्षात लैंगिक विकृती असूनही हिजड्यांसारखा स्वतःचा निराळेपणा जाहीरपणी दाखवत नाहीत. काही समलिंगीही असतात, पण ते कोणाला कळत नाही.

सर्वसामान्य माणसाला अशा खास लोकांचे प्रश्न जाणवत नाहीत, पण सरकारी पातळीवर प्रत्येक सामाजिक प्रश्नाचा विचार करणं जरूर असतं. प्रगत देशांच्यात हा विचार खूप पूर्वीपासून केला होता. भारतात मात्र खूप उशिरा म्हणजे एक वर्षापूर्वी तृतीय पंथीयांना समाजात सन्मान्य वागणूक मिळावी यासंबंधी कायदा झाला.

भारतातल्या तृतीयपंथीयांचं जे विकृत चित्र दिसतं तसं प्रगत देशात नसतं. पुरुषी चेहऱ्याचे साड्या नेसलेले, टाळ्या वाजवणारे, पैसे मागणारे लोक परदेशात अजिबात नसतात. 2500 वर्षांपासून म्हणजे तत्त्वज्ञानाचा जन्म झाला तेव्हापासून तृतीयपंथी, समलिंगी, दोन्ही प्रकारचे लोक समाजात होतेच. त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन विकृत नव्हता. अशांपैकी काहीजण राजे होते, सरदार, सेनापती पदांवरदेखील होते. अनाहत नावाचा सिनेमा याच विषयावर होता. याचाच अर्थ माणुसकी हीच खरी मूळ प्रथा होती. सगळी वाट लागली ती पुढच्या काळात.

पूर्वीच्या त्या अवस्थेपासून अशा अवस्थेत समाज पोचला की वागणुकीची मोकळीक दूरच राहिली, लैंगिक भावना व्यक्त करण्याचीही चोरी झाली. स्वैराचाराच्या बाजूनी बोलण्याचा इथे उद्देश नाही. एवढंच म्हणायचंय की, अति बंधनामुळे नैसर्गिक भावना चुकीच्या पद्धतीनी व्यक्त होतात, चुकीच्या पद्धतीनी उफाळून येतात, तसंच लैंगिक संबंध या विषयाचं झालं. त्याचे अनेक दुष्परिणाम झाले. त्यापैकी एक म्हणजे सर्वसामान्य माणसाची स्त्रीकडे बघण्याची दृष्टी वैषयिकच बनली. परस्त्रीच्या शरीराकडे जास्त लक्ष जायला लागलं.

निसर्गतः स्त्रीच्या शरीरामधे आणि पुरुषाच्या शरीरात बदल असतातच. पण काही विवस्त्र अवस्थेतच कळतात आणि काही कपडे घातलेल्या अवस्थेतही जाणवतात. स्त्रीच्या शरीरात हालणारे मांसल स्तन आणि नितंब असतात. त्याकडे या वैषयिक नजरेमुळे जास्त लक्ष जायला लागलं. हालणारी, डुलणारी कुठचीही गोष्ट पुरुषाला आकर्षित करायला लागली. सोन्याचे दागिने घालण्याची संस्कारांनी दिलेली रूढी वाढली. स्त्रीचे लांब केस, हालणारा शेपटा, हलणारे, लोंबणारे कानातले डूल, इतर दागिने ही सर्व आकर्षित करून घेण्याची साधनं मानली जाऊ लागली. दागिन्यांनी नटलेली स्त्री-पुरुषाला आकर्षक वाटते, याचं कारण दागिने पुरुषांना आकर्षित करण्यासाठी घातले आहेत आणि तो पुरुष म्हणजे

आपण स्वतः असं पुरुषांच्या सुप्त मनाला वाटतं.

आधुनिक काळात कुठच्याच भारतीयानी या विषयावर संशोधन केलं नाही. युरोपातल्या सीगमंड फ्रॉइड हा या बाबतीतल्या संशोधकांपैकी सर्वांत प्रभावी मानला जातो. फ्रॉइडची विधानं खूप आग्रही आणि विस्फोटक होती, त्याचप्रमाणे बहुचर्चित होती. फ्रॉइडच्या म्हणण्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीच्या भावनेतला मुख्य स्रोत हा लैंगिकतेचा असतो. 'फ्रॉइडिझम' विचारप्रणालीला विरोध करणारेही बरेच निघाले. मला स्वतःलाही त्याच्या विधानांपैकी सगळी पटत नाहीत, पण लैंगिकतेच्या स्रोताचा भाग पटतो.

●

## 4) सध्याच्या प्रश्नाचं स्वरूप

काही लोकांच्या मनात असा प्रश्न असेल की, शारीरिक, लैंगिक संबंधाविषयी कार्यशाळा घेण्याजोगं काय आहे? ते सगळं आपोआप समजतंच. एका दृष्टीनी हा मुद्दा खरा आहे. संपूर्ण लैंगिक संबंधाचं वर्णन एका वाक्यात करून हा विषय संपवता येईल. 'स्त्रीच्या योनीमधे पुरुषाचं लिंग घालून हालवणं म्हणजे लैंगिक संबंध.' पण या क्रियेसाठी खूप मोठं रामायण डोक्यात चालू असतं. त्याविषयीची समज नसली, तर महाभारत होतं, त्यासाठी ही कार्यशाळा.

तरुण मुलामुलींचं या बाबतीत किती अज्ञान असू शकतं याची लोकांना कल्पनाच येत नाही. पुरुषाचं लिंग ताठलं तरच संभोग होऊ शकतो. एवढी मूलभूत गोष्ट देखील माहिती नाही अशी उदाहरणं सापडतात. अनेक स्त्रियांना विवाह, प्रेम यासंबंधी आकर्षण असतं. पण लैंगिक संबंधाचं आकर्षण सोडाच, भीती किंवा किळस वाटते. अशा मुली लग्न नको म्हणतात, कधी कधी लग्न करतात, पण लैंगिक संबंधाला नकार देतात. मुलग्यांनाही निरनिराळ्या प्रकारच्या भरपूर अडचणी असतात.

साधारण 10% जोडप्यांना स्त्री-पुरुष संभोग क्रिया नीट माहिती नसते. घाईत, अंधारात, काहीतरी करून संभोग संपवून नवराबायको आपापल्या जागी जाऊन झोपतात. 1-2 मिनिटांत पुरुषाचं वीर्य गळतं. त्यामुळे त्याच्या दृष्टीनी संभोग झालेला असतो. बायकोला याबाबतीत संपूर्ण अज्ञान असलं, तर ती काहीच बोलत नाही. भलतीकडे वीर्य पडल्यामुळे साहजिकच गर्भ रहात नाही. मग चिंता, शंका, नैराश्य, चिडचीड, आरोपाआरोपी, अशा दुष्टचक्राला सुरुवात होऊन प्रकरण घटस्फोटापर्यंतही पोचू शकतं. कौटुंबिक दबावामुळे घटस्फोट होत नाही पण संसार निरर्थक बनतो अशी उदाहरणंही खूप आहेत.

स्त्री-पुरुष नातं ह्याचा अभ्यास करताना एकमेकांबद्दल असलेलं आकर्षण हे रास्त स्वरूपात व्यक्त होणं, त्याची समज वाढणं म्हणजे माझ्या दृष्टीनी आधुनिकतेचं एक पाऊल. ह्या उलट पारंपरिक मूल्यांमधे स्त्री-पुरुष आकर्षण ही नैसर्गिक भावना लपवून टाकण्याचा हट्ट होता. स्वतःला पारंपरिक असं म्हणवणारे, उठल्या-बसल्या पूजा करणारे, गंध लावून हिंडणारे, पण स्त्रियांच्या बाबतीत

विकृत नजर असणारे असे अनेक पुरुष आपल्या समाजात वावरत आहेत. ह्या उलट आधुनिकता वादाच्या म्हणजेच सत्यशोधकाच्या दृष्टिकोनातून पुरुषांनी केलेलं रास्त विधान असं असतं– ‘मला स्त्रियांविषयी आकर्षण वाटतं, पण मी असभ्यपणी आणि विकृत नजरेनी कुठच्याही स्त्रीकडे बघणार नाही. वागणार नाही.’ ह्याच पुस्तकसंचात आधुनिक आणि पारंपरिक हा स्वतंत्र लेख असल्यामुळे ह्याविषयी आणखीन इथे लिहिण्याचा इरादा नाही. हे सांगण्याचा उद्देश केवळ एवढाच आहे की, आधुनिकता आणि पारंपरिकता ह्यातल्या गोंधळामुळे समाज पिसून निघतो आहे.

अनेक बाबतींत घोटाळे झाले आहेत. त्यात एक महत्त्वाचा विषय लैंगिक शिक्षणाविषयीची समज हाही आहे. मुलगा झाला, मुलगी झाली इथपासूनच या लिंगभेदाला सुरुवात होते. ज्याप्रकारे आपण मुला-मुलींना वाढवतो त्यातून त्यांना काही संदेश निश्चितपणी पोचतात. मुलगे रडत नाहीत, मुलगे बाहुलीशी खेळत नाहीत, मुलगे स्वयंपाक करत नाहीत, घरकाम करत नाहीत, कारण ते ‘पुरुष’ असतात. पुरुषांनी हे काही करायचं नसतं, याउलट मुलींनी मुलीच्या जातीला शोभेसं वागलं पाहिजे, जपून राहिलं पाहिजे वगैरे शिकवलं जातं. यामुळे नकळत परिणाम असा होतो की, मुलांना वाटतं जी काय काळजी घ्यायची ती मुलींनी घ्यायची असते. मुलांवर काहीही जबाबदारी नसते.

लहान वयापासून मुला-मुलींची चांगली मैत्री झाली तर पुढे प्रश्न येत नाहीत. मुलं वयात येताना काय काय घडतं ते सांगणारं बरंच चांगलं साहित्य उपलब्ध आहे. मुलींच्या पाळी येण्याबद्दल काही पालक तिच्याशी बोलतात. मुलग्यांचा कोंडमारा होतो तो कोणाजवळ बोलता येत नाही. मुलींविषयी आकर्षण वाटतं, पण मुलींचा सहवास लाभत नाही. मग विकृती निर्माण होतात. स्वतःच्या शौर्याच्या बढाया सुरू होतात. नको त्या मार्गाचे मोह होतात.

लग्नानंतरच्या आयुष्यात नवरा-बायकोमधेही असं कधीच नसतं की दिवसभर कसेही वागा, एकमेकांचे अपमान करा आणि रात्र झाली की एकदम स्वर्गसुखाची अपेक्षा पूर्ण! समागमातलं सुख मिळवायचं तर आपलं नातं मैत्रीचं, आदराचं, दुसऱ्याच्या इच्छेचा सन्मान करण्याचं असायला हवं. सहजीवनाचे इतर पैलू जितके आनंददायी, जबाबदार असतील तेवढाच लैंगिक जीवनातला आनंदही दर्जेदार असतो.

स्त्री आणि पुरुष यांच्या शरीरात फरक असतात. त्यामुळे मानसिकतेत

मुळात फरक असतोच, शिवाय संस्कारांनी तो फरक अनेकपटींनी वाढवून ठेवला. स्त्री-पुरुषांच्या लैंगिक संबंधातला मुख्य फरक बराचसा छातीच्या आणि कमरेच्या जवळ असतो. पुरुषाला शरीराबाहेर आलेलं लिंग आणि वृषण असतं, तर स्त्रीची योनी शरीराच्या आतल्या भागात असते आणि त्याला जोडून त्याच्या आत गर्भाशय आणि गर्भ राहण्यासाठीचे अवयव असतात.

बहुतेकांचे सगळे अवयव 'नॉर्मल' असतात, पण क्वचित काही गोष्टी 'ॲबनॉर्मल' असू शकतात. मुलग्यांच्या अंगावर केस यायला लागतात. राकटपणा येतो. दाढी-मिशी येते. चेहऱ्याच्या आकारात फरक होतो. अशा नॉर्मल गोष्टी उशिरा होणं किंवा न होणं याबद्दल जरा वाट पाहून तपासणी केलेली चांगली. थोड्या प्रमाणात ॲबनॉर्मल असूनदेखील लिंगताठरता ही महत्त्वाची गोष्ट होत असेल तर, त्याकडे दुर्लक्ष करायला हरकत नाही. मुलींचंही असंच ठरलेलं वर्णन असतं. योनीभोवती केस, स्तनाच्या आकारात वाढ, नितंबाच्या आकारात वाढ, डोक्यांच्या केसांची वाढ, चेहऱ्याचा नाजुकपणा या गोष्टी नॉर्मल आहेत.

लहानवयात प्रमाणाबाहेर मोठे स्तन असले, तर मुलीला न्यूनगंड येतो. हीच गोष्ट तरुणवयात अभिमान बाळगण्याजोगी ठरते. स्तनांच्या आकाराचा कामेच्छेशी किंवा दूध असण्यानसण्याशी काही संबंध नसतो. जगात, भारतात काही नट्या त्यांच्या चेहऱ्यापेक्षा आणि अभिनयापेक्षा स्तनाच्या आकारामुळे पुढे आल्याची उदाहरणं आहेत. साहजिकच त्यांना भूमिकाही तशाच मिळायच्या.

पुरुषांच्यात ताठणारं लिंग ही महत्त्वाची परीक्षा असते. तशी स्त्रीशरीरात नसल्यामुळे स्त्रीच्या कामेच्छेमधे काही विकृती असली, तरी ती वेळेवर कळत नाही. त्या अर्थानी लग्नाच्या वेळी पुरुष जुगारच खेळत असतो, कारण होणाऱ्या बायकोच्या कामेच्छेविषयी त्याला काही माहिती नसते.

भारतीय स्त्रीची सर्वसाधारण मानसिकता अशी असते. आपल्या शरीराला पहिल्यांदा स्पर्श करणाऱ्या पुरुषाला तिच्या दृष्टीनी खूप भावनिक महत्त्व असतं. नवरा आणि बायको दोघांचीही अशी मानसिकता असू शकते, पण अशा विचारांचे पुरुष संख्येनी कमी असतात. जे तसे असतात त्यांच्या दोघांच्याही मनात आपल्याला लैंगिक सुख देणारी एकमेव व्यक्ती म्हणून एकमेकांविषयी प्रेम आणि कृतज्ञता असते.

पुरुषाच्या सगळ्या लैंगिक आयुष्यात स्त्रीपेक्षा खूप निराळी असलेली गोष्ट अशी की पुरुष मानसिकदृष्ट्या उद्दीपित झाला, त्याचं लिंग ताठलं की त्याला

काहीतरी करावंचं लागतं. मूठ मारून म्हणजे ‘मास्टरबेशन’ करून वीर्य गाळावं लागतं किंवा स्त्रीशी संभोग करावा लागतो. पुरुष चक्क अगतिक होतो, त्याला इतर काही सुचत नाही. हा ‘हेल्पलेसनेस’ पुरुषाची संपूर्ण मानसिक घडण विकसित करतो. जगाच्या इतिहासात स्त्री प्राप्त करण्यासाठी अनेक युद्धं झालेली आहेत. छोटी भांडणं तर अगणित संख्येनी रोज चालू असतात. वरवर काहीही भांडणाचं कारण दिसत असलं, सांगितलं असलं तरी खरं वादाचं कारण कुठची तरी विशिष्ट स्त्री हे असतं.

मोठ्या लोकांनाही तीच अगतिकता असते. श्रीमंतालाही तीच. ज्याला जे जमतं, परवडतं तो ते करतो, पण मुळातलं कारण एकच. श्रीमंत सुंदर रखेल सांभाळतो, अनेक अधिकृत बायका करतो, आणि कमी पैसे असणारा वेश्येकडे जातो. सुंदर, हुशार, स्वच्छ, रोगमुक्त, सुशिक्षित, सुसंस्कृत वेश्या फार पैसे घेते. त्यामुळे गरीब परवडेल त्या वेश्येकडे जातो. त्या वेश्या काय दर्जाच्या असतात हे आपल्याला वेश्यावस्तीच्या आसपास बघायला मिळतं. लोक त्यांच्याकडे कसे जातात हा आपल्याला प्रश्नच पडतो. त्याहून गरीब पुरुष सुद्धा अगतिक होऊ शकतोच की. अशा माणसाला लैंगिक संभोगासाठी भिकारीण, वेडी, मतिमंद कशीही स्त्री चालते. गुंड लोकांचीही अडचण तीच, पण फरक एवढाच की ते कुठच्यातरी स्त्रीवर बलात्कार करतात.

या वयातलं मुलींचं मुलांबद्दल आकर्षण खूप स्वप्नील असतं, तर मुलग्यांच्या वागण्यामधे शारीरिक रेटा असतो. या काळात जे शिक्षण मिळायला हवं ते मिळत नाही. मुलींना मित्र हवेत आणि मुलांना मैत्रिणी हव्यात, तर त्यांना मुलगे-मुली कसे असतात, कसे वागतात, काय विचार करतात हे समजेल. हे समजणं आवश्यक आहे, नाहीतर लग्नासाठी एखादा मुलगा समोर आला तर तो कसा आहे हे समजून घेण्याची मुलीची तयारी झालेली नसते. मुलगे-मुली यांची गटानी झालेली मैत्री खूप प्रगल्भता देऊ शकते. असे जवळचे मित्र-मैत्रिणी एकमेकांना सांभाळतात, शिकवतात, घडवताततही. मात्र त्यांना त्या मैत्रीच्या मर्यादा ठाऊक हव्यात. या मुलांच्या पालकांची एक जबाबदारी आहे. आपल्या मुलांनी त्यांच्या जीवनात येणाऱ्या मुलींशी, स्त्रियांशी सन्मानानी वागलं पाहिजे, त्यांचा आदर केला पाहिजे हे पालकांनी शिकवायला हवं.

सर्वसाधारण भारतीय स्त्री आणि सर्वसाधारण भारतीय पुरुष यांच्या विचारपद्धतीमधेच फरक असतो. एखाद्या मध्यम रूपाच्या स्त्रीला आपल्याबद्दल

आकर्षण वाटतंय् हे कळलं तरी भारतीय पुरुष खूष होतो. काही पुरुष तिथे थांबत नाहीत, परस्पर असा निष्कर्ष काढतात की, त्या स्त्रीला आपल्याशी लैंगिक संबंधाची इच्छा आहे. काही त्याच्याही पुढे जाऊन खुणावतात, चाळे करतात, बलात्काराचाही प्रयत्न करतात. याउलट सरासरी भारतीय स्त्री मध्यम रूपाच्या पुरुषाला आपण आवडतो हे कळल्यामुळे खूष होत नाही. उलट त्यांना भीती, घृणा वाटू शकते. याला अपवाद असतातच, पण फार कमी. मी इथे मध्यम रूपाच्या स्त्री किंवा पुरुषाबद्दल असं म्हणतोय कारण खूप सुंदर लोकांची गोष्ट निराळी असू शकते.

या सगळ्यावरून आपण सध्याच्या तरुण, मध्यमवयीन, ज्येष्ठ लोकांना उपयोगी असं काही शोधू शकू का खरा प्रश्न आहे. गेल्या 50-60 वर्षांचा आढावा आपण घेतला तर एक गोष्ट लक्षात येते की, कुठल्या स्त्रीला कुठचा पुरुष कशामुळे आवडेल याला काही नियम नाही. अगदी तसंच कुठच्या पुरुषाला कुठची स्त्री कशामुळे आवडेल याला काही नियम नाही. आईवडलांनी निवडलेलं स्थळ असलं तर त्याचा साचा अगदी सोपा आहे. श्रीमंत मुलगा चांगला आणि सुंदर मुलगी चांगली. सर्वांत चांगल्याची आशा करत करत कशात किती तडजोड करायची हे आईवडील ठरवतात.

प्रेमविवाहाची सगळी गोष्टच निराळी. एखाद्या मुलीला मुलगा निवडताना शिक्षणाचं, पैशाचं, तर कोणाला उंचीचं, रंगाचं, खेळातल्या प्राविण्याचं कशाचंही महत्त्व वाटू शकतं. मुलांना मुलगी निवडताना तिच्या रूपाचं, रंगाचं, एखाद्या इतर गुणाचं, शरीरयष्टीचं, स्तनाच्या आकाराचं, केसांचं कशाचंही महत्त्व वाटू शकतं. अशा प्रेमविवाहात जी गोष्ट पुढे खूप महत्त्वाची ठरते त्या गुणाबद्दल म्हणजे स्वभावाबद्दल बऱ्याच वेळा काहीच माहिती नसते. तेवढीच महत्त्वाची गोष्ट लैंगिक व्यक्तिमत्त्व. त्याबद्दल तर शून्य माहिती असते. या सगळ्या गोष्टींवर इलाज म्हणून परंपरेनी मुलाचं कमीतकमी वय 21 आणि मुलीचं 18 ठरवलं. कल्पना अशी की, लैंगिक प्रगल्भता त्या वयापर्यंत आलेली असते. त्याचाच पुढे कायदा बनला. भविष्यात या कायद्यात बदल होऊ शकेल.

लैंगिकतेबद्दल स्वतःच्या लहान मुलांशी वागण्याबद्दल एक महत्त्वाची गोष्ट सांगतो. सर्वसाधारण भारतीय घरांच्यात लहान मूल जरा 2-3 वर्षांचं झालं की त्याच्याबरोबर सगळे कपडे काढून अंघोळ करत नाहीत. मुलं वडलांची नुन्नी आणि आईचं काहीतरी निराळंच आहे याबद्दल सुरुवातीला विचारतात. मुलांच्या

मनात स्त्रीचं शरीर आणि पुरुषाचं शरीर याबद्दल विचार चालू असतातच. ते कोडं तसंच पडलेलं राहण्यापेक्षा लहान मुलांनी किंवा मुलींनी एकत्र अंघोळीच्या वेळेला आईवडिलांना पाहाण्यात जास्त फायदे आहेत. मनातली अस्वस्थता संपते. आपण मुलगा आहोत म्हणजे काय आणि आपण मुलगी आहोत म्हणजे काय हे कळल्यामुळे मूल शांत होतं. अज्ञानापेक्षा ज्ञानाचे फायदेच फायदे असतात. काही काळानी मूल आईवडलांच्या शरीराकडे लक्ष पण देत नाही, कारण ज्ञानाची भूक शमलेली असते.

स्त्री-पुरुषांनी भेटल्यावर एकमेकांची सौंदर्याची उघड तारीफ करणं, पोषाखाविषयी बोलणं, जाड, बारीक याविषयी उल्लेख करणं हे पाश्चात्त्य आहे. सर्वसाधारणपणी भारतीय स्त्रियांना परपुरुषांनी असे उल्लेख केलेले आवडत नाहीत. यातही पाश्चात्त्यीकरणामुळे थोडेथोडे बदल होतायत्. संस्कृतिसंरक्षक लोकांना याची खूप चिंता वाटते. मी स्वतः संस्कृतीचा आधुनिक अर्थ शोधण्याच्या प्रयत्नात असल्यामुळे मला त्यातल्या चांगल्या-वाईट दोन्ही गोष्टी दिसतायत.

जीवनसाथ विवाह अभ्यास मंडळात निरनिराळे 60 विषय मागणीप्रमाणे चर्चेला असतात. त्यातला 'लैंगिक संबंध' हा एक विषय असतो. एकदा माझा एक नातेवाईक आमच्याकडे रहायला आलेला असताना योगायोगानी जीवनसाथची कार्यशाळा होती आणि तशाच योगायोगानी 'लैंगिक शिक्षण' हा विषय लोकांनी निवडलेला होता. हा माझा नातेवाईक विवाहित, दोन लग्नाच्या वयाची मुलं असलेला, अनुभवी माणूस होता. कार्यशाळेत तो काहीच बोलला नाही. नंतर दुसऱ्या दिवशी त्यांनी मला त्यांचं मत सांगितलं. त्याच्या मते आदल्या रात्री बराच विचार करून तो अशा निष्कर्षापर्यंत पोचला होता की, मी हे जे लैंगिक शिक्षण देण्याचं काम करतोय ते अतिशय समाजविघातक आहे आणि ते मी ताबडतोब थांबवावं.

लैंगिक भावनिक संबंध यावरचे काही मोजकेच चित्रपट आहेत. मगाशी म्हणालो तो 'उत्सव' सिनेमा, तसाच मराठीत 'अनाहत' हा चित्रपट आहे. सत्यमेव जयते मधे आमीर खाननी 'चाईल्ड अ‍ॅब्यूज' ऊर्फ लहानपणी कुणातरी मोठ्या वयाच्या स्त्री किंवा पुरुषाची लैंगिक शिकार बनलेल्या मुलांसंबंधी कार्यक्रम केला होता. या सगळ्या कलाकृती म्हणून चांगल्या आहेत. पण एका गोष्टीला, कुठल्याही प्रकारच्या कॅमेऱ्याला मर्यादा आहे. मानवाच्या स्त्री आणि पुरुषाचे लैंगिक अवयव अशा जागी आहेत की प्रत्यक्ष लैंगिक संभोगकृतीचं चित्रीकरणच

करता येत नाही. त्यामुळे हा विषय शिकवणंही कठीण होऊन बसलं. लैंगिक शिक्षणाबद्दल मुळात समाजाचा नकार आहेच. मगाशी आपण म्हणालो तशी स्त्रियांची मुस्कटदाबी जास्त आहे.

अशा स्त्रियांची आणि एकूणच भारतीय स्त्रीपुरुषांची अवस्था अशी आहे की, खोलीत धूर कोंडला आहे. श्वास घ्यायला त्रास होतोय, पण खोलीबाहेर जाता येत नाही. त्यामुळे भारतानी, आपल्या समाजानी शेकडो वर्षं अशक्त मनं तयार केली.

एरवीच्या व्याख्येत जो प्रगत समाज आहे त्याची एरवीच्या अप्रगत आदिवासी समाजाशी तुलना केली, तर या एका बाबतीत शहरी, सुशिक्षित, सुसंस्कृत समाजाची अधोगतीच झाली असं म्हणावं लागतं. आदिवासी समाजात 'घोटुल' असतात. त्यामधे मुक्त शारीरिक संबंधासाठी समाजाच्या संमतीनी जाऊन रहता येतं. लैंगिक संबंधाचा अनुभव घेऊन मग लग्नाचा जोडीदार निवडता येतो. ठराविक काळानंतर नियमितपणी होणाऱ्या उत्सवात लग्नाव्यतिरिक्त इतरांबरोबर लैंगिक संबंध ठेवण्याची पद्धतच असते. त्यामुळे अशा समाजात लैंगिक गुन्हेगारी नसते. बलात्कार होत नाहीत.

गेली काहीशे वर्षं शारीरिक संबंधात पुरुषाचं समाधान एवढाच विचार होता. प्रणयामुळे मिळणारा आनंद माहिती नव्हता आणि स्त्रीचं लैंगिक समाधान या विषयाकडे पूर्ण दुर्लक्ष केलेलं होतं. स्त्रियांना या गोष्टींची जाणीव झाली. शहरांच्यात सुरू झालेली त्याची पुढची पायरी म्हणजे समाधानाची मागणी. पुरुष अस्वस्थ झाला. आजही अगदी सुशिक्षित, सुसंस्कृत शहरी कुटुंबात स्त्रीचं लैंगिक समाधान हा विषय नवीनच आहे जणू काही. तरुण मुलामुलींना विवाहापूर्वी, विवाहितांना विवाहानंतर लवकरात लवकर हे सगळं समजावं. ज्येष्ठांना फार उशीर व्हायच्या आत हा विषय त्यातल्या अनेक बारकाव्यांसकट समजावा आणि सगळ्यांचं सहजीवन समंजस आणि समृद्ध व्हावं हीच आमची कायम धडपड असते.

●

# 5) लैंगिक शिक्षणाची कार्यशाळा

शोभाचं आणि माझं असं मत आहे की, लैंगिक संबंध या विषयासाठी मोठा ग्रुप किंवा व्यक्तिगत समुपदेशन या दोन्ही पद्धतीपेक्षा छोटा 5-10 लोकांचा गट सर्वांत चांगला असतो. तीन जोडपी आणि मी नि शोभा हे सर्वांत चांगलं. यामुळे संकोचही होत नाही आणि विचार ताडून बघण्यासाठीही इतर जोडपी असतात. आमचं काम शारीरिक तपासणीचं नाही तर मनाला, विचार आणि भावना यांना शिवणं हे आहे, ते या संख्येत चांगलं जमतं. चुकून काही 'ॲबनॉर्मल' असलं, तरी एवढ्या लोकांच्यात जोडपी बोलतात. मग त्यांना 'सेक्सॉलॉजिस्ट'कडे पाठवायचं का 'सायकायाट्रिस्ट'कडे हे आम्ही ठरवू शकतो. आवश्यक तेवढे 'स्पेशॅलिस्ट' आमच्या संपर्कात असतातच.

आपण सगळे इथे बसलेले 'नॉर्मल', मध्यमवर्गीय, आणि सुशिक्षित वर्गातले आहोत. आपलं लैंगिक जीवन आनंददायक आणि समाधानकारक असायलाच हवं. आपल्याला फक्त त्यातल्या ज्ञानाची उणीव असू शकते. आपण इथे जमलेल्यांपैकी कोणी आज अजून अविवाहित असलो, तरी विवाहानंतर आपली स्वतःची स्वतःकडून तशी अपेक्षा आहे. आपण विवाहित असलो तर लग्न करताना एकमेकांना पसंत होतो म्हणून स्वेच्छेनी लग्न केलं आहे. कुठल्याही दोन नॉर्मल, एकमेकांना पसंत असलेल्या स्त्रीपुरुषांचं आयुष्य लैंगिक संबंधांसकट समाधानी असायलाच हवं. त्यासाठी तर विवाह शिक्षण ही कल्पना मी चालू केली आहे. इथे गटचर्चा चालतात. कारण त्याच्याइतकं खरा परिणाम करणारं दुसरं काही नाही.

मुळातच हा विषय फारसा उघड बोलला जात नाही त्यामुळे अज्ञान असतंच. एका मुलीनी तिच्या मैत्रिणीचा अनुभव सांगितला. ती मधुचंद्राच्या वेळी नवऱ्याला असं असतं, तसं नसतं सांगू लागली तर तो वेडा चिडला. संशयानी म्हणाला "तुला हे सगळं कसं माहीत?" तिनी एका वेबसाइटचं नाव सांगितलं आणि म्हणाली "यावर ही सगळी माहिती आहे. तू काहीच वाचलं नाहीस का?"

विवाहानंतरची पहिली रात्र आणि त्यात मिळणारं स्वर्गसुख सगळंच अतिरंजित स्वरूपात मुला-मुलींपर्यंत पोचलेलं असतं. 'हनिमून' नावाची अतिशय 'रोमँटिक' पाश्चात्त्य कल्पना मनात ठसलेली असते. फार अपेक्षेनी पहिल्या

रात्रीकडे बघितलं तर धक्क्याची शक्यताच जास्त. शारीरिक संबंध नीट जमला नाही तरी तसं कोणाला सांगता पण येत नाही. एवढी लांबच्या प्रवासाची तिकिटं, 'हॉटेल रिझर्व्हेशन' केल्यामुळे दडपण वाटतं. खरा मुख्य मुद्दा मन स्वस्थ असण्याचा असतो. मुळात परक्या नवीन व्यक्तीसमोर सगळे कपडे काढण्याचा स्त्रीचा संकोच, नवरा आपल्याला चांगलं वागवेल की नाही याबद्दल पोटातली भीती यामुळे मनावर ताणच जास्त असतो. पहिल्या रात्रीच काय, हनिमूनच्या चार-पाच दिवसांतही हे ताण संपून खरी मैत्री होऊ शकत नाही. खरा समाधान देणारा लैंगिक संबंध जमायला काही महिनेही लागतात. मधुचंद्राचं अवास्तव महत्त्व जोडप्यांनी टाळावं असं आम्हाला प्रामाणिकपणे वाटतं.

स्त्री-पुरुष आकर्षण, मैत्री, लैंगिक संबंध, या नैसर्गिक गोष्टी आहेत हे खरं असलं, तरी केवळ नैसर्गिक म्हटलं की पुरत नाही. प्रेम, आदर, विश्वास, समानता यांच्या संस्कारांखेरीज या गोष्टी नैतिक होत नाहीत. सुसंस्कृत होत नाहीत. भूक लागली की आपल्याजवळचं खाणं ही प्रकृति आहे, दुसऱ्याचं ओरबाडून खाणं ही विकृती आहे. पण आपल्याजवळचं दुसऱ्याला देणं ही संस्कृती आहे. समागम ही केवळ स्वतःच्या आनंदासाठी करायची स्वार्थी कृती नाही, तर ती दुसऱ्याला आनंद देण्याची जबाबदारी आहे, आणि ती दोघांना कळायला हवी.

पाण्यात पडलं की पोहता येतं हे खरं नाही. उलट नाकातोंडात पाणी जाऊन ठसका लागून कासावीस व्हायला होतं, पंचाईत होते याबद्दल आमची खात्री झाली आहे.

अभ्यासमंडळात येणाऱ्या तरुण-तरुणींना लैंगिकतेबद्दल अनेक प्रश्न असतात. एका तरुण मुलीला लैंगिक संबंध हा विषयच फार भीतिदायक वाटत होता. एक तरुण मुलगा मुलीशी ओळख होते न होते तोच "तुझं सेक्सबद्दल काय मत आहे?" असं विचारायचा. काही मुलं प्रगल्भपणे कुतूहल व्यक्त करतात, 'एखाद्याची सेक्स पर्सनॅलिटी आधी कळू शकेल का?" काही मुली बेदरकारपणी म्हणतात 'त्यात काय झालं? लग्नाआधी कुणाशी संबंध आला तर विसरून जायचं! एवढा काय बाऊ करायचा त्याचा?'

यानंतर हस्तमैथुन, मधुचंद्र, मनातले संकोच, एकमेकांविषयी गैरसमजुती, मनावरचे अवास्तव ताण, लैंगिक जीवनातलं नॉर्मल काय, मूल केव्हा व्हावं, अशा अनेक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा होतात.

लग्नाच्या आधी सर्वांत महत्वाची गोष्ट काही असेल तर ती म्हणजे

वैद्यकीय तपासणी. आपल्या सुशिक्षित समाजापर्यंत 'एड्स' हा मानवजातीचा शत्रू पोचलेला नाही अशी इच्छा असणं समजू शकतो, पण डोळे मिटून बसल्यानी घोटाळा तर टळत नाही. एड्स आणि इतरही संपूर्ण वैद्यकीय तपासणी लग्नाआधी व्हायलाच हवी. ग्रुपमधल्या लोकांना यावर मत विचारलं तर हो म्हणतील. पण लग्न ठरवताना हे भावी जोडीदाराला सांगण्यासाठी लोकांची जीभ रेटत नाही. असं समजू या की, लाखात एखाद्याच ठिकाणी हा धोका आहे, पण ती लाखातली एक व्यक्ती तुम्ही स्वतः असणं चालेल का हा विचार व्हायला हवा. पुण्यामध्ये जीवनसाथला जोडलेलं नवरा-बायको दोघं डॉक्टर असलेलं एक जोडपं आहे. त्यांच्याकडे आमचे सदस्य तपासणीसाठी जातात. मुंबईमधे अशाच वर्णनाचं एक दुसरं जोडपं आहे तिकडे आम्ही जायला सांगतो.

एकमेकांची अडवणूक करताना पैसा आणि लैंगिक सुख ही दोन महत्त्वाची शस्त्रं विवाहित नवराबायको वापरतात. चांगल्या सहजीवनात ही कटाक्षानी टाळण्याची गोष्ट आहे. बायकोला इच्छाच होत नाही अशी असंख्य जोडपी आहेत.

जीवनसाथमधे येणारी विवाहित मंडळी हा प्रश्न नेहमी विचारतात की, "स्त्रियांची लैंगिक इच्छा लवकर का संपते?" आम्हाला असं वाटतं की, लग्न झाल्यापासून घरात स्त्रीवरचे ताण सतत वाढते असतात, अनेकदा घरसंसार, मुलं, नातेवाईक अशा जबाबदाऱ्या तिच्या गळ्यात टाकून नवरा मोकळा होतो. आता तर काही क्षेत्रांत नवरे 15-18 तास कामातच असतात. त्यांच्या बायका गमतीनी म्हणतात "वी आर लिव्हिंग लाइक ब्रदर अँड सिस्टर." स्त्रियांची इच्छा लवकर संपते. कारण वैवाहिक जीवनात तिच्या इच्छेचा सन्मान होत नाही. लैंगिक जीवनात तर तिच्या समाधानाकडे लक्ष देत नाहीत कारण याबद्दलचं अज्ञान आणि अहंकार.

लैंगिक जीवनातली खरीखुरी गोडी दोघांनाही चाखता यायला हवी असेल, तर हेच लक्षात घ्यायला हवं, की ती नुसती शारीरिक क्रिया नाही. त्यासाठी सहजीवन चांगलं राखायला हवं, त्याच्या मानसिक, भावनिक, सांस्कृतिक, बौद्धिक अंगांकडेही लक्ष देण्याइतकी सवड ठेवायला हवी. योग्य ते लैंगिक शिक्षण कुठच्याही वयात घ्यायलाच हवं.

'मुलींना, स्त्रियांना लैंगिक शिक्षणाची गरज आहे ती विकृत पुरुषांपासून बचाव करण्यासाठी. मुलग्यांना, पुरुषांना लैंगिक शिक्षणाची गरज आहे ती त्यांच्यात विकृती येऊ नये म्हणून.' हे कितीही कडू वाटलं तरी हेच आपल्या समाजाचं चित्र आहे.

●

# 6) लैंगिक संबंधातलं समुपदेशन

समुपदेशनाला माझ्याकडे जोडपी येतात. पण एकटा पुरुष अडचण घेऊन क्वचित येतो. मुलींच्या अडचणी जास्त असतात. कारण त्यांची शरीरचना आणि मनोवृत्ती दोन्ही विशिष्ट प्रकारच्या असतात. त्यांची अडचण पुरुषांसंबंधीच असते, पण तो विशिष्ट पुरुष त्याला अडचण मानत नाही. तो समुपदेशनाला येत नाही. एक मुलगी लग्न होऊन परदेशात गेली. तिथे नवऱ्यानी तिचा पासपोर्ट काढून घेतला, तिला घरात कोंडलं आणि तिचा 'सेक्स मशीन'सारखा वापर केला. रोज दोनदा जबरदस्तीनी संभोग करायचा नि एरवी दुर्लक्ष करायचा. सुरुवातीला एकदा तिची पाळी उशिरा आली तेव्हा तिला वाटलं आता मूल झालं की नवरा सुधारेल. काही दिवसांनी पाळीही आली. तसंच दोन-तीनदा झालं. ती पुढे इतकी निराश झाली, वैतागली, खचली की तिला ते जगणं असह्य झालं. पुढे तिनी निराळं व्हायचं ठरवलं आणि ते दोघं भारतात परत आले. आता तिला वाटतं दिवस नाही गेले हे फार मोठं सुदैव आहे.

दुसरी एक परराज्यात स्थायिक झालेली मुलगी मूळची मराठी मुलगी होती. लग्नापूर्वी तिचा एका मुलाबरोबर लैंगिक संबंध आलेला होता. समुपदेशनाच्या काळात मी तिला खरं म्हणजे सांगितलं होतं की ही गोष्ट होणाऱ्या नवऱ्याला कशी सांगायची यावर थोडं काम करावं लागेल. एक-दोन वेळा भेटून त्यावर लिखाण करून तयारी करावी लागेल. कारण भारतीय मुलगे कसा विचार करतात हे आपल्याला चांगलं माहिती आहे. प्रत्यक्षात ही मुलगी भावनेनी सगळ्या गोष्टींकडे बघण्याच्या व्यक्तिमत्त्वाची होती, त्यामुळे अधीर होती. लिखाण करून त्याच्यावर जरा थंड डोक्यानी विचार करण्याइतका तिला संयम नव्हता. त्यामुळे तिनी त्याला धाडदिशी सांगूनच टाकलं. त्यामुळं भावनिक वादळात ती सापडली होती आणि तिचा होणारा नवराही त्यामुळे उन्मळून पडला होता. समुपदेशनानंतर ती दोघंही त्यातून बाहेर आली आणि त्यांनी लग्न केलं.

आणखी एका मुलीचे तिच्या कुटुंबाशी सलोख्याचे संबंध नव्हते. लग्न ठरण्यात खूप अडचणी येत होत्या. या अस्वस्थतेमुळे तिचे एका विवाहित पुरुषाशी लैंगिक संबंध सुरू झाले. तो माणूस म्हणायला लागला मी कधीच

पहिल्या बायकोला सोडून तुझ्याशी लग्न करीन म्हणालो नव्हतो. तिनीच लग्नाच्या आशेनी या संबंधांना स्वतःहून प्रोत्साहन दिलं आणि आता स्वतः सापळ्यात सापडली.

अशी उदाहरणं बघितली की, कळतं की लैंगिक शिक्षणाची आपल्या सुशिक्षित, सुसंस्कृत समाजातही नितांत गरज आहे.

लैंगिक संबंधात स्त्रीलाही महत्त्व देणं हा विषय पुरुषप्रधान समाजाला पचत नाही हे विसंवादाचं खरं कारण निघतं. संबंध सुरळीत असले, तर नवरा-बायको दोघांना ते बिनखर्चात मिळणारं सुख असतं. ते नसलं तर सगळीच फसगत होते, चंगळ नाहीतर बरबादी अशी ही परिस्थिती असते. इंग्रजीत ज्याला 'फीस्ट ऑर फॅमाइन' म्हणतात ते हेच. घरात बरबादीची परिस्थिती असली, तर लग्न या जुगारात स्त्रीपुरुष दोघंही कंगाल होतात. पुरुष कामानिमित बाहेर जाऊन बाहेरच काहीतरी 'उद्योग' निदान करू शकतो. घरीच असलेल्या बाईवर मात्र खूप अन्याय होतो.

लैंगिक संबंधाचं प्रमाण जास्त, कमी, क्वचित, बंद, याबाबतीत नवरा-बायको दोघांचं संपूर्ण एकमत असेल तर काहीच प्रश्न नाही. जेव्हा या प्रकारचा उल्लेख दुसऱ्यापाशी केला जातो तेव्हा त्याचा अर्थ उल्लेख करणाऱ्या व्यक्तीला ते रुचत नाहीय. कौटुंबिक विसंवादाचं हे अनेक वेळा कारण असतं.

दुर्देवानी ज्या चालीरीती रूढ झालेल्या आहेत त्यात लैंगिक शिक्षण बसत नाही. लैंगिक प्रश्नांना झाकून, लपवून सहन करत बसण्याची रीत फार अनिष्ट आहे. या विषयातल्या समुपदेशनाला लोक तयार नसतात. घरातला प्रश्न उंबऱ्याबाहेर जाऊ द्यायचा नाही या तत्वामुळे 'प्रायव्हसी'ची कल्पना डोक्यात घट्ट बसलेली असते. त्यात हा विषय 'प्रायव्हेट पार्टस' बद्दलचा. त्यामुळे फारच संकोच. प्रत्यक्षात ज्या गोष्टीला नवरा आणि बायको दोघं लागतात अशी ही एकच गोष्ट असते. प्रातर्विधी, अंघोळ, जेवण, झोप या सगळ्या एकट्यानी करण्याच्या क्रिया आहेत. पण लैंगिक संभोग एक व्यक्ती करूच शकत नाही. तिथे एकच स्त्री आणि एकच पुरुष लागतो. कौटुंबिक विसंवादासाठी जेव्हा जोडपी समुपदेशनाला येतात तेव्हा अनेक विषय निघतात. कित्येक वेळा असं लक्षात येतं की, खरं कारण लैंगिक अतृप्ती हे आहे. बहुतेकवेळा नवरा आणि बायको शरीरानी आणि मनानी नॉर्मल असतात. फक्त या विषयातल्या ज्ञानाची कमतरता असते.

आता हे ज्ञान म्हणजे काय हा प्रश्न तुम्हाला पडला असणार. दोन मुख्य प्रश्न मनात असतात. संभोग किती वेळा आणि किती वेळ हा तो प्रश्न. कितीवेळ याचं उत्तर अगदी सोपं आहे. सलग न थांबता योनीत लिंग घालून हलवत राहण्याची सरासरी 1 ते 3 मिनिटं एवढीच असते. थांबून थांबून, मधे एकमेकांना सूख देणाऱ्या इतर क्रिया करून संभोग केला, तर अर्धा-पाऊण तास सुद्धा संभोग चालू शकतो. खरं म्हणजे यापेक्षाही जास्त वेळ संभोग करता येतो, पण सरासरी माहिती असणं जरुरीचं आहे. म्हणजे स्त्रीला आणि पुरुषाला न्यूनगंड येत नाही.

संभोग कितीवेळा याचं उत्तर मात्र सोपं नाही. ते मला जरा सविस्तर सांगावं लागेल. मी सेक्सॉलॉजिस्ट नसल्यामुळे यातला माझा समुपदेशनाचा अनुभव मर्यादित आहे. दुसराच कुठलातरी प्रश्न घेऊन जोडपं येतं आणि अनेकवेळा भेटल्यानंतर हळूहळू त्यांच्या बोलण्यातून लैंगिक अतृप्ती बाहेर येते. मी केवळ तोच व्यवसाय करत नसलो, तरी त्याविषयी मी प्रचंड वाचन केलेलं आहे. इंग्लंड, अमेरिका, इतर जगातले देश आणि भारत यांच्याबद्दलच्या निराळ्या माहितीचा अभ्यास केलेला आहे. त्यातली सरासरी भारतीय व्यक्तीला उपयोगी पडणारी मी निवडून काढली आहे आणि ती माहिती खाली देतो आहे.

● 12 ते 16 वर्षांची मुलं शारीरिक संभोग करू शकतात, पण भारतातले मुलगे फार क्वचित करतात. 15-16 वर्षांचे मुलगे हस्तमैथुन करतात. पण त्याचंही प्रमाण फार कमी आहे. मुलीही हस्तमैथुन करू शकतात, पण त्याचं प्रमाण फारच कमी आहे. या वयाच्या मुलांनी किंवा मुलींनी आठवड्यातून तीनदा हस्तमैथून केलं तरी त्यानी अपाय होत नाही. त्यापेक्षा जास्त मात्र टाळलेलं चांगलं. भारतातले मुलगे-मुली, मुलगे-मुलगे, मुलीमुली एकमेकांना आनंद देण्यासाठी अगदी क्वचित एकमेकांसाठी हस्तमैथुन करण्याचं प्रमाणही फार कमी आहे. तोंडानी लिंग किंवा योनी चोखण्याचीही उदाहरणं सापडतात. पण मुलग्यांच्या किंवा मुलींच्या वसतीगृहात हे प्रकार जास्त प्रमाणात होतात.

● 16 वर्षांच्या पुढे तारुण्यात लग्न करायला अजून भरपूर वर्षं समोर दिसत असतात. मनात स्त्रीपुरुष आकर्षणाबद्दलचे विचार कमी-जास्त प्रमाणात सातत्यानी येत असतात. अशा काळात मुलगे रोज एकदा सुद्धा हस्तमैथुन, मुखमैथुन करतात. त्यामुळे अपाय होत नाही. त्यापेक्षा जास्त प्रमाणात मात्र असे प्रयोग केले, तर अपाय होऊ शकतात. मुलींपेक्षा मुलगे असे चाळे जास्त

प्रमाणात करतात. या सगळ्याच गोष्टी पाश्चात्त्य देशात भारताच्या तुलनेत बऱ्याच जास्त प्रमाणात असतात.

● काही मुलामुलींचं लग्न ठरलेलं असतं, साखरपुडा झालेला असतो, पण लग्न झालेलं नसतं. अशा परिस्थितीतले मुलगा-मुलगी वारंवार भेटतात, अनेक स्पर्श होतात. पूर्वी लग्नाच्या आधी एकमेकांना बघितलेलंही नसायचं या प्रथेपासून विचार बदलत बदलत एकमेकांशी बोलण्याची प्रथा पडली. त्यानंतर मुलगा-मुलगी दोघांनीच बाहेर सहलीला, जेवायला जाणं सर्वमान्य झालं. त्याच्या पुढचा टप्पा गाठण्याचं म्हणजे मिठी, चुंबन, लैंगिक अवयवांना स्पर्श याचं प्रमाण अजून कमी आहे पण हळूहळू वाढतंय. या काळात अजिबात हस्तमैथुन, मुखमैथुन न करणारे मुलगे-मुलीही असतात, आणि रोज करणारेही असतात. यामधे शरीराला अपायकारक काही नसतं. मनाचे सापळे मात्र नक्की तयार होतात. चुकून मोडावंसं वाटलं तरी त्यापुढे लग्न मोडणं शक्य होत नाही.

● लग्न झाल्यानंतरचा काळ खूप महत्त्वाचा असतो. संपूर्ण समाजाच्या, कुटुंबांच्या संमतीनी शारीरिक संभोग करायचा असतो. त्या दिवसापासून पुढच्या सबंध आयुष्यावर त्या पहिल्या रात्रीचा परिणाम होणार असतो. त्या पहिल्या रात्रीपासून बायकोला गर्भ राहीपर्यंतच्या काळाविषयी संभोग कितीवेळा यावरून जुळतं किंवा जुळत नाही. त्या सरासरीची नीट माहिती असावी असा इथे उद्देश आहे.

बायकोच्या मासिक पाळीचे दिवस वगळलेले चांगले. ते सोडून रोज रात्री संभोग अशीच खरी अपेक्षा असते. एकमेक जोडीदाराला किती आवडले, शारीरिक क्षमता, तब्येती चांगल्या असल्या, तर नवराबायको एका रात्रीत दोनदा-तीनदाही संभोग करू शकतात. नवराबायको दोघांची संमती असली तरच असा संभोग करावा, जबरदस्ती करायची नाही असं गृहीत धरलेलं आहे. ज्या जोडप्याला लग्नानंतरच्या पहिल्या वर्षात महिन्यातून 25 वेळा संभोग जमत असेल त्यांनी समाधान मानावं.

यापेक्षा प्रमाण कमी असलं तर मानसिक अस्वस्थता, शारीरिक दमणूक, गैरसमजूत यापैकी काहीतरी असलं पाहिजे असं समजून दोघांनी समुपदेशकाकडे जावं हे सर्वांत चांगलं. एकदोन भेटींमधे समुपदेशकाला जरूर वाटली, तर तो लैंगिक विकारतज्ज्ञाकडून शारीरिक तपासणी करवून घ्यायला सांगतो.

लग्नानंतरच्या एकदोन वर्षांपासून 5-7 वर्षांमधे जोडप्याला मुलं होतात. तोपर्यंत महिन्यात 25 रात्री 25 वेळा संभोग या प्रमाणात साधारणपणी फार

बदल होत नाही. बाकीच्या अनेक संदर्भाप्रमाणे, वागणुकीप्रमाणे एकमेकांविषयी प्रेम, आकर्षण वाढावं अशी अपेक्षा असते. आकर्षण वाढलं तरी जोडीदाराबरोबरच्या संभोगातलं नाविन्य संपलेलं असल्यामुळे सरासरीत बदल होत नाही.

● लग्न झालं, मुलं झाली की नवराबायकोच्या संभोगाच्या प्रमाणात एकदम खूप बदल होतात. मुलांमुळे जागरणं, त्यांची आजारपणं, आई-वडलांच्याच पलंगावर झोपण्याचा हट्ट अशा अनेक कारणांनी ते प्रमाण महिन्यातून 10-15 वेळा संभोग इतकं कमी होऊ शकतं. यापेक्षा संभोगाचं प्रमाण कमी झालं, एकमेकांचा कंटाळा आल्यासारखा वाटला तर समुपदेशकाला भेटलेलं चांगलं.

मुलं 5-7 वर्षांची झाली की बहुतेकवेळा रात्रभर शांतपणी झोपायला लागतात. मधे उठत नाहीत त्यामुळे नवराबायकोला एकांत मिळायला लागतो. हळूहळू महिन्यातून 10 वेळा पासून काही जोडपी महिन्यातून 25 वेळा संभोग या मूळ प्रमाणापर्यंतही पोचतात. प्रमाण वाढत नसलं तर जोडप्यानी समुपदेशकाला भेटणं चांगलं. मध्यमवयीन याची व्याख्या खूप प्रमाणात बदलू शकते. लग्न उशिरा झालं तर ही व्याख्या 35 ते 50 वयापर्यंत समजायला काही हरकत नाही. पन्नाशीपर्यंत पुरुषाला रोज संभोगाची इच्छा असल्याची खूप उदाहरणं आहेत. 40 ते 50 या वयात संभोगाची इच्छा आणि शारीरिक क्षमता हळूहळू कमी होत जाणं नैसर्गिक आहे. संभोगाचं प्रमाण महिन्यातून 10 वेळा ते महिन्यातून 2-3 वेळा एवढं कमी होऊ शकतं. या प्रमाणांच्यातही जोडपं बसत नसलं तर माझ्या मते समुपदेशकाला भेटावं.

● ज्येष्ठ जोडपी म्हणजे 55 ते 65 वयाची जोडपी कित्येक वेळा लैंगिक संबंधातून निवृत्त होतात, पण ते नैसर्गिक नाही आणि योग्यही नाही. महिन्यातून एकदा ते पाचदा अशी संभोगाची सरासरी भरत असली तर सगळं ठीक आहे समजावं. नाहीतर समुपदेशकाला भेटावं.

65 वयाच्या पुढे 75 वयापर्यंत संभोग करण्याची क्षमता शिल्लक असणारे बरेच असतात. क्षमता म्हणजे पुरुषाचं लिंग ताठणं. स्त्रीच्या शरीराचा कधीच प्रश्न नसतो. या वर्णनात बसणारं असलं तर काही अडचण नाही. नाहीतर समुपदेशकाला भेटावं. ‘आता निम्म्या गोवऱ्या मसणात गेल्या’ ‘आता काय उरलंय आमचं?’ ही वाक्यं चुकीची आहेत.

ही सगळी सरासरीची प्रमाणं सगळ्यांनी समजून घेतली, प्रत्येक बाबतीत

थोडीथोडी सवलत ठेवली, तर अनेक जोडप्यांमधले थोडे तरी विसंवादाचे विषय कमी होतील अशी मला खात्री वाटते.

याखेरीज आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख केल्याशिवाय मला नैतिकदृष्ट्या हा लेख संपवताच येणार नाही. अनेक जोडप्यांच्यात जी लैंगिक अतृप्ती असते त्याचं कारण सध्याच्या या बाबतीतल्या जगाच्या परिस्थितीबद्दल त्यांना नीट कल्पना नसते. नुसती ही माहिती मिळाली की त्यांचे हे प्रश्न काही प्रमाणात सुटू शकतील.

लैंगिक संबंधांमधे एकूण सहा जाती मानल्या गेल्या आहेत. या सहाही जातींमधे लैंगिक अवयव नॉर्मल मानून या जाती केल्या आहेत. अवयवांच्या व्यंगामुळे, कमतरतेमुळे तृतीयपंथी असलेल्यांच्यामधेही असे प्रकार तज्ज्ञांनी केले असतील, पण मला त्याचं ज्ञान नाही. आपण बोलतो आहोत त्या सहा प्रकारांबद्दल इतर ठिकाणी आधी उल्लेख झाले असतील पण त्यांची सलग ओळीनी माहिती देण्याचा निराळा फायदा आहे म्हणून तो इथे ती यादी पुन्हा देतोय.

1. स्त्री-पुरुष आकर्षण वाटून लैंगिक संबंध असणारे याच्या निराळ्या वर्णनाची गरज नाही. जगभर, भारतभर, महाराष्ट्रभर याच प्रकारचे सर्वांत जास्त लोक आहेत. याखेरीज निराळा प्रकार असतो याचीच कल्पना नसलेल्यांना या माहितीमुळे धक्का बसेल. काहींना स्वतःच्या आयुष्यामधल्या लैंगिक अतृप्तीचं यामुळे कारण समजेल आणि त्यामुळे उशिरा का होईना उपायाला सुरुवात करता येईल. यावर उपाय असतो हे मी खात्रीनी सांगतो.
2. पुरुष-पुरुष यांच्यातला लैंगिक संबंध हात, तोंड आणि गुद्द्वार या तीनही मार्गांनी पुरुष करतात.
3. स्त्री-स्त्री यांच्यामधला लैंगिक संबंध हात, तोंड या दोन्ही अवयवांचा वापर स्त्रिया करतात. पुरुषासारखं लिंग नसल्यामुळे गुदद्वाराचा मार्ग फार क्वचित वापरतात. आणि तरी लैंगिक प्रयोग करण्यात कायम पुढे असणाऱ्या पाश्चात्त्य देशांच्यात कंबरेला बांधलेल्या कृत्रिम लिंगाचा काही बायका उपयोग करतात. अशा लिंगाला 'डिल्डो' म्हणतात.
4. असेही काही लोक असतात की ज्यांना स्त्री आणि पुरुष दोन्ही लिंगी व्यक्तींबरोबर संभोग करण्यात आनंद वाटतो. त्यांना 'बायसेक्शुअल' म्हणतात. असे पुरुष असतात तशाच स्त्रियाही असू शकतात.

5. बायसेक्शुअल लोकं लग्न करतात. त्यांना मुलं होतात, संसार चालू असतो, पण मनातून आपण कुठल्या प्रकारचे आहोत हा त्यांचा अनेक वर्षं निर्णयच होत नाही. ते कधी पुरुषाच्या प्रेमात तर कधी स्त्रीच्या प्रेमात पडतात.
6. सहावा प्रकारही असतो. त्यांना 'असेक्शुअल' म्हणतात. त्यांचं शरीर पूर्ण नॉर्मल असतं. एकच अडचण म्हणजे त्यांना कोणाबरोबरही संभोगाचं आकर्षणच वाटत नाही. अशाही लोकांना मुलं होतात, त्यांचा संसार होतो. नवराबायको दोघंही सहाव्या प्रकारचे असले, तर काही अडचण नाही, पण त्यांच्यापैकी एकजण असा असला तर फार असमाधान निर्माण होतं.

हा झाला त्याबद्दलच्या सामान्यज्ञानाचा भाग. आणि तरी समुपदेशनाच्या प्रक्रियेत कधीकधी माझ्या लक्षात येतं की त्या व्यक्तीचा प्रश्न केवळ मानसशास्त्रीय समुपदेशनानी सुटणारा नाही. अशावेळी मी त्यांना ओळखीच्या 'सेक्सॉलॉजिस्ट'कडे पाठवतो.

●●●

# 10

# लैंगिक शिक्षण–
# जन्मापासून 5 वर्षापर्यंतच्या मुलामुलींबद्दल

लैंगिक शिक्षणाबद्दलची सर्वसाधारण पार्श्वभूमी सांगून झाली. आता आपण आयुष्याचे वयाप्रमाणे भाग पाडूया आणि त्या-त्या वयातले प्रश्न आणि माहिती असलेले उपाय यांच्याविषयी चर्चा करूया. मी मुलग्यांशी स्वतंत्रपणे बोलतो तो भाग मी मांडीन आणि शोभा मुलींशी स्वतंत्रपणे बोलते असं जे आपण मगाशी म्हणालो तो भाग शोभा मांडेल.

**शोभा :** अगदी जन्मल्यापासून तान्ह्या बाळाला आईचं दूध कसं प्यायचं हे समजतं. कसं पाजायचं, कशामुळे दूध येतं हे आईला शिकावं लागतं कधीकधी. अंगावर पिणारं मूल दूध पिता पिता आईचा स्तन तसाच तोंडात ठेवून झोपतं. जरा मोठं झालं की मूल जागेपणीसुद्धा आईचा स्तन तोंडात धरून ठेवतं. तो त्याचा खेळ असतो. 6 महिन्यांपासून मुलाला बऱ्याच गोष्टी कळायला लागलेल्या असतात. ते बोलू शकत नसल्यामुळे रडण्याचा प्रकार आणि काही आवाज, हालचाली यावरून मुलाला काय हवं ते ओळखावं लागतं. तोपर्यंत सर्वसामान्य माणसाला मुलगा आणि मुलगी यात काही फरक जाणवत नाही. बालरोगतज्ज्ञांना म्हणजे पीडिॲट्रिशन्सना मुलगा-मुलगी फरक जाणवू शकतात.

1 ते 2 वर्षांच्या आसपास मुलगा आणि मुलगी दोघांना आई सर्वांत आवडती व्यक्ती असल्यामुळे आईची मऊ साडी, ड्रेस, दुपट्टा, अंतर्वस्त्रं, काहीतरी कपडा बहुतेक मुलं घेऊन बसतात. सिगमंड फ्राईडच्या मताप्रमाणे ह्या वयातसुद्धा मुलगा आणि मुलगी यांच्या वागणुकीत मनातल्या लैंगिकतेमुळे फरक असतो. 2 वर्षांनंतर मुलगा स्वतःच्या लिंगाशी खेळताना दिसू शकतो. मुख्य गोष्ट पालकांना समजायला हवी ती म्हणजे ह्या सगळ्या गोष्टी नैसर्गिक आहेत.

त्याबद्दल मुलाला रागावण्याचं, दटावण्याचं काही कारण नाही. त्याशिवाय प्रत्येक मूल निराळं असतं त्यामुळे यातली प्रत्येक गोष्ट थोडी पुढे-मागे होऊ शकते. खूप निराळं काही आढळलं तर खास सल्ल्याची गरज पडते. नाहीतर मुलाच्या नियमित तपासणीच्या वेळेला सगळ्या जरूर त्या गोष्टी कळतात.

**अनिल :** आपण मुलगा आहोत आणि आपलं शरीर मुलींपेक्षा निराळं आहे हे कळल्यावर लैंगिकतेसंबंधी विचार तर चालू झालेले असतातच, पण साधारण 3 वर्षांपासून मूल अनेक प्रश्न विचारतं. त्यात स्त्री-पुरुष फरक या कुतूहलामुळे अनेक प्रश्न असू शकतात. महत्त्वाची गोष्ट अशी की, लहानपणी लैंगिक भावनांची हाताळणी पालकांनी व्यवस्थित नाही केली, तर पुढे मुलाला काही काळ किंवा कायमचा त्रास होऊ शकतो. न्यूनगंड निर्माण होऊ शकतो.

मुलांनी विचारलेल्या प्रश्नाला टाळण्यापेक्षा किंवा रागावण्यापेक्षा नंतर सांगतो म्हणून त्याची माहिती काढावी. पालक गटात बोलावं, अनुभवी माणसाला विचारावं, फॅमिली डॉक्टरशी, समुपदेशकाशी बोलावं आणि आठवणीनी त्याचं उत्तर द्यावं. पालक बरेच वेळा उत्तर न देता 'दुसऱ्या कोणाला तरी विचार' म्हणून दुसऱ्यावर ढकलतात. घरातले सगळे मोठे लोक अशी ढकलाढकली करून शेवटी त्याबद्दल काहीच करत नाहीत. याचं उत्तर मिळणार नाही असं मुलाला वाटलं, त्यापुढे काही प्रश्न आला तर मूल तो प्रश्न न विचारण्याची शक्यता असते आणि ते सर्वांत वाईट आहे.

मुलाचं किंवा मुलीचं वय 5 वर्षं हा एक महत्त्वाचा टप्पा मानतात. भाषेची समज, शारीरिक क्षमता, रोगप्रतिकारक शक्ती, आत्मसन्मानाची जाणीव सगळ्याच गोष्टी साधारण 5 वर्षांपासून बदलतात.

**शोभा :** लहान मुलींशी वागताना आईची काही कर्तव्यं आहेत. मुख्य म्हणजे मुलं जशी लिंगाशी खेळतात तशा मुली योनीशी खेळत नाहीत. त्या आईला काही काही प्रश्न मात्र विचारत असतात. मुख्य म्हणजे आईची नि मुलीची मैत्री फार महत्त्वाची. स्वतःच्या वागणुकीतून मुलीला हे कायम जाणवलं पाहिजे की केव्हाही काहीही विचार. हे वागणुकीतून, बोलण्यातून दिलेलं आश्वासन सर्वांत महत्त्वाचं आहे.

**अनिल :** लहान मुलाची बाबांशी एवढी मैत्री बहुतेक कुटुंबांत नसते. खरी म्हणजे मैत्री असायला हवी. बहुतेक घरं पुरुषप्रधान असतात, पुरुष कामानिमित्त जास्त बाहेर असतात आणि मुलामुलींना त्यांचा सहवास कमी पडतो. मुलग्यांनाही

बाबांनी वागणुकीतून आणि बोलण्यातून दिलेलं आश्वासन महत्त्वाचं की केव्हाही काहीही विचार. बरेच पालक या आश्वासनाच्या बाबतीत चूक करतात आणि पुढे मूल काही विचारेनासं होतं.

**शोभा :** पूर्वी अशी समजूत होती की, योग्य आणि अयोग्य स्पर्श मुलींना आपोआप नैसर्गिक प्रेरणांनी समजतो, त्यामुळे त्याविषयी मुद्दामून काही सांगण्याची जरूर नाही. प्रत्यक्षात गेल्या 20-25 वर्षांत स्त्री-पुरुषांवरचे ताण वाढले, चुकीचं वागण्याची इच्छा जास्त प्रमाणात व्हायला लागली. चुकीचं वागण्यासाठी लहान मुलं आणि मुली सोपी असतात. त्यांना युक्तीयुक्तीनी कुठेकुठे स्पर्श केला तरी तो स्पर्श वात्सल्यानी, मायेनी केला असं म्हणता येतं. मुलींना विशेषतः हे शिकवायलाच लागतं की योनीच्या आसपास, ढुंगणाला आणि छातीला इतर कोणी स्पर्श करायला लागलं की लगेच शंका घ्यायची. प्रथम तिथून निघून जाण्याचा प्रयत्न करायचा आणि आपल्या जवळच्या विश्वासाच्या माणसाला सांगायचं. ते शक्य नसलं तर आरडाओरडा करायचा. मुख्य म्हणजे आईवडलांपासून ही गोष्ट लपवायची नाही.

हे सगळं मला सांगायला सोपं आहे, पण प्रत्यक्षात यामधे बऱ्याच अडचणी येऊ शकतात. मुलाची किंवा मुलीची शारीरिक क्षमता कमीजास्त असू शकते. बुद्धिमत्ता, समयसूचकताही निरनिराळी असते. 5 वर्षांपर्यंत हे सगळं प्रकरण कठीणच असतं.

**अनिल :** प्रमाण बघितलं तर मुलग्यांच्या बाबतीत चुकीचं वागणाऱ्यांचं प्रमाण कमी असतं. पण तरी त्यांना सगळं सांगावं लागतंच. चुकीचं काहीतरी घडत असेल तर तिथून पळून जाणं ही गोष्ट साधारण 5 वर्षांची मुलं करू शकतात. त्या वयाच्या आधी ते सुचणं, धाडस असणं आणि पळून जाण्याइतकी चपळता मुलांच्यातही नसते आणि मुलींच्यातही नसते. असं वागणारा पुरुष किंवा स्त्री सराईत असली तर पळण्याची संधीच मिळत नाही. तसं नेमकं आपल्या मुलाच्या वाट्याला आलं तर दुर्दैवच म्हणायचं. कारण सराईत माणूस आरडाओरडा रोखण्यासाठी आधी तोंड बांधतो.

लहान मुलग्यावर लैंगिक अत्याचार म्हणजे काय याची अनेकांना कल्पनाच येत नाही म्हणून हे सांगायला हवं. अगदी लहान मुलीच्या योनीत विकृत पुरुष लिंग घुसवून बलात्कार करू शकतो हे समजण्याजोगं आहे. पण मुलग्याला योनी नसते आणि एवढ्या लहान वयात लिंग देखील ताठत नाही. मग लैंगिक

अत्याचार म्हणजे काय हा प्रश्न पडतो.

विकृत स्त्रिया लहान मुलग्याच्या न ताठलेल्या लिंगाशी खेळू शकतात, पण त्याचं प्रमाण नगण्य आहे. विकृत पुरुषांची संख्याच जास्त आहे. ते लहान मुलग्याच्या ढुंगणाचा योनीसारखा उपयोग करून त्यात जबरदस्तीनी लिंग घुसवतात. त्या मुलाला हे सहन होत नाही, त्याचं ढुंगण रक्तबंबाळ होतं, पण विकृत मनस्थितीतल्या पुरुषाला त्याचं काही वाटत नाही. ते मूल ही गोष्ट दुसऱ्या कोणाला सांगण्याची भीती वाटली, तर त्या मुलाला ठार करून कुठेतरी फेकून देतात. ही गोष्ट कुठच्याही गावात, कुठच्याही शहरात होऊ शकते ह्याची पालकांना समज हवी. लहान मुलांसोबत कायम विश्वासाची मोठी व्यक्ती हजर पाहिजे. मुलगा असो किंवा मुलगी, त्यांना एकटं सोडायचं नाही. आई-वडील श्रीमंत असले तर त्याखेरीज अपहरण, खंडणीची मागणी हे सगळे प्रकार अशक्य मानता येत नाहीत.

हे सगळं जरा मोठ्या मुलांशी प्रत्यक्ष समोर बसवून बोलता येतं, तसं 5 वर्षांच्या आतल्या मुलांशी बोलणं शक्य नाही. त्यामुळे पालकांनीच हे समजून घेण्यासाठी लैंगिक शिक्षणाच्या बैठकीला हजर राहायला हवं. मुलं सांभाळण्याची तात्पुरती दुसरी व्यवस्था करून आई-बाबा दोघांनी यावं अशी आम्ही शिफारस करतो.

काही निरीक्षणं सांगतो. अगदी लहान मुलांच्याही मनावर त्याचा परिणाम होतो. काही हिंदी सिनेमांच्यात एका सुंदर मुलीमागे 20-25 मुलगे लागलेले आहेत असं दाखवलेलं आहे. आणि पुढे ती मुलगी सगळ्या मुलांच्या बरोबर नाच करते. काय होणार मुलांच्या मनावर परिणाम? दुसरं एक पोस्टर मागे सगळीकडे लागलेलं दिसायचं. एक 4-5 वर्षांचा मुलगा आणि तेवढीच मुलगी एकमेकांचं 'किस' घेतायत्. काय होईल परिणाम?

●●●

# 11

# लैंगिक शिक्षण–
# 5 ते 10 वर्षांपर्यंतच्या मुला-मुलींसाठी

**अनिल :** या टप्प्यापासून प्रत्यक्ष मुला-मुलींशी बोलता येऊ शकतं.

**शोभा :** या वयाच्या मुलांशी लैंगिक संबंधांविषयी बोलणं सोपं नसतं, पण निदान शक्य असतं. अशा कार्यशाळांचं प्रमाण कमी असतं. पालक मुलांना पाठवायला तयार नसतात आणि स्वतःही कार्यशाळेला यायला तयार नसतात. पण शाळांनी या कार्यशाळांचं महत्त्व लक्षात घेऊन पालकांना आणि मुलांना बोलावलं तर ते शक्य होतं. शाळा या गोष्टीचा निराळाच परिणाम असतो कारण पालकांच्या दृष्टीनी शाळेवर उपयोगी शिक्षणाची जबाबदारी असते.

**अनिल :** 5 ते 10 वयात लैंगिक कुतूहल प्रत्यक्ष कृती करण्यापर्यंत पोहोचतं. डॉक्टर डॉक्टर खेळण्याच्या निमित्तानी मुलं-मुली एकमेकांची गुप्त इंद्रियं बघतात, स्पर्श करतात. यामधे खूप वाईट काही नसतं. त्यापायी मुलांना ओरडणं, मार देणं याची काही गरज नसते. कारण ही कुतुहलाची अवस्था 6-8 महिन्यांत आपोआप संपते. मुलं कुठच्याही धारदार, इजा होणाऱ्या वस्तूचा उपयोग करत नाहीत ना, याकडे मात्र लक्ष ठेवावं.

**शोभा :** समाजातल्या लैंगिक विकृती वाढल्या की त्याचा परिणाम मुलांवर होणारच. 6 ते 8 वयात शाळेतल्या वर्गमित्रांच्यात चुकीच्या गोष्टी घडण्याचं प्रमाण वाढतंय. मुलांना मोबाईल स्मार्ट फोनही वापरता येतो. मुलगे मुलींकडे त्यांचे नागडे फोटो मागतात आणि मुली ही मागणी पुरवतात असंही क्वचित आढळलेलं आहे. हे मात्र काळजीचं आहे. यावर आणखी अभ्यास करण्याची जरूर आहे.

**अनिल :** एक गमतीची गोष्ट आठवलीय ती सांगतो. माझं वय 10

असेल. काही काही शब्द वाचून मनातल्या मनात लैंगिक शब्दांची आठवण येऊन छान वाटायचं. कोणाशी बोलायची सोय नव्हती पण ते शब्द मग पुन्हा पुन्हा मी वाचायचो. पुस्तकात प्रयाण शब्द यायचा तो प्रणयसारखा वाटायचा. वृक्ष शब्द वक्ष असा दिसायचा. वृषाली नाव ऐकलं की मनात वृषण शब्द यायचा. काही मुलींची नावं सुभगा, सुखदा अशी ऐकली होती. अशी नावं ठेवण्याचा कसा धीर झाला असा प्रश्न पडायचा. अश्व शब्दाचा अर्थ माहीत असल्यामुळे अश्विनी असं नाव का ठेवत असतील असं वाटायचं. अश्विनी नक्षत्र माहिती होतं त्याचबरोबर अश्विनी हा स्त्रीचा प्रकार कामशास्त्रात सांगितलाय तेही माहिती होतं ना!

त्या काळात केव्हातरी एका मराठी निबंधाबद्दल मी शाळेत खूप बोलणी खाल्ली होती हे पण आठवतं. धीर पासून जसं धैर्य होतं तसा मी वीरपासून होणारा शब्द म्हणून 'वीर्य' असा वापरला होता.

लैंगिक शिक्षणासाठी लहान मुलांच्या ज्या कार्यशाळा आम्ही घेतो त्या मुलांच्या आणि मुलींच्या स्वतंत्र असतात. त्यात मुलांनी मोकळेपणानी शंका विचारणं फार महत्त्वाचं असतं. त्यांच्या मनात अनेक प्रश्न असतातच. पण ते विचारण्यासाठी मोकळं वातावरण तयार करणं फार महत्त्वाचं असतं. सर्वांत सोपी युक्ती म्हणजे चावट विनोद. प्रथम स्वतः एक-दोन सांगायचे. मग मुलांना सांगायला सांगायचे. समोर ज्या वयाच्या मुलांचा गट असेल त्याप्रमाणे आपण सांगण्याचे विनोद निवडावे लागतात. नाहीतर ते विनोद मुलांना समजत नाहीत त्यामुळे आवडत नाहीत. किंवा त्यांचा अपेक्षित परिणाम होत नाही. 8 ते 10 वर्षांच्या मुलांच्या गटासमोर सांगायचा एक विनोद तुम्हाला इथे सांगतो. मी तो अनेक वेळा अशा मुलांना सांगितलेला आहे.

'एका शाळेत मुलं आणि मुली एकत्र शिकायचे आणि एका बाकावर एक मुलगा एक मुलगी असे बसायचे. एकदा एका मुलानी शेजारच्या मुलीचं खोडरबर लपवून ठेवलं आणि स्वतःचंही लपवलं. ती जेव्हा खोडरबर शोधायला लागली तेव्हा त्यानी सांगितलं, माझ्या पँटच्या खिशात ठेवलंय, काढून घे. तिनी त्याच्या पँटच्या खिशात हात घातला, पण पँटचा खिसा पार फाटलेला होता.'

इथे थांबायचं. काही मुलांना विनोद कळतो, काहींना उशिरा कळतो आणि मग मुलं खुलतात. त्यानंतर मुलंही विनोद सांगतात. बहुतेक वेळा ते फालतू असतात पण याहून चांगल्या विनोदाची अपेक्षाही करायची नाही. आत्ता मी इथे

थांबणार आहे. बाकीचे विनोद तुम्ही जमवून ठेवावेत.

मग पुढे मी विचारतो, पुरुषाच्या लिंगाला मराठीत काय शब्द आहेत? मुलांना व्यवस्थित माहिती असतं. फक्त संकोच आणि भीती जायची गरज असते. मुलांना नुन्नी शब्द माहिती असतो. शूची जागा हा शब्द माहिती असतो. माझ्या लहानपणी बुल्ली म्हणायचे. मोठी मुलं लवडा म्हणतात. संस्कृतमधे शिश्न म्हणतात. आमच्या काळी मोठी मुलं बाबूराव म्हणायची. दांडूही म्हणायची. मुलगा म्हणजे दांडेकर आणि मुली म्हणजे होळकर. काही मुलांना होळकरचा अर्थ समजत नाही. मग होल म्हणजे भोक म्हणजेच स्त्रीची योनी हे सांगितलं की कळतं. त्यानंतर इंग्लिशमधे काय म्हणतात माहिती आहे का, असं विचारलं की काहींना माहिती असतं. डिक, डेरिक, प्रिक, पीनस, मेंबर, ऑर्गन, पेकर असे शब्द असतात, हे सांगेपर्यंत मुलं साधारणपणी मोकळी होतात. यात कार्यक्रमाची पहिली 10-15 मिनिटं जातात खरी, पण त्यामुळे पुढच्या उरलेल्या वेळेचा खरा उपयोग होतो.

**शोभा :** पुरुषांचं लिंग शरीराबाहेर असल्यामुळे मुलगे ते लवकर हाताळायला लागतात तसं मुलींचं होत नाही. मुलींना पाळी चालू होईपर्यंत स्वतःच्या शरीराच्या आत काय चालतं हे माहीत नसतं कारण तशी गरज पडत नाही. 8 ते 10 वयाच्या दरम्यान पाळी चालू होणार अशी कल्पना करून त्याच्या थोडं आधी पाळीचं अगदी थोडक्यात वर्णन आपणहून करावं आणि जेव्हा असं रक्त दिसेल तेव्हा घाबरून जायचं कारण नाही एवढं सांगून ठेवावं. त्या वेळेला मी तुला याबद्दल बारकाव्यानी सांगीन एवढं बोलायचं. माझ्या मुलीला मी एवढं सांगितलं त्यामुळे ती एके दिवशी शाळेतून आल्यावर 'तू म्हणालीस तसं आज झालं बरं का', एवढं म्हणाली आणि खेळायला गेली. नाहीतर घराघरांत कितीतरी अडचणी येतात! रडारड चालते, पारंपरिक घरात 'विटाळ', बाजूला बसणं वगैरे चालतं, मुलीला अगदी वैताग आणतात. मुख्य म्हणजे आमच्या मोठ्या मुलाला पण मी हे सगळं समजावून सांगितलं होतं.

आपण पाहुणे येणार असले की सतरंज्या घालून ठेवतो आणि ते नाही आले की सतरंज्या काढून टाकतो तसं पाळीचं आहे. निसर्गानी स्त्रीच्या शरीरातली ती मूल होण्याची म्हणजेच पाहुण्यांची तयारी करून ठेवलेली असते.

**अनिल :** मी साधारण 10 वर्षांचा असीन, पालकांच्या ज्या योग्य वागणुकीबद्दल आत्ता आपण बोलतो आहोत तसे माझे पालक वागले नाहीत.

माझ्या मनातल्या लैंगिक शंका घरात कोणाशी बोलण्याचा प्रश्नच नव्हता त्यामुळे मी माझ्यापेक्षा वयानी मोठ्या मित्रांना विचारायचो. त्या संबंधीच्या इतर गोष्टी पुढच्या टप्प्यात जरा वेळानी सांगीन, पण आत्ता इथे एकच सांगतो, मला लहानपणापासून स्त्रीच्या स्तनाचं खूप आकर्षण होतं. आमच्या खूप ओळखीच्या एका स्त्रीच्या स्तनाला हात लावायचा माझा प्रयत्न फसला होता. मी ते युक्तीनी केल्यामुळे प्रत्यक्ष माझ्या मनातला हेतू कोणाला कळला नाही. चुकून पाय अडखळून पडलो वगैरे थापाथापी मी करू शकलो आणि सहीसलामत सुटलो.

मित्रांना हे सांगितल्यावर ते म्हणाले की, त्यांनाही माझ्यासारखंच आकर्षण वाटतं. नाहीतरी आम्ही सगळे बिघडलेले मुलगे शाळा बुडवूनच भटकत होतो. भरपूर वेळ असायचा. एका मुलानी एक कल्पना काढली आणि आम्ही ती अमलात आणली. आम्ही तिघं-चौघं चार बाजूंनी जाऊन एका शेळीला पकडायचो. तिला तिघांनी धरून ठेवून पाळीपाळीनी तिचे स्तन दाबायचो. हे ऐकल्यावर तुमच्यापैकी काही लोकांच्या, विशेषतः विकृतीचा अनुभव नसलेल्या स्त्रियांच्या मनात 'शीऽऽ' काय वात्रटपणा हा', वगैरे येईल. ही गोष्ट सांगण्याचा उद्देश असा प्रकार तुमच्यापैकी कोणी मुलांनी करू नये असा आहे. शेळीबरोबर केलेला तो शुद्ध गाढवपणा होता हे मला मान्य आहे. माझ्या माहितीप्रमाणे पुरुषांच्या विश्वातली विकृती बदललेल्या स्वरूपात असेल पण कमी होण्याऐवजी वाढलेलीच आहे.

**शोभा :** एकदा माझी मुलगी मला सांगत होती की, ती आणि तिची मैत्रीण एका निर्मनुष्य देवळाच्या आवारात जाऊन एका झाडाची फुलं वेचायच्या. पुढे असंही म्हणाली, त्या असं गेल्या दोन महिन्यांपासून करत होत्या. ते देऊळ मी बघून आले, त्या दोघींना घरी समोर बसवून सगळा धोका समजावून सांगितला. यावरून लक्षात आलं. मगाच्याच यादीत एक गोष्ट वाढवायची. निर्मनुष्य ठिकाणी लहान मुलांनी-मुलींनी जायचं नाही.

**अनिल :** लहानपणी इंग्लंड नावाचा देश आम्ही ऐकून होतो. ब्रिटिशांपासून काही वर्षांपूर्वीच स्वातंत्र्य मिळालं वगैरे ऐकून माहिती होतं. इंग्लंडमधे रात्री स्त्रिया आणि पुरुष मिळून बॉल-डान्स करतात असं कोणी कोणी सांगितलं होतं. आमच्या त्या वेळच्या अवस्थेनुसार आम्ही बॉल शब्दाचा उल्लेख निघाला की अतिशय आनंदानी स्तन समजून हसायचो. पुढे अनेक वर्षांनी मी प्रत्यक्ष इंग्लंडमधेच बॉलरूममधे अनेकदा गेलो. तेव्हा 'टु हॅव अ बॉल', 'बॉल-रूम', 'बॉल-डान्स' शब्दांचा अर्थ कळला. बॉल म्हणजे मजा, एवढाच त्याचा मर्यादित अर्थ आहे.

**शोभा :** आणखी एक महत्त्वाची गोष्ट आहे त्याबद्दलच सगळ्यांनीच विचार करायला हवा. ती गोष्ट म्हणजे टी.व्ही, सिनेमा, वृत्तपत्रं, मासिकं, सगळीच माध्यमं.

मुलांची नजर तर दिसेल ते टिपते, साठवून ठेवून नंतर मूल त्याचा उपयोग करतं. एकदा आई आणि 8-10 वर्षांचा मुलगा टी.व्ही.वर सिनेमा बघत होते. एका प्रसिद्ध नटीचा सीन होता. तो मुलगा आईला म्हणाला, 'ही बघ तुझी सून!' एकदा एक मुलगा, 10 वर्षांच्या आसपासचा, आई-वडलांना सांगत होता, 'मला या नटीसारखी बायको हवी.' हे असं या वयात कसं डोक्यात येत असेल?

सिनेमा ही नुसती कलाकृती असते असं मला वाटत नाही. त्यामधे जे प्रसंग दाखवलेले असतात त्यामुळे बघणाऱ्याच्या मनावर परिणाम होणारच ना. एका प्रसिद्ध नटीच्या वाट्याला नेहमी अशा प्रकारची भूमिका यायची की पारंपरिक घरातली माणसं खूष होतील. ती नवरा बाहेरून आला की खाली त्याच्या पायाशी बसून त्याचे बूट काढते, पदरानी बूट पुसते, काही विचारू नका. बघणारे मुलगेही आपल्या भावी बायकोची अशीच प्रतिमा मनात धरून बसतील नाही तर काय?

मी तुम्हाला या सगळ्याचे नेमके परिणाम सांगते ना! गरवारे बालभवनमधे रोज 500 मुलं येतात. खूप गमतीशीर अनुभव येतात, त्यांपैकी काही सांगते. आपल्याला वाटतं मुलांना काय कळतं यातलं? एका दिवशी एका गटातल्या एका मुलाची आणि मुलीची पद्धतशीर लग्नपत्रिका केली होती. कार्यालयाचा पत्ता, तारीख, वेळ, सगळं आणि हो, दोघंही होती साधारण 7 वर्षांची. बालभवनमधला एक मुलगा मुलींसमोर जाऊन उभा राहायचा आणि म्हणायचा 'किस दे'. दुसरा एक मुलगा मुलींना 'आय लव्ह यू' म्हणायचा. कुठच्याही निमित्तानी, कुठच्याही संदर्भात 'भोक' शब्द आला की मुलं नि मुली दोघंही हसतात आणि वयं काय? 6, 7 वर्षं.

**अनिल :** सारांश एवढाच की, मुलांच्या सगळ्या दिनचर्येकडे 'पहारा' न वाटू देता लक्ष असू द्या. तुमचं कुटुंब सुखवस्तू, सुसंस्कृत, सुशिक्षित असलं म्हणून या प्रकारचा अनुभव, अडचण तुमच्या घरात शिरकाव करूच शकणार नाही, या समजुतीमुळे गाफील राहू नका. याबाबतीत आई आणि बाबा दोघांचीही मुलांना खूप गरज आहे.

●●●

# 12

# लैंगिक शिक्षण–
# 10 ते 16 वर्षांपर्यंतच्या मुला-मुलींसाठी

**अनिल :** पूर्वी किशोर वय 10 ते 17 समजायचे, पण तेही वय थोडं अलीकडे यायला लागलंय. खरा सरसकट बदल होऊन सर्वमान्य व्याख्या बदलायला अजून 50 वर्षं लागतील. आजच्या चर्चेपुरतं आपण हे वय 10 ते 16 असं मानूया. 10 वर्षांच्या आसपास ज्या एका कारणामुळे मुलग्याचं सगळं जगच बदलून जातं ते कारण म्हणजे स्वप्नावस्थेचा अनुभव. नेमक्या कुठच्या दिवशी म्हणजे कुठच्या रात्री याची सुरुवात होते याला काहीही नियम नाही.

स्त्रीसंबंधी आकर्षण हे नैसर्गिक आहे एवढं मान्य केलं तरी कुठच्या एकाच स्त्रीबद्दल आकर्षण वाटेल असाही नियम नाही. रात्री झोपेत, स्वप्नात स्त्री-शरीराविषयीच्या विचारानी मुलग्याचं लिंग ताठ होतं आणि त्यातून चिकट स्राव बाहेर पडतो. या गोष्टीवर स्वतःचं काही नियंत्रण नसतं. गर्भ राहण्यासाठी जे आवश्यक असतं ते वीर्य. ते शरीरात तयार होण्याच्या प्रक्रियेतली ही पायरी असते. खरं तर असं असं झालं ही गोष्ट मुलानी सकाळी उठल्यावर आई-वडलांना सांगणं अपेक्षित आहे. पण हे सांगण्याची लाज वाटते. शिवाय आत्तापर्यंत गोळा केलेलं लैंगिक ज्ञान आणि शरम यामुळे कालपर्यंत सगळ्या गोष्टी आई-वडील किंवा दोघांना सांगणारा लाडात वाढलेला मुलगा आयुष्यात पहिल्यांदा ही गोष्ट सांगायची नाही असं ठरवतो. त्या क्षणापासून पुरुष 'प्रायव्हेट पर्सन' बनतो. स्त्री आणि पुरुष यांच्या शरीरात फरक असतो पण या घटनेनंतर मनोवृत्ती, विचारसरणी, अभिव्यक्ती यांमधे पुरुष निराळा होतो. पुरुष स्वकेंद्री असतात, त्यांचा ई.क्यू. कमी असतो हे सगळे आरोप खरे आहेत, पण त्याची सुरुवात तेव्हा, त्या पहाटे होते.

मीही या कशाला अपवाद नाही. साधारण मी 10 वर्षांचा असताना मोठ्या बहिणीची एक सुंदर मैत्रीण घरी आलेली असताना काही कल्पना नसताना लिंग ताठल्यामुळे मी आतल्या खोलीतून बाहेर येत नव्हतो. जरा वेळानी बाहेर आलो तोपर्यंत ती मैत्रीण निघून गेली होती. ती खूप ओळखीची नेहमी भेटणाऱ्यांपैकी होती, त्यामुळे अनिल कुठे आहे हे विचारत होती हे मी ऐकलं होतं.

आपलं स्वतःवर काही नियंत्रण नसतं हे दोन-तीन प्रसंगांत कळल्यावर मी लंगोट वापरायला सुरुवात केली. त्यापुढे 12-15 वर्षं मी लंगोट वापरायचो. ते लंगोट कमरेला नाडी आणि त्याला अडकवलेला कापडी पट्टा असे असायचे. पुढे इलॅस्टिकचे 'वेस्ट सपोर्टर्स' मिळायला लागले, ते मी बरीच वर्षं वापरायचो. याशिवाय एका गोष्टीचीही अडचण व्हायची– घट्ट पँटस् किंवा जीन्स. शिंपीसुद्धा त्या काळच्या फॅशनप्रमाणे 'स्किनफिट' पँट्स शिवायचे. स्किन फिट पँटचा अगदी वैताग यायचा. अवघडायला तर व्हायचंच, पण ताठलेलं लिंग पँटच्या उंचवट्यावरून बघणाऱ्याला स्पष्ट कळायचं.

**शोभा :** स्त्री-पुरुषाच्या शरीरातल्या फरकांपैकी स्त्रीला स्वप्नावस्था न येणं हा एक फरक आहे. स्त्रीला स्वप्नावस्था नाही, पण मासिक पाळी आहे. प्रत्यक्ष पाळीविषयी आपण मघाशी बोललो आहोत. त्याबद्दल मी जो आई-मुलीच्या संभाषणाचा भाग सांगितला तो फार आवश्यक आहे. आई नसल्यामुळे वडलांना मुलीला पाळीविषयी समजावून सांगावं लागलं तरी त्यात गैर काही नाही. संकोच असला, इतर काही अडचण असली तर जीवनसाथसारख्या संस्थेची मदत घ्यावी, पण कुठल्यातरी पद्धतीनी मुलीशी मासिक पाळीच्या बाबतीत संवाद व्हायलाच हवा.

घराघरांत काय चालतं मला माहिती आहे. पाळी चालू असताना मुलींना कुठच्याही पूजेचा अधिकार नसतो. मला आठवतंय त्याप्रमाणे अशा बाजूला बसलेल्या बायकांना मधल्या अंधाऱ्या माजघरात, त्यातसुद्धा कोपऱ्यात बसवायचे. सगळं अघोरीच असायचं.

**अनिल :** स्त्रीचं शरीर आणि स्त्रीपुरुषांचे संबंध याविषयीच्या शिक्षणाचा म्हणजेच लैंगिक शिक्षणाचा आणखीन संबंध मुलांच्या अभ्यासाशी आहे. कसा ते सांगतो. 10 वर्षांच्या मुलाकडून किंवा मुलीकडून आई-वडलांची, शाळेची, नातेवाईकांची अपेक्षा असते की त्याचं सगळं लक्ष अभ्यासाकडे असावं. प्रत्यक्षातली परिस्थिती अगदी उलट असते. मुलग्यांची अवस्था सांगतो. अभ्यासाकडे

लक्ष द्यायला हवं हे कळत असून देखील निम्म्यापेक्षा जास्त डोकं स्त्रीविषयीच्या विचारांनी भरलेलं असतं त्याचं काय?

शारीरिक संभोगात स्त्री आणि पुरुष मिळून कशाततरी काहीतरी घालतात एवढं माहिती असतं, पण नेमकं कशात काय घालतात ते माहीत नसतं. या एका संशोधनप्रकल्पानी डोकं पार भंजाळून गेलेलं असतं. ज्येष्ठ मित्र काही काही सांगत असतात, चुकीची माहिती देत असतात, नागड्या बायकांची चित्रं असलेली मासिकं बघायला देतात, पण खरं कोडं सुटतच नाही, कारण त्याचा नीट फोटोच काढता येत नाही. 13-14 वयाच्या आसपास मी एकदा एक 'ब्ल्यू फिल्म' ही बघितली होती. मूळ कोडं सुटलं नाही, फिल्म आवडली नाही. शिवाय चोरून वेळ जुळवून ती बघायला जाण्याचं फारच मोठं संकट पार करावं लागलं.

या विषयावर 'बालक पालक' हा सिनेमा आहे असं ऐकलं होतं. शेवटी एकदा बघितला. मला सिनेमा बघितल्यावर असं लक्षात आलं की लैंगिक शिक्षण महत्त्वाचं आहे एवढंच त्यात सांगितलंय. प्रत्यक्ष लैंगिक शिक्षण दिलेलं नाहीय.

अनेक आई-वडलांना असे शब्द मराठीत बोलण्यामधे संकोच वाटतो. हे मी समजू शकतो. मराठीपेक्षा बरीच निराळी आणि आपल्याला येणारी भाषा म्हणजे काल्पनिक 'प्रायव्हसी' हे बरोबर आहे. मी लघवीला जाऊन येतो यापेक्षा बाथरूमला जाऊन येतो हे जास्त सभ्य का वाटतं हे आपल्याला माहिती आहे. अशा पद्धतीनी कोणी इंग्रजी शब्दांचा वापर केला तरी काहीच हरकत नाही. जी भाषा सोपी वाटेल ती वापरावी पण लैंगिक शिक्षण आपल्या मुलाला, मुलीला मिळेल अशी जबाबदारी घ्यावी. मुलांचं अभ्यासाकडे लक्ष लागायला हवं असेल तर त्यांच्या डोक्यातलं 'ते' कोडं लवकरात लवकर सुटेल असं बघा.

**शोभा :** तरुणपणी, काहींना किशोरवयातच चेहऱ्यावर मुरुमं किंवा तारुण्यपीटिका यायला सुरुवात होते. त्रास कमी होईल का जास्त, किती काळ हे कोणालाच माहिती नसतं. 12-13 वर्षांपासून पुढे 8-10 वर्षंही हा त्रास होऊ शकतो आणि तो आपोआप नैसर्गिकपणी जातो. नेमकं आपल्याला सुंदर दिसण्याची जेव्हा जास्तीतजास्त इच्छा असते त्याच काळात हा त्रास निसर्गानी का योजला आहे कळतच नाही.

बाजारात यासाठी खूप वस्तू म्हणजे प्रसाधनं मिळतात, पण खरोखर कोणाला कशाचा उपयोग होईल काही सांगता येत नाही. आहार बेताचा, सात्त्विक, शाकाहारी, हलका, कमी गोड आणि कमी स्निग्ध, नियमित व्यायाम,

चेहरा नुसत्या पाण्यानी जास्त वेळा धुणं आणि मऊ फडक्यानी सावकाश टिपणं एवढे उपाय जरूर करून बघावेत, पण यातली कुठलीच गोष्ट खात्रीशीर नाही. 'पिंपल्स' हा नशिबाचाच भाग आहे असं शेवटी म्हणावं लागतं. मला माझ्या नशिबानी मुरुमांचा त्रास झाला नाही. पुन्हा त्यात मुलगा-मुलगी, पैसेवाला का गरीब, काळा-सावळा का गोरा याचाही संबंध नाही. मुरुमांचे फोड फोडण्याच्या भानगडीत मात्र अजिबात पडायचं नाही, कारण त्यानी त्रास वाढतो.

**अनिल :** मला मात्र मुरुमांचा 10-12 वर्षं खूप त्रास झाला. त्यात त्याच काळात दाढीही करायची असते. काही विचारू नका. खूप हाल सोसले आणि नंतर आपोआप तो त्रास संपला. चांगली गोष्ट एवढीच की बहुतेकांचा एकदा तो त्रास संपला की कायमचा संपतो. हे जे आपण बोलतो आहोत ते सगळं खरं शरीरशास्त्राचंच शिक्षण आहे, पण शाळेत, घरी हा विषय एकमेकांवर ढकलला गेला. मी वयानी मोठ्या मित्रांकडून मासिकं आणायचो हे घरात कोणाला सांगायचं नसायचं ही सर्वांत मोठी अडचण होती. एक तर शाळा बुडवून बाहेर बागेत जायचं किंवा घरी मासिक आणलंच तर ते मच्छरदाणीच्या आत टॉर्चच्या प्रकाशात वाचायचं. माझ्या चष्म्याच्या एवढ्या नंबरचं रहस्य कदाचित यातच दडलेलं असेल.

या त्रासदायक काळातल्या दोन गोष्टी सांगतो. एक माझी स्वतःची आणि एक माझ्या मित्राची. मी दर सुट्टीत पुण्याला मामाकडे जायचो आणि त्याच आवारात माझ्याचसारखा माझ्याबरोबरीचा आणखी एक मुलगा सुट्टीपुरता यायचा. आम्ही दोघं एका झाडावर चढून तिथून गॅरेजच्या स्लॅबवर चढायचो. त्या गॅरेजमधे एक तरुण जोडपं भाड्यानी राहात होतं आणि शेजारी तट्ट्याचा आडोसा असलेली वरून उघडी अंघोळीची मोरी होती. मनातली महत्त्वाकांक्षा अशी होती की त्या भाडेकरू बायकोला अंघोळ करताना स्लॅबच्या वरून बघायचं. एकदा आम्हाला ती वेळ बरोबर गाठता आली, पण तेवढ्यात आमच्या दोघांपैकी एकाचा काहीतरी आवाज तिच्या कानावर गेल्यामुळे तिनी वर बघितलं नि ती ओरडली. बोंबाबोंब झाली. आम्ही दोघं पळालो आणि कोणाच्याच हातात सापडलो नाही. मला वाटतं, आमची ती खूप मोठी चूक होती. त्या बिचाऱ्या बाईवर फार अन्याय झाला.

दुसरा एक प्रसंग एन.सी.सी कँपचा. आमच्या वर्गातला कँपला आलेला एक गोरागोमटा मुलगा होता. आकारानी लहान होता, पण बायकी वगैरे नव्हता.

मी निराळ्या हॉलमधे झोपलो होतो. रात्री उशिरा अंधार झाल्यावर शेजारच्या हॉलमधून खूप आरडाओरडा ऐकू आला म्हणून आम्ही सगळे तिकडे गेलो. दोघा-चौघा व्रात्य मुलांनी त्या मुलाची पँट खेचून काढायचा प्रयत्न केला होता. हा रॅगिंगचाच एक प्रकार होता, जो मुलामुलांच्यात झाला. तसाच प्रयत्न नंतर एका शाळेच्या सहलीत दोन मुलांनी एका मुलीबरोबर केला. कोणाला यश आलं नाही हा भाग वेगळा, पण याच्याच पुढची पायरी म्हणजे बलात्कार असतो.

**शोभा :** मुलांच्यात काय किंवा मुलींच्यात काय, पौगंडावस्थेत किंवा किशोरवयात फार कमी काळात अतिशय झपाट्यानी शारीरिक बदल होतात. मोठी माणसं अगदी परवापरवापर्यंत लहान मुलासारखं वागवत असतात आणि काही महिन्यांत, एखाद्या वर्षात सगळं बदलून जातं. आईवडील, नातेवाईक, शिक्षक यांच्या हातून अशा मुलांशी वागताना चुका होतात. खरं तर त्यांनी स्वतःची किशोरावस्था आठवून बघितली, तर त्यांच्या बाबतीतही असंच झालेलं असणार. अशा मुलांना लहानही समजता येत नाही आणि मोठं मानण्याइतकी परिपक्वता त्यांच्यात नसते, हा प्रश्न असतो. स्वतःच्या लैंगिक विकासाबद्दल काही मुलं किंवा मुली भांबावलेली असतात. काही मुलींना स्वतःच्या स्तनांच्या वाढीची लाज वाटल्यामुळे त्या पोक काढतात, कधी मुलगे मुलींना टाळतात, आई-वडलांशी शत्रूसारखे वागतात, मनात खूप गोंधळ चालू असतात.

**अनिल :** मुलगे आणि मुली यांच्याशी मी आणि शोभा जेव्हा स्वतंत्रपणी बोलतो तेव्हा मी आणि शोभा नंतर एकमेकांशी एकमेकांच्या त्या कार्यक्रमाबद्दलच्या अनुभवांबद्दल बोलतो. मला वाटतं मुलगे माझ्याशी जेवढे मोकळेपणानी बोलतात त्यापेक्षा मुली शोभाशी जास्त मोकळेपणानी प्रश्न विचारतात. त्याचं कारण मघाशी बोलताना आपण बघितलंच आहे. 'मेन आर फ्रॉम मार्स अँड वीमेन आर फ्रॉम व्हीनस' हे तर सत्य म्हणून आपल्याला मान्यच करावं लागतं. या नावाचं एक प्रसिद्ध पुस्तकच आहे. मुलींना चावट विनोद सांगण्याची गरज पडत नाही.

**शोभा :** एका मुलींच्या गटात 15-16 वर्षांच्या मुलींनी विचारलेले प्रश्न मला अजून चक्रावून सोडतात. एक मुलगी विचारत होती, 'ओरल सेक्समुळे एडस् होत नाही ना?' त्या मुलीचा चेहरा मी बघत होते. हा प्रश्न काही सामान्यज्ञान वाढवण्यासाठी विचारलेला नव्हता. ती स्वतःच त्या काळजीत दिसत होती. दुसरी मुलगी विचारत होती, 'सेक्सचं नेमकं टेक्निक काय असतं ते सांगा', ही पण मुलगी अगदी घाईवर आल्यासारखीच दिसत होती. एकदा

सेवाग्राममधल्या काही मुलींशी मी बोलत होते. त्या मुली गरवारे बालभवनमधे आल्या होत्या. त्यातल्या एका मुलीनी तिचं मूल संस्थेतर्फे दुसऱ्या कुटुंबात दत्तक दिलं होतं आणि या मुलीचं वय 15 होतं.

**अनिल :** पालकांच्या मनात मुलांचा अभ्यास, परीक्षा, करिअर, चरितार्थाचा मार्ग या गोष्टींची इतकी काळजी असते की, त्यामुळे पालकांना बारावी होईपर्यंत म्हणजे 17-18 वर्षांचं मूल होईपर्यंत लैंगिक शिक्षण, विवाह अभ्यास हे विषयदेखील घरात नकोत असं वाटतं. प्रत्यक्षात ते विषय घरात नसले तरी मनात असतातच. माझं स्वतःचं मत याबाबतीत पक्कं आहे. 10 वर्षांपासून मुलांनी लैंगिक शिक्षण घ्यायला सुरुवात केली तर त्यांच्या मनातला कोलाहल संपेल. पालकांना वाटतं मुलांचं त्यामुळे अभ्यासाकडे लक्ष लागणार नाही. मला बरोब्बर उलट वाटतं. लैंगिक संबंधातल्या शंका फिटल्यामुळे त्यांचं अभ्यासाकडे नीट लक्ष लागेल.

●●●

*पालकांना बारावी होईपर्यंत म्हणजे 17-18 वर्षांचं मूल होईपर्यंत लैंगिक शिक्षण, विवाह अभ्यास हे विषयदेखील घरात नकोत असं वाटतं. प्रत्यक्षात ते विषय घरात नसले तरी मनात असतातच. माझं स्वतःचं मत याबाबतीत पक्कं आहे. 10 वर्षांपासून मुलांनी लैंगिक शिक्षण घ्यायला सुरुवात केली तर त्यांच्या मनातला कोलाहल संपेल. पालकांना वाटतं मुलांचं त्यामुळे अभ्यासाकडे लक्ष लागणार नाही. मला बरोब्बर उलट वाटतं. लैंगिक संबंधातल्या शंका फिटल्यामुळे त्यांचं अभ्यासाकडे नीट लक्ष लागेल.*

# 13

# लैंगिक शिक्षण – तरुणांसाठी – लग्नापूर्वी

## 1) सध्याची परिस्थिती

**अनिल :** आता आपण 16 वर्षांच्या पुढे आणि लग्न होईपर्यंतच्या वयापर्यंत काय परिस्थिती असते ते बघू. लग्न होईपर्यंत म्हणजे किती वयापर्यंत असं सांगणं कठीण वाटतं. कारण तो आकडा 40-45 पर्यंतसुद्धा गेलेला आहे हे मला माहीत आहे. माझं लग्न पंचविसाव्या वर्षी झालं आणि शोभा तेव्हा 22 वर्षांची होती. ते सगळ्या दृष्टीनी अगदी योग्य वय होतं असं आम्हाला वाटतं. कामधंदा, शिक्षण, मुलं सगळ्याच बाजूंनी विचार केला तर ते वय म्हणजे फार लवकर नाही, फार उशीर नाही असं वाटतं.

पुढच्या पिढीत खुद्द आमच्या मुलांचंही असं झालं नाही आणि जीवनसाथमधे तर मी बघतोच आहे की तिशी जवळ आली की जरा घाई व्हायला लागते. तोपर्यंत मुलं-मुली शांत असतात. हे जे मी 'शांत' असतात म्हणालो ते मात्र खरं नाही कारण करिअरमधले प्रश्न इतके असतात की लैंगिक संबंध या विषयावर त्यांना लक्ष केंद्रित करता येत नाही. याचा अर्थ त्यांना लैंगिक भावना नसतात असं नाही. कुणाविषयी तरी आकर्षण वाटलेलं असतं, प्रेमभंग झालेला असतो किंवा काही प्रमाणात संबंध आलेले असतात पण निर्णय घेता येत नसतो. नैसर्गिक लैंगिक प्रेरणांचं वय काही बदललेलं नाहीय, इतर घटकच फक्त बदललेयत.

समाजाची मुली आणि सगळ्या स्त्रिया यांच्याकडून काय अपेक्षा आहे हे तपासायला गेलं तर काही गोष्टी समोर येतात. भारतीय समाजाची अपेक्षा

म्हणजेच भारतीय पुरुषांची अपेक्षा असाच त्याचा अर्थ होतो. गंमत म्हणजे अनेक वर्षांच्या पुरुषप्रधानतेच्या संस्कारांमुळे मूठभर मुक्त स्त्रिया सोडल्या तर बाकीच्या स्त्रियाही पुरुषांच्याच नजरेतून प्रत्येक प्रश्नाकडे बघतात.

प्रत्यक्ष अपेक्षेचं वर्णन मात्र गोंधळाचं आहे. मुलींनी आणि स्त्रियांनी आकर्षक दिसायला हवं. अर्थात आकर्षक म्हणजे पुरुषाच्या नजरेला आकर्षक. पुढची अपेक्षा अशी की, तिनी पुरुषांना आकर्षित करून घेतल्यामुळे पुरुष आकर्षित झाले तरी तिचा संयम कधीही सुटता कामा नये.

**शोभा :** सहजीवनाच्या अभ्यासात कामजीवन हा विषय येतोच. उत्सुकता, संकोच, आकर्षण आणि भीती या सगळ्या नैसर्गिक भावना आहेत. पण लग्नाचं सरासरी वय वाढतंय. सिनेमे, टी.व्ही. ही माध्यमं या सगळ्या भावना अतिशयोक्त स्वरूपात विकृतपणी भडकवतायत. या अवस्थेत तरुण पिढीनी काय करायचं? मुलगा-मुलगी दोघांनाही मासिक पाळी, शरीरसंबंध आणि अपत्यजन्म याची वैद्यकीय माहिती हवीच. त्याचबरोबर त्यातल्या लैंगिक, भावनिक सहजीवनाचं ज्ञान हवं. अविवाहित मुलामुलींनी कसं वागावं या विषयावर त्यांच्याशी बोलणारं विश्वासाचं, प्रेमाचं माणूस त्यांना हवंय. जीवनसाथमधे अशा मुलामुलींचे ज्येष्ठ मित्र बनणं ही भूमिका आमची असते. मुलं-मुली लग्नापूर्वीच्या प्रेमप्रकरणांविषयी आई-वडलांशी नाही पण आमच्याशी खरं बोलायला लागतात. हे खरं बोलावंसं वाटणं फार महत्त्वाचं आहे.

●

## 2) लैंगिक भावनांबद्दलचा गोंधळ

**अनिल :** मी साधारण 15 वर्षांचा असताना आमच्या पलीकडच्या इमारतीत एक तरुण जोडपं राहायचं. दोघंही दिसायला चांगले होते. त्यातली बायको जेव्हा जेव्हा दिसायची तेव्हा पूर्ण मेकअपसकटच दिसायची. खास प्रसंगी बायका जशा फेशियल करून घेतात, भिवया, लाली, लिपस्टिक, केशरचना करून येतात तशी ही रोज असायची. दागिन्यांनी मढलेली असायची. स्वतः ब्यूटिशियन होती म्हणे आधी. त्यावर असं ऐकलं की ती घरात सुद्धा 24 तास तशीच राहायची, कारण तसा तिच्या नवऱ्याचा आग्रह होता. माझ्या मनावर त्या जोडप्याच्या आग्रहाचा कायमचा परिणाम झाला एवढं मात्र खरं. खूप नटणं, दागिने घालणं याबद्दल नावड निर्माण झाली, पण चेहरा सतत नीटनेटका ठेवावा याविषयी विचार चालू झाले. या प्रत्येक गोष्टीचे परिणाम पुढे माझ्या बायकोला सोसावे लागतील असा विचार मात्र डोक्यात आला नाही कारण मी लग्नच करायचं नाही असं ठरवत होतो.

मुलींबद्दल आकर्षण खूप वाटत होतं पण लग्न करायचं नाही असं मी म्हणत होतो यातला परस्परविरोध आणि खरा अर्थ तेव्हा मला समजत नव्हता. मी 15 वर्षांचा असताना कॉलेजमधे गेलो, तेसुद्धा 11 वी एस.एस.सी. करून. कारण 4 वर्षांचा असताना मला पहिलीत टाकलं होतं. कॉलेजमधे गेलो तेव्हा वय इतर सर्वांपेक्षा लहान होतं, पण मी सबंध वर्गात सर्वांत उंच होतो. त्या काळात मला एक मुलगी खूप आवडली, पण नीट प्रेमप्रकरण करण्याइतकी मला अक्कल नव्हती. फार लवकर शिक्षणाला सुरुवात झाल्यामुळे मला अभ्यासाची गोडी लागली नाही हा परिणाम झाला होताच, त्याशिवाय स्त्री-पुरुष आकर्षण याविषयीही डोक्यात खूप गोंधळ होते. मी त्या मुलीच्या सारखा मागे मागे असायचो, पण मित्रांशी बोलताना तिला मी बहीण मानतो असं सांगायचो. प्रत्यक्षात तो सगळा मूर्खपणा होता. मला तिच्याबद्दल जे वाटत होतं ते सरळसरळ लैंगिक आकर्षणच होतं.

एवढ्या वर्षांनंतर स्पष्ट विचार करून मला मानलेली बहीण, मानलेली मुलगी वगैरे गोष्टी पटत नाहीत. मित्र-मैत्रीण हा शब्द वापरायला लोक घाबरतात

आणि भाऊ-बहीण, वडील-मुलगी हे बोलायला सोपं आहे, त्याला समाजमान्यता आहे एवढाच मला त्याचा अर्थ दिसतो. मी ज्या बहीण मानलेल्या मुलीविषयी बोलतोय तिच्याकडे मी अनेक निरनिराळ्या निमित्तांनी जायचो. तिच्या घरच्या लोकांना नेमकं काय वाटत असेल, ती तिच्या घरच्यांना काय सांगत असेल मला माहीत नाही, पण तिच्याकडचे सगळे लोक मला माझ्या पाठीमागे नावं ठेवत असतील ही माझी खात्री आहे, कारण मी अगदी करू नये ती गोष्ट करायचो. त्यांच्याकडे जाऊन मी दिवाणखान्यात ठिय्या मारून बसून राहायचो. घरचे सगळे लोक माझ्याकडे दुर्लक्ष करून आपापले उद्योग करत असायचे, माझी ही मानलेली बहीणदेखील आतल्या खोलीत जाऊन तिचं तिचं काहीतरी करत असायची. 'आता तू जा', असं मला कधी कोणी म्हटलं नाही हा त्यांचा चांगुलपणा, पण मी जे वागलो ते खरं म्हणजे अक्षम्य होतं.

त्याच काळात चालू असलेली एक छोटी अल्पजीवी कहाणी सांगतो. आमच्या सबंध कुटुंबाच्या ओळखीचं जवळ राहणारं दुसरं एक कुटुंब होतं. त्यांना दोन मुली होत्या. मोठी आमच्याकडे नेहमी यायची. मला स्पष्ट कळत होतं की मला जाळ्यात पकडण्याचा त्या सबंध कुटुंबाचा इरादा आहे. प्रत्यक्षात गोची अशी होती की, मोठ्या बहिणीपेक्षा धाकट्या बहिणीबद्दल मला जास्त आकर्षण वाटायचं आणि ही गोष्ट कोणापाशीच बोलता येत नव्हती. त्याहीपेक्षा एक मोठी महत्त्वाची गोष्ट तर व्यक्त करण्यापलीकडची होती, ती म्हणजे त्या दोन्ही बहिणींपेक्षाही जास्त तीव्र आकर्षण मला दोघींच्या आईविषयी वाटायचं. एरवी 'काकू' म्हणून हाक मारायची आणि मनात त्या काकूंची छबी सारखी दिसायची, स्वप्नरंजन चालू असायचं असा सगळा प्रकार होता. अशा तऱ्हेनी माझा प्रेमभंग नाही झाला पण त्या मुलीचा बहुतेक विरस झाला.

**शोभा :** अनिलच्या मनातल्या गोंधळाच्या तुलनेनी माझ्या मनातले अगदी थोडेसे गोंधळच म्हणायचे. ते कृतीपर्यंत कधीच पोहोचले नाहीत. सध्या जीवनसाथमधे असतो तसा स्पष्ट विचारांचा पाया असता तर तेही किरकोळ गोंधळ झाले नसते.

●

## 3) मुलग्यांच्या विकृत गप्पा

**अनिल :** कॉलेजमधे मित्रामित्रांच्यातल्या गप्पा म्हणजे तर कमालीच्या विकृत असायच्या. सारखा एकच विषय. स्त्रीशरीर. आमच्या वर्गात एक मराठी न येणारा दक्षिणी मुलगा होता. त्याचं नाव बाबू. त्याला आम्ही सगळे बाबूराव म्हणायचो आणि वर सांगायचो की महाराष्ट्रात सन्मानानी असंच म्हणतात. एक-दीड वर्षानी त्याला त्याचा अर्थ कळल्यावर तो जाम भडकला. त्याखेरीज मित्रामित्रांच्यात एका बोधवचनाचा अपभ्रंशही खूप लोकप्रिय होता. 'परस्त्री मातेसमान'च्या ऐवजी 'परस्त्री बायकोसमान'. बरोबरीच्या मित्रमंडळींनाच काय मला देखील प्रामाणिकपणी वाटायचं की स्वतःला आवडणारी विशिष्ट मुलगी माझ्याकडे आकर्षित झालीय आणि त्यामुळेच ती माझ्याकडे बघतीय किंवा बघून हसतीय. मुलगी आपणहून माझ्याशी काहीतरी बोलली तर त्याची खात्रीच वाटायची.

मित्रामित्रांच्यात जी टवाळी चालायची त्यात आणखी एक विषय नेहमी असायचा. मुलगी एखाद्या गोष्टीला नाही म्हणाली की त्याचा अर्थ हो असा घ्यायचा. सिनेमांच्यात बघितल्यामुळेच हा विचार डोक्यात शिरला होता. प्रत्यक्षात ते खरं नसतं. पण ते कळायला मधे अनेक वर्षं जाऊन, लग्न होऊन, बायकोला विचारेपर्यंत ही गैरसमजूत चालू राहाते. मित्रामित्रांच्या गप्पांच्यात कुठच्या मुलीचा फोन नंबर काय अशा सांकेतिक भाषेत गप्पा चालायच्या. त्या काळात मुंबईतले फोन नंबर सहा आकडी असायचे. सहा आकडे म्हणजे छाती, कंबर, कुल्ले यांची मापं. मग त्यावरून काही खरोखरच्या ओळखीच्या फोन नंबर माहिती असलेल्या बायकांची टिंगलही चालायची. त्यातल्या एका बाईंचा खरोखरीचा फोन नं. 682868 असा होता. दुसऱ्या एका मुलीचा फोन नं. 342434 होता आणि ती मुलगी खरोखर तशा साधारण मापांची होती, त्यावरून मूळ कल्पना सुचली होती. तेव्हा मोबाईल फोनचा शोध लागलेलाच नव्हता.

मित्रांची गप्पांची मैफिल जमली की दारू-बिरू न पिता मैफिलीचं वातावरणच सगळ्यांना चढायचं. आपण कुठच्या मुलीबरोबर काय केलं असं कोणी कोणी सांगायचं. इतर जणही त्या बढाया मारण्याच्या स्पर्धेत मागे नसायचे. कल्पना

रंगवून रंगवून सांगितल्या जायच्या. प्रत्यक्षात सगळ्यांना माहिती असायचं की सगळं खोटं आहे. पण ते बोलण्यातली मजा हाच उद्देश असायचा. हे सगळं अगदी चुकीचं होतं हे मी मान्य करतो. ज्या मुलीबद्दल बोलणं चालू असायचं तिला यातली अर्थातच कसलीही कल्पना असणं शक्य नाही. पुढे काही काळानी त्यातल्याच एका मुलीबरोबर आमच्या गटातल्याच एकाचं सूत जुळलं. त्याच्या देखत त्या मुलीविषयी बोलणं शक्यच नव्हतं. आधी त्या बढायांच्यात तोही सामील असायचा, आता दुसऱ्या कुठच्यातरी मुलीचा नंबर लागायचा. आमच्या काळात अशा टोळक्यांच्या उभं राहण्याच्या ठिकाणाला वासूनाका म्हणायचे. कारण 'वासूनाका' नावाची एक प्रसिद्ध कादंबरी होती.

मी अशा मैफलींत फार काळ सामील नव्हतो त्याची दोन कारणं होती. एक म्हणजे संध्याकाळी मला व्यायामशाळेत जायचं असायचं आणि दुसरं म्हणजे मला आवडणाऱ्या मुलीबद्दल वासू मंडळी फार घाणेरडं बोलायची. त्यांच्यात अशा पैजाही लागायच्या की, एका समोर दिसणाऱ्या मुलीच्या अंगाला हात लावून आलं तर जो कोणी असं करून दाखवेल त्याला उरलेल्या सगळ्यांनी इतके रुपये द्यायचे. मी असा प्रसंग एकदाच बघितला. पैज जिंकलेला मुलगा तिच्यासमोर गेला आणि पाय अडखळून तोल गेला असं दाखवून खांद्यावर हात ठेवून उगीच काहीतरी बोलून माफी मागून आला. माझ्या लहानपणच्या विकृतीच्या अंमलातून मी बाहेर आलो होतो, त्यामुळे मला ते सगळं प्रकरण फार किळसवाणं आणि केविलवाणं वाटत होतं. अशा सगळ्या मित्रांच्यामधे एक गोष्ट सगळ्यांच्या बाबतीत सारखी होती. ती म्हणजे कोणालाच खऱ्या मैत्रिणी नव्हत्या. अगदी क्वचित काही श्रीमंत मुलं ओळखीची होती ती मुली फिरवणारी होती. बाकीच्या मध्यमवर्गीय मित्रांच्या बाबतीत मात्र मुली फिरवण्याच्या सगळ्या थापाच असायच्या.

हा मित्रमंडळींचा कंपू आणखीन एक उद्योग नेहमी करायचा. मी त्यांच्यात एकदाच गेलो होतो. मी दादरला राहायचो. दादरला शिवाजी पार्क आणि पुढे दादर चौपाटी आहे. मुंबईतल्या जागांची परिस्थिती 55 वर्षांपूर्वी फार वाईट होती, सध्या तर परिस्थिती भयानक आहे. घरात जागा नसल्यामुळे अगदी लग्न झालेली, मुलंबाळं असलेली जोडपी संभोग करायला घराबाहेर शिवाजी पार्कच्या मैदानावर किंवा चौपाटीवर यायची. पूर्ण कपडे काढणं शक्य नसल्यामुळे जमेल तेवढे कपडे दूर करून हे चालायचं. बहुतेक सगळे कनिष्ठ मध्यम वर्गीय,

कष्टकरी, झोपडपट्टीकर. मैदानात रस्त्यावरच्या दिव्यांच्या उजेडापासून त्यातल्या त्यात दूर, म्हणजे मैदानाच्या मध्यावर हे लोक जायचे नि दोन मिनिटांत संभोग उरकायचे. हा मित्रांचा कंपू ते बघायला जायचा. त्यातला एकजण अशा लोकांच्यावर टॉर्च पण मारायचा. आता विचार केला की मुंबईकर गरीब लोकांची कीव येते. ते जे काही काम दिवसा करत असतील त्यासाठी मनस्वास्थ्य टिकवणं किती कठीण असेल!

जीवनसाथच्या सदस्यांच्या बाबतीतही चुकीचे प्रकार घडलेले आहेत. विशेषतः घटस्फोटित स्त्रियांना सूचक संकेत करणं, 'त्यांनी काय हरकत आहे इतरांची मागणी पुरवायला?' असा मुद्दा मांडणं हे विकृत आहे. असा विचार एक मुलगा प्रत्यक्ष बोलत असेल तर त्याच्या दसपटींनी मुलं असा विचार मनातल्या मनात करत असतील असं मानायला हरकत नाही. तीही विकृतीच.

**शोभा :** काही गुन्हे नैतिक स्वरूपाचे असतात. म्हणजे त्यात स्पर्श नसतो, जबरदस्ती नसते पण तरी ती विकृती असते. दाराच्या फटीतून, भोकातून दुसऱ्याच्या बेडरूममधे डोकावणं, घाणेरड्या ई-मेल्स पाठवणं, एस.एम.एस– त्यावर अश्लील फोटो पाठवणं वगैरेंमधे मी म्हटलं तसा स्पर्श, प्रत्यक्ष संपर्क नसतो पण त्यात विकृती असतेच.

●

# 4) हस्तमैथुन

**अनिल :** मुलग्यांच्या मनावरचे ताण कसे असतात हे मगाशी आपण बघितलं. 10-12 वयापासून निर्माण झालेलं स्त्री-शरीराविषयीचं आकर्षण हळूहळू तीव्र स्वरूप धारण करतं आणि लग्नाला तर फार अवधी असतो. सगळ्या प्रकारची माध्यमं, वर्तमानपत्रं, मासिकं, टी.व्ही., सिनेमा आणि मित्रमंडळी यांच्यामुळे कामेच्छा तर वाढत जाते. या परिस्थितीत मुलग्यांसमोर एकूण चार मार्ग असतात. ब्रह्मचर्य व्रताचं पालन अशक्य नसतं पण खूप कठीण असतं. हस्तमैथुन हा दुसरा मार्ग, तिसरा मैत्रीण मिळवणं आणि चौथा वेश्येकडे जाणं.

हस्तमैथुनाबद्दल भारतातल्या गैरसमुजतींना सुमारच नाही. कोणी सांगतं पुरुषाच्या वीर्याचा एक थेंब म्हणजे 40 रक्ताचे थेंब असतात. त्यामुळे हस्तमैथुन अजिबात वर्ज्य. ही पूर्ण खोटी गोष्ट आहे. तरुण पुरुषाच्या शरीरात सतत वीर्य तयार होत असतं आणि जोपर्यंत, हस्तमैथुन मर्यादेत असतं तोपर्यंत काही अपाय होत नाही, अशक्तपणा येत नाही. साधारण रोज एकदा हस्तमैथुनामुळे वीर्य गळणं यात काहीच नुकसान नाही, खरं म्हणजे त्याचे तीन फायदेही असतात. एक तर सरळ साधं म्हणजे मनस्वास्थ्य मिळतं. 'स्त्री-शरीर' या विषयावर मन भडकून न उठल्यामुळे संयत वागणूक शक्य होते. दुसरा फायदा म्हणजे त्या निमित्तानी म्हणजे लिंग धुण्याच्या निमित्तानी लिंगाची स्वच्छता होते. तिसरा फायदा म्हणजे लिंगाच्या पुढच्या भागाचं कातडं धुताना पुढे-मागे केल्यामुळे ती त्वचा लवचिक होते. पुढे लग्नानंतरच्या पहिल्या लैंगिक संभोगाच्या वेळी अनेक पुरुषांचं कातडं दुखतं किंवा फाटतं. तो धोका यामुळे टळतो.

हस्तमैथुनाला काही लोकं मूठ मारणं असंही म्हणतात. मूठ मारणं याच शब्दाचा दुसरा अर्थ करणी करणं असाही असतो. त्यामुळे काही ठिकाणी हस्तमैथुनाला हातगाडी चालवणं असंही म्हणतात. प्रत्यक्ष हातगाडीनी माल पोचवणारे हमाल याला आणखी काहीतरी निराळंच म्हणत असतील.

एक खूप महत्त्वाची गोष्ट सगळ्यांना माहिती हवी. पुरुषाच्या वीर्यात अमूल्य असं काही नसतं. नॉर्मल पुरुषामधे वयाच्या विशिष्ट काळात वीर्य बनण्याची क्रिया अखंड चालूच असते. वीर्यनाश म्हणजे रक्तनाश म्हणजेच शक्तिपात या सगळ्या भ्रामक समजुती आहेत. या चुकीच्या कल्पनेच्या प्रभावाखाली जाऊन ब्रह्मचर्य स्वीकारलेले बरेच पुरुष आधीच्या पिढीत होते. ज्ञान तपासण्यासाठी

काही साधनं नव्हती. बहुतेक समाजानी भक्तिमार्ग, धर्ममार्ग स्वीकारला होता. ज्ञानमार्ग जवळजवळ कोणालाही माहिती नव्हता. पुरुषाची ताकद, बुद्धिचातुर्य वीर्यावर मुळीच अवलंबून नसतं हे माहिती नव्हतं.

●

## 5) वेश्येकडे जाण्याचा मोह

**अनिल :** माझ्या कॉलेजच्या काळात बहुतेक मुलांना लैंगिक संबंधासाठी मैत्रीण मिळणं कठीण होतं. त्या तुलनेत वेश्येकडे जाणं सोपं असतं. आम्ही कॉलेजमधे असताना वयानी मोठे असे काही अनुभवी मित्र होते. अनुभवी म्हणजे मधूनमधून वेश्येकडे जाणारे. त्यांनी आम्हाला आग्रह केल्यामुळे आम्ही काही मुलं त्यांच्याबरोबर एकदा वेश्येकडे जायला निघालो होतो. त्या काळात एड्स हा रोग नव्हता पण गुप्तरोग होते. गुप्तरोगाच्या भयानकतेला घाबरल्यामुळे आणि आपण हे चुकीचं करतो आहोत या गंडामुळे शेवटी आम्ही मध्यावरच परत फिरलो. बाकीचे अनुभवी लोक पुढे गेले. माहिती असावी म्हणून सांगतो, गुप्तरोगांवर तेव्हाही औषधं होती. आता तर खूपच चांगली औषधं असतात.

आता परिस्थिती बदलली आहे. 'चालू' मुलींची संख्या वाढली आहे. त्यातल्या काही मुलींची संभोगाच्या बदल्यात काहीच अपेक्षा नसते. फार फार तर मुलग्यानी एकत्र जेवणाचा खर्च केला, हॉटेलच्या खोलीचा खर्च केला की त्यांना पुरतं. शहरात येऊन एकट्या राहणाऱ्या मुली, मुलगे बऱ्याच प्रमाणात असतात. अशा लोकांच्या खोलीवरही जाता येतं. एखादी मुलगी, तीन-चार मुलं असले उद्योग रात्रभर करतात. कधीकधी दोन-तीन मुली, दोन-तीन मुलगे असतात. अशा मुली त्या मुलग्यांच्या खास जवळच्या मैत्रिणी बहुतेक वेळी नसतात. 'वन नाईट स्टँड' असतात.

मोठ्या मुंबईसारख्या शहरांच्यात महागड्या 'कॉलगर्ल्स' किंवा 'एस्कॉर्टस्' असतात. ज्यांना परवडतं ते त्यांना बोलावतात.

या सगळ्या 'सर्व्हिसेस' म्हणजे वेश्यांकडे जाण्याचेच प्रकार असतात. 'स्टाईल' निराळी, नाव निराळं आणि 'रकमा' निराळ्या एवढाच फरक असतो. कॉलगर्ल्स किंवा एस्कॉर्ट खूप पैसे घेतात.

●

## 6) मुलींच्या मनातल्या कल्पना

**शोभा :** भारतीय कायद्याप्रमाणे मुलीला 18 वर्षं पूर्ण होईपर्यंत आणि मुलाला 21 वर्षं पूर्ण होईपर्यंत लग्नाला परवानगी नसते. कायदा आहे म्हणजे तो पाळायलाच हवा. कष्टकरी वर्गात तो अजिबात पाळत नाहीत, हे आपल्याला माहीत आहे, पण भारत सरकार त्याबद्दल काही करत नाही हेही आपल्याला माहीत आहे. असा कायदा का केला असेल ते मात्र आपण समजू शकतो. 18 वर्षांपर्यंत विवाह करून जबाबदारीनी वागण्याची परिपक्वता आलेली नसते असं मानलेलं आहे. कायदा हेही त्यामधे धरून चाललेला आहे की 18 वर्षांनंतर स्वतः आई-वडलांच्या मदतीशिवाय निर्णय घेण्याची क्षमता मुलीमधे येते आणि ती क्षमता मुलामधे 21 व्या वर्षी येते. हा परिपक्वतेमधला 3 वर्षांचा फरक जो फरक कायद्याला कळलाय तो रास्त आहे असंच मला वाटतं. अगदी 10-12 वर्षांच्या मुलीला सुद्धा पुरुषांची आपल्याकडे बघण्याची नजर वात्सल्याची आहे का मैत्रीची का लैंगिक अभिलाषेची आहे हे कळतं. मुलींचीही अशी नजर असू शकते पण त्याचं प्रमाण कमी असतं. अजूनतरी सुशिक्षित, सुसंस्कृत, मध्यमवर्गीय घरातल्या बहुसंख्य मुली सज्जन असतात आणि फार थोड्या बिघडलेल्या असतात.

सज्जन मुलींच्या डोक्यातले जास्त विचार लग्नानंतरच्या नवरा-बायकोच्या खऱ्या प्रेमाचे असतात आणि शारीरिक संबंधाबद्दल कमी असतात. कुठच्यातरी आवडत्या नटासारखा दिसणारा आपला नवरा असेल अशी काव्यमय कल्पना असते. प्रणयाबद्दल स्वप्नरंजन असतं, पण प्रत्यक्ष लैंगिक संभोगाचं स्वप्नरंजन फार कमी असतं. माझा तरुणपणचा आवडता हीरो देव आनंद होता. एक देव आनंदसारखा साधारण दिसणारा आणि स्टाइल मारणारा मुलगा माझ्यावर प्रेम करायचा हेही मला माहीत होतं, पण प्रत्यक्ष जोडीदाराची निवड करायची वेळ आली तेव्हा मला अजिबात देव आनंदसारखा न दिसणारा अनिल आवडला. हा माझ्या पिढीतला 'रोमँटिसिझम' या पिढीत कमी झाला आहे. आता मुली होणाऱ्या नवऱ्याचा पैसा मुख्य समजतात. मी मात्र पैशाचा अजिबातच विचार केला नव्हता.

मुलींच्या डोक्यातले विचार मुलग्यांच्या डोक्यातल्या विचारांपेक्षा निराळे असतात, पण स्त्रीपुरुष संबंध याबद्दल विचार चालू असतात हे नक्की. या

विषयावर बोलण्यासाठी मी एकदा केवळ मुलींच्या शाळेत गेले होते. मी मुद्दे काढून काय बोलायचं याची तयारी करून गेले होते. पुरुषांच्या सध्याच्या विकृती, त्यापासून आपण स्त्रियांनी कसा बचाव करावा, कसं वागावं, जोडीदाराची निवड, लग्नानंतरची योग्य वागणूक वगैरे मुद्दे मी काढले होते. माझ्या आधी त्या मुलींच्या बाईंनी माझी ओळखही करून दिली आणि त्या चार शब्द बोलल्या. त्या चार शब्दांत त्यांनी मुलींना सांगितलं की, आपण सगळ्या झाशीच्या राणीच्या वंशज आहोत आणि आपला लढाऊ बाणा सतत जागृत ठेवला पाहिजे, पुरुषजातीला आपण अजिबात घाबरता कामा नये वगैरे वगैरे. मी बोलायला लागल्यावर झाशीच्या राणीमधून मुलींना बाहेर काढून खऱ्या लैंगिक शिक्षणापर्यंत पोहोचवायला मला फार श्रम पडले. नंतर असं कळलं की, लैंगिक शिक्षण नावाचा महिन्यातून एक तास असतो आणि या मुली अनेक शंका विचारायचा प्रयत्न करतात त्यांच्याकडे सरळ दुर्लक्ष करतात.

बहुतेक मुलींच्या मनात आपला प्रेमविवाह व्हावा अशी इच्छा असते. त्याचं कारण असं असतं की, प्रेमविवाह ही कल्पना जास्त काव्यमय किंवा 'रोमँटिक' आहे. कुठच्यातरी पुरुषाच्या प्रथमदर्शनी गुणावर प्रेमसुद्धा बसतं, पण पुढे काही घडत नाही. नंतर मात्र ज्याचं आपल्यावर प्रेम त्याच्यावर आपलं प्रेम असा नियम बनतो. साधारणपणी एकाच सांस्कृतिक वर्गातली मुलगा-मुलगी या नियमानी प्रेमात पडतात. नीट खोलवर विचार केला तर माणसाची मूळ गरज प्रेम मिळवणं ही असते आणि ते प्रेम मिळवण्यासाठी आपणही प्रेम करावं लागतं. दुर्दैवानी स्त्रियांना ही गोष्ट जास्त प्रमाणात कळते आणि कमी पुरुषांना ती कळते.

●

*बहुतेक मुलींच्या मनात आपला प्रेमविवाह व्हावा अशी इच्छा असते. त्याचं कारण असं असतं की, प्रेमविवाह ही कल्पना जास्त काव्यमय किंवा 'रोमँटिक' आहे. कुठच्यातरी पुरुषाच्या प्रथमदर्शनी गुणावर प्रेमसुद्धा बसतं, पण पुढे काही घडत नाही. नंतर मात्र ज्याचं आपल्यावर प्रेम त्याच्यावर आपलं प्रेम असा नियम बनतो.*

## 7) मुलगे आणि मुली यांची चांगली मैत्री

**अनिल :** मी स्वतः कसा चुकीचा वागत होतो आणि कसा कड्याच्या टोकावरून परत फिरलो हे मी तुम्हाला सांगितलं ते तुम्ही तसं वागू नये म्हणून. कसं वागायला हवं ते सांगायचं राहाता कामा नये. सर्वसाधारण 'नॉर्मल' मुलाला मुलींशी मैत्री करण्याची इच्छा असते. मला वाटतं, अशा काही चांगल्या मैत्रिणी जरूर असाव्यात. उगीच कोणाला बहीण वगैरे मानू नये. माझी अशी इच्छा आहे की, तुमच्या घरच्या ज्येष्ठांना या विषयावर चांगली समज असावी. तुम्ही अशा मैत्रिणींना तुमच्या घरी बोलवावं, तुम्ही त्यांच्याकडे अधूनमधून जावं हे चांगलं असतं. तीन-चार मुलींशी चांगली मैत्री असली की स्त्री जातीविषयी बऱ्यापैकी माहिती होते. एरवी आई-बहिणींची जी ओळख असते ती यासाठी पुरत नाही.

**शोभा :** माझ्या शाळा-कॉलेजच्या वयात माझी या प्रकारची 3-4 मुलांशी चांगली मैत्री होती. आमच्या घरी ही समज व्यवस्थित होती. पण माझ्या इतर नातेवाईकांना नव्हती. त्यांचा प्रश्न असायचा, 'ही काय 4 नवऱ्यांशी लग्न करणार आहे का?'

**अनिल :** माझ्या घरीही आम्हा भावंडांना मुलामुलींशी मैत्रीबद्दल चांगली मोकळीक होती. त्यासंबंधी एक गोष्ट तुम्हा मुलग्यांना मुद्दामहून सांगावीशी वाटते. चांगल्या मैत्रीसाठी मुख्य म्हणजे शरीरस्पर्श टाळावा. बसून बोलायचं तर समोर बसून बोलावं. मघाशी आपण म्हणालो तशा बिघडलेल्या मुली सोडल्या तर बाकीच्या चांगल्या घरच्या सज्जन मुलींना युक्तीनी, काहीतरी निमित्तानी स्पर्श करणारी मुलं आवडत नाहीत.

लग्नानंतर जेव्हा नवरा-बायकोचे लैंगिक संबंध चालू होतात तेव्हा एकमेकांबद्दल वाटणारं प्रेम व्यक्त करण्याचे अनेक मार्ग वापरायचे असतातच, पण सर्वांत महत्त्वाचा खरा मार्ग म्हणजे 'लैंगिक संबंध'. तो व्यवस्थित आणि सुखकारक असला तर एकमेकांना सारखं सारखं 'लव्ह यू' म्हणण्याची किंवा भेटवस्तू खरेदी करण्याची, भेटकार्ड देण्याची गरजच नसते. ही गोष्ट लग्नानंतरची असली तरी आत्ता सांगतोय. कारण खऱ्या आनंदाच्या अनुभवांऐवजी या बाकीच्या दुय्यम गोष्टींचं जास्त महत्त्व मुलामुलींना वाटतं आणि लग्नानंतर फसगत होते, नाराजी

असते, अशी उदाहरणं मला बरीच माहिती आहेत. हे ज्ञान लग्नाच्या आधीपासून हवं कारण या अवस्थेत केव्हाही लग्न ठरू शकेल, एखाद्या मुलाशी किंवा मुलीशी संवाद सुरू होऊ शकेल. तो संवाद योग्य दिशेनी व्हावा यासाठी या माहितीची जरूर आहे.

वय वाढत चाललेलं आहे आणि लग्न ठरत नाही, प्रेमिका मिळत नाही, वेश्येकडे जाण्याचा धीर नाही, अशा अवस्थेत मुलगे पिसाटतात. या एका गंडामुळे सगळ्यांशी चुकीचं वागतात. स्वतःचं पौरुष दाखवण्यासाठी मित्रांच्या नादानी दारू प्यायला लागतात, सिगारेटी ओढायला लागतात. खूप जास्त प्रमाणात बाहेर खायला लागतात, पार्ट्यांना जायला लागतात. मुलीबरोबर बसलेलं दिसणं हे महत्त्वाचं वाटतं त्यामुळे रेस्टॉरंटबाहेरच्या खुर्च्यांवर मुलींबरोबर गप्पा मारत बसतात. नुसतं बसणं शक्य नसतं म्हणून उगीचच काहीतरी खातात, पुन्हा पुन्हा चहा पितात. हा सगळा स्वतः 'ॲडल्ट' झाल्याचा स्वतःलाच दिलेला पुरावा असतो.

या वयात मुलं-मुली दोघंही स्वतः पैसे कमावत असतात त्यामुळे पैशाचा प्रश्न नसतो. संसार चालू झालेला नसल्यामुळे 'महागाईचा राक्षस' यांना आत्ता छळत नाही. आई-वडील यातच धन्यता मानतात की आपला मुलगा किंवा मुलगी स्वतःच्या पैशानी काय ते करतायत. 'काय ते' म्हणजे आरोग्याची, महत्त्वाच्या वेळेची बरबादी आहे हे बहुतेक आई-वडलांना माहितीही असतं, पण हे बोलण्याइतका, समजावण्याजोगा सुसंवाद घरात शिल्लक राहिलेला नसतो. कामावरून आल्यावर लगेच मुलं बाहेर पडतात ती उशिरा रात्री स्वतःच्या किल्लीनी दार उघडून घरात येतात, सुट्टीच्या दिवशी पूर्ण दिवसभर बाहेरच असतात. अशी मुलं म्हणजे घरासाठी 'नॉनपेइंग गेस्ट' असतात. माझ्या तरुणपणी मी असा नव्हतो, शोभा नव्हती. आमच्या मुलांची गोष्ट थोडी निराळी होती. मुलगा शोनील बाहेर असायचा, पण तो ट्रेकिंगसाठी आणि त्याच्या क्षेत्रातल्या म्हणजे पर्यावरणातल्या अभ्यासासाठी. मुलगी आभाही बाहेर असायची, पण नाचाच्या क्लाससाठी, नाचाच्या कार्यक्रमांसाठी, चित्रकलेच्या अभ्यासासाठी, प्रदर्शनांसाठी, इंडॉलॉजी या विषयातल्या एम.ए.च्या क्लासेसना. त्यामुळे मी वर्णन करतोय तो प्रश्न आमच्या घरात नाही आला. इतर घरांच्यात मात्र आई-वडील 24 तास डोक्याला हात लावून बसले आहेत.

●

## ८) लैंगिक शिक्षणाची अविवाहितांसाठी कार्यशाळा

**शोभा :** या तरुणपणीच्या काळातल्या स्त्री-पुरुष सहवासाच्या गरजेसाठी विवाह अभ्यास मंडळ हा सर्वांत चांगला पर्याय आहे कारण भेटणाऱ्या मुलांचा आणि मुलींचा खरेपणा कसा तपासायचा हा सर्वांत जटिल प्रश्न बनलेला आहे. साध्या साध्या अलैंगिक प्रश्नांबद्दल मुलं-मुली खरं बोलतील का नाही हा प्रश्न असतो तर लैंगिक आवडी-निवडी, त्यातलं ज्ञान-अज्ञान हे कसं बोलतील? विकृतीचा जन्म अज्ञानातच असतो. लैंगिक शिक्षण या एका विषयासाठी गटासमोर बोलणंच सर्वांत उपयोगी आहे असं आम्हाला दोघांना वाटतं.

लग्नापूर्वी स्वतःच्याच लैंगिकतेसंबंधी काही माहिती नसते हे मान्यच करावं लागतं. अनुभवच नसला तर स्वतःच्या लैंगिक संबंधाबद्दलच्या आवडीनिवडी कशा माहिती असणार? त्यामुळे काही गोष्टी लग्नाआधी तपासण्याजोग्या आणि बाकी आधी न तपासण्याजोग्या म्हणजेच जुगार हे मान्य करावंच लागतं. स्त्री-शरीराची पुरुषाची कल्पना आणि त्या विशिष्ट स्त्रीची पुरुषाच्या शरीराविषयीची कल्पना लग्नानंतर जुळली तर छान आहे, पण न जुळण्याची शक्यता मान्यच करावी लागते.

लैंगिक संबंधामधे पुरुषाच्या दृष्टीनी ती क्रिया जास्त शारीरिक असते आणि स्त्रीच्या दृष्टीनी जास्त मानसिक असते. स्त्रीनी त्यातल्या शारीरिक भागाचा जास्त विचार करण्याची गरज आहे आणि पुरुषानी त्यातल्या मानसिक भागाचा जास्त विचार करायला हवा.

शाळेतल्या लैंगिक शिक्षणात नाही आणि कुठेच नाही, एवढ्या खोलवरचा विचार बोललाच जात नाही. त्यामुळे शेवटी मुलांपर्यंत ती गोष्ट विकृत स्वरूपात पोहोचते. एक सगळ्यांनी लक्षात ठेवण्याजोगं महत्त्वाचं वाक्य आहे ते सुधारून पुन्हा सांगते, 'सेक्स इज बिटवीन टू लेग्ज अँड टू इअर्स'. ही गोष्ट समजण्यात पुरुष-स्त्री दोघांचाही सहभाग हवाच.

माझं स्वतःचं मत असं बनलेलं आहे की, काहीतरी चित्रं, अक्षरं टीशर्टच्या, कुडत्याच्या छातीवर छापलेले कपडे मुलींनी टाळावेत. या विकृत

पुरुषांच्या देशात राजरोसपणे चित्रं बघण्यासाठी, अक्षरं वाचण्यासाठी बायकांच्या छातीकडे बघण्याची संधी आपणहून पुरुषांना देऊ नये. या सगळ्या गोष्टींबद्दल जीवनसाथच्या कार्यशाळेत चर्चा होतात.

●

*लैंगिक संबंधामधे पुरुषाच्या दृष्टीनी ती क्रिया जास्त शारीरिक असते आणि स्त्रीच्या दृष्टीनी जास्त मानसिक असते. स्त्रीनी त्यातल्या शारीरिक भागाचा जास्त विचार करण्याची गरज आहे आणि पुरुषानी त्यातल्या मानसिक भागाचा जास्त विचार करायला हवा.*

# 9) चुकीच्या गोष्टीची शक्यता– रेव्ह पार्टी

**अनिल :** अशा सगळ्या 'इरॉटिक स्ट्रेस'मधे काही मुलं-मुली मित्रमैत्रिणींच्या संगतीमुळे 'डिस्को क्लब्ज'मधे जाऊन पोहोचतात आणि त्याच्या पुढची पायरी काही काळानी 'रेव्ह पार्टी' असते. मुळात रेव्ह याचा इंग्लिश शब्दार्थ फक्त खूप आनंदात असणं किंवा मजा करणं एवढाच आहे. रेव्ह पार्टी ही गोष्ट जास्त गंभीर समजायचं कारण तो कायद्यानी गुन्हा ठरतो. 18 वर्षांनंतर खासगी जागेत दारू पिणं हा गुन्हा नाही, पण अमली पदार्थांचं सेवन, वाटप, विक्री या सर्व प्रकारांवर कायद्यानी बंदी आहे. दुर्दैवानी भारतातली रेव्ह पार्टी अंमली पदार्थांची आणि अनिर्बंध लैंगिक संबंधांची असते. चेहरा लपवलेल्या तरुण-तरुणींचे रेव्ह पार्टीतले फोटो वर्तमानपत्रात बघितले की बहुतेकांना वाटतं आपल्या मुलांचं असं काही नाही हे बरं आहे. खरी गोष्ट अशी आहे की, ती केव्हा त्यात सापडतील हे सांगता येत नाही.

या सगळ्याची सुरुवात कुठून होते ते पण मला माहितीय. माझ्या कॉलेजच्या दिवसांत आमच्या वर्गातल्या मुलींशी ओळखी असायच्या, पण त्यापुढे अगदी क्वचितच एखादीचं पाऊल पडायचं. नंतरच्या पिढीत 'फ्रेंडशिप मागणं' हा प्रकार चालू झाला. त्याची सुरुवात संयमित पद्धतीनी झाली पण पुढे 'फ्रेंडशिप' प्रकरण आक्रमक बनायला लागलं. फ्रेंडशिप नाकारली तर 'रॅगिंग' चालू झालं. मुलामुलींच्या निराळ्या शाळा असतात, तशी मुलींची निराळी कॉलेजेस्, विद्यापीठं अशा गोष्टी समाजातल्या पुरुषांच्या विकृतीकडे थेट बोट दाखवणाऱ्या आहेत.

**शोभा :** 'फ्रेंडशिप' प्रकरणाबद्दल काही मुली मला सांगत होत्या की, लैंगिक संबंधांना नकार देणारी मुलगी मुलांना चालत नाही. तिची संगत ते सोडतात किंवा बळजबरी करतात. बळजबरी म्हणजे 'गँगरेप' नाही. तिला दारू पिण्याचा आग्रह करून कुठेतरी न्यायचं. दारूच्या नशेत हातून नकळत घडलं असं तिला पण नंतर म्हणता येतं आणि मुलालाही म्हणता येतं.

मुलींनी लक्षात ठेवण्याजोग्या काही गोष्टी आहेत. कायम 'पब्लिक प्लेस'मधे भेटायचं. 'लॉज'वर नाही. निवांत जागा चालेल पण एकांत नको. बसल्यावर

दोघांच्या मधे टेबल असेल अशी काळजी घ्यावी. मुलं खुबीनी हात लावतात आणि मुलगी विरोध करते का, कसा करते हे तपासतात. त्यानंतर पुढचे डावपेच आखतात. आणखी एक गोष्ट म्हणजे 'सोल्जर्स काँट्रिब्यूशन'चा आग्रह धरायचा. कायम स्वतःच्या खाण्यापिण्याचे पैसे स्वतः द्यायचे म्हणजे नंतर मिंधेपणा येत नाही. मित्राच्या पैशानी खाणंपिणं ही सुरुवातीला गंमत वाटते. नंतर मुलगा त्याची 'वसुली' करतो तेव्हा नाही म्हणणं शक्य होत नाही.

●

## 10) प्रेमभंग आणि लग्नापूर्वी लैंगिक संबंध

**अनिल :** जरा निराळा विषय विषय वाटेल पण तसं नाहीय. माझे माझ्या तरुणपणात एकूण 4 वेळा प्रेमभंग झाले. त्या त्या वेळेला वाईट वाटलंच, पण मला स्त्रीच्या मनाविषयी जे काही शिकायला मिळालं ते शोभाशी वागताना उपयोगी पडलं. त्या शिक्षणासाठी तरी मला असं वाटतं की प्रत्येकाची 3-4 प्रेमप्रकरणं, 3-4 प्रेमभंग होण्यात खूप फायदे आहेत. एक अडचण मात्र खरी आहे. भंग होण्यासाठी मुळात प्रेम तर जुळायला हवं!

बरेचसे प्रेमभंग हे प्रेम नसलेले किंवा एकतर्फीच असतात. मुलगा-मुलगी दोघांनी एकमेकांना खरोखर शब्दांत प्रेम आहे असं स्पष्ट म्हटलं असलं तरच ते प्रेम समजायला सुरुवात करायची, नाहीतर शक्यता पडताळून बघणं या पलीकडे त्याला अर्थ नसतो.

अतिसुंदर मुलीवर तिच्या नकळत केलेलं प्रेम हे एकतर्फी प्रेमच असतं. सिनेमा नट्यांवर प्रेम करणारे मुलगे, नटांवर प्रेम करणाऱ्या मुली यांना प्रेमप्रकरण मानायचंच कारण नाही. ते केवळ स्वप्नरंजन असतं. हे सगळं लक्षात घेतलं तर खरी प्रेमप्रकरणंच मुळात अगदी कमी असतात, त्यामुळे प्रेमभंगही कमी असतात.

**शोभा :** याखेरीज एक स्वतंत्र प्रकरण असतं ते म्हणजे लग्नाचं आमिष. वर्तमानपत्रामधे या स्वरूपाच्या अनेक बातम्या आपण वाचतो. ज्या मुलीचं लग्न जमत नसतं, घरच्यांना तिचं ओझं झालं असल्यासारखं वातावरण असतं, त्या मुलीच्या मानसिक परिस्थितीची आपण कल्पना करू शकतो. लैंगिक संबंधाच्या जाळ्यात सावज पकडण्याचा प्रयत्न करणाऱ्या मुलीही असतात आणि मुलगेही असतात. याबद्दल आमचं दोघांचं मत असं आहे की लग्नापूर्वी लैंगिक संबंध ठेवू नयेत. पण ही दोघांची खाजगी गोष्ट इतर कोणी तपासू शकत नाही.

**अनिल :** खुद्द जीवनसाथमधे मी असा प्रकार बघितला आहे. तो मुलगा आणि मुलगी माझ्याकडे व्यक्तिगत समुपदेशनाला येत होती. दोघांचे लैंगिक संबंध होते, पण मुलगा लग्नाला तयार नव्हता आणि मुलगी अधिकृत विवाहाच्या नोंदणीसाठी आग्रह धरत होती. दोन-तीन वर्षं हे असं चाललं आणि त्यानंतर

त्यांनी नोंदणी विवाह केला. एक मात्र खरं. त्या मुलीला या मुलाला जाळ्यात ओढणं जमेल असं मला वाटत नव्हतं. माझा अंदाज खोटा ठरला.

या दोघांच्या पत्रव्यवहाराच्या प्रती माझ्याकडे असायच्या. त्यातल्या 'लव्ह' आणि 'मेक लव्ह' या शब्दांवरून आठवलं, इंग्रजीतल्यासारखा शब्द मराठीत नाही वापरता येत. 'प्रेम' बसणं आणि 'प्रेम करणं' यात फार फरक नाही, तशी 'मेक लव्ह'ची गोष्ट पूर्ण निराळी. त्याला मेक शब्दाबरोबर लैंगिक हा अर्थ चिकटतो.

इंग्रजीतल्या 'एंजॉय' एक शब्दाची गंमत सांगतो, एका कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या एक प्रसिद्ध विद्वान बाई होत्या. त्यांची ओळख एका पुरुष कार्यकर्त्यांनी करून दिली आणि शेवटी म्हणाला, 'नाऊ लेट अस एंजॉय हर', एकानी दुरुस्तीचा प्रयत्न केला. तो म्हणाला, 'यू मीन वी विल एंजॉय हर स्पीच', त्यावर पहिला म्हणाला, 'यस वी विल एंजॉय हर व्हेरी मच.'

●

## 11) लग्नापूर्वी लैंगिक संबंधाबद्दल वैयक्तिक समुपदेशन

**अनिल :** समुपदेशनाच्या अनुभवातला एका विशिष्ट व्यक्तीचा विशिष्ट प्रश्न सांगतो. घरच्यांच्या आग्रहामुळे एक मुलगा लग्नासाठी मुली बघायला लागला, पण सारखा मुली नाकारायला लागला. घरचे लोक मग त्याला आग्रहानी जीवनसाथमधे घेऊन आले. एक-दोन भेटींनंतर त्यानी मोकळेपणानी सांगितलं की त्याला लग्नाची भीती वाटते. त्यामुळे प्रत्येक मुलीला तो नकार देतो, प्रत्यक्षात त्याला न्यूनगंड आहे.

अशी भीती वाटण्याची दोन कारणं होती, कॉलेजमधे मित्रांबरोबर लैंगिक जीवनाबाबत भडक चर्चा व्हायच्या. अश्लील साहित्य वाचनात आलं. लैंगिक चित्रपट पाहणं आणि त्यातल्या नायकाशी स्वतःची तुलना करण्यानी स्वतःच्या लैंगिक इंद्रियाबाबत काही चुकीचे विचार मनात घर करून राहिले. मग कॉलेजमधे शिकत असताना एका मुलीवर प्रेम केलं; परंतु तिच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. ते प्रकरण तिथेच थांबेल असं वाटलं. परंतु गावामधे दुसऱ्या एका मुलीबरोबर प्रेमाचे संबंध आले म्हटल्यावर त्या मुलीनी भांडण केलं, त्याचा अपमान केला. त्याच्या मनात स्वतःच्या लैंगिक इंद्रियाबाबतची कमतरतेची भावना अधिक पक्की झाली. जीवनसाथमधे येण्यापूर्वी त्यानी वैद्यकीय सल्लाही घेतला होता. डॉक्टरांनी बारकाईनी शारीरिक तपासणी करूनही त्यांना कोणताही दोष आढळला नव्हता. तो विवाहासाठी सक्षम आहे, असा त्यांनी दिलासाही दिला. तरीसुद्धा त्याला अधूनमधून लग्नाची भीती वाटायची.

जीवनसाथमधे वैयक्तिक समुपदेशनाबरोबर मिश्रगट चर्चा असतातच. त्यामुळे मित्रमैत्रिणींचा चांगला कंपू जमतो. त्यांच्यापैकी काही लोक अशाच अनुभवांतून गेलेले निघाले. हळूहळू तो मुलगा 4-6 महिन्यांत न्यूनगंडातून मोकळा झाला, खुलला आणि त्याचा प्रश्न सुटला.

●

# 12) परदेशातली परिस्थिती

**अनिल :** आम्ही परदेशात स्थायिक होतो हे आपलं बोलणं पूर्वी झालेलंच आहे. मी आधी काही वर्षं इंग्लंडमधे आणि मग यू.एस.ए.मधे लग्नापूर्वी एकटा होतो. त्यानंतर यू.एस.ए.मधेच शोभानी आणि मी लग्न करून तिथेच काही वर्षं संसार केला. आमच्या लग्नापूर्वीची परिस्थिती मी तुम्हाला मोकळेपणानी सांगतो.

इंग्लंड काय, यू.एस.ए. काय, सगळ्या पाश्चात्त्य जगात शनिवार-रविवारी कामाला सुटी असते. सोमवार ते शुक्रवार मात्र खूप काम असायचं. भारतात असताना त्या काळातल्या सगळ्या अविवाहित मुलांची विकृत मनःस्थिती मी तुम्हाला सांगितली. इंग्लंडमधे गेल्यावर त्या परिस्थितीत फारसा बदल नव्हता. आम्हा सर्व मित्रमंडळींच्या डोक्यात 'गोऱ्या मुली' हा एकच विचार असायचा आणि शनिवार-रविवारी एकत्र जमून सतत त्याचविषयी बोलणं व्हायचं. भरपूर थापा, बढाया यांना ऊत यायचा.

आपला मुलगा विलायतेत शिक्षण, नोकरी यासाठी जातो तेव्हा तिथे नेमकी काय परिस्थिती असते याची आई-वडलांना काही कल्पना नसल्यामुळे 'मुलगा परदेशात' या कल्पनेच्या आनंदात कॉलर ताठ करून ते भारतात वावरतात. बरेच वेळा तिथे गेल्यावर पैशाचे प्रश्न असतात. आसपास सगळीकडे गोऱ्या मुली वावरत असून, स्वतः 'कोरडं' राहण्याचा ताण असतो. याखेरीज सांस्कृतिक फरक. गोऱ्या लोकांच्या तुलनेत सावळं किंवा काळं रूप आणि त्याचा न्यूनगंड याचा खूप त्रास होतो. आई-वडलांना सगळं छान चाललंय असं कळवावंच लागतं. अशावेळी लैंगिक अतृप्तीचा ताण कमी करण्याचा सर्वांत सोपा मार्ग म्हणजे हस्तमैथुन असतो.

**शोभा :** मी अनिलशी लग्न करण्यासाठी फिलाडेल्फिया – यू.एस.ए. मधे गेले याविषयी आपण आधीच बोललो आहोत. अनिल दिवसभर त्याच्या कामावर आणि मी माझ्या कामावर जात असे. सकाळी आम्ही बरोबर निघायचो आणि संध्याकाळी ठराविक ठिकाणी भेटून बरोबर घरी यायचो. मी एकटीनी कुठे बाहेर जायचा प्रसंग अगदी क्वचित, पण यायचा. बाहेर जे गोरे अमेरिकन पुरुष दिसायचे त्यांच्यापैकी काही जवळपास राहात असल्यामुळे पुन्हा पुन्हा दिसायचे.

एक-दोघांनी मला निरनिराळ्या वेळी रस्त्यात भेटून माझ्यामधे रस दाखवला आणि 'पुन्हा भेटायचं का? आर यू इंटरेस्टेड?' असं विचारलं. अमेरिकन पुरुषांची ही गोष्ट मला फार विशेष वाटली. नाही सांगितल्यावर ते अगदी शांतपणे नकार मान्य करतात. मागे लागणं, अचकट-विचकट बोलणं, एकतर्फी प्रेमामुळे चाकूनी भोसकणं, हे प्रकार तिथे नाहीत. जीवनसाथमधे मी आणि अनिल 'नकार शांतपणी मान्य करणं' या विषयावर मुला-मुलींशी बरंच बोलतो.

पाश्चात्त्यांच्या सगळ्या पद्धतीच निराळ्या आहेत. सर्वांत महत्त्वाचा फरक म्हणजे योनीशुचितेची कल्पना. लग्न करताना भारतीय मुलीनी यापूर्वी कुणाशीही लैंगिक संबंध ठेवलेले असता कामा नयेत अशी कल्पना, अपेक्षा आणि रूढी आहे. विलायतेत याच्या बरोबर उलट परिस्थिती असते. लग्न होताना मुलगी कुमारिका म्हणजे 'व्हर्जिन' असणं ही गोष्ट त्यांना अमान्य आहे. तिला लैंगिक संभोगाचा अनुभव हवाच अशी कल्पना, अपेक्षा आणि रूढी आहे. मुलग्याचंही तसंच.

**अनिल :** अमेरिकेत, इंग्लंड, कॅनडा आणि इतर पाश्चात्त्य देशांत 13-14 वर्षांपासून मुलगे-मुली 'डेटिंग' करतात हे तुम्हाला ऐकून नक्कीच माहिती असेल. 13 वर्षांपासून पुढे डेटिंगची पुढची पायरीदेखील काही मुलं-मुली गाठतात. मिठी, चुंबन, 'फाँडलिंग'म्हणजे मुलीच्या छातीला मुलानी कपडे न काढता हात लावणं, मुलीच्या आणि मुलाच्या पायामधे गुप्त भागाला कपडे न काढता हातानी कुरवाळणं, चोळणं अशा पुढच्या पायऱ्या केव्हा गाठतात हे स्वभाव, घरून मिळणारं स्वातंत्र्य आणि एकांताची संधी यांवर अवलंबून असतं.

प्रत्येक मुलाकडे आणि मुलीकडे कार असते. भारतासारखी स्कूटर विलायतेत कोणी वापरत नाहीत. कारमधल्या मागच्या सीटवर लैंगिक संभोग ही अगदी सहज घडणारी गोष्ट असते. आई-वडलांपासून निराळं होऊन स्वतंत्र फ्लॅटमधे राहणाऱ्यांची संख्या खूप असते. त्यामुळे घरात खोलीमधे शांतपणी लैंगिक संबंध ठेवणं यामधे विशेष काही समजलं जात नाही.

खरी पंचाईत गोऱ्या देशात वाढलेल्या सावळ्या मुलाची किंवा मुलीची असते. जास्तीतजास्त प्रमाणात गोरे लोक, त्या खालोखाल काळे, त्या खालोखाल पिवळे (म्हणजे चिनी, फिलिपीनो, कोरियन वगैरे मंगोलियन वंशाचे लोक) आणि सर्वांत कमी सावळे अशी परिस्थिती असते. जोडीदार शोधणं कठीण असतं. लैंगिक संबंधासाठी लोक तयार असतात, पण लग्नासाठी मुलगा मुलगी

मिळणं कठीण जातं. मुलींना मुलांच्या तुलनेत जास्त प्रश्न असतात.

**शोभा :** गोऱ्या, कॉकेशियन मुली भारतात येतात तेव्हा त्यांना येणारे अनुभव हे एक निराळंच प्रकरण आहे. आमची काही गोऱ्या लोकांशी, विशेषतः मुलींशी जास्त ओळख आहे. त्या आमच्या घरी वगैरे येतात तेव्हा काय काय सांगत असतात. ते ऐकताना आपल्या भारतीय पुरुषांची लाज वाटते. भारतीय मुलगे, मध्यमवयीन पुरुषसुद्धा त्यांच्याशी लगट करायचा प्रयत्न करतात, त्यांना न समजणाऱ्या भाषेत एकमेकांशी त्यांच्याबद्दल असभ्य, अश्लील बोलतात, हावभाव करतात. अगदी शरमेनी मान खाली जाते.

●

# 13) लैंगिक संबंधामागची मानसशास्त्रीय बैठक

एक मानसशास्त्रातली माझ्या अभ्यासातली उपयोगी गोष्ट सांगतो. प्रथम माझा वैयक्तिक दृष्टिकोन सांगतो. मला खूप दागिन्यांनी नटलेल्या स्त्रीपेक्षा, नवीन नवीन ठिकठिकाणी अंग उघडं टाकून फॅशन म्हणून नखरेल पोषाख केलेल्या स्त्रीपेक्षा उत्तम आरोग्य असलेली, प्रमाणबद्ध शरीरयष्टीची, साधा पण कायम नीटनेटका चेहरा ठेवणारी, दागिन्यांशिवाय वावरणारी स्त्री जास्त सुंदर दिसते. हे मी म्हणतोय ते 'ट्रॅडिशनल', 'ओल्ड फॅशन्ड' आहे असं बहुतेक जण म्हणतील याची मला कल्पना आहे. मूळ मुद्दा निराळाच आहे. पुरुष जे जे करतो ते सर्व स्त्रियांना आकर्षित करण्यासाठी. स्त्रियांना अमुक गोष्ट आवडते असं चार लोक म्हणतात म्हणून तो म्हणतो. प्रत्यक्ष मुलींकडून त्याला सूचना मिळत नाहीत ही अडचण असते. समजा, मुलींना काय आवडतं याचा विचारांचा एक्सरे काढण्याचा काही मार्ग असता तर याचं खरं उत्तर मिळालं असतं. पुरुषांना त्याची गरज असते. प्रत्यक्षात तसा काही मार्ग नसल्यामुळे स्वतःच्या आयुष्यात आसपास असलेल्या निवडक स्त्रियांना काय आवडत असेल याचा अंदाजच करावा लागतो. त्या कल्पनेप्रमाणे पुरुष, म्हणजे मुख्यतः तरुण पुरुष दिसण्याचा प्रयत्न करतात.

अगदी हीच परिस्थिती मुलींची, स्त्रियांची असते पण उलटी. स्त्रियांना वाटतं की नटणं, कपड्यांच्या फॅशन्स करणं आणि दागिने घालणं ही गोष्ट पुरुषांना आवडते. पुरुषांच्या डोक्याचा एक्स-रे उपलब्ध नसल्यामुळे कल्पना करण्याखेरीज काही हातात नसतं. काय सांगावं, कदाचित मला वाटतं तसं अनेक पुरुषांना वाटतही असेल. पुढची गंमत अशी की, स्त्री नटते, दागिने घालते ती पुरुषजातीला खूष करण्यासाठी असं पुरुषांना वाटतं आणि तो पुरुष म्हणजे मीच अशी त्याची समजूत होते. 'समाजात बलात्काराचं प्रमाण वाढलं आहे, त्याचं कारण स्त्रीचा मादक पोषाख', हे विधान तुम्ही ऐकलं असेल. मी त्याच्याशी सहमत नाही. मुळात दुसऱ्याच्या भावनांविषयीची बेपर्वाई वाढली आहे, लैंगिक शिक्षण कमी पडतंय हे त्याचं कारण आहे असं मला वाटतं.

●●●

# 14

# लैंगिक शिक्षण–
# जोडीदाराच्या निवडीनंतर पण लग्नाआधी

## 1) द्विधा मनस्थितीचे परिणाम

**अनिल :** तुम्हाला ऐकताना खूप आश्चर्य वाटेल पण अनेकांचा साखरपुडा झालेला असतो, लग्नाची तारीख ठरलेली असते आणि तरी मुलाच्या किंवा मुलीच्या मनातली लग्न करावं का नाही ही द्विधा स्थिती संपलेली नसते. आपण पूर्वीच बोललो की, ही शंका वाटणं रास्त आहे, पण ही त्यासाठी योग्य वेळ नाही. शंका असली तर लग्नाची तारीख पुढे ढकलावी. लग्न करण्याच्या निर्णयासंबंधी समुपदेशनाला जावं, पण लग्न करताना स्वतःला पूर्ण पटून निर्णय झालेला हवा.

आपल्याला रामदास-स्वामींचं इतिहासातलं उदाहरण माहीत आहे. ते लग्नाच्या मंडपातून पळून गेले, पुढे फार मोठे तत्त्वचिंतक बनले हे मान्य, पण ज्या मुलीशी ते लग्न करणार होते, तिची काय चूक होती की तिच्यावर एवढा मोठा अन्याय व्हावा? तुलनेनी बघितलं तर विवेकानंदांनी योग्य वेळी अविवाहित राहण्याचा निर्णय घेतला, नि ते खूप मोठे तत्त्वज्ञानी बनले. आपण रामदास किंवा विवेकानंद आहोत का नाही हा निर्णय ज्याला त्यालाच आणि योग्य वेळी घ्यायला हवा.

लग्न म्हणजे दुसऱ्या भिन्नलिंगी व्यक्तीशी जबाबदारीनी वागण्याचं बंधन आलं. इंग्लिशमधला 'इंटरकोर्स' शब्द खूप अर्थपूर्ण आहे. त्याचा अर्थ 'कोर्स बिटवीन टू'. त्याला लैंगिक अर्थ नंतरच्या इंग्लिशमधे चिकटला आणि तो रूढ

झाला. स्त्री आणि पुरुष याच खऱ्या मानवाच्या जाती. त्या दोन जातींच्या दोन व्यक्तींमधला 'कोर्स' म्हणजे संबंध. अनेकांच्या बाबतीत लैंगिक कोर्सपेक्षा अलैंगिक कोर्स जास्त काळजीचा असतो. द्विधा मनस्थिती असा प्रश्न ज्यांना पडतो त्यांच्यासाठी जीवनसाथमधे 'लग्न कशासाठी' या विषयावर मधूनमधून कार्यशाळा असते. नक्की उपयोग होतो आणि द्विधा परिस्थिती संपते. तोपर्यंत अशी मुलं-मुली स्वतःचे आणि संबंध कुटुंबाचे खूप हाल करतात.

●

*तुम्हाला ऐकताना खूप आश्चर्य वाटेल पण अनेकांचा साखरपुडा झालेला असतो, लग्नाची तारीख ठरलेली असते आणि तरी मुलाच्या किंवा मुलीच्या मनातली लग्न करावं का नाही ही द्विधा स्थिती संपलेली नसते. द्विधा मनस्थिती असा प्रश्न ज्यांना पडतो त्यांच्यासाठी जीवनसाथमधे 'लग्न कशासाठी' या विषयावर मधूनमधून कार्यशाळा असते. नक्की उपयोग होतो आणि द्विधा परिस्थिती संपते.*

## 2) वैद्यकीय तपासणी

भारतीय समाजात आपण ज्या व्यक्तीशी लग्न करणार त्या जोडीदाराचं लैंगिक व्यक्तिमत्त्व आपल्याला कळणं आणि आपलं त्याला कळणं ही गोष्ट महत्त्वाची असली तरी शक्य नाही. एकच गोष्ट शक्य आहे ती म्हणजे वैद्यकीय तपासणी.

जोडीदार कोण हा निर्णय पक्का झाल्यावर जाहीर साखरपुडा करायचा का नाही हा लग्न ठरवणाऱ्यांचा प्रश्न आहे; पण साखरपुडा किंवा तत्सम काहीतरी करून एकमेकांशी लग्न करण्याचं पक्कं करण्यापूर्वी भावी पति-पत्नींनी आणखी एक गोष्ट करणं फार जरुरीचं आहे, ती म्हणजे वैद्यकीय तपासणी. रक्तगट बहुधा काहीतरी निमित्तानी पूर्वीपासूनच माहीत असतो; पण लैंगिक तपासणी यापूर्वी करण्याचा प्रसंगच आलेला नसतो. ती अवश्य करून घ्यावी. समजा, त्यात काही उपाय करण्याजोगी गोष्ट आढळलीच तर तो उपाय, औषधयोजना, मानसोपचार, अवश्य करून घेऊन मगच लग्न पक्कं करावं. त्वचेचे रोग, छातीचे रोग इ. गोष्टींचं तरुणपणी मुळात प्रमाणच कमी असतं, पण डॉक्टरकडून तपासणी करून घेताना असं काही असलं तर त्यांच्या लक्षात येतं. डॉक्टरांना आपल्या सवयी, अडचणी मोकळेपणानी सांगाव्यात. यासाठी मुलांनी पुरुष डॉक्टरकडे आणि मुलींनी स्त्री डॉक्टरकडे जावं हे सगळ्यात सोपं.

लग्नापूर्वी मुलगा मुलगी अनेक विषयांवर बोलतात. बोलण्याजोगं, ठरवण्याजोगं खूप असतं. अशा सगळ्या मुद्द्यांचा विचार वेळेमुळे शक्य नसला, तरी त्यात 'प्रायॉरिटीज' ठरवून घेऊन मुद्दे बोलावेत म्हणजे काही गोष्टी चुकून राहिल्या तरी एवढं बिघडत नाही. वैद्यकीय तपासणी हा मुद्दा सर्वांत महत्त्वाच्या मुद्द्यांपैकी एक आहे पण वैद्यकीय तपासणीमधे एक प्रश्न बरेच वेळा असू शकतो, तो म्हणजे पुरुषी अहंकार. समाजात असलेल्या पुरुषी अहंकाराची आपल्याला कल्पना आहे. मुली अशा वैद्यकीय तपासणीला सहज तयार होतात आणि मुलगे तयार नसतात. नवरा आणि बायको या दोघांची गरज खरी म्हणजे सारखीच असते, ती म्हणजे 'सेक्शुअली नॉर्मल' जोडीदार. मग तपासणीला नकार कसा असू शकतो? माणसाला होणाऱ्या अनेक आजारांपैकी थोडे सोडले तर बरेच आजार प्रयत्नानी

बरे होण्याजोगे असतात, कारण वैद्यकीय क्षेत्रात या विषयावर फार झपाट्यानी जगभर काम चालू आहे. पूर्वी क्षयासारख्या भयंकर रोगांवर औषधं नव्हती, पण आता आहेत. काही आजारांवर नियंत्रण ठेवता येतं इतपत प्रगती झाली आहे.

संपूर्ण वैद्यकीय प्रगतीला न जुमानणारे दोनच मोठे शत्रू शिल्लक आहेत. 'कॅन्सर' आणि 'एड्स'. त्यातल्या कॅन्सरचं कारणच माहीत नसल्यामुळे त्याकडे बघण्याचा दृष्टिकोन निराळा असतो. एड्स मुख्यतः लैंगिक शरीरसंबंधांतून होत असल्यामुळे त्याबद्दलचा एकूण विषय फार 'सेन्सिटिव्ह' असतो. त्याखेरीज तो शरीरात लपलेला असल्यामुळे खूप बिघडलेल्या अवस्थेत गेल्याशिवाय कोणाला कळत नाही, ही अडचण असते.

ही झाली नुसती वैद्यकीय माहिती. मुख्य मुद्दा असा आहे, की तुमच्या जोडीदाराला एड्स असलेला तुम्हाला चालेल का? याचं उत्तर 'नाही' असेल तर त्याची तपासणी करायला नको का? सरळ प्रश्न विचारला तरी त्याचं 'एड्स नाही' हे उत्तर खरं आहे असं कसं धरून चालणार? हा मुद्दा महत्त्वाचा असला तर त्याचं उत्तर रक्ततपासणी हेच आहे. संपूर्ण वैद्यकीय तपासणी केली की त्यात एड्सची तपासणी करायचीच हे डॉक्टरांना माहीत असतं आणि तरी शिवाय तसं स्पष्ट सांगावं. त्या तपासणीतून इतर काही निघालं तरी ते औषधांनी दुरुस्त होण्याजोगं असतं. त्यामुळे या तपासणीचे फायदेच फायदे आहेत असं मला वाटतं. समाधानी-सुखी वैवाहिक आयुष्य हे ज्यांना महत्त्वाचं वाटतं, त्यांनी हा आग्रह आपणहून धरायला पाहिजे. नाही तर व्हा जुगाराला तयार!

**शोभा :** अनिलनी आणि मी 1970 साली म्हणजे 45 वर्षांपूर्वी लग्न केलं. त्या काळात मी तर स्वप्नाळू, कविकल्पनांच्यात जगणारी, अशी असल्यामुळे मला वैद्यकीय तपासणी हा विचार सुचणं शक्यच नव्हतं. पण अनिलला तो सुचला कसा नाही याचं मला आश्चर्य वाटतं. त्यानी पत्रामधून मला गर्भप्रतिबंधक साधनांविषयी माहिती काढायला सांगितलं होतं आणि डॉक्टरी तपासणी करून मी त्याप्रमाणे गोळ्या चालू पण केल्या होत्या.

**अनिल :** शोभा म्हणते ते खरं आहे. मला माझ्याविषयी खात्री होती, शोभाच्या संस्कारांविषयी खात्री होती, पण तेवढं पुरत नाही असं आज मला आग्रहपूर्वक म्हणायचं आहे. पण तेव्हा हा मुद्दा मी पत्रचर्चेत काढला नाही हे चूकच आहे. आमच्या काळी 'एड्स' नव्हता. गुप्तरोग माहिती होते. कॅन्सरचं प्रमाणही तेव्हा कमी होतं, आणि तरीही नीट विचार केला तर मी तो आग्रह

धरायला हवाच होता. कारण असं आहे की, वैद्यकीय तपासणीशिवाय लग्न हा त्या काळी लाखात एक एवढ्याच प्रमाणात धोका होता. उदाहरण द्यायचं झालं तर गाडी चालवताना अर्धं मिनिट डोळे मिटून गाडी चालवली तर समोर कोणीतरी येण्याची शक्यता लाखात एकच असते. म्हणून आपण अर्धं मिनिट डोळे मिटून गाडी चालवायला तयार आहोत का?

**शोभा :** अनिल म्हणतो तो आधीचा मुद्दाही मला खूप महत्त्वाचा वाटतो. लग्नाच्या पहिल्याच रात्री केलेल्या पहिल्या शारीरिक संबंधामुळे गर्भ राहू शकतो हा विचार दोघांनी केलाच पाहिजे. तसं व्हायला नको असलं तर लग्नाआधी नवराबायकोनी पहिलं मूल केव्हा हवं याची चर्चा आणि एकमतानी निर्णय घेतलेलाच हवा. लगेच मूल नको असंच नवरा-बायकोंनी ठरवावं अशी माझी शिफारस आहे. दोघांचं एकमेकांशी नीट जुळतं याची खात्री झाल्याशिवाय मूल अजिबात व्हायला नको. मूल झाल्यावर किंवा दिवस गेल्यावर एकमेकांशी पटत नाही असं कळणं हे मुलाच्या किंवा नवराबायकोंच्या दृष्टीनी फारच दुर्दैवी आहे. लगेच मूल नको असं ठरलं तर गर्भप्रतिबंधक साधनांची माहिती, सल्ला, निर्णय आणि अंमलबजावणी ताबडतोबच व्हावी लागते. चर्चेअभावी, हे सगळं होऊच शकलं नाही तर मुलानी निदान कंडोम जवळ ठेवावा.

नेमक्या मधुचंद्राच्या दिवसांत मुलीची पाळी येण्याची शक्यता वाटली, तर डॉक्टरांच्या सल्ल्यानी पाळी पुढे ढकलण्यासाठी गोळ्या जरूर घ्याव्यात. परस्पर मनानी गोळ्या घेणं मात्र अजिबात म्हणजे अजिबात योग्य नाही. पाळी अनियमित असली, तर डॉक्टरचा वेळेवर सल्ला आणि जवळ ठेवलेल्या गोळ्या यांना इलाज नाही.

**अनिल :** यापेक्षा स्पष्ट विचार केला तर असंही म्हणता येईल की औषधांच्या सहाय्यानी पाळी पुढे-मागे करण्यापेक्षा सरळ चार दिवसांनी पहिला लैंगिक संभोग करावा. त्या विशिष्ट दिवसाला अवास्तव महत्त्व द्यायचं काहीच कारण नाही. ज्या नवऱ्याला तेवढा 4 दिवसांचा संयम नसेल तो वेडाच म्हणायला हवा.

**शोभा :** लैंगिक संबंधाच्या इतिहासात संततिनियमनाच्या साधनांचा शोध लागण्यापूर्वी आणि नंतर असे सरळसरळ दोन भाग होतात. त्या साधनांमुळे एकदम सगळी क्रांतीच झाली. पूर्वी बाईची परिस्थिती अशी असायची की पुन्हा पुन्हा बाळंतपणं, डझनावारी मुलं हा प्रकार अनेक स्त्रियांना असह्य व्हायचा.

एवढ्या बाळंतपणांच्या तुलनेत नवरा दुसऱ्या बाईकडे गेलेला परवडला अशी परिस्थिती असायची. पाळी गेलेली एखादी विधवा बाई घरात असायची. तिच्याशी लैंगिक संबंध असायचे. तिचं वय जास्त असल्यानी काहीच बिघडायचं नाही. बायको गंर्भार असताना मेव्हणीबरोबर लैंगिक संबंधाचीही पद्धत रूढ होती. फार चर्चा न करता लोकांनी अनेक मार्ग त्या काळात शोधले होते.

**अनिल :** लग्नाआधी वैद्यकीय तपासणीचं आणखीन एक महत्त्वाचं कारण आहे. सर्वसाधारण स्त्रीच्या मनावर असा संस्कार झालेला असतो की तिनी काही करायचं नसतं. जे काही करायचं ते पुरुषानी करायचं असतं. याउलट पुरुषाला आपली मर्दानगी पहिल्या रात्री सिद्ध करण्याचा ताण असतो. वैद्यकीय तपासणीत सगळं ठीकठाक आहे असं मुलगा-मुलगी दोघांना कळलं असलं तर पहिल्या रात्री काही सिद्ध करण्याचा ताण राहणार नाही. आपण नॉर्मल आहोत हे दोघांना आधी कळण्याचा हा एक फायदा तर सगळ्यांना पटायला हरकत नसावी.

इंटरनेटवर सगळ्या गोष्टींची माहिती मिळते असा पक्का समज अनेक तरुण-तरुणींचा असतो. ते खरं आहे पण काही अर्थानी अपुरं आहे. शाळांच्या पाठ्यपुस्तकात सगळे धडे छापलेले असतात. मग शाळेत शिक्षकांनी तेच सगळं पुन्हा कशाला शिकवायचं? खरं म्हणजे कितवीतल्या विद्यार्थ्याला काय शिकवायचं हे पक्कं करण्यासाठी शाळा. त्याखेरीज व्यक्ती समोरासमोर आल्यानी प्रश्नोत्तरं होऊ शकतात. यासारखंच लैंगिक शिक्षणाचं आहे. छोट्या गटात लोक बसलेले. अनुभवी ज्ञानी माणूस समोर हजर आणि प्रश्नोत्तरं चालू. अशा चर्चांची आणि इंटरनेटच्या माहितीची तुलनाही होऊ शकत नाही.

याच्या पुढची पायरी असू शकते, पण ती जगात कुठेही शक्य नाही, कारण कायद्याचं त्यावर बंधन आहे. अशा पायरीचं वर्णन 'थ्री सायरन्स' नावाच्या आयर्व्हिंग वॉलेसच्या कादंबरीत आहे. त्या काल्पनिक बेटावरच्या रिवाजाप्रमाणे एक स्त्री आणि एक पुरुष विद्यार्थ्यांना वर्गात प्रत्यक्ष लैंगिक संभोग करून दाखवतात असं मांडलेलं आहे.

आणखी एक गोष्ट सगळ्या मुलामुलींना माहिती हवी. वैद्यकीय तपासणीत ही गोष्ट कोणालाही कळणं शक्य नाही. ती म्हणजे प्रत्यक्ष संभोग न करता नुसती मजा. त्याला इंग्लिशमधे 'ऑलमोस्ट' असं म्हणतात. त्याचं इंग्रजीतलं वर्णन 'ऑलमोस्ट इंटरकोर्स' असं असतं, आणि असे प्रयोग केलेल्या मुलीला किंवा मुलाला 'ऑलमोस्ट व्हर्जिन' म्हणतात. हे ऑलमोस्ट प्रकरण पाश्चात्त्य देशात

जास्त आणि भारतात कमी असतं, पण असतं हे नक्की. विशेषतः वसतिगृहात हे प्रकार सर्वांत जास्त चालतात. स्त्रीपुरुषाच्या लैंगिक संभोगात स्त्रीच्या योनीत पुरुषानी ताठलेलं लिंग घालणं आणि हलवणं असा साधा आणि तेवढाच अर्थ असतो. ह्यात आनंद असतो, पण गर्भही राहू शकतो. त्यामुळे तेवढा आनंद आणि गर्भ राहण्याची शक्यता या गोष्टी वगळून बाकी संपूर्ण शरीराचा वापर करणं असा 'ऑलमोस्ट'चा अर्थ आहे.

पुरुषाचं लिंग तोंडात घेणं ही गोष्ट स्त्री करू शकते तशीच पुरुषही करू शकतो. स्त्रीची योनी चोखणं ही गोष्ट पुरुष करू शकतो तशीच स्त्रीही करू शकते. त्याशिवाय स्त्रीचे स्तन, नितंब, पुरुषाचं वृषण असे आनंद देणारे-घेणारे अवयव अंगभर असतात. ते चाटणं, चोखणं, दाबणं, संपूर्ण नागड्या शरीरावरून हात फिरवणं अशा क्रिया प्रत्यक्ष संभोगाव्यतिरिक्त काही तासही करता येतात. मुख्य म्हणजे 'ऑलमोस्ट'चा वापर करणारे समलिंगी आकर्षण असणारे म्हणजे 'होमोसेक्शुअल' किंवा 'लेस्बियन' असतातच असं नाही. जोडीदार सापडून प्रत्यक्ष लग्नाला जसा गेल्या काही वर्षांत उशीर व्हायला लागला तसं 'ऑलमोस्ट'चं प्रमाण वाढत गेलं.

**शोभा :** आपण आत्तापर्यंत बोललेलं सगळं पटलं तर तुम्हाला हे जाणून घेण्याची इच्छा असेल की नेमकी वैद्यकीय तपासणी कशाकशाची असते? मी आणि अनिल यांनी ही माहिती डॉक्टर्स मित्रमंडळींना विचारून तयार केली आहे.

वैद्यकीय तपासणी कशाकशाची करायला हवी याची निरोगी मुलग्यांच्या तपासणीची यादी अशी असते,

1) रक्त – आर.एच. गट, ताम्रपेशी, श्वेतपेशी, लिपिड प्रोफाईल, क्रिॲटिनिन व्हीडीआरएएल (गुप्तरोग नसल्याच्या खात्रीसाठी) एलिसा टेस्ट (एड्स नसल्याच्या खात्रीसाठी) थॅलेसेमिया आणि हिमोफिलियाच्या तपासण्या. 2) लघवी आणि शौच तपासणी, 3) छातीचा एक्सरे, 4) ईसीजी, 5) रक्तदाब, 6) पुरुषाच्या वीर्याची तपासणी. मूल होऊ शकेल की नाही यासाठी.

स्त्रीची वैद्यकीय तपासणी अशी असते. 1) रक्तगट, 2) एच.आय.व्ही साठीची रक्त तपासणी 3) प्रत्यक्ष शारीरिक तपासणी आणि प्रश्नोत्तरांवरून पाळीचा त्रास होतो किंवा नाही 4) सोनोग्राफी – गर्भाशयात सिस्ट किंवा फायब्राइडस् नाहीत ना, यासाठी 5) मूल होण्यात काही अडचण दिसते का नाही.

मला वाटतं की, एच.आय.व्ही. टेस्ट पॉझिटिव्ह असली, म्हणजेच एड्स झालेला असला तर लग्न टाळावं. बाकीच्या गोष्टी आहेत अशी माहिती कळली तरी त्या एवढ्या गंभीर नाहीत. एक तर त्यांच्यावर इलाज आहेत आणि त्याबद्दल नवराबायको दोघांनी होकारात्मक निर्णय घेतला तरी चालू शकतं. डॉक्टर मुलीचं योनीपटलही तपासतात, पण समजा ते आधी फाटलेलं आढळलं तरी तसं सांगण्यापलीकडे काही करण्याची गरज नसते. टॅपून्स वापरल्यानीही ते हायमेन म्हणजेच योनीपटल फाटू शकतं. खेळणाऱ्या मुलींचंही हालचालींमुळे फाटू शकतं.

**अनिल :** डॉक्टरांकडून काढलेल्या माहितीवरून मुलग्याच्या वैद्यकीय तपासणीच्या वेळेला लिंग ताठण्यात काही अडचण नाही याविषयीची प्रश्नोत्तरं आणि जरूर वाटली, तर ‘इरेक्शन टेस्ट.’ एरवी मुलगा हस्तमैथुन करतो असं म्हणाला तर याची गरज नसते. जरा जरी त्याबद्दल डॉक्टरना शंका आली तर प्रत्यक्ष मूठ मारून दाखवायलाही सांगतात. रक्तगट तपासणीत स्त्रीचा रक्तगट आर.एच. निगेटिव्ह असला तर मूल होण्यात अडचणी असू शकतात. पुरुषाचा रक्तगट आरएच निगेटिव्ह असला तर काही फरक पडत नाही.

शक्यतोवर मुलींनी स्त्री डॉक्टरकडे आणि मुलग्यांनी पुरुष डॉक्टरकडे तपासणीसाठी जावं असं का म्हणतात ते या यादीवरून कळेल.

●●●

# 15

# लैंगिक शिक्षण–लग्न झाल्यापासून मूल होईपर्यंतचा काळ

## 1) लग्नानंतरची पहिली रात्र

**अनिल :** लैंगिक शिक्षण या विषयाचे आपण आयुष्यात येणाऱ्या टप्प्याप्रमाणे भाग केले आहेत. त्यातला सर्वांत महत्त्वाचा टप्पा आपण आता गटचर्चेला घेतो आहोत. मघाशी म्हटल्याप्रमाणे संततिनियमनाची कसलीही व्यवस्था न करता नवरा-बायकोनी पहिल्या रात्री शारीरिक संबंध केला तर निसर्गाच्या करामतीमुळे पहिल्याच रात्री गर्भ राहिला असं होऊ शकतं. असंच नेमकं झाल्यामुळे लग्नाच्या दिवसापासून मोजून नऊ महिन्यांनी मूल झाल्याचीही उदाहरणं आहेत. बरोबर दुसरं टोक पण दिसतं. आधी 'इतक्यात मूल नको' म्हणत अनेक वर्षं थांबायचं आणि त्यानंतर 'मूल होत नाही' म्हणून निराश व्हायचं अशीही उदाहरणं आहेत. लग्नानंतर 10-12 च काय, 15-20 वर्षांनी मूल झाल्याचीही उदाहरणं आहेत.

आमच्या एका मित्राबरोबर राहात असलेले गृहस्थ आम्हाला त्याचे आजोबा वाटले होते ते त्याचे वडील निघाले. सांगण्याचा मुद्दा असा की, हा टप्पा लग्नाच्या रात्रीपासून पहिलं मूल होईपर्यंतचा आपण घेतला आहे, त्याची वयाची किंवा काळाची व्याख्या आपण करू शकत नाही. मुलाचा जन्म झाल्यासरशी आयुष्यच सगळं बदलून जातं. विशेषतः स्त्रीचं. पुरुषाचं बदलेल की नाही हे त्याच्या पालकत्वाच्या जाणिवेवर अवलंबून असतं.

**शोभा :** मी मगाशी सांगितलंच की आम्ही, मी आणि अनिलनी त्यावेळी

पुरेसा विचार केला नव्हता काही बाबतींत. पण त्यानी पत्रातून मला कळवलेला संततिनियमनाचा विचार खूप महत्त्वाचा आहे. गर्भ राहिलाच तर तो स्त्रीच्या पोटात वाढणार आहे आणि अडकणार ती स्त्रीच. चुकून नवऱ्याशी पटत नाही असं आढळलं तर पंचाईत होणार ती तिचीच. त्यामुळे स्वतः पुढाकार घेऊन संततिनियमनाची व्यवस्था तिनीच आधीपासून करायला पाहिजे.

जेली ही गोष्ट एवढ्या खात्रीची नसते. डायफ्राम सुरक्षित असतो, डॉक्टरांकडून तो बसवून घ्यावा लागतो. पण काही स्त्रियांना तो सहन होत नाही. तांबी ऊर्फ 'कॉपर टी' ची तीच गोष्ट. काहींना त्याचा त्रास होऊ शकतो. गर्भनिरोधक गोळ्यांइतकं सोपं आणि खात्रीशीर काही नाही असं म्हणतात, पण गोळ्यांशी सुद्धा न जमल्यामुळे त्रास झाल्याची उदाहरणं आहेतच. शेवटी उरतात दोन पद्धती. एक– 'सेफ पीरिअड' पद्धत. यामधे दिवसांचं गणित नीट करावं लागतं, कारण विशिष्ट दिवसांतच समागम केला तर ती पद्धत चालते. उरलेल्या दिवसांचं काय, याचं उत्तर यात मिळतच नाही, आणि शेवटची सोपी पद्धत म्हणजे कंडोम. तो चांगल्या दर्जाचा नसला तरी पंचाईत होऊ शकते. कंडोम मात्र पुरुषानीच वापरावा लागतो.

याखेरीज निराळी पद्धत नसल्यामुळे यांपैकीच काहीतरी शोधावं लागतं. योग्य आणि स्वतःला सोयीची पद्धत शोधून काढायला जो अवधी लागतो तो हाताशी नसला की धोक्याची शक्यता असतेच. माझ्या मते ही सगळी माहिती मुलीनी मुलाला सांगितली पाहिजे आणि त्याच्याकडे कंडोम नसण्याची शक्यता लक्षात घेऊन स्वतःकडे कंडोम ठेवले पाहिजेत. पंचाईत झालीच तर ती मुलीची जास्त होणार असते.

**अनिल :** बहुतेक वेळा एकाच दिवशी लग्नसमारंभ असतो नि त्याच रात्री हनीमूनलाही जायचं असतं. या दोन्ही गोष्टींबद्दल निराळ्या पद्धतीनी विचार करायची माझ्या मते फार गरज आहे.

काही विचार न करता 'असं असं करायचं असतं'च्या निरर्थक रूढी अनेक आहेत, पण त्या यादीतल्या दोन रुढींच्या निरर्थकतेबद्दल मी आत्ता बोलतोय. लग्नसमारंभ, त्यातले धार्मिक विधी आणि त्यानंतरचं 'रिसेप्शन' हे पूर्ण निरर्थक आहे. तशीच 'हनीमून' ही गोष्ट तेवढीच निरर्थक आहे. लग्नसमारंभाविषयी आपण पुढे सविस्तर बोलणार आहोत त्यामुळे इथे याहून जास्त काही सांगत नाही. हनीमून निरर्थक हा मुद्दाही लोकांना पटतो, पण तो हनीमूनवरून परत

आल्यावर. त्यासंबंधी मला आणखी असं वाटतं की, त्याचा आणि स्त्रीपुरुष समानतेचा खूप संबंध आहे. हनीमून करायचा पण तो मुलीच्या स्वतःच्या पैशानी असं म्हटलं तर निम्मे हनीमून रद्द होतील, थोडक्यात होतील, त्याच गावी होतील. केवळ मुलीकडच्या पैशानी हनीमूनला जायची पद्धत असते म्हणून एवढे खर्चिक हनीमून होतात. काही कुटुंबांमधे मुलाची बाजू हनीमूनचा खर्च करते. यातली कुठलीही गोष्ट असली तरी ती असमानताच असते.

हे सत्य लक्षात घेतलं तर मधुचंद्रासाठी एवढा आटापिटा तर्कबुद्धीला पटतच नाही. अनेक निरर्थक रुढींसारखी 'हनीमून' ही कल्पना समाजाच्या मनात घर करून बसली आहे. खरा चांगला समृद्ध लैंगिक संभोग पहिल्या रात्री तर होतच नाही, एका महिन्यानी, सहा महिन्यांनी झाला तर नशीब समजायचं. शरीरानी आणि मनानी पूर्ण स्वस्थ झाल्यावर ताणविरहित अवस्थेत लैंगिक संभोग ही चांगल्या संभोगाची व्याख्या पक्की केली तर हनीमून किती निरर्थक असतो हे पटेल.

मध्यमवर्गीयांच्यात नवीन लग्न झालेल्यांसाठी स्वतंत्र झोपायची खोली बहुधा असते, पण समजा नसली तर त्याच गावातल्या एखाद्या हॉटेलमधे खोली घ्यावी आणि तिथे 4-5 दिवस राहावं. दिवसा फिरताना कोणी ओळखीचं भेटेल हा लोकांचा आक्षेप मला माहिती आहे, पण त्यात मला काही हरकत दिसत नाही. नवराबायकोनी दिवसरात्र बरोबर काढण्याची कल्पनाही मला चुकीची वाटते. दिवसा सरळ आपापल्या कामावर हजर राहावं, आपोआप चिंतन होतं आणि त्यानंतर हॉटेलवर एकत्र भेटावं. 24 तास सारखं एकमेकांबरोबर राहिल्यानी एकमेकांची लवकर माहिती होते ही पण गैरसमजूत आहे. नवरा-बायको असले म्हणून काय झालं, दोन माणसांची ओळख नीट व्हायला बराच काळ जावा लागतो, बरेच चांगले-वाईट प्रसंग घडावे लागतात. या कल्पनेत कामावरून रजा पण फारशी घ्यावी लागणार नाही.

**शोभा :** आणखी एक सामाजिक पातळीवरचा प्रश्न आणि 'लग्नानंतरची पहिली रात्र' यांचा मला संबंध दिसतो. शारीरिक संबंधासाठी शरीराची जी सुदृढता लागते ती मुलींजवळ कमी असते असं मला वाटतं. भारतीय परंपरेप्रमाणे घरकाम हाच स्त्रीचा व्यायाम. तिथपासून आपला समाज इथपर्यंत पोहोचला आहे की 5% मुली व्यायाम, खेळ, ट्रेकिंग, पोहणं, धावणं यांपैकी काहीतरी करतात. बाकीच्या मुलींच्यात आणि खरं म्हणजे मुलांच्यात देखील चांगल्या शारीरिक संभोगासाठी लागणारी ताकद आणि चिवटपणा नसतो. एखादी वयस्कर व्यक्ती

थकावी तसे दोघंही थोड्याशा श्रमानी थकून जातात.

एक महत्त्वाची दुसरी गोष्ट मुलींना माहिती हवी नाहीतर उगीच चिंता वाटते. समोरच्या नवऱ्याच्या लिंगाचा आकार कल्पनेपेक्षा मोठा असला तरी धास्ती वाटते की स्वतःच्या योनीत ते कसं मावणार, आणि आकार फार छोटा असला तर शंका वाटते की हा अवयव एवढासा असला तर आपलं समाधान होईल का? या दोन्ही शंका अनाठायी असतात. कारण स्त्रीच्या योनीची रचना अशी असते की ती मोठ्या किंवा छोट्या लिंगाप्रमाणे स्वतःचा आकार जुळवून घेते. बरेच वेळा हा प्रश्नच येत नाही कारण स्त्रिया आग्रहानी दिवा बंद करायला लावतात. त्यांना माहिती नसतं की जोडीदाराला डोळ्यानी विवस्त्र बघणं हा संभोगातलाच एक भाग असतो.

कपडे काढण्याच्या बाबतीतही मानसिक क्रियाच महत्त्वाची असते. काहींना झटदिशी स्वतःच कपडे काढून टाकून विवस्त्र होऊन, पलंगावर झोपून जोडीदाराची वाट पाहणं आवडतं. जोडीदारांनी एकमेकांचे कपडे काढण्यातही निराळा आनंद असतो. मुख्य मुद्दा जे जोडीदाराला आवडेल ते करणं हाच असतो.

**अनिल :** लैंगिक अज्ञान ही गोष्ट इतक्या थराला आपल्या समाजात आहे याची कल्पना बहुतेकांना नसते. आईवडील निश्चिंत असतात कारण त्यांना वाटतं की आजकालच्या मुलांना सगळं माहीत असतं.

एक उदाहरण सांगतो, पहिल्या रात्री काय, दुसऱ्या काय, तिसऱ्या रात्री काय, जेव्हा जेव्हा पुरुषाचं वीर्य गळेल किंवा स्त्रीच्या योनीतून वंगणासारखा द्राव बाहेर पडेल त्यानंतर पुरुषाला लिंग आणि स्त्रीला योनी पाण्यानी धुवावी लागते. असं नाही केलं तर त्यातल्या जंतूंच्या संसर्गानी पुरळ येणं, खाज सुटणं, सुजणं, लाल होणं, आग होणं यांपैकी काहीतरी होऊ शकतं. कोणाला काय होईल आणि होईल का नाही हे सांगणं कठीण आहे. चांगल्या हॉटेलमधे 'ॲटॅच्ड टॉयलेट' असते ती त्या धुण्यासाठी. समजा, ॲटॅच्ड टॉयलेट नसली, तर पाणी पिण्यासाठी असं म्हणून पाण्याचं तांब्या-भांडं घेऊन जाण्याची पद्धत आहे. सफाईसाठी पाणी वापरून रुमाल किंवा टॉवेलला पुसण्यासाठी ही तयारी असते. ही साधी गोष्ट माहिती नसल्यामुळे अनेक स्त्रिया आणि अनेक पुरुष इन्फेक्शनमुळे तोंड दाबून बुक्क्यांचा मार सोसतात कारण हे बोलायची सोयच नसते कुणाजवळ.

खूप भारी हॉटेल्समधे 'ॲटॅच्ड प्रायव्हेट स्विमिंग पूल'ही असतो. पाण्यात पोहताना संभोग वगैरे वर्णनं फक्त कादंबऱ्यांच्यात वाचलेली असतात. काही श्रीमंतांच्या घरात बेडरूमला लागून असा तलाव असतो. बांधकाम क्षेत्रात

असल्यामुळे मी खूप श्रीमंतांकडे अशा खास गोष्टी बघितल्या आहेत. वापरलेल्या मात्र नाहीत.

**शोभा :** आणखी एक विनोदी गोष्ट म्हणजे सिनेमात दाखवतात ते दुधाच्या ग्लासचं दृश्य. अगदी जेवण झाल्याझाल्या संभोगाचा प्रयत्न करू नये हे कोणालाही समजण्याजोगं आहे. खरं म्हणजे जेवण झाल्याबरोबर धावू नये, लगेच प्रवासाला निघू नये, व्यायाम, खेळ, नृत्य यांतलं काही करू नये, तसाच संभोगही करू नये. जेवण झाल्यावर पुरेसा वेळ मधे गेल्यावर संभोगापूर्वी सिनेमात दाखवतात तसं ग्लासभर दूध प्यायलं तर जड पोटामुळे थेट झोपून जावं लागेल किंवा दूध उलटून पडेल.

**अनिल :** पहिल्या लैंगिक संभोगाच्या वेळची खरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे बायकोला सोयीचं होईल असं नवऱ्यानी वागण्याचा प्रयत्न करणं आणि नवऱ्याला सोयीचं होईल असं बायकोनी वागण्याचा प्रयत्न करणं. त्यासाठी चांगल्या नव्या-कोऱ्या ताज्या साध्या खोबरेल तेलाचा उपयोग करावा. योनीत लिंग घालणं जमो अथवा न जमो, वेदना तर होणार नाहीत!

**शोभा :** काही महत्त्वाची शारीरिक लैंगिक सत्यं नुसती सामान्यज्ञान म्हणून किमान माहीत हवीत. बायकोच्या योनीतून पहिल्या संभोगाच्या वेळेला रक्त येतंच असं नाही आणि बायकोला वेदना होतातच असं नाही. हे माहिती नसल्यामुळे रक्त न आल्याबद्दल आणि न दुखल्याबद्दल बायकोवर संशय घेणारे आणि रागावणारे नवरे असतात.

आणखी एक फार महत्त्वाची गोष्ट सगळ्यांनी पहिल्या रात्रीसाठी समजून घ्यावी. नवरा-बायकोच्या एरवीच्या संबंधांत ताण आले आणि समुपदेशनाला सुरुवात नाही केली तर संपूर्ण दिनचर्येवर परिणाम होतोच. नवराबायको दोघांनी कायम लक्षात ठेवण्याची गोष्ट म्हणजे कुठच्याही बाबतीत जबरदस्ती, अडवा-अडवी टाळणं. लैंगिक संबंधात बंद दारामागे घडलेल्या चुकीच्या गोष्टी मनाला मोठ्या जखमा करतात. लग्नाला दोन-तीन वर्षं होऊन गेलेली एक मुलगी समुपदेशनाला आली होती. तिचा नवरा लग्नाच्या पहिल्या रात्री तिच्याशी जसा वागला, त्याबद्दलची तिची मनाची जखम अजून भरून आलेली नाही. ती 'थांबा थांबा, मला वेदना होतायत्', असं सांगत होती त्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून नवऱ्यानी तिच्यावर चक्क हल्ला केला. आपलं काम दोन मिनिटात संपवून तो शेजारी लगेच झोपून गेला.

●

## 2) लैंगिक संबंधांबद्दलचं अज्ञान

**अनिल :** मी मानसशास्त्राचा, तत्त्वज्ञानाचा आणि व्यवस्थापनशास्त्राचा अभ्यासक असल्यामुळे मी समुपदेशन करतो. लैंगिक समस्या मार्गदर्शन हा त्यातला कधीकधी समोर येणारा छोटा भाग आहे. मी मागे एका विवाहित जोडप्याबद्दल असं ऐकलं की दोघांनाही वाटत होतं की लग्न झालं की आपण काही न करता दिवस जातात. दोघांपैकी एकाची अशी समजूत असणं नि दुसऱ्यानी मग त्या जोडीदाराला समजावणं याचं प्रमाण बरंच आहे, पण दोघंही असे 'गाढे विद्वान' हा योगायोग म्हणजे कमाल आहे. बहुतेक उदाहरणांच्यात मुलींना पुरेशी माहिती नसते आणि मुलग्यांना तुलनेनी जास्त असते.

**शोभा :** अशीही उदाहरणं क्वचित सापडतात की मुलीला लैंगिक संबंधांबद्दल काही माहिती नव्हती, मुलाला होती, पण मुलीनी पहिल्याच रात्री शारीरिक संबंधाला नकार दिला. मग नवरा सज्जन आणि समजूतदार असल्यामुळे तिला लैंगिक समस्या मार्गदर्शकाकडे नेलं आणि सोनारानी कान टोचल्यावर त्यांचं वैवाहिक जीवन रुळावर आलं.

दुसऱ्या एका उदाहरणात नवऱ्याला माहिती शून्य होती आणि मुलीला हे एवढं माहिती आहे याचा अर्थ ती चालू आहे की काय अशी शंका तो घेत होता. मुलीनी त्याला सांगितलं की इंटरनेटवर ही सगळी माहिती मिळते तेव्हा तो जरा शांत झाला. तिनी पहाटे एक वाजता इंटरनेट सुरू करून सगळी माहिती त्याला वाचायला लावली तेव्हा त्याचं समाधान झालं.

●

## 3) स्त्रीची मासिक पाळी

**शोभा :** ही एक गोष्ट स्पष्ट शब्दांत सगळ्यांना माहिती हवी. क्वचित काही स्त्रियांना मासिक पाळी येतच नाही. अशा बायकांना मूल होऊ शकत नाही. मासिक पाळी हा स्त्रियांना मिळालेला शाप नाही तर वरदान आहे. मासिक पाळीचा स्राव रक्तासारखा दिसतो, कारण त्यात काही प्रमाणात रक्त असतं. काही स्त्रियांना पाळीच्या दिवसांत खूप, मध्यम, कमी त्रास होऊ शकतो. मुख्य गोष्ट म्हणजे तो स्राव विषारी नसतो. पाळीच्या काळात स्त्री-पुरुष संभोग टाळावा असं म्हणतात याचं कारण केवळ स्त्रीला त्रास होऊ नये एवढंच असतं. मासिक पाळीच्या काळात स्त्रीला विश्रांती मिळावी या आणि केवळ या हेतूनी तिनी बाजूला बसण्याचा रिवाज सुरू झाला. त्या प्रकरणातली पारंपरिक अंधश्रद्धा इतकी टोकाची असते की शारीरिक त्रास होणाऱ्या स्त्रीला जास्तीचा मानसिक त्रासही घरचे लोक भोगायला लावतात.

**अनिल :** जे घर स्वतःला आधुनिक म्हणवून घेतं त्यांनी घरातल्या स्त्रीला पाळीच्या दिवसांत विशेष वागणूक जरूर द्यावी, पण ती सकारात्मक तऱ्हेनी. तिला एकटं अंधाऱ्या खोलीत बसवून ठेवण्याऐवजी ज्यात तिला आनंद वाटेल अशा गोष्टी आवर्जून करू द्याव्यात. कुटुंबाबरोबर तिला आराम मिळेल अशी व्यवस्था करावी. तिला कोणी किंवा तिनी कोणाला, कशाला स्पर्श न करण्याचं बंधन मनातून सबंध कुटुंबानी काढून टाकावं.

शक्यतोवर घराबाहेर तिला पडावं लागू नये अशी व्यवस्था करावी. तिनी रोज अंघोळ करायला काहीच हरकत नाही. हलकी बैठी घरकामं तिची इच्छा असली तर तिनी अवश्य करावीत. इतरांनी तिला शक्य तेवढी मदत करावी.

परंपरा नावाखाली हा एक अन्याय स्त्रियांवर घरोघरी चालू असतो. ज्येष्ठ मंडळींनीच काय सगळ्यांनी विवेकनिष्ठ ज्ञानमार्गाची वाट धरली तरच या परिस्थितीत बदल होऊ शकेल. मुळात मासिक पाळी याकडे ‘अशुभ’ म्हणून बघणंच चुकीचं आहे. संपूर्ण कुटुंबाचं संपूर्ण चित्र बघितलं तर ती अत्यंत ‘शुभ’ गोष्ट आहे. कारण मासिक पाळी येते म्हणूनच मुलं होतात.

**शोभा :** आणखी एक विनोदी गोष्ट सिनेमात, टी.व्ही. सीरियल्समधे

दिसते ती सांगते. बायको नवऱ्याला लाजत सांगते की आपल्या घरात आता छोटा पाहुणा येणार आहे, आणि मग नवरा आश्चर्यचकित होतो, आनंदानी उड्या मारतो, बायकोला मिठी मारतो किंवा गाणं म्हणतो. हे सगळं थेट विनोदीच आहे. बायकोला हे कळतं कसं तर पाळी चुकल्यामुळे. एका खोलीत झोपणाऱ्या नवऱ्याला तेवढं कळणार नाही का?

एका खोलीतच काय एका पलंगावर झोपणाऱ्या रोज लैंगिक संभोग करणाऱ्या नवऱ्याला बायकोच्या पाळी चुकण्याबद्दल काही माहिती नाही असं कसं होईल? त्या सिनेमाचे कथालेखक, दिग्दर्शक आणि कलाकारदेखील अशी गोष्ट कशी मान्य करतात?

●

## 4) स्त्री-पुरुषांची मानसिक बैठक

सगळ्या पुरुषांनी सतत लक्षात ठेवण्याची एक गोष्ट आहे. स्त्रियांना सौंदर्य, पोषाख, फॅशन्स, विवाहानंतरचं आयुष्य आणि आई होणं यामधे खरं स्वारस्य असतं. त्यासाठी लैंगिक संबंध आवश्यक असतात म्हणून त्या तो मान्य करत असतात. स्त्रियांना प्रेम, सहवास, स्पर्श, जिव्हाळा यांचं जास्त महत्त्व असतं. निरनिराळे पुरुष, विवाहबाह्य संबंध यात तिला रस नसतो.

पुरुषाची गोष्ट निराळीच असते. त्याला लैंगिक संभोगच महत्त्वाचा वाटतो. 'नग्नता, संभोगातली आसनं, ब्ल्यू फिल्म्स' यांचं आकर्षण वाटतं. या तफावतीचं अचूक वर्णन करणारं एक वचन आहे. ते असं–

**'पुरुष प्रेम करतो कारण त्याला लैंगिक संभोग हवा असतो.**
**स्त्री लैंगिक संभोग करते कारण तिला प्रेम हवं असतं.'**

ज्या नैसर्गिक प्रेरणांमुळे पुरुषाला स्त्रीविषयी आकर्षण वाटतं त्याचं एक महत्त्वाचं कारण म्हणजे पुरुषाला स्त्रीच्या चेहऱ्यावर, त्वचेवर केस नाहीत याचं फार अप्रूप वाटतं. त्याखेरीज स्त्रीचं शरीर मऊ आणि गोलाकार अवयवांचं बनलेलं असतं तेही पुरुषाला मोहवतं.

एक गोष्ट केवळ माहिती म्हणून सांगतो, स्त्री एकामागून एक अशा तऱ्हेनी लागोपाठ पुन्हा पुन्हा संभोग करू शकते. पुरुष तसं करू शकत नाही. या शरीररचनेमुळे एवढ्या प्रमाणावर स्त्री-वेश्या असतात. पुरुष वेश्यांची कार्यपद्धती याच कारणांमुळे निराळी असते.

**अनिल :** 'लग्नाची पहिली रात्र म्हणजे स्वर्गसुख' अशी जवळजवळ सर्व पुरुषांची समजूत असते. प्रत्येकाच्या ओळखीची 5-50 लग्न झालेली जोडपी असतात, पण हे पूर्ण असत्य आहे हे सत्य कोणीच कोणाला सांगत नाही. नवराबायको आधीपासूनचे मित्रमैत्रीण असले तर गोष्ट निराळी, पण तसं नसलं तर दोन अनोळखी किंवा थोड्या ओळखीच्या मुलामुलींनी एकमेकांसमोर कपडे काढायचे हीच फार मोठी भावनिक प्रक्रिया असते. काही क्षणांत शेकडो निरनिराळे विचार आणि भावना त्या दोघांना ओलांडून पार करायच्या असतात.

मुलगे मुलींच्या तुलनेत जास्त निर्लज्ज आणि निगरगट्ट असतात. मुलींना

तर कुणासमोर तरी सगळे कपडे काढायचे या कल्पनेचाच खूप ताण असतो. प्रत्यक्षात दोघांची मनं स्वस्थ असतानाच संभोग घडायला हवा. तसं बहुतेक वेळा न झाल्यामुळे, केवळ मानसिक ताणामुळे मुलीच्या योनीभागात वेदना होतात किंवा मुलाच्या लिंगाला ताठ होण्याची अडचण, शीघ्रपतन किंवा लिंगाचं पुढचं कातडं फाटणं अशा गोष्टी होऊ शकतात. त्यामुळे लक्षात ठेवण्याच्या दोन गोष्टी आहेत. एक म्हणजे कपडे न घालता एकमेकांच्या बरोबर स्वस्थ मनानी वावरता आणि झोपता आल्यावरच संभोग करावा. दुसरी गोष्ट म्हणजे पहिल्या रात्री लैंगिक संभोग घडलाच पाहिजे हा आग्रह सोडून द्यावा. एकमेकांच्या शरीराची आणि मनाची नीट ओळख होईपर्यंत स्वर्गसुख ही गोष्ट अशक्य आहे.

आणखी एक गोष्ट सर्व पुरुषांना समजली पाहिजे की स्त्रीच्या शरीराची आणि मनाची रचना अशी असते की ती उद्दीपित पण सावकाश होते आणि तिचं समाधान व्हायलाही पुरुषापेक्षा जास्त वेळ लागतो. अगदी क्वचित स्त्रीमधे अशी विकृती असू शकते की ती कधीच उद्दीपित होत नाही. म्हणजेच साध्या भाषेत पेटत नाही. अशा विकृतीला 'फ्रिजिडिटी' म्हणतात आणि तरी तिची योनी बहुतेक वेळा चारचौघींसारखी असते. अशा अवस्थेत नवऱ्याला संभोग करायलाच हवा अशी त्याची मानसिक अवस्था असली तर तो संभोग करू शकतो. काहीही विकृती नसलेल्या अनेक स्त्रिया नुसत्या पलंगावर कपडे काढून पडून राहतात. त्यांना असं शिकवलेलं असतं की, आपण काही करायचं नसतं, काय करायचं ते नवऱ्याला माहिती असतं.

त्याशिवाय अनेक स्त्रियांच्या मनावर असे संस्कार झालेले असतात की, लैंगिक संबंध ही नाईलाजानी मान्य करण्याची एक घाणेरडी गोष्ट आहे. अशा भावनेनी संभोगाकडे आणि अर्थात नवऱ्याकडे पाहणारी स्त्री असली तर नवऱ्याला संभोगात समाधान मिळणार नाही आणि अतृप्तीची भावना सबंध संसारात येईल नाही तर काय?

**शोभा :** अन्न, वस्त्र आणि निवारा या अत्यावश्यक गरजा मानल्या गेल्यायत. त्याच्या खालोखालच्या तीन गरजा म्हणजे मैथुन, ज्ञान आणि आत्मसन्मान. माणसाची मनस्थिती आणि पोटाची भूक यांचा थेट संबंध आहे. कडकडून भूक लागली की फक्त खाणं सुचतं तशी कडकडून लैंगिक भूक लागली की होतं. ती भूक शमली की मनस्थिती सुधारते. हे खरं म्हणजे स्त्री आणि पुरुष दोघांनाही लागू आहे, पण संस्कृती आणि परंपरांनी स्त्रीला याचा

विचार, उल्लेख करायला बंदी करून टाकली. त्यामुळे अशी कडकडून लैंगिक भूक भारतात फक्त पुरुषालाच लागू शकते. मग पुढे काय होणार? मानसिक बलात्कार करणारे पुरुष जिकडेतिकडे दिसतात. त्यातले थोडे अविवेकी लोक शारीरिक बलात्कार करणार हेही पुढे ओघानी येतंच.

**अनिल :** कोणाच्या घरी आपण जेवलो तर त्यांचं मीठ खाल्लं असं म्हणून आपण कृतज्ञ असतो. म्हणजेच पोटाची भूक भागवल्याबद्दलची कृतज्ञता सर्वांना समजते, पण लैंगिक भूक भागवल्याबद्दलची कृतज्ञता समजत नाही. जोडीदारांची एकमेकांबद्दलची भावना प्रेमाची, काळजीची, आकर्षणाची, आदराची तशीच कृतज्ञतेचीही असायला पाहिजे. हे लक्षात घेतलं तर वैवाहिक आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलून जाईल.

लग्न झाल्यापासून मूल होईपर्यंतच्या काळातल्या नवराबायकोतल्या लैंगिक संबंधांबद्दल आपण बोलतो आहोत त्यातला शेवटचा मुद्दा सांगतो. मगासपासून आपण बोलतो आहोत त्या पद्धतीनी शारीरिक लैंगिक संबंधापासून आनंद मिळवणं हा एक उद्देश आहेच, त्याशिवाय मूल हा दुसरा उद्देश आहे.

एक विचार असाही एकेकाळी काहींनी मांडला होता की, फक्त मुलं होण्यापुरता लैंगिक संबंध नवराबायकोंनी ठेवावा. आनंदासाठी नाही. मला स्वतःला हा विचार अयोग्य वाटतो. आनंदाचा अनुभव, त्यामुळे झिरपणारं आयुष्यभराचं समाधान हे तर आयुष्याचं प्रमुख इंधन असतं. शिवाय त्यात इतरांना त्रास नाही आणि खर्चही नाही.

तरी देखील शारीरिक संबंध म्हणजे काहीतरी वाईट अशा अपराधी भावनेनी आयुष्य जगलं तर सबंध आयुष्यातलाच आनंद संपतो त्याचं काय?

●

## 5) लैंगिक समस्यांबद्दलचं मिश्रगट समुपदेशन

**अनिल :** अगदी सुरुवातीला आपण म्हणालो तसे नवराबायकोच्या लैंगिक संबंधात किरकोळ प्रश्न असले तर नियमित चालणाऱ्या जीवनसाथच्या पहिल्या रविवारच्या कार्यशाळेमधे चर्चा करून स्वतःच ते सोडवता येतात. शिवाय वैयक्तिक समुपदेशनाला येता येतंच.

लैंगिक शिक्षणाचा विषय वर्षातून एक-दोनदा असतो. कधी एखाद्या व्यक्तीला, जोडप्याला नेमकं तेव्हा त्या कार्यशाळेला येणं जमणार नसलं तर वैयक्तिक समुपदेशनासाठी वेळ ठरवावी लागते.

साधारणपणी जे प्रश्न असतात त्यांचा विचार करून दोन-अडीच तासात प्रश्नोत्तरांसकट विषय संपेल अशी कार्यशाळेची रचना असते.

लैंगिक शारीरिक संबंध ही एकाच वेळी आनंद घेण्याची आणि देण्याची क्रिया आहे. यासंबंधी इतर कोणीच काही म्हणणार नसतं, पण स्त्री आणि पुरुष दोघांवर हे नैतिक बंधन असतं. त्यासाठी उत्तम आरोग्य तर लागतंच, त्याशिवाय काही छोट्या सोप्या गोष्टींची माहिती लागते. भारतीय पुरुषांच्या मनात आपल्या स्वतःचं लिंग इतरांच्या मानानी पुरेसं लांब आहे का नाही याबद्दल किंचित शंका असते. त्या शंकेच्या निरसनासाठी फक्त एवढ्या माहितीची गरज आहे. सरासरी भारतीय पुरुषाचं ताठलेलं लिंग सरासरी 4 ते 6 इंच असतं. त्या सरासरीत आपण बसत असलो तर काळजीचं काही कारण नाही. पुरुषांच्या सार्वजनिक मुताऱ्यांमधे चिकटवलेल्या जाहिरातीतही रस घेण्याचं कारण नाही आणि मुतारीमधल्या कडाप्पा डिव्हायडरवरून शेजारी डोकावून बघण्याची इच्छा होणार नाही. मुख्य म्हणजे बायकोबरोबर असताना न्यूनगंड वाटणार नाही.

दुसरी शंका पुरुषांच्या मनात अशी असते की आपला संभोग जितका वेळ चालतो तो वेळ सरासरीच्या मानानी अगदी कमी तर नसेल? याचं स्पष्ट उत्तर असं आहे, कमीतकमी 1 मिनिट आणि जास्तीतजास्त 7 मिनिटं, सरासरी 2 मिनिटं संभोग चालतो असं धरावं. तेवढं जमत असेल तर काळजी सोडावी. मन जेवढं शांत आणि स्वस्थ तेवढं चांगलं असतं.

संभोगानंतर नवरा-बायको दोघांनाही थोडा थकवा येतो. हा केवळ शारीरिक

थकवा असतो आणि तोही तात्पुरता असतो. पण मनाची अवस्था आनंदी असते कारण संभोगानी मन तृप्त झालेलं असतं. अशा अवस्थेतला थकवा अशा प्रकारचा असतो की कुठच्याही ताबडतोबीच्या इतर गरजेसाठी लगेच उठण्यात काही अडचण नसते.

मगाशी आधी उल्लेख केलेल्या गोष्टीविषयी जरा पुन्हा बोलूया. एक प्रश्न पुरुषांच्या मनात असतो, महिन्यातून किती वेळा नवरा-बायकोनी संभोग करणं अपेक्षित आहे? सरासरी काय आहे? याचं उत्तर असं आहे. लग्नानंतरची पहिलं मूल होईपर्यंतची 5 वर्षं नवराबायको मासिक पाळीचे दिवस सोडून रोज संभोग करतात. म्हणजे महिन्याला 25 वेळा. नवराबायको दोघंच स्वतंत्र राहात असले, सुट्ट्या असल्या तर हे प्रमाण महिन्यात 40 वेळापर्यंतही असतं. पहिल्या मुलाचा जन्म झाला की यात बराच फरक व्हायला लागतो. मुलांमुळे वयाच्या चाळिशीपर्यंत हे प्रमाण महिन्यातून 15 पर्यंत खाली येतं. पन्नाशीपर्यंत हे प्रमाण टिकतं आणि त्यानंतर महिन्यातून 7-8 वेळा, आठवड्यातून एकदा असं होत जातं. ही सगळी सरासरीची प्रमाणं कळूनदेखील शेवटी मी तुम्हाला महत्त्वाची गोष्ट सांगतो ती समजून घ्या. नवऱ्याच्या कामेच्छेत आणि बायकोच्या कामेच्छेमधे फरक असू शकतो. त्याच्या कारणामधे शिरायला हवं आहे का नाही यासाठी समुपदेशन आवश्यक असतं. त्याबद्दल भांडायच्या ऐवजी मध्य काढावा लागतो. अगदी चक्क वेळापत्रक ठरवावं लागतं. त्यासाठी तयारी करावी लागते.

**शोभा :** गरवारे बालभवनच्या संचालकाच्या खुर्चीत बसलं की मुलांसंबंधीचे प्रश्न सोडवणं हेच काम असतं. अनेक पालक मुलांचे प्रश्न घेऊन येतात तेव्हा बरेच वेळा असं दिसतं की प्रश्न मुलाचा नसतो, पालकांच्या कौटुंबिक विसंवादाचा असतो आणि त्या विसंवादाचं कारण बरेच वेळा लैंगिक अतृप्ती हे असतं. मी त्यांना कुठल्यातरी समुपदेशकाकडे जायला सांगते. अनिलला भेटा असं कधीही सांगत नाही. अनिल आधीच खूप कामात असतो. लोकांनी स्वतंत्रपणी त्याच्याविषयी बरंच ऐकलेलं असतं. पुण्यातल्या मानसशास्त्रीय समुपदेशकांपैकी तो एक खूप अनुभवी आणि 'बिझी' समुपदेशक आहे. त्याचं वेळापत्रक भरगच्च असतं. अनेक गावांमधून लोक त्याला भेटायला येत असतात. परदेशातूनही फोनवर, स्काइपवर समुपदेशन चालू असतं.

●

## 6) लैंगिक संबंधातल्या अडचणी आणि उपाय

**अनिल :** लग्नाची पहिली रात्र ही खूप चांगली किंवा खूप अडचणींची असू शकते. लग्नाआधी वैद्यकीय तपासणी केली नसली तर या जुगाराची शक्यता नेहमीच धरून चालायला हवी. स्वतः नॉर्मल आहोत असं आत्तापर्यंत सगळ्यांना भासवलेलं असतं. खरं काय ते मुलग्याला कधी कधी माहिती असतं, कधी कधी खरंच माहीत नसतं. जीवनसाथमधे समुपदेशनाला आलेल्यांच्यात दोन-तीन मुलींची अशी परिस्थिती झाली होती. नवऱ्याला माहिती होतं की स्वतःचं लिंग ताठ होत नाही, पण त्यानी ही गोष्ट लपवली होती. कधी कधी हे मुलाच्या आई-वडलांना खरोखरच माहिती नसतं, कधी असतं. अशा परिस्थितीत फसवणुकीचा दावा लावून घटस्फोट मिळतो, भरपाई मिळते हे जरी खरं असलं, तरी मुलीच्या आयुष्याची बरबादीच होते. कित्येक मुलांना शीघ्रपतनाची अडचण पहिल्या रात्री जाणवते. हस्तमैथुनाच्या वेळी हा प्रश्न येत नाही पण मुलगी समोर आली की होतो. ही संपूर्णपणे मानसिक विकृती असते आणि त्यावर इलाज असतो.

अनेक पुरुषांना शीघ्रपतन हा प्रश्न असतो. त्याचं मुख्य कारण घाई, भीती, इतर चिंता, गुप्तता, असं काहीतरी असतं. 'लिंग ताठ आहे तोपर्यंत घाईनी संभोग करावा. एकदा ते सैल झालं की पुढे फजिती', या भीतीपायी घाई होते आणि खरोखरच फजिती होते. शीघ्रपतन या अडचणीवर सोपे उपाय आहेत. प्रश्न फक्त धाडस करून समुपदेशकाला किंवा 'सेक्सॉलॉजिस्ट'ला भेटण्याचा असतो.

शीघ्रपतन हा ज्या पुरुषांचा प्रश्न आहे अशांसाठी साधा, सोपा आपल्या आपण करण्याजोगा इलाज म्हणजे संभोग करताना एक-दोनदा लिंग योनीत घालून झालं की थांबायचं, लिंगाचा पुढचा टोकाचा भाग दोन बोटांनी थोडा दाबायचा, थोडं थांबायचं, लिंगाचा ताठपणा जाईपर्यंत थांबायचं आणि पुन्हा पहिल्यापासून सुरुवात करायची. या प्रकारच्या संभोगात बायकोचं समाधान होत नाही हे खरं आहे, असं वारंवार करण्याची दोघांना कटकट वाटायला लागते. यात बायकोनी नवऱ्याला मदत केली तर मानसिक परिणाम जास्त चांगला होतो.

प्रश्न आहे तो दोघांनी मिळून सोडवायचा प्रयत्न करणं. ही इतकी चांगली उपयोगी गोष्ट आहे की काही काळानी थोडा बदल होत होत शीघ्रपतनाचा संपूर्णपणी मानसिक असलेला प्रश्न बहुतेक वेळेला नाहीसा होतो.

मधुचंद्राच्या वेळी बाहेरगावी जाण्याची पद्धत ज्या कारणांमुळे पडली त्यांपैकी एक कारण असं की, बाहेरगावी अनोळखी ठिकाणी दिवसा किंवा रात्री दिवा लावून संभोग करता येतो. हॉटेलमधे राहिल्यामुळे इतर व्यत्यय अजिबात नसतो. त्यातलं उजेडाचं महत्त्व अशासाठी की नजरेनी नीट बघितल्याशिवाय नवऱ्याला बायकोची योनी सापडत नाही. नवऱ्याचं लिंग हातात घेऊन बायको ते बरोबर योनीत घालून घेऊ शकते, पण बहुतेक मुलींना तेवढा मोकळेपणा तोपर्यंत आलेला नसतो. या सगळ्यासाठी साधी युक्ती म्हणजे योनीत नवऱ्यानी आधी बोट घालून जागा निश्चित करून मग लिंग घालावं. बायकोनी कुल्याखाली एखादी उशी घेतली तर आणखी सोपं जातं, कारण कोन नीट जुळतो.

नवरा, बायको यांनी दोघांनीही पहिल्या संभोगाच्या वेळी लक्षात ठेवण्याची गोष्ट म्हणजे प्रत्येकाचं स्वतंत्र लैंगिक व्यक्तिमत्त्व असतं. एकमेकांच्या लैंगिक व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देण्याची आणि ओळख करून घेण्याची पहिली रात्र म्हणजे फक्त सुरुवात असते. त्यामुळे अजिबात घाई करायची नाही. एकमेकांपासून शिकण्याची ती गोष्ट असते.

पुरुषाचं वीर्य योनीत नीट पडत नसलं किंवा लिंगातून वीर्य बाहेरच आलं नाही तर मुली आपल्याला नवऱ्याला तडकाफडकी नपुंसक, नालायक ठरवतात. वेडंवाकडं बोलतात, ताबडतोब माहेरी फोन लावून आई-वडील, भावंडं यांना तसं सांगतात. क्वचित काही मुली गप्प बसतात. साधारण 15-20 दिवसांच्या प्रेमळ वागणुकीनी हा प्रश्न मिटण्याजोगा असू शकतो. दोघांपैकी कोणालाही काही अडचण वाटली तर एकमेकांनी दुसऱ्याला मदत केली तर प्रश्न मिटतो. याखेरीज काही प्रश्न असला तर मात्र तज्ज्ञाचा सल्ला घ्यायला हवा. तोपर्यंत घाईनी नकारात्मक निर्णय घेऊ नये. नाहीतरी लग्न झालेलं असतं. थोड्या दिवसांनी त्यात फारसा फरक पडणार नसतो.

मागे माझ्याकडे एक तरुण मुलगा आला होता, त्याचं उदाहरण देतो. तो मुलगा नोकरीमुळे निराळ्या गावी राहायचा. तो बायको आणि इतर कुटुंबाला भेटायला सुट्टीच्या दिवशी घरी यायचा. लग्नानंतर काही महिन्यांतच बायको काहीतरी निमित्तानी माहेरी गेली ती परतच आली नाही. या मुलाशी मोकळेपणानी

हळूहळू अनेक विषयांवर बोलणं झालं. त्यानंतर तो एकदा रडायला लागला. त्यानी सांगितलं की दोघांचे लैंगिक संबंध नीट नव्हते. शीघ्रपतनामुळे त्याच्या बायकोचं समाधान व्हायचं नाही. मी केवळ 'सायकॉलॉजिकल काउन्सेलर' आहे. मी शारीरिक तपासणी करू शकत नाही आणि औषधही सांगू शकत नाही. त्या प्रसंगी सर्वांत सोपी गोष्ट होती ती म्हणजे त्याला 'सेक्सॉलॉजिस्ट'कडे पाठवणं. ते केल्यावर सर्व प्रश्न सुटले. मुख्य म्हणजे सुरुवातीला त्यानी बायकोविषयी केलेल्या तक्रारी खऱ्या नव्हत्या असं त्यानी आपणहून सांगितलं. माझं आणि त्या सेक्सॉलॉजिस्टचं व्यवस्थित बोलणं चालू होतं त्यानंतर तो जीवनसाथमधे नियमितपणे यायला लागला. पुढच्या काही महिन्यांत बायकोही दर महिन्याच्या मिश्रगट चर्चांना यायला लागली.

लिंग ताठणं ही गोष्ट भावनांशी म्हणजेच थेट मेंदूशी जोडलेली असल्यामुळे क्वचित असंही होतं की एरवी लिंग ताठण्यात काही अडचण नसते, पण नेमकी मधुचंद्राच्या पहिल्या रात्री ही अडचण येते. अशा परिस्थितीत करण्याची पहिली गोष्ट म्हणजे शांत राहाणं. एकमेकांना वेडंवाकडं काहीही न बोलता इतर मार्गांनी मनाला सुख देणाऱ्या गोष्टींविषयी बोलणं आणि कशाचीही काळजी न करता झोपण्याचा प्रयत्न करणं. अशा प्रसंगात बायकोला ही सगळी माहिती असणं, वागण्याची समज असणं फार आवश्यक आहे. ही गोष्ट अनेकांच्या बाबतीत होऊ शकते हे लक्षात घेऊन दोघांनी काही रात्री फक्त प्रणय म्हणजे 'फोरप्ले'मधे घालवाव्यात. दोघांची मैत्री झाली की हा प्रश्न आपोआप सुटेल.

या प्रणयकाळात वापरण्याची एक सोपी युक्ती म्हणजे लिंगाच्या पुढच्या भागावर बायकोनी बोटांनी थरथर करावी. पुरुषाच्या लिंगाचा सर्वांत संवेदनशील भाग तिथेच असतो. त्याचबरोबर गोट्या चोळाव्यात. या माहितीअभावी खूप अडचण होते. बायकोनी अशा वेळेला सहकार्य करण्याचं प्रमाण एकूण कमीच असतं. अशा अडचणीत संसाराच्या पहिल्या 15 मिनिटांत बायकोनी नवऱ्याला 'नपुंसक' म्हटल्यामुळे पूर्ण खच्चीकरण होऊन संसाराची वाट लागून घटस्फोटापर्यंत प्रकरण पोहोचल्याची खूप उदाहरणं आहेत.

एक स्वतंत्र मुद्दा सांगतो, काही स्त्री-पुरुषांची मूळ प्रवृत्तीच समलिंगी आकर्षणाची असते. अशांनी खरं म्हणजे लग्न करू नये. दुसऱ्या व्यक्तीचा आपल्यामुळे घोटाळा होऊ नये, हे त्या माणसाचं नैतिक कर्तव्य असतं. तरी त्यानी ते घरच्यांना न सांगितल्यामुळे घरच्या सगळ्यांनी त्याला लग्न करायला

लावलेलं असतं.

लग्नाआधी लैंगिक संबंध नाही असं ठरवलं की काही अंशी लग्नाचा जुगार खेळल्यासारखंच असतं ते. समलिंगी हा एक प्रकार झाला. आणखीही 3 प्रकारचे लोक असतात. एक म्हणजे नपुंसक. म्हणजे ज्या पुरुषाच्या लिंगाला ताठरता येऊच शकत नाही असा पुरुष. ज्यांना ‘सरप्राईझ’ हवं असतं त्यांना असं ‘सरप्राईझ’ लग्नाच्या पहिल्या रात्री वाट्याला येऊ शकतं. ही गोष्ट फक्त पुरुषाच्याच बाबतीत घडू शकते. स्त्री नपुंसक असूच शकत नाही. अगदी फार क्वचित एखाद्या मुलीला योनीच नसते. योनीच्या जागी सगळं सपाट असतं. असे लोक आयुष्यभर अविवाहित स्त्री किंवा अविवाहित पुरुष म्हणून एकटे राहतात. चारचौघांसारखं आयुष्य जगतात. काहींना स्त्रीसारखा, अर्धवट योनीसारखा अवयव किंवा अर्धवट लिंगासारखा अवयव असतो. असे लोक पैसेवाले, सुशिक्षित, सुसंस्कृत असले तर कोणाला कळतही नाही आणि खालच्या वर्गातले असले तर हिजडे म्हणून जगतात. नपुंसक आणि वांझ यात फरक आहे. वांझ म्हणजे लिंग ताठ होतं, संभोग होतो पण मूल होत नाही.

आणखी एक निराळाच प्रकार स्त्री-पुरुष दोघांच्यात असू शकतो, तो म्हणजे त्यांना लैंगिक आकर्षणच वाटत नाही. पुरुषाचं लिंग नॉर्मल, स्त्रीची योनी नॉर्मल पण कामेच्छा शून्य. अशी ‘एसेक्शुअल’ माणसंदेखील लग्न करतात, त्यांना मुलं होऊ शकतात, पण ते आकर्षणच न वाटल्यामुळे निरनिराळ्या खोल्यांत झोपले तरी त्यांना काही फरक पडत नाही. त्यांच्या जोडीदारावर मात्र खूप अन्याय होतो.

आधीच्या पिढीत कित्येक स्त्रियांचा अनेक तऱ्हांनी कोंडमारा व्हायचा. नवरा नपुंसक असला तरी त्या काही बोलायच्या नाहीत. वांझ असला तरी गप्प बसायच्या. समलिंगी असला तरी तक्रार करायच्या नाहीत. उभयलिंगी असला तर समाधान मानायच्या. एकूणच लैंगिक संबंधांविषयी कोणाशीच काही बोलण्याची बंदी असल्यामुळे खूप भावनिक कोंडी व्हायची.

फक्त देवळात जाणं समाजमान्य असल्यामुळे अशा बायका नियमित देवळात जायच्या. तिथे पुजारी, बुवा, महाराज हे त्यांच्या प्रश्नावर इलाज करायचे. बुवांकडे स्वतःच्या असण्याचा खरा अर्थ त्या बायकांना समजतो. बुवांना पुरेसं ज्ञान आणि अनुभव असल्यामुळे ते अगदी खुबीनी ‘सर्व्हिस प्रोव्हाइडर’ बनायचे. भारतात असे अनेक नवरे असतात, देवळंही कोपऱ्या-कोपऱ्यावर

असतात. शक्यतोवर कुठच्याही स्त्रीला गर्भ राहू नये अशी काळजी घेतली तरी क्वचित घोटाळा होऊन गर्भ राहायचा. आपल्या बायकोला आपल्यापासून गर्भ राहाणं शक्य नाही हे कळत असून पुरुष गप्प राहायचा कारण चारचौघांत बेअब्रू होण्यापेक्षा बायकोचा हा उद्योग गुपचूप मान्य करणं त्याला सोपं वाटायचं. अशा प्रकारचे प्रश्न आणि त्यावर या प्रकारचे उपाय अगदी राजघराण्यात, संस्थानिकांच्यात, सरदार घराण्यांच्यात राजरोस चालायचे. मोठ्या शेतकरी कुटुंबात असायचे. घराण्याच्या अब्रूला व्यक्तिगत सन्मानापेक्षा जास्त महत्त्व असायचं.

●

## 7) प्रणय म्हणजेच 'फोरप्ले'चं महत्त्व

**अनिल :** एकजात सगळ्या भारतीय नवऱ्यांनी एक गोष्ट समजून घेतली पाहिजे की, या जगात गेली हजारो वर्षं स्त्रियांवर अन्याय झालेला आहे. विशेषतः भारतीय स्त्रिया 'संस्कार' नावाचं भूत सबंध समाजाच्या मानगुटीवर बसल्यामुळे दबलेल्या आहेत. तिला खुलवण्याचं, तिची मनस्थिती सुधारण्यासाठी जे काय करायचं ते आपल्याला पुढाकार घेऊन करायचंय. मगाशी शोभानी जे सांगितलं तसं स्त्रीला उद्दीपित करण्यासाठी नवऱ्याला प्रणयाराधन करावं लागतं हे एकेकाळी भारतीय पुरुषांना माहीत होतं, पण आता ते विसरले आहेत.

प्रत्यक्ष संभोगापूर्वीचं एकमेकांना उद्दीपित करणं म्हणजे प्रणय. म्हणजेच इंग्रजीत 'फोरप्ले'. या प्रणयात संपूर्ण शरीराचा वापर करायचा असतो. संपूर्ण शरीर हे त्यासाठी योग्य आहे. आकर्षण हा मनात भाव असला तर पायापासून डोक्यापर्यंतचा प्रत्येक अवयव म्हणजे लैंगिक भावना निर्माण करणारा अवयवच असतो. असा प्रणयाचा काळ कितीही असू शकतो. कादंबऱ्यांच्यात 'रात्रभर सेक्स' असा उल्लेख असतो, त्याचा अर्थ रात्रभर यौनसंभोग असा नसतो. प्रणयाच्या वेळेसकट त्याचं वर्णन रात्रभर असं असतं. पुरुषाचं लिंग खराखुरा यौनसंभोग एवढा वेळ करूच शकत नाही. या प्रणयात एकत्र अंघोळ असू शकते, एकमेकांना आवडेल अशी वागणूक असू शकते, तेल मालिश असू शकतं. हे पुरुषाला आणि स्त्रीला दोघांना समजण्याची गरज आहे.

नवऱ्यानी अशा वेळेला बायकोला शक्य तेवढी सगळी मदत करावी. तेलमालिश करावं. शिश्निकेवर म्हणजे क्लायटोरिसवर बोटानी थरथर करावी. त्याचा वेग कमी-जास्त करून बघावा. कोणाला कुठे स्पर्श करून, मालिश करून, चोळून, दाब देऊन आनंद वाटेल याला नियम नसतो. ते निरनिराळ्या पद्धतीनी करून बघावं लागतं. जोडीदारानी स्वतःला कशानी आनंद वाटतो हे सांगावं लागतं. त्यासाठी मोकळेपणा लागतो. काही स्त्रियांना त्यांचे स्तन दाबलेले, चोखलेले फार आवडतात. काही पुरुषांना स्त्रीच्या स्तनांशी खेळणं फार आवश्यक असतं, कारण त्यामुळे लिंग चांगलं ताठ होतं. स्तन दाबण्यात पुरुषाला मऊ मांसल स्पर्शाचा आनंद असतोच, पण त्याखेरीज स्त्रीला त्यामुळे

आनंद मिळत असेल, त्यामुळे स्त्री उद्दीपित होत असेल या कल्पनेचा तो आनंद असतो. प्रत्यक्षात स्त्रीला नवऱ्यानी आपले स्तन कुरवाळणं, दाबणं याचा आनंद होतो, पण पुरुषाला तो त्यापेक्षा जास्त असतो.

काही स्त्रियांचे स्तन लहान असतात आणि काहींचे मोठे असतात. स्तन लहान असणाऱ्या स्त्रीला दाबल्यामुळे आनंद मिळतो, पण नवऱ्याला तेवढी मजा येत नाही. या नैसर्गिक शरीराच्या ठेवणीला अजिबात काही इलाज नसतो ही समजूत खरी नाही. शरीराच्या कुठच्याही भागाला मालिशमुळे स्नायूंना थोडा व्यायाम होतो तसंच स्तनमर्दनानी स्त्रीच्या स्तनाचा आकार काही प्रमाणात वाढू शकतो. त्यापेक्षा जास्त खात्रीशीर उपाय म्हणजे स्तनांच्या आसपासच्या स्नायूंचा व्यायाम. त्यासाठी खास व्यायाम शिकवणारेही असतात. शिवाय 'ब्रेस्ट डेव्हलपर' नावाची साधी वस्तू बाजारात मिळते त्याचाही उपयोग होतो.

**शोभा :** याखेरीज सिलिकॉन इंजेक्शन्स घेण्याचाही एक मार्ग असतो. मला स्वतःला वाटतं की त्या मार्गाचा वापर करू नये. आणखीही एक गोष्ट बायका करतात. सतत 'ब्रेस्ट फोम पॅड्स' वापरतात. अंगावर कपडे असताना असा स्तनभार आकर्षक दिसतो हे खरं, पण घरात प्रत्यक्ष प्रणयाच्या वेळी ती पॅड्स काढली की नवरा नाखूष होण्याची शक्यता जास्त असते.

**अनिल :** असाच परिणाम योनीशी खेळण्यानी होतो. काही पुरुषांना स्त्रीनी त्यांच्या गोट्या चोळल्याशिवाय, चोखल्याशिवाय उद्दीपन येत नाही. या सगळ्या गोष्टी करून बघूनच समजतात. 'फ्रेंच किस' किंवा 'फेलॅशियो' म्हणजे स्त्रीनी पुरषाचं लिंग तोंडात घेऊन त्याच्याशी खेळणं. बहुतेक पुरुष यानी फार खूष होतात. जोडीदारानी स्वतःचं शरीरभर चुंबन घेणं, सगळे अवयव चोखणं खूप आनंदाचं असतं. पण ते एकतर्फी असून चालत नाही. स्वतः जोडीदारासाठी त्याच सगळ्या गोष्टी कराव्या लागतात. 'दोघं एकमेकांसाठी' ते करणार हा विश्वास निर्माण होणं महत्त्वाचं असतं. ती खात्री असली की आधी कोणी काय करायचं हा प्रश्न येत नाही. एकानी अमुक केलं तरच दुसरी व्यक्ती तमुक करेल अशी मनातली अट नाहीशी होते.

**शोभा :** स्त्री-पुरुषांच्या शरीराला होणाऱ्या विकारांपैकी काही मुख्यतः शरीराचे असतात आणि त्यांचा मनावर परिणाम होतो. काही मनाचे असतात आणि त्याचा शरीरावर आघात होतो. काहींमधे मन आणि शरीर या दोन्हींवर एकदम परिणाम होतात. कॉम्प्युटरच्या एकविसाव्या शतकाच्या भाषेत मनाला

'सॉफ्टवेअर' आणि शारीरिक लैंगिक अवयवांना 'हार्डवेअर' म्हणतात. जेव्हा एखाद्या जोडप्याचा प्रणय चालू असतो तेव्हा सॉफ्टवेअरचा उपयोग जास्त करायचा असतो आणि हार्डवेअरचा नंतर करायचा असतो. मघाशी आपण म्हणाल्याप्रमाणे प्रणय काही तासच काय काही दिवससुद्धा चालतो. समजा, एखाद्या जोडप्याच्या वेळापत्रकामधे शनिवारी रात्री संभोग करायचा ठरला असला आणि गुरुवारपासूनच त्यांनी एकमेकांशी वागताना शनिवारचा विशिष्ट पद्धतीनी सुखद अनुभव म्हणून उल्लेख केला आणि दोघंही त्यामुळे खूष होऊन शनिवार रात्रीचा विचार करायला लागले तर गुरुवारीच प्रणय चालू होतो.

प्रणय या बाबतीत सर्वसाधारण स्त्री-पुरुष दोघांनाही समज कमी असते असं अनिलला आणि मला वाटतं. त्यातही कमी-जास्त समज ठरवायचीच झाली तर स्त्रीपेक्षा सरासरी पुरुष त्याबाबतीत जास्त ढ असतो. त्याची अनेक सामाजिक, कौटुंबिक, वैयक्तिक कारणं असतात. मुळात भारतीय समाज पुरुषप्रधान आहे. त्याची अनेक रूपं आयुष्यभरात बघायला मिळतात, पण बंद दाराच्या आत लैंगिक संबंधामधेही ती रूपं दिसतच असतात.

स्त्री ही पायातली वहाण असं समजणारा पुरुष असला तर त्याचा परिणाम शारीरिक संबंधांवर होणारच. त्या त्या कुटुंबात स्त्री-पुरुषांवर पैसे मिळवण्यासाठी कमी-जास्त जबाबदाऱ्या आणि त्याचे ताण असतात, इतर नात्यांची दडपणं असतात त्याचाही परिणाम होणारच. एरवी बायकोला कमी लेखणारा पुरुष बायकोकडून चांगल्या लैंगिक संबंधाची कशी अपेक्षा करू शकेल? रात्री 8 वाजता जेवताना भाजीत मीठ कमी म्हणून ताट भिरकावून द्यायचं आणि दोन तासांनी 10 वाजता बायकोकडून स्वर्गसुखाची इच्छा करायची हे कसं जमेल?

**अनिल :** लैंगिक अतृप्तीविषयी जरा सविस्तर बोलूया. मगाशी आपण बोललो त्याप्रमाणे तो प्रश्न क्वचित हार्डवेअरचा आणि बऱ्याच वेळेला सॉफ्टवेअरचा असतो. ते सॉफ्टवेअर दोन मुख्य गोष्टींवर ऑपरेट होतं. चांगली वागणूक आणि चांगलं दिसणं, आकर्षण वाटणं. त्या विशिष्ट नवरा बायकोनी जोडीदाराला आवडेल ती गोष्ट करणं हे महत्त्वाचं. ही महत्त्वाची गोष्ट न समजल्यामुळे सॉफ्टवेअर नीट काम करत नाही. मुळातलं नैसर्गिक रूप, रंग जोडीदारानी खुषीनी मान्य केलेला असतो. पण त्यापुढे आकर्षक दिसण्यासाठी प्रयत्न करणं पूर्णपणी आपल्या हातात असतं.

पूर्वी आपण बोललो आहोत तोच मुद्दा पुन्हा पण निराळ्या संदर्भात पुन्हा

सांगतो. लग्नापूर्वी कशानी आपण भिन्नलिंगी व्यक्तीला चांगले दिसतो हे कोणी सांगतच नाही. आरशात बघून आपण स्वतःच ठरवावं लागतं. लग्नानंतर नवरा-बायकोत तेवढा विश्वास, मैत्री निर्माण झाली तर हे सांगणारी भिन्नलिंगी व्यक्ती रोजच घरात हजर असते. इतर कोणाच्या देखत सांगू नाही, पण खासगीत काय चांगलं दिसतं, काय जास्त चांगलं दिसतं हे सांगणं, एकमेकांचं कौतुक करणं हे सगळं आवश्यक आहे. त्याच्या पुढची पायरी त्यानंतर गाठायची. इतके दिवस स्वतःला जे सर्वांत सुंदर वाटेल ते करुया असा निर्णय व्हायचा. यापुढे स्वतःला आणि जोडीदाराला मिळून जे चांगलं दिसेल तो निर्णय. मतभेद झाला तर चर्चा, मार्ग काढण्याचा प्रयत्न सगळं करायचं आणि तरी एकमत नाही झालं तर स्वतःच्या मनाजोगं करायचं.

काही लोकांची त्वचा नैसर्गिकपणे तेलकट असते, तर काहींची कोरडी. तेलकट चेहेरा वाईटच दिसतो. त्यासाठी एकतर दिवसातून अनेक वेळा चेहरा धुऊन टिपायला हवा किंवा पावडर लावायला हवी. असा कसलाच प्रयत्न न करता आकर्षक दिसणारे 'जातीचे सुंदर' असतात, पण आपण सर्वसामान्य माणसं आहोत त्यामुळे आपल्यात आणि त्यांच्यात फरक आहे हे मान्यच करायला हवं. किमान जोडीदारासमोर चेहेरा कायम नीटनेटका ठेवावा.

माझ्या आणि शोभाच्यामधली एक गोष्ट सांगतो. मला शोभानी केसात फुलं घातलेली खूप आवडायची. तिचे केस तरुणपणी खूप लांब होते. प्रत्यक्षात शोभालाही केसातली फुलं आवडायची. अडचण निराळीच आली. शोभाच्या कामाच्या प्रकारात लांब केस अडचणीचे होते आणि शिवाय केस गळायला लागले. बरीच चर्चा करून काही मार्ग निघाला नाही. केस लहान म्हणजे फुलं बाद होणार हे माहिती असून शोभानी केस कापण्याचा निर्णय घेतला. त्यात काही रागवारागवी नव्हती त्यामुळे घरीच स्टुलावर बसून मी स्वतः तिचा बॉबकट केला. तेव्हा बघायला शोनील-आभा होतेच, शिवाय आमच्या नात्यामधली एक तरुण मुलगीही हजर होती. मी बऱ्यापैकी न्हावीकाम केल्यामुळे ती म्हणाली तिलाही केस कापायचेयत. म्हणून मी तिचेही केस कापले.

सुदृढ आरोग्यपूर्ण शरीर आणि नीटनेटका चेहेरा आणि साधा पोषाख हीच गोष्ट माझ्या सॉफ्टवेअरमधे सुंदर म्हणून 'फीड' केलेली आहे. मला माहिती आहे की, बहुतेक लोक सकाळी उठल्यावर दात घासतात. त्याबद्दल माझं काही म्हणणं नाही. पण पुढे मला सांगायचं की लैंगिक संबंधापूर्वी किंवा त्या आधीच्या

जेवणानंतर पुन्हा एकदा दात घासणं जरूर आहे. जोडीदाराच्या तोंडाला वास येत असला तर 'सॉफ्टवेअर' बिघडतं.

सर्वसामान्यपणे दुसरी व्यक्ती समोर असताना न करण्याच्या गोष्टी वय वाढून 'मॅच्युरिटी' आली की माहिती असतात. जांभई आली तर तोंडावर हात धरायचा, जांभई देतादेता बोलायचं नाही, ढेकर देताना तोंडावर हात धरायचा, इतरांसमोर पादायचं नाही, नाकात बोटं घालायची नाहीत, दात कोरायचे नाहीत, कान कोरायचे नाहीत, थुंकायचं नाही. तोंड उघडं टाकणं, खाताना खूप आवाज करणं, पाणी पिताना चूळ भरत गाल फुगवून पाणी पिणं याही गोष्टी इतरांच्या देखत करायच्या नाहीत. ही सगळी यादी 'मॅनर्स' नावानी सगळ्यांना माहिती असते. पण विवाहित लोक चूक कुठे करतात तर जोडीदाराला गृहीत धरतात आणि त्याच्यासमोर या गोष्टी करायला हरकत नाही असं मानतात. कल्पना बहुधा अशी असते की, फक्त जोडीदारासमोर आपण विवस्त्र होतो म्हणजे इतर लोक आणि जोडीदार यांत फरक करायला हरकत नाही. मला स्वतःला वाटतं की हे सर्व 'मॅनर्स' जोडीदारासमोर पाळावेत नाहीतर सॉफ्टवेअर बिघडतं.

माझ्या मते आणखी एक खूप चुकीची गोष्ट अनेक स्त्री-पुरुष करतात ती म्हणजे जोडीदार लैंगिक संबंधाच्या अपेक्षेनी तयारी करत असताना स्वतः झोपून जाणं. अगदी क्वचित घडणारे अपवाद जोडीदार मान्य करेल. उदाहरणार्थ, अशक्तपणा, आधी नुकतंच झालेलं आजारपण, जागरण वगैरे. पण तेवढे अपवाद सोडले तर एरवी अशा पद्धतीनी झोपून जाणं म्हणजे जोडीदाराचा नकळत केलेला अपमानच ठरतो. त्यानी मनं बिघडतातच. झोपलेलं माणूस छान दिसतं वगैरे कल्पना याबाबतीत खऱ्या नाहीत.

**शोभा :** एक अगदी छोटा मुद्दा मला सगळ्या पुरुषांना उद्देशून सांगायचा आहे. नवरा-बायको दोघंच स्वतंत्र राहात असताना बायको अंघोळीला गेलेली असताना कोणाचा फोन नवऱ्यानी घेतला, विशेषतः पुरुषाचा फोन आला तर 'ती अंघोळीला गेलीय' या शब्दात सांगू नये. भारतीय विकृत पुरुष तिकडे अंघोळीची म्हणजे विवस्त्र स्त्रीची कल्पना करेल. ही कल्पनासुद्धा बायकांना आवडत नाही. त्यामुळे 'आत्ता इथे नाहीय' सांगावं. 'तयार होतेय, आवरतेय' असं काही बोललं तरी व्हायचा तो घोटाळा होतोच. 'पलीकडच्या खोलीत आहे', 'समोर गेलीय' असं काहीही चालेल.

अशा सूक्ष्म बारकाव्यांमधे सगळ्या स्त्रियांची समज पुरुषांपेक्षा जास्त असते असं माझं निरीक्षण आहे. ‘भारतीय स्त्रियांचा पुरुषांच्या विचारांच्या बाबतीतला ‘अँटेना पॉवरफुल’ असतो.

●

*कॉम्प्युटरच्या एकविसाव्या शतकाच्या भाषेत मनाला ‘सॉफ्टवेअर’ आणि शारीरिक लैंगिक अवयवांना ‘हार्डवेअर’ म्हणतात. जेव्हा एखाद्या जोडप्याचा प्रणय चालू असतो तेव्हा सॉफ्टवेअरचा उपयोग जास्त करायचा असतो आणि हार्डवेअरचा नंतर करायचा असतो.*

# 8) लैंगिक संबंधात स्त्रीचं समाधान

**अनिल :** नवरा-बायकोंनी लग्नानंतरच्या पहिल्या रात्री एक काळजी जरूर घ्यावी. संभोगातली कुठचीही क्रिया फार जोर लावून करू नये. आधीचा अनुभव आणि सवय नसल्यामुळे पुरुषाच्या लिंगाला किंवा स्त्रीच्या योनीला इजा होऊ शकते. एवढी काळजी घेऊन तरीही इजा झाली तर 4-5 दिवस संभोग करू नये. तोंडातल्या जखमा जशा लवकर बऱ्या होतात त्याचप्रमाणे गुप्त अंगांच्या जखमा लवकर भरून येतात. बहुतेक वेळा कुठच्याही मलमाची गरज नसते.

स्त्रीच्या समाधीला किंवा समाधानाला इंग्रजीत 'ऑरगॅझम' म्हणतात. पुरुषाच्या लिंगाच्या लांबीवर किंवा जाडीवर स्त्रीचं समाधान अवलंबून नसतं. पुरुषाला हे माहीत नसतं. त्याला वाटतं योनीच्या आत लिंग घातल्यामुळे स्त्रीला आनंद मिळतो. प्रत्यक्षात त्यामुळे फक्त पुरुषाला आनंद होतो. स्त्रीचं समाधान होण्यासाठी पुरुषानी हातानी शिश्निका म्हणजे 'क्लायटोरिस' आणि भगोष्ठ यांना हळूहळू चोळून उत्तेजित करावं लागतं. पुरुषाचं वीर्य योनीत गळलं की पुरुषाच्या दृष्टीनी संभोग संपतो. त्याला थोडा थकवा, काही मिनिटं ग्लानी येते आणि बहुतेक वेळा तो लगेच झोपी जातो. स्त्री मात्र अतृप्त राहाते.

हे सगळं लक्षात घेऊन सर्वांत चांगली पद्धत अशी असावी. प्रथम पुरुषानी स्त्रीबरोबर प्रणय, मग तिचं लैंगिक समाधान आधी करावं. त्यानंतर स्त्रीनी पुरुषाबरोबर संभोग करून त्याचं समाधान करावं. स्त्री आणि पुरुष – दोघांचं समाधान एकाच वेळी ही केवळ कविकल्पना आहे. असं कादंबऱ्यात लिहिलं गेलं तरी ते खरं नाही.

**शोभा :** लैंगिक संबंधातल्या एकाग्रतेच्या बाबतीत स्त्री-पुरुषात फरकच असतो. लिंग ताठलं की पुरुष लगेच एकाग्र होऊ शकतो आणि स्त्रीचं तसं होत नाही. तिचं मन संभोगक्रियेपर्यंत पोचायला आणि एकाग्र व्हायला वेळच जास्त लागतो.

स्त्रीच्या योनीतून चिकट पाण्यासारखा स्राव बाहेर पडतो. तो कमी-जास्त असू शकतो. संभोग सोपा जावा यासाठी ती निसर्गाची योजना आहे. काही स्त्रियांच्या योनीतून असा स्राव येत नाही, किंवा खूप प्रमाणात स्राव बाहेर येतो

असं असू शकतं. त्यावर इतर कुठचीही गोष्ट अवलंबून नसते.

पुरुषाचा संभोग काही मिनिटांत संपतो याचा अर्थ काही मिनिटांत त्याचं वीर्य गळतं. त्या वेळेला पुरुषाला खूप आनंद होतो. पण स्त्रीचं वीर्य गळणं वगैरे काही नसतं. वीर्य गळणं म्हणजे जर पुरुषाची आनंदाची समाधी म्हटलं तर स्त्रीची समाधी लागण्यासाठी योनीच्या वरच्या अंगाला एक बारिक शिश्निका किंवा इंग्रजीत 'क्लायटोरिस' असते तिचं समाधान करून शांत करावं लागतं. एकत्र संभोगाच्या वेळेपेक्षा या समाधीला स्त्रीला जास्त वेळ लागत असल्यामुळे पुरुषाला हाताच्या बोटांचा उपयोग करावा लागतो. या मेहनतीला पुरुष तयार नसतात. कित्येक बायकांना ऑरगॅझम ही कल्पनाच माहिती नसते, अनुभव तर नसतोच. या समाधीमधे विजेचा हलका धक्का बसावा तसा बसतो आणि स्त्री सगळं भान विसरते इतका त्यात आनंद मिळतो.

थोडी सबंध शरीराची थरथर होते आणि लैंगिक तृप्तीमुळे 'आता बास', यापुढे आनंद सहन होत नाही'अशी स्त्रीची अवस्था होते. बोटांऐवजी बाजारात मिळणारा 'बॅटरी ऑपरेटेड व्हायब्रेटर' ही वापरता येतो. पुरुषाच्या आणि स्त्रीच्या ऑरगॅझमला 'क्लायमॅक्स' सुद्धा म्हणतात.

**अनिल :** स्त्रीला ऑरगॅझम येण्यासाठी नेमका कसा, कुठे स्पर्श करायचा, जोर किती लावायचा हे नवरा-बायको दोघांनी मिळून ठरवावं लागतं. अंदाजानी केलेला स्पर्श नेमका दुसऱ्याला हवा तसा असेलच असं नाही. यासाठी दोघांच्यात स्पष्ट शब्दात संवाद लागतो. नवरा-बायको संभोग करताना निव्वळ खोलीचं दार लावून पुरत नाही. दरवाज्याच्या फटीतून आवाज पलीकडे जाऊ नये याची देखील गरज असते ती यासाठी. अशी सगळी व्यवस्था समजा असली तरी मुख्य गोष्ट त्याहून निराळीच असते. नवराबायकोचे भावनिक संबंध विश्वासाचे, मोकळेपणाचे असावे लागतात. दोघांच्यात समजुतीनी काही प्रयोग करून बघावे लागतात. काही योग्य ठरतात, काही फसतात. त्या परिस्थितीत अहंकार, अपमान यांना अजिबात मधे येऊ द्यायचं नसतं.

स्त्रीला ऑरगॅझम यायला किती वेळ लागतो हे प्रत्येक स्त्रीचं निराळं असतं. काही स्त्रियांना दोन मिनिटांत समाधी ऊर्फ ऑरगॅझम मिळतो, काहींना 10 मिनिटं तर काहींना खूप प्रयत्नानंतर 40-45 मिनिटंही लागतात. शिश्निकेवर बोटानी थरथर केली तर उपयोग होऊ शकतो, हे मगाशी आपण बोललोच.

लक्ष केंद्रित करण्याचाही प्रश्न काहींच्यात असू शकतो. कादंबऱ्यांच्यात

वर्णन केलेला ‘दोघांना एकाच वेळेला’ ऑरगॅझम ही गोष्ट क्वचितच एखाद्या जोडप्याला जमते. भारतीय जोडप्यांच्यात ही गोष्ट जवळजवळ अशक्य आहे असं अभ्यासानंतर माझं मत झालं आहे.

नवरा आणि बायको स्वस्थचित असणं, काही शारीरिक दुखणं नसणं, प्रणयासाठी पुरेसा वेळ असणं, एकमेकांना ‘ऑरगॅझम’ म्हणजे समाधीचा अनुभव मिळणं ही गोष्ट रोज घडू शकत नाही. सर्वांत सोपा मार्ग म्हणजे त्याचंही वेळापत्रक ठरवणं. समजा, शनिवार रात्र असं एखाद्या जोडप्याचं वेळापत्रक ठरलं तर कितीतरी गोष्टींची तयारी करायची असते. वेळेवर हलकं जेवण, मुलांना लवकर झोपवण्याच्या योजना, खूप गोष्टी जुळवाव्या लागतात.

क्वचित काही बायकांना कधीच ऑरगॅझम येऊ शकत नाही. याचा अर्थ त्यांना मुलं होत नाहीत असा नसतो. पुरुषाला त्यामुळे काही फरक पडत नाही.

●

## 9) समलिंगी, उभयलिंगी आकर्षण वाटणारे स्त्री-पुरुष

जगात, भारतीय समाजात जवळजवळ पंचाण्णव टक्के लोक स्त्री-पुरुष आकर्षण असलेले म्हणजे भिन्नलिंगी संभोग करणारे आहेत. स्त्री-पुरुष आकर्षण असलेल्या लोकांनीच लग्न करावं अशी आपली शिफारस आणि अपेक्षा आहे. पण प्रत्यक्षात तसं होतंच असं नाही. जो मुलगा किंवा मुलगी समलिंगी संबंध या प्रकारचे असतात, ते तिनी किंवा त्यानी आई-वडलांना सांगितलेलं असतंच असं नाही. तो मुलगा किंवा मुलगी लग्नाची कल्पना पुढे पुढे ढकलतात, मुद्दामहून एकामागून एक स्थळं नाकारतात, पण आई-वडलांना खरी परिस्थिती सांगण्याचा त्यांना धीर होत नाही. यातले काही जण लग्नदेखील करतात, त्यांना मुलं देखील होतात, पण त्यांचं मन जोडीदाराबरोबर रमत नाही. थोडक्यात त्यांच्या संसारात गंमत नसते.

कधीकधी ते कुठच्यातरी टप्प्यावर जोडीदाराला न सांगता बाहेर समलिंगी संबंध ठेवतात, कधीकधी स्पष्ट सांगून बाहेर समलिंगी संबंध ठेवतात, अशा प्रकारच्या अड्ड्यांवर जातात, बरंच काय काय आयुष्यभर चालतं. समलिंगी आकर्षण मनात, पण नवराबायकोचा लैंगिक संसार मधूनमधून चालू अशा लोकांना 'उभयलिंगी' म्हणतात. अशांचंही प्रमाण बऱ्यापैकी आहे. केवळ दुर्दैवानी असा जोडीदार पदरी पडलेले काही लोक माझ्या माहितीत आहेत. जोडीदार निवडीच्या काळात अनेक वेळा निरनिराळ्या विषयांवर बोलण्याचा, 6-8 महिने लग्नापूर्वी जाऊ देण्याचा तोही एक उद्देश असतो.

भावी जोडीदाराच्या मित्रमैत्रिणींशी ओळख होणं, कुटुंबातल्या जवळच्या, दूरच्या नातेवाईकांशी ओळखी, कामावरच्या सहकाऱ्यांशी बोलणं, या सगळ्या प्रक्रियेत असा काहीही लैंगिक घोटाळा असला तर तो नव्याण्णव टक्के या पद्धतीनी बाहेर येतोच. शिवाय वैद्यकीय तपासणी, लग्नापूर्वीच्या विवाह-अभ्यासाच्या कार्यशाळा यातून सुटणारे एक टक्का हुशार लोक असू शकतीलच. पण जुगाराचा अंश एवढ्या माहितीमुळे नक्की कमी होईल.

●

## 10) अविश्वास– जोडीदारावर, समाजावर

**अनिल :** नवराबायकोचे लैंगिक संबंध सुरळित असून देखील दोन प्रश्न त्रासदायक ठरू शकतात.

एक म्हणजे जोडीदाराबद्दल संशय. ज्यांचा स्वतःचा स्वतःवर विश्वास नसतो किंवा स्वतः जोडीदारापासून एखादं-दुसरं प्रकरण लपवून ठेवलेलं असतं त्या व्यक्तीला दुसऱ्याविषयी खात्रीच वाटत नाही. दुसऱ्याचा मोबाईल तपासणं, मुद्दामून आधी न सांगता घरी येणं वगैरे गोष्टी चालू झाल्या की अविश्वास ही गोष्ट आणखी आणखी वाढतच जाते. अशा विषयावर मला अगदी नियमित समुपदेशन करावं लागतं.

दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या आसपासच्या समाजावरचा अविश्वास. नवऱ्यावर बलात्काराची शक्यता जवळजवळ नसतेच, पण आपल्या मनोरुग्ण समाजातला एखादा विकृत पुरुष आपल्या कुठच्याही वयाच्या बायकोवर बलात्कार करू शकेल ही जाणीव खूप त्रासदायक असते. काहीशे वर्षांपूर्वीच्या भारतीय समाजात परकीय आक्रमणं, त्यांची लूटमार, स्त्रियांवरचे अत्याचार असे प्रकार केव्हाही व्हायचे. स्वतंत्र आधुनिक भारतात कायदे, पद्धती, तपशील बदलले पण ही भीती संपली नाही.

एकेकाळच्या इंग्रजी साहित्यात असे उल्लेख होते की, पूर्वी सैनिक युद्धावर जाताना किंवा व्यापारी परगावी जाताना बायकोला 'चॅस्टिटी बेल्ट' किंवा 'व्हर्जिनिटी बेल्ट' लावून त्याला कुलूप घालून किल्ली बरोबर घेऊन जायचा. चॅस्टिटी बेल्ट म्हणजे पुरुषांच्या लंगोटासारखी धातूची बनवलेली चड्डी. त्याला उघडण्याची सोय आणि कुलुपाची सोय असायची. त्यामुळे दोन्ही गोष्टी साध्य व्हायच्या. पुरुष बाहेर असताना बायको त्याला फसवून दुसऱ्या कोणाशीतरी लैंगिक संबंध ठेवण्याची शक्यता संपायची, त्याचबरोबर तिच्यावर बलात्कार होण्याचीही शक्यता नसायची. आपल्या सध्याच्या एवढ्या प्रगत, आधुनिक समाजात प्रत्येक स्त्रीनी चॅस्टिटी बेल्ट लावून, किल्ली कपाटात ठेवून घराबाहेर पडावं अशी परिस्थिती आलीय.

प्रगत देश, देशाचा विकास या कल्पनेमधे संपूर्ण समाजाला सुरक्षित वाटणं याला खूप महत्त्व असतं. भारताचा नंबर या क्रमवारीत पहिल्या शंभरात देखील लागत नाही.

●

## 11) लैंगिक अतृप्तीचे परिणाम

**अनिल :** काही कारणांनी पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या मनात लैंगिक अतृप्ती असली आणि त्याविषयी काही करता येत नसलं तर त्या अतृप्तीचे पडसाद दुसरीकडे कुठेतरी दिसतात, फालतू गोष्टीत रागवारागवी होते. स्वयंपाक, स्वच्छता, पैशाचे व्यवहार, पाहुणे– कुठेतरी किंवा सगळीकडे तो राग निघतो. रागावणं, नाराजी दर्शवणं हा एक प्रकार झाला. दुसरा प्रकार मंदपणा. गेली काही वर्षं आमचं दोघांचं असं निरीक्षण आहे की दिवसभर बैठं काम करणाऱ्या लोकांनी इतर व्यायाम, आरोग्य संवर्धन यात कंटाळा केला की सगळ्या क्रिया मंदावतात. इतर अनेक गोष्टींमधे लैंगिक संबंध मंदावणं आलंच. पैसे कमावण्यात आणि लैंगिक क्षमता मंदावण्यात दोन्हीमधे आय.टी. (इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी) क्षेत्र अग्रगण्य आहे. समुपदेशनाला येणाऱ्यांच्यात जवळजवळ निम्मं प्रमाण कॉम्प्युटर क्षेत्रातल्यांचं आहे.

त्या क्षेत्रावर टीका करणं हा माझा उद्देश नाहीय पण तरी एक निरीक्षण सांगतो, कॉम्प्युटरशी वागण्यात हे लोक जेवढे वाकबगार असतात तेवढेच जिवंत माणसाशी वागण्याच्या कलेत कच्चे असतात. पैसे कमावण्यातल्या त्यांच्या यशाचा वचपा कौटुंबिक अपयशात निघतो. अगदी तरुण वयात – तिशीत वगैरे काही स्त्री-पुरुष संभोग क्रियेमधे दमतात. स्त्रीच्या मांड्या, पोटऱ्या, कंबर वगैरे दुखतात तर पुरुषाचे हात, पाय, गुडघे दुखतात. काही जोडपी दमल्यामुळे थांबून जरा वेळानी पुन्हा संभोग करतात किंवा त्या रात्रीपुरता नाद सोडून देतात. अशा लोकांनी खरा म्हणजे एरवीचा व्यायाम रोज करणं  जरूर असतं.

अशा कुठच्याही कारणामुळे लैंगिक अतृप्ती असली तर त्या जोडप्याला समुपदेशनाची नितांत गरज असते. चांगल्या समाधानकारक लैंगिक संबंधांची गरज असतेच, पण त्याखेरीज एरवीसुद्धा एकमेकांच्या प्रेमळ सहवासाची गरज असते. नवरा आणि बायको दोघांनाही भिन्नलिंगी व्यक्तीची, त्या सहवासाची गरजच असते. ती गरज पूर्ण झाली नाही तर प्रथम विवाहबाह्य आकर्षणाला सुरुवात होते. त्याची तीव्रता वाढत गेली की विवाहबाह्य लैंगिक संबंधांना सुरुवात होते.

नवराबायको दोघांनाही वाटत असतं की, मी जोडीदाराकडे दुर्लक्ष केलं तरी काही बिघडणार नाही, कारण जोडीदार माझ्याखेरीज जाणार कुठे? ते खरं नसतं ही एकच अडचण आहे.

●

*नवराबायको दोघांनाही वाटत असतं की, मी जोडीदाराकडे दुर्लक्ष केलं तरी काही बिघडणार नाही, कारण जोडीदार माझ्याखेरीज जाणार कुठे? ते खरं नसतं ही एकच अडचण आहे.*

# 12) गर्भ राहणं

**शोभा :** काही कारणानी संततिनियमनाशिवाय संभोग घडल्यानंतर मूल नको असल्यामुळे औषधयोजना करण्याची पाळी येते. एक गोष्ट माहिती असावी म्हणून सांगते, वीर्य योनीत पडल्यापासून त्यातले शुक्राणू गर्भाशयापर्यंत पोचायला 3 दिवस लागतात. थोडक्यात काही औषधयोजना करायची असली तर ती रात्रीच्या रात्री करण्याची गरज नसते. दुसऱ्या दिवशी डॉक्टरला भेटून पुरतं.

**अनिल :** मी आणि शोभा जेव्हा मुलाचा विचार करत होतो त्यावेळेला आमची सविस्तर चर्चा झाली, ती इथे थोडक्यात सांगतो. आम्ही ठरवलं की आम्हाला दोन मुलं असली तर आवडेल. वैद्यकीय प्रश्न निर्माण होणार नाहीत असं धरून चालण्याखेरीज दुसरा मार्ग नसतोच. आम्ही अशी काही जोडपी बघितली आहेत की त्या दोघांच्या वैद्यकीय चाचण्यांच्यात काही दोष नव्हता. पण काही केल्या मूल होत नव्हतं. आमच्या वाट्याला नशिबानी असं काही आलं तर एक मूल दत्तक घेऊ असंही बोलणं झालं होतं.

दोन मुलं झाली तर दोन मुलांच्यात कमीतकमी अंतर असू दे असं चर्चा करून ठरलं. कमीतकमी म्हणजे दीड वर्षं असं एकमत झालं, आणि आपल्याला दोघांना दोन मुलांच्यात एक मुलगा आणि एक मुलगी असं आवडेल यावर एकमत झालं. आपल्या इच्छेप्रमाणे होणार असं गृहीत धरलं तर मुलगा मोठा आणि मुलगी धाकटी ही आमची इच्छा आहे ही चर्चा झाली. यामागे वंशाला दिवा, भावी व्यवसायात भागीदार वगैरे काही विचार नव्हता. विचार एवढाच होता की निसर्गतः मुलग्यामधे ताकद जास्त असते. मुलगा मोठा असला तर दोन भावंडांच्यातला फरक ताकदीच्या घटकामुळे प्रत्यक्षात रोजच्या जीवनात बराच जास्त होईल आणि त्यामुळे दोघा भावंडांत भांडणं कमी होतील आणि पुढे मोठेपणीही भावंडांच्यात प्रेम टिकून राहील.

त्याच काळात योगायोगानी आमच्या वाचनात एक लेख आला. त्या लेखाचा सारांश असा होता की, अल्कली वातावरणात मुलगा होण्याची शक्यता वाढते आणि आम्ल वातावरणात मुलगी होण्याची शक्यता वाढते. जेव्हा गर्भनिरोधक साधनं वापरणं बंद करून गर्भ राहायला हवा असा नवराबायकोचा

निर्णय होईल तेव्हा संभोगाच्या वेळी अल्कली पाण्यानी योनी धुवावी म्हणजे मुलगा होईल आणि आम्ल पाण्यानी मुलगी होईल. त्या लेखात त्यांनी शंभर टक्केचा दावा केलेला नव्हता. आम्ही या विषयातले शास्त्रज्ञ नव्हतो आणि विधानाचा खरेपणा तपासण्याचा आमच्याजवळ काही मार्ग नव्हता. त्याचबरोबर या कल्पनेचा वापर करण्यात नुकसान काही दिसत नव्हतं.

आम्ही त्या त्या वेळेला खायचा सोडा आणि लिंबू-पाणी याचा वापर केला आणि आमच्यापुरता तरी हा उपाय यशस्वी झाला. प्रथम मुलाचा म्हणजे शोनीलचा आणि नंतर दीड वर्षांनी नाही पण अडीच वर्षानी मुलीचा म्हणजे आभाचा जन्म झाला. या माझ्या उल्लेखाबद्दल जीवनसाथच्या एका कार्यशाळेत एका मुलीनी खूप कडक आक्षेप घेतला होता. मला वाटतं, तिला मी पुरुषप्रधान विचारांचा माणूस स्त्री-पुरुष समानतेविरुद्ध काहीतरी बोलतोय असं वाटलं असावं. प्रत्यक्षात मी पूर्णपणे समानता मानणाराच आहे. मुद्दामून प्रयत्न करून मुलगा आणि तसेच मुद्दामून प्रयत्न करून मुलगी या प्रयत्नामधे असमानता कुठेच नाही, पण तिला ते कळलं नाही.

**शोभा :** आजकाल सोनोग्राफीमुळे गर्भात काही विकृती असली तर ते आधी समजतं. विकृती असली तर त्या मुलाला जन्म देऊन मुलाचे आणि आपले हाल करून घेऊ नयेत असं आम्हाला वाटतं. 'ॲबॉर्शन' म्हणजेच गर्भसमाप्ती अत्यावश्यक असली तर करायलाच हवी. पण वीस आठवड्यांनंतरच्या गर्भसमाप्तीला कायद्यानी बंदी आहे हे लक्षात ठेवावं. एक गैरसमजूत सर्रास आढळते, ती म्हणजे पपई खाल्ल्यानी गर्भ पडतो. ते खरं असतं तर शासनानी लोकसंख्या वाढीच्या प्रश्नासाठी पपईच वापरली असती. आणखी एक गैरसमजूत म्हणजे सूर्यग्रहणाच्या वेळेला गर्भार स्त्रीवर टाकलेली बंधनं. म्हणे अशा वेळी त्या स्त्रीनी कापणं, चिरणं अशा गोष्टी केल्यानी गर्भात व्यंग निर्माण होतं. काहीतरीच!

**अनिल :** बायकोला दिवस राहिले की एकूण नऊ महिन्यांच्या गर्भारपणाच्या काळापैकी साधारण 6 महिने नवरा-बायकोत लैंगिक संबंध चालू राहू शकतात हे बरोबर आहे. शेवटचे 3 महिने नवऱ्याला ब्रह्मचर्य पाळावं लागतं किंवा हस्तमैथुन करावं लागतं. मुख्य मुद्दा असा आहे की मूल हे नवराबायकोच्या आयुष्यातलं महत्त्वाचं प्रॉजेक्ट आहे आणि इतर एखाद्या प्रॉजेक्टसाठी जसं तन-मन-धन अर्पण करायची तयारी असते तसं या प्रॉजेक्टचं करावं लागतं. बायको गर्भारपण, त्याची काळजी, चाचण्या, इलाज यात पूर्ण गुंतून गेलेली असते.

नवऱ्यानी तिच्या मनाची काळजी घेणं, शारीरिक मदत करणं, मुख्य म्हणजे स्वतःच्या मागण्या कमी करणं हे सगळं करावं लागतं. पुढे मुलाचा जन्म झाला की या सगळ्यात आणखी बदल होतो. लैंगिक संबंधांचं प्रमाण कमी होतं. सगळं आयुष्यच बदलून जातं. प्रत्येक विषयाचे इतके दिवस दोन संदर्भ असायचे ते तीन संदर्भ होतात. ते तीनही संदर्भ सांभाळत समाधानानी संसार करणं ही तर खरी खुबी आहे.

आम्हाला मुलं झाली तेव्हा मी माझा व्यवसाय वाढवण्याच्या खटपटीत होतो. ज्या खुबीचं मी वर्णन केलं ती मला माहिती होती पण प्रत्यक्षात मी तेवढा वेळ देऊ शकलो नाही. शोभावर मी अन्याय केला असं नाही म्हणता येणार पण माझ्या हातून अन्याय झाले. शोभानी मला माफ केलं हा तिच्या मनाचा मोठेपणा आहे.

●

## 13) आनंददायी लैंगिक संबंधांसाठी काही सूचना

लग्न झालेल्या जोडप्याला एवढ्या मगाचपासून सांगितलेल्या गोष्टींची माहिती असली, नवराबायको दोघांचं एकमत असलं की पहिली पायरी पार पडते ती म्हणजे घोटाळा होऊ न देण्याची. त्यानंतर पुढच्या पायरीवर नवराबायकोंनी जाण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे आनंददायी लैंगिक संबंधाचा. त्यासाठीचा एकच मंत्र आहे तो म्हणजे 'करून बघणं'. एकत्र आंघोळ, मालिश, आसनं सगळ्या गोष्टींचा उद्देश एकच. लैंगिक तृप्ती. लैंगिक अतृप्तीमुळे स्त्रीला किंवा पुरुषाला घटस्फोट मागावासा वाटला तर त्यात चूक काही नाही. कायद्यानीही अशा कारणानी मागितलेल्या घटस्फोटाला मंजुरी मिळते. एखाद्या जोडप्यात अशी काही अडचण असली तर समुपदेशन हा एक मार्ग आहेच, पण करून बघण्याजोगे अनेक प्रयोगही असतात. ठिकाणात, वेळेत, पद्धतीत बदल करून बघणं हे शक्य आहे. संभोगाची निरनिराळी आसनं ही तृप्तीसाठीच शोधलेली आहेत.

स्त्री किंवा पुरुषाची जाडी फार असली किंवा पोट सुटलेलं असलं किंवा गर्भारपणामुळे आकार वाढलेला असला, याखेरीज वयामुळे शरीराचा लवचिकपणा कमी झाला असला तर उपयोगी अशी दोन आसनं आहेत. एक म्हणजे पलंगावर हात ठेवून खाली उभं राहून स्त्रीनी ओणवं होणं आणि पुरुषानी मागच्या बाजूनी संभोग करणं. दुसरं म्हणजे स्त्रीनी पलंगाच्या टोकावर उताणं झोपणं आणि पुरुषानी उभं राहून संभोग करणं. याखेरीज पलंगावर कुशीवर एकामागे एक झोपूनही हीच गोष्ट शक्य आहे. मुख्य मुद्दा असा की, यातला कुठचाही मार्ग, याहून निराळी काही पद्धत शोधली तरी चालेल पण संभोग रद्द करू नये, टाळू नये. जाडीबद्दल वाटणारा न्यूनगंड झटकून टाकावा, एका बाजूनी लैंगिक संबंध चालू ठेवावेत कारण तो मनाच्या जवळिकीसाठीचा महत्त्वाचा मार्ग आहे आणि दुसऱ्या बाजूनी जाडी, वजन कमी करण्याचं 'प्रॉजेक्ट' मनापासून चालू करावं.

मघाशी म्हणाल्याप्रमाणे शरीराचा कुठलाही अवयव या आसनांतून वर्ज्य होत नाही. अनेक नवऱ्यांना बायकोनी त्यांचं लिंग तोंडात घेणं आवडतं पण बायकोला 'घाण वाटते' त्यामुळे अतृप्तता टिकून राहते. एकमेकांवर प्रेम असलं तर एखादी गोष्ट काही वेळा करून बघणं गरजेचं आहे. याचबरोबर स्त्रियांना

नवऱ्यानी योनी चोखणं, त्यावरून जीभ फिरवणं आवडतं पण पुरुष त्याला तयार नसतात. करून बघण्यात मुख्य फायदा म्हणजे जोडीदाराला आनंद देण्यामुळे स्वतःला मिळणारा आनंद. शेवटची महत्त्वाची गोष्ट म्हणजे जोडीदाराला कुठच्याही लैंगिक क्रियेची विनंती, आग्रह, आग्रहाची विनंती करावी पण अडवाअडवी किंवा जबरदस्ती अजिबात करू नये. आणि हो, या सगळ्या प्रयोगांच्यात दारू आणि अमली पदार्थांचा वापर पूर्णपणे टाळावा. किंचित दारूनी उद्दीपन येऊ शकतं, पण जरा जास्त झाली की झोप येते. दारू पिण्याचा अतिरेक झाला तर त्यामुळे वंध्यत्व येऊ शकतं. काहींना नपुंसकत्व येऊ शकतं.

बायकोनी हातानी हळुवारपणे गोट्या चोळल्या तर पुरुष खूष होतो. त्याची मनस्थिती बदलली तर तोही एखादी गोष्ट करून बघायला तयार होण्याची शक्यता असते. दोघांनी ठरवलं की, 'मार्ग काढू', त्यासाठी 'करून बघू' की त्यानंतर खरं म्हणजे एखादी गोष्ट जमत नाही ठरवलं तरी बिघडत नाही पण ती दोघांनी एकमतानी ठरवलेली पाहिजे. एवढ्या गोष्टी जमल्या तर खरं म्हणजे लैंगिक संबंध हा मोठ्या आनंदाचा ठेवा असतो. 'फीस्ट ऑर फॅमाईन'पैकी 'फीस्ट' ही दोघांच्या हातातली गोष्ट असते.

●●●

# 16

# लैंगिक संबंध– मध्यमवयीन स्त्री-पुरुषांचा

## 1) स्त्री-पुरुषांची लैंगिक गरज

**शोभा :** लैंगिक संबंध एकावेळी दोन व्यक्तींमधेच होऊ शकतो. मग त्याचे परिणाम सबंध कुटुंबावर, पर्यायानी समाजावर होतात. भारतात ज्या गैरसमजुतीमुळे जिथेतिथे स्त्रीवर अन्याय होताना दिसतो तो म्हणजे जन्मणारं बाळ मुलगा का मुलगी हे स्त्रीवर अवलंबून असतं अशी कल्पना. प्रत्यक्षात शास्त्रीय सत्य बरोबर उलट आहे. पुरुषाच्या वीर्यातून जे सूक्ष्मकण स्त्रीच्या शरीरात जातात त्यावर मुलगा होणार का मुलगी हे अवलंबून असतं. पूर्वीच्या अशास्त्रीय कल्पनेमुळे स्त्रियांना हजारो वर्षं अन्याय सोसावा लागला.

सरासरी भारतीय स्त्रीवरच्या सहन करण्याच्या संस्कारांमुळे ती सोसत राहते पण तक्रार करत नाही. बंड करत नाही. त्यामुळे भारतातल्या स्त्रियांच्यात समलिंगी संबंधांचं प्रमाण फार कमी असतं. त्यामानानी विलायतेत ते जास्त असतं. प्राचीन काळी भारततही स्त्रिया समलिंगी संबंध बऱ्याच प्रमाणात ठेवत असणार असं त्यावेळच्या शिल्पांवरून दिसतं. प्राचीन काळापासून सगळा उपलब्ध इतिहास बघितला तर असं दिसतं की लैंगिक आकर्षण माणसाला फार अविवेकी, हिंस्र बनवतं. त्या वृत्तीमुळे अनेक संस्कृतींमधली अनेक राज्यं नाश पावली.

**अनिल :** मध्यमवयीन पुरुषांची एकूण परिस्थिती आणि स्त्रीची परिस्थिती याची जरा तुलना बघूया. चाळीशीच्या आसपासच्या पुरुषाच्या व्यथेसह आणि कामविषयक विचारांसह स्त्रीची व्यथा आणि विचारही बारकाव्यांसकट लक्षात घ्यायला हवा आहे.

स्त्रीच्या कामेच्छेबद्दल, लैंगिकतेबद्दल सांगायचं, तर तिच्या शरीरापासूनच सुरुवात करावी लागेल. स्त्रीचं शरीर आणि अवयव कमानदार म्हणजे कमानीच्या आकाराचे, लयबद्ध आणि उठावदार असतात. त्यामुळे तिचं चालणंही स्वाभाविकच ढंगदार, लयबद्ध होतं. या तिच्या उन्नत शरीरयष्टीमुळेही आपल्या शरीराला कुठेच बाक, उभार नसलेला पुरुष स्त्रीच्या देहाकडे आकर्षित होतो. तसंही पुरुषाचं प्रेम जास्त शरीरप्रधान असतं, हे संशोधनानी सिद्ध झालं आहे. आपल्या भावना समजावून घेऊन तेच शरीरप्रधान प्रेम आणखी उदात्त, टिकाऊ आणि हवंहवंसं कसं करता येईल, याचंच प्रशिक्षण पुरुषांना देण्याची गरज आहे.

स्त्रीची लैंगिक गरज ही पुरुषाएवढीच असते. जर एखाद्या स्त्रीला मुलांची आवड नसली तर ती गरज तशीच राहते, पुरवलीही जाते; पण ज्या स्त्रियांना मुलं होतात त्यामुळे त्यांचं सगळं बदलतं. गरोदरपण, बाळंतपण, मुलांचं संगोपन, मुलांच्या जबाबदाऱ्या निभावाव्या लागतात. मुलांना योग्य वळण लावावं लागतं. जबाबदार नागरिक घडवावं लागतं.

या समंजस भूमिकेत स्त्रीची स्वतःची लैंगिक गरज आणि जाणीव वर्षानुवर्षं मनाच्या खोल कप्प्यात दडून राहते. दुर्लक्षिली जाते; पण एकदा मुलं मोठी झाली, मार्गी लागली की, मग तिची ही उपेक्षित राहिलेली गरज परत एकदा भानावर येऊ लागते.

आपण बऱ्याच आधी म्हणालो होतो की प्रत्येक पुरुषाला स्त्री सहवासाची गरज असते आणि प्रत्येक स्त्रीला पुरुष सहवासाची गरज असते. पुढे जाऊन आपण म्हणतो आहोत की विवाहित स्त्री-पुरुषांना देखील जोडीदाराव्यतिरिक्त इतर भिन्नलिंगी स्त्री-पुरुषांच्या सहवासाची गरज असते. ही गोष्ट जोडीदाराला समजली तर छान; पण समजा, नाही समजली तर ती व्यक्ती पाहिजे त्या व्यक्तीच्या सहवासासाठी निमित्त शोधणार, हे जोडप्याला समजायला हवं.

**शोभा :** असे पुरुष आणि स्त्रिया दोन्ही असतात पण आकर्षण व्यक्त करण्याच्या बाबतीत भारतीय सरासरी पुरुष फार अविवेकी, कधीकधी आक्रमकही झालेला दिसतो. आमच्या संसारात अगदी लग्न झाल्यापासून अनिलचा मंगळसूत्राला विरोध असल्यामुळे मी मंगळसूत्र वापरत नसे. पुण्यातल्या पुण्यात घरून गरवारे बालभवनला येताना काही अडचण आली नाही, पण जरा बाहेर किंवा बाहेरगावी गेलं की फरक लक्षात येतो. गळ्यात मंगळसूत्र नाही म्हटल्यावर पुरुष अशा स्त्रीला विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, अविवाहित अशांपैकी काहीतरी समजतात.

काही विकृत पुरुष अधिक चावटपणाही करतात. शेवटी मी एक खोटं मंगळसूत्र अशा प्रसंगी वापरण्यासाठी जवळ ठेवायला लागले.

एक खूप मोठा अकारण अप्रतिष्ठेचा केलेला आणि म्हणूनच कुजबुजीच्या स्वरूपात चर्चा होते असा विषय म्हणजेच योनीशुचिता. त्याचा उल्लेख करावाच लागेल. शुचिता म्हणजे नेमकं काय? शुचि या संस्कृत शब्दाचा अर्थ पवित्र असा आहे. शुद्धपणा या अर्थानी शुचि शब्द वापरला गेला, तरी मग तो शुद्धपणा फक्त स्त्रीच्या योनीबाबतचा का? पुरुषाच्या लिंगाबाबत लिंगशुचितेचा आग्रह का नाही?

मुळात असं आहे की, लैंगिकता ही प्रत्येक माणसाची एक नैसर्गिक भूक किंवा गरज आहे. माणूस या नात्यानी ती स्त्री आणि पुरुष दोघांमधे समानपणी अस्तित्वात असते. काही व्यक्तींबाबत ही गरज केवळ एकाच भिन्नलिंगी व्यक्तीकडून भागते. त्या व्यक्तीच्या दृष्टीनी ते पुरेसं असतं. काही व्यक्तींबाबत किंवा त्या व्यक्तींच्या संदर्भात ही गरज त्यापेक्षा जास्त असू शकते. जसं अन्नाबाबत, झोपेबाबत प्रत्येकाच्या गरजा भिन्न आणि व्यक्तिगणिक बदलत जाणाऱ्या असतात. तशाच लैंगिक गरजाही व्यक्तिगणिक बदलत जाणाऱ्याच असतात. हे नैसर्गिकपण लक्षात घेतलं, तर योनीशुचिता, श्लील-अश्लील यांसारखे शाब्दिक आणि पुरुषी वर्चस्वाच्या अहंगंडातून उभे राहिलेले दंभ क्षणात कोसळून पडतात.

स्त्री-पुरुषांचा एकमेकांना सहजपणे होणारा साधा हस्तस्पर्शही निषिद्ध मानल्या गेलेल्या आपल्या संकुचित वृत्तीच्या समाजात या लैंगिक गरजा वर्षानुवर्षे दडपलेल्या राहणं आणि वाट मिळताच त्या पुऱ्या करण्यासाठी धडपडणं यातूनही कदाचित एड्ससारखा रोग भारतात मोठ्या प्रमाणावर फैलावलेला दिसत नसेल ना? उत्तर मला माहीत नसलं तरी हा संशोधनाच्या योग्यतेचा विषय आहे.

**अनिल :** ज्या मध्यमवयीन स्त्री-पुरुषांबद्दल आपण बोलतो आहोत त्यांची वयं 35 ते 45 अशी समजूया. वागणुकीतल्या सगळ्या सवयी पक्क्या झालेल्या असतात. त्या बदलणं सोपं नसतं. उशिरा लग्न केल्यामुळे कधीकधी मध्यमवयात लग्न होतं. चांगल्या-वाईट सवयी घट्ट मुरलेल्या असतात. अशा सवयी-लकबींचा कधीकधी दुसऱ्याला खूप त्रासही होऊ शकतो. सगळ्या ब्रिटिश लोकांची एक सवय जगभर कुप्रसिद्ध आहे. ती म्हणजे मोठ्यांदा आवाज करून नाक शिंकरण्याची पद्धत. एरवी बारीकसारीक बाबतीत 'इंग्लिश मॅनर्स'चं मोठं प्रस्थ असतं. मग हे कसं असा आपल्याला प्रश्न पडतो. त्याचं कारण सांगतो.

इंग्लंडमधे साधारण वर्षभर थंडी, पाऊस, कुंद, ढगाळ हवा असते. त्यामुळे निम्म्याहून जास्त लोकांना सतत सर्दीचा त्रास असतोच. पूर्वी मी इंग्लंडमधे नोकरीसाठी राहतच होतो, त्यातही ब्रिटिश कुटुंबात राहायचो त्यामुळे मला हे प्रकरण पूर्णपणी माहिती आहे. प्रत्यक्षात मला रुमालात नाक शिंकरण्याची शिसारी येते. माणसानी नाक साफ करायला सरळ उठून मोरीत, बंद दरवाजाच्या मागे जायला हवं असं मला वाटतं. नवरा-बायकोंनी अशा गोष्टी लक्षात घेऊन जास्त काळजीपूर्वक वागायला हवं.

मध्यमवयाबद्दल आणखी एक गोष्ट मला मुद्दामून सांगायची आहे. मुळात पुरुषाच्या तुलनेत स्त्रीला 'ऑरगॅझम' यायला जास्त वेळ लागतोच. स्त्रीचं वय जसं वाढतं तशी बायकोच्या ऑरगॅझमसाठी आणखी जास्त मेहनत पुरुषाला करावी लागते. या गोष्टी स्त्री-पुरुष दोघांना मध्यमवयात समजायला हव्यात. त्यामुळे आयुष्य एकदम सोपं होऊन जातं. याशिवाय एकमेकांकडून नवरा-बायको अपेक्षा कमी करायला लागले की आयुष्य सोपं होणारच कारण अपेक्षांचं ओझं हाच मुख्य प्रश्न असतो.

●

## 2) लैंगिक संबंधातून निवृत्ती

**अनिल :** मध्यमवयीन पुरुषांना कुठच्यातरी वयात 'अँड्रोपॉज' येतोच. 'यापुढे लैंगिक संबंधातून निवृत्ती' असं खात्रीलायक ठरेपर्यंत काही वर्षं पुरुषाच्या दृष्टिकोनातून फार वाईट जातात. 'सेक्स टॉनिक' विकणाऱ्यांचं यामुळे फावतं. अशा औषधांची किती मोठ्या प्रमाणावर विक्री होते याची आपल्याला कल्पनाही करता येणार नाही. प्रत्यक्षात पुरुषाच्या लैंगिक क्षमतेवर खरोखर परिणाम करणारं औषध पृथ्वीतलावर अस्तित्वातच नाही. बायकोची प्रेमाची वागणूक हे एकच खरं परिणाम करणारं टॉनिक असू शकतं.

दारू पिऊन संभोग केला तर फायदा होतो अशी गैरसमजूत जगभर आढळते. प्रत्यक्षात किंचित दारुनी मन सुखावतं आणि जास्त दारुनी मन सुस्तावतं. दारुमुळे संभोगाची इच्छा बळावते, पण क्रिया मंदावते.

अशा अनेक विषयांवर, स्वतःच्या प्रश्नांवर अभ्यास गटात स्पष्ट बोलणं झालं तर कोणी कुठचा प्रश्न कसा सोडवला हे कळतं. असा गट निर्माण होण्याचाच प्रश्न असतो. पुरुषांच्या तुलनेत बायका थोडं तरी मनातलं बोलतात. पूर्वी पापड-कुरडया एकत्र करणं, एकत्र बसून लाडू वळणं वगैरे कामं करताना स्त्रिया बोलायच्या. आधुनिक स्त्रियाही एकमेकींशी याबाबतीत बरंच बोलतात.

पुरुषांचं वागणं निराळं असतं. पुरुषांच्या कंपूत पुरुष स्त्री-शरीराबद्दल आडून किंवा उघड भरपूर बोलतात. पण स्वतःच्या लैंगिक आयुष्यातल्या खऱ्या परिस्थितीबद्दल एक अक्षर बोलत नाहीत.

**शोभा :** आणखी एक गोष्ट मध्यमवयीन पुरुषानी समजून घ्यावी लागते. लैंगिक संबंधांमधला आनंद आणि मूल होणं न होणं या दोन गोष्टींचा काही संबंध नाही. स्त्रीला मेनोपॉझ आला की नवऱ्यानी तिला जास्त सांभाळून घ्यावं लागतं. तशा प्रकारे पुरुष वागू शकला तर स्त्रीच्या मेनोपॉझचा आणि लैंगिक संबंधामुळे मिळणाऱ्या आनंदाचा काही संबंध नसतो. दोघांनाही अगदी भरपूर आनंद मिळतो.

मगाशी आपण म्हणालो त्याप्रमाणे स्त्री कितीही वयाची झाली तरी तिला संभोग करणं शक्य असतं. याचा अर्थ तिच्या योनीत पुरुषाचं ताठलेलं लिंग जाऊ

शकतं. त्याचाच पुढचा अर्थ कुठच्याही वयाच्या स्त्रीवर बलात्कार होऊ शकतो.

**अनिल :** पुरुषाचं मात्र लिंग ताठणं संपलं की यौन बलात्कार त्याला शक्य नसतो. त्यातूनही विकृती उद्भवतात. त्याविषयी जरा वेळानी सांगतो.

●

*पुरुषांच्या कंपूत पुरुष स्त्री-शरीराबद्दल आडून किंवा उघड भरपूर बोलतात. पण स्वतःच्या लैंगिक आयुष्यातल्या खऱ्या परिस्थितीबद्दल एक अक्षर बोलत नाहीत.*

## 3) स्वप्नरंजन

कित्येक तरुण किंवा मध्यमवयीन स्त्रियांविषयी मला अनेकदा वाटलेलं आहे की ही आपल्या पिढीत जन्मली असती तर किती छान झालं असतं!

मी स्वतःबद्दल एक गोष्ट कबूल करतो की, एखाद्या स्त्रीचा चेहेरा सुंदर असला की माझ्या दृष्टिकोनातच बदल होतो. मला पूर्णपणी माहिती आहे की सुंदर चेहेऱ्याच्या दुष्ट आणि नासमझ मूर्ख स्त्रिया असू शकतात. समतोल विचारांचं तत्त्व मला माहीत आहे. केवळ चेहऱ्यावरून माणसाविषयी चांगलं मत बनवणं ही चुकीची गोष्ट आहे, पण तरी मला ती स्त्री चांगली वाटायला लागते. प्रत्यक्ष वागणुकीत काही बदल न करण्याचा मी प्रयत्न करतो; पण तसंही कधीकधी नाही जमत. मी त्या स्त्रीची जास्त खातीरदारी करतो. जास्त प्रयत्न करून अधिक कौशल्यानी बोलतो. मी तिला आवडलो तर बरं असा विचार डोक्यात असतो.

एक गोष्ट इथे स्पष्ट करतो, मी असभ्यपणी कधीही वागत नाही, कुठल्याही स्त्रीचा गैरफायदा घेत नाही. हे सगळं सुशिक्षित, सुसंस्कृत मध्यमवर्गीय स्त्रियांबद्दलच होतं असं नाही, तर कष्टकरी वर्गातल्या स्त्रियांबद्दल देखील होतं. माझ्या बांधकाम क्षेत्रात कामाला असणाऱ्या थोड्या का होईना स्त्रिया असायच्या. घरी कामाला मुली, बायका असायच्या. राहण्याच्या जागेच्या आसपास कोणीकोणी दिसायच्या. मी कामुक अभिलाषेनी कधीच कोणाशी वागलो नाही. त्या बायकांना माझ्या मनात झुकतं माप आहे हे त्यांना कळलं की नाही कोण जाणे, पण मला माहीत होतं.

नीट विचार केला तर पुरुषांच्या बाबतीतही माझं असं होतंच की! बहुधा सगळ्यांचंच कमीजास्त प्रमाणात असं होत असेल, मला बाह्यरूपाचं महत्त्व आहे ही गोष्ट मात्र मला स्पष्टपणी माहिती आहे. ते त्याचं मूळ कारण असू शकेल.

अगदी साधी एक गोष्ट आहे. व्यभिचाराविषयी कल्पना करताना, शारीरिक व्यभिचार टाळणं, करणं याबद्दल काहीतरी करणं, उपाय करणं शक्य तरी आहे. पण मानसिक व्यभिचाराबद्दल कोणीच काही करू शकत नाही. एखादी व्यक्ती जोडीदाराव्यतिरिक्त दुसऱ्या व्यक्तीबद्दल विचार करते की नाही करत, हे कळूच

शकत नाही. जी गोष्ट रोखता येणार नाही ती रोखण्याचा प्रयत्न न करणंच चांगलं. प्रत्यक्ष चुकीची अनैतिक कृती करण्यापेक्षा नुसता अनैतिक विचार अनेक पटींनी बरा. खरं म्हणजे अशा स्वप्नरंजनामुळे चुकीची कृती रोखता येत असेल तर स्वप्नरंजनाला काही हरकत नाही असंच शेवटी म्हणावं लागेल. जसं बलात्कारापेक्षा स्वतः केलेलं हस्तमैथुन चांगलं, तसं चुकीच्या वागणुकीपेक्षा अनैतिक स्वप्न चांगलं. तेवढी एक गोष्ट नवराबायकोंनी एकमेकांना कायमची माफ करून टाकायला काही हरकत नाही.

उगीच 'मानसिक व्यभिचार' ही गोष्ट मानगुटीवर बसवून घेऊ नये असं माझं मत झालं आहे. स्वप्नरंजनात सरासरी पुरुष सरासरी स्त्रीच्या फार पुढे आहे हे तर कबूलच करावं लागेल.

●

## 4) लैंगिक उपासमार

मी आणि शोभा एका तीन आठवड्यांच्या शिबिराला परराज्यात गेलो होतो. झोपण्याच्या खोल्यांची व्यवस्था बघून आम्ही आश्चर्यचकित आणि नाराज झालो. हजर असेलल्यांपैकी मी आणि शोभा दोघंच विवाहित जोडपं होतो. आमची झोपण्याची एकत्र व्यवस्था नव्हती. बाकी कोणाला काही फरक पडत नव्हता कारण ते एकेकटे आले होते. आम्ही पस्तिशीच्या आसपासच्या वयाचे असल्यामुळे ही व्यवस्था चालणार नव्हती. ते छोटं गाव असल्यामुळे तिथे हॉटेल्सही नव्हती. नाहीतर आम्ही स्वतःच्या पैशानी दोन तास हॉटेलमधे खोलीही घेतली असती. एकूण फारच लैंगिक उपासमार गेल्या दिवसापासून तिथे दिसत होती. व्हायचे ते हाल झालेच आमचे.

काही वर्षांनी मी आखाती देशात गेलो. साधारण 50 वर्षांचा होतो. उपास आणि विपश्यना दोन्हींचा पुरेपूर अनुभव घेतला.

मध्यमवयीन माणसाला तब्येतीचे प्रश्न केव्हातरी चालू होणारच, नवराबायकोंपैकी एकजण आधी मरणार, अशा गोष्टींची मानसिक तयारी वेळेवर करणं हाच त्याच्यावरचा खरा इलाज असतो.

अनेक मध्यमवयीन लोक कांदा, लसूण हे पदार्थ वर्ज्य करतात. काही धर्मांत हे पदार्थ कायमचेच वर्ज्य असतात. त्यामागची कल्पना अशी असते की, या पदार्थांनी लैंगिक उद्दीपन येतं. जोडीदार वारला की अनेक लोक हे पदार्थ टाळताना दिसतात.

●

# 5) नसबंदी

नवराबायको मध्यमवयीन झाले तरी त्यांच्या त्यांच्या सोयीच्या वेळापत्रकाप्रमाणे लैंगिक संबंध चालू असले तर भलत्या वयात गर्भ राहण्याची शक्यता कायमच असते. बायकोला मासिक पाळी येणं थांबलं की त्यानंतर गर्भ राहू शकत नाही हे खरं, पण तोपर्यंत काय?

काही इलाज न केल्यामुळे नवऱ्याचं वय 50, बायकोचं 45 आणि आधी 2 मुलं असताना दिवस गेले असं उदाहरण माझ्या पाहण्यात आहे.

माझं, शोभाचं आणि जीवनसाथ संस्थेचं असं मत आहे की, योजनेत असतील तेवढी मुलं झाल्यावर लवकरात लवकर पुरुषानी नसबंदी करून घ्यावी.

नसबंदी या विषयातही खूप गैरसमजुती आढळतात. नसबंदी केल्यामुळे शक्ती कमी होते, अशी समजूत असते. लैंगिक संबंधांवर त्यानी परिणाम होतो अशी अनेकांची समजूत असते. हे सगळं खोटं आहे. मी स्वतः आमच्या मुलीचा जन्म झाल्याच्या आठव्या दिवशी नसबंदी करून घेतली होती. नसबंदीच्या शस्त्रक्रियेला 15 मिनिटं लागतात. 2 दिवस त्यानंतर आराम करायचा असतो की संपलं. याउलट स्त्रीच्या ऑपरेशनला लागणारा खर्च, वेळ, बरं व्हायला लागणारा वेळ सगळंच जास्त असतं. हे सगळं असून दुर्दैव असं की अजूनही पुरुषांच्या नसबंदी शस्त्रक्रियेपेक्षा भारतात स्त्रियांच्या 'हिस्टॅक्टोमी' जास्त होतात.

मी अनेक वर्षं बांधकामाच्या धंद्यात होतो, त्यात तर आमच्या कामगारांना हे समजावून सांगावंच लागायचं. कसाबसा संसार चाललेला असायचा, पण प्रत्येकाला कमीतकमी 3, कधी 4, कधी 5 मुलं असायची. त्यानंतर बायकोचं 'ऑपरेशन' हेही ठरलेलंच असायचं.

मी एवढं कळकळीनी सांगायचो पण आत्तापर्यंत एकाही कामगारानी नसबंदी केल्याचं मला माहिती नाही.

●

## 6) पुढच्या पिढीचं भवितव्य

सध्याच्या तरुण पिढीची मला खरंच काळजी वाटते. घरापासून ते खूप तास बाहेर असतात. कधीकधी कामानिमित्त परगावी, परदेशीही असतात. घरी आले की त्यांचा हात लॅपटॉपकडे जातो. नवराबायकोंसाठी दोन निराळ्या खोल्यांच्यात दोन टेबलं आणि दोन लॅपटॉप्स असतात. शेजारच्या खोलीत बसलेल्या नवऱ्याशी किंवा बायकोशी ई-मेल चॅट करणं त्यांना जास्त सोपं वाटतं किंवा बाहेरच्या खोलीतून आतल्या खोलीत ते मोबाइल फोनवर बोलतात. मित्रमंडळींना तर प्रत्यक्ष भेटण्याची गरजच पडत नाही. असा ई-संसार आणि मो-संसार बघून मला खरंच प्रश्न पडतो की पुढे काय होणार?

त्यांचं लैंगिक आयुष्य कसं असेल कोण जाणे! ई-संभोग? दूषित हवा, दूषित पाणी, दूषित अन्न, व्यायामाच्या अभावामुळे शारीरिक क्षमता कमी, या आणि अशा अनेक गोष्टींच्या परिणामांमुळे त्यांची लैंगिक संबंधाची क्षमता नक्की कमी होईल असं वाटतं.

कदाचित लैंगिक भूकही कमी होऊन तो प्रश्न आपोआप सुटेल.

●●●

# 17

# लैंगिक संबंध–ज्येष्ठांचा आणि लैंगिक विकृती

## 1) ज्येष्ठांचा लैंगिक संबंध

**अनिल :** ज्याला म्हातारचळ म्हणतात ते म्हणजे बहुतेक वेळेला विस्मरण, अतिआग्रही वागणं, संशयखोर वागणूक असं असतं. अगदी कमी प्रमाणात म्हाताऱ्या स्त्री-पुरुषांच्यातल्या विकृती समाजापर्यंत पोहोचतात. बाकीच्या फक्त घरातल्यांना माहिती असतात. बायकांचा जसा मेनोपॉझ असतो आणि बायकांचं मानसिक स्वास्थ्य बिघडू शकतं, तसंच पुरुषांच्या अँड्रोपॉझनंतर पुरुषांचं होतं. पुरुषाच्या दृष्टिकोनातून बायकोच्या योनीमधे लिंग घालून वीर्य गाळणं हा खरा आनंद असतो तो कमी होत होत संपतो. प्रथम लिंग ताठच होत नाही इथून सुरुवात होते. त्यानंतर वीर्य तयार करणाऱ्या ग्रंथी कामच करत नाहीत.

अशाही अवस्थेत वृद्ध स्त्री-पुरुष जमेल तेवढ्या शारीरिक जवळिकीचा, अर्धवट संभोगाचा प्रयत्न चालू ठेवतात, कारण शरीराचा हा संवाद नवरा-बायकोच्या मनाच्या संवादासाठीचं साधन असतो. मनानी आपण जवळ आहोत हा विश्वास त्यामुळे टिकून राहतो.

मघाशी शोभा म्हणाली तसं स्त्रीची परिस्थिती अशी नसते, स्त्री अखेरपर्यंत संभोग करू शकते. पुरुषाला हळूहळू कळतं की लवकरच आपला संभोग बंद होणार. तेव्हापासूनच निराशेच्या मनस्थितीला सुरुवात होते. काही पुरुषांची ही अवस्था 60-65 वयात येते तर काहींची उशिरा. ८० वयानंतरही बाप होणारे म्हातारे क्वचित आढळतात. अशा निराशेच्या काळात काही लोक विकृतीच्या

वाटेनी जातात. त्यांना 'डर्टी ओल्ड मॅन' म्हणून समाज ओळखतो. कित्येक वेळा बायको फार आक्रमक आणि संभोगाची फार आसक्ती असणारी असली तर पुरुष मनानी संसारातून लवकर निवृत्त होतो आणि संभोगातूनही लवकर निवृत्त होतो.

म्हाताऱ्या पुरुषांना स्त्रियांविषयी आकर्षण वाटणं बंद होत नाही, पण समाजात सभ्यपणाची प्रतिमाही तेवढीच महत्त्वाची असते. एखाद्या अनोळखी तरुण स्त्रीनी हसून बघण्याइतपत लक्ष दिलं तरी म्हाताऱ्या पुरुषाला आतून बरं वाटतं.

आवडत्या मुलीनी, स्त्रीनी किंचित ओझरता स्पर्श केला तरी जीव सुखावतो. स्त्रीची मानसिक घडण थोडी निराळी असते. तिला शरीरस्पर्शाचं कौतुक मुळातच पुरुषापेक्षा कमी असतं. संस्कारांमुळे तिला संकोचाची भावना जास्त असते. वयस्कर म्हाताऱ्या स्त्रीला म्हाताऱ्या पुरुषाच्या तुलनेत भिन्नलिंगी व्यक्तीच्या स्पर्शाचं महत्त्व कमी असतं.

सभ्य ज्येष्ठ पुरुष स्त्रियांना स्पर्श करण्याच्या भानगडीत पडत नाहीत. काही म्हातारे पुरुष तरुण मुलींना जवळ घेणं, पाठीवर हात ठेवणं, पाठीवर थाप देणं अशा गोष्टी करतात. मी अगदी खात्रीनी सांगू शकत नाही की त्यांच्या मनात काय असतं. माझं माझ्यापुरतं धोरण पक्कं आहे. मुलींनी आपणहून हात पुढे केला तरच मी शेकहँड करतो, नाहीतर तोही नाही.

म्हातारे नवराबायको हळूहळू स्वतःच्या दिसण्याबद्दल बेपर्वाई करायला लागतात ते मला योग्य नाही वाटत. कवळी वापरणारा म्हातारा किंवा म्हातारी असली तर त्यांनी अगदी झोपेपर्यंत कवळी तोंडातून काढून वावरू नये. कारण उघड आहे. ते विद्रूप दिसतं. माझ्यापुरता आणखी एक निर्णय मी पक्का केलेला आहे. धडधाकटपणी मरायचं. तोपर्यंत आरोग्य शक्यतोवर चांगलं ठेवायचं. स्वतःला स्वस्थ वाटलं पाहिजे. कायम त्यातल्या त्यात चांगलं दिसलं पाहिजे. स्वतःसाठी आणि जोडीदारासाठी.

अनेक वयस्कर, ज्येष्ठ पुरुष दारू पितात आणि त्यात भूषण मानतात. असे लोक दारुडे नसतात, निवृत्त असतात, चांगली दारू पिण्याइतपत त्यांच्याकडे पैसे असतात आणि पुरेसा उद्योग नसतो. अशा कित्येकांना माफक दारू पिऊन छान झोप लागते. काहींची लैंगिक इच्छा दारुमुळे चेतावते पण कृती मंदावते. काही ज्येष्ठांना शेवटी डॉक्टर सांगतात तेव्हाच त्यांची दारू बंद होते.

**शोभा :** अनिलनी त्याच्या तरुणपणी हौसेनी भरपूर दारू प्यायली आहे. पण त्याच्या प्रकारच्या व्यक्तिमत्त्वाच्या माणसाला कुठलंच व्यसन लागत नाही.

तो गेली अनेक वर्षं सिगारेट, दारू यांपासून दूर आहे याचं आणखी एक कारण आहे. मरेपर्यंत भरपूर काम करत राहायचं असा त्याचा निर्धार आहे. त्याला दारुत घालवायला वेळच नसतो, मला याबद्दल चक्क आनंद वाटतो. मी इतर ज्येष्ठ पुरुष बघते तेव्हा अनिल हा फारच खास नवरा आहे याचाही आनंद होतो. माझंही अखेरपर्यंत कामात राहण्याचंच धोरण आहे.

**अनिल :** मला देखील शोभाचं प्रचंड कौतुक आणि आदर आहे. म्हातारपणीदेखील आम्हाला एकमेकांविषयी वाटणारं आकर्षण, आपुलकी, काळजी म्हणजेच प्रेम तेवढंच आहे. याचं काही प्रमाणाततरी श्रेय जीवनसाथमुळे जो आयुष्याचा आमचा अभ्यास झाला त्याला आहे.

●

## 2) लैंगिक विकृती

**शोभा :** लोकांच्या विकृती काय असू शकतात ह्याची माहिती असणं गरजेचं आहे. स्त्रियांच्या विकृती एकूणच जगात आणि भारतातही कमी असतात. काही स्त्रियांना संभोगासाठी सारखा पुरुष लागतो. त्यांना मग कोणीही पुरुष चालतो. अशांना इंग्रजीत 'निम्फोमॅनिॲक' म्हणतात. काही स्त्रिया पशूंशी लैंगिक संबंध ठेवतात. अगदी क्वचित घडणारी गोष्ट म्हणजे स्त्रिया लहान मुलग्यांशी लैंगिक चाळे करतात. त्या प्रकरणात त्या मुलाचं आयुष्य अर्थातच उद्ध्वस्त होतं.

**अनिल :** त्या तुलनेत विकृत पुरुषांचं प्रमाण फार आहे. काही पुरुष बायकोची पाळी चालू असताना तिच्याशी जबरदस्तीनी संभोग करतात. काही संभोगापूर्वी स्त्रीला मारतात, चावतात, काही पशूंबरोबर संबंध ठेवतात. काही पुरुष बायकोला जबरदस्तीनी स्त्री-पुरुष अदलाबदलीच्या 'वाइफ स्वॅपिंग पार्टी' मधे सामील व्हायला लावतात तर काही बायकोला जबरदस्तीनी 'ग्रुप सेक्स ऑर्गी' मधे सामील व्हायला लावतात.

श्रीमंत, जमीनदार, संस्थानिक यांच्या विकृत लैंगिक संबंधांचे चाळे या विषयावर अनेक सिनेमे, नाटकं, कादंबऱ्या आहेत. अनेक पुरुषांच्या अधिकृत बायका नवऱ्याचं लिंग तोंडात घ्यायला नकार देतात, यामुळे ते बाहेरख्याली बनल्याची उदाहरणं आहेत. मुळात पुरुषाला बायकोकडून मिळालेला नकार, मग तो कशाच्याही बाबतीत असो, सहन होत नाही. नकारामुळे पुरुषाचा अहंकार जास्त उफाळून येतो. मुळातली बायकोनी लिंग तोंडात घेण्याची त्याची इच्छा सौम्यही असण्याची शक्यता आहे, पण नकारामुळे पुरुष थेट भावनिक बंडापर्यंत पोहोचतो.

श्रीमंत आणि वृद्ध असलेल्यांना घरी बायकोबरोबर ज्या गोष्टी करता येत नाहीत त्या बाहेर करता येतात. भारतातच काय जगभर पैशाची गरज ही गोष्ट स्त्रियांना काहीही करायला भाग पाडते. श्रीमंतांच्या विश्वात रखेल ठेवणं हे जगभर, भारतात, महाराष्ट्रात, पुण्या-मुंबईत नियमित गोष्ट म्हणून मानलेली आहे. 'कॉल गर्ल' म्हणून धंदा करणं हा बिनभांडवली आणि कमी वेळात जास्त पैसे कमावण्याचा धंदा अत्यंत लोकप्रिय आहे. घरच्या लोकांना काही कल्पना नाही, पण प्रत्यक्षात मुलगी पैशासाठी मधूनमधून मित्रांबरोबर जातेय, अशा मुलींची

संख्या खूप वाढलेली आहे.

अगदी व्यवस्थित बघून लग्न करून संसार थाटल्यावर 'ह्या मुलीकडे एवढे पैसे येतात तरी कुठून' किंवा 'दिवसभर ही मुलगी बाहेर भटकते पण नेमकं काय करते कोणास ठाऊक', अशा शंका घरचे लोक घ्यायला लागल्यावर केव्हातरी हा उद्योग उघडकीला येतो. कधीकधी तोपर्यंत मुलं झालेली असतात त्यामुळे नवरा नाइलाजानी सगळं मान्य करतो. कधी तमाशे, मारामाऱ्या, खून, काडीमोड यातलं काहीतरी घडतं. हा उद्योग सिद्ध झाला तर घटस्फोट मान्य होतो. सिद्ध करणं मात्र सोपं नसतं.

हॉस्पिटल्समधे काम करणाऱ्या नर्सेसना विकृतीचे अनेक नमुने बघायला मिळतात. नर्सच्या देखत अनेक अवयव उघडे होतात त्यामुळे पुरुषांची बुद्धी भलत्या दिशेनी विचार करायला लागते. नर्सशी कसंही वागलं तरी चालतं असं विकृत पुरुषांना वाटायला लागतं. सुंदर चेहेऱ्याच्या आणि त्यात खास करून नर्सच्या पेशातल्या स्त्रीबद्दल पुरुषांच्या मनात लैंगिक अभिलाषा अतिरेकी असू शकते. रूपवान नर्सेसना असे खूप अनुभव येतात.

मध्यम आर्थिक परिस्थितीतले विकृत पुरुष पैशाच्या जोरावर घरातल्या मोलकरणीशी चाळे करण्याचा प्रयत्न करतात. कधीकधी अशा मोलकरणी ते मान्य करतात. पैशाची मागणी करतात. या गोष्टीवरून काही घरांत भांडणंही होतात.

एखाद्या वयस्कर माणसाला एखाद्या लहान मुलीविषयी आकर्षण वाटणं हा विकृतीचाच सौम्य प्रकार. क्वचित तरुण माणसाला एखादी वयस्कर बाईच लागते. ती पण विकृतीच.

शोभा जिथे काम करते तिथे म्हणजे गरवारे बालभवनमधे एवढी काळजी घेऊन देखील एकदा चमत्कारिक प्रसंग घडला होता. एका ओळखीच्या बायको-मुलं असलेल्या मध्यमवयीन ओळखीतल्या अगदी विश्वासातल्या माणसानी एका लहान मुलीशी चावटपणा केला. पुढे फार काही जास्त घडलं नाही आणि नाचक्की टळली. त्यानंतर चौकशी केली तेव्हा कळलं की त्या माणसाला त्याच्या आई-वडलांनी लहानपणी वाईट वागवलं होतं. त्याखेरीज त्याच्या हातून चुकीची गोष्ट होण्याचं दुसरं कारण म्हणजे त्याला शालेय अभ्यासात डोकं कमी असल्यामुळे न्यूनगंड होता. त्यातून जन्मलेलं ते विकृतीचं स्वरूप होतं.

काही विकृती गैरसमजुतीतून जन्माला आलेल्या आणि विस्तृत गटात

मान्यता पावलेल्या असतात. सर्वांत लोकप्रिय विकृत कल्पना म्हणजे गुप्तरोग बरा होण्यासाठी कुमारिकेशी लैंगिक संभोग करणं.

अशी कुमारिका यासाठी आपणहून तयार होणं शक्यच नाही. मग त्यासाठी मुलीला खाण्यातून शुद्ध हरपेल असं खुबीनी औषध देणं, जबरदस्तीनी रस्त्यातून पळवून तिला कोंडून ठेवणं, ज्या पुरुषाला तिची गरज असेल त्याच्याकडून पैसे घेऊन तिच्या अब्रूची विक्री करणं, असे दलाली करणारे बरेच असतात. उद्देश निराळा असला तरी हा बलात्कारच म्हणायचा. प्रत्यक्षात एका स्त्रीवर एका पुरुषानी बलात्कार करणं वाटतं तेवढं सोपं नाही. ती स्त्री प्रतिकार करते, ओरडते, पळून जाते, तक्रार करते हे सगळं लक्षात घेतलं तर ते कठीणच असतं. तरीही बलात्कारी पुरुष शस्त्राचा, इतर धमक्यांचा उपयोग करून, आमिषं वापरून बलात्कार करतात. वाईट भाग असा की, बलात्कारी गुन्हेगारापेक्षा बळी जाणाऱ्या स्त्रीला जास्त मोठी सामाजिक शिक्षा मिळते. भारतीय समाजातल्या संस्कारांचा परिणाम म्हणजे ती स्त्री स्वतःला त्याहून मोठी शिक्षा करून घेते. काही वेळा आत्महत्याही करते.

मुळात बलात्कारी पुरुष अस्वस्थ असतो. स्वतःवर रागावलेला असतो. इतर कुठेतरी अन्यायाची वागणूक मिळाल्याचा राग तो अबलेवर काढतो.

अनेक पुरुषांनी मिळून एका स्त्रीवर 'गँग-रेप' करणं ही तर विकृतीची परिसीमा आहे. बलात्कारामधे पौरुष नाही ही गोष्ट पुरुषांना केव्हा कळणार? एखादा पुरुष फार विकृत वागला तर त्याचं वर्णन पाशवी किंवा पशुतुल्य असं करतात, पण विशेष लक्षात घेण्याजोगी गोष्ट अशी की, पशूंमधे म्हणजेच जनावरांच्यात बलात्कार नसतात. ती मानवाचीच खासियत आहे. वर आणिक काही पुरुष असं म्हणतात की बलात्कार केलेल्या स्त्रीला सुरुवातीच्या मनस्तापानंतर मजाच येते की. हा तर निर्लज्जपणाचा कळस झाला. खरं म्हणजे बलात्कारी पुरुष क्रूर, दुष्ट तर असतोच शिवाय तो मूर्खही असला पाहिजे.

बलात्कार रोखण्याचा खात्रीशीर मार्ग अस्तित्वात नाही. मागे उल्लेख केला तशी पूर्वी पाश्चात्त्यांच्यात 'चॅस्टिटी बेल्ट' अशी कल्पना होती. धातूची बनवलेली चड्डी आणि त्याला कुलपाची सोय, या प्रकारची ती रचना असायची. नवरा बाहेर जाताना त्या कुलपाची किल्ली आपल्याकडे घेऊन जायचा. अशी धातूची चड्डी घालून 24 तास वावरणं बायकोला किती त्रासदायक असेल याची कल्पनाही करवत नाही आपल्याला.

आधुनिक काळात एकट्या स्त्रीला कुठेतरी प्रवास करण्याचे प्रसंग बरेच येतात. त्यासाठी एक युक्ती मात्र आहे. पुरुषांची विकृत नजर एकट्या स्त्रीच्या शोधात असते, हे लक्षात घेऊन लांबून बघून पुरुष वाटेल असा पोषाख करावा. अशा प्रसंगी वापरण्यासाठी एक कमी वजनाचा सैलसर कोट, केस झाकण्यासाठी घडीची हॅट, मनातली घबराट डोळ्यात दिसू नये म्हणून टिंटेड बिन नंबरचा चष्मा एवढं घालून हिंडावं. तोंडावरून स्कार्फ घ्यावा. पसंत आणि शक्य असलं तर खोट्या मिशाही चालतील.

लैंगिक विकृती जगभर कमी-जास्त प्रमाणात सगळीकडे आहेत. केवळ भारतातच आहेत असं नाही. सगळीकडे एक गोष्ट एकसारखी आढळते की या पुरुषप्रधान जगात पुरुष स्वामित्वाच्या जागेवर असून जास्त अस्वस्थ आहे त्यामुळे जास्त विकृत आहे.

लग्न झाल्यानंतरही प्रत्यक्ष सेक्स पार्टनर घरात राहात असताना पुरुषांना इंटरनेटवरची बायकांची अश्लील चित्रं बघावीशी वाटत असली, सेक्स मॅगेझिन्स बघावीशी वाटत असली, ब्लू फिल्म नियमितपणी कोणी बघत असलं तर तीही विकृतीच आहे. मी एकदा-दोनदा ब्लू फिल्म्स बघितल्या आहेत. त्यानंतर मात्र मला त्या बघवल्या नाहीत इतक्या त्या घाण असतात. प्रत्यक्षात सबंध जगभर तो एक मोठा धंदा मानला जातो.

मला तरी लैंगिक शिक्षण जास्तीतजास्त लोकांनी घ्यावं याविषयी सतत प्रबोधन करत राहण्याखेरीज कुठलाही दुसरा मार्ग दिसत नाही.

●●●

# जीवनसाथ पुस्तक संच
# संपूर्ण यादी

| पुस्तक क्र. | पुस्तकाचं नाव |
|---|---|
| 1. | विवाह अभ्यास म्हणजे नेमकं काय<br>●<br>कौटुंबिक विसंवाद |
| 2. | जोडीदाराची निवड<br>●<br>लैंगिक शिक्षण |
| 3. | व्यक्तिमत्त्व विकासाचा खरा अर्थ<br>●<br>पुरुष पालकांचं शिक्षण |
| 4. | आर्थिक व्यक्तिमत्त्व<br>●<br>करीअरचं नियोजन |
| 5. | व्यवस्थापनशास्त्र – वैवाहिक आणि रोजच्या आयुष्यातलं |
| 6. | स्वावलंबन, आत्मसन्मान<br>●<br>स्त्री-पुरुष असमानतेची रूपं |
| 7. | उत्सवी प्रवृत्ती<br>●<br>लग्नसमारंभ |

| | |
|---|---|
| 8. | खरे उपयोगी संस्कार<br>●<br>सर्वांनी करण्याजोगं समाजकार्य |
| 9. | रोजच्या आयुष्यातलं तत्त्वज्ञान<br>●<br>समतोल विचारांचं महत्त्व |
| 10. | ज्येष्ठांशी संवाद<br>●<br>मृत्यूसंबंधी स्पष्ट विचार |
| 11. | समुपदेशनाच्या अनेक नव्या पद्धती<br>●<br>जीवनसाथ समुपदेशन संस्था |
| 12. | कौटुंबिक स्वास्थ्यासाठी उपाय<br>●<br>जीवनसाथमधले खेळ |

# जीवनसाथ संचामधली अनिल भागवत यांची इतर पुस्तकं

पुस्तक-1

## विवाह अभ्यास म्हणजे नेमकं काय

●

## कौटुंबिक विसंवाद

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

**1 ) विवाह अभ्यास मंडळ म्हणजे नेमकं काय?**

1. या कल्पनेची थोडक्यात ओळख 2. विवाहाचा तत्त्वज्ञानाशी संबंध 3. वैवाहिक आयुष्यासाठीची काही महत्त्वाची तत्त्वं 4. रोजच्या आयुष्यातली साधी तत्त्वं 5. भावनांविषयीचा अभ्यास 6. विचारांचं भावनेत रूपांतर 7. भावनांवर नियंत्रण 8. कुटुंबाबरोबरच्या आयुष्याचं महत्त्व 9. व्यवस्थापनशास्त्राचा उपयोग 10. कुटुंबाचं समुपदेशन 11. आपुलकी, प्रेम, या भावना व्यक्त करणं 12. नाती सांभाळण्यासाठीची तत्त्वं आणि तंत्रं 13. प्रश्न सोडवण्याची पद्धत– मिश्रगट कार्यशाळा म्हणजेच 'ग्रुप काउन्सेलिंग' वर्कशॉप्स 14. खरं बोलणं 15. पैशाबद्दलची विचारसरणी 16. स्वावलंबन आणि आत्मसन्मान 17. स्त्री-पुरुष समतेची आणि समानतेची समज 18. लोकशाहीचं मूल्य आणि स्वतंत्र किंवा एकत्र कुटुंब 19. उत्सव, समारंभ याबद्दल भूमिका 20. असणं, दिसणं आणि दाखवणं 21. आधुनिक आणि पारंपरिक 22. वैयक्तिक समुपदेशन 23. या पुस्तकासंबंधीच्या सूचना

**2 ) कुटुंबातले आणि नवराबायकोमधले मतभेद म्हणजेच कौटुंबिक विसंवाद**

1. प्रश्नाचा नेमका शोध आणि उपायाचा शोध 2. विवाहाच्या इतिहासात आणि तत्त्वज्ञानात काय सांगितलंय 3. कौटुंबिक विसंवाद या विषयातली आकडेवारी 4. विचार, भावना यांचे गट आणि नवरा-बायकोचं नातं 5. कुटुंबातली इतर नाती / एकत्र कुटुंब 6. पैशावरून वाद 7. आत्मसन्मानावरून वाद 8. मुलांसंबंधीचे वाद 9. सासर-माहेर याविषयी वाद 10. स्त्री-पुरुष समानतेची समज नसण्यावरून विसंवाद 11. आधुनिक किंवा पारंपरिक विचारांमुळे विसंवाद 12. व्यसनं आणि भांडणं 13. नवराबायको आणि कुटुंबातले समाईक धागे 14. कुटुंबासाठी वेळ देणं 15. व्यवस्थापन कौशल्यांचा वापर 16. विवाहाचा अर्थ कळणं 17. सर्वात महत्त्वाची गोष्ट– संवाद 18. राग, धमक्या, रागवारागवी, रुसणं 19. मारहाण– हिंसेचे प्रकार 20. लग्न ठरवण्याची पद्धत– सगळ्याचं मूळ 21. लग्नाचा करार 22. मानसशास्त्राची मदत 23. करण्याजोग्या गोष्टी 24. खरं प्रेम म्हणजे काय ते न समजणं 25. भांडणांचं टोक– घटस्फोट

**3 ) मी आणि शोभामधले विसंवाद**

**4 ) मी आणि शोभा यांचं सहजीवन, आम्ही काढलेले उपाय**

**5 ) राग आवरण्याचे मार्ग**

**6 ) आभार**

●

टीप : जीवनसाथ पुस्तक संचातल्या पुस्तक क्र. 2 चा सविस्तर अनुक्रम या पुस्तकाच्या सुरुवातीच्या भागात दिला आहे.

पुस्तक-3

# व्यक्तिमत्त्व विकासाचा खरा अर्थ

●

# पुरुष पालकांचं शिक्षण

## या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

### 1 ) संवादकला

1. संवादामागचं तत्त्वज्ञान 2. मानसशास्त्रातला एक महत्त्वाचा प्रयोग 3. चांगला संवाद म्हणजे काय? 4. आयुष्यभरातल्या सगळ्या नात्यांचे फक्त 3 गट 5. जोडीदाराबरोबरचा किंवा जवळच्या व्यक्तीबरोबरचा संवाद 6. संवादातल्या चुकांची उदाहरणं 7. व्यवसाय, धंदा, दुकानदारी यामधले संवाद 8. चांगला संवाद– त्यासाठीचे मार्ग आणि तंत्रं 9. संवादकलेबद्दलच्या गटचर्चा 10. संवादातल्या भाषेचा प्रश्न आणि हावभाव, हालचाली यांच्यामधून संवाद

### 2 ) व्यक्तिमत्त्व विकास

1. आत्मविश्वास– व्यक्तिमत्त्वाचा पाया 2. बाह्यरूप 3. बोलणं 4. चेहऱ्यावरचे भाव 5. चुकीच्या लकबी 6. फसवेगिरी - खोटेपणा 7. कुचाळक्या - एक विकृती 8. अंगचे कलागुण 9. छंदापासून व्यसनापर्यंत 10. शिस्त आणि व्यवस्थापन 11. आयुष्याचा संतुलित दृष्टिकोन 12. अष्टपैलू– चतुरस्त्र– अष्टावधानी व्यक्ती 13. विकासाचे दोन मार्ग 14. मिश्रगट समुपदेशनाचे व्यक्तिमत्त्वासाठी फायदे

### 3 ) खरं बोलणं – अठ्ठ्याण्णव टक्के

### 4 ) नकार देण्याची कला

### 5 ) मी केलेल्या चुका

### 6 ) मी जोडीदाराकडून/विशिष्ट व्यक्तीकडून काय शिकलो/शिकले

**7 ) इ.क्यू. ( इमोशनल कोशंट ) म्हणजेच भावनिक गुणांक**

1. भावनिक गुणांकाची (इ.क्यू.) मूळ कल्पना 2. स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या भावनांकातला फरक 3. भावनांक सुधारण्याचं शिक्षण 4. समुपदेशनातले अनुभव 5. शोभा आणि मी यांचं उदाहरण 6. भावनांक आणि समाजकार्य यांचा संबंध 7. भावनांकावर वय, आरोग्य यांचा परिणाम

**8 ) पुरुष पालकांचं शिक्षण**

1. माझं स्वतःचं लहानपण 2. पालक शिक्षणाची थिअरी आणि प्रॅक्टिस 3. शोभाचं आणि माझं पालक-शिक्षणातलं काम 4. मूल कशासाठी? 5. मुलाची शारीरिक वाढ 6. सर्वसाधारण पुरुष पालकाची सध्याची वागणूक 7. पालकत्वाचे नवे प्रश्न / उपायांचा शोध 8. मुलांना अपमानास्पद वागणूक 9. मुलं बिघडण्याची कारणं 10. आईवडलांचं एकमेकांशी नातं 11. आजोबांची भूमिका 12. शिक्षण-शाळा-अभ्यास-समुपदेशन 13. मुलांचा भाषाविकास 14. मुलांना केलेल्या शिक्षा 15. मुलांना स्वच्छतेचं शिक्षण 16. मुलांसाठी लैंगिक शिक्षण 17. मुलांसाठी वेळ काढणं 18. मुलांची पैशाबद्दलची समज 19. मुलांचे खेळ - आरोग्य 20. मुलांमुळे करिअरमधे खंड 21. भावंडांचे संबंध 22. समाजाचं मुलांकडे दुर्लक्ष 23. संस्कार 24. 'स्पेशल' मुलं 25. तरुणांचे पालक म्हणून जबाबदाऱ्या 26. पालकत्वामागचा समतोल विचार

**9 ) आभार**

●

पुस्तक-4

# आर्थिक व्यक्तिमत्त्व

●

# करीअरचं नियोजन

## या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---


**1 ) पैशाबद्दलची विचारसरणी**

1. पैशाबद्दलच्या विचारसरणीची प्रक्रिया 2. विवाहापूर्वी आर्थिक व्यक्तिमत्त्वाची पारख 3. मिश्रगट कार्यशाळा– प्रश्नावलीचा उपयोग 4. कामाचं स्वरूप आणि करिअर प्लॅन 5. मिळवती बायको 6. पिढीतला फरक 7. गरिबीमुळे येणारी समृद्धी 8. उसनवारी, कर्ज, परतफेड 9. बचतीच्या सवयी 10. प्रामाणिकपणा– रास्त भूमिका 11. मध्यमवर्गीय असण्याचे फायदे 12. मोह, फसणं, फसवणं 13. दातृत्व, 14. भ्रष्टाचार– काळा पैसा 15. व्यसनं 16. पैशाबद्दलचा कौटुंबिक सुसंवाद-विसंवाद 17. आर्थिक विषमता– देशाची धोरणं

**2 ) शिक्षण आणि करिअर**

1. सध्याची परिस्थिती 2. परीक्षांची पद्धत 3. शिक्षणाची योग्य पद्धत 4. शैक्षणिक इमारती, इतर सोयी 5. वैवाहिक आयुष्यात शिक्षणाचं महत्त्व 6. आयुष्यात करिअरचं महत्त्व 7. जीवनशिक्षणासाठी योग्य मार्ग 8. करिअरचं नियोजन आणि बदल 9. भागीदारीतली करिअर 10. तीन मिनिटांचा खेळ

**3 ) परदेश**

**4 ) बचत**

1. बचत 2. विमा

**5 ) आभार**


●

पुस्तक-5

# व्यवस्थापनशास्त्र – वैवाहिक आणि रोजच्या आयुष्यातलं

## या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

**1 ) विवाह आणि रोजचं आयुष्य यातलं व्यवस्थापन**

1. व्यवस्थापनाचं आयुष्यात महत्त्व 2. थिअरी आणि प्रॅक्टिस 3. विवेकनिष्ठ विचारसरणी– थंड डोक्यानी विचाराची क्षमता 4. आत्मसन्मान आणि नियोजन 5. वैवाहिक आयुष्यातलं व्यवस्थापन 6. कुटुंब आणि व्यवस्थापनशास्त्र 7. कायदे, नियम, संकेत पाळण्याचं महत्त्व 8. संस्था आणि लोकांबरोबर काम 9. कामावर नेमलेल्यांशी लोकशाहीनी वागणं 10. काम न होण्याची कारणं 11. अग्रक्रम ठरवणं, एकाग्रता आणि कल्पकता 12. शारीरिक थकवा– मानसिक थकवा– उपाय 13. जबाबदारी, बेपर्वाई आणि तज्ज्ञसत्ता 14. प्रशिक्षण 15. कामाआधीची तयारी– कामाच्या टप्प्याचं नियोजन 16. उलगडा - एक महत्त्वाची गोष्ट 17. पैशाचे व्यवहार - कराराचं महत्त्व 18. भरवशाची वागणूक - डायरी सिस्टिम 19. नकारात्मक विचारांची तयारी 20. लिहिण्याचं महत्त्व 21. अतिजलद बांधकामाचं तंत्र 22. वेळ पाळणं 23. बक्षीस आणि शासन 24. व्यवस्थापनशास्त्र आणि इतर व्यवसाय 25. फोन, मोबाईल फोन आणि व्यवस्थापनशास्त्र 26. कामाचा दर्जा : वस्तूंचं व्यवस्थापन आणि सुबकपणा 27. बांधकामाचा दर्जा बद्दलच्या गैरसमजुती 28. खाद्यपदार्थांचा दर्जा 29. वागणुकीचा दर्जा 30. पोशाख आणि त्याचे खिसे 31. बॅगचा वापर 32. घरातल्या वस्तू 33. लिखाणाची शिस्त, सुबकपणा 34. टॉलरन्स म्हणजेच सवलती 35. चेकलिस्ट 36. व्यवस्थापनाची कार्यशाळा

**2 ) आभार**

●

पुस्तक-6

# स्वावलंबन, आत्मसन्मान

●

# स्त्री-पुरुष असमानतेची रूपं

## या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---


**1 ) स्वावलंबन आणि आत्मसन्मान**

1. लेखामागची मूळ कल्पना 2. समाजाची सध्याची परिस्थिती 3. इतर सजीव सृष्टी, वनस्पती, प्राणी आणि मानव 4. स्वावलंबन आणि पालकत्व 5. स्वावलंबन आणि वैवाहिक आयुष्य 6. रोजच्या आयुष्यातलं स्वावलंबन 7. स्वावलंबन, आत्मसन्मान आणि तत्त्वचिंतन 8. पैशाबद्दलचं स्वावलंबन 9. आजारपण, म्हातारपण यातलं स्वावलंबन 10. काही खास उदाहरणं 11. स्वावलंबन आणि भेटवस्तू, बक्षीशी, भीक वगैरे 12. निष्कर्ष

**2 ) लोकशाहीची समज आणि रोजचं कौटुंबिक आयुष्य**

**3 ) एकत्र किंवा स्वतंत्र कुटुंब**

**4 ) अंतिम निर्णय कोणाचा?**

**5 ) स्त्री-पुरुष समानतेच्या प्रवासातली असमानतेची रूपं**

1. गर्भधारणेपासून 5 व्या वर्षांपर्यंतची असमानता 2. अपत्याच्या 5 ते 10 वयामधली असमानता 3. अपत्याचं वय 10 वर्षांच्या पुढे ते शिक्षण पूर्ण करून कमवायला लागेपर्यंतची असमानता 4. नोकरी, धंदा, व्यवसायात, 'मिळवती बायको' या विषयातली असमानता 5. घरच्या आणि समाजातल्या वातावरणातली असमानता 6. लग्न ठरवतानाची असमानता 7. प्रत्यक्ष लग्न समारंभातली असमानता 8. लग्नानंतरचं एक ते दीड वर्ष किंवा मूल झाल्यावरची असमानता 9. पालकत्वातली असमानता 10. आपल्या मुलांच्या लग्नाच्या वेळची असमानता 11. म्हातारपणातली असमानता 12. जोडीदाराच्या मृत्यूनंतरची असमानता 13. स्त्री-पुरुष समानतेच्या प्रवासाच्या अभ्यासाचा निष्कर्ष

**6 ) आभार**


●

पुस्तक-7

# उत्सवी प्रवृत्ती

●

# लग्नसमारंभ

## या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---


**1 ) आयुष्यातले आनंद**

1. आयुष्यातल्या आनंदाबद्दलचं तत्त्वचिंतन 2. शरीराविषयीचे आनंद 3. पैसे आणि चरितार्थाविषयीचे आनंद 4. स्त्री-पुरुष संबंधांबद्दलचे आनंद 5. आत्मसन्मानासंबंधीचे आनंद 6. सौंदर्य, कला, खेळ यातून मिळणारा आनंद 7. मित्र आणि कुटुंबीयांसंबंधीचे आनंद 8. अभिमान न वाटण्याजोगे आनंद 9. आनंदाचे अनुभव– लक्षात ठेवण्याच्या गोष्टी

**2 ) उत्सवी प्रवृत्ती**

1. मुळातली मानसिक बैठक 2. वाढदिवस

**3 ) लग्नसमारंभ**

1. लेखामागची मूळ कल्पना 2. जोडीदाराच्या शोधासाठी, हौसेसाठी 3. लग्नसमारंभाच्या आधीची तयारी 4. लग्नसमारंभामागची व्यावहारिक कारणं 5. भेटवस्तू प्रकरण 6. परंपरांचा पगडा - मुहूर्त, विधी वगैरे 7. लग्नसमारंभातली स्त्री-पुरुष असमानता 8. लग्नसमारंभामधली सामाजिक अनैतिकता 9. लग्नसमारंभ आणि पर्यावरणाची हानी 10. अपरिपक्व विचार 11. रास्त पद्धतीचे विवेकनिष्ठ प्रयत्न

**4 ) विवाहाच्या लेखी कराराची कल्पना**

**5 ) आभार**


●

पुस्तक-8

# खरे उपयोगी संस्कार

●

# सर्वांनी करण्याजोगं समाजकार्य

## या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

**1 ) दैवी शक्तींविषयी सत्यशोधकाची भूमिका**

1. ईश्वर इत्यादी पॅकेज मधून मुक्ती 2. जन्मापासून पॅकेजबद्दलचे प्रश्न 3. पॅकेजबद्दल स्वतःची भूमिका 4. सध्याच्या प्रश्नांना उपाय 5. तत्त्वज्ञानाची गोडी 6. माणसांचे प्रकार 7. विवेकनिष्ठतेचे निकष 8. खरा मार्ग

**2 ) ईश्वरवादाबद्दलचा समतोल विचार**

1. सर्वांत महत्त्वाची गोष्ट 2. ईश्वर या कल्पनेचा जन्म आणि कल्पनाविस्तार 3. देव एक का अनेक 4. ईश्वराची भीती– चूप बस संस्कृती 5. मूर्तिपूजा 6. ईश्वर– एक वैयक्तिक कल्पना 7. ईश्वरवादाचे प्रसारक– ईश्वराचे दलाल, व्यापारी 8. दैवी शक्तींचे इतर प्रकार 9. विवाहाचा, एकूण आयुष्याचा ईश्वराशी संबंध 10. प्रार्थना 11. जगातली परिस्थिती 12. भूत, पिशाच्च, करणी वगैरे 13. रास्त, विवेकनिष्ठ, समतोल विचार

**3 ) धर्माविषयी समतोल विचार**

**4 ) जातीविषयी समतोल विचार**

**5 ) पुनर्जन्माविषयी समतोल विचार**

**6 ) नशीब, ज्योतिष-पत्रिका याबद्दल समतोल विचार**

**7 ) शपथ– शुभ-अशुभ याबद्दल समतोल विचार**

**8 ) रूढी– परंपरा– चालीरीती– व्रतवैकल्यं– कर्मकांडांबद्दल चर्चा**

1. या लेखामागची मूळ कल्पना 2. सध्याची रूढींबद्दलची परिस्थिती 3. दैवी शक्तींवरचा विश्वास 4. नाट– पायगुण, शकुन वगैरे 5. बारसं, वाढदिवस, मुंज

इत्यादी 6. खाण्यापिण्याबद्दलच्या रूढी 7. लग्नसमारंभाशी जोडलेल्या रूढी 8. पोषाखाच्या रूढी 9. हिंसा-अहिंसा 10. नमस्कारासंबंधी रूढी 11. सामाजिक कार्यक्रमातल्या रूढी 12. रूढीमधले झालेले आणि करण्याजोगे बदल 13. पाप-पुण्य, मृत्यूसंबंधीच्या रूढी 14. कुटुंबकारणातल्या आणि सामाजिक अधिकाराच्या रूढी 15. काय बदल करता येतील?

### 9 ) आधुनिक-पारंपरिक म्हणजे नेमकं काय?

1. या लेखामागची कल्पना 2. बाह्यरूपातली पारंपरिकता किंवा आधुनिकता 3. मनातली आणि विचारातली पारंपरिकता किंवा आधुनिकता 4. निष्कर्ष

### 10 ) खरे संस्कार म्हणजे नेमकं काय?

1. आहाराविषयीचे संस्कार 2. आरोग्याविषयीचे संस्कार 3. पोषाखाविषयीचे संस्कार 4. निवाऱ्यासंबंधीचे संस्कार 5. विवाहासंबंधीचे संस्कार 6. मुलांवरचे संस्कार 7. पैशांबद्दलचे संस्कार 8. कामाबद्दलचे संस्कार 9. अभिरुचीचे संस्कार 10. मृत्युसंबंधीचे संस्कार 11. संस्कारांबद्दल करण्याजोग्या गोष्टी

### 11 ) स्वतःची होकारांची आणि नकारांची यादी

### 12 ) समाजकार्याच्या दिशा

1. या लेखामागची कल्पना 2. 'फंडिंग' असलेली कामं 3. सामाजिक प्रथा बदलण्याची कामं 4. धार्मिक प्रकारची सामाजिक कामं 5. शिक्षणक्षेत्रासाठी सामाजिक कामं 6. बालकांच्या हक्कांसंबंधी कामं 7. पत्रकारितेमधून सामाजिक काम 8. ग्राहकहितासाठी सामाजिक काम 9. शहरी सुविधांसाठी चळवळ 10. वैद्यकीय क्षेत्रातली सामाजिक कामं 11. शिष्यवृत्त्यांसाठी, पारितोषिकांसाठी पैशाची सोय 12. नैसर्गिक आपत्तीनंतरची कामं 13. शहरांमधल्या झोपडपट्ट्यांच्यामधे काम 14. पर्यावरण रक्षण-शिक्षण 15. कोणालाही जमतील अशी साधी कामं

### 13 ) आभार

●

पुस्तक-9 (नऊ)

# रोजच्या आयुष्यातलं तत्त्वज्ञान

●

# समतोल विचारांचं महत्त्व

## या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---


**1 ) रोजच्या आयुष्यातलं तत्त्वज्ञान**

1. मूळ कल्पना 2. तत्त्वज्ञान विवेकनिष्ठ विचारसरणी आणि आयुष्य 3. तत्त्वज्ञानाचा इतिहास 4. ज्ञान देण्याचा आणि घेण्याचा आनंद 5. डॉ. ह. ना. फडणीस यांच्याबरोबरचा अभ्यास 6. ए. नागराज यांची मध्यस्थ दर्शनाची कल्पना

**2 ) पर्यावरण – साधी राहणी आणि आरोग्य वगैरे**

1. पर्यावरणाशी निगडित तत्त्वचिंतन 2. साधी राहणी 3. स्वच्छता 4. आरोग्य आणि व्यायाम 5. वैद्यकीय क्षेत्र आणि सामान्य माणूस 6. ऊर्जेची गणितं 7. पर्यावरण विषयाबद्दलचे प्रश्न 8. पर्यावरणातलं संशोधन आणि अंमलबजावणी

**3 ) सावकाश काम करणारे अपायकारक घटक आणि त्यावर उपाय**

1. या लेखामागची कल्पना 2. हवा 3. पाणी 4. अन्न 5. पेय 6. मलमूत्र 7. झोप 8. व्यसनं 9. औषधं आणि आरोग्य सुविधा 10. व्यायाम 11. शिक्षण 12. कपडे 13. सौंदर्यप्रसाधनं 14. काम 15. प्रवास 16. पैसे 17. उपकरणं 18. तंत्रज्ञान 19. करमणूक 20. प्रसारमाध्यमं 21. कुटुंबातला बेबनाव 22. सारांश

**4 ) इतर महत्त्वाचे प्रश्न**

1. शहरीकरण 2. जनमानस ट्रस्ट 3. तज्ज्ञसत्ता 4. माणसांचे वैचारिक प्रकार – सा प बं द 5. देशाटन 6. भाषा 7. प्रसारमाध्यमं 8. खरं आणि न्याय्य 9. दुष्टाशी गाठ 10. सामाजिक संघटनांमागचं तत्त्वज्ञान

5 ) सरकार

6 ) राजकीय लोकशाही

7 ) बहुमत

8 ) सहकारी संस्था

9 ) राजकारण

10 ) निवडणूक

11 ) राष्ट्र

12 ) राष्ट्रीय एकात्मता, विश्वबंधुत्व/विश्वशांती

13 ) कायदा आणि पोलीस यंत्रणा

14 ) स्वतःच्या आयुष्याविषयी समतोल विचार

15 ) आभार

●

पुस्तक-10

# ज्येष्ठांशी संवाद

●

# मृत्यूसंबंधी स्पष्ट विचार

## या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

**1 ) ज्येष्ठांशी संवाद**

1. पिढीतल्या फरकाचा अभ्यास कशासाठी? 2. सध्याची परिस्थिती 3. मुलांच्या लग्नाविषयी ज्येष्ठांची भूमिका 4. लग्न जुळवणारे मध्यस्थ 5. पारंपरिक संस्कार 6. पैशाबद्दलच्या विचारसरणीतला फरक 7. आहारामधले फरक 8. सामाजिक जाणिवेतला फरक 9. एकत्र का विभक्त कुटुंब? 10. स्वावलंबनाविषयी दृष्टिकोनात फरक 11. घरातल्या सोयी 12. स्वतःच्या मुलांच्या संसारात लक्ष 13. पालकत्वाविषयीचा दृष्टिकोन 14. प्रेमाची समज 15. मैत्रीबद्दलच्या कल्पना 16. भाषेचे प्रश्न 17. संवादकलेची समज 18. आधुनिक साधनं 19. आधुनिक दृष्टिकोन 20. म्हातारपणाची समज 21. मृत्युपत्र 22. निष्कर्ष

**2 ) नकारात्मक विचारांची शक्ती**

1. मूळ भूमिका 2. मृत्युपत्राचा नमुना (विल) 3. इच्छामरण पत्र (लिव्हिंग विल)

**3 ) मृत्यूविषयी स्पष्ट विचार**

1. म्हातारपणापासून मृत्यूपर्यंतचा प्रवास 2. जवळच्या नातेवाइकांची आजारपणं आणि मृत्यू 3. जोडीदाराच्या मृत्यूविषयी स्पष्ट विचार 4. स्वतःच्या मृत्यूविषयी स्पष्ट विचार

**4 ) आभार**

●

पुस्तक-11

# समुपदेशनाच्या अनेक नव्या पद्धती

●

# जीवनसाथ समुपदेशन संस्था

## या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

**1 ) जीवनसाथचा आणि आमचा अभ्यास प्रवास**

1. विवाह अभ्यास मंडळाची सुरुवात 2. मार्ग शोधताना

**2 ) ग्रुप काउन्सेलिंग**

1. या लेखामागची मूळ कल्पना 2. ज्ञान मिळवण्याच्या पायऱ्या, प्रकार आणि मर्यादा 3. विचार आणि भावना साठवण्याची क्षमता 4. काउन्सेलिंगचे इतर प्रकार– त्यांच्या मर्यादा 5. ग्रुपमधे केव्हा दाखल व्हावं? 6. ग्रुपमधले चर्चेचे विषय 7. ग्रुपमधल्या प्रश्नावल्या 8. ग्रुप चालवण्याच्या पद्धतीबद्दल 9. व्यवस्थापनशास्त्राची मदत 10. ग्रुपचे संस्कार - विवाहाचा खरा अर्थ 11. लग्नानंतरचं दोघांचं स्वतंत्र विश्व 12. ग्रुपचा उपयोग– 'सपोर्ट ग्रुप' 13. ग्रुप काउन्सेलिंगमधल्या अडचणी 14. विवाहासंबंधीची इतर कामं 15. निष्कर्ष

**3 ) निवडक गटाचं सहसमुपदेशन ( को-काऊन्सेलिंग )**

**4 ) विवाह अभ्यास मंडळ ते अभ्यास मंडळ**

1. सध्याची परिस्थिती आणि या लेखामागची मूळ कल्पना 2. या एकूण विषयाचे भाग 3. या पुस्तकाबद्दलची धोरणं आणि कारणं 4. एक परिणामकारक मार्ग– अभ्यास मंडळ 5. जीवनसाथशी निगडित इतर तज्ज्ञ 6. सामान्य माणसाचा दृष्टिकोन – एक महत्त्वाची गोष्ट 7. तत्त्वज्ञानाची शिकवण 8. मानसशास्त्राची मदत 9. व्यवस्थापनशास्त्राची देणगी 10. डोळे उघडणारे आकडे 11. पिढीपिढीतला फरक 12. वैयक्तिक समुपदेशनाचं काम

**5 ) वैयक्तिक समुपदेशन**

1. या लेखाची मूळ कल्पना 2. घरातल्या किंवा ओळखीतल्या ज्येष्ठांचा सल्ला 3. मार्गदर्शन आणि समुपदेशनातला फरक 4. समुपदेशनातली मूलतत्त्वं किंवा गृहितं 5. भारत आणि पाश्चात्त्य देशातली परिस्थिती 6. समुपदेशकाची खास कौशल्यं– ऐकणं, बोलणं 7. समुपदेशनाची सुरुवात आणि प्रगती 8. समुपदेशकानी स्वतःविषयी सांगणं 9. समुपदेशनाचे प्रकार 10. क्रिटिकल ॲनॅलिसिस पद्धतीचं समुपदेशन 11. आत्मविश्वास वाढविण्यासाठी समुपदेशन 12. समुपदेशनातली तंत्रं 13. समुपदेशनातली पथ्यं 14. समुपदेशनातल्या अडचणी 15. समुपदेशकांच्या श्रेणी 16. विवाहपूर्व समुपदेशन 17. घटस्फोटापूर्वीचं समुपदेशन 18. ग्रुप काऊन्सेलिंग– एक उत्तम पर्याय 19. निष्कर्ष

**6 ) रिफर्ड काऊन्सेलिंग ऊर्फ अप्रत्यक्ष समुपदेशन किंवा कॅरम बोर्ड काऊन्सेलिंग**

**7 ) जागा-पद्धत-व्यवहार, सूत्रधार तयार करणं वगैरे**

**8 ) या पुस्तकाचा उपयोग**

**9 ) अभ्यास मंडळात न येण्याची कारणं**

**10 ) आभार**

●

पुस्तक-12

# कौटुंबिक स्वास्थ्यासाठी उपाय,

●

# जीवनसाथमधले खेळ

## या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

**1 ) व्यक्तिमत्त्वाचे सहा प्रकार**

**2 ) व्यक्तिमत्त्वाचे सोळा प्रकार**

**3 ) व्यक्तिमत्त्वाचे दोन प्रकार**

**4 ) विवाहितांच्या मुलाखती**

**5 ) क्रिटिकल ॲनॅलिसिस - काउन्सेलिंग**

1. या पद्धतीमागची मूळ कल्पना 2. वास्तववादी विचारांची चाचणी 3. नमुना प्रश्नांचं क्रिटिकल ॲनॅलिसिस 4. क्रिटिकल ॲनॅलिसिस - उपयोगी तक्ते

**6 ) स्वतःच्या आयुष्यातले निराशेचे प्रसंग-उपाय म्हणजेच 'सेल्फ काउन्सेलिंग'**

**7 ) समुपदेशनाची उदाहरणं ( केस स्टडीज )**

**8 ) सूत्रसंचालन करण्याचं प्रशिक्षण**

**9 ) खेळ**

1. या विषयाबद्दलच्या लिखाणाचा उद्देश 2. काही महत्त्वाचे अर्थपूर्ण खेळ 3. चेंडूचे खेळ 4. कागद आणि पुठ्ठ्याचे खेळ 5. रुमालाचे खेळ 6. इतर वस्तू वापरून खेळ 7. वस्तूंशिवाय केवळ शारीरिक हालचालींचे खेळ 8. केवळ हात वापरण्याचे खेळ 9. विवाहासंबंधीचे आणि आयुष्यासंबंधीचे फक्त बोलण्याचे खेळ 10. बोलण्याचे इतर खेळ 11. गोलचर्चेचे खेळ 12. प्रसंग चर्चा 13. विधानावर चर्चा 14. स्वतःविषयी बोलण्याचे खेळ 15. एक महत्त्वाचा खेळ – कॅटॅगरीज

**10 ) मानसोपचारतज्ज्ञाची गरज ( सायकायाट्रिक ट्रीटमेंट )**

**11 ) यापुढच्या कामाच्या दिशा**

**12 ) आभार**

●

# अनिल भागवत यांनी लिहिलेली आणखी पुस्तकं

पुस्तक-1

## घर पाहावं बांधून (पाचवी आवृत्ती)

■ प्रस्तावना ■ प्रमोटर बिल्डर्सविषयी ■ आर्किटेक्टस्‌विषयी ■ बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टरविषयी ■ आर. सी. सी. डिझायनरविषयी ■ मटेरियल सप्लायरविषयी ■ बांधकाम कामगारांविषयी ■ पेटी कॉन्ट्रॅक्टर्सविषयी ■ गळणारं छप्पर ■ अॅग्रीमेंटवर सही ■ सिस्टिम बिल्डिंग ■ बांधकाम आणि सरकार ■ बांधकाम, कर्ज, सरकारी कर आणि आपण ■ कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट कन्सल्टंटविषयी ■ बांधकामातले तांत्रिक शब्द आणि चेकलिस्ट

---

पुस्तक-2

## लग्न पाहावं करून (उपलब्ध नाही)

---

पुस्तक-3

## व्यवस्थापनशास्त्र तुमच्यासाठी (दुसरी आवृत्ती)

■ मॉनिटरिंग मॅनेजमेंट - एक आवश्यक व्यवस्थापनशास्त्र ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंटची मूलतत्त्वं ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंटमधल्या महत्त्वाच्या गोष्टी आणि फायलिंग ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंट आणि कामगार ■ क्वालिटी मॅनेजमेंट आणि सुपरवायझर ■ स्पीड मॅनेजमेंट - एक जादूसारखं तंत्र ■ कॉस्ट मॅनेजमेंट ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंट आणि इतर तज्ज्ञ ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंट आणि मालक ■ डिझास्टर मॅनेजमेंट - आपत्ती निवारणशास्त्र ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंट - मोहीम फत्ते करण्याचं शास्त्र ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंट - बहुउपयोगीशास्त्र ■ तुम्ही कोणीही असा - ते वापरता येईल

●

## लेखक अनिल भागवत यांचे ऋणी आहेत.

- डॉ. उल्हास लुकतुके - 1997 साली जीवनसाथ सुरू करताना स्पष्ट विचारांची जीवनभर साथ हा उद्देश स्पष्ट होता, पण त्याची सुरुवात करण्यासाठी यांची खूप मदत झाली.
- जीवनसाथ - मुंबई शाखा माझ्या आईसाठी सुरू केली. मुंबईतल्या लोकांना या अभ्यासाची प्रचंड गरज होती, अजूनही आहे. तिच्या घरीच कार्यक्रम व्हायचे.
- मुंबई जीवनसाथचा भक्कम आधार होता सुशील आणि विनीता हाटे. त्यांची निष्ठा, संयोजनकौशल्य आणि आमची वैयक्तिक मैत्री मला खूप महत्त्वाची वाटते.
- पुण्यातलं जीवनसाथ अभ्यास मंडळ पहिल्या दिवसापासून जोरातच चाललं. बरीच वर्षं ते शनिवार पेठेतल्या आमच्या घरी होतं. आता आमच्याच कर्वेनगरच्या घरी अभ्यास मंडळ चालतं. गेली दोन वर्षं मी हा पुस्तकसंच लिहीत असताना मला अनेकांनी मदत केली. त्यातल्या काहींनी या पुस्तकांसाठी काही विषयांसाठी मजकूर लिहिला, काहींनी टायपिंगची, डिक्टेशन घेऊन लिहिण्याची मदत केली. मजकुरावरच्या त्यांच्या प्रतिक्रियादेखील महत्त्वाच्या होत्या. त्यांची नावं मी आडनावाच्या आद्याक्षरांच्या क्रमानी देतोय. ती आद्याक्षरं इंग्लिश अल्फाबेटाप्रमाणे रचली आहेत.

  बोकील डॉ. आशा, बोरोटीकर तुषार, भोइटे आमोद, दंडवते मानसी, डिंबळे रामभाऊ, देगवेकर दिलीप, देशपांडे केशव, देवराज शिल्पा, गोवित्रीकर सुनीति, जाधव विजय, कानेटकर श्रद्धा, कुळकर्णी पौर्णिमा,

क्षेमकल्याणी ममता, लिमये हर्षद, लिमये गौरी गोळे, मेढेकर शैवल, मोहाडीकर डॉ. लीना, मुद्‌गल दीपा, मुद्‌गल स्मिता, मुळे अंजली, म्हैसकर मकरंद, नागपूरकर माधव, पाटणकर राजेश, पाटील मोहिनी, पाटील स्मिता, पाटील विक्रांत, राऊळ श्यामल, रावराणे गीता, साठे आशा, शुक्ल डॉ. भूषण, संचेती अपूर्वा, संचेती आदिती, वळसंगकर अनिल, तेलंग डॉ. नीलू.

- जीवनसाथ अभ्यास मंडळाचे सगळे सभासद. जीवनसाथ समुपदेशन केंद्राचे सगळे समुपदेशनार्थी.
- शोभा तर या पुस्तकसंचाच्या थोड्या भागाची सह-लेखिकाच आहे. मी आमच्या वैवाहिक आयुष्यात तिच्यावर केलेल्या अन्यायाचा मी अनेक ठिकाणी उल्लेख केलाच आहे. शिवाय या पुस्तक-प्रक्रियेच्या दोन वर्षांच्या काळातही तिच्या मदतीशिवाय, टीकेशिवाय, सूचनांशिवाय आणि प्रोत्साहनाशिवाय मी इथपर्यंत पोचलोच नसतो.

  शोनील आणि आभामुळे तर जीवनसाथ संस्था सुरू झाली. अनास्तेसिया, श्रेयस आणि आमची नातवंडं ओजस, तुहिन आणि डॉमिनिक यांना पुढे त्यांच्या आयुष्यात माझ्या या कार्यशाळांचा आणि त्याबद्दलच्या लिखाणाचा उपयोग व्हावा हा माझा ऊर्जास्रोत होता.
- हे पुस्तक या अवस्थेपर्यंत आणण्यात श्री. हेमंत जोशी आणि सौ. संगीता सरदेसाई यांचा मोठा वाटा आहे.
- मी पुस्तकसंचात म्हटलं आहे तेच पुन्हा सांगतो. वाचकांच्या प्रतिक्रिया नाव, फोटो पत्त्यासह पुढच्या आवृत्तीत छापणार आहे. कौतूक, टीका दोन्हीचं स्वागत असेल. अशा प्रत्येकाचं माझ्यावर ऋण असणार आहे.

**– अनिल भागवत**

वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशक

'आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचं खरं मर्म एकच – चांगल्या-वाईट अनेक घटना तुमच्या वाट्याला आयुष्यभर येणार. त्यांची हाताळणी कशी करायची हे दुसरी कुठचीही शक्ती किंवा व्यक्ती ठरवणार नसते. ते तुम्ही स्वत: ठरवायचं असतं. त्यासाठी त्या घटनेच्या सर्व अंगांचा अभ्यास स्वत:ला करावा लागतो. त्या अभ्यासासाठी जीवनभर स्पष्ट विचारांची साथ लागते. म्हणजेच जीवनसाथ.'

## या पुस्तकाविषयी

लग्नाचं योग्य वय काय, या प्रश्नाचं उत्तर आकड्यात देणं योग्य नाही. खरं उत्तर असं आहे की, विचार परिपक्व असतील तर कायद्यानी परवानगी दिल्यापासून पुढे केव्हाही लग्न करावं.

महाराष्ट्रात लाखो तरुण-तरुणी योग्य जोडीदाराच्या शोधात दारोदार भटकतायत. त्यांना प्रश्न सोडवण्याचा खराखुरा मार्ग लेखकानी दाखवलाय. आत्तापर्यंत लैंगिक शिक्षण देणारी वैद्यकीय क्षेत्रातल्या अनेकांची पुस्तकं आहेत. पण त्यातला मानस-शास्त्रीय भाग उलगडून सांगणारं हे पहिलंच पुस्तक आहे. त्याखेरीज वैशिष्ट्य म्हणजे हे जोडप्यानी दिलेलं लैंगिक शिक्षण आहे.